[illegible]

V(M)

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला : पुष्प १६ वें

# भारतीय संस्कृति

लेखक
साने गुरुजी, एम्. ए.

विद्ययामृतमश्नुते

पंचमावृत्ति : १९५० ]

[ साधी प्रत रु. २
अर्धकापडी रु. २॥

प्रकाशक :
रघुनाथ गणेश जोशी
सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला
टिळक रोड, पुणें २

Gift
BK-3638
B
131·7
.S2

संपादक
आचार्य शं. द. जावडेकर
आचार्य स. ज. भागवत

[ मराठी आवृत्तीचे सर्वाधिकार प्रकाशकाचे अधीन. शेषाधिकार श्री. मो. ग. पुसाळकर, वकील, अमळनेर, यांचे अधीन. ]

THE UNIVERSITY LIBRARY
The Maharaja Sayajirao University of Baroda
Call No. B 131·7 .S2
BK-3638

प्रथमावृत्ति : १९३७
द्वितीयावृत्ति : १९४३
तृतीयावृत्ति : १९४४
चतुर्थावृत्ति : १९४६
पंचमावृत्ति : १९५०

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार, पुणें २

# प्रस्तावना

UNIVERSITY LIBRARY
UNIVERSITY OF BARODA

एका सामान्य माणसानें सामान्य जनांकरितां लिहिलेलें हें पुस्तक आहे. या पुस्तकांत पांडित्य नाहीं, विद्वत्ता नाहीं. शेंकडों ग्रंथांतील आधार व संदर्भवचनें वगैरे येथें कांहींएक नाहीं. येथें प्राच्यविद्याविशारदत्व नाहीं, गहनगंभीर-गूढ असें कांहींएक नाहीं. या पुस्तकांत एक विशिष्ट दृष्टि मात्र आहे. यांत भारतीय संस्कृतीचा इतिहास नाहीं. कलाक्षेत्रांत वा ज्ञानविज्ञानाच्या क्षेत्रांत, व्यापारांत वा राजकारणांत आम्ही कसे पुढारलेले होतों, त्याची माहिती येथें नाहीं. चंद्रगुप्त व अशोक, कालिदास व तानसेन, आर्यभट्ट व भास्कराचार्य यांचे अभिनव इतिहास येथें नाहींत. भारतीय संस्कृतीच्या आत्म्याशीं येथें [illegible] आहे. तिच्या अंतरंगाचें येथें दर्शन आहे. भारतीय संस्कृतीच्या गाभाऱ्यांत प्रवेश आहे.

"भारतीय संस्कृति" हा शब्दसमुच्चय आपण अनेकदां ऐकतों. 'हें भारतीय संस्कृतीस शोभत नाहीं,' 'हें भारतीय संस्कृतीस हानिकारक आहे' वगैरे वाक्यें लेखांत वा भाषणांत आपणांस वाचावयास व ऐकावयास मिळतात. अशा वेळेस "भारतीय संस्कृति" या शब्दांचा अर्थ काय असतो? तेथें भारतीय संस्कृतीचा इतिहास अभिप्रेत नसतो. भारतीय संस्कृतीची जी एक विशेष दृष्टि ती तेथें अभिप्रेत असते. ही दृष्टि कोणती? भारतीय संस्कृतीची ही दृष्टि दाखविण्याचा येथें मीं प्रयत्न केला आहे.

मीं अनेक ठिकाणीं व्याख्यानांतून वा प्रवचनांतून या पुस्तकांतलि विचार मांडले होते. पुष्कळ श्रोते मला म्हणत, "हे विचार तुम्ही लिहून कां काढीत नाहीं?" त्यांच्या समाधानासाठीं हे लहानमोठे निबंध लिहून काढले आहेत. भारतीय संस्कृतीच्या अनंत छटा येथें दाखवितां येणें शक्य नव्हतें. हें अर्धस्फुट दर्शन आहे.

या पुस्तकांतील अनेक विचार मीं दुसऱ्या थोरांपासून ऐकले आहेत. माझ्या हृदयांतील जन्मजात भावना त्यामुळें विकसित झाल्या आहेत. वर्ध्याच्या सत्याग्रहाश्रमांतील आचार्य पूज्य विनोबाजी यांचे अनेक मोलवान् विचार या पुस्तकांत आले आहेत. कर्म, ज्ञान, भक्ति, कर्मफलत्याग, अहिंसा, वगैरे प्रकरणांत त्यांच्यापासून जें भक्तिप्रेमानें ऐकलें, तें सारांशानें मीं लिहिलें आहे. अर्थात् जें जें मीं लिहिलें आहे त्याबद्दल ते जबाबदार नाहींत. त्यांनीं पेरलेलीं, परंतु माझ्या बुद्धींत व हृदयांत वाढलेलीं हीं बीजें आहेत. त्यांतील वेडेवाकडेपणा हा माझा आहे. त्यांतील सत्यता त्या थोरांची आहे.

भारतीय संस्कृति हृदय व बुद्धि यांची पूजा करणारी आहे. उदार भावना व निर्मळ ज्ञान यांच्या योगानें जीवनास सुंदरता आणणारी ही संस्कृति आहे. ज्ञानविज्ञानास हृदयाची जोड देऊन संसारांत मधुरता पसरूं पाहणारी ही संस्कृति आहे. भारतीय संस्कृति म्हणजे कर्म-ज्ञान-भक्तीचा जिवंत महिमा. शरीर, बुद्धि व हृदय यांना सतत सेवेंत झिजविण्याचा महिमा.

भारतीय संस्कृति म्हणजे सहानुभूति. भारतीय संस्कृति म्हणजे विशालता. भारतीय संस्कृति म्हणजे सत्याचे प्रयोग. भारतीय संस्कृति म्हणजे स्थाणु न राहतां सारखें ज्ञानाचा मागोसा घेत पुढें जाणें. जगांत जें जें कांहीं सुंदर, शिव व सत्य दिसेल, तें तें घेऊन वाढणारी ही संस्कृति आहे. जगांतील सारे ऋषीमहर्षी ती पूजील. जगांतील सर्व संतांना ती वंदील. जगांतील सर्व धर्मस्थापकांना ती आदरील. मोठेपणा कोठेंहि दिसो, भारतीय संस्कृति त्याची पूजा करील. आदरानें व आनंदानें त्याचा संग्रह करील.

भारतीय संस्कृति संग्राहक आहे. ती सर्वांना जवळ घेणारी आहे. "सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे" असें म्हणणारी ती आहे. संकुचितपणाचें वावडें असणारी ही संस्कृति आहे. आणि म्हणूनच भारतीय संस्कृति म्हणतांच माझे हात जोडले जातात. भारतीय संस्कृति म्हणतांच सागर व अंबर या दोन महान् वस्तू माझ्या डोळ्यांसमोर उभ्या राहतात. प्रकाश व कमळ या दोन दिव्य वस्तू डोळ्यांसमोर उभ्या राहतात. त्याग, संयम, वैराग्य, सेवा, प्रेम, ज्ञान, विवेक या गोष्टी आठवतात. भारतीय संस्कृति म्हणजे सान्तांतून अनन्ताकडे जाणें, अंधारांतून प्रकाशाकडे जाणें, भेदांतून अभेदाकडे जाणें, चिखलांतून कमळाकडे जाणें, विरोधांतून विवेकाकडे जाणें, विकारांतून विवेकाकडे जाणें, गोंधळांतून व्यवस्थेकडे जाणें, आरडाओरडींतून संगीताकडे जाणें. भारतीय संस्कृति म्हणजे मेळ. सर्व धर्मांचा मेळ, जातींचा मेळ, सर्व ज्ञानविज्ञानांचा मेळ, सर्व काळांचा मेळ. अशा प्रकारचा महान् मेळ निर्माण करूं पाहणारी, सर्व मानवजातीचा मेळा मांगल्याकडे घेऊन जाऊं पाहणारी, अशी जी ही थोर संस्कृति तिचाच लहानसा—निदान मानसिक तरी—उपासक मला जन्मोजन्मीं होऊं दे. दुसरी कोणतीहि इच्छा मला नाहीं.

कृष्णाष्टमी, १८५९ }
२१ ऑगस्ट, १९३७ }

—पां. स. साने

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १ | अद्वैताचें अधिष्ठान ... ... | १ |
| २ | अद्वैताचा साक्षात्कार ... ... | ९ |
| ३ | बुद्धीचा महिमा ... ... | १८ |
| ४ | प्रयोग करणारे ऋषी ... ... | २८ |
| ५ | वर्ण ... ... ... | ३८ |
| ६ | कर्म ... ... ... | ४४ |
| ७ | भक्ति ... ... ... | ५६ |
| ८ | ज्ञान ... ... ... | ७० |
| ९ | संयम ... ... ... | ७७ |
| १० | कर्मफलत्याग ... ... | ८५ |
| ११ | गुरु-शिष्य ... ... | ९५ |
| १२ | चार पुरुषार्थ ... ... | १०३ |
| १३ | चार आश्रम ... ... | १२९ |
| १४ | स्त्रीस्वरूप ... ... | १४८ |
| १५ | मानवेतर सृष्टीशीं प्रेमाचे संबंध ... | १५९ |
| १६ | अहिंसा ... ... | १७१ |
| १७ | बलोपासना ... ... | १९१ |
| १८ | ध्येयांची पराकाष्ठा ... ... | २०४ |
| १९ | अवतार कल्पना ... ... | २१३ |
| २० | मूर्तिपूजा... ... ... | २१९ |
| २१ | प्रतीकें ... ... ... | २२९ |
| २२ | श्रीकृष्ण व त्याची मुरली ... | २४५ |
| २३ | मृत्यूचें काव्य ... ... | २५४ |
| २४ | उपसंहार ... ... | २६३ |
| | परिशिष्ट ... ... | २६५ |

# भारतीय संस्कृति

## अद्वैताचें अधिष्ठान : : १

भारतीय संस्कृतींत सर्वत्र अद्वैताचा आवाज घुमून राहिला आहे. भारतीय संस्कृतीला अद्वैताचा मंगल वास येत आहे. हिंदुस्थानच्या उत्तरेस ज्याप्रमाणें उत्तुंग गौरीशंकर शिखर उभें आहे, त्याप्रमाणें येथील संस्कृतीच्या पाठीशींहि उत्तुंग व भव्य असें अद्वैतदर्शन आहे. कैलासावर बसून ज्ञानमय भगवान् शंकर अद्वैताचा डमरू अनादि काळापासून वाजवीत आहेत. शिवाजवळच शक्ति असणार. सत्याजवळच सामर्थ्य असणार. प्रेमाजवळच पराक्रम असणार. अद्वैत म्हणजेच शिवत्व. अद्वैत म्हणजे निर्भयता. या संसारांत अद्वैताचा संदेशच सुखसागर निर्मूं शकेल.

भारतीय ऋषींनीं ही महान् वस्तु ओळखली. अद्वैताचा मंत्र त्यांनीं जगाला दिला. या मंत्राइतका पवित्र मंत्र दुसरा कोणताहि नाहीं. जगांत दुजाभाव असणें म्हणजे दुःख असणें व समभाव असणें म्हणजे सुख असणें. सुखासाठीं धडपडणाऱ्या मानवानें अद्वैताची कांस धरल्याशिवाय तरणोपाय नाहीं.

ऋषी कळकळीनें सांगत आहेत, कीं ज्याच्या ज्याच्याबद्दल तुला दुजाभाव वाटत असेल, त्याच्या त्याच्याजवळ जाऊन त्याला प्रेमानें मिठी मार.

“ सहनाववतु सह नौ भुनक्तु सह वीर्यं करवावहै
तेजस्विनावधीतमस्तु ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः ”

या थोर मंत्राचा खोल अर्थ काय ? हा मंत्र आपण एके ठिकाणींच म्हणावयाचा नाहीं. हा मंत्र सर्वत्र उच्चारावयाचा आहे व तदनुरूप वागावयाचें आहे. केवळ गुरुशिष्यांपुरता हा मंत्र नाहीं. ब्राह्मणांना ब्राह्मणेतरांबद्दल व ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांबद्दल दुजाभाव वाटत आहे का ? येऊं देत ते एके ठिकाणीं व म्हणूं देत हा मंत्र. स्पृश्य व अस्पृश्य परस्परांपासून दूर आहेत का ? येऊं देत ते जवळ-जवळ व उच्चारूं देत हा मंत्र. हिंदु-मुसलमान परस्परांस पाण्यांत पहात आहेत का ? येऊं देत ते जवळ; हातांत हात घेऊन उच्चारूं देत हा मंत्र. गुजरातेंतील

व महाराष्ट्रांतील लोक एकमेकांचा द्वेष करीत आहेत का ? येऊं देत त्यांना जवळ व उच्चारूं देत हा मंत्र.

ज्यांना एकमेकांबद्दल दुजाभाव वाटत नाहीं, त्यांच्यासाठीं हा मंत्र नाहीं. दुजाभाव दूर करण्यसाठीं हा मंत्र आहे. जगांत सर्वत्र दिसून येणाऱ्या दुजाभावाचा अंधार दूर करण्यासाठीं म्हणून ऋषींनें हा महान् दीप दिला आहे. हा दीप हातांत घेऊन आपण पाहूं या, आपले व्यवहार करूं या. आनंद प्राप्त झाल्या-शिवाय राहणार नाहीं.

अद्वैत म्हणजे 'माझ्यासारखाच दुसरा आहे' ही भावना. समर्थांनीं सारें अद्वैत-तत्त्वज्ञान माझ्या मतें एका ओवींत सांगून ठेविलें आहे. अद्वैताचें प्रत्यक्ष व्यावहारिक स्वरूप त्यांनीं त्यांत शिकवलें :

“ आपणास चिमोटा घेतला । तेणें जीव कासावीस झाला
आपणावरून दुसऱ्याला । ओळखीत जावें ”

मला कोणीं मारलें तर मला दुःख होतें. मला अन्नपाणी मिळालें नाहीं तर माझे प्राण कंठांत येतात. माझा कोणीं अपमान केला तर मेल्याहून मेल्याप्रमाणें मला होतें. मला ज्ञान मिळालें नाहीं तर मला लाज वाटते. माझ्याप्रमाणेंच दुसऱ्याला असें होत असेल. मला मन, बुद्धि, हृदय आहे. दुसऱ्यालाहि तीं आहेत. मला माझा विकास व्हावा अशी इच्छा आहे, तशीच ती दुसऱ्यालाहि असेल. माझी मान वर असावी, तशीच दुसऱ्याचीहि असणें योग्य आहे. थोडक्यांत आपणास येणाऱ्या सुखदुःखांच्या अनुभवांवरून दुसऱ्यांच्या सुखदुःखांच्या कल्पना येणें म्हणजे एक प्रकारें अद्वैत.

मला ज्या गोष्टींनीं दुःख होतें, त्या गोष्टी दुसऱ्याच्या बाबतींत मी करणार नाहीं, हा त्यापासून मनाला बोध मिळतो. मला ज्या गोष्टींनीं आनंद होतो, त्या दुसऱ्यांसहि लाभाव्यात अशी मी खटपट करीन असेंहि माझें अद्वैत मला सांगतें. अद्वैत म्हणजे अमूर्त कल्पना नव्हे; अद्वैत म्हणजे प्रत्यक्ष व्यवहार. अद्वैत म्हणजे चर्चा नव्हे; अद्वैत म्हणजे अनुभूति.

ऋषी केवळ अद्वैताच्या कल्पनेंत रमले नाहींत. सर्व जगाशीं, सर्व चराचराशीं ते एकरूप झाले. रुद्रसूक्त लिहिणारा ऋषि मानवांना काय काय लागेल त्याची काळजी वाहात आहे. सर्व मानवजातीच्या गरजा जणुं त्याला स्वतःच्या वाटत आहेत. शरीराच्या, मनाच्या, बुद्धीच्या भुका तो अनुभवीत आहे.



“ घृतं च मे, मधु च मे, गोधूमाश्च मे, सुखं च मे, शयनं च मे, ऱ्हीश्च मे, श्रीश्च मे, धीश्च मे, धिषणा च मे । ”

“ मला तूप हवें, मध हवा, गहूं हवेत, सुख हवें, आंथरूण-पांघरूण हवें, विनय हवा, संपत्ति हवी, बुद्धि हवी, धारणा हवी, मला सारें हवें.”

तो ऋषि स्वतःसाठीं हें मागत नाहीं. तो जगदाकार झाला आहे. आजु-बाजूच्या सर्व मानवांचा तो विचार करीत आहे. या मानवांना या सर्व गोष्टी केव्हां मिळतील अशी तगमग त्याला लागली आहे. पोटभर खायला, अंगभर ल्यायला या सर्व भावा-बहिणींना केव्हां मिळेल ? या सर्वांना ज्ञानाचा प्रकाश केव्हां मिळेल ? या सर्वांना सुखसमाधान कसें लाभेल, याची चिंता त्या महर्षीला लागून राहिली आहे.

समर्थांचेंसुद्धां असेंच एक मागणें आहे. राष्ट्राला जें जें पाहिजे त्याची भिक्षा प्रभूजवळ त्यांनीं त्या स्तोत्रांत मागितली आहे. त्याला “ पावनभिक्षा ” असें सुंदर नांव त्यांनीं दिलें आहे. विद्या दे, गायन दे, संगीत दे, साऱ्या हृद्य व मंगल वस्तू त्यांनीं मागितल्या आहेत.

रुद्रसूक्तांतील कवि समाजाच्या गरजा मागत आहे व त्या गरजा पुरविणाऱ्यांना तो वंदन करीत आहे. त्या ऋषीला अमंगल व अशुचि कोठेंहि इवलेंसुद्धां दिसत नाहीं.

“ चर्मकारेभ्यो नमो, रथकारेभ्यो नमो, कुलालेभ्यो नमो । ”

“ अरे चांभारा, तुला नमस्कार; अरे सुतारा, तुला नमस्कार; अरे कुंभारा, तुला नमस्कार ! ”

समाज-पुरुषाची कर्ममय पूजा करणारे हे सारे श्रमजीवी त्या थोर ऋषीला वंद्य वाटत आहेत. तो चांभाराला अस्पृश्य मानीत नाहीं, कुंभाराला तुच्छ लेखीत नाहीं, समाजाला जिवंत विचार देणाऱ्या विचारस्रष्ट्यांइतकीच मडकीं देणाऱ्यांचीहि तो योग्यता मानीत आहे.

“ There is nothing great or small,
in the eyes of God.”

“ देवाच्या दृष्टीनें समाजसेवेचें कोणतेंहि कर्म उच्च किंवा तुच्छ नाहीं.” तीं तीं सेवाकर्में करणारे सारे मंगल व पवित्रच होत.

परंतु रुद्रसूक्तांतील ऋषि सेवा करणाऱ्यांनाच वंदन करीत आहे असें

नाहीं; तर तो पतितांनाहि प्रणाम करीत आहे. मनुष्यें पतित तरी कां होतात? समाजाच्या दोषांमुळेंच तीं पतित होतात.

" स्तेतानां पतये नमो "

असें हा ऋषि म्हणत आहे. चोरांना व चोरांच्या नायकांना हा ऋषि प्रणाम करीत आहे. हा ऋषि वेडा नाहीं. चोर तरी चोरी कां करतो? श्रीमंताच्या मुलाजवळ शेंकडों खेळणीं असतात. गरिबाच्या मुलाजवळ एकहि नसतें. त्या गरिबाच्या मुलानें एकादें खेळणें चोरलें तर त्याला फटके मारतात! शेतांत मरे-मरेतों काम करणाऱ्या मजुराला जेव्हां पोटभर खायला मिळत नाहीं, तेव्हां तो धान्य चोरतो. त्याचा त्यांत काय दोष? तो चोर नाहीं. त्याला उपाशी ठेवणारा समाज चोर आहे. ऋषि कळकळून म्हणतो, " अरे चोरांनो! तुम्ही चोर नाहीं. समाज जर नीट वागेल, तर तुम्हांला चोरी करावी लागणार नाहीं. तुमच्यांतील माणुसकी मी पहात आहें. तुमच्यांतील दिव्यता मला दिसत आहे. तुमच्या आत्म्याचें वैभव दुसऱ्या दगडांना दिसलें नाहीं, तरी निर्मल दृष्टि असणाऱ्या मला तें दिसल्याशिवाय कसें राहील? "

अद्वैताचा विसर पडलेल्या समाजांत मग क्रांति होते. ईश्वर जगाला धडा देऊं इच्छितो. शेजारी भावाला, तो रात्रंदिवस श्रम करीत असूनहि राहायला नीट घर नाहीं, खायला पोटभर अन्न नाहीं; आणि मी माझ्या प्रचंड बंगल्यांत रेडिओ ऐकत बसतों. ही भारतीय संस्कृति नाहीं. भारतीय संस्कृतीचा हा खून आहे. उपाशी लोकांना पाहून दामाजीनें कोठारें उघडीं केलीं. घरांत चोरी करावयास आलेल्या माणसास एकनाथ म्हणाले, " आणखी थोडें घेऊन जा." चोरी करणाऱ्या माणसास पाहून आपणांस आपली लाज वाटली पाहिजे. आपल्या समाजाची चीड आली पाहिजे.

अद्वैत म्हणजे थट्टा झाली आहे. भरल्या पोटीं अद्वैताची चर्चा करीत बसतात, परंतु जीवनांत अद्वैत जाणणारा भगवान् बुद्ध वाघिणीला उपाशी व आजारी पाहून तिच्या तोंडांत मांडी देतो. अद्वैताचा अनुभव घेणारा तुलसीदास झाड तोडणाऱ्यापुढें आपली मान करतो व तें फुलणारें, फळणारें, छाया देणारें चैतन्य-मय झाड राखूं पाहतो. अद्वैताचा अनुभव घेणारा कमाल गवत कापण्यासाठीं रानांत गेल्यावर

" सुटे मंद वारा डुले सर्व रान "



असें दृश्य पाहून विरघळतो. 'नको रे कापूं, नको रे कापूं' असें जणुं हें गवत सांगत आहे असें त्याला वाटतें. त्याच्या हातांतील विळा गळून पडतो. अद्वैताचा अनुभव घेणाऱ्या ऋषीच्या आश्रमांत वाघ व शेळी प्रेमानें नांदतात; हरणें सिंहाची आयाळ खाजवतात, साप मुंगुसाला मिठी मारतो. अद्वैत म्हणजे उत्तरोत्तर वाढतें प्रेम, विश्वाला विश्वासानें आलिंगणारें प्रेम.

परंतु अद्वैताला जन्म देणाऱ्या व अद्वैत जीवनांत अनुभवूं पाहणाऱ्या थोर संतांच्या या भरतभूमींत आज अद्वैताचा संपूर्ण अस्त झाला आहे! आम्हांला ना शेजारी ना पाजारी! आम्हांला आजुबाजूचें विराट् दुःख दिसत नाहीं. आमचे कान बधिर झाले आहेत, डोळे आंधळे झाले आहेत. सर्वांना हार्ट डिझीज झालेला आहे.

वेदांतील एक महर्षि हृदय पिळवटून सांगत आहे :

" मोघमन्नं विन्दते अप्रचेता :<br>
सत्यं ब्रवीमि वध इत् स तस्य<br>
न अर्यमणं पुष्यति नो सखायं<br>
केवलाघो भवति केवलादी "

" संकुचित दृष्टीच्या मनुष्याला मिळालेल्या धान्याच्या राशी फुकट आहेत. त्याच्या घरांत तें धान्य सांठवलेलें नसून तें त्याचें मरण सांठवलेलें आहे! जो भावा-बहिणींस देत नाहीं, योग्य माणसांस देत नाहीं, असा केवळ स्वतःपुरतें पाहणारा मनुष्य केवळ पापरूप होय."

आजुबाजूला लाखों कष्ट करणारे लोक अन्नवस्त्रहीन असतां आपल्या बंगल्यांत कपड्यांचे ढीग व धान्याचीं कोठारें ठेवणें हें धोक्याचें आहे. ऋषि म्हणतो, " तुमचा चक्काचूर करणारे ते बॉंबगोळे आहेत." ऋषीचें म्हणणें हें इतर देशांत अनुभवास येत आहे. आपल्याहि देशांत येईल.

नामदेवानें उपाशी कुत्र्याला तूप पोळी खाऊं घातली. त्याच संतांच्या भूमींत उपाशी माणसांची कोणी कदर करीत नाहीं. कोणी अद्वैताचा अभिमानी शंकराचार्य संस्थानिकास सांगत नाहीं, कीं कर कमी कर; सावकारास सांगत नाहीं, कीं व्याज कमी कर; कारखानदारास सांगत नाहीं, कीं मजुरी वाढव व कामाचा थोडा वेळ कमी कर. सर्वांच्या पुड्या खाऊन व पाद्यपूजा घेऊन संचार करणारे 'श्री' जीवनांत अद्वैत यावें म्हणून मरत आहेत का?

आजच्या साम्यवादाला हे संस्कृतीच्या गप्पा मारणारे हंसतात. परंतु साम्यवाद म्हणजे एक प्रकारें कृतींत आणलेला वेदान्त होय. हजारों वर्षे वेदान्त घोकला जात आहे. कथापुराणांतून सांगितला जात आहे. वेदान्त शिकणाऱ्या समाजाला अशी विकलता कां यावी? आमचा पाया पोखरला जात होता. अद्वैत शिकवणाऱ्या समाजांत द्वैताचा नुसता बुजबुजाट उडाला आहे. या बुजबुजाटांत सुखशांति आणण्याचें काम साम्यवादी करीत आहेत.

" सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वे सन्तु निरामयाः "

" सारे सुखी असोत, सारे निरोगी असोत " असे मंत्र पुटपुटल्यानें सुख व आरोग्य निर्माण होत नसतें. मंत्र म्हणजे ध्येय. तें ध्येय कृतींत आणण्यासाठीं मरावयाचें असतें, झिजावयाचें असतें. हे मंत्र पुटपुटांना किती लोकांना सुख नाहीं, किती लोकांना औषध नाहीं, किती लोकांना घाणेरड्या खोलींत रहावें लागतें, किती लोकांना स्वच्छ हवा नाहीं, स्वच्छ पाणी नाहीं, किती लोकांना आरोग्याचें ज्ञान नाहीं, याचा विचार तरी मनांत येतो का? आपल्या लोकांत सर्वत्र दंभ बोकाळला आहे. महान् वचनें ओठांवर; पोटांत कांहीं नाहीं! परंतु धर्म जीवनांत गेल्याशिवाय जीवन सुंदर होत नाहीं. भाकरीचा तुकडा नुसता ओठांवर ठेवून भागत नाहीं; तो पोटांत जावा लागतो, तेव्हांच शरीर सतेज व समर्थ होतें. थोर वचनें जेव्हां कृतींत उतरतील तेव्हांच समाज सुखी व आरोग्यसंपन्न होईल.

साम्यवादी हे मंत्र पुटपुटत बसणार नाहींत. या महान् मंत्रांचा आचार केव्हां सुरू होईल याची उत्कट तळमळ त्यांना लागली आहे. यासाठीं ते तडफडत आहेत. धर्मबिर्म आम्हांला कळत नाहीं असें ते म्हणतात. परंतु, खरा धर्म तेच आचरूं पहात आहेत. सर्वांना खायला-प्यायला देऊं पहात आहेत. समाजांतील अन्याय, दैन्य, दास्य, दूर करूं पहात आहेत. समाजांतील दुर्गुण दूर करावयाचे असतील, तर अद्वैत जीवनांत आणा. आपणावरून दुसऱ्याला ओळखावयास शिका असें ते सांगत आहेत. ते स्वतःला भाई म्हणवून घेत आहेत. आपण सारे भाई भाई. " अमृतस्य पुत्राः " त्या अमृतरूपी चैतन्याचीं आपण सारीं लेंकरें. या, एके ठिकाणीं खपूं, एके ठिकाणीं खाऊं, एके ठिकाणीं खेळूं, एके ठिकाणीं शिकूं, गाऊं, हंसूं असें हे साम्यवादी म्हणत आहेत.

ऋषींच्या आश्रमांतील प्रेमाच्या प्रभावामुळें साप व मुंगूस एके ठिकाणीं रहात. हें ध्येय आपणांपासून पुष्कळ दूर आहे हें खरें. मनुष्य आपल्या प्रेमप्रकर्षानें



विश्वांतील सर्व विरोध दूर करीत आहे, हें ध्येय कदाचित् आपल्या दृष्टींत येत नसेल. परंतु सर्व मानवजातीनें तरी प्रेमानें एकत्र नांदावें यांत काय कठिण आहे? या भरतभूमींत हा प्रयोग ऋषी करूं पहात होते. अद्वैताचा तारक-मंत्र देऊन हें प्रेमैक्य निर्माण करूं पहात होते. परंतु त्यांची परंपरा पुढें चालवूं पाहणारे सर्वत्र भेदभाव माजवीत आहेत, वैषम्य वाढवीत आहेत.

ही सृष्टि एकप्रकारें अद्वैत शिकवीत आहे. मेघ सारें पाणी देऊन टाकतात, झाडें फळें देऊन टाकतात, फुलें सुगंध देऊन टाकतात, नद्या ओलावा देऊन टाकतात, सूर्य-चंद्र प्रकाश देतात. जें जें आहे तें तें सर्वांना देऊं. सर्वांमिळून उपभोग घेऊं. आकाशांतील सारे तारे सर्वांसाठीं आहेत. देवाचे जीवनप्रद वारे सर्वांसाठीं आहेत. परंतु मनुष्य भिंती बांधून स्वतःच्या मालकीच्या इस्टेटी तयार करूं लागतो. जमीन सर्वांची आहे. सारे मिळून ती कसूं या, पिकवूं या. परंतु मनुष्य त्यांतील तुकडा अलग करतो व म्हणतो, 'हा माझा तुकडा!' अशानेंच जगांत अशांति उत्पन्न होते. द्वेष-मत्सर उत्पन्न होतात. स्वतःला समाजांत बुडविलें पाहिजे. पिंडाला ब्रह्मांडांत बुडविलें पाहिजे. व्यक्ति शेवटीं समाजासाठीं आहे, दगड इमारतीसाठीं आहे, बिंदु सिंधूसाठीं आहे, हें अद्वैत कोण पाहतो? कोण अनुभवितो? हें अद्वैत जीवनांत आणणें म्हणजे केवढा आनंद!

ज्याला लाखों भाऊ सर्वत्र दिसत आहेत, त्याला केवढी कृतकृत्यता वाटेल! संतांना हीच तहान होती, हेंच वेड होतें:

" ऐसें भाग्य कधीं लाहता होईन,
अवघें देखें जन ब्रह्मरूप.
मग तया सुखा अंत नाहीं पार,
आनंदें सागर हेलावती. "

अवघा समाज ज्याला स्वतःइतका पूज्य वाटत आहे, प्रिय वाटत आहे, त्याच्या भाग्याचें कोण वर्णन करील?

" जिकडे तिकडे देखें उभा,
अवघा चैतन्याचा गाभा "

जिकडे तिकडे चैतन्यमय मूर्ती दिसत आहेत. दगडाधोंड्यांतहि चैतन्य पाहून डोलणारा संत मानवांतील चैतन्य नाहीं का पाहणार?

" जेथें जेथें देखें तुझींच पाऊलें
सर्वत्र संचलें तुझें रूप "

सर्वत्र तेंच स्वरूप आहे. चैतन्यमय आत्म्याचें स्वरूप आहे. या चैतन्यमय मूर्तींची सेवा करावयास संत तडफडत असतो. त्याला वाटतें, कीं सहस्र हात असते, तर सहस्र बोलत्याचालत्या मूर्तींना वस्त्रें नेसविलीं असतीं, जेऊंखाऊं घातलें असतें !

परंतु लाखों वस्त्रहीन, अन्नहीन, चैतन्यमय देवांची पूजा करावयास कोण उभा राहतो ? अद्वैत म्हणजे मरण आहे, स्वतःचें मरण !

" आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां "

स्वतः मेल्याशिवाय या आसमंतांत पसरलेल्या परमेश्वराचें दर्शन होणार नाहीं. स्वतःचा अहंकार कमी करा. स्वतःची पूजा कमी करा. जसजसें तुमचें 'अहं'चें रूप क्षुद्र होत जाईल, तसतसें परब्रह्म तुम्हांला दिसूं लागेल. बुद्धानें स्वतःचें निर्वाण केलें, स्वतःला मालवून टाकलें, तेव्हां त्याला सर्व चराचराला अपरंपार प्रेम देतां आलें.

अद्वैताचा उच्चार म्हणजे स्वतःच्या स्वार्थी सुखावर निखारा ठेवणें !

" तुका म्हणे व्हावी प्राणांसवें तुटी
नाहीं तरी गोष्टी बोलूं नये."

प्राण फेंकून द्यावयास तयार असाल तर वेदान्ताच्या वल्गना करा. दुसऱ्यासाठीं दोन दिडक्याच नाहीं, तर सर्वस्व अर्पण करावयास तयार असणें म्हणजे अद्वैताची दीक्षा.

" जीवातळीं आंथरिती । प्राण आपुलें "

आपल्या प्राणांच्या पायघड्या दुसऱ्यासाठीं आनंदानें घालणारे, ते अद्वैताचे अधिकारी.

शंकराचार्यांच्या अद्वैत-तत्त्वज्ञानाच्या सिंहगर्जनेनें इतर तत्त्वज्ञानें पळून गेलीं असें म्हणतात. सिंह पाहतांच कोल्हीं-कुत्रींच नव्हे, तर प्रचंड हत्तींनीहि तारांबळ उडते. शंकराचार्यांच्या अद्वैतामुळें द्वैतवादी पळाले, परंतु समाजांतील द्वैत पळालें नाहीं ! समाजांतील दंभ, आलस्य, अज्ञान, रूढि, भेदभाव, उच्चनीचपणा, स्पृश्यास्पृश्यें, वैषम्यें, दारिद्र्य, दैन्य, दास्य, दुबळेपणा, भ्याडपणा या गोष्टी पळाल्या नाहींत. ही सारी द्वैताची प्रजा आहे. समाजांत दुजाभाव



असला म्हणजे हें सारें भीषण चित्र दृष्टीस पडूं लागतें. भारतीय समाजांत तोंडांतील अद्वैत समाजांतील रोजच्या आचारांत अल्पस्वल्पहि जरी दाखविण्यासाठीं कोणी मनापासून झटते, तरी भारताला अशी अधोगति येती ना.

थोर स्वामी विवेकानंद म्हणूनच खेदानें म्हणत कीं, 'हिंदुधर्माइतकीं उदार तत्त्वें सांगणारा दुसरा धर्म नाहीं आणि हिंदू लोकांइतके प्रत्यक्ष आचारांत अनुदार लोकहि अन्यत्र सांपडणार नाहींत."

शेंकडों वर्षें अद्वैताचे डंके वाजत आहेत, परंतु रानांतील रानटी लोकांजवळ आमचे मठ सोडून आम्ही कधीं गेलों नाहीं. कातकरी, भिल्ल, गोंड, शेंकडों जाती, त्यांच्यापासून अहंकारानें आम्ही दूर राहिलों. अद्वैतावर भाष्यें लिहिणारे व तीं वाचणारे प्रत्यक्ष रोजच्या व्यवहारांत अद्वैतशून्य दृष्टीनें जणुं वागत.

अद्वैत हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. या तत्त्वाचा उत्तरोत्तर जीवनांत अधिक अधिक अनुभव घेत जाणें म्हणजेच भारतीय संस्कृतींत भर घालणें होय. आपल्या सर्व आंतरबाह्य कृतींतून अद्वैताचा सुगंध जसजसा येऊं लागेल, तसतसा भारतीय संस्कृतीचा आत्मा आपणांस समजूं लागला असें म्हणतां येईल. तोंपर्यंत त्या संस्कृतीचें नांवहि उच्चारणें म्हणजे त्या थोर ऋषींची व त्या थोर संतांची केवळ विटंबना आहे, दुसरें काय ?

## अद्वैताचा साक्षात्कार : : २

सर्व सजीव-निर्जीव सृष्टींत अद्वैताचा अनुभव घेणें ही अंतिम स्थिति होय. मनुष्येतर चराचर सृष्टीबद्दलहि आपलेपणा वाटणें, आत्मौपम्य वाटणें म्हणजे अद्वैताची पराकाष्ठा होय. मनुष्याला तें केव्हां साधेल तेव्हां साधो; परंतु निदान मानवजातीपुरतें तरी त्यानें विशाल दृष्टीचें नको का व्हायला ?

या भरतभूमींत प्राचीन काळापासून परस्पर-भिन्न संस्कृतींचे संघर्ष सुरू झाले. भारताबाहेरील आर्य व एतद्देशीय थोर संस्कृतिसंपन्न अनार्य यांच्यामध्यें अनेक झगडे माजले. वेदांमधून या वैरांचीं वर्णनें आहेत. दक्षिणेकडील वानर म्हणजे अनार्य लोकच. लंकेंतील रावण हा आर्य होता. तो आपलें साम्राज्य वरतीं नाशिकपर्यंत पसरवीत आला. वालीचें व त्याचें युद्ध झालें. या काळ्यासांवळ्या एतद्देशीय लोकांना तो तुच्छतेनें वानर म्हणे. परंतु दुसरे कांहीं आर्य या अनार्य

लोकांत प्रेमानें मिसळले. अगस्ति ऋषि विंध्य पर्वत ओलांडून आला व या द्रवीडियन जनतेंत मिसळला. त्यानें तेथील लोकांच्या भाषेचीं व्याकरणें लिहिलीं. तामीळ भाषेचा पहिला व्याकरणकर्ता अगस्ति मानतात. तामीळ भाषा अत्यंत प्राचीन अशी सुसंस्कृत भाषा आहे. आर्य ऋषींनीं अनार्य लोकांत आपले आश्रम स्थापिले. संस्कृतीची देवाण-घेवाण सुरू झाली. रामाला या आर्य ऋषींनीं अनार्यांची बाजू घेण्यास लाविलें. रावणाचा रामानें पराजय केला. आर्य व अनार्य यांना जोडणारा राम हा पहिला महान् पुरुष होय. राम सर्वांना प्रेमानें जवळ घेत आहे. अद्वैत वाढवीत आहे. गुण्यागोविंदानें नांदावयास शिकवीत आहे. राम हा मानव्याची उपासना करणारा आहे. माणुसकीचा धर्म तो ओळखतो.

आर्य व अनार्य एकमेकांत मिसळूं लागले. परस्परांत विवाह होऊं लागले. परंतु कधीं कधीं आपल्या आर्यत्वाचा टेंभा मिरवणारे प्रतिष्ठित पुढारी दिसून येत व ते अनार्यांचा उच्छेद करूं बघत. आज ज्याप्रमाणें हिट्लर सर्व ज्यू लोकांना हांकलून देत आहे, त्याप्रमाणें जनमेजय सर्व नागजातींचा उच्छेद करावयास सिद्ध झाला होता. अर्जुनानें नागकन्यांजवळ लग्नें लाविलीं होतीं, परंतु नागस्त्रीपासून झालेल्या बभ्रुवाहनाला अभिमन्यूहून अर्जुन हीन समजत असे! परीक्षिताचा एका नागनायकानें खून केला. त्यामुळें जनमेजय चिडला. सर्व नागजातीला जाळून भस्म करा, असे त्याचे अमानुष आदेश सुटले. ठायीं ठायीं नागलोक जिवें जाळले जाऊं लागले. जे कोणी नागांना आश्रय देतील, त्यांनाहि तेंच प्रायश्चित मिळेल असें उद्घोषिण्यांत आलें.

अशा वेळीं भारतीय संस्कृतीचा संरक्षक भगवान् आस्तिक उभा राहिला. मांगल्यावर ज्याची श्रद्धा तोच खरा आस्तिक! अद्वैत निर्माण करूं पाहील तोच खरा आस्तिक! आस्तिक ऋषीस प्रत्यक्ष दृश्य संसारांत अद्वैत पहावयाचें होतें. दृश्य संसारांतील विरोध-वैषम्यें दूर करण्यासाठीं प्रयत्न न करतां परलोकाच्या गप्पा मारणारे ते खरोखर नास्तिक होत! तो खरा आस्तिक, कीं जो आजुबाजूला जें दिसत आहे, त्याला सुंदरता आणूं पाहतो. आज जे आस्तिक म्हणून समजले जातात ते खरोखर नास्तिक आहेत, व जे नास्तिक म्हणून समजले जातात ते खरोखर आस्तिक आहेत. गीतेंत सांगितलें आहे, कीं यज्ञ न करणाऱ्याला हा लोक तर नाहींच, मग परलोक तर दूरच राहिला! म्हणजे या



लोकाचें महत्त्व सांगतात. जीवयात्रा, लोकयात्रा हे शब्द प्राचीन मुनी महत्त्वाचे मानीत. संसाराला ते तुच्छ नसत मानीत. केवळ स्वतःच्या संसाराला पाहणें म्हणजे मिथ्या होय. परंतु समाजाच्या ध्येयानें स्वतःचा संसार पाहिला, तर तो मिथ्या नाहीं. मला एकट्याला या जगांत काय करतां येणार? समाजामुळें मी पोसला जात आहें. या समाजाची सेवा करण्यांत व्यक्तीचा विकास आहे.

तो महर्षि आस्तिक समाजाचीं शकलें झालेलीं शांतपणें कसा पाहील?

आस्तिक उठला व लोकांना जाळणाऱ्या जनमेजयासमोर उभा राहिला. आस्तिकाची आई नागकन्याच होती! जनमेजयाला आस्तिक म्हणाला, "अरे, मलाहि होळींत फेक. मीहि नागकन्येच्या उदरांतील आहें!" तपस्वी आस्तिकाचा महान् त्याग पाहून जनमेजयाचे डोळे उघडले. नागजात कां हीन समजायची? ज्या जातींत आस्तिकासारखीं विश्ववंद्य माणसें निर्माण होतात, ती जात का तुच्छ?

जनमेजयानें आस्तिकाचे पाय धरले. तें सर्पसत्र थांबलें. आस्तिकानें भारताचें उज्ज्वल भवितव्य त्या दिवशीं सांगितलें. आस्तिक म्हणाले, "जनमेजया! अरे, जगांत कोणी तुच्छ नाहीं, कोणी उच्च नाहीं. सर्वांच्या ठिकाणीं दिव्यत्व आहे. आर्यांत कांहीं गुण आहेत, अनार्यांतहि आहेत. दोघांत दोषहि आहेत. आपण परस्परांचे दोष न बघतां दोषांखालीं दडपलेली आंतरिक गुणसंपत्तीच पाहिली पाहिजे. जो दुसऱ्या जातीजमातीस सदैव हीन लेखील तो नास्तिक समज. या अफाट देशांत अनेक जाती व वंश आहेत. तुम्ही आर्य बाहेरून आलेत. आणखीहि अशाच जाती येतील. आज तुम्ही जो पायंडा पाडाल तो पुढें टिकेल. या भरतभूमींत शेंकडों जातीजमाती एकत्र नांदत आहेत, असा प्रयोग होऊं दे. आर्य व अनार्य एक व्हा. आर्यांचीं दैवतें अनार्यांचीं होवोत, अनार्यांचीं आर्यांचीं होवोत. आर्यांच्या सुंदर चालीरीती अनार्य घेतील, अनार्यांच्या सुंदर चालीरीती आर्य घेतील. अशा रीतीनें नवीन भव्य संस्कृति निर्माण होवो. भारतीय संस्कृति म्हणजे सहस्र पाकळ्यांचें शतरंगाचें भव्य कमल! या फुलांत शेंकडों विविध सुगंध निर्माण होवोत. नाना रंग, नाना गंध! जनमेजया, नागजातीला सर्प हें दैवत फार प्रिय व पूज्य वाटतें. तुझ्या पित्यानें सापाला मारून तो मृत सर्प एका ऋषीच्या गळ्यांत अडकविला! नागांच्या दैवतांचा हा उपहास होता. नागांची नागपूजा तुम्हीहि घ्या. नागपंचमीचा दिवस पंचांगांत आपण रूढ

करूं या. आर्य व नाग जातींच्या ऐक्याची ती खूण भावी पिढयांस मार्गदर्शन करील ! "

भारतीय संस्कृतीचा हा महान् विशेष आहे. अभेदांत भेद व भेदांत अभेदता हें भारतीय संस्कृतीचें स्वरूप आहे. त्या प्राचीन ऋषींनें एक पृथ्वीमोलाचा मंत्र सांगून ठेवला आहे :

" एकं सत् विप्रा बहुधा वदन्ति "

सत्य वस्तु एकच आहे; परंतु तिला नानाप्रकारें संबोधण्यांत येत असतें. शेंकडों दैवतें एकाच शक्तीचीं नांवें आहेत. एकाच पाण्याला ज्याप्रमाणें जल, नीर, वारि वगैरे नांवें आपण दिलीं आहेत, त्याप्रमाणें या विश्वापाठीमागील शक्तीला आपण अनेक नांवें देतों. आपण या नांवांसाठीं भांडतों ! आंतील अर्थ पाहूं गेलों, तर आपण केलेल्या अनर्थाचें आपणांस हसूं येईल. आपण लाजेनें मान खालीं घालूं.

आर्य व अनार्य यांच्या शेकडों दैवतांची एकी करण्यांत आली. दैवतांची एकी करून मानवांचें ऐक्य साधण्यांत आलें. देवतांच्या हीन स्वरूपास आध्यात्मिक स्वरूप देण्याचे प्रयत्न झाले. अद्वैत अनुभविण्याचा तो केवढा महान् प्रयत्न होता !

भारतीय संस्कृतींत प्रत्येक तत्त्व मनावर ठसविण्यासाठी कांहीं प्रतीकें सांगितलेलीं असतात; परंतु या प्रतीकांतील महत्त्व नाहींसें होऊन तें प्रतीक निर्जीव मढें होऊन जातें. प्रतीकांतील अर्थ विलुप्त होतो व प्रतीकाची पूजा केवळ मंत्रवत् सुरू होते. अद्वैताचें तत्त्व मनावर ठसविण्यासाठीं एक महान् प्रतीक सांगण्यांत आलें आहे.

समुद्रावर स्नानाला जा, संगमावर स्नानाला जा, नदीवर स्नानाला जा, असें आपणांस शिकविण्यांत आलेलें आहे. आपण जेथें स्नान करूं तेथला भाव शरीर स्वच्छ होत असतां मनांतहि शिरत असतो. नळावर स्नान करणाऱ्या माणसाचें हृदय नळाच्या तोंडाएवढेंच आकुंचित व क्षुद्र होण्याचा संभव असतो. विहीर नळापेक्षां बरी; परंतु विहीरहि चोहोंकडून बांधून घेतलेली असते. तिचें तोंडहि चिंचोळेंच असतें; परंतु नदी ? ती खळखळ वहात असते. शेकडों मैल जात असते. नदीवर स्नान करण्यांत म्हणे पुण्य आहे ! कोणतें पुण्य ?

नळाखालीं भिजलेलें डोकें नळासारखें होईल, नदींत बुडलेलें डोकें नदी-



प्रमाणें होईल. नदी पाप दूर करते, डोक्यांतील घाण व हृदयांतील घाण अंगावरील घाणीबरोबर वाहून जाते. नदी म्हणजे काय ? नदी म्हणजे शेकडों ठिकाणच्या लहान-मोठ्या प्रवाहांचें परम मंगल अद्वैतदर्शन होय ! नदी म्हणजे अद्वैताची मूर्ति ! नदी म्हणजे सुंदर उदार परमोच्च सहकार्य ! ते शेकडों प्रवाह परस्परांस तुच्छ समजत नाहींत. गटार येवो कीं दुसरा कोणता प्रवाह येवो, सारे एकत्र येतात. " आपल्यांतील घाण खालीं बसेल, आपल्यांतील प्रसन्नता प्रकट होईल," या अमर श्रद्धेनें सारे प्रवाह एकमेकांत मिसळतात, एकमेकांशीं सहकार्य केल्यामुळें त्यांचा महान् प्रवाह होतो. हे प्रवाह परस्परांपासून अहंकारानें दूर राहाते तर त्यांचा विकास झाला नसता. त्यांना लांबी, रुंदी, खोली प्राप्त झाली नसती. शेंकडों एकर जमीन त्यांना सुपीक करतां आली नसती. ते अहंकारी प्रवाह आटून गेले असते, नाहींसे झाले असते. त्यांच्यांत किडे पडले असते. परंतु, ते एकमेकांतील अभिजात पावित्र्य पाहून एकत्र आले व महान् नदी निर्माण झाली.

नदींत बुडविलेल्या डोक्यांत हे विचार उत्पन्न झाले पाहिजेत. नदीचें हें अद्वैत-गायन बुद्धीला ऐकूं आलें पाहिजे. परंतु गंगेवर आंघोळ करणारे गंगापुत्र दगडाहून दगड राहतात ! सर्व प्रवाहांना जवळ घेणाऱ्या त्या नदींत उभे राहून ते दुसऱ्याचा उपहास करीत असतात ! " तूं तुच्छ, तूं पतित, तूं तिकडे जा " असा रुद्र म्हणत असतां व नदींत डुंबत असतां मानवाचा उपमर्द हे करीत असतात. शेंकडों वर्षें नदींत डोकीं बुडत आहेत, परंतु डोकीं खोकींच राहिलीं आहेत !

नदीपेक्षां संगम अधिकच पवित्र ! अद्वैताचा अनुभव घेणाऱ्या दोन संतांची भेट म्हणजे केवढें पवित्र दर्शन ! वसिष्ठ–नामदेवांची भेट, रामदास-तुकारामांची भेट, महात्माजी व रवींद्रनाथ यांची भेट, जवाहरलाल व मानवेंद्र रॉय यांची भेट म्हणजे तें महान् काव्य असतें.

" सतां सद्भिः सङ्गः कथमपि हि पुण्येन भवति "

हजारों प्रवाहांना पोटाशीं घेत एक नदी येते, दुसरीकडून दुसरी एक तशीच नदी येते, व दोघी एकमेकींच्या गळ्यांत पडतात !

गंगा, यमुना व सरस्वती यांच्या संगमाला आपण अत्यंत पवित्र मानलें आहे. एकाच शुभ्र–स्वच्छ उंच हिमालयापासून गंगा, यमुना निघाल्या ! परंतु गंगा

जरा गोरीगोमटी; ती अहंकारानें वरून वरून चालली. यमुना काळीसांवळी; जरा दुरून दुरून चालली. परंतु काळ्या यमुनेला प्रेमानें मिठी मारल्याशिवाय गंगेला शतमुखांनीं सागराला भेटतां येणें शक्य नव्हतें. ती अहंकारी गंगा नम्रपणें थबकली. तिकडून यमुना आली. गंगेनें हात पुढें केले. " ये, यमुने ये. तूं काळी-सांवळी म्हणून मीं तुला तुच्छ मानिलें. परंतु तुझ्या तीरावर गोपालकृष्णानें भक्तिप्रेमाचा पाऊस पाडला. राव-रंक एक केले. सर्वांना 'सहनौभुनक्तु'चा अनुभव दिला. ऐक्याची मुरली तुझ्या तीरावर वाजली. आकाशांतील देव तुझ्या पाण्यांत मासे झाले. तुझा महिमा थोर आहे. तूं दिसायला काळीसांवळी, परंतु आंत-अंतरंगीं अत्यंत निर्मळ आहेस. ये, मला भेट!" गंगेला गहिंवरून आलें, तिला बोलवेना.

यमुनाहि उचंबळली. ती म्हणाली, " गंगाताई! तूं माझी स्तुति करतेस, परंतु तुझा महिमाहि अपार आहे. माझ्या तीरीं भक्ति वाढली, परंतु तुझ्या तीरावर ज्ञान वाढलें. योगिराजा भगवान् पशुपति तुझ्या तीरावर ज्ञानांत तल्लीन झाला. शेंकडों ऋषी-महर्षी तुझ्या तीरावर तपश्चर्या करीत असतात. मोठमोठे राजे राज्यें तृणासमान मानून तुझ्या तटाकीं ब्रह्मचिंतन करितात. गंगाताई, तूं म्हणजे मूर्त ज्ञान आहेस. मला तुझ्या शुभ्र पायांशीं लोळण घेऊं दे!"

गुप्त असणाऱ्या सरस्वतीची गंभीर वाणी ऐकूं आली, " ज्ञानाशिवाय भक्ति आंधळी आहे. भक्तीशिवाय ज्ञान कोरडें आहे, आणि कर्मांत अवतीर्ण झाल्याशिवाय ज्ञान-भक्तीस अर्थ नाहीं. ज्ञानमयी गंगा भक्तिमय यमुनेंत मिळूं दे, आणि कर्ममय सरस्वतीस भक्ति-ज्ञानाचा स्पर्श होऊं दे."

गंगा, यमुना व सरस्वती म्हणजे ज्ञान, भक्ति व कर्म यांचा मला संगम वाटतो. गंगाजमनी भांडें आपण पवित्र मानतों. दोन डोळ्यांतून घळघळणाऱ्या अश्रुधारांना आपण गंगा-यमुना म्हणतों. गंगा-यमुना आपल्या जीवनांत शिरल्या आहेत. परंतु जेथें शिरल्या पाहिजे होत्या, तेथें अद्याप शिरल्या नाहींत. पांढर-पेशांची गंगा काळ्यासांवळ्या श्रमजीवी लोकांच्या यमुनेस अद्याप मिळाली नाहीं. पांढरपेशे लोक स्वतःला पवित्र व शुद्ध समजून बहुजनसमाजापासून दूर राहिले आहेत. वरिष्ठ वर्ग व कनिष्ठ वर्ग एकत्र येऊन प्रेमानें परस्परांस जोंपर्यंत कवटा-ळीत नाहींत, तोंपर्यंत भारताच्या ललाटीचें दास्य दूर होणार नाहीं. आणि समुद्रांत स्नान करणें म्हणजे तर पावित्र्याची परम सीमा.



## " सागरे सर्व तीर्थानि "

जगांतील सर्वच प्रवाह समुद्र जवळ घेतो. म्हणून तो सदैव उचंबळत आहे. पाऊस पडो वा न पडो, समुद्राला आटणें माहीत नाहीं. जो सर्वांना जवळ घेईल त्याच्याजवळ सर्व तीर्थें आहेत असें ऋषी सांगत आहेत.

## " देव रोकडा सज्जनीं "

भेदाभेद जाळून सर्वांना उराशीं धरणाऱ्या सज्जनांच्या ठिकाणीं प्रत्यक्ष रोखठोक देव आहे. प्रत्यक्षावगम परमेश्वर तेथें आहे.

भारतीय संतांनीं अशा रीतीनें हा वस्तुपाठ आम्हांस दिला. परंतु त्यांतील महान् अर्थ कधींहि आम्हीं मनांत आणिला नाहीं. संगमावर व समुद्रांत स्नानें करून पापें जळणार नाहींत; त्या संगमावर व समुद्रांत स्नानें करून परत आल्यावर त्यांचा महान् अद्वैताचा संदेश प्रत्यक्ष जीवनांत आणला, तर समाज निष्पाप होईल; निर्दोष होईल; समाजांत वाण उरणार नाहीं; घाण राहणार नाहीं; दुःख दिसणार नाहीं; सर्वत्र प्रसन्न असें वातावरण निर्माण होईल.

अद्वैताचा अशा रीतीनें जीवनांत साक्षात्कार कोणता भारतपुत्र करूं पहात आहे? आपण सर्वत्र डबकीं निर्माण केलीं आहेत. चित्पावन, कऱ्हाडे, देशस्थ, यजुर्वेदी, शुक्ल यजुर्वेदी, मैत्रायणी, हिरण्यकेशी, अशीं ब्राह्मणांतच शेंकडों डबकीं आहेत. आधीं एकेका जातीचें डबकें व त्या डबक्यांत पुनः आणखी डबकीं! डबकीं करून राहणारे व अहंकारानें टरोंटरों करणारे आपण सगळे बेडूक झालों आहोंत! चिखलांत उड्या मारावयाच्या व चिखल खायचा हें आपलें पवित्र ध्येय झालें आहे!

जातीजातींची, स्पृश्यास्पृश्यांची, ब्राह्मण-ब्राह्मणेतरांची, हिंदु-मुसलमानांचीं शेंकडों डबकीं आहेत. गुजराथी, महाराष्ट्रीय, मद्रासी व बंगाली हीं प्रांतीय डबकीं शिवाय आहेतच! डबक्यांत राहणाऱ्यांस प्रसन्नतेचा प्रसाद प्राप्त होत नसतो. डबकीं सांचलीं कीं घाण निर्माण होते. डांस-मच्छर यांचा बुजबुजाट होतो. रोग उत्पन्न होतात. भरतभूमीला भले दिवस यावेत अशी जर इच्छा असेल, तर हीं डबकीं दूर करण्यासाठीं आपण उठलें पाहिजे. भेदांच्या भिंती जमीनदोस्त केल्या पाहिजेत. सारे प्रवाह प्रेमानें जवळ येऊं देत. उचंबळूं दे सागर.

## " जाळीन मी भेद। येथें प्रमाण तो वेद "

अशी तुकाराममहाराज प्रतिज्ञा करीत आहेत. समाजाच्या कल्याणाची तळमळ असणारा प्रत्येक मनुष्य अशीच प्रतिज्ञा करील.

भारतीय संस्कृतीच्या उपासकांनो ! केलेंत पाप तेवढें पुरे. उठा व हरिजनांना पोटाशीं धरा. सर्व पददलित जनतेला प्रेमानें कवटाळा. एकाच ईश्वराचीं आपण सारीं लेकरें. एकाच शुभ्र-स्वच्छ चैतन्याचीं आपण रूपें. जितके जितके आपण प्रेममय होऊं, अद्वैत होऊं, तितके तितके आनंदानें, भाग्यानें उचंबळूं.

जो दुसऱ्यास तिरस्कृत करील, तो स्वतः तिरस्कारिला जाईल. जो दुसऱ्यास तुच्छ लेखील, त्यालाहि लाथा बसतील. आपण आपल्याच पापांचीं फळें आज भोगीत आहोंत. आपण दास्य पेरलें तें आज पोटभर मिळत आहे. आपण सर्वत्र गुलामगिरीला पुष्ट केलें. पुरुषांची स्त्रियांवर लादलेली गुलामगिरी, स्पृश्यांची अस्पृश्यांवर गुलामगिरी, रावांची रंकावरील गुलामगिरी, सावकारांची कुळांवर गुलामगिरी, ज्ञानवंतांनीं अज्ञानी जनतेवर लादलेली गुलामगिरी ! शतमुखी गुलामगिरी आपण निर्माण केली व आज संपूर्णपणें गुलाम झालों आहोंत. मराठ्यांचें राज्य अद्वैताच्या आधारानें निर्माण झालें, परंतु भेदाभेद निर्माण होतांच तें नाहींसें झालें. 'मराठा तितुका मेळवावा' या मंत्रानें मराठ्यांचें राज्य अस्तित्वांत आलें. परंतु ब्राह्मण, मराठे, प्रभू, शूद्र यांची आपापसांत स्पर्धा सुरू झाली, उच्चनीचपणा सुरू झाला आणि भगवा झेंडा भस्मीभूत झाला ! मराठे उत्तर हिंदुस्थानांत गेले. त्यांनीं रजपूत, जाट वगैरे लोकांना जवळ घेतलें नाहीं, त्यामुळें मराठ्यांचा मोड झाला. हळूहळू ऐक्यमंत्र वाढवीत गेलें पाहिजे होतें. 'मराठा तितुका मेळवावा' असें सांगणारे समर्थ झाले. पेशव्यांच्या काळांत 'हिंदुमात्र मेळवावा' असें सांगणारा दुसरा कोणी समर्थ पाहिजे होता आणि आज 'हिंदीमात्र मेळवावा' असें सांगणारा महात्मा पाहिजे आहे.

जीवनांत असें अद्वैत अनुभवणारे महात्मे हीच मानवजातीची आशा आहे. मनुष्यजातीला किती उंच जातां येतें हें महापुरुष दाखवीत असतात. आकाशांत कोट्यवधि अंशांच्या उष्णतेनें सूर्य जळत असतो, तेव्हां आपल्या अंगांत ९८ अंश उष्णता असूं शकते. भगवान् बुद्धासारखे महात्मे वाघिणीवरहि प्रेम करतात, तेव्हां कोठें मनुष्य शेजारच्या माणसावर थोडी दया करावयास सिद्ध होतो. समाज पुढें जावा, वर जावा, यासाठीं विश्वप्रेमी पुरुषांची नितांत आवश्यकता असते. ते प्रेमाचा समुद्र जीवनांत उचंबळवितील, तेव्हां कोठें प्रेमाचा बिंदु आमच्या जीवनांत



येणें शक्य आहे ! संत हे आपल्या प्रेमानें व तपश्चर्येनें समाजाचें धारण करीत असतात.

"सन्तो तपसा भूमिं धारयन्ति"

अद्वैताचा मंत्र जपत जीवनांत संगीत आणणारे आपले पूर्वज होते. हिंदु-मुसलमानांतहि ते आशेनें ऐक्य आणीत होते. हिंदूंच्या देवस्थानांना मुसलमानी राजांनीं देणग्या दिल्या व मुसलमानी पीरांना हिंदू राजांनीं वतनें दिलीं. हिंदू राजे मोहरम साजरा करीत व हिंदू-उत्सवांत मुसलमानहि येत. अंमळनेरच्या सखाराममहाराजांच्या रथाला पहिली मोगरी देण्याचा मान मुसलमानाचा आहे ! आणि त्यांना नारळ प्रसाद म्हणून देण्यांत येतो ! हिंदूंच्या रथाला मुसलमान-बंधूंनीं मोगरी पहिल्यानें द्यायची ! आजच्या काळांत हा मूर्खपणा व स्वभिमान-शून्यपणा समजला जाईल. परंतु पूर्वजांची दृष्टि फार थोर होती. भारतांत आलेल्या सर्वांमध्यें प्रेमाचे संबंध निर्माण करणें हें त्यांचें पारंपरित पवित्र कर्तव्य होतें. आस्तिकानें पेटवलेला तो नंदादीप त्यांना विझवावयाचा नव्हता. मुसलमानांच्या मोहरमांत हिंदूहि सामील होत. हिंदू जमीनदारांच्या घरीं ताबूत यावयाचे. मुसलमानांस नारळ व गूळ देण्यांत यावयाचा. आमच्या लहानपणीं आमच्या गांवांत हे प्रेमळ संबंध मीं पाहिले आहेत. गरीब मुसलमान मुलें आमच्याजवळ कागद मागावयास येत व आम्ही त्यांना देत असूं. माझ्या शेजारच्या बंधूचा होऊं दे चांगला डोळा !

हिंदूंच्या उत्सवाला मुसलमानांस बोलाविलें तर ते येतात. माझ्या एका मित्राजवळ एक मुसलमान मुलगा प्रेमानें गणपति-अथर्वशीर्ष शिकला. माझ्या एका अंमळनेरच्या मित्राकडे दत्तजयंतीला मुसलमान मित्र आले होते.

आपल्यापेक्षां आपले पूर्वज अधिक समाजशास्त्रज्ञ होते. आपण आज साम्राज्यवादी परसत्तेचे गुलाम झालों आहोंत. परकीय लोक आपल्यांत भेद पाडीत आहेत. आपणहि भेद पाडीत आहोंत. भेद पाडून गुलामगिरी लादणाऱ्या सरकारला आपण साहाय्यभूत होत आहोंत. भेदांवर अभेद हेंच औषध आहे. विषावर अमृताचाच उपाय. दुसरा चालणार नाहीं.

पूर्वजांचे प्रयोग आपण पुढें नेऊं या. अद्वैत अधिक साक्षात्कारूं या, भरतभूमींत ऐक्य निर्मून मग जगाला आपण हांक मारूं, ही भरतभूमि मानवजातीचें

तीर्थक्षेत्र होईल. सारे धर्म, भिन्न भिन्न संस्कृती येथें एकत्र नांदत आहेत हें ऐकून सर्व देश भरतभूमीच्या पायांपाशीं येतील ! हें ईश्वरदत्त महान् कार्य आपणांस साधावयाचें आहे ! हें महान् ध्येय आपणांस बोलावीत आहे. या महान् ध्येयासाठीं बाकी सारी क्षुद्रता आपण झडझडून फेंकून दिली पाहिजे. भारतीय संस्कृतीच्या उपासकांनीं श्रद्धेनें त्यागपूर्वक यासाठीं उठलें पाहिजे.

## बुद्धीचा महिमा : : ३

भारतीय संस्कृतींत अंधश्रद्धेला स्थान नाहीं. विचाराचा महिमा सर्वत्र गाइलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा वेद हा पाया मानिला जातो. परंतु वेद म्हणजे काय ? वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृति आहे.

वेद किती आहेत ? वेद अनंत आहेत. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद एवढेच वेद नाहींत. भारतीय संस्कृतीचा एकच ऋषि नाहीं, एकच पैगंबर नाहीं, एकच वेद नाहीं. भारतीय संस्कृति गगनाप्रमाणें विशाल व सागराप्रमाणें अपार आहे.

जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. आपलें आयुष्य आनंदी व उत्साही कसें राहील हें आयुर्वेद सांगेल. समाजाचें रक्षण कसें करावें तें धनुर्वेद सांगेल. समाजाची कशी करमणूक करावी, समाजाला दुःखाचा विसर कसा पाडावा, तें गांधर्ववेद सांगेल. हे सारे वेदच आहेत.

काल अनंत आहे व ज्ञानहि अनंत आहे. नवीन नवीन ज्ञान उदयास येईल व भारतीय संस्कृति सर्वांआधीं त्या ज्ञानाचा सत्कार करावयास उभी राहील. भारतीय संस्कृतीला ज्ञानाहून दुसरें कांहींहि पवित्र वाटत नाहीं. ज्ञानोपासकांबद्दल भारतीय संस्कृतीला नितान्त आदर आहे.

भारतीय संस्कृति एकाच काळीं सारे ऋषी झाले असें कधींहि मानणार नाहीं. असें म्हणणें अहंकार आहे. तो परमेश्वराचा अपमान आहे. सारें ज्ञान जर खलास झालें असेल, तर सृष्टीच्या अस्तित्वाची कांहीं जरूरच नाहीं. कणसें आलीं कीं ज्वारी कापून टाकायची एवढेंच उरतें. त्याप्रमाणें शोधावयास कांहीं जर शिल्लकच नसेल, तर मानवाच्या उत्पत्तीला कांहीं अर्थ उरत नाहीं.



नवीन नवीन विचार उत्पन्न होतात, नवीन नवीन ज्ञान आपणांस मिळतें, युरेनस व नेप्चून पूर्वी दिसत नव्हते, ते आतां दिसूं लागले. खगोलांत ज्याप्रमाणें नवीन नवीन तारे दिसतात, त्याप्रमाणें जीवनाच्या शास्त्रांतहि नवीन नवीन विचार उत्पन्न होत असतात. खरें पाहिलें तर इतर सर्व शास्त्रांच्या मानानें हें जीवनशास्त्र फारच प्रयोगावस्थेंत आहे असें म्हणावें लागेल. ह्या जीवनाच्या शास्त्रांत अद्याप कांहींहि ठरलें नाहीं. भूमितीमध्यें स्वयंसिद्ध, शंकातीत, संशयातीत अशीं कांहीं तत्त्वें आहेत. गणितशास्त्रांत पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि गेलेत, तरी दोन नि दोन चार यांत फरक होणार नाहीं. परंतु जीवनाच्या शास्त्रांत असें एकहि तत्त्व विशंकपणें अपवादरहित असें मांडतां येणार नाहीं. सत्य चांगलें कीं चाईट, अहिंसा योग्य कीं अयोग्य, ब्रह्मचर्य असावें कीं नसावें, यांचीं निश्चित उत्तरें अद्याप मानवी मनास देतां येत नाहींत.

असें असल्यामुळें भारतीय संस्कृति कशाचा आग्रह धरीत नाहीं. "बुद्धेः फलमनाग्रहः" कोणत्याहि तत्त्वाचा आग्रह बुद्धिमान् मनुष्य धरणार नाहीं. श्रीकृष्णांनीं शेवटीं अर्जुनाला "यथेच्छसि तथा कुरु" असें सांगून त्याच्या बुद्धीला महत्त्व दिलें. वेदधर्म म्हणजे विचाराप्रमाणें वागणें; बुद्धि सांगेल त्याप्रमाणें वागणें. "अंतरिंचा ज्ञानदिवा मालवूं नको रे" असें भारतीय संस्कृति सांगत आहे. तुझ्या स्वतःच्या हृदयांतील बुद्धि काय सांगते तें बघ. त्या बुद्धीचा जो विशंक आवाज येईल त्याप्रमाणें वाग. "मनःपूतं समाचरेत्" या वचनाचा अर्थ हाच. अमुक ऋषि सांगतो म्हणून नाहीं, तमुक तत्त्वज्ञानी सांगतो म्हणून नाहीं, तर तुझ्या मनाला जें पवित्र वाटेल तें तूं कर. तूं तुझ्या आत्म्याचा अपमान करूं नकोस. तूं तुझ्या बुद्धीचा गळा दाबूं नकोस.

वेद अपौरुषेय आहेत वगैरे सर्व कल्पना भ्रामक आहेत. मानवी बुद्धीचा हा सारा पसारा आहे. वेदाला मानणें म्हणजे बुद्धीला मानणें. वेदांतील सर्वांत पवित्र मंत्र म्हणजे गायत्री मंत्र. या गायत्री मंत्राला एवढें महत्त्व कां ? या मंत्राची उपासना करूनच मनुष्याचा पुनर्जन्म होतो. या मंत्रांत एवढें काय आहे ? या मंत्रांत बुद्धीची निर्मळता मागितली आहे.

"त्या तेजस्वी प्रेरणा देणाऱ्या सूर्याच्या परमश्रेष्ठ तेजाची आम्ही उपासना करतों. तो सूर्य आमच्या बुद्धीस चालना देतो." विश्वामित्र ऋषींनें देवाजवळ आपल्या समाजासाठीं निर्मळ बुद्धीची देणगी मागितली. वेदांमध्यें गायी दे, पुत्र दे,

यश दे, इत्यादि शेंकडों याचना देवाजवळ केलेल्या आहेत. परंतु त्या सर्व मंत्रांपेक्षां हा लहान मंत्र परमश्रेष्ठ ठरला. यावरून भारतीय पूर्वज कोणत्या वस्तूला सर्वांत अधिक महत्त्व देत होते, तें दिसून येईल.

मनूनें एके ठिकाणीं स्वच्छ सांगितलें आहे कीं, "माझें म्हणणें तर्कास पटत असेल तर घ्या. नाहीं तर फेकून द्या." शंकराचार्य म्हणतात, "शेंकडों श्रुती येऊन अग्नि थंड आहे म्हणून सांगूं लागल्या तरी त्याला कोण महत्त्व देईल ?" तर्काच्या कसोटीवर घांसून घांसून जें शंभर नंबरी असेल, तेंच ज्ञानधन पूज्य माना, असें ते प्राचीन कवी सांगत आहेत.

महाभारतांत "कोऽयं धर्मः कुतो धर्मः" असा भीष्माला प्रश्न करण्यांत आलेला आहे. हा धर्म कोठून येतो ? हा धर्म का ईश्वर कानांत येऊन सांगतो ? भीष्मांनीं सांगितलें, कीं विचारवंत लोक चिंतन करून, अभ्यास करून हा धर्म निर्माण करतात. "मतिभिरुध्दृतम्।" आपापल्या मतींनीं ते तत्त्वें शोधून काढतात. वेदधर्म म्हणजे विचारधर्म. वेदधर्म म्हणजे बुद्धिप्रधान धर्म. श्रुतीचें श्रुतीला पटत नाहीं, स्मृतीचें स्मृतीला जुळत नाहीं, एका ऋषीचें दुसऱ्या ऋषीला संमत नाहीं, याचा अर्थ काय ? याचा अर्थ एवढाच कीं, प्रत्येकजण स्वतंत्रपणें विचार करी. त्याच्या त्याच्या काळांत जी परिस्थिति असे, त्याप्रमाणें तो विचार करी. ऋषी आंधळे नव्हते. ते पोपट नव्हते. ते तेजस्वी गायत्री मंत्राची उपासना करणारे होते. पदोपदीं ते फरक करीत. 'बाबावाक्यं प्रमाणं'ची त्यांना अपार चीड येई. ते चर्चा करीत. बैठका भरवीत. ज्ञानाचा शांतपणें खल करीत.

प्राचीन काळांत सहज ओझरती नजर फेकली, तरी विचारांची प्रचंड चळवळ दिसून येईल. यास्काचार्यांच्या नुसत्या निरुक्तांत पाहिलें तर वेदांच्या अभ्यासासाठीं निरनिराळ्या दृष्टींचीं शेंकडों मंडळांचीं नांवें त्यांत आलेलीं आहेत. इति नैरुक्तिकाः, इति आख्यायिकाः, इति ऐतिहासिकाः अशीं निरनिराळीं अभ्यास-मंडळें यास्क देत आहेत. तसेंच उपनिषत्कालीं सर्वत्र तत्त्वज्ञानाची प्रचंड व अखंड चर्चा चाललेली दिसते. शेंकडों मतें, शेंकडों पंथ, शेंकडों सूक्ष्म छटांचे तत्त्वज्ञानी आपणांस दिसून येतात. प्रांजलपणें वाद करीत आहेत, पटलें तर घेत आहेत, त्याप्रमाणें वागूं लागत आहेत, असा तो देखावा दिसतो. निःशंकपणें व निर्भयपणें विचारांची मांडणी करण्यांत येत असे. त्या चर्चा ऐकावयास लोक जमत असत.



मीमांसक ईश्वर मानीत नसत; चार्वाकपंथी परलोक वगैरे मानीत नसत. कणाद वगैरे सारी सृष्टि परमाणूपासून झाली असें म्हणत. बुद्धपंथी सारें क्षणिक आहे असें मानीत. शेंकडों मतें होतीं. परंतु कुणाचा छळ झाला नाहीं. युरोपमध्यें नवविचार देणाऱ्यांच्या होळ्या करण्यांत आल्या. भारतांत तसें झालें नाहीं. प्रत्येकाच्या प्रामाणिक मताला येथें मान देण्यांत येत असे.

ज्ञान म्हणजे पोरकटपणा समजण्यांत येत नसे. एकेक गोष्ट समजून घ्यावयास तपेच्या तपें देत. उपनिषदांत अनेक ठिकाणीं ज्ञानासाठीं ब्रह्मचर्यपालन करून कशी तपश्चर्या करीत, कसें चिंतनांत गढून जात, तें आलें आहे. ज्ञान मागण्यासाठीं वाटेल त्याच्याकडे जात. ब्राह्मण क्षत्रियाकडे जाई, क्षत्रिय ब्राह्मणाकडे जाई. ब्राह्मण तुलाधारासारख्या वैश्याकडे ज्ञानासाठीं नम्रपणें जाई. ज्ञान कोठेंहि असो, तें पवित्र आहे. सूर्याचा प्रकाश कोठूनहि आला तरी तो घेतला पाहिजे. झाडांचीं मुळें मिळेल तेथून ओलावा घेण्यासाठीं धडपडत असतात. त्याप्रमाणेंच ज्ञानोपासकाची दृष्टि हवी. देवांचा कच, दैत्यांच्या गुरूकडेहि जाईल आणि दैत्यांचा गुरुहि शत्रूकडच्या शिष्याला प्रेमानें सारें ज्ञान देईल. ज्ञानाच्या प्रांतांत शत्रु-मित्र नाहीं.

नचिकेता प्रत्यक्ष मृत्यूजवळहि ज्ञानाचीच भिक्षा मागता झाला; याच्याहून ज्ञानाची थोरवी आणखी कोणती असावी ? ज्ञानासाठीं मृत्यूजवळहि जावें लागेल ! ज्ञानाला कशाची भीति नाहीं. ज्ञान मिळवूं पाहणारा साऱ्या त्रिखंडांत जाईल व त्यासाठीं वाटेल तो त्याग करावयास तयार होईल.

समाजाला नवविचार देणें म्हणजे फार थोर साधनाच आहे. विचाराचा डोळा समाजाला देणें याहून धन्यतर दुसरें काय आहे ? चिंतन करून आपणांस जो विचार सुचला, त्याला पूज्य मानून तो सदैव प्रकट केला पाहिजे. त्याची वाढ केली पाहिजे, तो सर्वांसमोर निर्भयपणें मांडला पाहिजे. तो सोडतां कामा नये.

ज्ञानाचें बाह्यस्वरूप कोणतेंहि असेल. त्या त्या बाह्यांगाची पूजा करण्यासाठीं मनुष्य निःस्वार्थपणें कसा धडपडतो आहे, तें पाहिलें पाहिजे. ज्ञानाचें बाह्यांग व्याकरण असेल. व्याकरणरूपी परब्रह्माची एखादा पाणिनी अहोरात्र पूजा करूं पाहील. त्या पाणिनीस भगवान् ही पदवी भारतीय संस्कृति देईल. शंकराचार्य पाणिनीचा उल्लेख भगवान् पाणिनी असा सदैव करतात. पाणिनी ज्ञानाच्या एका स्वरूपांत रमले. त्यांना दुसरें तिसरें कांहींच सुचत नव्हतें, रुचत नव्हतें. व्याकरण

म्हणजे त्यांचा वेदान्त. जे कोणी येतील त्यांना ते व्याकरण शिकवीत. एके दिवशीं तपोवनांत ते व्याकरण शिकवीत असतां एकदम वाघ आला. वाघाला पाहून पाणिनी पळाले नाहींत. वाघाला पाहून व्याघ्र शब्दाची ते व्युत्पत्ति सांगूं लागले. वाघ हुंगत हुंगत येत होता. पाणिनी म्हणाले, " वास घेत घेत येणारा हा पहा वाघ." " व्याजिघ्रति स व्याघ्रः । " पाणिनी व्युत्पत्ति सांगण्याच्या आनंदांत होते. शिष्य केव्हांच पळून गेले होते. वाघानें पाणिनीवर झडप घालून त्याला खाऊन टाकलें ! ज्ञानाची किती थोर उपासना ! ज्ञानाची उपासना करणारा सर्व कांहीं विसरून जातो. त्या त्या विचारांशीं तो तन्मय होतो. त्याची जणुं समाधि लागते. समाधि म्हणजे सर्वत्र ध्येयाचाच साक्षात्कार होणें. समाधि म्हणजे ध्येयेतर सृष्टीचें विस्मरण ! समाधि म्हणजे सर्व सृष्टीचें विस्मरण नव्हे.

ज्ञानाचा प्रांत कोणताहि असो. त्या ज्ञानाच्या पाठोपाठ जाऊन त्या बाबतींतील शेवटचें टोंक जो गांठतो, परमोच्च स्थान जो मिळवितो, तोच ऋषि. ज्याची पैशावर किंवा सुखावर दृष्टि असते, तो अशा फंदांत कधीं पडणार नाहीं. तपस्वीच ज्ञान देतात. ज्ञान असो वा विज्ञान असो, तें सिद्ध करण्यासाठीं, जीवनांत आणण्यासाठीं महात्मेच मरतात. ज्ञानोपासक सारखा पुढें जाईल. ज्ञानदेवाचें दर्शन घेतल्याशिवाय तो थांबणार नाहीं. जीवनाच्या नानाविध क्षेत्रांत अपार संशोधनास वाव आहे. भारतीय संस्कृति त्या त्या संशोधकाचा सन्मान करावयास उभी आहे. ज्ञानसंशोधनांत खाणेंपिणें विसरणारा न्यूटन हा ऋषीच होता. पन्नास वर्षें अध्ययन करून, विचार करून नवदृष्टि देणारा कार्ल् मार्क्स हा महर्षीच आहे. जगाच्या विचारांत क्रांति घडवणारा चार्ल्स डार्विन याला ऋषि कोण म्हणणार नाहीं ? इंग्लंडमधील एका झोपडींत राहून सहकार्याचे नवीन नवीन मार्ग जगाला दाखविण्यासाठीं धडपडणारा तो हद्दपार झालेला थोर क्रॉपोट्किन्—त्याला ऋषि म्हणावयाचें नाहीं तर कोणाला ?

भारतीय संस्कृति या सर्वांची पूजा करील. रवीन्द्रनाथ टागोरांनीं जगांतील ऋषींची भारत आपलेपणानें पूजा करतो, हें विश्वभारती विद्यापीठ काढून दाखविलें आहे. जगांतील महान् महान् आचार्यांना ते तेथें बोलावून घेत होते व त्यांचा सन्मान करीत होते. रवींद्रनाथ भारतीय संस्कृतीचा आत्मा ओळखीत होते; भारतीय संस्कृतीचे ते खरे उपासक होते.

भारतीय संस्कृतींत ज्ञानाला कधीं विरोध नव्हता. अगदीं क्रांतिकारक मत



मांडणाऱ्याचाहि येथें गौरव होई. तें मत ऐकिलें जाई. त्या मताच्या पाठीमागें किती तळमळ, किती व्यापकता, केवढा अनुभव, किती चिन्तन आहे हें पाहण्यांत येई. त्या त्या मतासाठीं मतस्थापक किती त्याग करावयास तयार आहे हें पाहण्यांत येई. भारतीय संस्कृति प्रत्येक नवीन मत पटकन् उचली असें नाहीं. परंतु प्रत्येक मतास वाव असे. सत्य असेल, तर काळाच्या ओघांत टिकेल. असत्य असेल तर अदृश्य होईल.

परमेश्वराचें स्वरूपच मुळीं ज्ञान, असें भारतीय संस्कृतींत सांगितलें आहे. परमेश्वराची, ब्रह्माची व्याख्या काय ? " ज्ञानं ब्रह्म." ज्ञान म्हणजेच ब्रह्म. ज्ञान म्हणजेच परमेश्वर. ईश्वराची याच्याहून थोर व्याख्या जगाला कोणींहि दिली नाहीं. ईश्वराची उपासना करणें म्हणजे ज्ञानाची उपासना करणें, ज्ञानाची उपासना अनंत रूपांनीं करणें. समाजशास्त्र असो, खगोलशास्त्र असो, भूगोल असो, इतिहास असो, आयुर्वेद असो, तत्त्वज्ञान असो, योग असो, कर्मयोग असो, गणित असो, संगीत असो, ती ती ज्ञानस्वरूप परमेश्वराचीच पूजा होय. एकाच ज्ञानसूर्याचे हे अनंत किरण आहेत. महाभारतांतील श्लोकांइतकींच गणितांतील प्रमेयेंहि पूज्य आहेत. श्रुतिस्मृतींच्या अभ्यासाइतकेंच सृष्टिशास्त्राचें अध्ययन पवित्र आहे. सनातन धर्मांतील ही थोर दृष्टि आपण पुन्हां उचलली पाहिजे. परमोच्च बौद्धिक विकासाची ज्वाळा पुन्हां पेटविली पाहिजे. भारतीय संस्कृति तरच पुन्हां नवतेजानें नटेल. आज संस्कृतिरक्षणाच्या चळवळी होत आहेत. नवीन विचारांचे वारे येऊं नयेत म्हणून सनातनी नांवाची मंडळी किल्लेकोट बांधू पहात आहेत. परंतु हे संस्कृतिरक्षक नसून संस्कृतिभक्षक आहेत. भारतीय संस्कृतीचें मढें ते कवटाळूं पहात आहेत व आंतील प्राण गुदमरवीत आहेत. हे सनातनी नसून असनातनी आहेत.

सनातन या शब्दाचा अर्थच काय ? " सनातनो नित्य नूतनः " जें नेहमीं नवीन नवीन स्वरूप प्रकट करील तेंच टिकेल. ज्या झाडाला नवीन पालवी फुटेनाशी झाली, तें झाड मरणार असें समजावें. ज्ञानेश्वरीच्या शेवटच्या अध्यायांत ज्ञानेश्वर लिहितातः

" हें नित्यनूतन देखिजें । गीतातत्त्व "

गीतेंतील शब्दांचे अर्थ निरनिराळे दिसूं लागतील. कारण त्या शब्दांकडे आज विसाव्या शतकांतील परिस्थितींतन आपण पाहणार ! अर्थाचा विकास होत

असतो. शब्द लहान असतो, परंतु त्यांतील अर्थ अनन्त आहे. विचारांची उत्क्रांति सदैव होत असते.

भारतीय संस्कृतीची भव्य इमारत नवीन विचारांच्या वाऱ्यानें पडेल, अशी का या संस्कृतिरक्षकांना भीति वाटते ? या नवीन विचारांच्या वाऱ्यांनीं जर ती पडण्यासारखी असेल, तर ती टिकण्यांत तरी अर्थ काय ? जरा आलेली वाऱ्याची झुळूक ज्याला सहन होत नाहीं, तो क्षयी लवकरच मरणार, असाच नाहीं का ध्वनि निघत ? भारतीय संस्कृति का अशी लेचीपेची आहे ? आमच्या दृष्टीनें ती तशी नाहीं. ज्ञानावर, अनुभवावर ज्या संस्कृतीचा पाया रचला आहे, त्या संस्कृतीला कधींहि भय नाहीं. किल्लेकोट बांधून, भिंत बांधून, ती बुरखा घेऊन बसणार नाहीं. हें बुरख्यांतील बावळट पावित्र्य भारतीय संस्कृतीस नको आहे. नवीन विचारांचें भारतीय संस्कृतीस वावडें नाहीं. जगांतील कोणतीहि अनुभवाच्या कसोटीस उतरलेली, ज्ञानावर उभारलेली संस्कृति आणा; भारतीय संस्कृतीचा तिच्याशीं विरोध नाहीं.

जगांतील प्रयोगांचा भारत उपयोग करून घेईल. भारतीय संस्कृतीचे दरवाजे मोकळे आहेत. साम्यवादाचे विचार आले तर त्यांत श्रीकृष्णाचें बालचरित्र भारतीय संस्कृतीस दिसेल. गोकुळांतील लोणी चोरणारा श्रीकृष्ण, सर्व पददलितांची बाजू घेणारा श्रीकृष्ण, सर्व साम्राज्यें धुळीस मिळविणारा श्रीकृष्ण, त्याचेंच दर्शन साम्यवादांत भारतीय संस्कृतीचा आत्मा ओळखणाऱ्यास होईल. "सत्या-असत्यासि मन केलें ग्वाही" असें म्हणणाऱ्या तुकारामाचेंच दर्शन, 'स्वतःच्या बुद्धीला पटेल तें करा' असें सांगणाऱ्या ध्येयवादी नवविचारवंतांत खऱ्या संस्कृतीच्या उपासकाला घडेल ! भारतीय संस्कृतीस भीति, नाश व मरण हे शब्द माहीत नाहींत. कारण ज्ञानाला नाश नाहीं आणि ज्ञानावर ही संस्कृति उभी आहे.

भारतीय संस्कृति प्रत्येक पाऊल बुद्धिपूर्वक टाकावयास सांगत आहे. "दृष्टिपूतं न्यसेत्पादम् वस्त्रपूतं पिबेज्जलम् ।" विचार करून वागा, पाहून पाऊल टाका, गाळून पाणी प्या. भारतीय संस्कृति सांगते कीं, विचार सर्वत्र घेऊन जा. धर्म म्हणजे काय ? धर्म म्हणजे प्रत्येक क्रिया डोळसपणें करणें. सकाळीं सात वाजतां स्नान करून संध्या करणें, एवढाच धर्म या शब्दाचा अर्थ नव्हे. धर्म म्हणजे चोवीस तास होणारीं कर्में. जन्मभर होणारीं कर्में. धर्म का देवघरापुरता असतो ?



धर्म सर्वत्र आहे. हवा ज्याप्रमाणें आपण जेथें जेथें जाऊं तेथें तेथें पाहिजे, त्याप्रमाणें धर्म सर्वत्र हवा. तुम्ही विधिमंडळांत जा, स्वयंपाकघरांत जा, कारखान्यांत जा, कोठेंहि जा; जें जें कर्म कराल तें धर्ममय पाहिजे.

धर्ममय पाहिजे म्हणजे वेदमय पाहिजे, विचारमय पाहिजे. याचाच अर्थ प्रत्येक कर्म बुद्धिपूर्वक करा. परंतु बुद्धि शुद्ध व्हावयास हृदयाचीहि जरूर असते. हृदय शुद्ध व्हावयास बुद्धीची जरूर असते. हृदय व बुद्धि यांच्या एकतानतेंतून जो महाविचार निर्माण होईल तो धर्म होय. अशी एकतानता ज्याची होते, त्यालाच आपण धर्मस्थापक म्हणतों. समर्थांनीं एकच धर्मस्थापक सांगितला नाहीं.

"धर्मस्थापनेचे नर । झाले आहेत, पुढें होणार"

त्या त्या काळांतील परिस्थितीचा खोल विचार करून, त्या त्या काळांतील बहुजनसमाजाच्या सुखदुःखांचा एकरूपतेनें विचार करून, महापुरुष त्या त्या काळांतील युगधर्म देत असतो. त्या काळाला नवीन दृष्टि देतो, नवीन विचार देतो. अशा रीतीनें धर्म वाढत जातो.

भारतीय धर्म हा वर्धिष्णु धर्म आहे. नवीन नवीन तो घेईल व पुढें जाईल. नवीन नवीन क्षेत्रांत घुसेल. सारें ज्ञान आपलेसें करून समाजाचें धारण करूं पाहील. विचाराशिवाय समाजाचें धारण कसें होणार ? ज्ञान ही शक्ति आहे. खरा सनातन धर्म तें ज्ञान घेतल्याशिवाय कसा राहील ?

मारुती ज्याप्रमाणें लाल दिसणाऱ्या सूर्याला धरावयास उडाला, त्याप्रमाणें भारतीय संस्कृति क्षितिजावर दिसणाऱ्या भव्य, दिव्य, नव्य विचारांना कवटाळूं पाहील. भारतीय संस्कृति ही स्थाणूंची स्थाणू संस्कृति नाहीं. ती गतिशील आहे, पुढें जाणारी आहे. ती कधीं थांबणार नाहीं. सत्याचीं नवनवीन दर्शनें घ्यावयास भारतीय आत्मा तडफडेल. सत्याचा संशोधक "आतां बस् झालें" असें कधीं म्हणणार नाहीं. अनंत क्षेत्र त्याच्या डोळ्यांसमोर उघडें असतें. आज महात्मा गांधीच पहा. जीवनाचें असें एकहि क्षेत्र नाहीं, कीं ज्या क्षेत्रांत ते बुद्धीचा दीप घेऊन शिरले नाहींत ! राजकारणाच्या क्षेत्रांत नवीन प्रयोग त्यांनीं चालविलेच आहेत. उद्योगधंद्यांची गोष्ट घ्या, त्यांतहि ते शिरतीलच. राष्ट्रीय शिक्षण असो, राष्ट्रभाषा असो, ग्रामोद्योग असो, समाजसुधारणा असो, धार्मिक प्रश्न असो, आरोग्य असो, खाण्यापिण्याचे प्रयोग असोत, ब्रह्मचर्यादि मानसिक प्रश्न असोत, प्रत्येक क्षेत्रांत ते शिरतील. ते बुद्धीचे उपासक आहेत. शुद्ध

हृदयाची शुद्ध बुद्धीला जोड देऊन ते प्रयोग करीत असतात. खऱ्या सनातनी वेदधर्माचे ते खरे अनुयायी आहेत.

बुद्धिवादी मनुष्य निर्भय असतो. तो कुणाचें तुणतुणें वाजवीत बसणार नाहीं. तो आपल्या विशंकतेनें पुढें पाऊल टाकील. जुने लोक कलियुग कलियुग म्हणतात. नवीन लोक यंत्रयुग यंत्रयुग म्हणतात. गांधी म्हणतील, "मी माझें युग निर्माण करीन. मी चरख्याचें युग आणीन. ग्रामोद्योगाचें युग आणीन." बुद्धिमान् मनुष्य री ओढीत बसणार नाहीं. तो स्वतःच्या विचारांचें युग आपल्या-भोंवतीं निर्माण करूं पाहतो.

जगांत स्वतंत्र बुद्धि फार थोडी असते. सनातनी लोक दहा हजार वर्षांपूर्वींच्या ऋषींचे गुलाम होतात, तर नवीन लोक पाश्चिमात्य पंडितांचे गुलाम होतात. परंतु भारतीय संस्कृति स्वतंत्र दिवा लावावयास सांगत आहे. तुमच्या देशाच्या स्थितीचा विचार करा, परंपरेचा विचार करा, आजुबाजूच्या देशांचाहि विचार करा, आणि स्वतःच्या समाजाला काय हितकर तें बघा.

सत्याची तहान या सत्यकामाच्या भूमींत आज उत्पन्न झाली आहे कीं नाहीं ? मानवजातीनें जे जे उद्योग सुरू केले आहेत, जे जे विचारप्रांत उत्पन्न केले आहेत, त्या सर्व ठिकाणीं आपण गेलें पाहिजे. यंत्रशास्त्र, वास्तुशास्त्र, शिल्पशास्त्र, शिक्षणशास्त्र, साहित्य, कला, रसायन, व्यायाम, क्रीडांगणें, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, मानसशास्त्र, सर्व सत्याच्या साक्षात्कारांच्या क्षेत्रांत न थकतां, न दमतां पुढें घुसणारे लोक भारतीय संस्कृतीच्या उपासकांत निर्माण झाले पाहिजेत. सहकारी चळवळी असोत, मजुरांची संघटणा असो, शेती सुधारणें असो, नवीन उद्योगधंदे सुरू करणें असो, सर्वत्र आपण गेलें पाहिजे. अभ्यास केला पाहिजे, नवीन प्रयोग केले पाहिजेत. हीच परमेश्वराची पूजा. देवानें दिलेलें वाढविणें म्हणजेच त्याची पूजा. परमेश्वरानें दिलेल्या बुद्धीचा विकास करणें म्हणजेच खरा धर्म.

त्या त्या काळांतील प्रश्न त्या त्या विचारवंतांना सोडवावयाचे असतात. अर्वाचीन बुद्धीसमोर अर्वाचीन प्रश्न आहेत. भारतीय संस्कृतींत ही हिम्मत नाहीं का ? जगांतील राष्ट्रांच्या मांडीशीं मांडी लावून बसण्याचा हक्क वेद घोकून मिळणार नाहीं, पूर्वजांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन मिळणार नाहीं. नवीन प्रश्नांस आपण हात घातला पाहिजे. प्रयोगालयें म्हणजे होमशाळा काढल्या पाहिजेत. होऊं देत सुरू प्रयोग—सत्यदेवाचें सर्वांगीण स्वरूप समजून घेण्याचे प्रयोग !



आतां कोठेंहि अडतां कामा नये. आपले घोडे सर्वत्र दौडत जाऊं देत. ग्रामसंघटन, खादीशास्त्र, समाजशास्त्र, नवनीतिवाद, कोणतेंहि क्षेत्र असो; त्या त्या विषयांत घुसूं व नवीन ज्ञान निर्मूं. ठिकठिकाणीं संग्रहालयें, प्रयोगालयें, ग्रंथालयें स्थापूं. बौद्धिक व वैचारिक सहकार्य मिळवूं. ज्ञान ही सहकार्याची वस्तु आहे. प्रत्येक विचार हा सहकार्यांतून निर्माण झाला आहे. पूर्वींच्या शेंकडों विचारांच्या खांद्यावर नवीन विचार उभा रहात असतो. गांधी टिळकांच्या कल्पनांचा विकास करतील. जवाहरलाल गांधींना पुढें नेतील. ज्ञानाच्या प्रत्येक प्रांतांत अशी स्थिति आहे. तेथें अहंकार नाहीं. तेथें नम्र व निष्ठापूर्वक ज्ञानेश्वराची पूजा आहे.

भारतीय संस्कृति सांगत आहे, "माझ्या मुलांनो ! जगांत ज्ञानासाठीं जीवनेंच्या जीवनें देणारे शेंकडों लोक निर्माण होतात. येथेंहि होऊं देत. येथेंहि विचारपूजा सुरू होऊं देत."

विचार तलवारीपेक्षां प्रखर आहे. विचार नवजीवन देतो. "वह्नि तो पेटवावा रे." विचारांचा वह्नि पुन्हां प्रखरतेनें पेटविल्याशिवाय कश्मलें जळून जाणार नाहींत.

भारतांत आज क्रांतीचा समय आलेला आहे. ही क्रांति केवळ राजकीय नाहीं. ही शतमुखी क्रांति आहे. सारा संसार धांडुळावयाचा आहे. साऱ्या कल्पना पारखून घ्यावयाच्या आहेत. नवीन काळ, नवीन दृष्टि ! मजुराला पोटभर घांस कसा मिळेल हें पाहणें म्हणजे आज महान् धर्म आहे. राष्ट्राच्या एकाद्या नवीन उद्योगांत रात्रंदिवस गढून जाणें म्हणजे संन्यासी होणें आहे.

निर्मळ विचार व शुद्ध दृष्टि यांची आज नितांत आवश्यकता आहे. येथें अधीरता नको, उतावीळ नको, स्वार्थ नको, आळस नको. निर्मळता हवी असेल, तर खोल अभ्यासाची आवश्यकता आहे. प्रयत्न व कष्ट यांची जरूर आहे. समाजाबद्दल प्रेम व कळकळ यांची जरुरी आहे. समाजाला सुखी कसें करतां येईल, ही तळमळ लागली म्हणजे मग तुम्ही विचार करूं लागाल. मग जो विचार स्फुरेल, त्याचा आचार सुरू होईल; आणि त्या विचाराला व आचाराला 'युगधर्म' असें नांव दिलें जाईल.

# प्रयोग करणारे ऋषी : : ४

भारतीय संस्कृति ही बुद्धिप्रधान संस्कृति आहे. परंतु केवळ बुद्धीचीच नाहीं, तर हृदयाचीहि हांक येथें ऐकिली जाईल. निर्मळ बुद्धि व निर्मळ हृदय हीं वस्तुतः एकरूपच आहेत. निर्मळ बुद्धींत ओलावा असतो व निर्मळ हृदयांत बुद्धीचा प्रकाश असतो. निर्मळ हृदय व निर्मळ बुद्धि यांच्या बळावर भारतीय संस्कृति उभारण्यांत आलेली आहे.

उदार विचारावर ही संस्कृति आधारलेली असल्यामुळें, तिच्यांत शेंकडों फेरबदल झालेले आहेत. धर्मात दोन भाग असतात. एक शाश्वत तत्त्वांचा भाग व एक अशाश्वत तत्त्वांचा भाग. जगांत सर्वत्र या दोन गोष्टी आपणांस दिसून येतील. आपलें शरीर बदलत असतें, परंतु आंतील आत्मा तोच असतो. समाजांतील व्यक्ती जन्मतात–मरतात, परंतु समाज चिरंतन आहे. नदीच्या प्रवाहांतील जलबिंदू सारखे बदलत असतात, परंतु प्रवाह कायम असतो.

धर्मांतील यमरूप भाग बदलत नसतो. परंतु नियमरूप भाग बदलत असतो. यम म्हणजे धर्मांतील त्रिकालाबाधित भाग. सत्य, अहिंसा, संयम, दया, प्रेम, परोपकार, ब्रह्मचर्य इत्यादि गोष्टींना यम अशी संज्ञा आहे. संध्या करणें, स्नान करणें, खाणेंपिणें, जानवें घालणें, गंध लावणें, हजामत करणें, इत्यादि गोष्टी नियमांत येतात. यम म्हणजे अचल धर्म व नियम म्हणजे चलधर्म. स्मृतींतून स्वच्छ सांगितलें आहे, कीं यमाचा विचार न करतां केवळ नियमांनाच जेव्हां महत्त्व प्राप्त होतें, त्या वेळेस समाजाचा नाश होतो. परंतु या स्मृतिवचनाचें स्मरणहि आम्हांस आज नाहीं. आज नियमांचें स्तोम आम्हीं माजविलें आहे. जानवें, गंध, शेंडी यांचाच जणुं धर्म बनला आहे! यमाची कदर आम्हांस नाहीं. नियम म्हणजेच आमचें सर्वस्व!

चल वस्तूला जेव्हां आम्ही अचल मानूं लागतों व अचल वस्तूचें जेव्हां महत्त्व वाटत नाहींसें होतें, तेव्हां धर्माचें सुंदर स्वरूप नष्ट होतें. नियम आपणांस पदोपदीं बाजूला ठेवावे लागत असतात. परंतु आपण ते बाजूला करीत नाहीं. परंतु आपले पूर्वज असे नव्हते. नियमांच्यावर यमधर्माचें अकुंशत्व ते सदैव ठेवीत असत.

एका काळीं नियोगाची चाल धर्म म्हणून मानली जात होती. ज्या वेळेस



आर्यावर्तांत जमीन भरपूर होती व लोकसंख्याच फार कमी होती, त्या वेळेस नियोगाचा नियम करण्यांत आला. परंतु पुढें हा नियम बदलण्यांत आला. हा नियम नष्ट करण्यांत आला. त्या त्या वेळचे विचार करणारे पुरुष समाजाचें नीट धारण व्हावें, म्हणून त्या त्या काळाला उपयुक्त असे नियम करीत असतात. समाजांत स्त्रियांची संख्या कमी असेल, तर अनेक पती मिळून एक पत्नी असा नीतिनियम करावा लागेल. समजांतील स्त्रियांची संख्या पुष्कळ व पुरुषांची कमी असेल, तर एका पुरुषानें अनेक स्त्रिया करण्यास हरकत नाहीं असा नियम होईल. अरबस्तानांत महंमदाला स्त्रियांची संख्या अधिक असल्यामुळें, बहुपत्नीकत्वाची चाल सांगावी लागली. ह्या चाली, ह्या रूढी, हे नियम, तत्कालानुरूपी असतात. समाजाची स्थिति बदलतांच हे नियमहि बदलतात.

प्राचीन काळांतील इतिहास पाहिला, तर शेंकडों फेरबदल आपणांस दिसतील. वेदकाळांत बहीण व भाऊ यांच्या विवाहाचे उल्लेख आहेत. यम-यमी संवाद ह्यासाठीं प्रसिद्ध आहे. यमी यमाला म्हणते, "भाऊ! तूं माझ्याशीं विवाहबद्ध कां होत नाहींस?" यम म्हणतो, "पूर्वी तसें करीत. परंतु आतां तसें करणें अधर्म मानलें जाईल. आपणांस नांवें ठेवतील." समाज नियमबद्ध होत होता. समाज प्रयोग करीत होता. एके ठिकाणीं पुढील वचन आहेः

"सप्तमर्यादा कवयस्ततक्षुः"

"ह्या सात मर्यादा शहाण्या लोकांनीं आतां आंखून दिल्या आहेत." ह्या सात मर्यादांचें उल्लंघन होणें पाप समजलें जाई. त्या काळांतील कवी म्हणजे विचारवंत लोक, समाजाची परिस्थिति विशाल व सूक्ष्म दृष्टीनें पाहून नवीन मर्यादा, नवीन नवीन नियम घालून देत असत. एका सूक्तांत वसिष्ठ ऋषि म्हणतात, "उपैमि चिकितुषे जनाय।" चिकित्सा करणाऱ्या प्रज्ञावंताकडे माझें काय चुकलें, तें विचारावयास मी जातों. समाजांत असे महात्मे असत. त्यांचा सल्ला घेतला जाई.

नागपूरचे विद्वद्रत्न डॉ. दप्तरी यांनीं लिहिलें आहे, कीं त्या त्या युगांत सप्तर्षि नवधर्म देत असत. मनु व सप्तर्षि त्या त्या काळांतील युगधर्म सांगत. मनु म्हणजे जिज्ञासू जीव म्हणा. जिज्ञासू जीव त्या त्या काळांतील पूज्य अशा सात पुरुषांकडे जाई. हे सात पुरुष एकमतानें जो धर्म सांगत, तो त्या काळांतील धर्म मानला जाई.

उदाहरणार्थ, आजच्या आंदोलनाच्या काळांत जर योग्य धर्म पाहिजे असेल,

तर आजच्या भारतवर्षांतील सात थोर पुरुष एकत्र बसावेत. ते एकमतानें ज्या गोष्टी ठरवतील तो आजचा युगधर्म होईल. डॉ. राधाकृष्णन्, महात्मा गांधी, डॉ. कूर्तकोटी, पं. मदन मोहन मालवीय, पं. जवाहरलाल नेहरू, डॉ. आंबेडकर अशी विविध विचारांची मंडळी एकत्र बसवावी. जे कांहीं नियम सर्वानुमतें ते ठरवितील तो आजचा धर्म, ती आजची स्मृति. अशा प्रकारची आपली प्राचीन काळांतील पद्धति होती.

स्मृतिग्रंथांतून नुसतें वरवर चाळीत गेलें, तरी शेंकडों फरक आपणांस दिसतील. एके काळीं मुलांच्या मौंजीबंधनाप्रमाणें मुलींचेंहि मौंजीबंधन करण्यांत येत असे. याचा अर्थ मुलांप्रमाणें मुलींनींहि शिकावें असा त्या वेळचा धर्म होता. प्राचीन काळांत वादविवाद करणाऱ्या पंडिता नारी पदोपदीं आढळतात. वेदांमध्यें स्त्रीऋषींचीं सूक्तें आहेत. रामायणांत गोदावरीच्या तीरावर संध्या करणाऱ्या सीतेचें वर्णन आहे. स्त्रियांना ज्ञानाचा अधिकार होता. ब्रह्मवादिनी त्या होत्या. सभांतून चर्चा करीत. महाभारताच्या उद्योगपर्वांत सत्तर वर्षांचें वय होईपर्यंत ब्रह्मचारिणी व ब्रह्मवादिनी म्हणून वागणारी एक तेजस्वी नारी विवाह करूं पाहते असा उल्लेख आहे.

संस्कृत नाटकांतून ऋषींच्या आश्रमांत विद्यार्थी व विद्यार्थिनी एकत्र शिकत, असे उल्लेख आहेत. शाकुंतलांत अनसूया, प्रियंवदा वगैरे शिकण्यासाठींच राहिलेल्या मुली आहेत. उत्तररामचरितांत वाल्मिकीच्या आश्रमांत मुलीहि शिकत, असे उल्लेख आहेत. एका शाळेंतून दुसऱ्या शाळेंत जावें, एका आश्रमांत अभ्यासाचें जर नीट न जमलें तर दुसऱ्या आश्रमांत जावें, असाहि प्रकार होता. ज्या वेळेस मुलींचें मौंजीबंधन होई व त्या शिकत, त्या वेळेस अर्थातच प्रौढविवाह समाजांत असले पाहिजेत. आणि प्रौढविवाह पुष्कळसे प्रेमविवाहहि असतील. परंतु प्रौढविवाह पुढें कदाचित् बदलावे, असें कांहीं विचारवंतांस वाटलें असेल. हिंदुस्थानांत एकत्र कुटुंबपद्धति प्राचीन काळापासून आहे. एकत्र कुटुंबपद्धति यशस्वी होण्यासाठीं स्त्रियांवर जबाबदारी आहे. प्रौढ मुलींना सासरची सर्व मंडळी आपलीशी वाटत नाहींत. पतीपुरतें त्यांचें प्रेम असतें. जर मुलींचे विवाह लहानपणींच केले, तर त्या लहानपणींच मधूनमधून सासरीं जातील. लहानपणींच प्रेमाचे संबंध जडतात. दिरांबद्दल, सासरच्या मंडळींबद्दल आपलेपणा त्या मुलींच्या मनांत साहचर्यानें व परिचयानें लहानपणीं उत्पन्न होण्याचा संभव अधिक. एकत्र



कुटुंबपद्धतीचा प्रयोग करणाऱ्यांनीं कदाचित् यासाठीं प्रौढविवाह रद्द करून बालविवाह रूढ केले असतील.

किंवा मुलें-मुली शिकल्यावर कदाचित् भराभरा भिक्षु-भिक्षुणी होऊन जातील; परंतु कामवासना जिंकतां न आल्यामुळें हे भिक्षु-भिक्षुणींचे संघ व्यभिचारी होतील, अशी भीति वाटल्यामुळें समाजाचे नियम करणाऱ्यांनीं बालविवाह रूढ केले असतील.

कारणें कोणतींहि असोत. त्यांनीं फरक केला ही गोष्ट खरी. ते पूर्वज प्रयोग करणारे होते. अमुक नियम अविचल असें ते मानीत नसत. पूर्वी वरचे वर्ण खालच्या सर्व वर्णांशीं विवाह करीत. वरिष्ठ वर्णाच्या पुरुषाला कनिष्ठ वर्णाच्या मुलीशीं धर्ममय लग्न लावतां येई. मनुस्मृति 'भार्या चतस्रो विप्राणाम्' म्हणून सांगते. ब्राह्मण चारी वर्णांच्या स्त्रिया करूं शकेल. याज्ञवल्क्यानें या बाबतींत बदल केला. तो म्हणाला, "ब्राह्मणानें तीन वर्णांतील मुलींशींच विवाह करावा. शूद्र वधूशीं विवाह करूं नये." असे बदल स्मृतिकार करीत असत.

कांहीं स्मृतींतून पुनर्विवाहास परवानगी आहे; कांहींत नाहीं. कलियुगासाठीं म्हणून जी पराशरस्मृति सांगतात, त्या स्मृतींत पुनर्विवाहास संमति आहे. पुण्यांतील थोर न्यायाधीश रामशास्त्री प्रभुणे यांची गोष्ट प्रसिद्धच आहे. त्यांनीं पुनर्विवाहास संमति दिली होती. आणि तुळशीबागेंत एका स्त्री-कीर्तनकारिणीनें समोर बसलेल्या रामशास्त्र्यांस प्रश्न केला, "रामशास्त्री! पुरुषांना पुन्हां पुन्हां विवाह करावयास सदैव परवानगी आहे. पहिली पत्नी मरून दहा दिवस झाले नाहींत, तोंच दुसऱ्या लग्नाची तो तयारी करूं शकतो. मग स्त्रियांनींच असें काय पाप केलें आहे? स्त्रियांना पति मेल्यावर जर पुनर्विवाहाची इच्छा झाली, तर तशी परवानगी कां नसावी?" रामशास्त्री म्हणाले, "स्मृती ह्या पुरुषांनीं लिहिल्या. त्यांनीं पुरुषांची सुखसोय पाहिली. स्त्रियांच्या सुखदुःखांची त्यांना काय कल्पना?"

ह्या चालीरीती सर्व बदलत असतात एवढाच याचा अर्थ. परंतु आपला समाज जेव्हां बदल करीत नाहीं, तेव्हां तो फार मोठी चूक करीत असतो, हें त्याच्या लक्षांत येत नाहीं. जुन्या जीर्णशीर्ण रूढी आज कशा चालतील? लहानपणचा अंगरखा मोठेपणीं मुलाला कसा येईल? अंगरखा तरी मोठा करा, नाहीं तर मला तरी सदैव लहान ठेवा, असें त्या मुलाला म्हणावें लागेल. रूढीचे कपडे

हे सदैव बदलत असावेत. उन्हाळ्यांतील कपडे थंडींत चालणार नाहींत, थंडींतील कपडे उन्हाळ्यांत चालणार नाहींत हा नियम आहे. असा बदल न कराल, तर थंडींत गारठून मराल व उन्हाळ्यांत उकडून मराल.

हिंदुधर्म बुडाला बुडाला असें कांहीं म्हणत असतात. कोणाच्या डोक्यावर शेंडी दिसली नाहीं, कपाळावर गंध दिसलें नाहीं, तोंडावर मिशी दिसली नाहीं, गळ्यांत जानवें दिसलें नाहीं, म्हणजे त्यांना वाटतें कीं धर्म रसातळास गेला! चित्राहुती घातल्या नाहींत, प्राणाहुती घेतल्या नाहींत, आचमनें-अघमर्षणें केलीं नाहींत, म्हणजे म्हणतात धर्म बुडाला. परंतु, हा धर्म आधीं किती लोकांचा आहे? आणि ह्या धर्मांचें महत्त्व तरी काय?

हीं बाह्य चिन्हें बदलतात व बदलणारच. नवीन कालांत नवीन चिन्हें निर्माण होत असतात. एकेकाळीं डोक्यावर घालून जाणें मंगल वाटे; आतां डोक्यावर कांहीं न घालणें म्हणजेच कोणाला ऐक्याचें चिन्ह वाटेल. परंतु यांत धर्माच्या बुडण्या-तरण्याचा काय प्रश्न आहे?

हिंदुधर्म कांहीं चहाच्या पेल्यांत बुडून जाण्याइतका किंवा मिशा काढतांच मरून जाण्याइतका लेचापेचा नाहीं. हिंदुधर्म तेव्हां मरेल, जेव्हां बुद्धीची उपासना मरेल. "आमची बुद्धि तेजस्वी राहो" ही गायत्रीमंत्रांतील प्रार्थना जेव्हां मरेल तेव्हां हिंदुधर्म मरेल. पंडित मोतीलाल नेहरू स्नानसंध्या करीत नसतील, वाटेल तें खातपीत असतील; परंतु ते जें कांहीं करीत, तें त्यांच्या बुद्धीला त्या त्या वेळेस जें योग्य दिसे तें करीत. ते गायत्रीमंत्राचे आमरण उपासक होते. त्यांच्या गळ्यांत जानवें नसेल. परंतु खरा गायत्रीमंत्र त्यांच्याजवळ अहोरात्र जिवंत होता. आणि मरतांना त्या महापुरुषाच्या ओंठावर गायत्रीमंत्र होता! गायत्रीमंत्र गात गात त्यांचा आत्महंस उडून गेला!

मरतांना सर्वांत महत्त्वाची वस्तु जीव बरोबर घेऊन जातो. आपण एका गांवाहून दुसऱ्या गावीं जाऊं लागलों, कीं सर्वांत महत्त्वाच्या वस्तू आपण बरोबर घेतों; केरकचरा टाकून देतों. या जगाच्या खोलींतून मोतीलाल परलोकच्या दुसऱ्या खोलींत जावयास निघाले. कोणती महत्त्वाची वस्तु त्यांनीं बरोबर घेतली? त्यांच्या जिवाला कशाची भूक होती? शुद्ध विचारांची, बुद्धीच्या स्वातंत्र्याची. ज्ञानाच्या प्रकाशाची. जर्मन कवि गटे मरतांना "अधिक प्रकाश, अधिक प्रकाश"



असें म्हणत मेला. मोतीलाल नेहरू "तेजस्वी बुद्धि, स्वतंत्र बुद्धि" असें जपत निघून गेले.

प्रत्यहीं जानवें हातांत धरून गायत्रीमंत्र जपणाऱ्यांना मरतांना गायत्रीमंत्र आठवेल का? तो महान् मंत्र त्यांच्या रोमरोमांत गेला आहे का? त्यांना जानवें महत्त्वाचें वाटतें. परंतु गायत्रीमंत्रांतील दिव्य विचार महत्त्वाचा वाटत नाहीं. विचाराची उपासना करणारा, ज्ञानासाठीं धडपडणारा, तोच खरा गायत्रीचा सांभाळकर्ता आहे; आणि यासाठींच स्वामी विवेकानंद म्हणत, "ब्राह्मण पाश्चिमात्यांत अधिक आहेत." ज्ञानाची उपासना आमरण क्षणाक्षणाला करणारे आपणांत कोठें आहेत? जानवीं सांभाळून हिंदुधर्म सांभाळला जात नसतो. जानवीं सांभाळणारे किल्ल्या व कानकोरणीं सांभाळतात! हातांतील अंगठी व सल्लेजोडी सांभाळतात!

समाजांत धर्म आहे कीं नाहीं हें कशावरून ओळखावयाचें? त्यागावरून. ज्यांच्याजवळ त्याग दिसेल, त्यांच्याजवळ धर्माचा आत्मा आहे. ज्या तरुणांना आज धर्महीन म्हणून म्हणण्यांत येतें, त्यांच्याजवळ जर त्याग असेल तर त्यांच्याजवळ धर्म आहे. शेंडीसाठीं पूर्वी युद्धें झालीं. ती शेंडी आज न ठेवणारे धर्महीन आहेत, हें म्हणणें पोरकटपणाचें आहे. शेंडी न ठेवणाऱ्यांजवळ ज्याच्यासाठीं मरावें, असें दुसरें कांहीं आहे कीं नाहीं? सत्याग्रहाच्या चळवळींत तुरुंगांत नित्यनेमाची टकळी सूत कांतावयास मिळाली नाहीं म्हणून मरेतों उपवास करणारे लोक निघाले. प्रत्येकाला कांहीं ना कांहीं महत्त्वाचें वाटत असतें. पूर्वींचीं चित्रें, पूर्वींचीं प्रतीकें, पूर्वींचीं व्रतें व पूर्वींचे नियम ह्यांत बदल होईल. नवीन व्रतें व नवीन प्रतीकें येतील. त्या त्या प्रतीकांसाठीं व व्रतासाठीं प्राणार्पण करूं पाहणारें तेज असलें म्हणजे झालें.

इंग्लंडमध्यें बर्ट्रांड रसेल म्हणून एक प्रज्ञावंत पुरुष आहे. त्यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे, कीं नीति दोन प्रकारची असते. एक ऋण–नीति व दुसरी धन–नीति. ऋण–नीति समाजाच्या हिताचें कांहींएक करीत नसते. माळा जपतील, गायत्रीमंत्र म्हणतील, तीनतीनदां स्नानें करतील, भस्में लावतील, गंधें लावतील; हें सारें ऋण–नीतीचा उपासक करतो. परंतु जर आपण त्याला विचारलें, "समाजांतील उपासमार दूर करण्यासाठीं काय केलेंस? समाजास चांगलें शिक्षण मिळावें

म्हणून काय केलेंस ? समाजांतील दास्य जावें, अन्याय जावेत, भांडणें जावींत म्हणून काय केलेंस ? स्त्रियांची स्थिति सुधारावी म्हणून काय केलेंस ?" या सर्व प्रश्नांना त्याचें उत्तर "नेति नेति" असेंच येईल. याच्या उलट, धन–नीति असते. धन–नीतीचा उपासक स्नानसंध्या करीत नसेल, देवदर्शनास–कथा-कीर्तनास जात नसेल, माळा–भस्में यांची उपासना करीत नसेल; परंतु समाजांतील अन्याय दूर करण्यासाठीं तो धांव घेतो. तो पददलितांची बाजू घेतो. सारी घाण जाळावयास तो उभा राहतो. जेथें जेथें विपत्ति असेल, संकट असेल, जुल्म असेल, अशरणता असेल, अरेरावी असेल, तेथें तेथें तो वीराप्रमाणें उभा राहील, स्वतःचें बलिदानहि वेळ पडली तर तो देईल.

सनातनी लोक ऋण–नीतीचे उपासक असतात. नवीन कार्यकर्ते धन–नीतीचे उपासक असतात. ज्या समाजांत कर्मशून्य ऋण–नीतीचाच पसारा फार दिसतो, त्या समाजाला धुळीस मिळावें लागतें. ज्या समाजांत प्रत्यक्ष सेवा करणारे धन-नीतीचे उपासक असतात, तो समाज वर येतो.

या धन–नीतीच्या उपासकांना समाजाचा छळ सोसावा लागतो. शंकराचार्यांनीं नुसतें अद्वैत सिद्ध केलें नाहीं. तें समाजाच्या व्यवहारांत आणण्यासाठीं त्यांनीं कष्ट केले. दक्षिण देशांत भिन्नभिन्न देवतांची उपासना करणारे संपदाय होते. या संप्रदायांमध्यें प्रचंड वैरें असत. शंकराचार्य म्हणाले, "अरे, सारीं एका शक्तीचीं रूपें. गणपति असो वा सूर्य असो, शिव असो, शक्ति असो वा विष्णु असो; या पांचहि देवतांची एकत्र पूजा करा. पंचायतनपूजा सुरू करा. भेदांत अभेद आणा. अद्वैत कृतींत येऊं दे व कलहहि मिटूं देत."

पंचायतनपूजा शंकराचार्यांनीं सुरू केली. नवीन प्रयोग त्यांनीं केला. अद्वैताचा प्रात्यक्षिक प्रयोग. शंकराचार्यांचा त्यासाठीं छळ झाला. हे सबगोलंकार करणारे आहेत, हे प्रच्छन्न बुद्धपंथीच आहेत, नाना दूषणें त्यांना मिळालीं. त्यांच्यावर बहिष्कार घालण्यांत आला. शंकराचार्य मरणोन्मुख आईला भेटावयास गेले. आई मरण पावली. त्या वेळेस त्या मातेच्या मृत देहाला नेण्यासाठीं कोणी मिळेना! शंकराचार्यांनीं आईच्या देहाचे तीन तुकडे केले. एकेक तुकडा त्यांनीं स्मशानांत नेला व अग्नि दिला! आज मलबार प्रांतांत मेलेल्या मनुष्याच्या अंगावर तीन रेषा ओढतात. तीन तुकड्यांची ती कठोर निशाणी आहे!

संतांनीं संस्कृतांतील ज्ञान लोकांच्या भाषेंत आणण्याचें महान् कार्य सुरू केलें.



मनुष्याला ज्ञानाशिवाय कसें जगतां येईल ? सूर्याचे किरण सर्वांना हवेत, त्याप्रमाणें ज्ञानाचेहि किरण जीवमात्रास हवेत. ज्ञान हें कांहीं लोकांची वतनदारी असणें म्हणजे घोर अन्याय होता. संतांनीं बंड पुकारलें. ज्ञानेश्वर, मुकुंदराय, एकनाथ–सारे बंडांत सामील झाले. तुकाराम तर म्हणूं लागले, "अरे घोक्यांनो! पाठीवर भार वाहून चव कळत नाहीं!"

वेदांचा तो अर्थ आम्हांसीच ठावा।
येरांनीं वहावा भार माथा॥

प्रत्यक्ष जीवनांत जे अद्वैत अनुभवूं लागले, त्यासाठीं सनातनींचे होणारे विरोध न जुमानतां जे वागूं लागले, त्यांनाच वेद समजत होता. वेद म्हणजे ज्ञानाचा साक्षात्कार! ज्ञान हें साक्षात्कारासाठीं आहे. भरल्यापोटीं चर्चेसाठीं नाहीं.

पहिले बाजीराव पेशवे मस्तानीपासून झालेल्या पुत्रांची मुंज करूं पहात होते. त्यांचें हंसें झालें. त्यांना अपमान सहन करावे लागले. परंतु भारतीय संस्कृतीचा आत्मा त्यांनीं ओळखला होता.

गीतेंत चार प्रकारचे भक्त सांगितले आहेत. माझ्या मतें त्यांत फार थोर दृष्टि आहे. समाजाची उन्नति करणारें सारें शास्त्रच जणुं त्यांत आलें आहे :

आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ।

आर्त, जिज्ञासु, अर्थार्थी व ज्ञानी असे हे चार भक्त आहेत.

आर्त भक्त म्हणजे काय ? आर्त म्हणजे दुःख सांगणारा. देवाजवळ दुःख सांगणारा. हें कोणाचें दुःख ? मला वाटतें, भक्त जो असेल तो केवळ स्वतःचें दुःख उगाळीत बसणार नाहीं. हा उदार आर्त आहे. या चारी भक्तांना उदार म्हटलें आहे. जगाच्या दुःखानें तो आर्त भक्त दुःखी होतो. सर्व समाजांतील भीषण अन्याय पाहून त्याचें अंतःकरण तळमळतें. समर्थांनीं लहानपणींच आईला सांगितलें,

"आई! चिंता करितों विश्वाची"

समर्थांसारख्या उदार आर्त भक्तांना समाजाची चिंता प्रथम असते. या समाजाचें भलें कसें होईल, समाज सुसंपन्न, सुसंस्कृत, सुशिष्ट कसा होईल, समाजांत अन्नवस्त्राची, ज्ञानविज्ञानाची विपुलता कशानें होईल, याची त्यांना चिंता लागते. या एकाच चिंतेनें त्यांच्या हृदयाची होळी पेटत असते.

झाडूं संतांचे मार्ग। आड रानीं भरलें जग॥

सारा संसार रानांत शिरलेला त्यांना दिसतो. चुकीच्या मार्गानें लोक जात आहेत व त्यामुळें दुःखांत पडत आहेत, असें त्यांना दिसतें. या उदार आर्त भक्तांना चैन पडत नाहीं. किंकाळ्या त्यांच्या कानांवर येत असतात. भक्ताची ही पहिली स्थिति असते. जगाच्या दुःखाशीं तो एकरूप होतो.

या उदार आर्ततेंतून मग उदार जिज्ञासा उत्पन्न होते. दुःख तर आहे, परंतु हें दुःख कां आहे याची कारणमीमांसा तो आर्त भक्त करूं लागतो. आर्त भक्तींतून जिज्ञासा उत्पन्न होते. प्लेग कां येतो? चला, शोधूं त्याचीं कारणें. स्वतःच्या अंगांत टोंचून घेऊं या. प्रयोग करूं या. पीतज्वर कां होतो? उपदंश कां होतो? भूकंप कां होतात? ज्वालामुखींचे स्फोट कां होतात? वादळें कां होतात? पिकांचे रोग कां येतात? समाजांत व्यभिचार कां आहेत? चोऱ्यामाऱ्या कां आहेत? समाजांत एकीकडे मोठमोठ्या माड्या, एकीकडे मातीच्या झोपड्या, असें चित्र कां? कांहींचे गाल फुगलेले, कांहींचे बसलेले; कांहीं अनवाणी, तर कांहीं नवीन बूट घातलेले; कांहीं मरमर मरतात, कांहीं खुशाल गाद्यांवर मांसाच्या गोळ्याप्रमाणें लोळतात; कांहीं अजीर्णानें मरतात, कांहीं भुकेनें मरतात; कांहींना ज्ञानाचा गंध नाहीं, कांहीं आमरण शिकतच आहेत! हीं अनंत दुःखें कां? याची मीमांसा तो आर्त भक्त करूं लागतो. राष्ट्राराष्ट्रांत लढाया कां, भेद कां? साम्राज्यवाद कां? गुलामगिरी कां? कां हें सारें?

अशा रीतीनें मनुष्य विचार करूं लागला म्हणजे त्याला नाना प्रकारचीं कारणें दिसतात. तीं कारणें दूर करण्याचे उपाय तो शोधूं लागतो. परंतु खरा उपाय कोणता? दुःखें दूर करण्याचे अनेक मार्ग त्या जिज्ञासु भक्ताला दिसूं लागतात. परंतु सारे मार्ग हितकरच असतील असें नाहीं. भक्तीची तिसरी स्थिति तो आतां अनुभवतो. अर्थार्थी भक्त दुःख दूर करण्यासाठीं जे जे उपाय सुचले, त्यांतील कोणत्या उपायानें खरोखर अर्थ साधेल हें बघतो. अर्थ म्हणजे कल्याण. मनांतील मांगल्याचा अर्थ कोणत्या मार्गानें गेलें असतां साधेल? अर्थार्थी म्हणजे प्रत्येक गोष्टींत अर्थ पाहणारा, प्रत्येक गोष्टींचें मूल्यमापन करणारा, तिचें महत्त्वमापन करणारा.

समाजांतील विरोध व वैषम्यें, हे भेद व हीं दुर्भिक्ष्यें दूर करण्यासाठीं साम्यवाद चांगला कां? हीं यंत्रें चांगलीं आहेत कीं वाईट आहेत? ग्रामोद्योग सुरू करावेत कीं यंत्राची पूजा सुरू करावी? हिंदु-मुसलमानांचे प्रश्न आर्थिक आहेत कीं



दुसरीं कांहीं कारणें आहेत? हिंसेचा अवलंब करावा कीं अहिंसेचा? निःशस्त्र प्रतिकार हितकर आहे कीं वांझोटा आहे? साम्राज्यांतर्गत स्वराज्य चांगलें कीं फुटून निघणें चांगलें? मुलें-मुली एकत्र शिकण्यांत हित आहे कीं अहित आहे? शिक्षण स्वभाषेंतून असावें कीं परभाषेंतून? प्रौढ विवाह असावेत कीं बालविवाह? पोशाख एक असावा कीं नसावा? घटस्फोटाची जरुरी आहे का? स्त्रियांना वारसा हक्क कां असूं नये?

समाजांतील शेंकडों दुःखांना शेंकडों उपाय त्या जिज्ञासु आर्ताला सुचतात. त्या उपायांतील जे उपाय हितकर वाटतील ते उपाय भक्त हृदयाशीं धरतो. जे निरनिराळे विचार त्याला स्फुरतात, त्यांतील अत्यंत हितकर विचारांना तो मिठी मारतो. अर्थार्थी भक्त आतां ज्ञानी होतो. म्हणजे जें ज्ञान त्याला निर्मल वाटतें, निःशंक वाटतें, अर्थमय वाटतें, त्या ज्ञानाशीं स्वतःचें तो लग्न लावतो. त्या ज्ञानाचा प्रयोग तो सुरू करतो. त्या प्रयोगासाठीं सारें उर्वरित जीवन वेंचतो. त्या प्रयोगासाठीं साऱ्या निंदा, सारे अपमान, सारे कष्ट, तो हंसत हंसत सहन करतो. फांस असो वा गोळी असो, सर्वाठायीं त्याची आतां तयारी असते. त्या ज्ञानाची, त्या सत्याच्या प्रयोगाची पूजा करण्यांत, त्या सत्याचा महिमा वाढविण्यांत, अपार आनंद त्याला होत असतो. तोच त्याचा मोक्ष. तेंच त्याचें सर्वस्व.

लोकांच्या सुखदुःखांशीं एकरूप होणें, त्यांच्या वेदनांनीं विव्हल होणें, त्या वेदनांची मीमांसा करणें, जे उपाय सुचतील त्यांतील कोणते उपाय अधिक परिणामकारक, अधिक सत्यमय, अधिक मंगलावह हें पाहणें व असे जे उपाय दिसतील त्याच्यासाठीं सारें आयुष्य देणें, हें ऋषींचें महान् ध्येय असतें. अशा रीतीनें ते प्रयोग करतात व प्राण अर्पण करतात. प्राचीन काळापासून असे संत भारतीय संस्कृतींत झाले आहेत; आजहि दिसत आहेत. अशा प्रयोग करणाऱ्या निर्भय, सत्यमय, ध्येयनिष्ठ वीरांनींच समाजाला पुढें नेलें आहे..

विष्णुवीर गाढे। कळिकाळ पायां पडे॥

असे ज्ञानोपासक विष्णुवीर कोणाला भीक घालीत नाहींत. कोणत्याहि सत्तेला ते भीत नाहींत. ध्येय-देवासमोर ते लवतात. ध्येय-देवाला पूजितात. दुसरा देव त्यांना माहीत नाहीं!

असा ध्येयानें पेटलेला महात्मा समाजांत उभा राहिला, म्हणजे सारा समाज शेवटीं पेटल्याशिवाय रहात नाहीं. त्याच्या महान् प्रयोगांत जनता सामील होते.

ज्याप्रमाणें एकादा महान् वृक्ष हळूहळू तपस्येनें वाढतो, त्याला फळेंफुलें येतात, मग वारा येतो, त्या वृक्षांचीं बीजें तो महान् वारा दशदिशांत फेकतो आणि जंगलेंच्या जंगलें उभीं राहतात, त्याप्रमाणें एक असा दिव्य-भव्य सत्याचे प्रयोग करणारा उभा राहतो, त्याच्या प्रयोगाचीं बीजें लाखों हृदयांत पडतात. मग त्याच्याभोंवतीं त्या ध्येयाचे लाखों उपासक उभे राहतात ! कारण, शेवटीं मनुष्य हा सत्यमय आहे. त्याच्या आत्म्याचा नैसर्गिक स्वभाव जागृत होतो. मांगल्याची हांक त्याच्या हृदयाला ऐकूं येते.

अशा रीतीनें महान् चळवळी होतात. प्रचंड क्रांत्या होतात. मानवजाति एक पाऊल पुढें टाकिते. असे प्रयोग करीत मानवजात चालली आहे. जो समाज असे प्रयोग करणार नाहीं तो मरेल. जी संस्कृति असे प्रयोग करणार नाहीं, ती पै किंमतीची होईल.

## वर्ण : : ५

वर्णाश्रमधर्म हा शब्दसमुच्चय आपण अनेकदां ऐकतों. वर्णाश्रम-स्वराज्यसंघ वगैरे संघहि अस्तित्वांत आलेले आहेत. परंतु वर्ण म्हणजे काय, आश्रम म्हणजे काय, यासंबंधीं गंभीर विचार फारसा केलेला आढळत नाहीं. प्रस्तुत प्रकरणांत आपण वर्ण म्हणजे काय यासंबंधीं थोडेंसें विवेचन करूं.

आपापल्या वर्णाप्रमाणें प्रत्येकानें वागावें असें आपणांस सांगण्यांत येत असतें. परंतु वर्णाप्रमाणें वागणें म्हणजे काय ? ब्राह्मणानें ब्राह्मणधर्माप्रमाणें वागावें, क्षत्रियानें क्षत्रियधर्माप्रमाणें वागावें, वैश्यानें वैश्यधर्मानुसार व शूद्रानें शूद्रवृत्त्यनुसार वागावें, असें याचें स्पष्टीकरण करण्यांत येत असतें.

या सर्व बोलण्या-सांगण्यांत एक वस्तु गृहीत धरलेली असते, कीं आईबापांचेच सारे गुणधर्म मुलांत उतरत असतात. परंतु प्रत्यक्ष संसारांत अनुभव तर तसा येत नाहीं. आईबापांच्याच आवडी-निवडी अपत्यांत आलेल्या असतात असें नाहीं. मायबापांपेक्षां अत्यंत भिन्न वृत्तींचीं मुलें आपणांस दिसून येत असतात. हिरण्यकश्यपूच्या पोटीं प्रल्हाद येतो.

परंतु आईबापांचे गुणधर्म उतरत नसले, तरी मुलें लहानपणापासून जें सभोंवतीं पाहतील, त्याचाच ठसा त्यांच्या जीवनावर उमटल्याशिवाय राहणार नाहीं.



त्या वातावरणाचा त्यांच्या मनावर परिणाम होईल. कीर्तनकाराचा मुलगा लहानपणापासून घरांत कविता, आख्यानें वगैरे ऐकेल. गाणाऱ्याचा मुलगा गाणें, तंबोरा तवला, पेटी यांच्या संगतींत वाढेल. विणकराचा मुलगा हातमाग, पांजणी, ताणावाणा, धोटा यांच्याशीं परिचित असेल. शेतकऱ्याच्या मुलाला नांगर, वखर, पाभर, पेरणी, निंदणी, खुरपणी, मोट, नाडा यांचा सराव असेल. सैन्यांतील शिलेदाराचा मुलगा घोड्यावर बसेल, भाला फेंकील, तलवार खेळवील. वाण्याचा मुलगा तराजू तोलील, मालाचे भाव सांगेल, नीट पुडी बांधून देईल, जमाखर्च राखील. चित्रकाराचा मुलगा रंगांशीं रमेल, चर्मकाराचा मुलगा चामड्याशीं खेळेल. अशा प्रकारें त्या त्या मुलाच्याभोंवतीं जें वातावरण असेल, त्या वातावरणाचा तो बनेल.

मनुष्य केवळ परिस्थितीचा गोळा आहे का ? सभोंवतालच्या वातावरणाचा परिणाम होतो हें खरें. परंतु मुळांत कांहीं असेल, तर त्याच्यावर परिणाम होईल. बीजच नसेल, तर कितीहि पाणी ओतलें म्हणून का अंकुर वर येणार आहे ? मुळांत बीज हवें. आंत जन्मतःच कांहींतरी पाहिजे.

आईबापांचेच गुणधर्म मुलांत येतात, वातावरणामुळें आईबापांचाच वर्ण मुलाच्या जीवनाचा असणें शक्य व संभवनीय दिसतें, असें प्राचीन काळांत मानलें गेलें; परंतु त्या वेळच्या प्रयोगांप्रमाणें व संशोधनाप्रमाणें तसें ठरविलें गेलें, म्हणून आजहि तसेंच मानलें पाहिजे असें नाहीं. आज शास्त्रें वाढलीं आहेत. जास्त शास्त्रीय दृष्टीनें वर्णचिकित्सा आज करतां येणें शक्य आहे.

ज्यानें त्यानें आपल्या वर्णाप्रमाणें वागावें हा सिद्धान्त त्रिकालाबाधित आहे. आपण वर्ण चार कल्पिले. परंतु हे फार व्यापक तऱ्हेनें कल्पिले. ज्ञानाची उपासना करणारा ब्राह्मणवर्ण. परंतु ज्ञान शेंकडों प्रकारचें आहे. अनंत वेद आहेत. वाढत्या काळाप्रमाणें ज्ञान वाढत आहे. मानसशास्त्र, नीतिशास्त्र, अध्यात्मशास्त्र, पुनर्जन्मशास्त्र, सृष्टिशास्त्र, ज्योतिषशास्त्र, रसायनशास्त्र, वातावरणशास्त्र, विद्युच्छास्त्र, संगीतशास्त्र, शारीरशास्त्र, शस्त्रक्रियाशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र, उद्भिज्यशास्त्र, शेंकडों शास्त्रें आहेत. ज्ञानाची उपासना करणें हा एक वर्ण झाला. परंतु या एका वर्णाचीं हीं शेंकडों अंगें आहेत.

तसेंच क्षत्रियवर्णाचें. विमानयुद्ध, नाविकयुद्ध, जलयुद्ध, वातयुद्ध, शेंकडों प्रकारचीं युद्धें अस्तित्वांत येत आहेत.

वैश्यवर्ण. कृषिगोरक्षवाणिज्य म्हणजे वैश्यकर्म. परंतु प्रत्येकांत शेंकडों भाग आहेत. कोणी अफू पेरील, तर कोणी तमाखू लावील; कोणी कपाशी पेरील, तर कोणी भुईमूग; कोणी संत्रीं लावील, तर कोणी द्राक्षें लावील. ज्याप्रमाणें शेतीचे शेंकडों प्रकार त्याप्रमाणें वाणिज्याचेहि शेंकडों प्रकार. हा कापसाचा व्यापारी, हा धान्याचा व्यापारी, हा तुपाचा व्यापारी, हा तेलाचा व्यापारी, हा गिरणीवाला, हा लोखंडवाला असे शेंकडों प्रकार आहेत.

आणि धंदे हजारों प्रकारचे; यामुळें हजारों ठिकाणीं मजुरी करणारे शूद्रहि हजारों कामांत पडतील.

या चार वर्णांत हजारों प्रकार सामावतात. या हजारों प्रकारांतील कोणती गोष्ट मुलानें उचलावी ? मुलानें कोणत्या वर्णांतील कोणता भाग पूजावा ?

वर्ण या शब्दाचा अर्थ रंग असा आहे. आपण म्हणतों, कीं आकाशाचा वर्ण निळा आहे. मराठींत वर्ण या शब्दापासून वाण हा शब्द आला आहे. "गुण नाहीं पण वाण लागला" अशी जी म्हण आहे, त्या म्हणींतील वाण शब्दाचा अर्थ रंग हाच आहे. मी अमक्या वर्णाचा आहें, याचा अर्थ मीं अमक्या रंगाचा आहें.

देवानें कोणता रंग देऊन मला पाठविलें आहे ? कोणते गुणधर्म देऊन मला पाठविलें आहे ? कुऽऊ करणें हा कोकिळेचा जीवनरंग आहे. मधुर सुगंध देणें हा गुलाबाचा जीवनधर्म आहे. माझ्यांतून कोणता रंग, कोणता गंध बाहेर पडणार ? कोणत्या रंगाचा विकास मला करावयाचा आहे ?

मुलांच्या गुणधर्मांचें परीक्षण केल्याशिवाय हें कसें कळणार ? कोणता रंग घेऊन बालक जन्मलें आहे, याचें शास्त्रीय संशोधन करावयास हवें. स्मृतींतून असें सांगितलें आहे, कीं आपण जन्मतांना सारे एकाच वर्णाचे असतों. आपणांस आधीं वर्ण नसतो. वर्ण नसतो म्हणजे काय ? वर्ण असतो, परंतु तो अस्पष्ट असतो, अप्रकट असतो. आठ वर्षांचे होईपर्यंत आपण वर्णहीनच असतों. वर्ण कळला म्हणजे उपनयन करावयाचें. वर्ण कळल्याशिवाय उपनयन तरी कसें करावयाचें हा प्रश्नच आहे.

आठदहा वर्षांचा मुलगा होईपर्यंत त्याचे गुणधर्म आपणांस कळूं लागतात. एकाद्याला वाचनाचीच आवड दिसते. एकादा गातच बसतो. एकादा वाजवीत बसतो. एकादा घड्याळ जोडीत बसतो. एकादा फुलझाडांशीं खेळतो. एकादा कुस्ती, मारामारी करतो. एकादा पक्ष्यांना गोफणी मारतो. मुलांच्या भिन्नभिन्न प्रवृत्ती दिसून येतात. मुलांचे भिन्नभिन्न गुणधर्म दिसून येतात.



स्वतंत्र देशांत निरनिराळ्या प्रकारचे शिक्षणप्रयोग होत असतात. मुलांचें वर्णशोधन करण्याचा प्रयत्न होत असतो. एकाद्या दिवाणखान्यांत शेंकडों वस्तू ठेवतात. तेथें रंग असतात, वाद्यें असतात, यंत्रें असतात, पुस्तकें असतात, तेथें बाहेर घोडे असतात, फुलें असतात, धान्यें पेरलेलीं असतात, सायकली असतात; कोणत्या वस्तूबरोबर मुलगा रमतो हें शिक्षकानें पहावयाचें असतें. हीं बाल-फुलपांखरें तेथें सोडून द्यावयाचीं. हिंडत, फिरत, गुंगत तीं कोठें अधिक काळ रमतात तें नमूद करून ठेवावयाचें. पुष्कळ दिवसांच्या निरीक्षणानें त्या मुलांच्या आवडीनिवडी शिक्षकास कळण्याचा संभव असतो. तो शिक्षक मग पालकास कळवील, कीं तुमचा मुलगा चित्रकार होईल असें वाटतें. तुमचा मुलगा उत्कृष्ट माळी होईल असें दिसतें. यांत्रिक संशोधनाची बुद्धि तुमच्या मुलाची दिसते. मुलाचे गुणधर्म कळल्यावर त्या गुणाचा जेथें विकास होईल तेथें त्याला पाठविणें हें पालकाचें व शिक्षणखात्याचें कर्तव्य ठरतें.

उपनयन म्हणजे गुरूजवळ नेणें. कोणत्या गुरूजवळ न्यावयाचें ? मुलाच्या विशिष्ट वर्णाचा विकास करूं शकणाऱ्या गुरूजवळ न्यावयाचें. संगीताची आवड असणाऱ्या मुलाला आंकडेमोड करणाऱ्या शिक्षकाकडे नेऊन काय फायदा ? तो त्या मुलाची संगीत-वृत्ति गुदमरवून टाकील. बाल-कोकिळेचा गळा दाबला जाईल. तो त्या मुलाच्या आत्म्याचा वधच होय.

ज्या राष्ट्रांत, ज्या राज्यपद्धतींत व्यक्तीच्या वर्णाचें शास्त्रीय संशोधन होऊन त्याच्या वर्णाच्या विकासाला पूर्णपणें अवसर असतो, त्या वर्णविकासाच्या मार्गांतील साऱ्या अडचणी दूर करण्यांत येत असतात, तें राष्ट्र परम थोर होय. तेथील राज्यपद्धति खरी आदर्शभूत समजली पाहिजे.

परंतु स्वराज्य असल्याशिवाय हें कसें शक्य होईल ? स्वराज्य यासाठीं पाहिजे आहे. व्यक्तीच्या विकासासाठीं स्वराज्य पाहिजे आहे. व्यक्तीचें ईश्वरी देणें वाढीस लागावें, यासाठीं स्वराज्य पाहिजे आहे. जोंपर्यंत स्वराज्य नाहीं, तोंपर्यंत खरा वर्ण नाहीं. नामधारी वर्ण तोंपर्यंत दिसतील. परंतु व्यक्तींच्या गुणधर्मांचें शास्त्रीय परीक्षण-निरीक्षण होणार नाहीं. विकासांतील अडथळे दूर होणार नाहींत.

आज शाळेंतील शिक्षकास कोणते अनुभव येतात ? निरनिराळ्या गुणधर्मांच्या मुलांची आज कत्तल होत आहे. सर्वांना सदैव एकच शिक्षण. वर्णविकासास आज अवसर नाहीं. दारिद्र्यामुळें आज कोणत्याहि मुलाला स्वतःच्या आवडीचें शिक्षण घेतां येत नाहीं. खरा वर्णाभिमानी मनुष्य आधीं स्वराज्यासाठीं मरावयास सिद्ध होईल.

एकाद्या श्रीमंताला स्वतःच्या वर्णाप्रमाणें वागतां येईल. परंतु सर्वांना तें शक्य आहे का ? लोकमान्य टिळकांचा कोणता वर्ण होता ? तत्त्वज्ञानांत रमावें, गणित-शास्त्रांत डुंबावें हा त्यांच्या आत्म्याचा धर्म होता. कदाचित् त्यांना त्या गुण-धर्माचा विकास करणें शक्य झालें असतें. परंतु त्यांच्या डोळ्यांना दिसलें कीं, लाखों जीवांना आपल्या गुणधर्मांचा विकास करून घेणें या सर्वभक्षक पारतंत्र्यांत शक्य नाहीं. म्हणून ते म्हणाले, " सर्वांच्या विकासमार्गांत आड येणारें पारतंत्र्य हें आधीं दूर करूं या. " स्वराज्यासाठीं लोकमान्य गेले. राष्ट्राचा वर्णविकास नीट व्हावा, राष्ट्रांत खरा वर्णधर्म आज ना उद्यां केव्हांतरी यावा, म्हणून ते अविरत श्रमले.

महात्मा गांधी एकदां असेंच म्हणाले. समाजसुधारक वृत्तीचे महात्माजी आहेत. परंतु राष्ट्राच्या विकासास पारतंत्र्य हा मोठा अडथळा असल्यामुळें तो दूर करण्यासाठीं ते उठले. इतिहासाचार्य राजवाडे दुःखसंतापानें म्हणत, " पदोपदीं स्वराज्याची आठवण येते." स्वराज्य असतें, तर राजवाड्यांनीं केवढा ज्ञानप्रांत जिंकून घेतला असता त्याची कल्पनाहि करवत नाहीं.

कितीतरी कलावान्, कितीतरी शास्त्रज्ञ, कितीतरी शोधकबुद्धीचे कल्पक आज या दास्यांत धुळींत पडून मरत आहेत. पारतंत्र्यांत सर्वांत मोठें नुकसान जगाचें होत असेल, तर हेंच होय.

वर्णविकासासाठीं स्वराज्य पाहिजे. परंतु कोणत्या प्रकारच्या स्वराज्यांत सर्वांच्या वर्णाचा विकास होईल ? जें स्वराज्य मूठभर भांडवलवाल्यांचें आहे, त्या स्वराज्यांत गोरगरिबांच्या मुलांचे गुणधर्म नीट संवर्धिले जातील का ? सर्वांचा वर्णविकास व्हावयास पाहिजे असेल, तर साम्यवादाशिवाय गत्यंतर नाहीं. साम्यवादी राज्यपद्धतींतच सर्वांचें योग्य तें उपनयन होईल.

" स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः " हा श्रीगीतेंतील चरण वारंवार म्हटला जातो. या चरणांतील धर्म या शब्दाचा अर्थ हिंदु-धर्म, मुसलमान-धर्म, असा नाहीं. येथील धर्म शब्दाचा अर्थ वर्ण असा आहे. अर्जुनाची क्षत्रियवृत्ति होती. उत्तरगोग्रहणापर्यंत हजारों शत्रूंचीं मुंडकीं चेंडूप्रमाणें उडविणें यांत त्याला आनंद वाटत होता. जन्मल्यापासून हाडीमासीं खिळलेली ही क्षत्रियवृत्ति अर्जुन मोहामुळें टाकूं इच्छीत होता. तो संन्यासाच्या गप्पा मारूं लागतो. भिक्षा मागून जगेन म्हणतो. परंतु हें त्याचें स्मशानवैराग्य टिकलें असतें का ? तो रानावनांत जाता व तेथेंहि हरणें-पांखरें मारूं लागता व त्यांचें मांस मिटक्या मारून खाता. अर्जुनाची फजिती झाली असती. वृत्तीनें, वैराग्यानें, चिंतनानें खरी संन्यास-भूमिका सिद्ध झाली नसतांना केवळ लहर म्हणून संन्यासी होणें, यांत दंभ आला असता.



जी वृत्ति अद्याप आपल्या आत्म्याची झाली नाहीं, ती एकदम अंगीकारूं पाहणें भयावहच आहे. अंतरंगीं आसक्ति असलेल्यानें संन्यस्त होणें, यांत स्वतःचा व समाजाचा अधःपात आहे. मनांत शिक्षणाची आस्था नसणाऱ्यानें शाळेंत शिकवणें यांत स्वतःलाहि समाधान नाहीं व राष्ट्रांतील भावी पिढीचेंहि अपरंपार नुकसान आहे. आपला वर्ण समाजांत कमी समजण्यांत येत असला, तरी त्या वर्णानुरूप समाजाची सेवा करीत राहणें यांतच विकास असतो. पाण्यापेक्षां दूध मोलवान् आहे; परंतु मासा पाण्यांतच वाढेल, दुधांत जगणार नाहीं.

" यज्जीवन जीवन तो दुग्धीं वांचेल काय हो मीन ? "

ज्यानें त्यानें स्वतःच्या धर्माप्रमाणें वागावें म्हणजे स्वतःच्या वर्णधर्माप्रमाणें वागावें. स्वतःच्या गुणधर्माप्रमाणें वागावें व समाजसेवा करावी.

संस्कृतांत न्यायशास्त्रांत धर्म शब्दाची व्याख्या विशिष्ट अर्थानें करण्यांत येत असते. ज्याशिवाय पदार्थ असूंच शकत नाहीं, तो धर्म होय. उदाहरणार्थ, जाळणें हा अग्नीचा धर्म होय. उष्णतेशिवाय अग्नि असूंच शकत नाहीं. शीतलत्वाशिवाय पाणी संभवत नाहीं. प्रकाशण्याशिवाय सूर्याला अर्थ नाहीं. आपण सूर्याला जर म्हणूं " तूं तपूं नकोस " तर तो म्हणेल, " मीं न तपणें म्हणजे मीं मरणें." आपण वाऱ्याला जर म्हणूं " तूं वाहूं नकोस " तर तो म्हणेल, " मी वाहूं नको तर काय करूं ? वाहणें म्हणजेच माझें जीवन."

धर्म शब्दाचा हा अर्थ आहे. महात्माजींना विचारा कीं, " तुम्ही चरखा कांतू नका;" तर ते म्हणतील " मग मी जगेन कसा ? " जवाहरलालांना विचारा,

"तुम्ही पददलितांसाठीं नका असें जिवाचें रान करूं;" तर ते म्हणतील, "मग माझ्या श्वासोच्छ्वासाला अर्थ काय ?"

ज्याच्याशिवाय आपण जगूं शकत नाहीं, ज्याच्यासाठीं जगावें व मरावें असें वाटतें, तो आपला वर्णधर्म होय. शेतकऱ्याला म्हणा, "तूं शेत पेरूं नकोस, गायीगुरें पोसूं नकोस, मोट हांकूं नकोस." त्याला कंटाळा येईल. शिक्षकाला—खऱ्या शिक्षकाला—मे महिन्याची सुटी कंटाळवाणी वाटते. शिकवणें हाच त्याचा परमानंद असतो. वाण्याला म्हणा, 'दुकानांत बसूं नकोस; भाव काय आहे त्याची चौकशी करूं नकोस;' तर त्याला जीवनांत गोडी वाटणार नाहीं. आपल्या आवडीचें सेवेचें कर्म म्हणजे आपला प्राण होय. त्याच्यासाठीं जगावें, मरावें असें वाटत असतें.

असा जो स्वतःचा वर्ण, असा जो स्वतःचा सेवाधर्म, त्याच्यासाठीं आपले सारे उद्योग असावेत. त्या वर्णाचा, त्या रंगाचा आपण रात्रंदिवस प्रयत्न करून विकास करावा आणि मेल्यावर देवाजवळ जाऊन म्हणावें, "देवा! हें भांडवल तूं मला दिलें होतेंस. त्याची अशी मीं वाढ केली. त्या भांडवलाची वाढ करून मीं समाजाला सुखी केलें. समाज-पुरुषाची मीं पूजा केली." देव संतोषेल व तुम्हांला हृदयाशीं धरील.

## कर्म : : ६

भारतीय संस्कृतींत समाजाला महत्त्व आहे कीं व्यक्तीला महत्त्व आहे ? समाजासाठीं व्यक्ति आहे. व्यक्ति म्हणजे माया आहे, समाज सत्य आहे. अद्वैत सत्य आहे, द्वैत मिथ्या आहे. शंकराचार्य संसाराला मिथ्या मानतात याचा अर्थ काय ? व्यक्तीचा संसार मिथ्या आहे. मीं केवळ माझ्यापुरतें पाहणें म्हणजे मिथ्या आहे. माझ्या आजुबाजूला दुःख असतांना मी एकटा सुखी होऊं पाहणें म्हणजे भ्रम आहे. आजुबाजूला आग लागली असतां माझें एकट्याचें घर सुरक्षित कसें राहील ? जगांत केवळ स्वतःसाठीं पाहतां येणार नाहीं. कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति जर केवळ स्वतःपुरतें पाहील, तर कुटुंबाचा विचका होईल. त्या कुटुंबांत आनंद कसा दिसेल ? समाधान कसें नांदेल ? ज्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति इतरांच्या सुखांत स्वतःचें सुख मानते, तेंच कुटुंब भरभराटेल, सुखी व आनंदी दिसेल.



जो नियम कुटुंबाला लागू तोच समाजाला, सर्व संसाराला. आपण समाजासाठीं आहोंत, या मानवजातीसाठीं आहोंत, या सर्व प्राणिमात्रांसाठीं आहोंत. दगड अलग पडला तर त्याला महत्त्व नाहीं. परंतु तो इमारतींत संयमपूर्वक बसेल, तर त्याला अमरता येते, त्याला महत्त्व येतें. आपण या समाजाच्या सुंदर इमारतींत योग्य ठिकाणीं बसलें पाहिजे व तेथें शोभलें पाहिजे.

समाजाला सत्यता आहे, व्यक्तीला नाहीं. परंतु याचा अर्थ व्यक्तीला स्वातंत्र्य नाहीं, असा नाहीं. समाजासाठीं व्यक्ति आहे, परंतु व्यक्ति आपल्या गुणधर्माप्रमाणें समाजासाठीं जगेल. माझ्या ठायीं जो वर्ण आहे, त्या वर्णाच्या विकासानें मी समाजाची सेवा करीन. मी समाजाची सेवा करीन हें खरें, परंतु माझ्या विशिष्ट आवडीप्रमाणें मी सेवा करीन. माझा वर्ण समाज मारणार नाहीं. माझ्या वर्णाच्या विकासासाठीं समाज सोयी करून देईल. परंतु माझ्या विकासानें मी समाजाचीच पूजा करीन. माझा विकास हा समाजाला शोभवील, सुखवील, हंसवील, पोषवील. मी समाजासाठीं व समाज माझ्यासाठीं. समाजाला माझ्यामुळें शोभा व समाजामुळें मला शोभा, असा हा अन्योन्य संबंध आहे.

मनुष्यानें समाजाची सेवा करावयाची; परंतु कोणती सेवा त्यानें करावयाची ? त्याची निवड कोणीं करावयाची ? कोणीं हें ठरवावयाचें ?

कर्माशिवाय मनुष्य जगूंच शकत नाहीं. आपण जर सारे कर्मशून्य होऊं, तर समाज चालेल कसा ? सारी सृष्टि कर्म करून राहिली आहे. प्रत्येकानें कर्म केलेंच पाहिजे. प्रत्येकाला शरीर, हृदय व बुद्धि आहे. शरीरानें कर्म करावयाचें. त्या कर्मांत हृदयाचा जिव्हाळा ओतावयाचा व तें कर्म करतांना बुद्धि वापरावयाची. अशा रीतीनें प्रत्येक व्यक्तीनें शरीर, हृदय व बुद्धि या तिहींच्या योगानें समाजासाठीं रात्रंदिवस झिजावयाचें, आनंदानें श्रमावयाचें.

परंतु कोणत्या कर्मांत रमावयाचें ? आपल्या आवडीच्या कर्मांत; आपला जो वर्ण असेल, आपली जी वृत्ति असेल, त्याला अनुरूप अशा कर्मांत रमावयाचें. त्याच कर्मांत आपण अखंड रमूं, जें कर्म आपणांवर लादलेलें नसून जें आपल्या आवडीचें असूं शकेल.

जें कर्म माझ्या इच्छेविरुद्ध मला करावें लागेल, त्यानें माझा आत्मा शिणेल. त्यांत मला आनंद वाटणार नाहीं. तें कर्म योग्य रीतीनें माझ्याकडून होणार नाहीं. रडतराउतांना घोड्यावर बसविण्यांत काय अर्थ ?

आपल्या आवडीनुसार कोणतेंहि सेवेचें कर्म आपण उचलावें व तद्द्वारा समाज-देवाची पूजा करावी. सेवेचीं सर्व कर्में पवित्र आहेत. कोणतेंहि सेवाकर्म तुच्छ नाहीं, हीन नाहीं. वर्णांमध्यें श्रेष्ठ-कनिष्ठ भाव नाहीं. सारे वर्ण देवाघरीं सारख्याच योग्यतेचे. सेवेच्या सर्व कर्मांची सारखीच किंमत.

समाजाला तत्कालानुरूप नवविचार देणारा पुरुष जितका थोर, तितकाच समाजाला धान्य देणारा शेतकरीहि थोर. समाजाचें रक्षण करणारा योद्धा जितका थोर, तितकाच समाजाला मोट करून देणारा चांभारहि थोर. शाळेंतील शिक्षक जितका थोर, तितकाच रस्ता झाडणारा झाडूहि थोर. हृदय ओतून विचारपूर्वक केलेलें कोणतेंहि सेवाकर्म मोक्ष देणारें आहे.

गीतेमध्यें मोक्ष मिळविण्याचें साधन म्हणून स्वकर्म सांगितलें आहे :

**" स्वकर्मकुसुमीं त्यास पूजितां मोक्ष लाभतो "**

ईश्वराला दुसऱ्या फुलांची आवड नाहीं. तुमचीं दैनंदिन होणारीं हजारों कर्में म्हणजेच फुलें. हीं कर्मफुलें रसमय, गंधमय आहेत कीं नाहींत, एवढें पाहणें म्हणजेच खरा धर्म.

हें स्वकर्म प्रत्येकाचें भिन्नभिन्न असूं शकतें व असणारच. ईश्वर एकाच मासल्याचीं माणसें उत्पन्न करीत नाहीं. छापखान्यांतून भराभर आवृत्त्या निघतात, त्याप्रमाणें ईश्वर करीत नाहीं. ईश्वराची प्रतिभा दुबळी नाहीं. शेंकडों गंधांचीं व रंगांचीं फुलें तो फुलवितो. शेंकडों गुणधर्मांचीं माणसेंहि तो या जगदुद्यानांत पाठवतो. बागेंत शेंकडों फुलें असतात; परंतु कोणतें फूल थोर, कोणतें अधिक योग्यतेचें ? बागेंत एकाच रंगाचीं व एकाच गंधाचीं फुलें आपणांस आवडणार नाहींत. गुलाब, मोगरा, जाई-जुई, शेवंती यांच्याबरोबरच झेंडू, तेरडा हीं फुलेंहि हवींत. प्रत्येकाचा रंग निराळा, गंध निराळा. सर्वांमुळें बाग नयनमनोहर दिसते. त्या फुलांच्या भोंवतीं हिरवेंहिरवें गवतहि पाहिजे. गवताला ना फूल ना फळ, परंतु तें हिरवें गवत—तें साधें गवत—तेथें नसेल, तर तीं फुलें शोभणार नाहींत.

मानवी समाजांत एकाच वर्णाचे सारे असतील, तर किती नीरस होईल तें जीवन ! सारेच गाणारे, सारेच वाजविणारे, सारेच शास्त्रज्ञ, सारेच कुंभार—असें जर असेल तर समाज चालणार नाहीं. समाजांत आनंद दिसणार नाहीं. विविधतेंत आनंद आहे. परंतु ही विविधता साऱ्या समाजासाठीं आहे.

या विविधतेंत तेव्हांच आनंद राहील, ज्या वेळेस खोटे श्रेष्ठ-कनिष्ठपणाचे भाव



समाजांत मांजणार नाहींत. भारतीय संस्कृतींत ज्या वेळेपासून वर्णावर्णांत श्रेष्ठ-कनिष्ठपणाचें बंड घुसलें, त्या वेळेपासून संस्कृति पोखरली जाऊं लागली. समाजाचा अधःपात आंतून नकळत हळूहळू सुरू झाला. भगवान् श्रीकृष्णांनीं या वृत्तीविरुद्ध बंड पुकारलें. समाजसेवेचें प्रत्येक कर्म थोर आहे, हें श्रीकृष्णानें स्वतःच्या कृतीनें दाखविलें आहे. श्रीकृष्णानें गायी चारल्या, घोडे हांकले, शेण-गोळे फांसले, उष्टीं उचललीं, गीताहि सांगितली ! प्रत्येक कर्म पवित्र आहे, अशी त्या महापुरुषानें घोषणा केली.

'स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम् ।' मोक्षाचीं दारें श्रीकृष्णानें खाडखाड सर्वांसाठीं मोकळीं केलीं. स्त्रियांना म्हणे ज्ञानाचा अधिकार नाहीं, मोक्षाचा अधिकार नाहीं ! श्रीकृष्ण म्हणतो, "चुलीजवळ बसणारी, दळण दळणारी, शेण लावणारी, पाळणा हलविणारी स्त्रीहि मोक्षाची अधिकारी आहे." जी पतीच्या इच्छेंत स्वतःची इच्छा मिळवून टाकते, मुलांबाळांच्या संवर्धनांत स्वतःला विसरते, त्या कर्मयोगिनी स्त्रीस मोक्ष नाहीं, तर मग कोण बाबा मोक्षाचा अधिकारी ?

समाजाच्या सेवेचें कोणतेंहि कर्म हातीं घ्या. त्यानें तुम्ही मुक्त व्हाल. सारे संत ही गोष्ट सांगत आहेत. संत टाळकुटे नव्हते, संत आळशी नव्हते, परपुष्ट नव्हते. समाजावर स्वतःचा भार त्यांनीं कधींच घातला नाहीं. कोणताहि संत घ्या. कोणतें तरी समाजोपयोगी कार्य तो करीत असे. कबीर वस्त्रें विणी, गोरा कुंभार मडकीं भाजी, सांवता माळी भाजी देई, सेना न्हावी हजामत करी, जनाबाई दळी, तुलाधार वैश्य वाण्याचा धंदा करी, सजन कसाई खाटकाचा धंदा करी. हे सारे संत मोक्षाचे अधिकारी होते.

कसाई मुक्त कसा, असा कोणी प्रश्न करील. समाजांत जोंपर्यंत मांस खाणारे लोक आहेत, तोंपर्यंत समाजांत कसायाचा धंदा करणारे लोक असणारच. तो धंदा समाजाच्या सेवेचाच झाला म्हणावयाचा. कसाईखाने म्युनिसिपालिटीस बांधून द्यावे लागणार. जो कसाई प्राण्याचे हाल न करतां त्याला मारील, त्या कसाईपणाच्या कामांतहि ज्ञान वापरील, तो मुक्त होईल. तो घाण होऊं देणार नाहीं, वाटेल तेथें पशुहत्या करणार नाहीं, लहान मुलांबाळांच्या डोळ्यांआड कोठेंतरी तें कर्म करील. कसाई स्वतः मांस खातहि नसेल. परंतु पूर्वजांचा धंदा चालत आला आहे, समाजाला तो धंदा पाहिजे आहे, तर मग त्या धंद्यांत

अनभ्यस्त माणसानें पडून पशूंचे अधिक हाल करण्याऐवजीं त्या धंद्याचें नीट ज्ञान असणारानेंच त्यांत पडणें, भूतदयेच्याहि दृष्टीनें अधिक श्रेयस्कर आहे. अनासक्त राहून तें कर्म तो करील.

कसायाप्रमाणेंच फांशी देणारा मांगहि. समाजांत जोंपर्यंत फांशीची शिक्षा आहे, तोंपर्यंत फांशी देणारे कोणीतरी पाहिजेतच. कोणा अनभ्यस्त माणसानें कसातरी वेडावांकडा फांस गळ्याला लावून द्यावा व तो दुर्दैवी अपराधी धडपडत अधिक वेळ लोंबकळावा यांत किती दुःख आहे! फांशी द्यावयाचेंच आहे तर त्याला नीट द्या. पटकन् फांस बसेल व झटकन् फार वेदना न होतां, फार हाल न होतां प्राण जाईल असें करा; आणि ही गोष्ट त्या कर्मांत कुशल असा मनुष्यच करूं शकेल. इंग्लंडमध्यें कुऱ्हाडीनें डोकें तोडावयाचें अशी शिक्षा असे. ज्या वेळेस मोठमोठ्या मोहऱ्यांना ही शिक्षा देण्यांत येई त्या वेळेस मुद्दाम दूरदूरचे कुऱ्हाडवाले बोलावण्यांत येत. एका घावासरसें मुंडकें सफाईनें दूर करील अशाला मुख्यत्वेंकरून बोलावून आणीत. हेतु हाच कीं त्या कैद्याला कमी दुःख व्हावें.

फांशी देणाऱ्या मांगानें तो फांस नीट काळजीपूर्वक दिला, कसायानें पशूला फार त्रास न देतां एकदम नीट मारलें, तर तो मांग व तो कसाई मुक्त आहेत. दोषी कोणी असेलच, तर सारा समाज दोषी आहे.

अशा रीतीनें समाजाच्या सेवेचीं जीं जीं कर्में आहेत, तीं तीं करणारे मुक्त होतात असें गीता-महाभारत सांगत आहेत. त्या त्या कर्माची योग्यता सारखीच. कोणालाहि अहंकार नको. कोणाची मान मी श्रेष्ठ वर्णाचा म्हणून फार वर व्हावयास नको; कोणाचीहि मान मी नीच वर्णाचा असें मनांत येऊन खालीं व्हावयास नको. सर्वांची मान सरळ असूं दे. सर्वांची एकच उंची, एकच किंमत.

उपनिषदांत एक सुंदर गोष्ट आहे. एकदां इंद्र, वायु, अग्नि वगैरे देवांत फार वाद माजला. प्रत्येकजण म्हणे मी श्रेष्ठ. इंद्र म्हणाला, "मी पाऊस पाडतों. पाऊस न पडेल तर पृथ्वी सुकेल. जीवन अशक्य होईल." वायु म्हणाला, "एक वेळ पाणी नसलें तरी चालेल; परंतु हवा तर आधीं हवी. मी सर्वांत श्रेष्ठ आहें." अग्नि म्हणाला, "ऊब आधीं हवी. उष्णता हवी. उष्णता नाहींशी होतांच मनुष्य थंडगार होतो. पाय गार पडत चालले असें लोक म्हणतात. अग्नीशिवाय, उष्णतेशिवाय सारें मिथ्या आहे."



असे वाद चालले असतांना तेथें एकदम एक तेजस्वी देवता आली. ही देवता कोण, कोठली वगैरेंचें देवांना गूढ पडलें. अग्नि म्हणाला, "मी त्या देवतेजवळ जाऊन तिची माहिती विचारून येतों." अग्नि त्या देवतेजवळ गेला व म्हणाला, "आपण कोण?"

त्या देवतेनें उलट प्रश्न केला, "आपण कोण?"

अग्नि चिडून म्हणाला, "माझें नांव माहीत नाहीं? मी अग्नि!"

देवता म्हणाली, "आपण काय करीत असतां?"

अग्नि संतापानें म्हणाला, "अहो, सारें ब्रह्मांड एका क्षणांत मी जाळून टाकीन! माझा पराक्रम का तुम्हांला माहीत नाहीं?"

ती देवता म्हणाली, "असेल तुमचा तसा पराक्रम. परंतु माझ्या ऐकिवांत नाहीं. परंतु ही येथें एक काडी आहे, ती जाळून दाखवा बरें!"

अग्नीनें आपल्या साऱ्या ज्वाळा प्रज्वलित केल्या, परंतु ती काडी त्याच्यानें जाळवेना. अग्नि खट्टू झाला. खालीं मान घालून तो निघून गेला.

नंतर वारा आला.

"आपण कोण?" वायुदेवानें प्रश्न केला.

"आपण कोण?" देवतेनें उलट विचारलें.

"अहो मी वारा." वायु अहंकारानें म्हणाला.

"म्हणजे काय करतां आपण?" देवतेनें प्रश्न केला.

"अहो, मी पर्वतांचे चेंडू करतों! वृक्ष उपटतों! पाण्याला नाचवतों! प्रचंड लाटा निर्माण करून गलबतें बुडवतों! माझा पराक्रम तुम्हांला माहीत नाहीं?" वायूनें रागारागानें विचारलें.

"नाहीं; ही येथें एक काडी आहे, ती उडवून दाखवा बरें!" देवतेनें सांगितलें.

वाऱ्यानें सारी शक्ति एकवटली. परंतु ती क्षुद्र काडी त्याला जागची हालवितां आली नाहीं. वारा लज्जेनें खालीं मान घालून निघून गेला. अशा रीतीनें ते सारे भांडखोर अहंमन्य देव फजीत झाले. शेवटीं ती अध्यात्मदेवता उमा त्या देवांना म्हणाली, "अरे वेड्यांनो, मी श्रेष्ठ, मी श्रेष्ठ असे भांडतां काय? कोणीहि श्रेष्ठ नाहीं, कोणीहि कनिष्ठ नाहीं. त्या विश्वशक्तीनें इंद्राच्या ठिकाणीं पाऊस

पाडण्याची शक्ति ठेविली आहे, म्हणून इंद्र पाऊस पाडूं शकतो. अग्नीच्या ठिकाणीं जाळण्याची शक्ति ठेविलेली आहे, म्हणून अग्नि जाळतो. वाऱ्याच्या ठिकाणीं वाहण्याची शक्ति ठेविलेली आहे, म्हणून वारा वाहतो. त्या विश्वशक्तीनें ती शक्ति जर काढून घेतली, तर तुम्ही शून्य आहांत, मढीं आहांत. त्या त्या शक्तीचा अहंकार नका बाळगूं. त्या त्या विशिष्ट शक्तींमुळें दुसऱ्यांस हीन नका समजूं."

ही गोष्ट अत्यंत बोधप्रद आहे. ज्ञान देणाऱ्या ऋषीनें रस्ता झाडणाऱ्या झाडूवाल्यास तुच्छ लेखूं नये. चित्रकारानें गवयास हीन समजूं नये. कुंभारानें विणकरास कमी मानूं नये. आपण सर्वांनीं एकमेकांस रामराम करावयाचा. रामराम म्हणजे काय ? तूं राम व मी राम ! तूंहि पवित्र व मीहि पवित्र !

"हे मलमूत्र नेणाऱ्या भंगीदादा, तूं राम आहेस. हा प्रणाम घे," असें सद्‌गदित होऊन ऋषि म्हणेल.

"रामराम," "सलाम आलेकम्, आलेकम् सलाम" असें म्हणत सर्वांनीं आनंदानें नांदावयाचें आहे.

परंतु भगवान् श्रीकृष्णांची ही थोर दृष्टि भारतवर्ष विसरला. संतांचें दिव्य जीवनकर्म सारे विसरले. आणि श्रेष्ठ-कनिष्ठपणाचे वाद समाजांत माजून सारा समाज पोखरला गेला. बुद्धिजीवी आणि श्रमजीवी असे समाज-पुरुषाचे तुकडे पाडण्यांत आले. बुद्धिजीवी स्वतःला श्रेष्ठ समजूं लागले. श्रमजीवी मनुष्याला सारे हीन समजूं लागले. संपत्ति निर्माण करणारा तुच्छ मानला जाऊं लागला. गादीवर बसून संपत्तीचा उपभोग घेणारे देवाप्रमाणें मानले जाऊं लागले.

रामायणांत एक लहानशी गोष्ट आहे. रामचंद्र ज्या वेळेस शबरीला भेटावयास आले, त्या वेळेचा तो प्रसंग आहे. ज्या वनांत राम बसले होते, त्या वनांत सर्वत्र फुलें फुललीं होतीं. ती फुलें कोमेजत नसत, सुकत नसत. सदैव मधुर गंध त्यांचा सुटलेला असे. राम शबरीला म्हणाले, "हीं फुलें कोणीं लाविलीं ?"

शबरी म्हणाली, "रामा, त्याचा इतिहास आहे."

रामानें विचारलें, "कोणता इतिहास ?"

शबरी म्हणाली, "रामा ! ऐक. एकदां मतंग ऋषि आश्रमांत जळण नव्हतें म्हणून मनांत विचार करीत होते. तेथें मतंग ऋषींचा आश्रम होता. त्यांच्या आश्रमांत पुष्कळ विद्यार्थी असत. आश्रमांत ऋषिमुनीहि दूरदूरचे कांहीं दिवस



येऊन रहात. पावसाळा जवळ येत होता. पावसाळ्यासाठीं चार महिने पुरेल इतकें जळण सांठवून ठेवण्याची जरुरी होती. परंतु विद्यार्थी निघेनात. शेवटीं वृद्ध मतंग ऋषि खांद्यावर कुऱ्हाड घेऊन निघाले. आचार्य निघतांच सारे छात्रहि उठले. आश्रमांतील पाहुणेहि निघाले. सारे दूर रानांत गेले. वाळलेलीं काष्ठें त्यांनीं तोडलीं. मोठमोठ्या मोळ्या त्यांनीं बांधल्या, त्या मोळ्या डोक्यांवर घेऊन सारी मंडळी परत फिरली.

"रामा ! ते भर उन्हाळ्याचे दिवस. प्रखर ऊन पडलें होतें. सारी मंडळी घामाघूम होऊन गेली होती. त्यांच्या अंगप्रत्यंगांतून घाम निथळत होता. तो घाम जमिनीवर गळत होता. तिसरे प्रहरीं सर्व आश्रमांत परत आले. त्या दिवशीं मग सुटी होती. सारे श्रांत होते, थकले भागले होते. लौकर झोंपले.

"पहांटे मतंग ऋषि उठले. सारे विद्यार्थी उठले. स्नानाला निघाली मंडळी. एकदम सुगंध आला. त्या मंदमंद उषःकालीन वाऱ्याच्या झुळकांबरोबर प्रसन्न वास येऊं लागला. तसा सुगंध पूर्वीं कधींहि आला नव्हता. कोठून येतो वास, कोठून येतो वास, असें सारें विस्मयानें बोलूं लागले. शेवटीं मतंग ऋषि म्हणाले, 'जा रे पाहून या.' मुलें हरणाप्रमाणें उड्या मारीत निघालीं. तों त्यांना काय दिसलें ? ज्या ज्या ठिकाणीं रानांतून मोळ्या आणीत असतांना घाम गळाला होता, त्या त्या ठिकाणीं एक एक सुंदर फूल फुललेलें त्यांना दिसलें ! रामा, हीं घामांतून निर्माण झालेलीं फुलें आहेत."

ज्या वेळेस रामायणांत मीं हें वाचलें त्या वेळेस मी नाचलों. मी गहिंवरलों. "घर्मजानि कुसुमानि !" घामांतून निर्माण झालेलीं फुलें ! निढळाचा घाम ढाळणाऱ्या आपल्या मुलांकडे भूमाता जणुं शत डोळे उघडून पहात होती ! तीं फुलें नव्हतीं, भूमातेचे ते प्रेमळ पवित्र डोळे होते ! माझीं मुलें कशीं श्रमताहेत तें ती पहात होती. मी मनांत विचार करूं लागलों. जगांत कोणतें पाणी श्रेष्ठ असा मीं स्वतःला प्रश्न विचारला. गंगा-यमुनांचें, कृष्णा-गोदावरीचें, सप्तसमुद्रांचें पाणी का पवित्र ? स्वाती नक्षत्राचें का पाणी मोलवान् ? पश्चात्तापानें डोळ्यांतून अश्रू येतात ते का पवित्र ? दुसऱ्याच्या दुःखानें डोळ्यांतून अश्रू येतात ते का पवित्र ? प्रेमळ माणसाचें स्मरण येऊन डोळे डबडबतात, त्या अश्रुधारा का सर्वांत थोर ?

मीं म्हटलें, "श्रमजीवी माणसाच्या अंगांतून गळणारें घामाचें पाणी हें सर्वांत

थोर." तें पाणी म्हणजे जगाचें पोषण आहे. देव पाऊस पाडील. परंतु शेतकरी स्वतःच्या घामाचा पाऊस जर शेतांत पाडणार नाहीं, तर काय पिकणार आहे? माणसांना दाणे मिळणार नाहींत, पांखरांना दाणे मिळणार नाहींत. सारी सृष्टि मरेल !

इंग्लंडमधील अत्यंत प्रतिभावान् व थोर मनाचा कवि शेले एके ठिकाणीं म्हणतो, "जगांतील सर्वांत थोर कलावान् कोण? तर शेतकरी." किती यथार्थ आहे त्याचें म्हणणें ! भगभगीत उजाड दिसणाऱ्या जमिनीला तो हिरवी हिरवीगार करतो. फुलांफळांनीं तिला नटवितो, हंसवितो. परंतु अशा त्या थोर शेतकऱ्याची आज काय स्थिति आहे? या ऋषींच्या भूमींत त्या शेतकऱ्याची काय दैना आहे? सारे त्याला तुच्छ लेखतात. सारे त्याला अपमानितात. त्याला कोणी गादीशीं बसविणार नाहींत. सारे त्याला दारांत बसवितील. ज्या दिवशीं शेतकऱ्याला प्रथम लोड मिळेल त्या दिवशीं भारतीय संस्कृति लोकांना समजूं लागली असें मी म्हणेन. परंतु आज सर्वांना पोसणाऱ्या या शेतकऱ्याच्या जीवनवृक्षावर बांडगुळांप्रमाणें जगणाऱ्यांनाच मान मिळत आहे ! किती विद्रूप व नीच आहे हा देखावा !

आज आपल्या समाजांत धडें व मुंडकीं दूर दूर पडलेलीं आहेत. धडाला मुंडकें नाहीं व मुंडक्याला धड नाहीं ! समाज-पुरुष असा मरून पडला आहे. बुद्धिजीवी लोक, डोकेबाज लोक, श्रमजीवी माणसांची कदर करीत नाहींत. परंतु हें मुंडकें धडाजवळ गेल्याशिवाय राष्ट्रांत जिवंतपणा उत्पन्न होणार नाहीं. श्रमजीवी व बुद्धिजीवी एकत्र येऊं देत. बुद्धिवादी श्रम करूं देत व श्रमणाऱ्याला विचाराचा आनंद मिळूं दे. असें होईल तो सुदिन.

भारतीय संस्कृति कर्ममय आहे. कर्माला प्राधान्य देणारी ही संस्कृति आहे. या संस्कृतीला आळस खपत नाहीं. या संस्कृतीस कोणतेंहि सेवाकर्म तुच्छ नाहीं. कर्माचा महिमा भारतीय संस्कृतींत किती वाढविलेला आहे, हें जरा पहा तरी. तीं तीं कर्मांचीं साधनेंसुद्धां आपण पवित्र मानलीं आहेत. साधनेंसुद्धां पवित्र, मग तें कर्म किती पवित्र असेल ?

बायका केरसुणीला पाय लावूं देत नाहींत, जात्याला पाय लावूं देत नाहींत, चुलीला पाय लावूं देत नाहींत, याचा अर्थ काय? बायकांचीं हीं सेवासाधनें आहेत. केर काढून, दळून, स्वयंपाक करून त्या सेवा करतात. त्या सेवेनें त्या मुक्त होतात. त्यांच्या मोक्षप्राप्तीचीं साधनें म्हणजे ती केरसुणी व ती चूल.



केरसुणीला पाय लावणें म्हणजे पाप ही गोष्ट ज्या संस्कृतीनें शिकवली, त्या संस्कृतीच्या भक्तांनीं व उपासकांनीं केर काढण्याचें काम तुच्छ मानावें, झाडूला पतित समजावें, हीन मानावें, ही केवढी खेदाची गोष्ट !

शेतकरी नांगराला पाय लावणार नाहीं. पंडित पुस्तकास पाय लावणार नाहीं. चांभार आपल्या दारावर कातड्याच्या तुकड्यांचें तोरण लावील, महार हाडें दारावर लावील, यांत महान् अर्थ आहे. तें तें सेवाकर्म पवित्र आहे. ब्राह्मण समाजाची सेवा ज्ञानदानानें करीत असेल, तर सेवासाधन जें पुस्तक तें तो स्वतः पवित्र मानील आणि इतरहि त्याचें तें सेवासाधन तुच्छ मानणार नाहींत. महारचांभार मृत ढोरें फाडून समाजाची सेवा करीत असतील, तर तीं हाडें, तीं चर्मे पवित्र आहेत. त्यांतून ते संपत्ति निर्माण करीत आहेत. स्मशानांत शिव रहातो व त्याच्या गळ्यांत हाडांचे अलंकार आहेत. महार-चांभार म्हणजेच शिवशंकराची मूर्ति होय.

महाभारतांत अर्जुनाला गांडीव धनुष्याची निंदा सहन होत नसे अशी गोष्ट आहे. गांडीवाची निंदा करणाऱ्या धर्मराजासहि मारावयास तो धांवला. अर्जुनाला गांडीव इतकें प्रिय व पवित्र कां वाटे? कारण तें त्याचें सेवासाधन होतें. समाजाचें दुष्टांपासून संरक्षण करण्याचें, दीनदुबळ्यांचें संरक्षण करण्याचें तें धनुष्य साधन होतें. त्याची निंदा अर्जुनाला सहन होणार नाहीं.

तीं तीं सेवासाधनेंहि पवित्र आहेत. मग तीं कर्में पवित्र नाहींत का? लेखणी असो वा तरवार असो, तराजू असो वा नांगर असो, चूल असो कीं झाडू असो, आरी असो कीं वस्तरा असो, हीं सारीं सेवासाधनें भारतीय संस्कृति पवित्र मानते आणि नव्या युगांत जीं नवीन सेवासाधनें निघतील, तींहि भारतीय संस्कृति पवित्र मानील.

सेवेच्या साधनांची कितीतरी काळजी घेण्याबद्दल सांगितलें आहे. सेवासाधनें सदैव स्वच्छ ठेवावींत; नाहींतर सेवा उत्कृष्ट करतां येणार नाहीं. पंडिताजवळचीं पुस्तकें नीट व्यवस्थित असावींत. वीराजवळचीं शस्त्रें घांसून-पुसून ठेवलेलीं असावींत. चूल सारवलेली असावी. कोयता, विळा धार लावलेलीं असावींत. सेवेचीं साधनें नीट न ठेवलीं, तर उत्कृष्ट सेवा करतां येणार नाहीं.

परंतु येथें एक गोष्ट सांगावीशी वाटते. मनुष्य सेवासाधनें काळजीपूर्वक

वापरतो. परंतु कांहीं साधनांकडे तो दुर्लक्ष करतो. सेवासाधनें दोन प्रकारचीं आहेत : सजीव व निर्जीव.

**सेवासाधनें**

**सजीव**

कुळें शिक्षक मजूर हमाल माणसें, गायी-बैल, घोडे, खेंचरें वगैरे पशू.

**निर्जीव**

पुस्तकें छापखाने कारखाने यंत्रें, नांगर, मोटार इत्यादि.

मनुष्य सजीव साधनांपेक्षां निर्जीव साधनांची अधिक काळजी घेतो असें आपणांस दिसून येतें. एकादा जमीनदार बैलगाडी नीट ठेवील, चाक नीट आहे कीं नाहीं पाहील, तेल घातलेलें आहे कीं नाहीं पाहील. परंतु बैलाला पोटभर चारा मिळाला कीं नाहीं, वेळेवर पाणी मिळालें कीं नाहीं हें पाहणार नाहीं. त्याचप्रमाणें बैल हांकणारा त्याचा गडी, त्या गड्याला पोटभर खायला मिळतें कीं नाहीं, त्याच्या अंगावर पुरेसा कपडा आहे कीं नाहीं, हें तो पाहणार नाहीं.

मोठ्या कारखान्यांत तुम्ही जा. तेथें यंत्राला सारखें तेल मिळत असतें. यंत्राची खूप चिंता वाहण्यांत येते. यंत्रें वरचेवर स्वच्छ करण्यांत येतात. परंतु या निर्जीव यंत्रांसमोर जें एक सजीव यंत्र असतें, त्याची कोण काळजी घेतो ? त्या मजुरांच्या शरीरयंत्राला तेल-तुपाचें ओंगण भरपूर मिळतें कीं नाहीं, याची काळजी कोणता कारखानदार घेतो ?

कारखाना सेवेचें साधन आहे. कारखान्यांतून समाजाला उपयुक्त वस्तू पुरविण्यांत येतात. कारखाना ही पवित्र वस्तु आहे; या पवित्र कर्माचीं सर्व साधनेंहि पवित्र आहेत. म्हणूनच यंत्रांची नीट काळजी घेणें म्हणजे महान् धर्म होय. देवाची मूर्ति म्हणजे माझा सांचा. तो सांचा घांसून-पुसून ठेवणें म्हणजे देवाची मूर्ति घांसणें होय. परंतु निर्जीव यंत्रांच्या पूजेबरोबरच सजीव यंत्रांचीहि पूजा कारखानदारानें केली पाहिजे. त्या मजुरांना चांगलें अन्न, पुरेसे कपडे, रहावयास नीट हवेशीर घरें, प्यायला स्वच्छ पाणी, अपघातांत तत्काल मदत, मजुरांचा विमा, त्यांना पगारी रजा, त्यांना करमणूक इत्यादि सर्व गोष्टी आहेत



कीं नाहींत हें पाहणें म्हणजे महान् धर्म होय. हा महान् धर्म न पाळणारा नरकाचा धनी आहे. साऱ्या समाजांत तो दास्य-दारिद्र्याचा नरक निर्माण करील. दुर्गुणांचा नरक निर्माण करील. व्यभिचार, चोरी, दारू, खून यांचा प्रसार करील.

समाजांत हा दुःखप्रद देखावा दिसतो आहे. श्रीमंत मनुष्य मोटार स्वच्छ ठेवण्यासाठीं जितके पैसे खर्च करील, तितके तो नोकराला देणार नाहीं. मोटार ठेवण्यासाठीं जितकी सुंदर खोली बांधील तितकी गड्याला रहावयासाठीं बांधणार नाहीं. माणसांपेक्षां मोटारी पूज्य आहेत ! मजुरांपेक्षां यंत्रें मोलवान् आहेत ! परंतु हीं सजीव सेवासाधनें जर उपेक्षिलीं गेलीं तर सारा संसार भयाण होईल, ह्याची ह्या विचारहीन स्वार्थी कारखानदारास कल्पनाहि नसते.

गीतेंतील पंधराव्या आध्यायांत क्षर व अक्षर अशा दोन प्रकारचा पुरुष सांगितला आहे आणि या दोघांना व्यापून असणारा तो पुरुषोत्तम. क्षरसृष्टि, अक्षरसृष्टि व त्यांना वेढून असणारा परमात्मा. तिघेहि पवित्र. क्षरसृष्टि म्हणजे आजुबाजूची बदलणारी सृष्टि. या क्षरसृष्टींतून आपणांस सेवेचीं साधनें मिळतात. फुलें, फळें, धान्य, सारें मिळतें. लांकूड, धातू, दगड, सारें मिळतें.

कालची चूल फुटली, आज नवीन घातली. पहिली मोटार बिघडली, नवीन घेतली. पहिला दिवा बिघडला, नवीन घेतला. अशा प्रकारें हीं साधनें बदलत आहेत. परंतु हीं क्षर साधनेंहि पुरुषोत्तमाचेंच रूप. ही क्षरसृष्टीहि पूज्यच आहे.

मोठमोठ्या कारखान्यांतील मजूर ही सुद्धां एक प्रकारची क्षरसृष्टीच आहे. कारखाना शंभर वर्षें चालेल. जुने मजूर गेले, नवीन आले. मजूर नेहमीं बदलत राहतील. परंतु मजूर कोठलाहि असो तो पवित्रच आहे. हे बदलणारे मजूर सारीं पुरुषोत्तमाचींच रूपें आहेत. त्यांची पूजा करणें हें कर्तव्य आहे.

कारखानदाराच्या दृष्टीनें मजूर क्षर आहे. परंतु तो मजूर अक्षरहि आहे. त्याच्यांत अमर परमात्मा आहे. तो कधीं नष्ट होत नाहीं. त्या अमर परमात्म्याची ओळख तो मजूर स्वतःच्या सेवाकर्मानें करून घेईल.

सेवेचें कर्म उत्कृष्ट व्हावयास पाहिजे असेल, तर साधनें पवित्र माना. सजीव-निर्जीव साधनें पवित्र माना. त्यांना प्रसन्न ठेवा. दुसरा देव नाहीं, दुसरा धर्म नाहीं. जो कारखानदार मजुरांना देवाप्रमाणें मानील, त्यांना स्वसेवेचीं पवित्र साधनें मानून त्यांना संतुष्ट ठेवील, त्याच्याहून देवाला कोण अधिक प्रिय वाटेल ?

भारतीय संस्कृतीच्या उपासकांनो ! कोणतेंहि कर्म—सेवाकर्म—तुच्छ मानूं नका.

मरेपर्यंत सेवा करा. स्वतःच्या आवडीचें कर्म करा. स्वतःचा वर्ण ओळखून तदनुसार वागा. तें तें कर्म उत्कृष्ट करा. त्या कर्माचीं सजीव–निर्जीव साधनें पवित्र मानून त्यांची काळजी घ्या आणि अशा रीतीनें स्वकर्म उत्कृष्ट करून त्या जनता–जनार्दनाची, या समाज–पुरुषाची पूजा करा. हा श्रीगीतेचा धर्म आहे. परंतु या धर्माची खरी ओळख आज कितीकांना आहे बरें ?

# भक्ति : : ७

व्यक्तीनें स्वतःच्या वर्णानुसार म्हणजेच स्वतःच्या गुणधर्मानुसार समाजाची सेवा करावयाची हें आपण पाहिलें. ही सेवा केव्हां बरें उत्कृष्ट होईल ? या सेवेच्या कर्मानें आपण कसे मुक्त होऊं ?

मुक्त होणें म्हणजे तरी काय ? मुक्त होणें म्हणजे बांधलेलें नसणें. मुक्त होणें म्हणजे मोकळे आहोंत असें वाटणें. कोणतेंहि आपणांवर दडपण नाहीं असें अनुभवास येणें म्हणजेच मुक्त होणें. ना वासनांचा गुलाम, ना जगांत कोणत्याहि सत्तेचा गुलाम. स्वतःच्या समाधानानें, आनंदानें, उत्साहानें कर्म करीत राहणें म्हणजेच मोक्ष होय.

आपण हजारों कर्में करीत असतों. परंतु त्यांचा आपणांवर बोजा असतो. त्या कर्मांमुळें आपण मेटाकुटीस येत असतों. आपण त्रस्त होत असतों. रडकुंडीस येत असतों. असें कां होतें ? याचीं दोन कारणें आहेत. एक तर, जें कर्म आपण करीत असतों तें आपल्या आवडीचें नसतें. तें आपल्या वर्णाचें नसतें. तो परधर्म असतो. परंतु मोहानें तो आपण अंगीकारिलेला असतो. असा हा परधर्म भयावह असणार, आपणांस संत्रस्त करणार, हें गीता गर्जून सांगत आहे.

एकादा शिक्षक घ्या. ज्याला शिक्षक-कर्मांत आनंद नाहीं, मुलांच्या हार्दिक व बौद्धिक विकासांत आनंद नाहीं, अशा शिक्षकाला त्या अध्यापनकर्मांत कसा आनंद वाटेल ? मुलांचे गृहपाठ तपासतांना तो संतापेल. त्यांचीं प्रश्नोत्तरपत्रें तपासतांना तो भराभर रेघोट्या मारील. त्यांच्या शंका ऐकून चिडेल. नवीन ग्रंथ वाचण्याचा त्याला बोजा वाटेल. अशा शिक्षकाला सारखें वाटत असेल, कीं दिवाळीची सुटी कधीं येईल, नाताळ कधीं येईल, मे महिना कधीं उजाडेल ! तें शिक्षकाचें कर्म त्याच्या उरावर बसतें. तें भूत त्याच्या मानगुटीस बसतें. परंतु



पोटासाठीं म्हणून तो तें रडतरडत चिडत-चरफडत करीत असतो. तो त्याचा वर्ण नसतो.

आज सर्व समाजांत हेंच दिसत आहे. वर्णाला स्थानच नाहीं. त्यामुळें वाटेल तें कर्म वाटेल तो करीत आहे. आवड असो वा नसो, ते ते गुणधर्म असोत वा नसोत, पोटाला मिळेल ना ? उचला तें काम, करा कसें तरी, असें होत आहे. ज्या समाजांत अशीं कर्में होत असतात, त्या समाजाला कळा कशी चढणार ? तो समाज सुखी, समृद्ध कसा होणार ?

ज्या समाजांतील कर्मांत तेज नाहीं, आनंद नाहीं, उत्साह नाहीं, श्रद्धा नाहीं, त्या कर्मानें त्या कर्म करणाऱ्यालाहि असमाधान व तें कर्म नीट न झाल्यामुळें समाजाचेंहि नुकसान. स्वतःचा अधःपात व समाजाचा अधःपात. स्वतःची प्रतारणा व समाजाचीहि वंचना.

जें कर्म आपल्या आवडीचें असतें त्याचा कंटाळा आपणांस येत नाहीं. कोकिळेला जर आपण म्हणूं, " आज तूं सुटी घे, आज कुऊ करूं नकोस; " तर ती म्हणेल, " एक वेळ खाणेंपिणें नसलें तरी चालेल, परंतु मला कुऊ करूं दे. त्यानें मला त्रास नाहीं. तो माझा आनंद आहे. तें कुऊ करणें म्हणजेच माझें जीवन. " सर्व सृष्टींत हेंच आहे. सूर्य–चंद्र, तारे–वारे यांना रविवारची सुटी नाहीं. समुद्र सारखी गर्जना करून राहिला आहे. नद्या सारख्या जीवन असेपर्यंत वहात आहेत. जीवन आहे तों विश्रांति नाहीं. विश्रांतीची जरूरच नाहीं. कर्म म्हणजे विश्रांति. कारण कर्म म्हणजे आनंद !

मुलें खेळत असतात. त्या वेळेस त्यांना कितीतरी श्रम होतात. त्या श्रमांचा बोजा त्यांना वाटत नाहीं. परंतु त्यांच्या इच्छेविरुद्ध त्यांना मैल अर्धा मैल जावयास सांगा. त्यांना तें जड वाटेल. त्यांचे पाय दुखतील. ज्या कर्मांत आत्मा रंगत नाहीं, तें कर्म म्हणजे मरण होय. तें कर्म म्हणजे शृंखला होय. आपण सारे अशा त्या वर्णहीन कर्मांच्या शृंखलांनीं रात्रंदिवस बद्ध झालेले आहोंत. आपण सारे बद्ध आहोंत. मुक्त कोणीच नाहीं.

कर्माचा बोजा वाटावयास नको असेल, तर स्वधर्म शोधा. म्हणजे स्वतःचा वर्ण शोधा. स्वतःच्या आवडीचें सेवाकर्म उचला. त्यांत तुम्ही रमाल, रंगाल. इतके तास काम केलें, असें मनांतहि येणार नाहीं. काळाचें भान तुम्हांस राहणार

नाहीं. तुम्ही काळाचे काळ व्हाल. वेळ कसा दवडावा अशी चिंता, असें संकट तुम्हांस पडणार नाहीं.

कर्म उत्कृष्ट व्हावयास आणि कर्माचा कंटाळा न वाटावा म्हणून कर्माची आवड असली पाहिजे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे ज्यांच्यासाठीं कर्म करावयाचें त्यांच्याबद्दल मनांत प्रेम हवें. कर्माबद्दल मनांत प्रेम हवें व तें कर्म ज्यांच्यासाठीं करावयाचें त्यांच्याबद्दलहि अपार प्रेम हवें. अध्यापनकर्माबद्दल आवड हवी व लहान मुलांबद्दल प्रेम हवें. तरच शिक्षक शिक्षकाच्या कर्मात रंगेल. तें कर्म त्याला बद्ध न करतां मुक्त करील. सर्व मुलांच्या हृदयांशीं, सर्व छात्रांच्या आत्म्यांशीं तें कर्म त्याला जोडील. त्या कर्मानें या शरीरांत कोंडलेला त्याचा आत्मा बाहेरच्या अनंत आत्म्यांशीं समरस होईल. म्हणजेच मोक्ष.

कर्में आपल्या उरावर बसतात याचें एक कारण त्या कर्माबद्दल अप्रीति; व दुसरें कारण म्हणजे ज्यांच्यासाठीं कर्म करावयाचें त्यांच्याबद्दलहि अप्रीति. हीं दोन कारणें जर दूर झालीं तर मोक्ष जवळ आला. कर्माबद्दलहि प्रेम वाटूं दे, व त्या कर्माचा ज्यांच्याशीं संबंध आहे, त्यांच्याबद्दलहि प्रेम वाटूं दे.

आपण रुग्णालयांतील उदाहरण घेऊं या. तेथें एकादी परिचारिका असेल. शुश्रूषेचें कर्म तिला प्रिय आहे. तिचा तो वर्ण आहे. परंतु आजारी पडलेल्या जीवाबद्दल जर तिला प्रेम वाटलें नाहीं, तर कर्म तितकेंसें उत्कृष्ट होणार नाहीं. ज्या रोग्याबद्दल तिला आपलेपणा वाटेल, प्रेम वाटेल, त्याची सेवा करावयास ती कंटाळणार नाहीं. ज्याच्याबद्दल प्रेम वाटणार नाहीं, त्याचीहि सेवाशुश्रूषा ती करील. परंतु ती सेवा तिला मुक्त करणार नाहीं. ती सेवा तिला ओझें वाटेल.

माता स्वतःच्या मुलांची सेवा किती प्रेमानें करते! त्या सेवेचा तिला त्रास नाहीं. एकाद्या मातेचा मुलगा आजारी असूं दे. ती रात्रंदिवस त्याच्या उशापायथ्याशीं बसते. तुम्ही त्या मातेला म्हणा, "माते! फार श्रमलीस, फार दमलीस. या मुलाला मी रुग्णालयांत ठेवण्याची व्यवस्था करतों." तर ती माता काय म्हणेल? "मला कसले आहेत श्रम? दोन हातांऐवजीं दहा हात असते तर आणखी सेवा केली असती. ही सेवा म्हणजे माझें समाधान आहे. तुम्ही मुलाला जर दूर न्याल, तर मात्र मी कष्टी होईन!"

संत तीं तीं सेवाकर्में करून मुक्त झाले याचें हेंच कारण होय. कबीर वस्त्रें विणी. वस्त्रें विणण्याचा त्याला कंटाळा नसे. तो त्या कर्मात रमे. तो वेठ मारीत नसे. "समाजरूपी देवाला हीं वस्त्रें द्यावयाचीं आहेत. या माझ्या कर्मकुसुमांनीं समाजदेव पूजावयाचा आहे," अशी भावना त्याच्या हृदयांत असे. त्यामुळें त्याचें तें कर्म उत्कृष्ट होई. भक्तिविजयांत लिहिलें आहे, कीं बाजारांत कबीर वस्त्रें मांडून बसे. लोक तीं सणंगें पहात. परंतु तीं विकत घेण्याचें धाडस त्यांना होत नसे. त्या वस्त्रांची अनंत किंमत असेल असें त्यांना वाटे. हीं सणंगें अमोल आहेत असें लोक म्हणत. त्या सणंगावर लोकांची दृष्टि खिळून बसे. तीं वस्त्रें ते पहात उभे रहात. खरेंच आहे. तीं साधीं वस्त्रें नव्हतीं. त्या वस्त्रांत कबिराचें हृदय ओतलेलें असे. ज्या कर्मात हृदय ओतलेलें आहे, आत्मा ओतलेला आहे, त्या कर्माचें मोल कोण करील? त्या कर्मानें परमेश्वर मिळत असतो, मोक्ष लाभत असतो.



गोरा कुंभार मडकीं घडवी. त्याचें तें आवडीचें कर्म होतें. परंतु ज्यांना मडकीं द्यावयाचीं, त्या गिऱ्हाइकांबद्दल त्याला अपरंपार प्रेम वाटे. जनता म्हणजे त्याला रामाचें रूप वाटे. लोकांना फसवावयाचा विचारहि त्याच्या मनांत येत नसे. आज दिलेलें मडकें उद्यां फुटेल, मग लौकर नवीन मडकें खपेल, असा विचार तो करीत नसे. बापानें विकत घेतलेलें मडकें मुलाच्या हयातींतहि दिसेल, अशा वृत्तीनें गोरा कुंभार मडकीं बनवी.

म्हणून मडक्यांची माती तुडवितांना तो कंटाळत नसे. तें माती तुडवण्याचें काम वेद लिहिण्याइतकेंच, गणितांतील गहन सिद्धांताइतकेंच पवित्र व महत्त्वाचें त्याला वाटे. ती माती तुडवितां तुडवितां तो स्वतःला विसरे. त्या मातींत स्वतःचें रांगत आलेलें मूल तुडविलें गेलें, तरी त्याला भान नव्हतें! जनताजनार्दन त्याच्या अंतश्चक्षूंसमोर होता. मडकें विकत घ्यावयास येणारा परमेश्वर त्याला दिसत होता. अशी तन्मयता मोक्ष देत असते. जीवनांत अखंड आनंद निर्माण करीत असते. त्या आनंदाला तोटा नाहीं, त्या आनंदाचा वीट येत नाहीं. तो अवीट, अखूट, अतूट असा निर्मळ आनंद असतो.

कर्म लहान कीं मोठें हा प्रश्नच नाहीं. तें कर्म करतांना तुम्ही स्वतःला किती विसरतां, हा प्रश्न आहे. कर्माची किंमत स्वतःला विसरण्यावर आहे. एकादा म्युनिसिपालिटीचा अध्यक्ष घ्या. तो लाखों लोकांची सेवा करीत असतो. परंतु त्याचा अहंकारहि जर तेवढाच मोठा असेल, तर त्या कर्माची किंमत नाहीं.

आपण ही गोष्ट गणितांत मांडूं या :

म्युनिसिपालिटीच्या अध्यक्षाचें काम, कितीजणांची सेवा, तें अंशस्थानीं लिहा आणि त्याचा अहंकार छेदस्थानीं लिहा.

$$\frac{\text{तीन लाख लोकांची सेवा}}{\text{अहंकारहि तेवढाच}}$$

या अपूर्णांकाची किंमत काय ? किंमत एक.

आतां एका मातेचें उदाहरण घ्या. ती एकाच मुलाची सेवा करते. परंतु सेवा करतांना स्वतःला विसरते. त्या सेवेचे रिपोर्ट ती लिहून प्रसिद्ध करीत नाहीं. तसे रिपोर्ट ती छापील तर महाभारतें होतील. परंतु इतकें ती करते, तरी कांहींच नाहीं असें तिला वाटतें. तिच्या कर्माची गणितांत मांडणी करा :

$$\frac{\text{एका मुलाची सेवा}}{\text{पूर्ण निरहंकारता ( स्वतःला शून्य करणें )}}$$

या अपूर्णांकाची काय किंमत ? एकाला शून्यानें भागिलें तर भाग कितीचा लावावयाचा ? तेथें कोणताहि भाग लावा, तो अपुराच पडतो. एक भागिलें शून्य $\frac{1}{0}$ या अपूर्णांकाची किंमत अनंत आहे. आणि अनंत म्हणजेच मोक्ष.

एका लहानशा कर्मानेंहि मोक्ष मिळेल, जर कर्मांत जिव्हाळा असेल, जर त्या कर्मांत आत्मा असेल. आपण दक्षिणा देतों त्या वेळेस ती ओली करून देतों. हेतु काय ? ती दक्षिणा रुकाभर असेल, एक पै असेल; परंतु हृदयाचा ओलावा त्या दक्षिणेंत आहे. म्हणून ती पै श्रीमंतांच्या अहंकारी लक्षावधि रुपयांच्या दानाहून अनंतपटींनीं श्रेष्ठ आहे. रुक्मिणीचें एक भावभक्तीचें तुळशीपत्र सत्यभामेच्या सोन्याचांदीच्या, हिरेमाणकांच्या राशींहून वजनदार ठरतें. सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या शिवाच्या जटेंतील एक केंस कुबेराच्या संपत्तीहून वजनदार ठरतो.

म्हणून कर्म भक्तिमय करा. ज्याच्यासाठीं कर्म करावयाचें त्यालाच देव माना. असें तुम्ही करूं लागलांत म्हणजे तुमच्या जड कर्मांत किती रसमयता येते, याचा अनुभव तर घेऊन पहा ! समजा, माझी खानावळ आहे. माझा एकादा प्रिय मित्र जर जेवावयास यावयाचा असेल, तर मी किती काळजीपूर्वक स्वयंपाक करीन. किती प्रेमानें करीन. ती भाकरी भाजतांना मला त्रास होणार नाहीं, चटणी वाटतांना हात दुखणार नाहींत. मी ताट स्वच्छ ठेवीन. तांब्या स्वच्छ भरून ठेवीन. हातरुमाल स्वच्छ ठेवीन. माशा दूर करण्याची दक्षता बाळगीन. माझ्या मित्रा-



साठीं काय करूं, काय न करूं, असें मला होईल. माझ्या मित्रासाठीं जर मी इतकें करीन, तर माझ्याकडे जेवावयाला येणारे म्हणजे भगवंताच्याच मूर्ती आहेत अशी जर भावना मी करीन, तर माझ्या खानावळीचें कसें स्वरूप दिसेल बरें ! किती स्वच्छता, किती प्रेम, किती अगत्य, किती आनंद, किती प्रसन्न वातावरण असेल, नाहीं ? प्रत्यक्ष मोक्ष-लक्ष्मी तेथें अवतरलेली दिसेल !

समाजसेवेचें कोणतेंहि कर्म घ्या. शाळा असो, खानावळ असो, दुकान असो, सलून असो. मामलेदार व्हा वा म्युनिसिपल अधिकारी व्हा. या समाजदेवाची पूजा करावयाची आहे हें विसरूं नका. म्हणजे तुमचें कर्म दिव्य झाल्याशिवाय राहणार नाहीं.

परंतु आज समाजांत काय दिसतें ? गव्हर्नर यावयाचा असला म्हणजे म्युनिसिपालिटी जागी होते. मग रस्ते साफ होतात, गटारें धुतलीं जातात. परंतु लाखों लोक म्युनिसिपल हद्दींत राहतात, तीं का मढीं आहेत ? त्यांना का स्वच्छता नको ? त्यांना का घाणीच्या नरकांत ठेवावयाचें ? आज बडे लोक आपले देव झाले आहेत. ते आले म्हणजे आपण कर्में नीट करूं लागतों. परंतु लाखों माणसें हीं परब्रह्में आहेत ही भावना बाळगून कर्में होऊं लागतील, तेव्हां भाग्य येईल, मोक्ष येईल, स्वातंत्र्य येईल. तोंपर्यंत सर्वत्र अवकळाच असावयाची. सर्व समाजावर मृतकळाच यावयाची. तोंपर्यंत आपलीं दुकानें, आपलीं हॉटेलें, आपल्या खानावळी, आपल्या कचेऱ्या म्हणजे घाण, अव्यवस्था, निष्काळजीपणा, स्वार्थ यांनींच बरबटलेलीं असावयाचीं. आणि भारतीय संस्कृति हीन आहे असाच शेरा सारें जग मारील यांत संशय नाहीं.

मोक्ष जपतपांत नसून धर्मांत आहे, सेवाकर्मांत आहे, आवडीचें कर्म हृदय ओतून करण्यांत आहे. समाजदेवाची ही कर्ममय पूजा रसमय, गंधमय करण्यांत आहे. त्या कर्माचाच जप करावयाचा. हें कर्म कसें उत्कृष्ट होईल, कसें तन्मयतेनें करतां येईल, याचीच चिंता बाळगावयाची.

यज्ञानां जपयज्ञोऽस्मि ।

असें गीता सांगते. जप म्हणजे निदिध्यास. कालच्यापेक्षां आजचें कर्म अधिक सुंदर होवो, आजच्यापेक्षां उद्यांचें होवो, असें सारखें मनांत वाटणें म्हणजेच जप. यानेंच मोक्षाचे अधिकारी आपण होत असतों. हीच ती तळमळ; सेवा निर्दोष होण्याची तळमळ, सेवा निःस्वार्थी होण्याची तळमळ.

रात्रीं ईश्वराला प्रत्यहींचीं कर्मे अर्पण करायचीं असतात. या कर्मांचा नैवेद्य त्याला दाखवावयाचा आणि म्हणावयाचें, "देवा! अजून हें कर्म निर्दोष होत नाहीं. कर्म करतांना अजून स्वतःचा पूर्ण विसर पडत नाहीं. कीर्तीची, मानाची, पैशाची स्पृहा असते. निंदास्तुतींनीं मी खचतों. परंतु उद्यां आजच्यापेक्षां अधिक सुंदर करीन बरें कर्म. प्रयत्न करीन."

आपल्या हातून पूर्ण निर्दोष कर्म होत नाहीं म्हणून वाईट वाटणें यांत सारा धर्म आहे. हे जे अपूर्णत्वाचे अश्रू डोळ्यांतून घळघळतात त्यांत भक्तीचा जन्म आहे. गटे या जर्मन कवीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, "जो कधीं रडला नाहीं, त्याला देव दिसणार नाहीं." स्वतःच्या अपूर्णतेचे अश्रू डोळ्यांत येऊन डोळे धुतले जातात. डोळे निर्मळ होतात. सर्वत्र भगवंत दिसूं लागतो आणि या भगवंताची सेवामय पूजा करावयास अपरंपार उत्साह व उल्हास वाटतो.

अशा जिव्हाळ्यानें कर्मे करा, म्हणजे कधीं थकवा वाटणार नाहीं. जनाबाई दळून कधीं दमत नसे. नामदेवाच्या घरीं नेहमीं संत यावयाचे. जनाबाई त्यांच्या भक्तिप्रेमाच्या, ज्ञानाच्या गोष्टी ऐकावयास जात नसे, ती दळीत बसे. "आज माझ्या घरीं देव आले आहेत; त्यांना चांगली भाकर पाहिजे. दाणे निवडून नीट बारीक दळूं दे" अशा भावनेनें जनाबाई दळी. तिचे हात दमत नसत. त्या हातांत देव जणुं येऊन बसे. ते जनाबाईचे हात नसत. ते देवाचे हात होऊन जात. तें दळणें म्हणजे अपौरुषेय होत असे. तें दळणें म्हणजे अपौरुषेय वेद होता.

जवाहरलाल आठ आठ महिने दौरा काढीत हिंडतात. क्षणाची विश्रांति घेत नाहींत. दिवसांतून दहा दहा सभा. विमानांतून, मोटारींतून, घोड्यावरून, उंटावरून, सायकलीवरून, पायीं, भिरीभिरी हिंडणें सदैव चाललें आहे! हा उत्साह कोठून येतो? त्या सेवेंत ते तन्मय असतात. या दरिद्री नारायणाला कसा हंसवूं, कसा अन्नवस्त्रानें नटवूं, ज्ञानानें सजवूं, हीच चिंता त्यांना असते. ती कर्ममय थोर पूजा असते.

महात्माजींचा क्षणन् क्षण सेवेंत जात असतो. गांधी-आयर्विन् कराराच्या वेळेला दिल्लीला महात्माजींस कधीं कधीं अर्धा तासच झोंप मिळाली. रात्रीं दोन वाजतां बोलणेंचालणें संपवून येत आणि राहिलेलें सूत कांतण्यासाठीं त्या वेळेस चरखा घेऊन बसत! ती त्यांची मूर्ति डोळ्यांसमोर आणा म्हणजे हृदय सद्गदित झाल्याशिवाय राहणार नाहीं.



भक्तिमय कर्मांत असा आनंद आहे. त्या कर्माचें ओझें नाहीं. एकादा मोठा लांकडाचा ओंडा असावा. तो किती जड असतो. कोणाच्या डोक्यांत घातला तर कपाळमोक्षच व्हावयाचा. परंतु त्या लांकडाच्या ओंड्याला काडी लावा. त्या ओंडक्याची चिमूटभर निरुपद्रवी राख होईल! मऊ मऊ राख, खुशाल अंगाला फांसावी! खुपणार नाहीं, रुतणार नाहीं! कर्माचें तसेंच आहे. जें कर्म भाररूप वाटत असतें, तेंच भक्तिभावानें करूं लागलें म्हणजे सहज वाटतें. खादी घरोघर जाऊन विकणें किती कठिण! परंतु त्या कर्मांत भक्ति ओता, म्हणजे तें खादीचें गांठोडें म्हणजे मोक्षाचें गांठोडें वाटेल. मग तें गांठोडें आपण खालीं ठेवणार नाहीं. पुंडलिकानें प्रत्यक्ष परमेश्वर समोर उभा राहिला तरी आईबापांचे पाय सोडले नाहींत. पुंडलिकाला माहीत होतें, कीं या सेवा-कर्मानें देव दारांत आला आहे. हें सेवाकर्म सोडून मी देवाकडे जाईन तर देव पळेल. परंतु हें सेवाकर्म जोंपर्यंत मी करीत आहें, तोंपर्यंत युगें अठ्ठावीस हा पांडुरंग माझ्यासमोर उभा राहील व कृपादृष्टीची वृष्टि करील! तुकारामांनीं मोठ्या प्रेमानें लिहिलें:

"कां रे पुंड्या मातलासी
उभें केलें विठोबासी॥"

पुंडलिका, माजलास होय तूं? माझ्या विठोबाला सारखें उभें करून ठेविलें आहेस तूं! परंतु तुकारामांनीं तेंच केलें. देव समोर आला तरी माझें भजन थांबणार नाहीं असें ते म्हणतात. सेवेचें कर्म म्हणजेच सारें कांहीं:

विठ्ठल टाळ विठ्ठल दिंडी
विठ्ठल तोंडीं उच्चारा।
विठ्ठल अवघ्या भांडवला
विठ्ठल बोला विठ्ठल।
विठ्ठल नाद विठ्ठल भेद
विठ्ठल छंद विठ्ठल।
विठ्ठल सुखा विठ्ठल दुःखा
तुकयामुखा विठ्ठल।

या अभंगांत सारें जीवनाचें तत्त्वज्ञान आलें आहे. आपलें कर्म, आपल्या कर्माचीं साधनें, म्हणजे सारें ईश्वराचेंच रूप. माझा चरखा म्हणजे माझा देव,

माझें जातें म्हणजे माझा देव, माझी चूल म्हणजे माझा देव, माझा कारखाना म्हणजे देव, माझी खादी म्हणजे देव, माझी व्यायामशाळा म्हणजे देव, तेथील उपकरणें म्हणजे देव, प्रयोगशाळा म्हणजे देव, तेथील गॅस, तेथील ॲसिडें म्हणजे देव. सर्वत्र देवाचेंच रूप.

काँग्रेसची संघटना असो, मजुरांची संघटना असो, शेतकरी-संघ असोत, युवक-संघ असोत, ग्रामोद्योग असोत, प्रचंड कारखाने असोत, व्यायमशाळा काढा वा औद्योगिक केंद्रें उघडा; हीं सारीं सेवेचीं कर्में असतील, तर तीं मंदिरें आहेत. तेथें सर्वत्र विठ्ठल आहे.

तीं कर्में करतांना सुख मिळो वा दुःख मिळो, तेंहि विठ्ठलाचें रूप. तीं कर्में करतांना गळ्याला फांस लागो वा फुलांचा हार गळ्यांत पडो, दोन्हीं सारखींच. मनाची चलबिचल नाहीं. भक्तीच्या प्रकाशांत सारें सुंदर व सारें मंगलच आहे.

महात्माजींना एकदां एकानें प्रश्न विचारला, " तुमच्यावर इतक्या टीका होतात. तुम्हांला काय वाटतें ? " तो महापुरुष म्हणाला, " माझ्या अंतरंगीं तंबोरा लागलेला असतो. " महात्माजींच्या हृदयांत अखंड संगीत आहे. तेथें प्रक्षुब्धता नाहीं. सागरावर अनंत लाटा उसळतात, परंतु आंत खालीं समुद्र गंभीर असतो. तेथें प्रशांत शांति असते.

महापुरुषांना हें कसें शक्य होतें ? कारण स्वार्थाचा लवलेशहि तेथें नसतो. जनतेची सेवा हेंच एक ध्येय असतें. आपण समुद्रांत बुडया मारतों, त्या वेळेस कितीतरी घनफूट पाणी आपल्या डोक्यावर असतें; परंतु त्या पाण्याचा बोजा वाटत नाहीं. आपण पुनः पुनः बुडया मारतों. पाण्यांत लपतों, खेळतों, ठाव आणतों; परंतु त्या पाण्यांतून बाहेर या. स्वत:साठीं एक घागर भरून घ्या. ती घागर तुमच्या डोक्याला त्रास दिल्याशिवाय राहणार नाहीं. तुमच्या डोक्याला, तुमच्या कमरेला तिचें ओझें झाल्याशिवाय राहणार नाहीं.

स्वतःच्या केवळ सुखासाठीं केलेलें प्रत्येक स्वार्थी कर्म म्हणजे बोजा आहे. त्याचें जिवाला ओझें होतें. तो जोजारा होतो. परंतु हें कर्म जनतेसाठीं आहे असें म्हणा, म्हणजे ओझें नाहीं. जनसागरांत बुडा; तुमच्या स्वत.चा बिंदु जनता-सिंधूंत मिसळून टाका. म्हणजे मग जीवनांत संगीत आल्याशिवाय राहणार नाहीं.

" शान्ताकारं भुजगशयनम् " असें परमेश्वराचें वर्णन केलेलें आहे. परमेश्वर सहस्रफणांच्या शेषावर निजला आहे. परंतु शांतपणें पहुडला आहे याचा अर्थ



काय ? तो मेघ पाठवीत असतो, तारे हंसवीत असतो, कळ्या फुलवीत असतो. परमेश्वर झोंपून विश्व कसें चालेल ?

या विश्वाचा पसारा मांडणाऱ्या परमेश्वराला किती शिव्याशाप मिळत असतील ? या जगांत सर्वांत मोठा हुतात्मा कोणी असेल, तर तो परमेश्वर होय. परंतु तो परमेश्वर या शिव्याशापांकडे लक्ष देत नाहीं. त्याला जें योग्य व परिणामीं हिताचें वाटतें, तें तो करीतच आहे. शांतपणें अविरत करीतच आहे.

परमेश्वराचें हें वर्णन महापुरुषाला लागू पडतें. महापुरुषहि असेच शांतपणें ध्येयावर दृष्टि ठेवून पुढें जात असतात. त्यांची नितांत निःस्वार्थता त्यांना अपार धैर्य व शांति देत असते. स्वार्थाला भय आहे, निःस्वार्थी वृत्तीला भय नाहीं.

एकच कर्म नेहमीं करावें लागेल असें नाहीं. कधीं कधीं नेहमींचीं वर्णकर्में दूर ठेवून इतर कर्मेंहि अंगीकारावीं लागतील. आग लागली असतां सर्वांनीं धांवलें पाहिजे. भूकंप झाला असतां सर्वांनीं स्वयंसेवक झालें पाहिजे. बिहारमध्यें भूकंप झाला होता. धांवले जवाहरलाल ! तेथें स्वयंसेवक भेदरून उभे होते. मातींतून मुडदे काढण्याचें धैर्य त्यांना होईना. जवाहरलालांनीं हात सरसावले ! घेतलें कुदळ-फावडें, लागले उकरायला ! त्याबरोबर सारे स्वयंसेवक संस्फूर्त झाले. प्रसंगीं कोणतेंहि कर्म येवो, त्या कर्मांत तितक्याच तडफेनें, तितक्याच तन्मयतेनें पडलें पाहिजे.

आज भारतवर्ष दास्यांत आहे. या पतित राष्ट्रास मुक्त करणें हा आज सर्वांचा मुख्य धर्म आहे. आपापल्या आवडी-निवडी क्षणभर बाजूस ठेवाव्या लागतील आणि स्वातंत्र्याच्या कोठल्या ना कोठल्या कर्मांत रमावें लागेल. लोकमान्यांनीं वेद-वेदान्ताचा, गणित-ज्योतिषाचा आनंद सोडला, हा त्यांचा सर्वांत मोठा त्याग होय. नामदार गोखल्यांना अर्थशास्त्रावर ग्रंथ लिहावयाचा होता. न्याय-मूर्तींचें चरित्र लिहावयाचें होतें. परंतु हें सारें त्यांना दूर ठेवावें लागलें. प्रफुल्ल-चंद्रांना शास्त्र आवडतें. परंतु बंगाली खेड्यांत म्हातारपणीं चरखा देत ते हिंडतात. राष्ट्र ज्या ज्या योगें बलवान् होईल, तें तें कर्म आज हातांत घ्या. राष्ट्रोद्धाराचे जे अनेक उद्योग आहेत, त्यांतला जो आवडेल तो उचला. परंतु जें कांहीं उचलाल त्यांत हृदय ओता. त्याचा अहर्निश जप करा. म्हणजे तो उद्योग तुम्हांला मोक्ष देऊन तुमच्या राष्ट्रालाहि मोक्ष दिल्याशिवाय राहणार नाहीं.

एका जपानी कामगाराला कोणीं विचारलें, " तूं चांगले स्क्रू करतोस का ? " त्या कामगारानें उत्तर दिलें, " नुसते चांगलेच नाहीं, तर उत्कृष्ट स्क्रू मी तयार करतों. " हेंच उत्तर आपणां सर्वांस देतां आलें पाहिजे. मी जें जें कर्म करतों, तें उत्कृष्ट करतों, जसें ज्याला म्हणतां येईल तो धन्य होय.

एक जपानी मजूर गलबतें बांधण्याच्या कामावर असे. तो वाचावयास शिकत होता. कोणीं त्याला विचारलें, " तूं आतां मोठा झालास, कशाला वाचावयास शिकतोस ? " तो म्हणाला, " समजा, रशियाशीं आमच्या देशाची लढाई सुरू झाली. त्या लढाईंत आरमारी युद्धेंहि होतील. एकाद्या आरमारी युद्धांत जपानी आरमाराचा जर विजय झाला, आणि तो विजय मिळवून देणाऱ्या गलबतांत जर हें गलबत असेल, तर मला किती आनंद होईल ! ज्या गलबतांना मी तयार करीत होतों, त्या गलबतांचीं नांवें जर मीं वर्तमानपत्रांत वाचलीं तर मला कृतकृत्य वाटेल. मी म्हणेन कीं, त्या गलबतांत मीं दोन खिळे मारले होते, मीं दोन पत्रे ठोकले होते, मीं दोन स्क्रू पिळले होते. मीहि माझ्या देशाच्या स्वातंत्र्य-युद्धांत, माझ्या देशाच्या विजयांत थोडा भागीदार आहें, असें मला वाटेल. तें वर्तमानपत्र वाचतां यावें म्हणून मी शिकत आहें. "

आपल्या लहानशा कर्माबद्दल केवढी ही थोर दृष्टि ! माझें हें लहानसें कर्महि देशाच्या उपयोगी पडेल, समाजाच्या उपयोगास येईल, म्हणून तें मी करीत आहें व शक्य तितकें उत्कृष्ट करीत आहें असें मनांत वागवणें, यांत केवढा कर्ममहिमा आहे !

कर्म लहान असो वा मोठें असो. तें कर्म समाजाला मोक्ष देणारें करा, समाजाच्या उपयोगास येईल असें करा. समाजाच्या पूजेच्या कामीं तें येईल असें करा. लिहा वा व्याख्यानें द्या. उच्चारलेला शब्द, लिहिलेली ओळ समाजाचें भलें करील अशी मनांत खात्री असूं दे. मीं दिलेला माल समाजाला पुष्टि देईल, रोग देणार नाहीं, ही सर्वांची अंतरीं निष्ठा असूं दे. बौद्धिक खाणीं द्या वा शारीरिक खाणीं द्या. तीं समाजाला धष्टपुष्ट करतील अशीं असूं देत. विषारी खाणीं कृपा करून समाजाला देऊं नका.

अशा दिव्य कर्ममय जीवनाचा सर्वांना ध्यास लागूं दे. " मोक्षाचे तों आम्हां नाहीं अवघड." मोक्ष दारांत आहे, शेतांत आहे, कचेरींत आहे, चुलीजवळ आहे, कारखान्यांत आहे, शाळेंत आहे, सर्वत्र आहे. समाजाचा बुडालेला धंदा पुन्हां सजीव करून समाजाला भाकर देऊं पाहणारा महापुरुष हा खरोखर संत आहे. समाजांतील घाण दूर करून त्यांना स्वच्छतेंत रहावयास शिकविणारा तो परम थोर ऋषि आहे. परपुष्ट कर्मशून्य जीव आतां तुच्छ वाटूं देत. केवळ हरिहरि म्हणणारे व भोगासाठीं लालचावलेले जीव हे किडे वाटूं देत.



**पोटापुरतें काम । आणि अगत्य तो राम ॥**

पोटासाठीं कोणतें तरी कर्म. परंतु तें करतांना रामाला विसरूं नका. दारूचे गुत्ते घालून पोटाला मिळवूं नका. रामाला स्मरणें म्हणजे मंगलाला स्मरणें, समाजाच्या कल्याणाला स्मरणें.

कोणी कोणी मुखानें राम राम म्हणत बसतात. परंतु मुखानें राम म्हणा व हातानें काम करा, सेवा करा. मी माझ्या आईचा नुसता जप करीन, तर तें आईला रुचणार नाहीं. आई म्हणेल, " माझे चार धंदे कर. जा कळशी भरून आण. " आईची सेवा न करतां मी आई म्हणत बसेन तर तो दंभ नाहीं का होणार ? देवाचें नांव उच्चारा व हातानें सेवा चालूं दे. ती सेवा म्हणजेच देवाचें नांव. महात्माजी एकदां म्हणाले, " चरखा हें माझ्या देवाचेंच एक नांव आहे." ईश्वराला सहस्रावधि नांवें आहेत. प्रत्येक मंगल वस्तु म्हणजे त्याचेंच स्वरूप आहे, त्याचेंच नांव आहे.

मुखांत देवाचें नांव व हातांत सेवेचें काम. कधीं कधीं ईश्वराचें अपरंपार प्रेम दाटून आपोआप कर्म माझ्या हातून गळेल. समजा, माझ्या खाणावळींत जेवणाऱ्या लोकांकडे हीं देवाचीं रूपें आहेत या भावनेनें मी पाहूं लागलों; एकादे वेळेस ही भावना इतकी वाढेल कीं मी वाढणें विसरून जाईन. त्या देवांच्या मूर्तींकडे पाहतच राहीन. माझे डोळे घळघळ वाहूं लागतील. अष्टभाव दाटतील. रोमांच उभे राहतील.

**' तनुवरी गुढियाच उभारती '**

असा अनुभव येईल.

अशा रीतीनें कर्म गळून पडणें म्हणजेच शेवटची स्थिति. ती कर्माची परमोच्च दशा होय. त्या वेळेस समोरचे जेवणारे न खातां तृप्त होतील. त्या वाढणाऱ्याच्या डोळ्यांतील प्रेमगंगांनीं ते पुष्ट होतील. म्हणून रामकृष्ण परमहंस म्हणत, " ईश्वराचें नांव उच्चारतांच जोंपर्यंत तुझे डोळे भरून येत नाहींत, तोंपर्यंत कर्म सोडूं नकोस."

परंतु धन्यतेची स्थिति न येतांच जे पापात्मे खुशालचेंडूप्रमाणें भोजनें झोडतात आणि मुखानें वरवर ' नारायण नारायण ' म्हणतात, त्यांना समाजानें शेणगोळ्या-प्रमाणें दूर भिरकावून दिलें पाहिजे. भारतीय संस्कृति असें भिरकावून देण्यास सांगत आहे.

भारतीय संस्कृति सांगते, " कोणतें तरी सेवाकर्म हातीं घ्या. त्यांत रमा. निरहंकार व्हा. निःस्वार्थ व्हा. त्या कर्मानें समाजदेवाची पूजा करावयाची आहे हें विसरूं नका आणि उत्तरोत्तर तें सेवाकर्म उत्कृष्ट करीत करीत एक दिवस हा देह पडूं दे व त्याचें सोनें होऊं दे. " भारतीय संस्कृति म्हणजे सेवेचा, कर्माचा अपरंपार महिमा.

परंतु आज ही संस्कृति मारली गेली आहे. मी रस्त्यांत कर्मशून्य होऊन नारायण म्हणत बसलों, तर माझ्यापुढें पैशाचे ढीग पडतात. परंतु मी रस्त्यांतील घाण दूर करीन, विष्ठा उचलीन, तर मला प्यायला पाणी मिळत नाहीं; मग पोटभर जेवावयाची तर गोष्ट दूरच राहिली ! कर्महीनांना पायपूजा मिळत आहेत, आणि कर्ममय, श्रममय ज्यांचें जीवन आहे, त्यांना लाथा बसत आहेत, त्यांचा पदोपदीं उपहास होत आहे ! भारतीय संस्कृतीचा आत्मा चिरडला गेला आहे. ज्यांना ज्यांना भारतीय संस्कृतीचा अभिमान असेल, त्यांनीं स्वतः कर्ममय ज्यांचें जीवन आहे त्यांना पूजावयास उठलें पाहिजे.

**तैं झडझडून वाहिला नीघ। इये भक्तीचियें वाटें लाग ॥**
**तैं पावसीं अव्यंग। निजधाम माझें ॥**

मोक्षाचें, आनंदाचें परमधाम पाहिजे असेल, जेथें कोणतेंहि व्यंग नाहीं, दुःख नाहीं, वैषम्य नाहीं, दुष्काळ नाहीं, दारिद्र्य नाहीं, अज्ञान नाहीं, घाण नाहीं, रोग नाहीं, भांडण नाहीं, क्रोध-मत्सर नाहीं, असें तें परम मंगल स्वातंत्र्याचें धाम पाहिजे असेल, तर सारे मिथ्या अभिमान, सारीं श्रेष्ठ-कनिष्ठपणाचीं कुभांडें, सर्व आलस्य, सारे स्वार्थ, सर्व भ्रामक कल्पना झडझडून फेंकून द्या आणि या सेवामय, कर्ममय, वर्णधर्ममय, भक्तीच्या वाटेला लागा.

**एक हात भू नांगरणें**
**शत व्याख्यानांहुन थोर**
**एक हात खादी विणणें**
**मंत्रजपाहुन तें थोर**



**एक वस्त्र वा रंगविणें**
**तव पांडित्याहुन थोर**
**शेतकरी, तसे विणकरी, तसे रंगारी, बना देशाचे**
**आळशी न कुणि कामाचे, यापुढें ॥**
**एक नीट मडकें करणें**
**तव व्याख्यानाहुन थोर**
**एक नीट जोडा शिवणें**
**तव श्रीमंतीहुन थोर**
**चाकास धांव बसवीणें**
**तव विद्वत्तेहुन थोर**
**कुंभार, तसे चांभार, तसे लोहार, बना देशाचे**
**आळशी न कुणि कामाचे, यापुढें ॥**

हा आतां आपला मंत्र. ही आहे भारतीय संस्कृति.

बेंजामिन फ्रँकलिन इंग्लंडमधून अमेरिकेंत जेव्हां परत गेला, तेव्हां त्याला विचारण्यांत आलें, " इंग्लंडांत काय पाहिलेंत ? "

बेंजामिन म्हणाला, " इंग्लंडमध्यें सारे लोक उद्योगी आहेत. तेथें प्रत्येकजण कांहीं ना कांहीं करीतच असतो. इंग्लंडमध्यें वारा, वाफ वगैरेंनाहि कामाला लावण्यांत आलें आहे. पवनचक्या फिरत असतात, वाफेनें यंत्रें चालत असतात. इंग्लंडमध्यें सारे श्रमजीवी लोक आहेत. तेथें एकच जंटलमन मला दिसला."

" कोण तो ? " सर्वांनीं एकदम विचारिलें.

बेंजामिन म्हणाला, " पिग्–डुक्कर ! हें डुक्कर मात्र कांहीं काम करीत नव्हतें. घूं घूं करीत भराभरा विष्ठा खात हिंडत होतें ! "

बेंजामिन श्रम न करणाऱ्याला डुक्कर म्हणत आहे. शिष्ट मनुष्याला, जंटलमनला बेंजामिन काय पदवी देत आहे तें पहा. बेंजामिन श्रमहीनास सूकर म्हणत आहे. परंतु आपल्या देशांत श्रमहीनास देव समजण्यांत येत असतें. अमेरिका वैभवांत कां व आपण दारिद्र्याच्या गर्तेत कां, हें यावरून दिसून येईल.

पूज्य शेतकऱ्याला आपण धिक्कारीत आहोंत. हरिजनांना बहिष्कृत करीत आहोंत आणि कर्महीन श्रीमंतांना व धर्माच्या नांवानें सर्वांना लुबाडणाऱ्यांना,

भ्रष्टाकार माजविणाऱ्यांना, स्त्रियांचीं पातिव्रत्यें धुळीस मिळविणाऱ्यांना पूजीत बसलों आहोंत. अतःपर भारतीय संस्कृतीच्या उपासकांनीं हा बावळटपणा, हा मूर्खपणा, हा करंटेपणा, दूर फेंकून दिला पाहिजे. धुळींत काम करून मळलेला हा सर्वांहून मंगल व पवित्र असें मानावयास शिकलें पाहिजे. आपणांस वाटत असतें, धुळींत मळलेला मनुष्य अमंगळ. परंतु त्याचा कोठा स्वच्छ असतो. त्याला अंतःशुद्धि असते. याच्या उलट, बाहेरचे कपडे परीटघडींचे वापरणारा, अंगाला रोज साबण लावणारा, केंस विंचरणारा, असा हा बाह्य स्वच्छतेचा पुतळा—परंतु त्याचें पोट तपासून पहा, त्याच्या पोटांत सारी घाण. त्याला सदैव अपचन व अजीर्ण. त्याच्या शौचाची सदैव तक्रार. त्याला बद्धकोष्ठाची व्यथा. श्रम करील, तर ना कोठा स्वच्छ राहील!

सर्वांनीं विचार करा. भारतीय संस्कृतीचा आत्मा ओळखा. गीतेचें अंतरंग पहा. घोड्याचे खरारे करणारा व पीतांबराचा तोबरा करून त्यांतून घोड्यांना चंदी चारणारा तो गोपाळकृष्ण डोळ्यांसमोर आणा, आणि जीवनाला शुद्ध वळण द्या. आजचा हा रडका संसार सुखमय, समृद्ध व आनंदमय करा. भारतीय संस्कृतीची उपासना करणारें राष्ट्र कधीं दरिद्री व दास होणार नाहीं. खऱ्या सद्धर्माजवळ श्री, वैभव, जय हीं ठेवलेलींच असतात!

## ज्ञान : : ८

आपण आवडीप्रमाणें स्वतःच्या वर्णानुसार समाजसेवेचें कर्म उचललें, त्यांत हृदयाची भक्ति ओतली, जिव्हाळा ओतला, तरी एवढ्यानें भागत नाहीं. त्या कर्मांत ज्ञान आल्याशिवाय त्या कर्माला पूर्णता येणार नाहीं. कर्मांत ज्ञान व भक्ति यांचा समन्वय पाहिजे.

ज्ञान दोन प्रकारचें आहे. एक आध्यात्मिक ज्ञान व दुसरें विज्ञान. कर्म चांगलें व्हावयास या दोन्ही हातांची आवश्यकता आहे. आध्यात्मिक ज्ञान म्हणजेच अद्वैत. सारी मानवजात माझी आहे, हे सर्व माझेच भाऊ, आणि यांची सेवा करावयासाठीं मला विज्ञान पाहिजे आहे, अशी जी ही दृष्टि, ती ज्ञान-विज्ञानात्मक दृष्टि.



ही दृष्टि जोंपर्यंत नाहीं, तोंपर्यंत विज्ञान सुरक्षित नाहीं. विज्ञानाच्या पाठीमागें हें अद्वैताचें तत्त्वज्ञान, हें एकत्वाचें तत्त्वज्ञान, हें प्रेमाचें तत्त्वज्ञान जर नसेल, तर विज्ञान सर्व जगाची होळी करील. विज्ञानानें संसार सुंदर होण्याऐवजीं संसार भयाण होईल.

टॉल्स्टॉय म्हणूनच म्हणत असे कीं, " इतर शास्त्रांचे अभ्यास आधीं बंद करा. समाजांत परस्परांविषयीं कसें वागावयाचें त्याचें शास्त्र आधीं सिद्ध होऊं दे. " सर्व शास्त्रांत मुख्य शास्त्र म्हणजे हें समाजशास्त्र आहे. म्हणूनच भारतीय संस्कृति अद्वैताचें शास्त्र पुढें करून प्रगति करूं पाहते. समाजांत सर्वांना सुख मिळावें, सर्वांना ज्ञान मिळावें, सर्वांना पोटभर खायला, अंगभर ल्यायला मिळावें, सर्वांच्या विकासाला वाव असावा, कोणीं कोणास हिणवूं नये, प्रबळानें दुर्बळाला पिळूं नये, दुसऱ्यास गुलाम करूं नये, स्वतःच्या हवेल्या बांधून दुसऱ्यांच्या घरांच्या होळ्या करूं नयेत, इटालियन जगावेत म्हणून अबिसीनियानें मरावें असें होऊं नये, अशा प्रकारचा सिद्धान्त आधीं स्थापन झाला पाहिजे. राष्ट्राराष्ट्रांचे, जातीजातींचे असे प्रेमाचे संबंध जोंपर्यंत मानण्यांत येत नाहींत, तोंपर्यंत जगांत खरी शांति येणार नाहीं, खरें स्वातंत्र्य येणार नाहीं.

आज जगांत कोण स्वतंत्र आहे ? कोणीहि स्वतंत्र नाहीं. आपणांस वाटतें, कीं इटाली स्वतंत्र आहे, जर्मनी स्वतंत्र आहे, जपान स्वतंत्र आहे; परंतु ही भूल आहे. एक गुलाम असतांना दुसरा स्वतंत्र होऊं शकत नाहीं.

आपण सिंह हा पशूंचा राजा मानतों. परंतु सिंह हा सारखा मागें पहात असतो. त्याला वाटत असतें, कीं आपणांस कोणी खावयास येईल! तो सिंह हत्तींचें रक्त प्राशून आलेला असतो. त्याचें मन त्याला खातें. त्याचें मन म्हणतें, " तुला कोणी खावयास येईल, तुझें रक्त पिण्यास येईल."

जगांतील स्वतंत्र राष्ट्रांची हीच दशा आहे. जपानला वाटतें, रशिया प्रबळ झाला. रशियाला वाटतें, जर्मनी स्वारी करील. इंग्लंडला वाटतें, कीं इटाली प्रबळ होत आहे. फ्रान्स जर्मनीला भीतच असतो. अशा प्रकारें सर्वत्र भीतीचें साम्राज्य आहे. बंदुकीवर हात ठेवून सारे सुखाची भाकरी खाऊं पहात आहेत! बाँबगोळे जवळ ठेवून चहा पीत आहेत! तरवारी उशाला घेऊन झोंपत आहेत! त्यानें गुप्त तह नाहीं ना कोठें केला, त्यानें न कळत आरमार नाहीं ना वाढविलें, त्यानें नवीन मारक शोध नाहीं ना लावला, अशी धास्ती सर्वांना वाटत असते. जिकडे

तिकडे गुप्त पोलिसांचा सुळसुळाट, सर्वत्र कारस्थानें, कट, कारवाया असें हें जगाचें नरकाचें रूप आहे. सर्वत्र भय, भीति, धोका, आहे. शाश्वति क्षणाची नाहीं. केव्हां आगडोंब पेटेल याचा नेम नाहीं.

जगांत जोंपर्यंत हिंसा आहे, स्वार्थ आहे, तोंपर्यंत जगाचें असेंच स्वरूप रहावयाचें. माझ्या पोळीवर तूप पाहिजे, मला माडी पाहिजे, दुसऱ्याचें कांहीं का होईना, ही वृत्ति जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत सारे भयभीतच राहणार. हिंसा ही भित्री आहे. हिंसेला आपली कोणी हिंसा करील का अशी सदैव भीति असते. जगांत प्रेमच निर्भय असतें.

" आनन्दं ब्रह्मणो विद्वान् न बिभेति कदा च न ।" ब्रह्माची गांठ घेणारा निर्भय असतो. त्याला स्व-पर नाहीं. सर्वांचें कल्याण व्हावें म्हणून तो धडपडतो.

आज विमानांतून बॉंबगोळे फेंकून जीवनें धुळींत मिळविलीं जात आहेत. आज विषारी गॅस सोडून लोक मारण्यांत येत आहेत. प्रचंड यंत्रांचे शोध करून मजुरांना पिळून काढण्यांत येत आहे. विज्ञानाचा अशा रीतीनें दुरुपयोग होत आहे. बुद्धीचा आग लावण्याकडे उपयोग होत आहे.

अद्वैताची दृष्टि आल्याशिवाय, आत्मौपम्य आल्याशिवाय, विज्ञान फुकट आहे. ज्ञानहीन विज्ञानाच्या हातांत समाज सोंपविणें म्हणजे माकडाच्या हातांत कोलीत देण्याप्रमाणेंच आहे. म्हणून आधीं सारे भाऊ भाऊ व्हा. सारे एका ईश्वराचे व्हा. कोणी आर्य नाहीं, कोणी अनार्य नाहीं; कोणी हिंदु नाहीं, कोणी मुसलमान नाहीं; सारे मानव आहोंत. या मानवांची निरपवाद पूजा विज्ञानमय कर्मानें करावयाची आहे.

जर्मनींतून ज्यू लोकांची हकालपट्टी हिटलरनें केली. आर्य लोकांशीं ज्यूंचा संबंध नको. आर्य म्हणजे श्रेष्ठ. असला आचरटपणा व रानवटपणा तो हिटलर करीत आहे. परंतु आश्चर्याची गोष्ट ही, कीं कांहीं हिंदुसंघटनवाले हिटलरचा हा कित्ता गिरवण्यास हिंदूंस सांगत आहेत ! " पहा तो हडेलहप्पी हिटलर ! कसा तो ज्यूंची हकालपट्टी करीत आहे. तुम्ही तशीच मुसलमानांची करा, " असलें व्रात्य तत्त्वज्ञान सांगण्यांत येत आहे. ही भारतीय संस्कृति नाहीं. भारतीय संस्कृति सर्व जगांतील मानवांना हांक मारील. भारतांत " शृण्वन्तु सर्वे अमृतस्य पुत्राः " " अमृतस्वरूपी देवाच्या लेंकरांनो, ऐका " अशी ऋषि गर्जना करील. भारतीय संस्कृति हें करीत आली, हेंच पुढें करील. आर्य असोत, अनार्य असोत,



कृष्ण असोत, पीत असोत, रक्त असोत, बसक्या नाकाचे असोत, जाड ओठांचे असोत, रुंद जबड्यांचे असोत वा घाऱ्या डोळ्यांचे असोत, ठेंगणे असोत, वा उंच असोत, सारे मानव स्वतःच्या दिव्य झेंड्याखालीं घेण्यासाठीं भारतीय संस्कृति उभी आहे.

तात्पुरत्या विजयानें हुरळून हिटलरी अनुकरणें करून पशू होणें योग्य नव्हे. आपला थोर वारसा आहे. आपण दिव्य मानव्यासाठीं जगूं या व मरूं या. प्रत्येक मानवजातींत थोर पुरुष उत्पन्न झालेले आहेत. मानवजातीस ज्यांचा चिरंतन अभिमान वाटावा अशीं नरनारीरत्नें सर्व मानववंशांत जन्मलीं आहेत. कोणी कोणास हंसण्याची जरूर नाहीं.

ही मानवी ऐक्याची भव्य कल्पना भारतीय संस्कृतीचा प्राण आहे. कोणतेंहि कर्म करतांना ही दृष्टि हवी. भक्ति म्हणजे हें अद्वैत-ज्ञानच. दुसऱ्याबद्दल तेव्हांच प्रेम व भक्ति वाटेल, ज्या वेळेस तो माझ्यासारखाच आहे, एकच सत्तत्त्व सर्वांत आहे, असें समजेल तेव्हां ! तो म्हणजे मीच आहें, आणि म्हणूनच त्याच्यावर मीं प्रेम केलें पाहिजे. मी दुसऱ्यावर प्रेम करतों, म्हणजे स्वतःवरच प्रेम करतों.

कर्मामध्यें हें आत्मौपम्य आलें म्हणजे कर्म मनापासून होईल. परंतु तें कर्म हितकर व्हावें म्हणून त्यांत विज्ञानहि हवें. विज्ञान म्हणजे तें तें कर्म कसें करावयाचें याची माहिती. केवळ प्रेम असून भागत नाहीं. समजा, एकाद्या रोग्याची मी शुश्रूषा करीत आहें. त्या रोग्याबद्दल मला प्रेम आहे. त्याच्याबद्दल मला आपलेपणा आहे. परंतु त्याची शुश्रूषा कशी करावयाची ह्याविषयींचें नीट ज्ञान जर मला नसेल, तर नुकसान होण्याचा संभव असतो. प्रेमामुळें, जें देऊं नये तेंच मी खावयास देईन. जें करावयास नको तेंच करीन. जें पाजावयास नको तेंच पाजीन. अशा रीतीनें माझें प्रेम तारक होण्याऐवजीं मारकच व्हावयाचें.

प्रेम हें डोळस प्रेम हवें; तरच कर्म हितपरिणामी होईल. आजकाल विज्ञान किती तरी वाढलें आहे. प्रत्येक कर्मांत त्याची जरूर आहे. स्टोव्ह कसा पेटवावा, पाणी स्वच्छ कसें करावें, कोणती पावडर टाकावी, इलेक्ट्रिकजवळ कसें वागावें, टेलिफोन कसा करावा, सायकल कशी दुरुस्त करावी, इंजेक्शन कसें द्यावें, कोणत्या भाज्या चांगल्या, व्हिटॅमिन्स कशांत आहेत, कोणते व्यायामप्रकार चांगले, कोणती शिक्षणपद्धति चांगली, सदीप व्याख्यानें कशीं द्यावीं, खेड्यांत आरोग्य कसें सुधारावें, खतें कशीं तयार करावीं, बीं किती अंतरावर पेरावें, एक ना दोन

—शेंकडों प्रकारचें ज्ञान आपणांस आपल्या रोजच्या व्यवहारांत पाहिजे आहे. आपलीं प्रत्यहींचीं कर्में सुंदर, त्वरित व चांगलीं व्हावींत म्हणून सर्व प्रकारचें शास्त्रीय ज्ञान आपण हस्तगत केलें पाहिजे.

जर प्रेम असेल तरच आपण हें ज्ञान मिळवूं. माझ्या भावावर जर माझें प्रेम असेल, तरच त्याच्यासाठीं जें कर्म मी करणार त्यांत विज्ञान वापरीन. शाळेंतील विद्यार्थ्यावर प्रेम असेल, तरच मी शिक्षणशास्त्राचा अभ्यास करीन. मुलांचें मानसशास्त्र अभ्यासीन. मी तें ज्ञान मिळविण्याचा कधींच कंटाळा करणार नाहीं. प्रेमाला आळस माहीत नसतो.

आज भारतीय संस्कृतींत विज्ञानाचा जवळजवळ अस्तच झाला आहे. विज्ञानाचा दिवा विझला आहे. विज्ञानपूजा लोपली आहे. हा विज्ञानाचा नंदादीप पुन्हां प्रज्वलित केला पाहिजे. एकादा महापुरुष विशिष्ट क्षेत्रांत संशोधन करतो. मग त्याचा तो शोध सर्वसामान्य जनतेच्या रोजच्या व्यवहारांत येतो. असे संशोधक भारतांत उत्पन्न झाले पाहिजेत. संसाराला सुंदरता आणणारें हें विज्ञान —त्यांत भिण्यासारखें कांहींच नाहीं. लोक पाश्चिमात्यांना केवळ भौतिक म्हणून तुच्छ मानितात आणि स्वतःला आध्यात्मिक वृत्तीचे समजतात. परंतु आज आपण आध्यात्मिकहि नाहीं व भौतिकहि नाहीं. आपण केवळ मढीं आहोंत.

पाश्चिमात्यांत भौतिक विज्ञानाच्या पाठीमागें अद्वैताची–मानव्याची–थोर कल्पना नसल्यामुळें जगांत हैदोस घालण्याचें आसुरी कर्म त्यांनीं चालविलें आहे. त्यांच्या भौतिकतेला आध्यात्मिकतेची जोड मिळाली तर सारें सुंदर होईल. भारतांत भेदांचा बुजबुजाट आहे. श्रेष्ठ-कनिष्ठपणाचीं बंडें आहेत. मुखानें अद्वैत घोकतील व कृतीनें दुसऱ्यास लाथ मारतील ! आध्यात्म ग्रंथांत आहे. भारतीय संस्कृतींतील अध्यात्म आज विलुप्त झालें आहे. तें आपण कृतींत आणूं या. सर्वांस सुख-विण्याची इच्छा धरूं या. आणि ही इच्छा मूर्त करण्याकरितां विज्ञानाचीहि कांस धरूं या.

पाश्चिमात्यांत केवळ आध्यात्मिकतेची वाण आहे. परंतु आपण दोन्ही दृष्टींनीं दिवाळखोर आहोंत. ज्ञान आणि विज्ञान दोन्ही येथें मरून पडलीं आहेत. आर्यभट्टांच्या व भगवान् बुद्धांच्या या भरतभूमींत पुनरपि ज्ञान–विज्ञानांची जोपासना नाहीं का सुरू होणार ? अध्यात्मविद्या व भौतिकविद्या यांचा संगम नाहीं का होणार ?



ईशोपनिषदांत हीच गोष्ट प्रामुख्यानें सांगितलेली आहे. विद्या व अविद्या, संभूति व असंभूति, यांचा समन्वय करावयास ऋषीनें सांगितलें आहे :

विद्यां चाविद्यां च यस्तद्वेदोभयं सह
अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्ययाऽमृतमश्नुते ॥

अविद्या म्हणजे भौतिक ज्ञान. या भौतिक ज्ञानानें आपण मृत्यु तरतों; म्हणजे हा मृत्युलोक तरतों. संसारांतील दुःखें, रोग, संकटें यांचा परिहार करतों. संसारयात्रा सुखकर करतों. आणि विद्येनें अमृतत्व मिळतें. अध्यात्मज्ञानानें या शरीरांच्या आंतील, या आकारांतील चैतन्य एकच आहे हें कळून अमरता अनुभवास येते.

जो केवळ विद्येला भजेल किंवा केवळ अविद्येला भजेल तो पतित होईल. एवढेंच नव्हे, तर हें उपनिषद् सांगतें, कीं केवळ अविद्येची उपासना एक वेळ पत्करली; परंतु केवळ अध्यात्मांत रमणारा तर फारच घोर नरकांत पडतो. कारण, विज्ञानाची उपासना करणारा संसाराला, निदान स्वतःच्या राष्ट्राच्या संसाराला तरी शोभा आणील. परंतु कर्मशून्य वेदान्ती सर्व समाजाला धुळींत मिळवितो. समाजांत तो दंभ निर्माण करतो. अध्यात्म व भौतिकशास्त्र यांत कोणत्या एकाचीच कांस धरावयाची असेल तर ईशोपनिषद् म्हणतें, " भौतिकशास्त्राची कांस धर." केवळ भौतिकशास्त्राची कांस धरल्यानें पतित होशील, परंतु तितका पतित होणार नाहींस, जितका केवळ अध्यात्मवादी झाल्यानें होशील :

अन्धं तमः प्रविशन्ति येऽविद्यामुपासते ।
ततो भूय इव ते तमो य उ विद्यायां रताः ॥

कर्में करीत शंभर वर्षें उत्साहानें जगा असा महान् संदेश देणारें हें उपनिषद् असें सांगत आहे. विज्ञानाची कुटाळकी व हेटाळणी करणें हें भारतीय संस्कृतीची जोपासना करणाऱ्यांना शोभत नाहीं. विज्ञान तुच्छ नाहीं. विज्ञान महान् वस्तु आहे, हें आतां तरी आपण ओळखूं या.

गीतेमध्यें ज्ञान-विज्ञान हे शब्द नेहमीं बरोबर येतात. विज्ञानाशिवाय ज्ञान निरुपयोगी आहे आणि ज्ञानाशिवाय, अद्वैताशिवाय विज्ञान भेसूर आहे. ज्ञानाच्या पायावर विज्ञानाची इमारत उभारली तर कल्याण होईल. पाश्चिमात्य लोक विज्ञानाची इमारत वाळूवर उभारीत आहेत. म्हणून ही इमारत गडगडेल व संस्कृति गडप होईल. विज्ञानाचा पाया अध्यात्माच्या पायावर उभारणें हें भारतीय

संस्कृतीचें भव्य कर्म आहे. हें महान् कर्म भारताची वाट पहात आहे. भारत हें कर्म नाहीं का अंगावर घेणार ?

प्रपंच व परमार्थ यांचें हें रमणीय संमीलन आहे. ज्ञान-विज्ञानाच्या या विवाहांतून मांगल्याचीं बाळें जन्माला येतील व पृथ्वीवर स्वर्ग अवतरेल.

महात्माजी आज हें करीत आहेत. महात्मा गांधींना भेद माहीत नाहींत. अद्वैत त्यांच्या रोमरोमांत बाणलें आहे. सर्वत्र त्यांना नारायणच दिसत आहे. परंतु या नारायणाची सेवा शास्त्रीय दृष्टीनें ते करूं पहात आहेत. महात्माजींना विज्ञान पाहिजे आहे. चरख्यांत सुधारणा करणाऱ्यांना त्यांनीं एक लाख रुपयांचें बक्षीस देऊं केलें होतें. अर्थशास्त्रावर निबंध लिहिणारास एक हजार रुपयांचें बक्षीस त्यांनीं जाहीर केलें आहे. त्यांना संशोधन पाहिजे आहे; कल्याणावह संशोधन पाहिजे आहे. खाण्यापिण्याचे ते प्रयोग करतात. गूळ चांगला कीं साखर चांगली, सडलेले तांदुळ चांगले कीं असडिक तांदुळ चांगले, हातसडीचे तांदुळ हितकर कीं यांत्रिक तांदुळ सत्त्वयुक्त, कोणते पाले खावेत, घोळीची भाजी, निंबाचा पाला वगैरेंत कोणतीं तत्त्वें आहेत, चिंचेचें सरबत चांगलें कीं वाईट, कच्चें खावें कीं शिजलेलें खावें, मधाचा काय उपयोग, मधुसंवर्धनविद्या देशांत कशी वाढेल, एक कीं दोन–शेकडों प्रकारचा विज्ञानविचार महात्माजी करीत असतात. आजारीपणांत पाणी, माती, प्रकाश वगैरे नैसर्गिक उपचारांचा उपयोग ते करूं पाहतात. कारण हे उपाय स्वस्त व सुलभ आहेत. आपल्या बांधवांचा संसार सुंदर व्हावा म्हणून महात्माजींची कोण आटापीट, केवढे प्रयोग, किती कष्ट !

जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत बुद्धीचा दिवा घेऊन ते जात आहेत. विज्ञानाला घेऊन जात आहेत. संसाराला, सर्व जनतेच्या संसाराला सौंदर्य देणारे, समृद्धि देणारें विज्ञान त्यांना पाहिजे आहे. ज्ञान-विज्ञानाची उपासना करणारे व त्यांत भक्तीचा जिव्हाळा ओतणारे असे महात्माजी म्हणजे भारतीय संस्कृतीची मूर्ति आहेत. भारतीय संस्कृति म्हणजे ज्ञानयुक्त, विज्ञानयुक्त व भक्तियुक्त केलेलें शुद्ध कर्म ! असें कर्म कसें करावें हें महात्माजींसारख्यांपासून शिकावें. महात्माजींच्या रूपानें भारतीय संस्कृतीचा आत्माच अवतरला आहे असें मला वाटतें.

अशी ही भारतीय संस्कृति संपूर्ण आहे. ती कोणत्याहि एकाच गोष्टीला महत्त्व देणारी नाहीं. ती मेळ घालणार आहे. शरीर व आत्मा दोघांना ती ओळखते. शरीरासाठीं विज्ञान व आत्म्यासाठीं ज्ञान ! शरीरानें नटलेल्या या आत्म्याला



विज्ञानानें नटलेलें अध्यात्म व अध्यात्मानें नटलेलें विज्ञान यांचीच जरूर आहे. भारतीय जनता हें दिव्य सूत्र ओळखील तो सुदिन !

## संयम : : ९

ज्ञान-विज्ञानयुक्त, हृदयाचा जिव्हाळा ओतून, अनासक्त होऊन कर्म करावें हें खरें. परंतु हें बोलणें सोपें आहे. असें कर्म सारखें हातून होण्यास भरपूर साधना हवी. जीवनांत संयम हवा. संयमाशिवाय उत्कृष्ट कर्म हातून होणार नाहीं.

भारती संस्कृतीचा संयम हा एक प्रकारें आत्मा आहे असें म्हटलें तरी चालेल. भारतीय संस्कृति संयमावर उभारलेली आहे. आपण शंकराच्या देवळांत जातों; परंतु आधीं बाहेर कांसवाची मूर्ति असते. या कांसवाचें दर्शन घेतल्याशिवाय शिवाकडे, मृत्युंजयाकडे जातां येणार नाहीं. आणि कांसव म्हणजे काय ? कांसव म्हणजे संयमाची मूर्ति. कांसव आपले सारे अवयव क्षणांत आंत घेतें, क्षणांत बाहेर काढतें. स्वतःच्या विकासास अवसर असेल, तर सारे अवयव बाहेर आहेत. स्वतःला धोका असेल तर सारे अवयव आंत आहेत. असें हें कांसव भारतीय संस्कृतीनें गुरुस्थानीं मानिलें आहे. देवाकडे जावयाचें असेल, तर कांसवाप्रमाणें होऊन जा. कांसवाप्रमाणें स्वतःच्या इंद्रियांचे स्वामी व्हा. वाटेल तेव्हां इंद्रियें स्वाधीन राखतां आलीं पाहिजेत. ज्याला जगाचें स्वामी व्हावयाचें असेल, त्यानें आधीं स्वतःचें स्वामी झालें पाहिजे. ज्याला देव आपलासा करून घ्यावयाचा आहे, त्यानें स्वतःचें मन आधीं आपल्या ताब्यांत घ्यावयास पाहिजे.

शंकराची मूर्ति डोळ्यांसमोर आणा. शंकराला तिसरा डोळा आहे. दोन डोळ्यांमध्यें हा तृतीय नेत्र आहे. या तृतीय नेत्राचें काय काम ? या तृतीय नेत्राचें काम पहारेकऱ्याचें आहे. डोळ्यांवर, कानांवर, जिभेवर, सर्व इंद्रियांवर या डोळ्याची दृष्टि आहे. या तृतीय नेत्रांत अग्नि आहे. माझ्या जीवनाच्या विकासाला जें जें विरोधी असेल, त्याचें त्याचें भस्म करावयास हा अग्नि सिद्ध आहे. हा तिसरा डोळा उघडा ठेवल्याशिवाय जीवनांत सिद्धि नाहीं.

माझ्या डोळ्यांनीं वाटेल तेथें नाहीं जातां कामा, कानांनीं वाटेल तें नाहीं ऐकतां कामा, जिभेनें वाटेल तें नाहीं बोलतां कामा, नाहीं खातां कामा. हातांनीं

वाटेल तें नाहीं करतां कामा. पायांनीं वाटेल तेथें नाहीं जातां कामा. माझ्या ध्येयाला अनुकूल असणाऱ्या गोष्टींकडेच माझीं इंद्रियें गेलीं पाहिजेत. या इंद्रिय-बैलांनीं माझा जीवनरथ खड्डयांत न घालतां माझ्या प्राप्तव्य स्थानीं नेला पाहिजे.

ज्ञानेश्वरीमध्यें योगाचें वर्णन करतांना फारच सुंदर ओंव्या लिहिल्या आहेत. गीतेमध्यें जो

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ।
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥

हा श्लोक आहे, त्या श्लोकावरच्या त्या ओंव्या आहेत. ज्याला कर्मयोग साधावयाचा आहे, त्यानें हा संयमयोग अंगीं आणणें आवश्यक आहे.

नियम पाळावे । जरि म्हणसीं योगी व्हावें ॥

योगी म्हणजे कर्मयोगी. सतत कर्मांत रंगून जाणें. सारखी सेवा हातून होणें. त्यासाठीं काय केलें पाहिजे ?

सारें मोजूनमापून केलें पाहिजे. मोजकें खाणें, मोजकें पिणें, मोजकें बोलणें, मोजकें चालणें, मोजकी निद्रा. इंद्रियांना सारें द्यावयाचें. परंतु मोजूनमापून प्रमाणांत द्यावयाचें. असें करीत गेल्यानें जीवनांत प्रसन्नता राहील. ही गोष्ट केवळ काल्पनिक नाहीं. ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

आपण समजा अधिक जेवलों. भजीं आहेत, खाल्लीं वाटेल तितकीं. बासुंदी आहे, ओरपली भराभर. तर काय होईल ? आलस्य येईल. आधिक खाल्लें कीं अधिक लोळावें लागतें. एवढ्यानें भागेल असें नाहीं. अपचन होईल, अजीर्ण होईल, पोट दुखेल; कदाचित् आजारीहि पडण्याचा संभव. क्षणभर जिभेचें सुख अनुभवलें, परंतु पुढें दहा दिवस अन्नाची रुचि वाटणार नाहीं. पुढें दहा दिवस कांहीं करतां येणार नाहीं. कोठलें कर्म नि कोठलें काय ?

रात्रीं गाणें आहे, बसलों दोन वाजेपर्यंत ऐकत. मग झोंप पुरी होत नाहीं. झोंप पुरी मिळाली नाहीं, तर पचन नीट होत नाहीं. दुसऱ्या दिवशीं कामहि नीट होणार नाहीं. काम करतांना डोळे पेंगू लागतील. अशा प्रकारें कर्मसिद्धि होणार नाहीं.

ज्याचें जीवन कांहींतरी ध्येयासाठीं आहे, ज्याचें जीवन सेवेसाठीं आहे, त्यानें म्हणून प्रमाणांत सारें केलें पाहिजे. प्रमाणांत सारी शोभा आहे. प्रमाणांत सौंदर्य



आहे, संयमांत सौंदर्य आहे. संयमाची पुष्कळ अविवेकी लोक टिंगल करतात. आम्हांला हीं बंधनें नकोत असें ते म्हणतात. परंतु स्वतःच स्वतःवर घातलेलीं बंधनें हीं बंधनें नाहींत. आपल्या लहरींचे गुलाम असणें म्हणजे कांहीं स्वातंत्र्य नाहीं. स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार नव्हे. स्वातंत्र्य म्हणजे विकास. आणि संयमाशिवाय विकास नाहीं.

तुम्ही सर्व सृष्टींत पहा. सर्वत्र संयम दिसेल. वृक्षच पहा ना. हा वृक्ष मुळांनीं बांधून ठेवलेला आहे. वृक्ष जर म्हणेल, "मी असा पृथ्वीशीं काय म्हणून बांधला जाऊं ? उडूं दे मला आकाशांत. तोडा माझीं मुळें." तर तो मरेल. जर वृक्षाचीं मुळें तोडलीं, तर वृक्ष जगेल का ? वृक्ष मुळांनीं बांधलेला आहे, म्हणूनच तो उंच जात आहे. म्हणूनच फुलें-फळें त्याच्यावर येत आहेत. त्याच्या संपत्तीचें रहस्य त्या दृढ संयमांत आहे.

सतार घ्या. सतारीला तारा असतात. त्या तारा नुसत्या जमिनीवर ठेवा. त्या तारांवरून बोट फिरवा. त्या तारांतून ध्वनि बाहेर पडणार नाहीं. त्या तारांतून संगीत बाहेर पडणार नाहीं. परंतु त्या तारा सतारीच्या खुंटीला बांधा; मग त्या बंधनांत घातलेल्या तारांतून डोलवणारें संगीत स्रवूं लागतें. त्या जड तारा चिन्मय होतात. त्यांच्यातून अपरंपार माधुरी पाझरूं लागते. संयमांतून संगीत प्रकट होतें.

नदी पहा. डोंगरावरील पाणी दाही दिशांस गेलें, तर त्याचा प्रवाह होणार नाहीं. परंतु तें पाणी एका विशिष्ट दिशेनें जाईल, तर त्याचा प्रवाह होईल. प्रवाहाला तीरांचें बंधन असतें. नदी दोन तटांनीं बांधलेली आहे. त्या दोन तीरांतून ती वाहते. मला हें तीरांचें बंधन नको असें जर ती म्हणेल, तर काय होईल ? पाणी सर्वत्र पसरेल व चार दिवसांत तें आटून जाईल. नदीला बंधन आहे म्हणून तिला गति आहे, खोली आहे, गभीरता आहे. तिला बंधन आहे म्हणूनच ती पुढें पुढें वाढत जाते व महासागराला जाऊन भेटते. तिला बंधन आहे म्हणूनच हजारों एकर जमीन ती सुपीक करते, सदैव ओलावा देते. नदीला बंधनामुळें अमरता आली आहे. नदीला संयमामुळें सागराची भेट घेतां येत असते.

वाफ पाहा. वाफ बंधनांत नसेल, तर तिला शक्ति नाहीं. स्वैर संचार करणारी

वाफ दुबळी आहे. प्रचंड नळींत बद्ध केलेली वाफ प्रचंड यंत्रें चालविते. मोठमोठ्या आगगाड्या ओढते.

संयमाला तुच्छ मानूं नका. तुमच्या विकासासाठीं तो आहे. समाजाच्या हितासाठीं तो आहे. आपण संयम पाळला नाहीं तर आपलें काम नीट होणार नाहीं. काम नीट झालें नाहीं म्हणजे समाजाचें नुकसान होणार. आपण केवळ आपल्या स्वतःसाठीं नाहीं. आपण समाजासाठीं आहोंत, याची जाणीव आपणांस हवी. हा आपला देह, हें आपलें जीवन समाजाचें आहे. आपलें पोषण सारी सृष्टि करीत आहे, सूर्य प्रकाश देत आहे, मेघ पाणी देत आहेत, वृक्ष फुलें-फळें देत आहेत, शेतकरी धान्य देत आहेत, विणकर वस्त्र देत आहे, शाळा शिकवीत आहे. आपण या सर्व सजीव-निर्जीव सृष्टीचे आभारी आहोंत. यासाठीं हें आपलें जीवन त्यांच्या सेवेंत अर्पण करणें हें आपलें काम आहे. हें जीवन ज्यांचें त्यांना सेवाद्वारां अर्पण करावयाचें आहे.

या जीवनाला म्हणून कीड लागूं देतां कामा नये. देवाच्या पूजेसाठीं न वासलेलें फूल न्यावयाचें. न कोमेजलेलें, न किडलेलें, रसमय व गंधमय असें स्वच्छ, सुंदर फूल न्यावयाचें. आपलें जीवनपुष्पहि समाजदेवाला अर्पण करावयाचें आहे. हें जीवन रसमय व गंधमय व्हावयास पाहिजे असेल, तर संयमाची अत्यंत जरूर आहे,

इंद्रियांना उत्तरोत्तर उदात्त आनंदाची संवय लावली पाहिजे. खाण्यापिण्याचा आनंद हा पशुपक्षीहि घेतात. मनुष्य हा केवळ खाण्यापिण्यासाठीं नाहीं. त्याला खाणें पाहिजे. परंतु दुसऱ्या ध्येयासाठीं तें खाणें पाहिजे आहे. खाणें—पिणें—झोंपणें हीं माझ्या पूर्णतेच्या ध्येयाचीं साधनें झालीं पाहिजेत.

न्यायमूर्ति रानड्यांची गोष्ट सांगतात. त्यांना कलमी आंबा आवडत असे. एकदां आंब्यांची करंडी आली होती. रमाबाईंनीं आंब्यांच्या फोडी करून न्यायामूर्तींसमोर बशी नेऊन ठेवली. न्यायमूर्तींनीं त्यांतील एक दोन फोडी खाल्ल्या. रमाबाईंनीं कांहीं वेळानें येऊन पाहिलें तर फोडी बऱ्याच शिल्लक. त्यांना वाईट वाटलें. त्या म्हणाल्या, "एवढ्या चिरून आणल्या, तुम्हांला आवडतात, मग कां बरें घेत नाहीं?" न्यायमूर्ति म्हणाले, "आंबा आवडतो म्हणून का आंबाच खात बसूं? खाल्ली एक फोड. जीवनांत दुसरे आनंद आहेत."

खाण्यापिण्याच्या गोष्टींची चर्चा करण्यांत आपला किती वेळ जातो! जणुं



जिभेचे गुलाम आहोंत आपण. परंतु आपणांस कळलें पाहिजे, कीं शेवटीं गोडी वस्तूंत नसून माझ्यांत आहे. मी माझी गोडी त्या त्या वस्तूंत ओततों व ती वस्तु गोड म्हणून खातों. सर्व मधुरता आपल्या अंतरंगांत आहे. ती गोडी ज्याला लाभली, त्याला कांहींहि द्या. त्याला सारें गोडच लागेल.

जगांतील सर्व थोर पुरुष संयमी होते. त्यांचें खाणेंपिणें साधें असे. महंमद पैगंबर साधी भाकर खात व पाणी पीत. लेनिनचा आहार अत्यंत साधा होता. महात्मा गांधी पांच पदार्थांपेक्षां अधिक पदार्थ जेवतांना घेत नाहींत. महात्माजींचा आहार-विहार असा नियमित नसता, तर इतकें अपरंपार काम त्यांना करतांच आलें नसतें. देशबंधु दासांच्या पत्नी वासंतीदेवी देशबंधूंची फार काळजी घ्यावयाच्या. देशबंधूंच्या जेवणाकडे त्यांचें लक्ष असे. देशबंधूंना त्या म्हणावयाच्या, "आतां पुरे, उठा."

परंतु या आहार-विहारांच्या संयमापेक्षांहि दुसरा संयम आहे. समाजांत आनंद नांदावा म्हणून या उदात्त संयमाचें जितकें महत्त्व गावें तेवढें थोडेंच आहे. आपल्या हिंदुस्थानांत प्राचीन काळापासून एकत्र कुटुंबपद्धति चालत आली आहे. एकत्र कुटुंबपद्धति संयमाशिवाय चालूंच शकणार नाहीं. संयम नसेल तर दहांचीं तोंडें दहा दिशांस होतील! कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ति स्वतःच्याच इच्छांना जर प्राधान्य देऊं लागेल तर सर्वांचें पटावयाचें कसें? सारी आदळआपट व धुसफूस चालेल.

एकत्र कुटुंबपद्धतींत जो मुख्य असतो त्याच्यावर फारच जबाबदारी असते. त्याला सर्वांचीं मनें सांभाळावीं लागतात. यासाठीं त्याला अपरंपार त्याग करावा लागतो. तो मुख्य मनुष्य स्वतःच्या मुलांबाळांस आधीं दागिने करणार नाहीं, स्वतःच्या पत्नीस आधीं इरकलीं लुगडीं घेणार नाहीं. आपल्या लहान भावांचीं मुलेंबाळें, आपल्या पाठच्या भावांच्या बायका, त्यांची काळजी तो आधीं घेईल. त्यांना आधीं वस्त्रें, अलंकार तो घेईल. असें तो करील तरच त्याच्या शब्दाला मान राहील. तरच त्याच्याबद्दल आदर व आपलेपणा कुटुंबांतील सर्वांस वाटेल. त्यागानें वैभव मिळत असतें तें असें.

संध्येच्या वेळीं आपण एक मंत्र म्हणतों. त्यांत पुढील चरण आहे :

**"सर्वेषामविरोधेन ब्रह्मकर्म समारभे"**

आतां कोणाचाहि विरोध नाहीं. आतां मला माझें ब्रह्मकर्म आरंभूं दे. सर्वांचा अविरोध ! फार महत्त्वाचे आहेत हे शब्द. आधीं कोठलें ब्रह्मकर्म ? आधीं कोठली स्नानसंध्या ? कोठलें देवदेवतार्चन ? कोठलें जपतप ? समाजांत आधीं सलोखा निर्माण करा. स्नेह निर्माण करा. मानवजातींतील विरोध दूर करा, कलह मिटवा, द्वेष-मत्सर नाहींसे करा आणि मग तुमचीं ब्रह्मकर्में आरंभा.

हा अविरोध कसा निर्माण होईल ? संयमानें प्रत्येकजण आपल्या वासना व इच्छा यांना जर थोडासा लगाम घालील, तर अविरोध निर्माण होणें सुकर होईल. पेटींतील प्रत्येक सूर वाटेल तसा ओरडूं लागला तर संगीत कसें निर्माण होईल ? त्या सुरांनीं स्वतःच्या इच्छांना संयत केलें पाहिजे. त्याप्रमाणें जीवनांतून संगीत निर्माण व्हावें असें जर मानवजातीस प्रांजलपणें वाटत असेल, तर मानवजातीनें स्वतःच्या सुरांवर संयम घातला पाहिजे. इटली आपला सूर फारच उंच काढील, जर्मनी तिकडून बोंबलत उठेल, जपान आदळआपट करीत भांडत बसेल, तर संगीत कसें निर्माण व्हावयाचें ?

भारतीय जीवनांत आज संगीत नाहीं. प्रांताप्रांतांत भांडणें आहेत. मतभेद असूं शकतात; परंतु मतभेदांतून मत्सराचीं भुतें उठतात तेव्हां भय वाटतें. भारताचा राष्ट्रव्यापक एकत्र कुटुंबपद्धतीचा प्रयोग आहे. भारत हें एकराष्ट्र आहे. पूर्वजांनीं भारताचे तुकडे कधीं कल्पिले नाहींत. आपल्या डोळ्यांसमोर भारतीय ऐक्याची भव्य कल्पना त्यांनीं सदैव ठेविली होती. आपण स्नान करतांना केवळ महाराष्ट्रांतील नद्यांचें स्मरण नाहीं करणार, तर सर्व भरतखंडांतील नद्यांचें स्मरण करतों. "हर गंगे, यमुने, नर्मदे, तापी, कृष्णे, गोदावरी, कावेरी" असें आपण म्हणतों. कलशाची पूजा करतांना त्या लहान कलशांत सारा हिंदुस्थान आपण पहात असतों.

**गंगे च यमुने चैव गोदावरि सरस्वति ।**
**नर्मदे सिंधु कावेरि जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु ॥**

अशा प्रमुख नद्यांचें स्मरण आपण करतों. "अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवन्तिका। पुरी द्वारावती चैव" अशा ह्या पवित्र सप्त पुरी आपण भारताच्या चारी दिशांत ठेविल्या आहेत.

**दुर्लभं भारते जन्म।**

असें ऋषीनें मोठ्या गौरवानें म्हटलें आहे. पूर्वजांच्या डोळ्यांसमोर अंग, वंग,



कलिंग, नसे; गुर्जर, विदर्भ, महाराष्ट्र नसे; त्यांच्या डोळ्यांसमोर भारत असे.

या विशाल भारतांत अनेक प्रांत आहेत. मोठ्या कुटुंबांत पुष्कळ भाऊ असावेत, त्याप्रमाणें या विशाल भारतीय कुटुंबांत पुष्कळ भाऊ आहेत. या भावांनीं परस्परांशीं संयमानें वागलें पाहिजे. एका कुटुंबांत रहावयाचें असेल, तर आपापलींच तुणतुणीं वाजवून चालणार नाहीं. आपापलेच सूर उंच करून भागणार नाहीं. युरोपांत लहान लहान देश विभक्त आहेत आणि कापाकापी करीत आहेत. तसें जर भारताचें व्हावयास नको असेल, तर भारतानें जपलें पाहिजे. आणि एकत्र कुटुंबांत दुसऱ्याचें सुखदुःख आधीं पहावयाचें. आधीं माझें नाहीं, आधीं तुझें, हें जसें करावें लागतें, तसेंच आपणांस भारतीय संसारांत करावें लागेल. महाराष्ट्रीयानें गुजराथला म्हणावें, "धन्य गुजराथ ! महात्माजींस जन्म देणारा गुजराथ धन्य होय." गुजराथनें महाराष्ट्रास म्हणावें, "धन्य महाराष्ट्र ! लोकमान्यांना जन्म देणारा, छत्रपति शिवाजीस जन्म देणारा, शूरांचा महाराष्ट्र, धन्य आहे !" बंगालला म्हणावें, "बा वंग देशा ! कृतार्थ आहेस तूं. जगदीशचंद्र, प्रफुल्लचंद्र, रवींद्र, यांना जन्म देणाऱ्या ! देशबंधु, सुभाषबाबू यांना जन्म देणाऱ्या ! श्रीरामकृष्ण व विवेकानंद यांना प्रसवणाऱ्या ! बलिदान देणाऱ्या शेंकडों सत्पुत्रांनीं शोभणाऱ्या ! धन्य आहे तुझी !" पंजाबला म्हणावें, "हे पंजाबा ! दयानंदांची तूं कर्मभूमि ! स्वामी रामतीर्थांची जन्मभूमि ! श्रद्धानंद, लालाजी, भगतसिंग यांची तूं माता ! थोर आहेस तूं." सरहद्द प्रांताला म्हणावें, "पंचवीस लाख लोकांतून सोळा हजार सत्याग्रही देणाऱ्या तेजस्वी प्रांता ! धन्य आहे तुझी ! देवाचे सैनिक देणाऱ्या प्रांता ! तूं भारताची शोभा व आशा आहेस !" अशा रीतीनें सारे प्रांत परस्परांची मुक्तकंठानें स्तुति करीत आहेत, एकमेकांचा गौरव करीत आहेत, एकमेकांचा प्रकाश घेत आहेत, एकमेकांपासून स्फूर्ति घेत आहेत, एकमेकांचे हात हातांत घेत आहेत, असा देखावा या भारतांत दिसला पाहिजे. परंतु याला मोठें मन हवें. याला संयम हवा. स्वतःचा अहंकार दूर राखावयास हवा.

जो दुसऱ्याच्या सुखदुःखांचा विचार करूं लागला, त्याला संयम सुलभ वाटतो. मीं असें केलें तर त्याला काय वाटेल, मीं असें बोललों तर त्याचा काय परिणाम होईल, असें लिहिल्यानें व्यर्थ मनें तर नाहीं ना दुखवलीं जाणार, जोरानें पाय आपटीत गेलों तर कोणाची झोप नाहीं ना मोडणार, रात्रीं रस्त्यानें मोठ्यानें चर्चा

करीत वा गाणीं गात गेलों तर कोणास त्रास नाहीं ना होणार, सभास्थानीं आपण आपसांत चर्चा करूं लागलों तर व्याख्यान ऐकून घेण्यास इतरांस अडचण तर नाहीं ना होणार, एक का दोन, शेंकडों बारीकसारीक गोष्टींच्या वेळीं दुसऱ्यांची आठवण झाली पाहिजे. परंतु आपल्या देशांत ही संवयच नाहीं. दुसऱ्याचा विचार क्षणभरहि आपल्या मनांत डोकावत नाहीं. कारण सहानुभूति कमी. जेथें सहानुभूति नाहीं, तेथें संयम नाहीं.

दुसऱ्याला आपल्या कृत्यापासून उगीच त्रास होईल ही भावनाच आपल्या लोकांच्या मनांतून गेली आहे. जणुं मीच काय तो एकटा जिवंत आहें, आजुबाजूस कोणी नाहीं, या भावनेनें आपण वागत असतों. पाश्चिमात्य देशांत ही वस्तु नाहीं. पाश्चिमात्य देशांत त्यांच्या सार्वजनिक जीवनांत संयम अधिक आहे. रस्त्यांतून उगीच गोंगाट करणार नाहींत. दुसऱ्याला त्रास होईल असें कांहीं करणार नाहींत. सर्वत्र व्यवस्थितपणा आढळेल. संयमाशिवाय व्यवस्थितपणा येत नसतो. जेथें संयम नाहीं तेथें सारी बजबजपुरीच! आपल्या सभा पहा, आपल्या मिरवणुकी पहा, स्टेशनवर तिकिटाच्या तेथें पहा. सर्वत्र संयमहीन जीवन आढळेल. आणि कोणीं संयम सुचविला तर त्याचीच टर उडविण्यांत येते! "अहो, जरा हळू बोला," असें कोणास सुचविलें तर "गप्प बसा, मोठे आलेत शिष्ट," असे पुणेरी जोडे एकदम मिळावयाचे!

एकादा शब्द आपण एकदम बोलतों आणि कायमचीं मनें तोडलीं जातात. एकादें भरमसाट विधान करतों आणि कायमचीं वैरें उत्पन्न होतात. आणि एकदां तुटलेलीं मनें जोडणें कठिण आहे.

**फुटलें मोतीं तुटलें मन। सांधूं न शके विधाता ॥**

जगांत जोडणें कठिण आहे. तोडणें सोपें आहे. वृक्ष वाढविणें कठिण आहे. परंतु त्याला एका क्षणांत तोडून टाकतां येतें. घर बांधणें कठिण, पाडणें सोपें. आपणांस जीवनें जोडावयाचीं आहेत. तीं संयमानेंच जोडतां येतील.

आपण रेड्याला कमी मानतों. कारण तो संयमी नाहीं. तो सारखींच शिंगें उगारतो, सारखेच डोळे वटारतो. आपण त्या पशूंना किंमत देतों, जे संयमी आहेत, जे लगाम घालून घेतात, गाडीला नीट चालतात, नांगर नीट ओढतात. जो घोडा लगाम घालून घेणार नाहीं, त्याला कोण जवळ करील? त्याला कोण किंमत मोजील? पशूला चामड्याचा लगाम घालावा लागतो, परंतु माणसाला कांहीं



असले लगाम घालावयाचे नाहींत. बुद्धि हा माणसाचा लगाम आहे. मनुष्य हा विचारानें वागतो. जो विचारानें वागणार नाहीं तो मनुष्य नाहीं. संयमी असणें ही मनुष्यत्वाची पहिली खूण आहे. परंतु ही खूण कितीजणांजवळ आपणांस आढळेल? आज जगांत माणसें वृकव्याघ्रासारखींच वागत आहेत! परस्परांस खावयास उठलीं आहेत! स्वतःस उच्च समजून दुसऱ्यांस तुच्छ लेखीत आहेत! संयमाचा संपूर्ण अभाव सर्वत्र दिसत आहे.

दोन दगड एकत्र जोडण्यास सिमेंट लागतें. संयमाचें सिमेंट जर असेल, तरच जीवनें जोडलीं जातील. प्रांत प्रांतास, राष्ट्र राष्ट्रास जोडलें जाईल. परंतु अहंकार जर असेल तर हें साधणार नाहीं. एकाद्या प्रांताला उज्ज्वल भूतकाळ असतो. परंतु त्या उज्ज्वल भूतकाळाच्या अहंकारानें आपण इतरांस जर पदोपदीं तुच्छ मानूं लागलों तर काय फायदा? अशा वेळेस उज्ज्वल भूतकाळ नसता तर बरें, असें वाटूं लागतें. ज्या इतिहासामुळें मी घमेंडखोर बनतों, मीच शहाणा व बाकी दगड असें मला वाटतें, तो इतिहास नसलेला पत्करला. मला भूतकाळच्या इतिहासापासून स्फूर्ति मिळावी, परंतु ती शेजारच्या भावास हिणविण्यासाठीं नसावी. महाराष्ट्रानें ही गोष्ट ध्यानांत धरली पाहिजे.

संयम म्हणजे शरणता नव्हे, संयम म्हणजे नेभळटपणा नव्हे. संयम म्हणजे सामर्थ्य आहे. जीवनाच्या विकासासाठीं तो आहे. कर्म उत्कृष्ट व्हावें म्हणून तो आहे. सेवा उदंड हातून व्हावी म्हणून तो आहे. समाजांत आनंद अधिक यावा, संगीत अधिक यावें, म्हणून तो आहे. संयम ही सार्वभौम वस्तु आहे!

## कर्मफलत्याग : : १०

श्रीगीतेनें कर्मफलत्याग शिकविला आहे. ज्ञानविज्ञानपूर्वक निष्ठेनें व जिव्हाळ्यानें स्ववर्णानुसार म्हणजे स्वतःच्या आवडीचें सेवाकर्म करावयाचें. तें कर्म उत्कृष्टपणें पार पाडतां यावें म्हणून जीवन संयत करावयाचें. आहार-विहार नियमित करावयाचे. शरीर आणि मन प्रसन्न व निरोगी राखावयाचीं. अशा रीतीनें जीवन सार्थकीं लावावयाचें. सेवाकर्म करीत करीत, उत्तरोत्तर अधिकाधिक तन्मयतेनें करीत करीत, एक दिवस सर्व सृष्टीशीं सख्य जोडावयाचें. मन भेदातीत करून केवळ चिन्मयाच्या साम्राज्यांत रमावयाचें.

परंतु हें सर्व साधावयास आणखी एक वस्तु पाहिजे. आणखी एक दृष्टि पाहिजे. ती दृष्टि म्हणजे फळाची आशा करीत न बसणें. कर्मांतच इतकें रमावयाचें, कीं फलाचा विचार करावयास अवसरच नाहीं. कर्ममयच जीवन. "देवचि खावा, देवचि प्यावा" असें जनाबाई म्हणे. देव म्हणजे आपलें ध्येय. आपलें सेवाकर्म. हें सेवाकर्मच खावयाचें, सेवाकर्मच प्यावयाचें. याचा अर्थ खातांनाहि कर्माचाच विचार, पितांनाहि कर्माचाच विचार. झोंपेंतहि कर्माचेंच चिंतन. महात्माजी मागें एकदां म्हणाले होते, "मला हरिजनांच्या सेवेचींच स्वप्नें पडतात. मंदिरें उघडताहेत असें दिसतें." रामतीर्थांना झोंपेंत गणितांचीं कूटें सुटत. अर्जुनाची गोष्ट अशीच सांगतात. अर्जुनावर श्रीकृष्णाचें प्रेम फार म्हणून उद्धव अर्जुनाचा हेवा करी. श्रीकृष्णाच्या ध्यानांत तें आलें. श्रीकृष्ण उद्धवाला म्हणाला, "उद्धवा! अर्जुन काय करतो आहे तें बघून ये." उद्धव निघाला. अर्जुन खोलींत गाढ झोंपला होता; परंतु तेथें 'कृष्ण कृष्ण' असा मंजुळ ध्वनि ऐकूं येत होता. तो आवाज कोठून येत होता? उद्धव पाहूं लागला, शोधूं लागला. तो अर्जुनाच्या जवळ गेला. त्याला काय दिसलें? अर्जुनाच्या रोमरोमांतून 'कृष्ण कृष्ण' असा ध्वनि येत होता. कृष्णाचें प्रेम अर्जुनाच्या जीवनांत ओतप्रोत भरलें होतें. नानकानें म्हटलें आहे, "देवा! तुझें स्मरण श्वासोच्छ्वासाप्रमाणें होऊं दे." देवाच्या स्मरणाशिवाय जीवन असह्य होऊं दे. त्याचें स्मरण म्हणजे जीवन, त्याचें विस्मरण म्हणजे मरण. त्याचें स्मरण म्हणजे सकल सुख, त्याचें विस्मरण म्हणजे परम दुःख.

"विपद् विस्मरणं विष्णोः संपन्नारायणस्मृतिः"

आणि देवाचें स्मरण म्हणजे ध्येयाचें स्मरण. स्वकर्माचें, स्वधर्माचें स्मरण. ज्याच्यासाठीं जगावेसें वाटतें, ज्याच्यासाठीं मरावेसें वाटतें, तें आपलें दैवत. तो आपला देव. त्याच्या चिंतनांत सदैव रमणें म्हणजेच परमसिद्धि.

मनुष्य स्वकर्मांत इतका कधीं रंगेल? ज्या वेळेस त्या कर्मापासून मिळणाऱ्या फलाला विसरेल तेव्हांच. लहान मूल असतें. तें आंब्याची बाठ घेऊन जमिनींत पुरतें. दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून ती बाठ तें मूल पुन्हां उकरून पाहतें. अंकुर फुटला आहे कीं नाहीं तें पाहण्याची त्यास उत्कंठा असते. परंतु जर ती बाठ घटकेघटकेला अशी उकरून पाहण्यांत आली, तर तिला कधींहि अंकुर फुटणार नाहीं, कधींहि मोहोर येणार नाहीं, रसाळ फळें लागणार नाहींत. याच्या उलट,



त्या बाठीला जर रोज पाणी घालण्यांत आलें, खत घालण्यांत आलें, बकरीनें पानें खाऊं नयेत म्हणून कुंपण करण्यांत आलें, आणि अशा रीतीनें त्या आम्रसंवर्धनाच्या कर्मांतच जर मनुष्य रमला, तर वर एके दिवशीं रसाळ फळें डोलल्याशिवाय राहणार नाहींत.

मनुष्याचा खरा आनंद फळांत नसून कर्मांतच आहे, असें खोल पाहिलें तर दिसेल. आपले हातपाय, आपलें हृदय, आपली बुद्धि हीं सदैव सेवाकर्मांत रंगलेलीं असण्यांतच आनंद आहे. इंग्लंडमधील प्रख्यात इतिहासकार गिबन ज्या मध्यरात्रीं त्याचा तो प्रचंड इतिहास लिहून संपला, त्या वेळेस रडला. बारा वाजून गेले होते. प्रशांत रात्र होती. शेवटचें वाक्य लिहून झालें. पंचवीस वर्षें तो उद्योग गिबनचा चालला होता. प्रत्येक क्षण आनंदांत गेला. परंतु तो इतिहास संपतांच त्याला वाईट वाटलें. तो म्हणाला, "आतां उद्यां काय करूं? उद्यां कोठला आनंद? आतां काय वाचूं? काय लिहूं?" तें कर्म करण्यांतच त्याचा आनंद होता.

मुलें खेळतात. खेळतांना आपणांस इतका व्यायाम होईल, आपलें शरीर असें सुधारेल, वगैरे विचार त्यांच्या मनांत नसतात. हे विचार मनांत आणून मुलें खेळतील, तर खेळाचा आनंद त्यांना लुटतां येणार नाहीं. आट्यापाट्या खेळतांना माझ्या मांड्यांना आतां व्यायाम होत आहे असा का विचार करून खेळाडू खेळेल? असा विचार करून त्याला कोंडी फोडतां येणार नाहीं, मुलें खेळासाठीं म्हणून खेळतात. त्यानें मिळणारें जें व्यायामाचें फळ, त्या फळाकडे खेळतांना त्यांचें लक्ष नसतें.

याचा अर्थ असा नाहीं, कीं खेळ खेळणाऱ्याला व्यायामाचें फळ मिळत नाहीं. त्याची प्रकृति निरोगी राहते. तो आनंदी राहतो. तो मनमोकळा होतो. कितीतरी फळें त्याला मिळतात. खेळ खेळावयास जाण्यापूर्वी, खेळाला आरंभ करण्यापूर्वी, व्यायामाचा विचार त्याच्या मनांत असतो. मी जर रोज खेळत जाईन, तर माझी प्रकृति निकोप राहील असें तो ठरवितो. फळाचा विचार प्रथम मनांत असतो. परंतु एकदां कर्म सुरू झालें म्हणजे त्या फळाचा विसर पडला पाहिजे. तें कर्मच धर्म वाटला पाहिजे. ती साधनाच साध्यरूप वाटली पाहिजे. प्रत्येक प्रयत्न म्हणजे कर्मसिद्धि आहे, प्रत्येक धांव म्हणजे विजय आहे, प्रत्येक टाकलेलें पाऊल म्हणजे ध्येयप्राप्ति आहे, असें वाटलें पाहिजे. प्रयत्न म्हणजेच सिद्धि.

बेलदार मोगरी हातांत घेऊन दगड फोडीत असतो. समजा, दहा घावांनीं दगड फुटला नाहीं, आणि अकराव्या घावास तो फुटला, तर ते पहिले घाव फुकट का गेले ? प्रत्येक घाव त्या दगडांतील अणूंना आघात करीतच होता. ते अणू अलग केले जात होते. प्रत्येक घाव ध्येयाकडेच नेत होता.

कर्म उत्कृष्ट व्हावें म्हणूनच कर्मफलत्यागाची जरुरी आहे. फळाचें सतत चिंतन करणाऱ्यापेक्षां, कर्मांतच जो रमला, त्याला अधिक थोर फळ मिळेल. कारण पदोपदीं फळाचें चिंतन करणाऱ्याचा पुष्कळसा वेळ चिंतनांतच जातो. पाऊस नाहीं पडला तर, भाव नीट नाहीं आला तर, उंदीर लागला तर, अशी पदोपदीं जो शेतकरी काळजी आणि विवंचना करीत बसेल, फळाविषयीं विचार करीत बसेल, त्याच्या हातांत भरपूर उत्साह राहणार नाहीं; त्याच्या मनांत अनंत आशा उरणार नाहीं; त्याचें कर्म उत्कृष्ट होणार नाहीं. ह्याच्या उलट, जो शेतकरी कर्मांतच रंगला आहे, खत घालीत आहे, पाणी घालीत आहे, निंदणी करीत आहे, दुसरा विचार करावयास ज्याला वेळच नाहीं, त्याला अधिक उत्कृष्ट फळ मिळेल यांत शंका नाहीं.

कमळ असतें ना, त्याची गोष्ट रामकृष्ण परमहंस नेहमीं सांगावयाचे. कमळाला फुलावयाचें असतें. रात्रंदिवस चिखलांत पाय रोंवून तें धडपडतें. सूर्याकडे तोंड करून फुलूं पहात असतें. त्या कमळाची साधना सारखी अखंड सुरू असते. स्वतःचें फुलणें तें विसरून जातें. फळाला जणुं विसरून जातें. थंडी, ऊन, वारा, पाऊस, चिखल यांत राहून धडपडत असतें. परंतु एक दिवस उजाडतो. तें कमळ मंद-मधुर फुलतें. सूर्याचे किरण त्याला चुंबितात. वारे त्याला आंदुळतात, गाणीं म्हणतात. आपण फुललों आहोंत, याचें भान त्या कमळाला जणुं नसतें. सुगंधानें, पावित्र्यानें, मकरंदानें मी भरून राहिलों आहें, याची जाणीव त्याला नसते. शेवटीं भ्रमर गुं गुं करीत येतो. त्या कमळाभोंवतीं प्रदक्षिणा घालतो. त्या कमळाच्या अंतरंगांत तो शिरतो व सांगतो, " पवित्र कमळा ! तूं फुलला आहेस. किती गंध, कसा रंग, किती गोड रस ! "

मनुष्याचें असेंच झालें पाहिजे. फळाचा विसर पडला पाहिजे. फळ पायाशीं येऊन पडलें तरीहि तिकडे दृष्टि जातां कामा नये. ध्रुवाच्या डोळ्यांसमोर प्रत्यक्ष नारायण येऊन उभा राहिला, तरी त्याचे डोळे मिटलेलेच. नारायणाच्या चिंतनांतच तो तल्लीन झाला होता. इतकी समरसता साधनेंत होणें ही महत्त्वाची वस्तु आहे.



भारतीय संस्कृति साधना शिकविते. अधीर होऊं नका, उल्लू होऊं नका, फळासाठीं लालचावलेले होऊं नका, घायकुतीस येऊं नका. महान् फळें चुटकी-सरशीं मिळत नाहींत. अनंत साधना व अखंड अविरत श्रम त्यासाठीं लागतात. वडाचें प्रचंड झाड दोन दिवसांत वाढत नाहीं. मेथीची भाजी दोन दिवसांत वाढते, चार दिवसांत सुकते. परंतु वडाचें झाड एकदां उभें राहिलें, म्हणजे हजारोंना छाया देतें. त्याच्या शाखा आकाशाला कवटाळायला जातात. त्याचें शिर गगनाला भिडतें, त्याचीं मुळें पाताळगंगेची भेट घेतात. परंतु असा हा स्पृहणीय व महनीय पसारा, हें महान् वैभव प्राप्त व्हावयास दगडांधोंड्यांतून मुळें रोंवीत रोंवीत कित्येक वर्षें त्या वटवृक्षाला धडपडावें लागतें.

विनता व कद्रू यांची गोष्ट सुप्रसिद्ध आहे. कद्रूला एक हजार सर्पबाळें होतांच विनता अधीर झाली. तिनें एक अंडें फोडलें. परंतु तें परिपक्व नव्हतें. त्यांतून लुळापांगळा अरुण बाहेर पडला. विनता कष्टी झाली. तिच्या उतावीळपणाचें बक्षिस तिला मिळालें. परंतु ती अनुभवानें शहाणी झाली. दुसरें अंडें तिनें फोडलें नाहीं. एक हजार वर्षें ती थांबली आणि मग एक हजार वर्षांनंतर त्या अंड्यांतून पक्षिराजा गरुड बाहेर पडला. भगवान् विष्णूचें तो वाहन झाला.

तुमच्या कर्मांतून दुबळीं फळें मिळावयास नको असतील व अशीं भव्यदिव्य फळें पाहिजे असतील तर शेंकडों वर्षें श्रमावें लागेल, साधना करावी लागेल. भारतीय संस्कृतीचे उपासक आज साधना विसरले आहेत. त्यांना चुटकीसरशीं फळें हवीं असतात. पटकन् स्वातंत्र्य हवें आहे. परंतु लाखों खेड्यापाड्यांत जाऊन वर्षानुवर्ष साधना करावयास नको आहे. क्रांति क्षणांत होत नसते. राष्ट्रीय शिक्षणाचे महान् आचार्य विजापूरकर एकदां म्हणाले, " इंग्रजांना राज्य घ्यावयास दीडशें वर्षें लागलीं. त्यांना घालवावयास तीनशें लागतील, अशा आशेनें सारखें धडपडलें पाहिजे."

कर्मफलत्यागी मनुष्य कधीं निराश होत नाहीं. कारण फळाकडे त्याचे डोळेच नाहींत. जो सारखें फळाचें चिंतन करील, तो कष्टी होईल, निराश होईल. भगवान् बुद्ध एकेक गुण अंगीं येण्यासाठीं एकेक जन्म घेत होते. जीवनाची परिपूर्णता गांठावयास त्यांना शेंकडों जन्म घ्यावे लागले.

एकदां दोन साधक तपश्चर्या करीत होते. देव भेटावा अशी त्यांना इच्छा होती. देवदूत प्रथम एकाकडे आला व म्हणाला, " काय रे, देव कधीं भेटावा

असें तुला वाटतें ? " तो म्हणाला, " या क्षणीं; मी अगदीं अधीर झालों आहें." देवदूत म्हणाला, " तुला हजारों वर्षें झालीं तरी तो भेटणार नाहीं." देवदूत दुसऱ्याकडे गेला. त्यालाहि तोच प्रश्न त्यानें विचारला. तो साधक म्हणाला, " किती वर्षांनीं तो भेटूं शकेल ? " देवदूत म्हणाला, " दशसहस्र वर्षांनीं." साधक सद्गदित होऊन म्हणाला, " काय इतक्या लौकर देव मला भेटेल ? देवाची प्राप्ति व्हावयास कोट्यवधि वर्षें लागतात. मला खरेंच का इतक्या लौकर तो मिळेल ? " इतक्यांत परमेश्वर तेथें आला व म्हणाला, " मी आत्तांच तुला भेटतों, तुझ्या हृदयमंदिरांत येऊन राहतों."

देवाची प्राप्ति व्हावयास कितीहि साधना केली तरी ती थोडीच आहे. ध्येयप्राप्तीसाठीं अशी ही अमर आशा हवी. प्रयत्नांचा, कष्टांचा, उद्योगांचा कंटाळा येतां कामा नये. उत्तरोत्तर अधिकच उत्कट कर्म होऊं लागलें पाहिजे. जो हजारों वर्षें श्रमावयास तयार आहे, त्याला या घटकेला फळ मिळेल.

परंतु स्वतःच्या मनाचें समाधान हें फळ तर सारखें मिळतच असतें. मी माझी पराकाष्ठा करीत आहें, कष्टांची शर्थ करीत आहें, हें माझें आंतरिक समाधान कोण हिरावून नेणार ? आपणांस हा देह, ही बुद्धि, हें हृदय यांची जोड मिळाली आहे. देवानें हें भांडवल आधींच दिलें आहे. हें जें मिळालें आहे, त्याचे उतराई होण्यासाठीं म्हणून सेवा केली पाहिजे. समाज आपणांस अपरंपार देत आहे. सृष्टि देत आहे. त्यांचें अनृणी होण्यासाठीं म्हणून सदैव झिजणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे.

आणि फळ आपणांस न मिळालें तरी समाज अमर आहे. व्यक्ती जातात, परंतु समाज चिरंतन आहे; कार्य करणारे जातात, परंतु कार्य उरतेंच. तें कार्य पुरें करावयास समाज आहेच. माझें पडलेलें काम दुसरा कोणी उचलील. मीं लावलेल्या झाडाला दुसरा कोणी पाणी घालील. माझ्या श्रमाचें फळ कोणाला तरी मिळेलच; आणि ज्या कोणाला मिळेल, तो माझाच आहे. त्याच्यांत व माझ्यांत भेद आहे कोठें ?

आपल्या संस्कृतींत अदृष्ट फळाची एक गोड कल्पना आहे. उथळ बुद्धीचे लोक या कल्पनेची टर उडवितात. परंतु या कल्पनेचा जसजसा विचार करावा, तसतसा आनंद होतो. तुझ्या प्रयत्नांना फळ लागेल; परंतु तें तुला प्रत्यक्ष दिसणार नाहीं, तुझ्या कल्पनेच्या दिव्य चक्षूंना तें दिसेल. न दिसणारें फळ



तुला मिळेलच मिळेल. हिंदुस्थानांत स्वराज्यासाठीं किती तरी मोठमोठीं माणसें आमरण कष्ट करून निघून गेलीं. त्यांच्या प्रयत्नांचें फळ त्यांना मिळालें नाहीं. परंतु अदृष्ट फळ त्यांना मिळतच होतें. न्यायमूर्ति रानडे एकदां म्हणाले, " तो पहा सुखी, समृद्ध हिंदुस्थान मला दिसत आहे. ही देवांची आवडती भूमि स्वतंत्र व मुक्त अशी मला दिसत आहे. रोग-दुष्काळ नाहीं, अज्ञान नाहीं, रूढि नाहीं, भांडण नाहीं, तंटा नाहीं, द्वेष नाहीं, मत्सर नाहीं; साऱ्या जाती, सारे धर्म परस्परांशीं गुण्यागोविंदानें वागत आहेत, सर्वांना अन्न आहे, वस्त्र आहे, रहावयाला घरदार आहे. असा तो हिंदुस्थान मला दिसत आहे." न्यायमूर्तींच्या विशाल दृष्टीला—शास्त्रपूत व श्रद्धापूत दृष्टीला—तें अदृष्ट फळ दिसत होतें. मनुष्याला त्याच्या श्रमांचें अदृष्ट फळ मिळेल. म्हणजे त्याचे श्रम फुकट जाणार नाहींत. जगांत कांहींहि फुकट जात नाहीं.

अदृष्ट फळ याचा दुसराहि एक अर्थ आहे. नदी वाहत असते. कितीतरी तरुवेलींना ती ओलावा देत असते. परंतु तिला तें माहीत नसतें. कितीतरी जलचरांना तिनें पोटाशीं धरलेलें असतें, परंतु त्याची तिला जाणीव नसते. आपण किती जमीन सुपीक व समृद्ध केली, याची तिला जाणीव नसते. किती विहिरींना आपल्यामुळें पाण्याचा पुरवठा झाला, हें तिला माहीत नसतें. नदी वाहत असते. रात्रंदिवस कर्म करीत असते. ओलावा देत असते. परंतु हा ओलावा कोठें, कोणाला, किती मिळाला हें तिला काय ठावें ? तें फळ तिला माहीत नाहीं. तिला दिसत नाहीं. परंतु तिच्या नांवावर तें जमा आहे. तिच्या कर्माला लागलेलीं तीं अनंत फळें आहेत.

आपण किती ठिकाणचा अंधार दूर केला हें सूर्यास माहीत नसतें. त्याला जर आपण म्हटलें " भगवान् सूर्यनारायणा ! केवढा तुझा उपकार ! तूं सारा अंधार दूर केलास. " सूर्य म्हणेल, " कोठला अंधार मीं दूर केला ? मला आणून दाखवा चिमूटभर. मीं अंधार पाहिला नाहीं, मग दूर कोठून करूं ? मला प्रकाशणें माहीत. रात्रंदिवस जळत राहणें एवढें मला माहीत."

सूर्यानें आपल्या जीवनाचें यज्ञकुंड सतत पेटत ठेविलें आहे. परंतु त्याला त्या कर्माचें फळ मिळत का नाहीं ? सूर्याच्या उष्णतेमुळें प्राणिमात्र जगत आहेत. फुलेंफळें उत्पन्न होत आहेत. वृक्षवनस्पती वाढत आहेत. सर्व विश्वाचा कारभार चालला आहे. सर्व जगाचा तो आत्मा आहे.

"सूर्य आत्मा जगतस्तस्थुषश्च"

या स्थिरचर सृष्टीचा तो प्राणदाता आहे. सूर्याला ह्या महान् फळाची वार्ताहि नाहीं. परंतु हें अदृष्ट फळ त्याला मिळतच आहे.

बाहेर सुंदर सुगंधी फूल फुलतें. कितीतरी मानवांच्या जीवनांत त्या फुलाच्या दर्शनानें आनंद उत्पन्न होत असतो. परंतु फुलाला त्याची कोठें कल्पना आहे? वाऱ्याबरोबर त्या फुलाचा परिमळ आसमंतात् पसरतो व लोकांना सुख होतें. आजाऱ्याला प्रसन्न वाटतें. मधमाशा, फुलपांखरें, भुंगे फुलाशीं येतात, त्याला लुटतात, त्याच्याजवळ गुजगोष्टी करितात. फुलाला त्याची स्मृति नाहीं. त्यानें आपलें जीवन फुलवून ठेवलें आहे. परंतु हजारों जीवांना आनंद दिल्याचें, त्याला माहीत नसलेलें तें अदृष्ट फळ त्याला मिळतच असतें.

लहान मूल हंसतें, खेळतें. जगूं का मरूं अशा स्थितींत असणाऱ्या टेनिसनला फुलें व मुलें पाहून आशा मिळते. त्या मुलाला काय माहीत, कीं हें हास्य निराश व निरानंद जीवनांत सुधासिंधु ओतीत आहे! आपल्या आईबापांना, भावा-बहिणींना, शेजाऱ्यापाजाऱ्यांना आपल्यामुळें सुखसमाधान मिळत आहे हें त्या मुलाला ठाऊक नसतें. परंतु तें अदृष्ट फळ त्याला मिळत असतें.

आपण खादी विकत घेतली. त्यामुळें कोणत्या खेड्यांत, कोणत्या उपास काढणाऱ्या कुटुंबाला दोन घांस मिळाले, तें आपणांस माहीत नसतें. परंतु आपणांस माहीत नसलें, तरी तिकडे दोन जीव सुखी झाले ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. चिंचेचा पाला शिजवून खाणारे लोक भाकर खाऊं लागले हें खरें आहे. मला दिसो वा न दिसो, तें अदृष्ट फळ मला मिळालेंच आहे.

मनुष्यानें सेवा करीत रहावें. सत्कर्म करीत रहावें. त्यामुळें मनाचें समाधान हें दृष्ट फळ तर त्याला पदोपदीं आहेच. परंतु समाजाला आनंद देण्याचें अदृष्ट फळहि त्याला मिळत असतें. या जगांत जर कांहींच फुकट जात नाहीं, तर सत्कर्म तरी फुकट कसें जाणार? घराजवळ घाण केली तर डांस होतात. घराजवळ स्वच्छता ठेवली तर आरोग्य व आनंद नांदेल. वाईट वा चांगलें—दोघांना फळें येतच असतात. कांटे पेराल तर कांटे खाल. गुलाब लावाल तर गुलाब मिळतील. प्रत्येक गोष्टीचा परिणाम स्वतःवर व सभोंवतालच्या सृष्टीवर होत असतो. आकाशांत दूर तारा चमकतो व माझ्या जीवनांत पावित्र्य येतें. ध्रुवतारा दिसतो व माझी नौका सुरक्षित जाते. मनांत आलेल्या भावनांचा व विचारांचाहि जर



परिणाम होतो, तर मग केलेल्या कृतींचा परिणाम कसा होणार नाहीं? हा परिणाम अदृष्ट असेल; परंतु तो होत असतो यांत संशय नाहीं.

केवळ कर्मातच रमून जाणें हें एकदम साधणार नाहीं. मनुष्य प्रथम लोभानें कर्मास प्रवृत्त होतो. आई मुलाला म्हणते, "श्री ग काढ, म्हणजे खारीक देईन." त्या खारकेच्या आशेनें तो पाटी घेतो. वडी मिळेल म्हणून तो शाळेंत जातो. परंतु पुढें विद्येचा आनंद कळतो. विद्येसाठीं म्हणून तो विद्या शिकतो. त्या वेळेस इतर फळें त्याला मिळत नाहींत असें नाहीं. लहानपणीं खारीकच मिळे. परंतु आतां फळाची आशा सोडून विद्येची उपासना करूं लागतांच त्याला मान-सन्मान, कीर्ति, पदव्या सारें मिळतें. त्याला निमंत्रणें येतात, त्याचीं स्वागतें होतात. अनंत फळें त्याच्यापुढें हात जोडून उभीं राहतात. ऋद्धिसिद्धि त्याच्या-भोंवतीं तिष्ठत राहतात. परंतु त्या मानसन्मानांचा त्या विद्यानंद पुरुषास आनंद वाटत नाहीं.

तैं गजबजो लागे कसौ। व्याधें विंधिला मृगू जैसा॥

बाणानें हरिण विद्ध व्हावा, घायाळ व्हावा, त्याप्रमानें मानसन्मानांनीं तो गजबजून जातो, गांगरून जातो.

तुकाराममहाराजांची कीर्ति ऐकून शिवाजीमहाराजांनीं त्यांच्याकडे पालखी वगैरे पाठविली, घोडेस्वार पाठविले. पालखींत घालून तुकारामांना मिरवीत आणावें असें शिवाजीमहाराजांस वाटलें. परंतु तुकाराम कष्टी झाले. आपल्या सत्कर्माला हीं वैभवाचीं लागलेलीं फळें पाहून त्यांना वाईट वाटलें. देवाला म्हणाले, "देवा! ह्या दिवट्या, हे घोडे, ह्या पालख्या, हीं छत्रचामरें, कशाला हें सारें? मला का याची आवड आहे?" तुकारामांना सेवेसाठीं सेवा पाहिजे होती. मोक्षाचें फळहि त्यांना नको होतें. मोक्षावरसुद्धां त्यांनीं लाथ मारली.

"दंभ-कीर्ति-मान। सुखें टाकितों थुंकून॥
जा रे चाळवी बापुडीं। ज्यांना असे त्याची गोडी॥"

असें तुकाराम स्वच्छ सांगत आहेत. "कीर्तीला, मानाला आम्हीं झुगारून दिलें आहे. त्यांच्या पाठीमागें लागून कर्मच्युत होणारीं दीनदुबळीं अहंपूज्य माणसें आम्ही नाहीं. त्या गोष्टींनीं च्युत होणारीं दुसरीं माणसें आहेत."

ही दृष्टि शेवटीं माणसास आली पाहिजे. कर्म म्हणजेच मोक्ष, मोक्ष म्हणजेच संतोष. कर्म म्हणजेच सर्व कांहीं. सत्कर्माची संवय झाली पाहिजे. सूर्याला जळणें

माहीत, मेघाला वर्षणें माहीत, वाऱ्याला वाहणें माहीत, संताला दुसऱ्याचे अश्रू पुसणें माहीत. संवय झाली म्हणजे अहंकार जातो, फलेच्छा मरते. नाक सारखें श्वासोच्छ्वास करीत आहे, म्हणून त्या नाकाचे आपण आभार मानीत नाहीं. नाकालाहि वाटत नाहीं कीं आपण फार मोठें कांहीं करीत आहोंत. तसें आपलें झालें पाहिजे. स्वतःच्या मुलाचा शेंबूड आई जितक्या सहजतेनें, फलविरहित हेतूनें काढते, तितक्याच सहजतेनें शेजारच्या मुलाचा शेंबूड काढण्याची तिच्या हाताला संवय झाली पाहिजे. प्रथम शेजारच्या मुलाचा शेंबूड काढतांना ती आजुबाजूला पाहील. त्या मुलाची माता " हें काय, तुम्हीं कशाला काढलात ?" वगैरे बोलून आपला गौरव करीत आहे कीं नाहीं इकडे तिचें लक्ष असेल. परंतु पुढें पुढें हें सारें नाहींसें झालें पाहिजे. हाताचा तो सहजधर्म झाला पाहिजे.

" मामनुस्मर युद्धय च "

अशी भगवंताची शिकवण आहे. फळ येवो वा न येवो; सत्याची आठवण ठेवून सदैव कर्म करीत रहा. देवाचें स्मरण ठेवून कर्म करावयाचें; परंतु देवाचें स्मरण म्हणजे काय ? सच्चिदानंदाचें स्मरण. माझें कर्म सच्चिदानंदरूपी परमेश्वराचें पूजन करणारें झालें पाहिजे. मांगल्याची पूजा करणारें माझें कर्म आहे कीं नाहीं हें पाहणें म्हणजे सत्स्वरूप पूजणें, सत्स्वरूप स्मरणें; तसेंच माझें कर्म ज्ञानविज्ञान-युक्त आहे कीं नाहीं हें पाहणें म्हणजेच चित्स्वरूपी परमेश्वराचें स्मरण; आणि हें कर्म करतांना माझें हृदय उचंबळत आहे कीं नाहीं, मला अपार आनंद होत आहे कीं नाहीं, हें पाहणें म्हणजे आनंदस्वरूपी परमेश्वराचें स्मरण. कर्मांत समाजाचें मांगल्य हवें, कर्मांत ज्ञान हवें; कर्माचा मला बोजा न वाटतां आनंद वाटायला हवा. याला म्हणतात सच्चिदानंदाची पूजा.

भारतीय संस्कृति व जय वा पराजय, सिद्धि वा असिद्धि, यश वा अपयश यांच्याकडे लक्ष देत नाहीं. समुद्राच्या लाटा वर उसळतात व खालीं पडतात. वर चढत व खालीं पडत समुद्र तीराला गांठतो. समुद्राला भरती येते व ओहोटी येते, परंतु त्याची धीरगंभीर गर्जना कधीं थांबत नाहीं. त्याचें कर्म चाललेंच आहे. जीवन वा मरण, संपत्ति वा विपत्ति, दास्य वा स्वातंत्र्य, जय वा पराजय, इकडे लक्ष न देतां ध्येयाकडे सदैव जावयाचें. चारित्र्य ही मुख्य वस्तु आहे. माझा स्वतःचा विकास ही मुख्य वस्तु आहे. सत्कर्म ही मुख्य वस्तु आहे. तिच्यासाठीं मी आहें. जयापजयाच्या लाटांशीं झुंजत मी पुढें जाईन. जयानें हुरळणार नाहीं, पराजयानें होरपळून जाणार नाहीं. संपत्तींत गर्वांध होणार नाहीं, विपत्तींत निस्तेज होणार नाहीं. मी माझें कर्म हातांत घेऊन पुढें जात राहीन. भारतीय संस्कृति केवळ विजयाचें तत्त्वज्ञान सांगत नाहीं. केवळ विजयावरच जर ती उभारलेली असेल, तर जगांतलि निम्म्या अनुभवांवरच ती उभारलेली आहे असें होईल. सदैव सुखाच्या स्वर्गांत राहशील अशी लालूच भारतीय संस्कृति दाखवीत नाहीं. विजयामुळें उतूंमातूं नकोस, पराजयामुळें कष्टी, हताश होऊं नकोस, हा भारतीय संस्कृतीचा महान् संदेश आहे. जयापजयांना छातीत काटीत आपण पुढें जावयाचें. जयाचे व पराजयाचे साक्षी व्हावयाचें. ख्रिस्तावर क्रॉसवर जाण्याची वेळ आली तरी तो महापुरुष म्हणाला, " प्रभो ! जशी तुझी इच्छा ! " कर्म करीत असतांना फांस मिळो वा सिंहासन मिळो, हार मिळो वा हाल मिळोत, यश मिळो वा अपयश मिळो, माझा आत्मा मलिन होणार नाहीं, अशी खऱ्या कर्मवीराची श्रद्धा असते. अदृष्ट फळ त्याला दिसत असतें. शेवटीं सत्याचा विजय होईल हें त्याच्या दृष्टीला दिसत असतें. विजयाचे नगारे वाजवूं नकोस, पराजयाचीं रडगाणीं गाऊं नकोस. दोहोंच्यावर जाऊन, दोहोंच्यावर स्वार होऊन, निर्द्वंद्व होऊन, सदैव स्वकर्म करीत रहा, त्यांत तन्मय हो; तोच तुझा मोक्ष, तीच पूजा, तोच खरा महान् धर्म, असें भारतीय संस्कृति सांगत आहे. पण कोण ऐकणार ?



## गुरु-शिष्य : : ११

भारतीय संस्कृतींत गुरुभक्ति म्हणचे एक अत्यंत मधुर असें काव्य आहे. ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरीच्या तेराव्या अध्यायांत या गुरुभक्तीचा अपार महिमा गायिला आहे. पुष्कळांना या गुरुभक्तींतील महान् अर्थ समजत नाहीं. दंभाचा पसारा सर्वत्र वाढल्यामुळें, दिखाऊपणाचें स्तोम जिकडे तिकडे माजल्यामुळें थोर गुरुभक्तीचें महान् तत्त्व आज धुळींत पडलें आहे.

गुरु म्हणजे केवळ शिक्षक नव्हे, केवळ आचार्य नव्हे. शिक्षक किंवा आचार्य त्या त्या विशिष्ट ज्ञानाशीं आपला थोडाफार परिचय करून देत असतात. त्यांचा हात धरून आपण ज्ञानाच्या अंगणांत येतों. परंतु गुरु आपणांस ज्ञानाच्या गाभाऱ्यांत घेऊन जातो. त्या त्या ध्येयभूत ज्ञानाशीं गुरु आपणांस एकरूप करून

टाकतो. ज्ञानाशीं तन्मय झालेला गुरु शिष्याचीहि समाधि लावतो. शाळेंत विद्यार्थी प्रश्न विचारतात. परंतु गुरूजवळ फारशीं प्रश्नोत्तरें नसतात. येथें न बोलतां शंका फिटतात. न सांगतां उत्तरें मिळतात. येथें पहावयाचें, ऐकावयाचें. न बोलतां गुरु शिकवतो. न विचारतां शिष्य शिकतो. गुरु म्हणजे उचंबळणारा ज्ञानसागर! सच्छिष्याचा मुखचंद्र पाहून गुरु हेलावत असतो. गीतेमध्यें ज्ञानार्जनाचे प्रकार सांगितले आहेत :

" तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया "

तें ज्ञान प्रणामानें, पुनः पुनः विचारण्यानें, सेवेनें प्राप्त करून घे. शिक्षकांजवळ परिश्रमानें आपण ज्ञान मिळवितों. परंतु गुरूजवळ प्रणाम व सेवा हेच ज्ञानाचे दोन मार्ग असतात. नम्रता हा ज्ञानाचा खरा आरंभ आहे. गुरूजवळ शिष्य रिकामें मन घेऊन जातो. विहिरींत अपरंपार पाणी आहे. परंतु भांडें जर वांकणार नाहीं, तर त्या भांड्यांत त्या अनंत पाण्यांतील एक थेंबहि शिरणार नाहीं. तसेंच ज्ञानाचे जे सागर असतात, त्यांच्याजवळ जोंपर्यंत आपण वांकणार नाहीं, निमूटपणें त्यांच्या चरणांजवळ बसणार नाहीं, तोंपर्यंत ज्ञान आपणांस मिळणार नाहीं. भरण्यासाठीं वांकावयाचें असतें. वाढविण्यासाठीं नमावयाचें असतें.

एकादा संगीत शिकूं पाहणारा मुलगा एकाद्या संगीतशाळेंत जातो. तेथें कांहीं वर्षें तो शिकतो. परंतु संगीताचें खरें ज्ञान त्याला होत नाहीं. संगीताशीं त्याचा परिचय होतो. संगीताचा आत्मा त्याला केव्हां दिसणार? केव्हां समजणार? एकाद्या महान् गायकाच्या संगतींत जेव्हां साधक होऊन तो वर्षानुवर्षें राहील, त्या गुरूची भक्तिप्रेमानें सेवा करील, जेव्हां जेव्हां गुरु राग आळवूं लागेल तेव्हां तेव्हां नम्रपणें सर्व इंद्रियांचे कान करून तो राग तो ऐकेल, तेव्हांच खरी विद्या त्याला प्राप्त होईल. त्याच्या ओबडधोबड विद्येला तेव्हांच सुसंस्कृतता येईल, कळा चढेल.

केवळ विनम्र होऊन येणारा हा जो ज्ञानोपासक शिष्य त्याची जातकुळी गुरु विचारीत नाहीं. तळमळ ही एकच वस्तु गुरु ओळखतो. शत्रूकडचा कचहि प्रेमानें पायांशीं आला, तर शुक्राचार्य त्याला संजीवनी देतील. रिकामा घडा घेऊन गुरूजवळ कोणीहि या व वांका, तुमचा घडा भरून जाईल.

गुरु आपणांस संपूर्ण ज्ञानाची भेट करवितो. त्या त्या ज्ञानप्रांतांतील या क्षणापर्यंतच्या सकल ज्ञानाशीं तो आपली सांगड घालून देतो. सर्व भूतकाळ तो



आपणांस दाखवितो. वर्तमानकाळाची ओळख देतो. भविष्यकाळाची दिशा सांगतो. गुरु म्हणजे आतांपर्यंतचें संपूर्ण ज्ञान.

गुरु म्हणजे एक प्रकारें आपलें ध्येय. आपल्याला ज्या ज्ञानाची तहान आहे, तें ज्ञान अधिक यथार्थपणें ज्याच्या ठिकाणीं आपणांस प्रतीत होतें, तो आपला गुरु होतो. गुरुभक्ति म्हणजे एक प्रकारें ध्येयभक्ति. गुरु या शब्दाऐवजीं ध्येय शब्द योजा. म्हणजे गुरुभक्ति मग वेडगळपणा वाटणार नाहीं. फुललेल्या कमळांतील रस पिण्यासाठीं, रुंजी घालीत, अधीर होऊन ज्याप्रमाणें भुंगा येतो, अलगत त्या कमळाजवळ बसतो, त्या कमळांतील रस पितां पितां तल्लीन होतो, तसेंच सच्छिष्याचें गुरूजवळ होतें. गुरूला तो लुटतो. गुरूला सोडीत नाहीं. गुरूला रिकामें करण्यासाठीं तो तडफडतो. परंतु गुरूला तेव्हांच रितें करतां येईल, जेव्हां शिष्य स्वतः रिकामा असेल. स्वतःच्या जीवनाचें भांडें जितकें मोठें खोल, त्या मानानें गुरूपासून आपणांस घेतां येईल.

समर्थांनीं लिहिलें आहे, " नेणतेपण सोडूं नये. " आपण नेणते आहोंत, आपण अजून रिकामे आहोंत, अजून भरपूर आपणांस शिकावयाचें आहे, असें सदैव वाटलें पाहिजे. आणखी पुढें, आणखी पुढें, असें सदैव म्हटलें पाहिजे. हाच विकासाचा मार्ग आहे. मी सारें समजलों, सारें शिकलों, असें म्हणतांच विकास थांबतो.

ध्येय सदैव वाढतच असतें. ध्येयरूपी गुरु अनंत आहे. त्याची सेवा किती केली तरी ती अपुरीच आहे. जन्मोजन्मीं त्याची भक्ति करावी लागेल, तेव्हां कदाचित् परिपूर्णता लाभेल. न्यूटन म्हणणार, " माझें ज्ञान सिंधूंत बिन्दू आहे." सॉक्रेटिस म्हणणार, " मला कांहीं समजत नाहीं, एवढेंच मला समजलें."

त्या त्या शास्त्रांतील अनंत ज्ञानासाठीं कसें तडफडावें, कसें वेडें व्हावें, हें गुरु शिकवीत असतो. गुरु म्हणजे अनंत ज्ञानाची मूर्ति असें शिष्याला वाटतें. गुरु म्हणजे एक प्रतीक होतें. गुरु म्हणजे मूर्त ज्ञानपिपासा. गुरु म्हणजे अनंत ज्ञानाची तळमळ. गुरु म्हणजे सत्याच्या प्रयोगाची उत्कटता. माझ्या गुरूला आदि नाहीं, अंत नाहीं. माझ्या गुरूला पूर्व नाहीं, पश्चिम नाहीं. माझा गुरु म्हणजे परिपूर्णता.

अशा गुरूला कांहीं द्यावें लागत नाहीं. त्याला कितीहि दिलें तरी तें थोडें

आहे. कितीहि दिलें तरी तें पुष्कळ आहे. मनुस्मृतींत सांगितलें आहे, " अरे, तुझ्याजवळ द्यावयास कांहींच नसेल तर खडावांचा एक जोड दे. एक उदककुंभ भरून दे. एक फूल दे. " शिष्यानें किती दिलें हें पहावयाचें नसतें. जें दिलें त्यांत कृतज्ञतेचा सागर भरलेला असतो. सारें हृदय त्यांत ओतलेलें असतें.

युरोपखंडांत मी अमक्याचा शिष्य, मी अमक्या गुरूच्या पायांशीं बसून शिकलों, असें सांगण्यांत मोठा अभिमान बाळगतात. सॉक्रेटिसाचा शिष्य म्हणवून घेण्यांत प्लेटोला धन्यता वाटे. प्लेटोचा शिष्य म्हणवून घेण्यांत ॲरिस्टॉटलला कृतार्थ वाटे. इब्सेनचा अनुयायी म्हणवून घेण्यांत शॉला मोठेपणा वाटेल, तर मार्क्सचा शिष्य म्हणवून घेण्यांत लेलिनला गौरव वाटला असेल.

आपण कोणाचे तरी आहोंत ही भावना थोर आहे. त्या भावनेंत कृतज्ञता आहे. मी जगांत एकांडा शिलेदार नाहीं. जगांत सहकार्य आहे. त्याचा मला आधार, माझा पुढच्याला आधार. जगांत कोणीहि संपूर्ण स्वतंत्रपणें सर्व ज्ञान शोधून काढलें आहे असें नाहीं. प्रत्येकजण पूर्वींच्या लोकांच्या खांद्यांवर उभा राहतो व आणखी दूरचें पाहतो. ज्ञानाचा इतिहास म्हणजे सहकार्याचा इतिहास, अखंड परंपरेचा इतिहास.

खरा गुरु आपल्यापुढें जाणाऱ्या शिष्याचें कौतुकच करतो. शिष्याकडून पराजय होण्यांत गुरूला अपार आनंद होतो. कारण शिष्याचा विजय हा गुरूचाच विजय असतो. गुरूनें जें पेरलें त्याचाच तो विकास असतो. गुरु ज्या ज्ञानाची उपासना करीत होता, त्या ज्ञानाचीच ती पूजा असते. त्या ज्ञानाचेंच तें वाढतें वैभव असतें. अण्णासाहेब पटवर्धन लोकमान्यांना शत आशीर्वाद देत व गोखले गांधींचीं स्तुतिस्तोत्रें गात.

गुरु स्वतःचें सारें ज्ञान शिष्याला देतो. त्याच्यापासून तो कांहीं लपवून ठेवीत नाहीं. स्वतःचें महत्त्व कमी होईल म्हणून स्वतःजवळची सर्व ज्ञानपुंजी न देणारे अहंभावी गुरू पुष्कळ असतात. परंतु ते गुरू नव्हत. त्यांचें ज्ञान त्यांच्याबरोबर मरतें. ज्या ज्ञानाची आपण उपासना केली, तें मरावें असें कोणास वाटेल ? खऱ्या गुरूला ज्ञानाचा वृक्ष वाढत जावा असें वाटत असतें. ज्ञानरूपानें गुरु अमर होत असतो. मिळविलेलें देऊन टाकावयाचें. एके दिवशीं श्रीरामकृष्ण परमहंस विवेकानंदांना म्हणाले, " मी सारें तुला आज देऊन टाकतों. माझी सारी साधना



आज तुझ्यांत ओततों. " केवढा दिव्य तो क्षण असेल ! शिष्याला स्वतःच्या जीवनांतील सारें अर्पण करणें !

गुरु म्हणजे विशिष्ट ज्ञानाचें प्रतीक. गुरूच्या विचारांतील किंवा सिद्धान्तांतील कांहीं चूक शिष्याला आढळली, तर ती चूक सच्छिष्य लपवणार नाहीं. गुरूनें दिलेलें ज्ञान अधिक निर्दोष करणें म्हणजेच गुरुपूजा. गुरूच्या चुका उराशीं धरावयाच्या नाहींत. तो गुरूचा अपमान होईल. ज्ञानाची पूजा म्हणजेच गुरुभक्ति. गुरु जिवंत असता तर ती चूक दाखविल्याबद्दल गुरु रागावला नसता. उलट, त्यानें शिष्याला पोटाशीं धरलें असतें, त्याचें कौतुक केलें असतें.

गुरूची आंधळी भक्ति गुरूला आवडत नाहीं. गुरूचे सिद्धान्त पुढें नेणें, गुरूचे प्रयोग आणखी चालविणें यांतच खरी सेवा आहे. निर्भयपणें परंतु नम्रपणें ज्ञानाची उपसना करीत रहाणें यांत गुरुभक्ति आहे. एका दृष्टीनें सारा भूतकाळ हा आपला गुरु आहे. सारे पूर्वज आपले गुरू आहेत. परंतु भूतकाळांतील कांहीं गोष्टी आतां चुकीच्या वाटल्या, तर त्या दूर न करणें म्हणजे भूतकाळाचा अपमान आहे. भूतकाळांतील भ्रामक गोष्टी जर तशाच पुढें चालवूं तर तें उचित नाहीं. तो भूतकाळाचा गौरव नाहीं. तो पूर्वजांचा गौरव नाहीं. उलट, त्या थोर पूर्वजांना तो उपमर्द वाटेल.

आपणांस प्रिय व पूज्य असें कुटुंबांतील कर्तें माणूस जर मेलें, तर आपणांस वाईट वाटतें. परंतु त्या मृतास मोहानें कवटाळीत का आपण बसणार ? शेवटीं त्या प्रिय परंतु मृत माणसाचें प्रेत आपणांस अग्नीच्या स्वाधीन करावें लागतें. तें प्रेत घरांत ठेवणें म्हणजे सडूं देणें. ती त्या प्रेताची विटंबना होईल. त्याप्रमाणेंच पूर्वजांच्या मृत चालीरीती, सदोष विचारसरणी, यांना आपण नम्रपणें आणि भक्तिभावानें मूठमाती देणें यांतच पूर्वजांची पूजा आहे.

गुरुभक्ति म्हणजे शेवटीं ज्ञानभक्ति हें विसरतां कामा नये. पूर्वजांबद्दल आदर म्हणजे पूर्वजांच्या सदनुभवांबद्दल आदर. त्यांच्या प्रयत्नांबद्दल आदर. त्यांच्या धडाडीबद्दल, ज्ञाननिष्ठेबद्दल आदर. गुरूची पूजा म्हणजे सत्याची पूजा, ज्ञानाची पूजा, अनुभवाची पूजा, विचारांची पूजा. जोंपर्यंत मनुष्याला ज्ञानाची तहान आहे, ज्ञानाबद्दल आदर आहे, तोंपर्यंत जगांत गुरुभक्ति राहणार.

भारतांत गुरु शब्दांपेक्षां सद्‌गुरु शब्दाचा महिमा आहे. सद्‌गुरु म्हणजे काय ? गुरु त्या त्या ज्ञानप्रांतांत किंवा त्या त्या कलेंत आपणांस पुढें पुढें नेतो;

परंतु सद्गुरु जीवनाची कला शिकवितो. संगीताचा आत्मा तानसेन दाखवील. चित्रकलेचा आत्मा अवनींद्रनाथ दाखवितील. नृत्यांतील दिव्यता उदयशंकर दाखवतील. सृष्टिज्ञानांतील अनंतता श्री. रामन् दाखवतील. परंतु जीवनांतील अनंतता कोण दाखवणार? जीवनांतील संगीत कोण शिकवणार? जीवनांतील मधुर नाच कोण शिकवणार?

" अध्यात्मविद्या विद्यानाम् " असें गीता सांगते. जीवन सुंदर करणें, स्वतःचें जीवन निर्दोष, निष्काम, निरुपाधि करणें ही सर्वांत थोर विद्या. ही विद्या शिकविणारा तो सद्गुरु. नेपोलियन युद्धशास्त्र शिकणाऱ्यांचा गुरु आहे. परंतु स्वतःच्या जीवनांतील कामक्रोधांच्या वेगाशीं लढावयास शिकविणारा तो सद्गुरु होय.

उत्कृष्ट वाद्य वाजविणारा मुलांबाळांवर संतापून त्यांना रडायला लावील! डामरांतून सुंदर रंग काढणारा शास्त्रज्ञ जीवनाला डामर फांसूं शकेल! प्रकाशाची उपासना करणारे चंद्रशेखर रामन् प्रत्यक्ष संसारांत प्रांतीय भेदभावांचा अंधार उत्पन्न करितील! सुंदर विचार देणारा पंडित बेकन खुशाल लांचलुचपत घेईल!

जगांत शास्त्रांचा कितीहि विकास झाला, तरी जोंपर्यंत जीवनकला माणसास साधत नाहीं तोंपर्यंत सारें व्यर्थ होय. समाजांत परस्परांशीं कसें वागावयाचें तें आधीं शिका, असें महर्षि टॉल्स्टॉय म्हणत असत. संत जीवन मधुर कसें करावें हें सांगतात. रेडिओ ऐकून संसारांत संगीत येणार नाहीं. तुमच्या या बाह्य टाकंटिक्यांनीं रडका संसार मधुर होणार नाहीं. संगीत आंत अंतरंगांत सुरू झालें पाहिजे. हें जीवनांतील सागरसंगीत सद्गुरु शिकवितो. तो हृदयांत प्रकाश पाडतो. बुद्धीला सम करतो. प्रेमाचे डोळे देतो. तो काम-क्रोधादि सर्पांचे दांत पाडतो. द्वेष-मत्सरादि व्याघ्रांना कोंकरें बनवितो. सद्गुरु हा असा मोठा किमयागार असतो.

म्हणून भारतांत सत्संग किंवा सज्जनांची सेवा यांना फार महत्त्व दिलें आहे.

**सज्जनसंगतिरेका। भवति भवार्णव–तारण–नौका॥**

रवींद्रनाथ सृष्टीकडे कसे पाहतात, महात्माजी शांतपणें अविरत कसे कार्यमग्न असतात, हें त्यांच्याजवळ बसल्यानेंच कळेल.

थोरांच्या संगतींत क्षणभर राहिलें तरी संस्कार होतो. भगवान् बुद्धांच्या चरित्रांत एक गोष्ट आहे. एकदां भगवान् बुद्ध एका नगराबाहेरच्या विशाल



उद्यानांत उतरले होते. त्यांच्या दर्शनासाठीं लहान-मोठे स्त्री-पुरुष, राव-रंक सारे जात होते. एके दिवशीं प्रातःकाळीं राजा एकटाच पायीं दर्शनास जात होता. तिकडून दुसरा एक श्रीमंत व्यापारीहि जात होता.

त्यांना वाटेंत एक माळी भेटला. माळ्याच्या हातांत एक रमणीय सुगंधी कमळ होतें. शरद् ऋतु संपून शिशिर ऋतु सुरू झालेला होता. कमळें दुर्मीळ झालीं होतीं. तें दुर्मीळ कमळ विकत घेऊन आपण बुद्धदेवाच्या चरणीं वाहावें असें राजास व त्या सावकरास—दोघांसहि वाटलें.

सावकार माळ्याला म्हणाला, " माळीदादा, फुलाची काय किंमत? "

माळी म्हणाला, " चार पैसे. "

राजा म्हणाला, " मी दोन आणे देतों. मला तें दे. "

सावकार म्हणाला, " माळीदादा! मी चार आणे देतों, मला दे. "

राजा म्हणाला, " मी आठ आणे देतों. "

सावकार म्हणाला, " मी रुपया देतों. "

अशा रीतीनें किंमत वाढूं लागली. माळी मनांत म्हणाला, "हे दोघे ज्या गृहस्थाला कमळ नेऊन देणार, त्याला जर तें आपणच नेऊन दिलें तर आपणांस अधिक किंमत मिळेल." अशा विचारानें तो माळी त्या दोघांस म्हणाला, " मी कोणासच देत नाहीं. तुम्ही जा."

राजा व सावकार निघाले. त्यांच्या पाठोपाठ तो माळीहि निघाला. भगवान् बुद्ध एका शिलाखंडावर बसले होते. हजारों लोक उपदेश ऐकत होते. राजानें वंदन केलें व निमूटपणें तो दूर जाऊन बसला. सावकारानें प्रणाम केला व तो दूर जाऊन बसला. त्यांच्या पाठोपाठ तो माळीहि होताच. भगवान् बुद्धांच्या पायांवर तें कमल ठेवून तोहि नम्रपणें दूर जाऊन बसला.

भगवान् बुद्धांना पाहतांच पैशाचे स्वार्थी विचार माळ्याच्या मनांत उभे राहिले नाहींत. त्या पवित्र मूर्तीसमोर पवित्र विचारांनींच त्याचें हृदय भरून आलें. त्या वातावरणांत स्वार्थी विचार क्षणभरहि जगूं शकत नव्हते.

एक क्षणभर भेटीचा जर इतका परिणाम, तर तपेंच्या तपें अशा महात्म्यांच्या संगतींत दवडलीं तर जीवनाचें सोनें कां होणार नाहीं? संत कसे बोलतात, कसे चालतात, निरनिराळ्या परिस्थितींत कसे वागतात, कसे निर्भय असतात, कसे निःस्पृह असतात, किती निरिच्छ, किती संयमी, किती मृदु, परंतु किती निश्चयी,

कसे निरहंकारी, कसे सेवासागर, किती निरलस, किती क्षमी, कसें त्यांचें वैराग्य, कशी निर्मळ दृष्टि, कसा विवेक, कसा अनासक्त व्यवहार, हें सारें त्यांच्या सहवासांत नित्य राहिल्यानेंच समजत असते.

आपलें गढूळ जीवन अशा सद्गुरूच्या सहवासांत निर्मळ होऊं लागतें. पटलें जातात, प्रकाश येतो. प्रत्यक्ष प्रायोगिक शिक्षण प्रत्येक क्षणाक्षणाला मिळतें. सद्गुरूच्या श्वासोच्छ्वासाबरोबर पावित्र्य येत असतें. आई-बाप देह देतात, जन्म देतात. परंतु या मातीच्या देहाचें सोनें कसें करावें हें सद्गुरु शिकवितो. भौतिक शास्त्रांतील गुरू मातीचीं माणकें बनवतील. परंतु सद्गुरु जीवनाच्या मातीचीं माणिक-मोतीं बनवितो, पशूचा मनुष्य करतो, वैचारिक जन्म देतो, सत्यसृष्टि देतो. अशा सद्गुरूचे उतराई कसे होणार ? ज्यानें माकडाचें माणूस केलें, पशूचें पशुपति होण्याची हातीं किल्ली दिली, त्या सद्गुरूचें ऋण कसें फिटणार ? त्याचें कोणत्या शब्दांनीं स्तवन करूं ? त्याला किती वानूं, किती मानूं, किती वाखाणूं ?

**गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः ।**
**गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ॥**

सद्गुरूचें वर्णन करावयास वाणी तोकडी पडते. गुरु म्हणजे देव, महादेव. गुरु म्हणजेच सर्व कांहीं.

आपणांकडे सद्गुरूंची परंपरा सांगण्याचा प्रघात आहे. सर्वांचा आदिगुरु म्हणजेच कैलासराणा शिव चंद्रमौळी. निर्मल, धवल अशा उंच कैलासावर रहणारा, शीलाचा चंद्र मिरवणारा, ज्ञानगंगा मस्तकीं धारण करणारा, सर्पांना निर्विष करून फुलांच्या हाराप्रमाणें अंगावर खेळवणारा, सर्वस्वाचा त्याग करून विभूतीचें वैभव मानणारा, जगासाठीं स्वतः हलाहल पिणारा, भुतें-प्रेतें-पिशाचें अशा पापयोनींनाहि प्रेमानें जवळ घेऊन त्यांना मांगल्याचा पथ दाखवणारा, वैराग्याचा तृतीय नेत्र उघडा ठेवून वासनांचें भस्म करणारा, असा हा पशुपति मृत्यंजय शिव सर्वांचा आदिगुरु. त्याच्यापासून सर्वांची ज्ञानपरंपरा.

जनकाचा याज्ञवल्क्य गुरु, जनक शुक्राचार्यांचा गुरु. निवृत्तींचा शिष्य ज्ञानदेव. रामानंदाचे शिष्य कबीर. असे हे संबंध शब्दांनीं वर्णन करतां येणार नाहींत. जीवन स्वच्छ, शुद्ध, शान्त व्हावें, अशी जोंपर्यंत तळमळ माणसास राहील, तोंपर्यंत



हे संबंधहि जगांत रहातील. हे संबंध भारतांतच नाहीं, तर जगांतहि रहातील यांत शंका नाहीं. ते राहण्यांतच जगाचें कल्याण आहे.

## चार पुरुषार्थ : : १२

धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार पुरुषार्थ आहेत. या संसारांत प्रयत्न करून मिळविण्यासारख्या या चार वस्तू आहेत. पुरुषार्थ म्हणजे पुरुषानें प्राप्त करून घेण्यासारख्या गोष्टी. मनुष्यानें संपादण्यासारख्या वस्तू. पुरुषार्थ या शब्दाचा अर्थ मराठींत आतां कृतार्थता, पराक्रम, सार्थकता, प्रौढी अर्शासारखा झाला आहे. " असें करण्यांत कांहीं पुरुषार्थ नाहीं " असें आपण म्हणतों. याचा अर्थ, असें करणें माणसास शोभत नाहीं, साजत नाहीं, यांत कौतुक करण्यासारखें कांहीं नाहीं, यांत पराक्रम कांहीं नाहीं, असा होतो.

भारतीय संस्कृति सांगते, कीं संसारांत चार वस्तू मिळवा. चार वस्तू जोडा. भारतीय संस्कृति एकाच वस्तूवर जोर देत नाहीं. ती व्यापक आहे, एकांगी नाहीं. भारतीय संस्कृति दैन्य-नैराश्याचीं गाणीं गाणारी नाहीं. भारतीय संस्कृति पैशाला वमनवत् समजत नाहीं. अर्थ ही एक पुरुषार्थाची वस्तु आहे. द्रव्य-संपत्ति त्याज्य नाहीं. प्रयत्नानें द्रव्य जोडा, संपत्ति मिळवा. संपत्तीचें भारतीय संस्कृतीस वावडें नाहीं. संपत्तीला पचविणारी भारतीय संस्कृति आहे. संपत्तीप्रमाणेंच कामोपभोग. भारतीय संस्कृति कामाला सन्मान्य स्थान देत आहे. काम ही एक पुरुषार्थाची वस्तु मानिली गेली आहे. संपत्ति पवित्र आहे, कामहि पवित्र आहे. अर्थ आणि काम माणसानें मिळवावेत. संपत्ति मिळवावी आणि तिचा नीट उपभोगहि घ्यावा. काम म्हणजे केवळ रतिसुख एवढाच येथें अर्थ नाहीं. काम म्हणजे उपभोग, सुखोपभोग. काम म्हणजे विषयसुख. पंचेंद्रियांचें सुख. पंचविषयांचें सेवन. अशा व्यापक अर्थीं काम शब्द घेतला पाहिजे.

तुकारामांच्या एका अभंगांत एक फार थोर वचन येऊन गेलें आहे :

**विधीनें सेवन । धर्माचें पालन**

विषयांचें विधियुक्त सेवन कराल, तर तें धर्महीन नाहीं. मर्यादित प्रमाणांत विषयभोग घेणें यांत धर्माची च्युति नाहीं. धर्म म्हणजेच विधियुक्त ग्रहण. तुकारामांचा दुसराहि एक चरण आहे :

जोडुनियां धन उत्तम व्यवहारें । उदार विचारें खर्च करी

धन मिळवूं नका असें हा थोर संत सांगत नाहीं. परंतु धन उत्तम व्यवहारानें जोडा आणि तें जोडलेलें धन विवेकानें उदारपणानें खर्च करा असें तो सांगत आहे.

विधि म्हणजे आज्ञा. स्मृतींतून विधि शब्द नेहमीं येत असतो. कोणतेंहि कर्म विधिपुरस्सर करा असें स्मृति सांगत असते. विधि म्हणजे शास्त्रवचन, विधि म्हणजे स्मृतींतील विधान. विधि म्हणजे धर्म. जें कर्म विधियुक्त नाहीं तें अधार्मिक होय, असें स्मृतिकार सांगतात. परंतु विधि कसला ? कशाविषयीं विधि ? कशाविषयीं आज्ञा ? कशाविषयीं बंधन ? कशाविषयीं मर्यादा ?

भारतीय संस्कृति मानवी मन ओळखते. मनुष्याच्या हृदयाच्या भुका ती ओळखते. मनुष्याला वासना-विकार आहेत ही गोष्ट भारतीय संस्कृति डोळ्यांआड करीत नाहीं. भारतीय संस्कृतीचें ध्येय परमोच्च असलें, तरी ती मर्यादा ओळखते. मानवी आत्मा या मातीच्या शरीरांत अडकलेला आहे, हा आत्महंस या चिखलांत रुतलेला आहे, त्याला हळूहळू या चिखलांतून बाहेर काढलें पाहिजे, ही गोष्ट भारतीय संस्कृति कधीं विसरत नाहीं.

सारी मानवी संस्कृति चिखलांतूनच वर आली आहे. चिखलांत किडेहि होतात. परंतु चिखलांतून पंकजहि फुलतें. चिखलांतून कमळें फुलविणें हें भारतीय संस्कृतीचें ध्येय आहे. अंधारांतून प्रकाश निर्माण करणें, मातींतून हिरे व माणकें निर्माण करणें, मरणांतून अमरता मिळविणें हें भारतीय संस्कृतीचें ध्येय आहे.

रवींद्रनाथांची एक सुंदर कविता आहे. त्या कवितेंत रवींद्रनाथ म्हणतात, " फुलापासून दिलेल्या गंधाची, दिलेल्या रंगाची, देव मागणी करतो. कोकिळेपासून दिलेल्या कुऊकुऊची फक्त तो अपेक्षा करतो. वृक्षापासून विवक्षित फळाचीच तो आशा राखतो. परंतु मानवाच्या बाबतींत देवाचा नियम निराळा आहे. त्यानें मनुष्याला दुःख दिलें आहे व त्यांतून माणसानें सुख मिळवावें अशी त्याची अपेक्षा आहे. त्यानें माणसाला अंधार दिला आहे. ' या अंधारांतून प्रकाश प्रकट करा ' असें तो सांगतो. त्यानें माणसास मर्त्य केलें आहे. ' या मरणांतून अमृतत्व मिळवा ' असें तो म्हणतो. त्यानें आजुबाजूस घाण ठेविली आहे, असत् ठेविलें आहे. ' या असतांतून सत् मिळवा , या विषांतून सुधा सृजा, या अमंगलांतून मंगलता निर्माण करा, ' असें तो म्हणतो. देवाचा मानवाच्या बाबतींतच असा पक्षपात कां बरें ? मानवावरच ही महान् जबाबदारी कां ? मानवाच्या



बाबतींत कां ही कठोरता, कां ही अशक्य अपेक्षा ? नाहीं, देव कठोर नाहीं, दुष्ट नाहीं. सर्व सृष्टींत मानवप्राणी थोर असें देवाला वाटतें. मानवापासून या गोष्टी त्यानें नाहीं अपेक्षावयाच्या तर कोणापासून ? यांत मानवाचा गौरव आहे. एकाद्या वीराला लहानसा किडा मारावयास सांगणें हा जसा त्याचा अपमान आहे, तद्वत् मानवापासून क्षुद्र वस्तूंची अपेक्षा राखणें म्हणजे त्याच्या शक्तीचा अपमान आहे. माझा लाडका मनुष्यप्राणी हें सर्व करूं शकेल अशी देवाला आशा आहे. चौऱ्यायशीं लक्ष योनीनंतर जन्माला आलेला हा थोर मानवप्राणी, हा सर्व सृष्टीचा मुकुटमणि, माझी आशा फोल करणार नाहीं, अशी देवाला श्रद्धा आहे."

किती सुंदर आहे ही कविता, किती थोर आहे हा विचार, किती विशाल व गंभीर आहे ही सृष्टि ? शेक्सपियरनें एके ठिकाणीं मानवाचा मोठेपणा असाच वर्णिला आहे. " कसा बोलतो, कसा सुरेख चालतो, कसा सुंदर दिसतो, कसें थोर हृदय, कशी विचार करण्याची शक्ति, कशी विशाल दृष्टि, मनुष्य म्हणजे भगवंताची मूर्तीच होय, " अशा अर्थाचें तें वर्णन आहे.

नरदेहाची थोरवी भारतीय संतांनींहि वर्णिली आहे :

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पहा हो ॥

असे समर्थांनीं थोर उद्गार काढले आहेत.

बहुता पुण्यपण्येन क्रीतेयं कायनौस्त्वया ॥

अरे, हा मानवी देह मोठ्या भाग्यानें तुला मिळाला, असें हें वचन सांगत आहे. तुकारामांनीं तर नरदेहाला " सोनियाचा कलश " असें म्हटलें आहे. या नरदेहांत जन्मून नराचा नारायण होणें हें महत्त्वाचें ध्येय, असें भारतीय संत सांगत आहेत.

मनुष्यापासून किती थोर अपेक्षा ! परंतु ही अपेक्षा मनुष्य कशी पुरी करणार ? पशुप्रमाणें वागणारा मनुष्य देवाप्रमाणें केव्हां होणार ? बर्नार्ड शॉनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, " मनुष्याला निर्मून हजारों वर्षें झालीं. आशेनें देव वाट पहात आहे. देव स्वतःचे हेतू पूर्ण करून घेण्यासाठीं निरनिराळे प्रयोग करीत होता. निरनिराळे प्राणी निर्माण करीत होता. हा प्राणी आपले हेतू पूर्ण करील, आपल्या आशा सफळ करील, असे करीत करीत देवानें हजारों प्राणी निर्माण केले. परंतु त्याच्या आशा अपूर्णच राहिल्या. पूर्वीच्या अनुभवानें शहाणा होऊन देव नवीन प्राणी निर्माण करीत असे. परंतु तो नवीन प्राणी पुन्हां देवाच्या तोंडाला पानें

पुत्री ! असें करतां करतां देवानें मानव निर्माण केला. सर्व चातुरी खर्चून, सर्व अनंत अनुभव ओतून हा दिव्य जीव देवानें निर्मिला आणि देव थांबला. दमलेला देव निजला. त्याला वाटलें कीं हा मानवप्राणी माझ्या सर्व आशा पूर्ण करील, माझे मनोरथ पुरवील. निःशंकपणें देव निजला. आपण जागे होऊं तेव्हां त्या मानवी प्राण्याची दिव्य कृति पहावयास सांपडेल व आपल्या डोळ्यांचें पारणें फिटेल या आशेनें देव झोंपला आहे. परंतु आतां हजारों वर्षें होऊन गेलीं. आणि देव जर जागा झाला तर काय दिसेल ? देवाला प्रसन्न वाटेल का ? त्या परात्पर पित्याला धन्य धन्य वाटेल का ? मानवी संसाराचा सोहळा पाहून त्याच्या डोळ्यांतून आनंदाश्रू घळघळतील का ? त्याचें हृदय प्रेमानें वोसंडून येईल का ? या मानवाला तो पोटाशीं धरून त्याला प्रेमाश्रूंनीं न्हाणील का ?

"छे छे. मनुष्य मनुष्याला गुलाम करीत आहे. मनुष्य मनुष्याला छळीत आहे, पिळीत आहे, गांजीत आहे, भाजीत आहे. राष्ट्रें राष्ट्रांचे लचके तोडीत आहेत. दांतओंठ खाऊन एकमेकांकडे पहात आहेत. वृकव्याघ्र बरे; सर्पसिंह बरे; घारीगिधाडें पत्करलीं; परंतु मनुष्य नको. सर्व सृष्टीचा त्यानें संहार चालविला आहे. तो पाले खातो. फुलेंफळें खातो. तो पशुपक्षी मारून खातो, कधीं कधीं लीलेनें त्यांची शिकार करतो ! परंतु हें एक वेळ जाऊं दे. तो स्वतःच्या जातीचाहि निःपात करीत आहे ! वाघिण स्वतःचीं पिलें खातें. तिचें एकादें पिलूं वांचतें. मांजरीहि स्वतःचीं पिलें कधीं कधीं खाते. प्रसववेदनांनीं कष्टी झालेली ती माता स्वतःचींच पोरें मटकावते ! स्वतःच्या पोटाची वखवख, भुकेची आग शान्त करण्याकरितां स्वतःच्या पोटचीं पोरें वाघिण भक्षिते. परंतु मानवंहि तेंच करीत आहे ! स्वतःच्या पोटाची आग शान्त करण्याकरितां तो शेजारच्या राष्ट्रांना खाऊन टाकतो. मानव मानवाला भक्षीत आहे. मनुष्य म्हणजे बुद्धिमान् वाघ ! क्रौर्याला बुद्धीची जोड मिळाली, मग काय ? वाघाला फक्त नखें व दांत आहेत. प्राणी जवळ आला तरच त्याला वाघ खाऊन टाकील, फाडून खाईल. परंतु बुद्धिमान् मानवी वाघानें चमत्कार केले आहेत ! तो पंचवीस मैलांवरून मारूं शकतो. तो हवेंतून मारील, पाण्यांतून मारील, रात्रीं मारील, दिवसा मारील. हवेनें मारील, किरणांनीं मारील ! सर्व सृष्टींतील संहारतत्त्वें शोधून त्यांचा तो उपासक होत आहे ! मारण्याचीं साधनें शोधून काढणें हीच त्याची संस्कृति ! रक्तानें भरलेला हा मानवी संसार आहे. येथें आरोळ्या व आक्रोश आहेत. बळी दुर्बळाला रग-



डीत आहे, मारक शक्तीचे गोडवे गायिले जात आहेत. पाशवी बळांचीं उपनिषदें पढविलीं जात आहेत, कोणी सुखांत तर कोणी दुःखांत, कोणी विलासांत तर कोणी विलयांत, कोणी माड्यामहालांत तर कोणी रस्यावर पडलेले, कोणी अजीर्णानें मरत आहेत, तर शेंकडों अन्नाविणें मरत आहेत, कोणी वस्त्रांनीं गुदमरत आहेत तर कोणी वस्त्र नाहीं म्हणून गारठत आहेत, कोणी सदैव गाद्यांवर लोळत आहेत, शरीराला श्रम नाहीं, हातपाय मळत नाहींत, थंडी-ऊन लागत नाहीं, तर दुसऱ्यांना सुखाची झोंप ठाऊक नाहीं, विश्रांति ठाऊक नाहीं; ऊन असो पाऊस असो, दिवस असो रात्र असो, खायला असो खायला नसो, आजारीपणा असो वा बरें असो, घरांत मुलें तडफडत असोत, बायको मरत असो, सदैव काम करावेंच लागत आहे. एकीकडे संगीत, एकीकडे विवळणें ! एकीकडे चैन, एकीकडे वाण ! एकीकडे मजा, एकीकडे मरण ! काय हा मानवी संसार !

"अरेरे ! देवाला हें हृदय फाडून टाकणारें दृश्य पाहून काय वाटेल ? स्वतःच्या साऱ्या आशा-आकांक्षा धुळींत मिळालेल्या पाहून त्या जगदीश्वराला काय वाटेल ? निराशेनें तो वेडापिसा होईल. त्याची अनंत आशा संपेल. त्याच्या सहनशीलतेचा शेवटचा क्षण येईल. तो मानवाकडे संतापानें पेटलेल्या डोळ्यांनीं पाहील. मानवाचें भस्म होऊन जाईल. तो मानवाला सृष्टींतून साफ पुसून टाकील. हा प्रयोग फसला असें तो ठरवील. कदाचित् दुसरा प्रयोग तो करील, कोणाला माहीत ?"

बर्नार्ड शॉला देव मानवाला पुसून टाकील असें वाटत आहे. परंतु तसें देव करणार नाहीं. कारण या मानवी प्राण्यांत काय शक्ति आहे तें त्याच्या अनुभवास आलें आहे. याच राक्षसी व मुर्दाड मानवांतून भगवान् बुद्ध जन्माला आले. भगवान् ख्रिस्त जन्माला आले. याच मानवी प्राण्यांतून सेंट फ्रॅन्सिस बाहेर पडले, तुळसीदास बाहेर पडले. याच मानवी प्राण्यांतून महात्माजी प्रकट झाले आहेत, रवींद्रनाथ जन्मले आहेत. देवाला आशा आहे. आंबट फळाचा त्याग करूं नये. ती आंबट कच्ची कैरी एक दिवस पिकेल. तिच्या आंबटपणाचें मधुर रसांत परिवर्तन होईल. त्याप्रमाणें मानवी प्राणी पिकतील. कांहीं पिकलेलीं फळें फारच मधुर निघालीं. देवानें हें पाहिलें आहे. तो आशेनें अनंत काळ वाट पहात बसेल.

रामतीर्थ म्हणत असत, "ज्ञानाची शिडी चढणारीं आपण सारीं बाळें आहोंत. कोणी सर्व पायऱ्या चढून वरच्या दिवाणखान्यांत गेलीं, कोणी वरच्या

शेवटच्या पायरीवर आहेत, कोणी मध्यें आहेत, कोणी खालच्या पायरीवर आहेत. कोणी शिडीजवळ उभीं आहेत. कोणी शिडीकडे धांवत येत आहेत. एक दिवस सारीं बाळें दिवाणखान्यांत येतील व अपूर्व सोहळा होईल. मधुरतम संगीत होईल."

मानवी यात्रा सुरू झाली आहे. आपण सारे यात्रेकरू आहोंत. मांगल्याकडे जाणारे यात्रेकरू. नदी सागराकडे जाते, ती का सरळ जाते? ती का एकाच गतीनें, एकाच वेगानें जाते? नदी कधीं वांकडी जाते, कधीं कड्यावरून निःशंकपणें उडी घेते, कधीं उच्छृंखळ होते, कधीं गांवेंच्या गांवें उध्वस्त करते, कधीं गंभीर तर कधीं उथळ, कधीं हंसते तर कधीं रडते, कधीं भरलेली तर कधीं रिती, कधीं रानावनांत कांट्याकुट्यांत शिरते तर कधीं प्रसन्नपणें मैदानांतून जाते. परंतु शेवटीं सागराच्या पायांवर जाऊन पडते. आणि नदीची वाट पाहणारा, त्या सहस्र सरितांची रात्रंदिवस वाट पाहणारा तो सागर सहस्र हस्तांनीं त्यांना हृदयाशीं धरतो, स्वतःशीं एकरूप करितो.

ते पर्वत, ते सरितांचे जन्मदाते! ते आपल्या मुलींवर संतापत नाहींत. ते आशेनें मुलींकडे पहात असतात. ते आपले आशीर्वाद पाठवीत असतात. ते जीवनाचा पुरवठा करीत असतात. माझ्या मुली शेवटीं अनंत सागराकडे जातील, वेड्यावांकड्या गेल्या तरी ध्येयाला जाऊन गांठतील, अशी पर्वताला अमर आशा असते. स्वतः वितळून तो हिमालय त्यांना पाणी पुरवतो. "जा, बाळांनो, जा. मी श्रद्धावान् आहें. गंगे-यमुने जा. माझा तुमच्यावर विश्वास आहे," असें तो भव्य हिमालय मुकेपणानें सांगत असतो.

परमेश्वराची अशीच आशा आहे. मानवी प्राणी शेवटीं माझ्याकडे येईल. प्रेमाकडे, सहकार्याकडे, ऐक्याकडे, मांगल्याकडे, पावित्र्याकडे येईल अशी त्याला श्रद्धा आहे. या श्रद्धेनेंच तो चंद्र-सूर्य पेटवीत आहे, तारे पेटवीत आहे, मेघ पाठवीत आहे, फुलेंफळें निर्मीत आहे, वारे नाचवीत आहे, धान्य पिकवीत आहे.

मनुष्याला या ध्येयाकडे घेऊन जाणें हें धर्माचें काम आहे. संस्कृतीचें हेंच प्राप्तव्य, हेंच गंतव्य. संत याच ध्येयाकडे मानवी समाजाला घेऊन जाण्यासाठीं तडफडत असतात. संत हे मुक्त असतात. परंतु बद्धांना मुक्त करण्यासाठीं ते स्वतः बद्ध होतात. चिखलांत रुतलेल्यांना काढण्यासाठीं ते पुन्हां चिखलांत येतात. वरती दिवाणखान्यांत त्यांना बसवत नाहीं. रानावनांत भटकणाऱ्या बंधूंना ज्ञानाच्या



सोपानाकडे आणण्यासाठीं कमर कसून आशेनें संत प्रयत्न करतात. स्वतःचें बलिदान देतात.

संत मनुष्याला चुचकारून चुचकारून ध्येयाकडे घेऊन जात आहेत. घोड्याला चुचकारावें लागतें, तसेंच मानवी प्राण्याचें आहे. संत म्हणतात, "विषयोपभोग घे, संपत्ति जोड. कांहीं हरकत नाहीं. परंतु थोडी मर्यादा सांभाळ." खा, पी, झोंप घे, विषय भोग, संपत्ति मिळव, मारामारी कर, हिंसा कर, या गोष्टी मनुष्याला शिकविण्याची जरूर नाहीं. त्या त्याच्या रक्तांतच आहेत. या उपजत वृत्तीच आहेत. धर्म या गोष्टी सांगत नाहीं. धर्म या वृत्तींना मारीतहि नाहीं. धर्म म्हणतो, "या वृत्तींना मर्यादा घाल." तुला खायचें असेल तर खा बाबा. परंतु गड्या, जरा बेतानें खा. तेलतिखट खाऊं नको. शिळेंपाकें खाऊं नको. मांसमच्छर खाऊं नकोस. वाटेल तेव्हां खाऊं नकोस. भूक लागेल तेव्हांच खा. खाण्याची वेळहि ठरव. निजायच्या आधीं दोन तास खा. खाल्ल्याबरोबर फार व्यायाम करूं नकोस. जें पचेल तेंच खा. मांसमच्छरहि खावयाचें असेल तर वाटेल त्या प्राण्याचें खाऊं नकोस. जें पचण्यासारखें असेल तेंच खा. तेथेंहि नियम पाळ, विचार कर.

तुला झोंपावयाचें असेल तर झोंप. परंतु लौकर झोंप व लौकर ऊठ. फार झोंपूं नकोस. त्यामुळें आळस येईल. शरीरहि दुबळें बनेल. मोकळ्या हवेंत झोंप. कुशीवर झोंप. पाय लांब करून झोंप. रात्रीच्या वेळींच झोंप. दिवसा झोंपूं नकोस. विधिपूर्वक झोंप घे.

विषयभोग तुला भोगावयाचा आहे, भोग बाबा. परंतु नेहमीं भोगच भोगणें शोभत नाहीं. पशुपक्षीहि संयम पाळतात. तूं तर मनुष्य. अमावास्या वर्ज्य कर. अमुक वार वर्ज्य कर. कांहीं तरी बंधन पाळ. व्रत ठेव. तुला पुष्कळ दिवस विषयसेवन करतां यावें म्हणून तरी संयम पाळ. ज्याप्रमाणें एकच दिवस खूप खाल्लेंस तर मरशील, परंतु रोज बेताचें खाल्लेंस तर रसनेचें सुख पुष्कळ वर्षें तुला घेतां येईल; त्याप्रमाणें प्रमाणांत विषयसेवन करशील तर तुझी शक्ति पुष्कळ काळ पुरेल. तुझ्या सुखासाठीं तूं बंधन पाळ.

तुला हिंसा करावयाचीच आहे, कर बाबा. परंतु तेथेंहि कांहीं नियम पाळ. विषारी वायू सोडूं नकोस; बॉंबगोळे फेकूं नकोस; गदायुद्धांत कमरेखालीं मारूं नकोस; रात्रीं लढाई करूं नकोस; एकावर अनेकांनीं हल्ला करूं नका; स्त्रिया, मुलें,

वृद्ध पुरुष यांना मारूं नका; उगीच अन्यायानें मारूं नकोस; तुला कोणी मारावयाला आला तरच प्रतिकार करावयास उभा रहा; कपटानें मारूं नकोस.

संपत्ति मिळवावयाची आहे, मिळव. परंतु उत्तम व्यवहारानें मिळव. कोणाला फसवूं नको, लुबाडूं नको. चोरीमारी करूं नकोस, गरिबाला पिळूं नकोस. फार फायदा घेऊं नकोस. फार व्याज घेऊं नकोस. दुसऱ्या देशांतील लोकांना दारू पाजून पैसे नको मिळवूं. दुसऱ्या देशांतील लोकांना तरवारीच्या धारेखालीं अफू खायला देऊन पैसे नको मिळवूं. दुसऱ्या देशांतील लोकांना बेकार करून, त्यांचे उद्योगधंदे मारून, त्यांना गुलाम करून पैसे नको मिळवूं. दुसऱ्यांचीं घरें पाडून स्वतःच्या माड्या नको बांधूं. दुसऱ्याला नाडून स्वतः नको नटूं. दुसऱ्याला रडवून स्वतः नको हंसूं.

असें धर्म सांगतो. हळूहळू तुम्हांला प्रगतीकडे धर्मस्थापनेचे नर घेऊन जात असतात. धर्म, अर्थ, काम, मोक्ष. अर्थ आणि काम यांच्या आरंभीं धर्म आहे व अंतीं मोक्ष आहे. मनुष्याचा प्रयत्न मोक्षासाठीं आहे. मोक्ष म्हणजे मोकळेपणा, आनंद. मोक्ष म्हणजे दुःखापासून, चिंतेपासून सुटका. मोक्ष म्हणजे परम सुख, केवळ शान्ति. हा मोक्ष मिळविण्यासाठीं मानवाची धडपड आहे. हा मोक्ष कसा मिळेल? वासना-विकारांचा केवळ गोळा असा जो हा दुबळा मानव, त्याला ही परमशान्ति कशानें मिळेल?

केवळ भोगानें शांति मिळेल का? भोग भोगतांना हंसणारा व भोगल्यावर रडणारा असा हा मानव आहे. भोगानें खरें सुख नाहीं. अनिर्बंध, मर्यादाहीन भोगांत सुख नाहीं. विधिहीन, व्रतहीन, संयमहीन भोग रडवितो. स्वतःला रडवितो व समाजासहि रडवितो. भोग भोगण्याचे प्रयोग मानवानें करून पाहिले आहेत. ययातीनें सारखा विषयभोगाचा प्रयोग करून पाहिला. पुनःपुनः तो तरुण होत होता. आपल्या मुलांचें तारुण्य तो घेई व पुन्हां भोग भोगी. परंतु शेवटीं कंटाळला बिचारा! हजारों वर्षें हा प्रयोग करून पुढील सिद्धान्त त्यानें मानवजातीला दिला आहे :

" न जातु कामः कामानामुपभोगेन शाम्यति "

कामाचा वर्षानुवर्षें उपभोग घेतला तरी काम शान्त होणें शक्य नाहीं. अग्नींत आहुति दिल्यानें अग्नि न विझतां अधिकच प्रज्वलित होतो.



तेव्हां हा प्रयोग फसला. मग काय करावयाचें? इंद्रियें तर भोगासाठीं लालचावलीं आहेत.

इंद्रियांचीं दीनें। आम्ही केलों नारायणें॥

या इंद्रियांचे आपण गुलाम आहोंत. हीं इंद्रियें एकदम स्वाधीन कशीं करून घ्यावयाचीं? त्यांना अजिबात भोग न दिला तर तीं वखवखतील आणि संधि सांपडतांच बेफाम होतील. त्यांना उपाशी ठेवणें, बळजबरीनें त्यांना माणसाळविणें हेंहि कठिण आहे; त्यांना मोकाट व स्वैर सोडणें म्हणजेहि नाशकारक आहे. भारतीय संस्कृति सांगते, "भोग दे. परंतु प्रमाणांत दे. बेतानें दे. मोजका दे."

अर्थ आणि काम यांच्या पाठीशीं धर्म हवा. आधीं धर्माचें अधिष्ठान. धर्माच्या पायावर अर्थ-कामाचीं मंदिरें बांधा. अर्थ आणि काम यांचा सांगाती जर धर्म असेल, तर तेच अर्थ-काम सुखकर होतील. बद्ध करणारे न होतां मुक्त करणारे होतील. अर्थ आणि काम यांच्यांतहि अर्थाला प्राधान्य. कारण अर्थ नसेल तर कोठला काम? खायला-प्यायला नाहीं तर मी मरेन. मग कामोपभोग कोठला? अर्थ म्हणजे कामाचीं साधनें. अर्थाशिवाय कामवासना, निरनिराळ्या विषयभोगेच्छा कशा तृप्त होणार? द्रव्याशिवाय सर्व फुकट. धनधान्याशिवाय काम तडफडून मरेल.

अर्थ आणि काम या ज्या दोन प्रवृत्ती, त्यांतहि अर्थाचें स्थान आधीं, हें भारतीय संस्कृतीनें ओळखलें आणि अशा ह्या दोन वृत्तींच्या पाठीमागें धर्माचें बंधन ठेवलें. अर्थ, काम धर्मानें नियंत्रित करा. परंतु धर्मानें नियंत्रित करणें म्हणजे काय? धर्म म्हणजे काय? धर्म म्हणजे का शेंडी? धर्म म्हणजे का गंध? धर्म म्हणजे का माळा? धर्म म्हणजे का जानवें? धर्म म्हणजे का हरिहरी म्हणणें? जप करणें? धर्म म्हणजे का कांहीं न करतां भोग भोगायचे? धर्म म्हणजे का घंटा वाजविणें, शंख फुंकणें? धर्म म्हणजे का वाद्यबंदी? धर्म म्हणजे का वाद्य वाजविणें? धर्म म्हणजे काय?

धर्माची अत्यंत शास्त्रीय व्याख्या भारतीय संस्कृतीनें केली आहे. "धारणात् धर्मः" ही ती व्याख्या. सर्व समाजाचें धारण ज्यानें होतें तो धर्म. धारण कोणाचें? माझें, माझ्या जातीचें, माझ्या देशाचें, मानवजातीचें का चराचर सृष्टीचें? मानव हा सर्व सृष्टींतील थोर प्राणी आहे. थोरवी फुकाफुकीं मिळत नसते. थोरवी म्हणजे जबाबदारी. मानवानें सर्वांची व्यवस्था लावायची. मानवाच्या

नीतिशास्त्रांत सर्व सृष्टीचा विचार हवा. मानवानें मानवाशीं कसें वागावयाचें याचा विचार पाहिजेच. परंतु पशुपक्ष्यांशीं, तृण-वृक्ष-वनस्पतींशीं, नदीनाल्यांशीं कसें वागावें याचेंहि विवेचन मानवी नीतिशास्त्र करील.

मनूनें आपल्या स्मृतीला ' मानवधर्मशास्त्र ' असें नांव दिलें. आर्यांचें, भारतीयांचें, असें नांव त्यानें दिलें नाहीं. मनु मानवांचा धर्म सांगत आहे. मनु त्याच्या दृष्टीनें मानव्याचा आचार सांगत आहे. मनूचे विचार आज पटणार नाहींत. त्याची दृष्टि आज सदोष वाटेल. परंतु मनु मानवजातीचा विचार करीत आहे ही गोष्ट थोर आहे. " मानवधर्मशास्त्र " हा शब्दच हृदयाला व बुद्धीला आनंद देतो.

तेव्हां धर्म धारण करणार तें मानवजातीचें. मानवेतर सृष्टि क्षणभर दूर ठेवूं या. निदान मानवाचें कल्याण तरी पाहूं या. मनु सांगतो, " सर्व मानवांचा विचार करा." अर्थशास्त्र सर्व मानवजातीच्या कल्याणावर उभारलेलें असलें पाहिजे. जें अर्थशास्त्र विवक्षित जात, विवक्षित धर्म, विवक्षित राष्ट्र यांचाच विचार करतें, तें अर्थशास्त्र धर्ममूल नाहीं. धर्ममूल अर्थशास्त्र सर्वांचा विचार करील.

हिंदुस्थानला भिकारी करून इंग्लंड धनकनकसंपन्न होणार असेल, तर इंग्लंडचें अर्थशास्त्र अधर्ममूल आहे. चीनचा गळा दाबून जपान गबर होत असेल, तर जपानचें अर्थशास्त्र अन्यायाचें आहे. अनार्य जातींना दास करून केवळ आर्यांचा उदोउदो करूं पाहणारें अर्थशास्त्र सदोष आहे. मुसलमानांस वगळून केवळ हिंदूंना श्रीमंत करणारें अर्थशास्त्र सनातन संस्कृतीचें नाहीं. ब्राह्मणेतरांना वगळून ब्राह्मण श्रीमंत होऊं पाहतील, हरिजनांना वगळून ब्राह्मणेतर धनिक होऊं पाहतील, महाराष्ट्राला मारून गुजरात श्रीमंत होत असेल, बंगालला बुडवून मारवाडी कुबेर होत असतील, तर तेथें धर्ममय अर्थशास्त्र आहे असें म्हणतां येणार नाहीं. कुळांना लाचार करून, रात्रंदिवस गुलामांप्रमाणें राबवून, त्यांनीं पिकविलेलें आयतें आपल्या कोठारांत भरून श्रीमंत होणारा जमीनदार पापी आहे. मजुरांना दहा दहा तास बैलांप्रमाणें राबवून, पोटभर खायला न देणारा, त्यांच्या राहण्याची नीट सोय न लावणारा, त्यांच्या मुलांबाळांची फिकीर न करणारा, त्यांना पगारी रजा न देणारा, त्यांच्या सुखाची काळजी न करणारा, असा श्रीमंत होणारा कारखानदार हा पापी आहे. ह्या सर्वांचें अर्थशास्त्र अन्यायावर, अधर्मावर उभारलेलें आहे. शेतकऱ्याला पिको न पिको, भरमसाट व्याजाचे दर



आकारून त्याच्या पिकावर जप्ती नेऊन त्याच्या घरादारावर नांगर फिरविणारा, त्याचीं आवडतीं गायीगुरें बांधून घेऊन जाणारा, मुलांबाळांना अन्नास मोताद करणारा, खुशालचेंडू, हृदयहीन, कृपणमति सावकार हा अधर्माचें अर्थशास्त्र चालवीत आहे.

आज सर्व जगांत हेंच अधर्माचें अर्थशास्त्र अमलांत आहे. म्हणून तर सर्वत्र विषमता आहे. म्हणून दुःख, दैन्य, दारिद्र्य, यांचा सुकाळ आहे. कांहीं भांडवलवाले सर्व जगावर सत्ता गाजवीत आहेत. भारतीय संस्कृति ही गोष्ट सहन करणार नाहीं. भारतीय संस्कृति अद्वैतावर उभारलेली, समाजधारणेवर उभारलेली आहे.

सर्वेऽत्र सुखिनः सन्तु
सर्वे सन्तु निरामयाः
सर्वे भद्राणि पश्यन्तु

हीं भारतीय संस्कृतीचीं ध्येयें आहेत. एकाला सुखी करण्यासाठीं, एकाला चैनींत लोळावयास मिळावें म्हणून लाखों लोकांनीं कसेंतरी कीडमुंगीप्रमाणें जगावें, मरमर मरावें, असें भारतीय संस्कृति सांगत नाहीं.

अवघाचि संसार सुखाचा करीन।
आनंदें भरीन तिन्ही लोक ॥

ही भारतीय संतांची घोषणा आहे. सर्वांना सुखी व समृद्ध करण्याचा झेंडा संतांनीं खांद्यावर घेतला आहे. मजुरांना पशूप्रमाणें, गुलामांप्रमाणें वागवणारे दांभिक कारखानदार, शेतकऱ्यांना पिळणारे दांभिक सावकार, कुळांना गांजणारे खोत व जमीनदार आणि या पिळवणुकीला आशीर्वाद देणारे दांभिक संतमहंत हे भारतीय संस्कृतीचे उपासक नाहींत. सनातन संस्कृति त्यांना कळत नाहीं, समजत नाहीं. विशाल हृदयांच्या थोर ऋषींनीं भारतीय संस्कृति निर्मिली आहे. संकुचित व क्षुद्र वृत्तीच्या अनुदार लोकांना ती समजेल असें मला वाटत नाहीं. आज भारतीय संस्कृतीच्या नांवाखालीं मोठमोठ्या गप्पा मारणारे लोक विषमता निःशंक पहात आहेत. त्यांना त्याचें दुःख नाहीं. श्रमहीन छळणाऱ्या श्रीमंतांना त्यांचे शत आशीर्वाद आहेत. हे श्रीमंत कितीजणांना रडवीत आहेत इकडे त्यांचें लक्ष नसतें. ' भारतीय संस्कृति, भारतीय संस्कृति ' म्हणून गाजावाजा करणारे हे लोक भारतीय संस्कृतीचा वध करीत आहेत ! संतांना व ऋषींना धुळींत मिळवीत

आहेत ! उपनिषदें व वेदान्त यांना मूठमाती देत आहेत ! भारतीय संस्कृतीचा आत्मा साम्यवादीच ओळखूं शकेल.

"दारिद्रान् भर कौन्तेय"

असा महाभारतांत अर्थशास्त्राचा सिद्धान्त सांगितला आहे. जो दरिद्री आहे, त्याचें भरण केलें पाहिजे. जे खळगे असतील ते भरून काढले पाहिजेत. परंतु एकीकडचे खळगे भरून काढावयास दुसरीकडच्या टेकड्या खणाव्या लागतील. आज समाजांत एकीकडे पैशाचे ढीग आहेत आणि दुसरीकडे कवडी नाहीं. हे पैशाचे ढीग सर्वत्र वांटून दिले पाहिजेत.

समाजांतील संपत्तीचीं साधनें समाजाच्या मालकीचीं हवींत. व्यक्तीची त्याची मालकी अपायकारक आहे. विशेषतः प्रचंड उत्पादनाचीं साधनें तरी खाजगी असतां कामा नये. याशिवाय समाजांतील हे खळगे दूर करतां येणार नाहींत. समाजांत जी संपत्ति निर्माण होईल, तिचें नीट विभजन झालें पाहिजे.

आजपर्यंत जो तो आपल्या विशेष गुणधर्माची विशेष किंमत करीत असे. परंतु कोणत्याहि कर्माची, कोणत्याहि कौशल्याची किंमत आपण कशी ठरविणार ? मजुराच्या आठ तास अंग मोडून केलेल्या कामाची का दोन आणेच किंमत, आणि डॉक्टरच्या पांच मिनिटें भेटीची का तीन रुपये किंमत ? कारकुनाच्या कामाची का महिना पंधरा रुपयेच आणि मामलेदाराच्या श्रमांची चारशें रुपये ? प्राथमिक शाळेंतील शिक्षकाच्या अध्यापनाची का वीस रुपये किंमत आणि प्रोफेसराच्या प्रत्यहीं २-३ तास शिकविण्याची का हजार-पांचशें किंमत ? थंडीवाऱ्यांत, रात्रीं-बेरात्रीं दिवा दाखवणाऱ्या रेल्वेच्या कामगाराची का दहा रुपये किंमत आणि गाडी-वरून हिंडणारा इंजिनियर त्याच्या श्रमांची का पांचशें रुपये किंमत ? रस्ता झाडणाऱ्याला महिना पांच रुपये आणि एका गवयाच्या तासभर गायनाला पांचशें रुपये ?

या किंमती कोण ठरवितो, हें मोल कसें निश्चित करावयाचें ? एकादा मिलचा मालक म्हणतो, "मीं प्रथम माझें भांडवल घातलें. मी हिंडलों, शेअर जमविले, भांडवल वाढविलें, सर्व योजना आंखली, संघटना केली, म्हणून ही गिरणी उभी राहिली. माझ्या या कर्तबगारीची किंमत करतां येणार नाहीं. मजुरांना थोडीशी मजुरी देऊन बाकी उरेल तो सारा फायदा माझ्या संघटनाबुद्धीची, माझ्या कल्पकतेची, माझ्या व्यवस्थाचातुर्याची किंमत आहे. मी ती घेणार. यांत अन्याय नाहीं. यांत अधर्म नाहीं. माझ्या विशेष गुणांचा मोबदला मीं कां न घ्यावा ?"



परंतु या लोकांना समजत नाहीं कीं तो तो गुणसुद्धां विशिष्ट वातावरणामुळें व परिस्थितीमुळें त्यांना मिळाला. मनुष्याचे गुण हे समाजनिर्मित आहेत. त्या गुणांचें श्रेय त्याला नसून विशेष परिस्थितीला आहे. त्या गुणांची ऐट मनुष्याला नको. निरनिराळे गुण माणसांत आढळतात. त्या गुणांचा अभिमान त्याला नको. त्या त्या गुणांसाठीं त्यानें समाजाचें ऋणी राहिलें पाहिजे आणि त्या गुणांचा फायदा समाजाला दिला पाहिजे.

एकादा बलभीम येऊन जर म्हणेल, "मी बलवान् आहें. माझ्या शक्तीचा मी वाटेल तो उपयोग करीन. इतरांस तुडवीन, बुडवीन, छळीन, पिळीन" तर तें योग्य होईल का ? माझ्याजवळ शक्ति आहे, ती इतरांच्या रक्षणार्थ आहे, दुसऱ्याच्या कल्याणासाठीं आहे. कारण माझी शक्ति माझी नाहीं. तीहि समाजानें दिली आहे. समाजानें मला खायला-प्यायला दिलें. सृष्टीनें मला प्रकाश दिला, हवा दिली, म्हणून मी जगलों, बलवान् झालों. माझी शक्ति मीं मला वाढणाऱ्या समाजाच्या सेवेंत खर्चिली पाहिजे.

भारतीय संस्कृति सांगते, कीं आपापल्या वर्णाप्रमाणें सेवेचीं कर्में उचला. परंतु त्या कर्मांत प्रतवारी लावूं नका. बौद्धिक कर्मांची विशेष किंमत. शारीरिक श्रमांची कमी किंमत असें नका लेखूं. कोणत्याहि कर्माची कोणत्या क्षणीं किती किंमत येईल, त्याची कल्पना करतां येणार नाहीं. ज्यानें त्यानें आपल्या विशिष्ट गुणधर्मा-प्रमाणें, आपल्या शक्तीप्रमाणें, आपल्या पात्रतेप्रमाणें कर्म करावें. ज्याला देखरेख करतां येईल त्यानें देखरेख करावी; यंत्र दुरुस्त करतां येईल त्यानें यंत्र दुरुस्त करावें; यंत्र चालवतां येईल त्यानें चालवावें. कर्में निरनिराळीं असलीं म्हणून त्याचा मोबदला कमीअधिक नको.

लायकीप्रमाणें काम व जरुरीप्रमाणें मोबदला हा धार्मिक अर्थशास्त्राचा सिद्धान्त आहे. दोन मजूर आहेत. एक अधिक कुशल आहे. दुसरा तितका नाहीं. परंतु जो कुशल आहे त्याला दोनच मुलें आहेत व जरा कमी कुशल आहे त्याला चार आहेत समजा. तर हुशार मजुरापेक्षां त्या कमी कुशल मजुराला अधिक मजुरी द्यावी लागेल. कारण त्याची गरज अधिक आहे. समाजानें त्या मुलांची स्वतंत्र रीतीनें तरी व्यवस्था करावी किंवा मजुराला मजुरी अधिक द्यावी.

कारकुनाला चार मुलें असतील व मामलेदाराला मुळींच मूल नसेल, तर कारकुनाला पन्नास रुपये पगार द्या व मामलेदाराला पंधरा द्या. मामलेदार

आपण शेती करतों, पृथ्वीची झीज होते. ती झिजून आपणांस धान्य देते, तिचा कस, तिचें सत्त्व कमी होतें. आपण तिची झीज भरून काढली पाहिजे. आपण तिला नांगरून ठेवतों. सूर्याची उष्णता तिच्या आंत शिरते. आपण तिच्यांत खत घालतों. अशा रीतीनें तिचा कस पुन्हां आपण भरून काढतों. आपण पृथ्वीसाठीं जी ही झीज सोसली, उन्हांत नांगरलें, खत ओतून पैसे खर्च केले, ही जी आपण शारीरिक व आर्थिक झीज पृथ्वीसाठीं केली, ती झीज उत्कृष्ट पीक देऊन पृथ्वी भरून काढते. ती माझ्यासाठीं झिजते, मी तिच्यासाठीं झिजतों.

गीतेच्या तिसऱ्या अध्यायांत हें महान् यज्ञतत्त्व सांगितलें आहे. परमेश्वरानें सृष्टि निर्माण करतांनाच यज्ञतत्त्व निर्माण केलें आहे.

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ।
अनेन प्रसविष्यध्वम् एष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥

प्रभु म्हणाला, " लोक हो ! हा यज्ञहि तुमच्याबरोबर मीं निर्माण केला आहे. या यज्ञानें सर्व कांहीं मिळवून घ्या. या यज्ञालाच कामधेनु समजा. " परमेश्वरानें सकल सुखाचें साधन जें यज्ञ तें आपल्या स्वाधीन केलें आहे. परमेश्वराच्या नांवानें आतां रडण्यांत कांहीं अर्थ नाहीं. त्याच्या नांवानें हांका मारूं नका. त्याच्या नांवानें बोटें मोडूं नका. आपणांस जर दुःख असेल, समाजांत जर विषमता असेल, दुःखदारिद्र्य असेल, समाजांत जर असमाधान, अशांति असेल, प्रक्षुब्धता असेल, तर आपण यज्ञधर्माची नीट उपासना केली नाहीं हेंच त्याचें कारण. तें दुःख दूर व्हावें असें वाटत असेल, तर आपण यज्ञाची पूजा केली पाहिजे. यज्ञ म्हणजेच साधन. यज्ञ म्हणजेच धर्म. यज्ञ म्हणजेच ईश्वर. आपण ईश्वराचें वर्णन " यज्ञस्वरूपी नारायण " असें केलें आहे.

आज मानवी समाजांत हें यज्ञतत्त्व पाळण्यांत येत नाहीं म्हणून मानवी समाज दुःखी आहे. कांहीं वर्ग दुसऱ्यांसाठीं सारखे झिजत आहेत. परंतु त्यांची झीज भरून काढण्यासाठीं मात्र कोणी झिजत नाहींत. मजूर झिजून झिजून भांडवलदारांसाठीं चिपाड होत आहेत. भांडवलदार झिजून झिजून मजुरांसाठीं चिपाड होत नाहीं. तो सारखा लठ्ठच होत आहे ! त्याच्या मोटारी वाढत आहेत, त्याची चैन वाढत आहे. मजूर सुखी व्हावेत म्हणून ही चैन कमी होत नाहीं. परंतु सृष्टि सांगते, " मेघांसाठीं नद्या कोरड्या झाल्या, वापी-तलाव शुष्क झाले, पुष्करिणी आटल्या. परंतु त्यांना पुन्हां भरून टाकण्यासाठीं मेघ रिकामे होतील." मेघांजवळची

झाला म्हणजे तो खंडीभर खातो असांतला भाग नाहीं. पगार हा आवश्यक गरजा भागवण्यासाठीं आहे. मामलेदाराला हिंडावें लागत असेल तर त्याची व्यवस्था सरकार निराळ्या रीतीनें करील. परंतु केवळ खाण्यापिण्यासाठीं म्हणून अधिक पगार नको. मामलेदाराकडे पुष्कळ लोक येणार-जाणार, तर त्याच्यासाठीं कायमचा एक बंगला बांधून ठेवण्यांत येईल म्हणजे झालें.

मामलेदार अधिक लायक असतील, अधिक शिकलेले असतील, कायद्याचा नीट अभ्यास केलेले असतील, तर त्यांच्या हातांत सत्ता अधिक द्या. त्यांच्या लायकीचें काम त्यांना द्या. परंतु पगार हा लायकीवर अवलंबून ठेवणें योग्य नाहीं. लायकीप्रमाणें काम व जरुरीप्रमाणें पगार, हें तत्त्व अमलांत आणलें म्हणजे वर्णधर्म पाळला असें होईल. वर्णधर्म म्हणजे लायकीप्रमाणें समाजाचें काम उचलणें व पोटापुरतें लागेल तें घेणें.

भारतीय संस्कृतींत जें यज्ञतत्त्व सांगितलें आहे त्यांत महान् अर्थ आहे. वर्णधर्मांत लायकीप्रमाणें कर्म उचला हें तत्त्व आहे, तर यज्ञधर्म सांगतो, कीं सर्वांची काळजी घ्या. यज्ञ म्हणजे काय ? यज्ञ या शब्दांत खोल अर्थ आहे. देवांसाठीं यज्ञ करावयाचा. देव आपणांस पाऊस देतात, प्रकाश देतात, वारे देतात. देव आपणांसाठीं झिजतात. देव झिजतात, तर त्यांची झीज आपण भरून काढली पाहिजे. यासाठीं आपण देवांना हविर्भाग द्यावयाचा. आपणांजवळची जी तुपाची संपत्ति, तिचा भाग देवांना अर्पण करावयाचा. देव आपणांसाठीं झिजले, आपण देवांसाठीं झिजूं या. यज्ञ म्हणजे परस्परांची झीज भरून काढणें. तूं माझ्यासाठीं झीज, मी तुझ्यासाठीं झिजतों. मी तुला जीवन देतों, तूं मला जीवन दे.

"जीवो जीवस्य जीवनम्"

या वचनाचा एक प्रकारें विशेषहि अर्थ आहे. प्रत्येक जीव दुसऱ्या जीवाचें जीवन आहे. प्रत्येक प्राणी दुसऱ्यासाठीं झिजत आहे. आपण सारे एकमेकांसाठीं झिजून, त्याग करून, एकमेकांना जीवन देत आहोंत.

कारखानदार मजुरांसाठीं झिजो, मजूर त्याच्यासाठीं झिजोत. कुळें खोतासाठीं झिजलीं, खोत कुळांसाठीं झिजो. शेतकरी सावकारासाठीं झिजले, सावकार त्यांच्यासाठीं झिजो. प्रजा सरकारासाठीं झिजते, सरकार प्रजेसाठीं झिजो. परस्परांची झीज भरून काढूं या.

पाण्याची संपत्ति नदीनाल्यांनीं उन्हानें वाफाळून दिली आहे. त्या नदीनाल्यांची ती तपश्चर्या, ती प्राणमय सेवा मेघ विसरत नाहींत. ते कृतज्ञतेनें ओथंबून खालीं येतात, व सर्वस्व अर्पण करून रिते होतात. पुन्हां त्या भरलेल्या नद्या प्रेमानें आटून मेघांना भरून टाकतात. असा या प्रेमाचा अन्योन्य यज्ञधर्म आहे.

मजुरांनीं म्हणावयाचें, " शेठजी! तुमच्यासाठीं आम्ही यंत्रांजवळ झिजतों. सारी संपत्ति तुमच्या हातांत देतों; घ्या." शेठजीनें म्हणावयाचें, " बंधूंनो! ही सारी संपत्ति पुन्हां तुमच्यासाठीं मी देऊन टाकतों; घ्या." अशा रीतीनेंच समाजांत आनंद राहील.

परस्पर जर याप्रमाणें वागतील, तर समाजांत समता राहील. एकीकडे खळगे व एकीकडे टेकाडें दिसणार नाहींत. एकीकडे प्रचंड प्रासाद, एकीकडे क्षुद्र झोंपड्या हें दुःख दिसणार नाहीं. एकीकडे आनंदमय संगीत तर दुसरीकडे शोकाचें रडगाणें असा हृदयभेदक देखावा दिसणार नाहीं.

पाण्याचा धर्म समान पातळींत राहणें हा आहे. तुम्ही पाण्यांतून एक घागर भरून घ्या. तेथें झालेला तो खळगा भरून काढण्यासाठीं आजुबाजूचे सारे जलबिंदू धांवतात. तो खळगा भरून येतो. एका क्षणार्धात भरून निघतो. तो खळगा पाहण्यांत आजुबाजूच्या बिंदूंना आनंद वाटत नाहीं. परंतु याच्या उलट रस्त्यावरचे खडीचे ढीग पहा. एका बाजूनें तुम्ही जर खडी नेलीत, तर तेथील खळगा भरून काढण्यासाठीं आजुबाजूची खडी धांवणार नाहीं. तो खळगा आपणांस दिसतो. चार-दोन खडे, अगदीं जवळचे खडे धांवतात. परंतु पुष्कळसे गंमतच पाहतात. दगडच ते! त्यांना थोडेंच दुःख आहे?

समाजांत हीच दगडांची स्थिति आहे. पाण्याच्या बिंदूप्रमाणें आपण सहृदय नाहीं. म्हणूनच जीवन सुकत चाललें आहे. आपण परस्परांचे खळगे भरून काढून समता निर्मीत नाहीं. यज्ञधर्माचा लोप झाला आहे. अग्निहोत्रांचे यज्ञ व बोकडांचे यज्ञ विक्षिप्त लोक पुन्हां सुरू करीत आहेत. परंतु " परस्परं भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ " एकमेकांची काळजी घेऊन, एकमेकांबद्दल भावना बाळगून आनंद मिळवून घ्या; खरें कल्याण, खरें श्रेय ( स्वतःचें फक्त नव्हे ) प्राप्त करून घ्या असें जें भगवद्गीत यज्ञकर्म, त्याचें पुनरुज्जीवन करावयाचें कोणाच्याच मनांत नाहीं. आणि " हें यज्ञकर्म करा; झिजणाऱ्या मजुरांची, श्रमणाऱ्या शेतकऱ्यांची झीज नीट भरून काढा, " असें अट्टाहासानें सांगणाऱ्या साम्यवादी, ध्येयवादी



जवाहरलालांसारख्यांची धर्मशून्य म्हणून संभावना होत आहे! जवाहरलाल गीतेचा महान् यज्ञधर्म आचरा व परमश्रेय प्राप्त करून घ्या असें सांगत आहेत. थोर यज्ञधर्माची दीक्षा यज्ञहीनांस देऊं पाहणारे ते थोर धर्मसेवक आहेत.

साम्यवादी लोक म्हणत असतात, धर्म वगैरे आम्ही कांहीं समजत नाहीं. धर्म म्हणजे अफूची गोळी आहे. आम्हांला सर्वांना सुखी कसें करावें याची प्रखर चिंता आहे. हाच आमचा खरा धर्म. " साम्यवादी लोक " धर्म " या शब्दाला कां कंटाळणार नाहींत? जो धर्म लाखों लोकांची दैना आनंदानें बघतो, तो का धर्म? त्या धर्माचें नांव त्यांना कसें सहन होईल?

उपनिषदांत म्हटलें आहे, " येन ज्ञातं तेन न ज्ञातम्। येन न ज्ञातं तेन ज्ञातम्। " जो म्हणेल कीं मला समजतें, त्याला कांहींहि समजलें नाहीं. आणि जो म्हणेल कीं मला कांहीं कळत नाहीं, त्यालाच सारें कळलें. त्याप्रमाणें जे धर्म धर्म म्हणून शंख करतात व लाखों लोकांची उपासमार होत असतां सुखांत नांदतात त्यांना धर्म नाहीं. आणि जे " धर्मबिर्म आम्हांस समजत नाहीं, परंतु सारा समाज, सुखी, आनंदी, ज्ञानी कसा होईल याचा ध्यास आम्हांस लागला आहे, यासाठीं आम्ही जगूं-मरूं " असें म्हणतात व रात्रंदिवस तडफडत काम करतात, रक्ताचा बिंदून् बिंदु आटवतात, त्यांच्याजवळच धर्माची पवित्र मूर्ति आहे.

जे कां रंजले गांजले। त्यासीं म्हणे जो आपुले।
तोचि साधु ओळखावा। देव तेथेंची जाणावा॥

ज्ञानेश्वरीवर, गीताभागवतावर प्रवचनें करणारे, श्रम न करतां शिरापुरी खाणारे, पाद्यपूजा घेणारे, पुज्या खाणारे, सुखांत राहून अद्वैतावर भाषणें करणारे हे संत नव्हत. त्यांच्याजवळ ना देव, ना धर्म. धर्म त्याच्याजवळ आहे, जो रंजल्यागांजल्यांची बाजू घेतो, त्यांना पोटाशीं घेतो.

दया करी जे पुत्रांसीं। तेचि दासा आणि दासी

अशा भेदातीत वृत्तीनें सर्वांचीं दुःखें दूर करावयासाठीं तो प्राणपर कष्ट करतो. हिंदु-मुसलमान बघत नाहीं. पीडलेले सारे मजूर-शेतकरी माझे. त्यांच्यासाठीं मी तळमळेन. स्पेनमधील गरीब जनता तडफडत आहे का? एक आणा त्यांना पाठवून दे. पैसा नसेल तर सहानुभूति तरी दाखवूं दे. त्यांचें दुःख तें माझें दुःख आहे. माझा केवळ सहानुभूतीचा शब्दहि त्यांना धीर देईल. आज सारी

सृष्टि जवळ येत आहे. आगगाडी, आगबोट, विमान, बिनतारी यंत्र, आकाशवाणी, सर्व साधनांनीं मानव जवळ जवळ येत आहेत. दूर दूर असलेले भाऊ जवळ येत आहेत. घेऊं दे त्यांना जवळ. त्यांच्यापासून का मी दूर राहूं ? माझा हात सर्वांसाठीं आहे, माझे अश्रू सर्वांसाठीं आहेत, माझें हृदय सर्व पददलितांसाठीं तडफडत आहे, असें जो म्हणेल, असा जो वागेल, हें ज्याचें महनीय, स्तवनीय ध्येय, त्याच्याजवळ संतत्व आहे, ऋषित्व आहे. त्याच्या जवळ खरा धर्म आहे. देव कोठें असलाच तर त्याच्याजवळ असण्याचा संभव आहे.

**तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनीं**

अशा महान् सज्जनांजवळ प्रत्यक्ष रोकडा देव आहे.

अग्नि म्हणजे देवांचें मुख. आपणांसाठीं झिजलेल्या देवाचें तोंड म्हणजे अग्नि. या अग्नींत आहुति द्या म्हणजे देव तृप्त होतील.

**अग्निर्वै देवानां मुखम् ।**

हा अग्नि कोठें आहे ? लाखों श्रम करणाऱ्या लोकांचा जठराग्नि पेटला आहे. त्या अग्नींत आहुति द्या. त्या श्रमणाऱ्या देवांच्या पोटांत आग पेटली आहे. ती आग शान्त करण्यासाठीं उठा सारे सनातनी, उठा सारे शेठसावकार, उठा धर्माच्या नांवानें गप्पा मारणाऱ्या खोतांनो, जमीनदारांनो, संतमहंतांनो, महाराजांनो ! हा भावाबहिणींच्या, त्यांच्या गोड मुलांबाळांच्या पोटांतील अग्नि तृप्त करणें म्हणजे महान् यज्ञ, म्हणजे खरा धर्म.

परंतु हा यज्ञ सनातनींस समजेनासा झाला आहे. लाखों गरिबांची हायहाय त्यांना दिसत नाहीं. त्यांची बुद्धि मेली आहे, हृदय सडलें आहे. केवळ कार्पण्य त्यांच्याजवळ उरलें आहे. दुसऱ्याची उपासमार पाहून त्यांचें पोट दुखत नाहीं. सज्जनगडावरची एक गोष्ट जुने लोक सांगतात. दासनवमीचा सज्जनगडावर नऊ दिवस उत्सव असतो. नऊ दिवस गडावर येणाऱ्या सर्वांस जेवण मिळतें. समर्थांच्या गादीवर जे महाराज असतील त्यांनीं गडावर कोणी उपाशी नाहीं ना, अशी सर्वत्र चौकशी करून मग रात्रीं जेवावयाचें. एकदां काय झालें, असा उत्सव चालला होता. परंतु एके दिवशीं मध्यरात्रीं महाराजांचें पोट दुखूं लागलें. कांहीं केल्या राहीना. शेवटीं महाराज म्हणाले, "गडावर कोणी उपाशी तर नाहींना राहिला ? जा पाहून या." मंडळी मशाली पाजळून धांवली. चौकशी सुरू झाली. एका झाडाखालीं एक माणूस–आंधळा का पांगळा–भुकेनें तडफडत



होता. मंडळींनीं त्याला उचलून नेलें. महाराजांनीं त्याला पोटभर गोड बोलून जेवूं घातलें. महाराजांचें पोट दुखायचें थांबलें. गरिबाचें पेटलेलें पोट शांत होतांच महाराजांचें पोट शान्त झालें !

अशी ही धर्ममय पोटदुखी किती सनातनींना आहे ? किती संस्कृतिसंरक्षकांना आहे ? धर्माच्या नांवानें कंठशोष करणाऱ्यांत आहे ? दुसऱ्यांचीं पेटलेलीं पोटें, तीं यज्ञकुंडें, ते पवित्र जठराग्नी, शान्त होत नाहींत म्हणून किती जणांना अशान्ति वाटते, किती जणांचे डोळे दुःखानें ओले होतात, संतापानें पेटतात ? ज्याचें असें पोट दुखेल तो खरा समर्थांचा भक्त; ज्याचें असें पोट दुखेल तो भारतीय संस्कृतीचा खरा उपासक; तो संतांचा सेवक, ऋषींचा पूजक. म्हणून महात्माजी, जवाहरलाल यांच्यासारखे तळमळणारे आत्मे हे खरोखरच संस्कृतिसंरक्षक आहेत; संतांचे व ऋषींचे सत्पुत्र म्हणून शोभतात. खरें अग्निहोत्र अहोरात्र त्यांनीं चालविलें आहे व महान् प्रखर दीक्षा शेंकडों तरुणांस ते देत आहेत.

धर्ममय अर्थशास्त्र अशा दृष्टीचें आहे. धर्मार्थकाममोक्ष या चतुर्विध पुरुषार्थांतील 'अर्थ' अशा थोर धर्माच्या पायावर उभारला गेला पाहिजे. सर्व समाजांतील शक्तीचें नीट धारण होईल, नीट पोषण होईल अशा स्वरूपाचें हें अर्थशास्त्र पाहिजे. सर्व मानवजातीचें हित पाहणारें असें मग हें अर्थशास्त्र होईल. या अर्थशास्त्राला अजून आरंभहि झाला नाहीं. म्हणून जगांत मोक्ष किंवा स्वातंत्र्य अद्याप कोठेंच नाहीं. मोक्षाचा जन्म अद्याप व्हावयाचा आहे. आपण सारे गुलाम आहोंत. हिंदुस्थानच इंग्लंडचें गुलाम आहे असें नाहीं, तर इंग्लंडहि हिंदुस्थानचें गुलाम आहे. हिंदुस्थान माल घेईल तरच इंग्लंड जगणार ! चार नोकर श्रीमंत धन्याला कुबड्या देऊन चालवतात, त्यांतलाच हा प्रकार आहे. ते नोकर श्रीमंताचे गुलाम व तो श्रीमंत त्या नोकरांचा गुलाम ! ते नोकर जर आधार देणार नाहींत तर तो लुळापांगळा श्रीमंत धुळींत मिळेल. हिंदुस्थान इंग्लंडचा आधार काढून घेईल तर इंग्लंड मरेल. दुसऱ्यास गुलाम करणारा स्वतःहि नकळत गुलाम होत असतो. जें पेरावें तें मिळत असतें. एक श्रीमंत गुलाम व एक दारिद्री गुलाम ! एक ढेरपोट्या गुलाम व एक पोटाची दामटी वळलेला गुलाम ! एक गाल वर आलेला गुलछबू गुलाम, एक बसक्या गालांचा निस्तेज गुलाम ! परंतु शेवटीं दोघेहि गुलामच !

जगांत जोंपर्यंत धर्ममय अर्थशास्त्र येत नाहीं, सर्वोदय करणारें, मानवास साजेसें अर्थशास्त्र येत नाहीं, तोंपर्यंत जगांत खरें स्वातंत्र्य नाहीं. आज स्वातंत्र्याचीं सोंगें आहेत. स्वातंत्र्याच्या पडछाया आहेत. स्वातंत्र्याचीं पिशाच्चें आहेत. खरें मंगलदायक व आनंददायक, सर्वांचा सर्वांगीण विकास निरपवाद करूं पाहणारें स्वातंत्र्य अद्याप बहुत दूर आहे. पृथ्वीला या मंगलमय बालकाच्या प्रसववेदना थोड्या थोड्या होऊं लागल्या आहेत. पृथ्वीच्या पोटाच्या एका कोपऱ्यांत या कळा सुरू झाल्या आहेत. परंतु प्रसववेदना पूर्ण होऊन दिव्य स्वातंत्र्य-बालक जन्माला यावयास किती युगें लागतील तें कोण सांगू शकेल ?

धर्ममय अर्थशास्त्र, त्याप्रमाणेंच धर्ममय कामशास्त्र. भारतीय संस्कृति कामाला गाडूं पहात नाहीं. काम म्हणतांच कानांवर हात ठेवूं पाहणारी ती नाहीं. मानवी विकारांची व्यवस्था लावणारी ही संस्कृति आहे. विकारांतून विकास करूं पाहणारी ही संस्कृति आहे. श्रीमद्‌भगवद्गीता म्हणते :

" धर्माऽविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ "

ज्या कामाचा धर्माशीं विरोध नाहीं, तो मर्यादित काम म्हणजे माझेंच स्वरुप. तो मर्यादित काम म्हणजे मी परमेश्वर. ती माझीच एक दिव्य विभूति !

भारतीय संस्कृतीनें कामालाहि धर्माचें अधिष्ठान दिलें; आणि धर्म म्हणजे समाजाचें धारण. मानवजातीचें धारण. माझ्या विषयभोगानें समाजाचें स्वास्थ्य बिघडतां कामा नये, समजांत अशान्ति उत्पन्न होतां कामा नये. समाजांत दुःख, दैन्य, दास्य, दारिद्र्य उत्पन्न होतां कामा नये. माझा विषयभोगहि समाजाला सुखकर झाला पाहिजे.

काम या शब्दांत पंचेंद्रियांचे जरी भोग आले, तरी मुख्यतः स्त्री-पुरुषसंबंधच आपल्या दृष्टींसमोर उभा राहतो. आणि स्त्री-पुरुषसंबंध ही महत्त्वाचीच गोष्ट आहे. या संबंधावर समाजाचें स्वाथ्यच नव्हे, तर समाजाचें अस्तित्वहि अवलंबून आहे.

अती वीषयी सर्वदा दैन्यवाणा ।

सदैव विषयांतच जो रमला, तो दीनदुबळा होणार. त्याला उत्साह राहणार नाहीं. मग समाजाची सेवा तो काय करणार ? स्वतःचें कर्म नीट कसें पार पाडणार ? समाजाचें कर्म नीट पार पाडतां यावें म्हणून आपण मर्यादितच विषयसुख घेतलें पाहिजे.



स्त्री-पुरुषांचे परस्परसंबंध प्रेमाचे हवेत. स्त्री म्हणजे कांहीं सत्तेची एक वस्तु नाहीं. तिला हृदय आहे, बुद्धि आहे. तिला भावना आहेत. तिला स्वाभिमान आहे. तिला आत्मा आहे. तिला सुख-दुःख आहे. या सर्व गोष्टींची जाणीव पुरुषानें ठेवली पाहिजे. स्त्री म्हणजे जगांतील महान् शक्ति. या शक्तीशीं वागणाऱ्या पुरुषानें शिव झालें पाहिजे. शिव व शक्ति यांच्या प्रेमावर सर्व समाजाचा प्राण अवलंबून आहे. शिव व शक्ति यांच्या प्रेममय परंतु संयममय संबंधांपासूनच कर्तृत्ववान् कुमारांचा संभव होत असतो. शौर्यधैर्याचे सागर, विद्येचे आगर असे सत्पुत्र जन्माला येतात.

मनुष्यानें नेहमीं आपल्या कृतीचा परिणाम काय होईल याचा विचार करून त्या कृतीला आरंभ केला पाहिजे. स्त्री-पुरुषसंबंधापासून मुलेंबाळें जन्मणार. एक मूल जन्माला घालणें म्हणजे एक देवाची मूर्ति निर्माण करणें होय. या देवाची आपणांस नीट काळजी घेतां येईल का, याला पोटाला पुरेंसें देतां येईल का, याच्या वर्णाचा नीट विकास करतां येईल का, याचा विचार आईबापांनीं करावयास हवा. नाहीं तर घरांत खंडीभर मुलें चिरचिरीं रोगी दिसत आहेत. त्यांना ना शिक्षण, ना संरक्षण. आशानें सुखाचा संसार कसा होणार, आणि तो समाजहि कसा तेजस्वी राहणार ? त्या समाजाचें धारण कसें होणार ?

खरें पाहिलें तर, अर्थशास्त्र सुधारल्याशिवाय कामशास्त्र सुधारणार नाहीं. धर्ममय, समाजाचें नीट धारणपोषण करणारें, सर्वांचा विकास करूं पाहणारें अर्थशास्त्र जोंपर्यंत नाहीं, तोंपर्यंत तेजस्वी कामशास्त्र तरी कसें संभवणार ? मजुराला का आम्हीं ब्रह्मचर्याचे धडे शिकवीत बसायचें ? वरच्या वर्गांनीं वाटेल तशी चैन करावयाची आणि मजुरांच्या मुलांची उपासमार व्हावयाची ! श्रीमंत दोन तऱ्हांनीं पाप करीत आहेत. श्रीमंत आतां संततिनियमन करून खुशाल माड्या-महालांत भोग भोगीत असतात. समाजाला बालकेंहि देत नाहींत. समाजाचें हें महान् कर्म ते टाळूं पहात आहेत. समाजांत संपत्तीची निर्मिति मजुरांनींच करावयाची आणि मुलांची निर्मिति करून समाजाचें अस्तित्वहि त्यांनींच टिकवावयाचें ! परंतु मजुरांच्या मुलांना पोटभर खायला मिळेल अशी व्यवस्थाहि हे श्रीमंत करूं इच्छीत नाहींत. श्रीमंत स्वतः संतति निर्माण करीत नाहींत, आणि जे संतति निर्माण करितात त्यांच्याजवळ संपत्ति निर्माण करूनहि संपत्ति नाहीं ! गरिबांनींच झिजून संपत्ति निर्माण करावयाची आणि गरिबांच्या बायकांनींच

झिजून संततीहि निर्माण करावयाची! मेणबत्ती बिचारी दोन्हीकडून पेटली तर लवकरच खलास होईल झालें!

मजुरांजवळ पोटाला पुरेंसें नाहीं आणि संततिनियमनाचीं साधनेंहि त्यांच्याजवळ नाहींत. संततिनियमनाविरुद्ध सनातनी आरडाओरड करितात. परंतु मजुरांच्या मुलांना पोटभर खावयाला मिळेल, त्या मुलांच्या वर्णाप्रमाणें त्यांना शिक्षण मिळेल, असें धर्ममय अर्थशास्त्र समाजांत निर्माण करण्यासाठीं मात्र ते ओरडत नाहींत! जोंपर्यंत समाजांत ही विषमता आहे, तोंपर्यंत गरिबाला संततिनियमनाशिवाय कोणता मार्ग? त्याला का ब्रह्मचर्याचे उपदेश पाजणार? ती दुःखावर डागणी आहे.

परंतु हें संततिनियमनाचें ज्ञान तरी मजुराला कोण देणार? ज्ञानाचीं साधनेंहि श्रीमंतांसाठींच आहेत. ते उपायहि श्रीमंतच करूं शकतात. औषधाला दिडकी ज्याच्याजवळ नाहीं, तो कोठून आणणार डॉक्टर? साध्या आरोग्याचें ज्यांना ज्ञान नाहीं, तो या गुंतागुंतीच्या शास्त्रांत कसा नीट वागणार? मजुराच्या संसारांत खायला नाहीं, ल्यायला नाहीं, शिकायला नाहीं, तेथें सारा अंधार आहे! मुलें उत्पन्न होणार व समाज दिवसेंदिवस दीन, दरिद्री, दुःखी होणार!

धर्ममय अर्थशास्त्र समाजांत आल्यावर तें या सर्व गोष्टींचा विचार करील. पृथ्वीवर किती माणसें जगूं शकतील? कितींचें पोषण होईल? पडीत जमिनी लागवडीस आणूं. सुधारलेली शेती करूं. विद्युत्–उष्णता देऊन वर्षांतून चार-चार पांचपांच पिकें घेऊं. वाळवंटेंहि सुपीक करूं. कृत्रिम पाऊस पाडूं. लोकसंख्या वाढत चालली अशी उगीच हाकाटी धर्ममय अर्थशास्त्र करणार नाहीं. आणि किती लोकसंख्या पृथ्वीला चालेल हें पाहून मग नियमन घालील. इतकींच मुलें निर्माण करा असें हें धर्ममय अर्थशास्त्र आज्ञा करील. ज्याप्रमाणें यंत्रांतून जरूर तितकीं वस्त्रें निर्माण केलीं जातील, त्याप्रमाणें धर्ममय अर्थशास्त्रहि जरूर तेवढीं मुलें समाजाला देईल.

ज्या वेळेस हिंदुस्थानांत भरपूर जमीन होती, लोकसंख्याच कमी होती त्या वेळेस "अष्टपुत्रा सौभाग्यवती भव" असा आशीर्वाद देणें म्हणज धर्म्य वस्तु होती; परंतु समाजांत धर्ममय अर्थशास्त्र नसतांना आणि समाजांत लोकसंख्या मात्र भरपूर असतांना "अष्टपुत्रा भव" असा आशीर्वाद देणें म्हणजे शापच आहे! आपण काय बोलतों हेंच आपणांस समजत नाहींसें झालें आहे. "अष्टपुत्रा भव" असा आशीर्वाद देणाऱ्याला जर म्हटलें, "त्या आठ पुत्रांचें पोषण व्हावें म्हणून साम्यवाद समाजांत आणशील का?" तर तो म्हणेल, "अब्रह्मण्यम्! साम्यवादाचें पाप कशाला? नांव काढूं नका त्या भ्रष्ट साम्यवादाचें!" मग पुन्हां त्या आशीर्वाद देणाऱ्याला म्हणा, "आठ पुत्र घेऊन काय करूं? संततिनियमन मला शिकव. तुझा आशीर्वाद नसला तरी मला मुलें होणार. परंतु त्यांचें पोषण कसें करूं? पोषण करावयास समाजाचें धारण करणारें साम्यवादी अर्थशास्त्र आणा असें म्हणतांच तुम्ही रागावतां. तर मग मुलें न होतांच कसा भोग भोगूं तें सांगा. भोग न भोगणें जमणार नाहीं. तें देवांना शक्य झालें नाहीं. ऋषिमुनींना शक्य झालें नाहीं. कोणी भिल्लीण पाहून भुलले, कोणी कोळीण पाहून भुलले. तेव्हां उगीच ब्रह्मचर्याचा मंत्र बोलूं नका. भोग भोगावयाचा, परंतु समाजांत रडकीं दुबळीं मुलें पाहण्याचें तरी दुःख नको. आपले पोटचे गोळे वस्त्रहीन, अन्नहीन, ज्ञानहीन पाहणें मायबापांना का आवडेल? अहो, आपण गायीबैलांनाहि थंडींत झूल करतो. तेव्हां तुम्ही संततिनियमनाचें शास्त्र सांगा." तर तो धर्ममार्तंड "अब्रह्मण्यम्" म्हणून पळून जाईल!



साम्यवाद तरी आणा, नाहीं तर संततिनियमनाचा तरी प्रचार गोरगरिबांत करा. तो प्रचार करणें म्हणजे आज महान् धर्म आहे. परंतु हे दोन्ही महान् धर्म न करतां त्या दोन्ही गोष्टींना अविवेकानें नांवें ठेवणें हें जडत्वाचें लक्षण आहे. हृदयें दगड झाल्याची ती खूण आहे. यांत ना धर्म, ना माणुसकी, ना बुद्धि, ना शास्त्र. हा राक्षसीपणा आहे.

स्त्रियांच्या मनाची तर कोणीच काळजी घेत नाहीं. बिचारीला पोटभर खायला नाहीं, विश्रांति नाहीं; आणि पुनः पुनः बाळंतपणें. आसन्नप्रसवा अशी स्त्री अपार कष्ट करतांना पाहून कोणाचे डोळे भरून येणार नाहींत? स्त्रियांची विषयनिवृत्ति होते, परंतु पुरुषांची होत नाहीं. एक थोर माता माझ्याजवळ म्हणाली, "आपल्या लेकीसुनांचीं मुलें पाळण्यांत असतांना स्वतःच्या मुलांचेहि पाळणे शेजारीं असावत, याची मला लाज वाटते. परंतु काय करायचें? त्यांच्यासाठीं सारें सहन करायचें. त्यांचें पाऊल वांकडें पडूं नये म्हणून जपायचें!"

ते उद्गार मी कधीं विसरणार नाहीं. स्त्रियांना विसावाच पुरुष देत नाहींत. स्त्रियांनाहि कामवासना असते. परंतु कामवासनेचें नियमन जोंपर्यंत करतां येत

नाहीं, आणि समाजांतहि जोंपर्यंत विषमता आहे, तोंपर्यंत संततिनियमन करून भोग भोगणें हाच मर्यादित धर्म ठरतो.

समाजांत रोगी मुलें उत्पन्न होऊं नयेत याची धर्ममय कामशास्त्र काळजी घेईल. आपण पशूंची अवलाद चांगली व्हावी म्हणून खटपटी करीत आहोंत, परंतु माणसांची अवलाद चांगली निघावी म्हणून कोण शास्त्रीय दृष्टीनें खटपट करणार? एकदां गोरक्षणाच्या सभेला अध्यक्ष व्हा म्हणून विवेकानंदांना सांगण्यांत आलें. ते म्हणाले, " मानवरक्षणाच्या सभेचा मी अध्यक्ष होईन. " याचा अर्थ ते गोरक्षण कमी मानीत होते असें नाहीं. परंतु माणसें पशूंसारखीं झालीं आहेत, याची कोणी काळजी घ्यावयाची?

म्हणून जर्मनींत नालायक पुरुषांची कायद्यानें खच्ची करण्यांत आली. समाजाच्या कल्याणासाठीं मनुष्य स्वतःवर विवेकाचें बंधन जर न घालील तर कायद्यानें बंधन त्याच्यावर घालावें लागेल. घोड्याला लगाम द्यावा लागतो, त्याप्रमाणें कायद्याचा कांटेरी लगाम मनुष्यरूपी पशूला घालणें अवश्य होईल! प्रेम, विवेक, संयम या गोष्टी मनुष्याला शेवटीं कायद्यानें शिकवाव्या लागणार का? मनुष्यानें सर्वांसाठीं झिजलें पाहिजे, परंतु तो झिजत नाहीं. मग कायद्याचें व क्रांतीचें साम्यवादी सरकार येतें आणि कायद्यानें झिजवायला लावतें. जे रोगी आहेत त्यांनीं संतति निर्माण करूं नये. परंतु ते ऐकत नाहींत. मग कायद्यानें त्यांना खच्ची करणें भाग पडतें.

म्हणून आपल्या स्मृतींतून विवाह करण्याच्या आधीं वधूवरांची भिषग्रत्नांकडून नीट परीक्षा केली जावी असें सांगितलें आहे.

" स्त्रीत्वे पुंस्त्वे परीक्षितः "

वधू गर्भधारणक्षम आहे ना, कांहीं दोष नाहीं ना, कांहीं रोग नाहीं ना, हें आधीं परीक्षून घ्यावयाचें. तसेंच वर नपुंसक नाहीं, रोगी नाहीं, उत्कृष्ट शक्तीनें संपन्न आहे, हें तपासून घ्यावयाचें आणि मग लग्न लावावयाचें. तरच तें लग्न समाजाच्या कल्याणाचें व वधूवरांनाहि आनंद देणारें होईल. परंतु मला किती तरी उदाहरणें माहीत आहेत, कीं क्लीब पुरुषांनीं पुनः पुनः लग्नें केलीं आहेत. परंतु क्लीबानें शतदां लग्नें केलीं म्हणून का संतति होणार आहे?

एक संतांच्या गादीवरचे महाराज एका श्रीमंताकडे गेले. त्या श्रीमंताला नव्हतें मूलबाळ. ते गादीवरचे महाराज म्हणाले, " पुन्हां लग्न करा. होईल आशीर्वादें



मूल!" त्या श्रीमंतानें पुन्हां लग्नाची तयारी केली. परंतु त्या क्लीबाला का संतति झाली असती? गादीवरच्या महाराजांनीं दुसरे कांहीं प्रयोग केले असते, आशीर्वादाच्या जोडीला कांहीं व्यभिचार जोडले असते, तर कदाचित् झालें असतें मूलबाळ. हे गादीवरचे महाराज विचार करीत नाहींत. पुनः पुनः लग्नें करावयास सांगतात, आणि स्त्रियांचीं जीवनें निराश व निरानंद करण्यांत येतात. अशा स्त्रिया वेड्या होतात, भ्रमिष्ट होतात, किंवा कांहीं घरच्या धष्टपुष्ट हिंदु वा मुसलमान नोकराजवळ विषय भोगतात. अशा कांहीं निरानंद व भ्रमिष्ट स्त्रियांना भुतानें पछाडलें आहे असेंहि मग ठरविण्यांत येतें व भूत काढण्यासाठीं त्यांना मारहाण होते! अरेरे काय हा धर्म! काय ही संस्कृति!

लग्न लावणाऱ्या आचार्यानें आधीं विचारलें पाहिजे, " या वधूवरांची नीट परीक्षा घेतली आहे का? तरच हा धार्मिक विवाह होईल. " परंतु असें विचारणें म्हणजे आचार्याला अब्रह्मण्यम् वाटतें! इतर साऱ्या चौकशा करतात. हुंड्याची चौकशी, शिक्षणाची चौकशी, सारें होतें. परंतु वैद्यकीय चौकशी मात्र होत नाहीं.

वधूवरांचे गुणधर्म म्हणजे मानसिक परीक्षा व वधूवरांचें आरोग्य म्हणजे शारीरपरीक्षा. ह्या दोन परीक्षा झाल्या पाहिजेत. समान वर्णांचा विवाह हवा. आणि वर्ण म्हणजे आवड, रंग असें आपण मागें पाहिलें आहे. मुलीला कसली आवड आहे, कोणतें काम तिला येतें, तिच्या बुद्धीला, हृदयाला कोणता रंग आहे हें पाहिलें पाहिजे. परंतु मुलीच्या अंगाचा वर्ण पाहण्यांत येतो. तिच्या बुद्धीचा व हृदयाचा वर्ण, तिच्या अंतरात्म्याचा वर्ण यांच्याकडे कोणाचें लक्षहि नाहीं! उलट, स्त्रियांना आत्माच नाहीं, म्हणजे एक प्रकारें त्यांना वर्णच नाहीं असें समजण्यांत येतें! म्हणून आजचे सारे विवाह हे अशास्त्रीय व अधार्मिक विवाह आहेत. ज्या विवाहांत स्त्री-पुरुषांच्या हृदय-बुद्धीचा वर्ण पाहण्यांत येईल, त्यांच्या शरीरांची अव्यंगता पाहण्यांत येईल, तेच विवाह खरे शास्त्रीय विवाह होतील.

आज राक्षसगण आहे का देवगण आहे हें पंचांगावरून ठरवतात. ह्याचा वर्ण राक्षसाचा आहे का देवाचा आहे, हें का पंचांगावरून ठरेल? समाज मरत असतां जो स्वतःचीं कोठारें व स्वतःच्या पेट्या भरून ठेवतो तो राक्षस. स्वतःसाठीं राखणारा तो राक्षस व दुसऱ्यास देतो तो देव. वर्ण हे कृतीवरून

ओळखावयाचे. आत्म्याचे रंग प्रत्येक कृतींतून प्रकट होत असतात. ते पंचांगांतून पहावयाचे नसतात.

तसेंच, कांहीं कांहीं लहान जाती त्या जातींतच विवाह करीत असतात. त्या जातींत सर्वांचें रक्त एक होऊन गेलेलें असतें. सारे एकमेकांचे नातलग असतात. खानदेशांत लाडसक्के जात आहे. त्या जातींत सारे परस्परांचे नातलग आहेत. परंतु त्या जातीच्या जरा बाहेर ते विवाह करणार नाहींत. आणि असे हे एका रक्ताचे अशास्त्रीय विवाह सनातनी ब्राह्मण प्रत्येक वर्षी लावीत आहेत! केवढा हा अधर्म! केवढी ही अशास्त्रीयता!

वर्ध्यांच्या सत्याग्रहाश्रमाचे थोर आचार्य विनोबाजी एकदां म्हणाले, "विवाह समुद्रांतले नकोत आणि डबक्यांतले पण नकोत." महान् सूत्र त्यांनीं सांगितलें. एकदम एका भारतीयानें उठून अमेरिकेंतील कोणाशीं लग्न लावणें तेंहि सदोष होईल व आपापल्या लहान जातींतच सारखीं लग्नें लावणें तेंहि सदोष होईल. महाराष्ट्रांतील गायीला एकदम युरोपियन वळू कदाचित् मानवणार नाहीं. महाराष्ट्रांतील गायीला पंजाबचा किंवा गुजराथचा वळू मानवेल. फार लांबचे नको, कारण वातावरण सारें अगदीं भिन्न असतें; आणि अगदीं जवळचेंहि नको, कारण तेंच वातावरण असतें.

आणि कधीं कधीं मिश्रविवाह समाजाच्या हितासाठींहि असतील. जमिनींत एकच पीक सारखें घेत नाहींत. मध्येंच बीं-वाढ करावयास दुसरें पीक घेतात. बीं-वाढीसाठींच दुसरें पिक! मध्येंच एक वर्ष दुसरें पीक घेतलें, म्हणजे पुन्हां तें पहिलें पीक भरदार येतें. समाजाच्या संततिशास्त्रांतहि अशी वेळ कदाचित् येत असेल. मिश्रविवाहानें समाज कदाचित् भरदार होईल. सर्वसाधारण जनतेचा उत्साह व सर्वसाधारण जनतेची बुद्धि यांची कदाचित् वाढ होईल. भारतांतील सारे प्राचीन महर्षी मिश्रविवाहाचीं फळें होत. "ऋषीचें पाहूं नये कूळ, नदीचें पाहूं नये मूळ" असें आपण म्हणत असतों. परंतु त्यांत ऋषीला कमीपणा थोडाच आहे? मिश्रविवाह हे कधीं कधीं आवश्यकहि असतील. आज भारतांत ती वेळ आली आहे असें वाटतें.

मांस खाऊन आपणांस जोम येणार नाहीं. तर मिश्रविवाहानें जोम येईल. दोन भिन्न सर्पांपासून जन्मणारा अक्करमाशा हा अधिकच क्रूर असतो. याचा



अर्थ मिश्रविवाहाचें फळ जो अक्करमाशा तो अधिक जोमदार असतो. सर्पांचा दुष्टपणा अधिकच वाढीस लागतो.

मिश्रविवाह सदैवच असावा असें नाहीं. परंतु कांहीं विशिष्ट काळीं कांहीं शतकें त्याची जरुरी असेल. कांहीं काळ गेल्यावर समाजाची स्थिति पाहून पुन्हां नवीन नियम करा. अशा सर्व रीतींनीं कामशास्त्राचें खरें धार्मिक व बौद्धिक विवेचन व आचरण झालें पाहिजे. कामशास्त्र म्हणजे एक प्रकारें संततिशास्त्र. संतति सतेज, निरोगी कशी होईल, त्याचप्रमाणें संततीचें नीट पोषण व विकसन कसें होईल हें सर्व पाहणें हें धर्ममय कामशास्त्रांत येतें.

संयम, स्त्री-पुरुषांचें प्रेम, त्यांच्या आवडीनिवडी, त्यांची आर्थिक स्थिति, त्यांचें शारीरिक निर्दोषत्व व बौद्धिक समानत्व इत्यादि अनेक गोष्टी प्रकाशांत पहाव्या लागतील. ज्ञान वाढतें आहे, अनुभव वाढत आहे, वेद अनंत आहेत. वेदांवर म्हणजे अनुभवांवर, शास्त्रीय ज्ञानावर उभारलेला हा सनातन धर्म नव-नवीन प्रकाश जीवनांत आणील व खरें धर्ममय अर्थशास्त्र व धर्ममूल कामशास्त्र जनतेस देऊन खऱ्या शांतीचा, खऱ्या आनंदाचा, खऱ्या निश्चित व निर्मळ सुखाचा मोक्ष सर्वांना देईल.

सर्व समाजाचें धारणपोषण करणारे अर्थ-काम हे मोक्षाकडे नेत असतात. परंतु अशा रीतीनें अर्थ-कामांची ज्ञानविज्ञानमय, शास्त्रीय, म्हणजेच धार्मिक व्यवस्था लावूं पाहणारे, आज नरकाकडे नेणारे असें समजण्यांत येत आहे, हा केवढा दैवदुर्विलास!

## चार आश्रम : : १३

सनातनधर्माला वर्णाश्रमधर्म असें म्हणतात. वर्णाश्रम हें भारतीय संस्कृतीचें प्रधान स्वरूप आहे. वर्णधर्म म्हणजे काय हें आपण मागें पाहिलें आहे. आतां आश्रमधर्म जरा पाहूं.

मनुष्याचा विकास व्हावा यासाठीं चार आश्रमांच्या चार पायऱ्या सांगितल्या आहेत. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासाश्रम. संन्यास हें अंतिम ध्येय. शेवटीं केवळ अनासक्त जीवन हें प्राप्तव्य. परंतु त्या ध्येयाकडे हळूहळू

जाण्यासाठीं पहिले तीन आश्रम आहेत. हळूहळू निर्वासन व्हावयाचें, निवृत्तकाम व्हावयाचें.

जन्मतः मनुष्य तीन ऋणें डोक्यावर घेऊन येतो असें भारतीय संस्कृति सांगते. ऋषिऋण, पितृऋण व देवऋण. हीं तीन ऋणें आपणांस फेडावयाचीं असतात. ब्रह्मचर्याश्रमांत उत्कृष्ट ज्ञान संपादून आपण ऋषिऋण फेडतों. पुढें गृहस्थाश्रमांत संतति निर्माण करून, तिचें नीट संवर्धन करून आपण पितृऋण फेडतों आणि वानप्रस्थ व संन्यास या दोन आश्रमांच्या द्वारां सर्व समाजाची सेवा करून आपण देवऋण फेडतों. देव सर्व सृष्टीसाठीं आहे. देवाचें ऋण फेडावययाचें म्हणजे आपणहि सर्वांचें व्हावयाचें.

ब्रह्मचर्याश्रमांत मुख्यतः ज्ञानाची उपासना. उपनयन झाल्यापासून ब्रह्मचर्याला सुरुवात होते. उपनयन म्हणजे ब्रह्मचर्याची दीक्षा. ब्रह्मचर्य कोणत्या तरी ध्येयासाठीं असतें. ध्येयहीन ब्रह्मचर्य निरर्थक आहे. ध्येयहीन ब्रह्मचर्य टिकतहि नाहीं. ज्ञानासाठीं ब्रह्मचर्य. गुरूजवळ जोंपर्यंत शिकत आहोंत, तोंपर्यंत ब्रह्मचर्याची कांस बळकट धरून ठेवली पाहिजे.

उपनयनाच्या वेळेस सर्व ब्रह्मचर्याचाच महिमा आहे. सारीं प्रतीकें ब्रह्मचर्याचीं द्योतक आहेत. कमरेला तीन पदरी मौंजिमेखला बांधावयाची, कौपिन नेसावयाचें, यांत काय अर्थ आहे? कमर बळकट ठेव. तुला ज्ञान मिळवावयाचें आहे. विषयवासना मारून ठेव, तिला बांधून ठेव, लंगोटबंद गडी रहा. ब्रह्मचारी बटूला मेखला लेववितांना जे मंत्र म्हटले जातात ते मोठे सुंदर आहेत :

इयं दुरुक्तात् परिबाधमानात्
शर्म वरूथं पुनती न आगात्
प्राणापानाभ्यां बलमाभरन्ती
प्रिया देवानां सुभगा मेखलेयम् ॥
ऋतस्य गोप्त्री तपसः परस्पी
घ्नती रक्षसः सहमाना अरातीः
सा नः समन्तमनु परेहि भद्रया
भर्तारस्ते मेखले माप रिषाम ॥

" ही मेखला पावन करणारी आहे. ही मेखला मला वेडेवांकडें बोलूं देणार नाहीं. ही मेखला मला सुख देईल. प्राण आणि अपान यांच्या द्वारां सामर्थ्य देईल. ही मेखला तेजस्वी लोकांना प्रिय आहे. सत्याचें रक्षण करणारी, तपाला आधार देणारी, राक्षसांना मारणारी व शत्रूंना हांकलून देणारी अशी ही मेखला आहे. हे मेखले ! कल्याणकारक गोष्टींसह येऊन तूं मला सर्व बाजूंनीं वेढा दे. तुला धारण करीत असतां कधींहि नाश न होवो."



ज्याची कमर कसलेली आहे, त्याच्याकडे वांकड्या नजरेनें कोण पाहील ? " ज्वलन्निव ब्रह्ममयेन तेजसा। " ब्रह्मचर्याच्या तेजाचा तो धगधगीत लोळ असतो. सर्व आंतर्बाह्य शत्रू त्याच्यापासून पळतील.

मेखला बांधणें म्हणजे व्रतांनीं बांधणें. मेखला बांधण्याच्या आधीं दीक्षा देण्याचा एक विधि असतो, त्या वेळेस गुरु म्हणतो :

" मम व्रते हृदयं ते दधामि
मम चित्तमनुचित्तं ते अस्तु
मम वाचमेकव्रतो जुषस्व
बृहस्पतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम् "

" हे बटो ! तुझें हृदय माझ्या व्रतांच्या ठिकाणीं मी ठेवतों. माझ्या मनापाठोपाठ तुझें मन असो. एकनिष्ठेनें, एकाग्रतेनें माझें सांगणें ऐकत जा. तो बुद्धिपूजक बृहस्पति तुझी योजना माझ्याकडे करो."

गुरूचे शब्द नीट ऐकण्यासाठीं व्रतें पाहिजेत. एकाग्रता पाहिजे. आणि ब्रह्मचर्य म्हणजे व्रतांचा राजा. ब्रह्मचर्यांत सर्व व्रतें येऊन जातात.

बटूचे हात हातांत घेणारा गुरुहि देवरूप मानला आहे :

सविता ते हस्तमग्रभीत् । अग्निराचार्यस्तव

" बाळ ! अरे, मी नाहीं तुझे हात घेत; तर बुद्धीला चालना देणारा सवितादेव तुझे हात धरीत आहे. अग्नि हा तुझा आचार्य; मीं नाहीं."

गुरु म्हणजे प्रकाश. ज्ञानप्रकाश देणारा. तेजोरूप गुरूची उपासना ब्रह्मचाऱ्यानें करावयाची आहे. उपनयनाच्या मंत्रांत किंवा यज्ञोपवीताच्या मंत्रांत सर्वत्र तेजाची उपासना आहे. ब्रह्मचारी सर्व तेजस्वी देवतांचा आहे :

देव सवितरेष ते ब्रह्मचारी
तं गोपाय समामृत ॥

" हे सूर्यनारायणा ! हा ब्रह्मचारी तुझा आहे. त्याचें संरक्षण कर. त्याला मरण प्राप्त न होवो. "

ब्रह्मचर्याश्रमांत जाणें म्हणजे जणुं पुनर्जन्म. आतां संयमी व्हावयाचें. ध्येयाची उपासना सुरू करावयाची :

युवा सुवासः परिवीत आगान्
स उ श्रेयान् भवति जायमानः

"हा तरुण ब्रह्मचारी आला. नवीन सुंदर वस्त्रें त्यानें परिधान केलीं आहेत. त्यानें यज्ञोपवीत घातलें आहे. तो आतां नवीन जन्म घेत आहे. तो कल्याणाकडे जात आहे."

"तं धीरासः कवयः उन्नयन्ति
स्वाध्यो मनसा देवयन्त।"

"संयमी ज्ञानवंत गुरु त्याला उन्नतीप्रत नेवोत. तो तरुण अध्ययन करून मनानें एकाग्र होऊन देवांना आवडणारा होवो, तेजस्वी होवो."

अग्नीमध्यें समिधा होमिल्यावर जी प्रार्थना ब्रह्मचाऱ्यानें म्हणावयाची ती तेजस्वी आहे :

"मयि मेधां मयि प्रज्ञां मय्यग्निस्तेजो दधातु
मयि मेधां मयि प्रज्ञां मयीन्द्र इन्द्रियं दधातु
मयि मेधां मयि प्रज्ञां मयि सूर्यो भ्राजो दधातु
यत्ते अग्ने तेजस्तेनाहं तेजस्वी भूयासम्
यत्ते अग्ने वर्चस्तेनाहं वर्चस्वी भूयासम्
यत्ते अग्ने हरस्तेनाहं हरस्वी भूयासम्"

"अग्नि माझ्या ठिकाणीं बुद्धि, विचारशक्ति व तेज ठेवो. इंद्र माझ्या ठिकाणीं बुद्धि, विचारशक्ति व सामर्थ्य ठेवो. सूर्य माझ्या ठिकाणीं बुद्धि, विचारशक्ति व तेज ठेवो. हे अग्ने! तुझ्या तेजानें मला तेजस्वी होऊं दे. तुझ्या विजयी तेजानें मला वर्चस्वी होऊं दे. सर्व खळमळ जाळून टाकणाऱ्या तुझ्या तेजानें मला खळमळ जाळून टाकणारा होऊं दे."

बटु, मेखला व कौपीन धारण केल्यावर हातांत दंड घेतो. त्या वेळेस तो म्हणतो, "अदान्तं दमयित्वा मां मार्गे संस्थापयन् स्वयम्। दण्डः करे स्थितो यस्मात्तस्माद्रक्ष यतो भयम्।"

हा दंड असंयत असलेल्या मला संयम शिकवील. हे दण्डा! कोठूनहि भय येवो, त्यापासून तूं माझें संरक्षण कर.



उपनयनाचे शेवटीं मेधासूक्त म्हणतात, तें येथें दिल्याशिवाय माझ्यानें राहवत नाहीं :

ॐ मेधां मह्यमंगिरसो मेधां सप्तर्षयो ददुः
मेधामिंद्रश्चाग्निश्च मेधां धाता ददातु मे॥
मेधां मे वरुणो राजा मेधां देवी सरस्वती
मेधां मे आश्विनौ देवावधत्तां पुष्करस्रजा॥
या मेधा अप्सरस्सु गंधर्वेषु च यन्मनः
दैवी या मानुषी मेधा सा मामविशतादिमाम्॥
यन्मे नोक्तं तद्रमतां शकेयं यदनुब्रुवे
निशाम तन्निशामहै मयि व्रतं सह व्रतेषु॥
भूयासं ब्रह्मणा संगमेमहि
शरीरं मे विचक्षण वाङ्म मधुमदुहा॥
अवृद्धमहमसौ सूर्यो ब्रह्मणानीस्थः श्रुतं मे मा प्रहासीः
मेधां देवीं मनसा रेजमानां
गंधर्वजुष्टां प्रति नो जुषस्व
मह्यं मेधां वद मह्यं श्रियं वद
मेधावी भुयासम् अजरा जरिष्णु॥
सदसस्पतिमद्भुतं प्रियमिन्द्रस्य काम्यम्
सनिं मेधामयासिषं स्वाहा
यां मेधां देवगणाः पितरश्चोपासते
तया मा मेधया मे मेधाविनं कुरु॥
मेधाव्यहं सुमनाः सुप्रतीकः श्रद्धामनाः सत्यमतिः सुशेवः
महायशा धारयिष्णुः प्रवक्ता भूयासमस्ये स्वधया प्रयोगे॥

"अंगिरस ऋषि व इतर सप्तर्षी, तसेंच इंद्र, अग्नि व सृष्टिकर्ता हे मला बुद्धि देवोत. नीतिदेव वरुणराजा व देवी सरस्वती मला बुद्धि देवोत. कमळांचे हार घालणारे अश्विनीदेव मला बुद्धि देवोत. जी मेधा गंधर्व लोकांना आहे, देवलोकांत आहे, मानवलोकांत आहे, अशी ती त्रिभुवनव्यापक मेधा माझ्या

बुद्धींत शिरो. जरी मीं वरचेवर पठण केलें नाहीं, तरीहि जें पठण केलें तें कायमचें मजजवळ राहो. जें मी शिकलों, तें वाटेल तेव्हां मला बोलतां येऊं दे. जें ऐकेन तें कायमचें ऐकल्यासारखें होवो. इतर व्रतचारी लोकांप्रमाणें माझें व्रत असो. विद्वान् लोकांशीं आमचा संबंध येऊं दे. माझीं इंद्रियें जिज्ञासू असूं देत. माझी वाणी मोहाचा तिरस्कार करणारी असूं दे. वरवर गोड बोलणारी व मनांत विष बाळगणारी अशी नसूं दे. माझा उत्साह अखंड असो. हा ज्ञानमय सूर्य माझें ज्ञान कधींहि नष्ट न करो. बुद्धींत चमकणारी अशी जी मेधा, दिव्यलोकांत असणारी जी ही मेधा, ती मला मिळो. मला मेधा द्या, तेज द्या. मला बुद्धिमान् होऊं दे. हें शरीर जरी जीर्ण झालें तरी त्यांतील बुद्धि अजर अशी असो. बुद्धि सदैव तेजस्वी असो.

"सभेला जिंकून घेणारी, इंद्राला आवडणारी, अत्यंत अपूर्व अशी ही मेधा आहे. त्या मेधेसाठीं मी खटपट करतों. ज्या मेधेची देव व पितर उपासना करितात, त्या मेधेनें मला मेधावी करा. मला बुद्धिमान् होऊं दे. सत्प्रवृत्तींचा होऊं दे. चांगल्या गोष्टींची पूजा करणारा, श्रद्धावान्, सत्यनिष्ठ असा होऊं दे. मला ब्रह्मचर्याच्या तेजानें शोभणारा होऊं दे. मला कीर्तिमान् होऊं दे. मला धीरव्रत होऊं दे. मला उत्कृष्ट वक्ता होऊं दे. कोणत्याहि चर्चेच्या प्रसंगीं माझ्या बुद्धीच्या प्रभावानें मला शोभूं दे."

असे हे सुंदर मंत्र आहेत. उपनयन म्हणजे बुद्धिसंपन्न होण्यासाठीं सुरू केलेलें व्रत. हें जें ज्ञान मिळवावयाचें, ही जी धारणशक्ति मिळवावयाची, ही जी अभंग स्मरणशक्ति मिळवावयाची, त्याच्यासाठीं ब्रह्मचर्य हवें. ब्रह्मचर्याशिवाय एकाग्रता नाहीं. ब्रह्मचर्य म्हणजे सर्वेंद्रियांची शक्ति एका ध्येयावर केंद्रीभूत करणें. भिंगांतून सूर्याचे किरण पुंजीभूत करून ज्याप्रमाणें ठिणगी पाडतात, त्याप्रमाणें सर्वत्र जाऊं पाहणाऱ्या इंद्रियांची शक्ति एके ठिकाणीं आणून तिच्यांतून अद्‌भुत तेज निर्माण करणें म्हणजे ब्रह्मचर्य.

भारतीय संस्कृतींत ब्रह्मचर्याचा अपार महिमा गायिलेला आहे. ब्रह्मचर्य म्हणजे काय ? ब्रह्मप्राप्तीसाठीं जी वागणूक ठेवावयाची, ती वागणूक म्हणजे ब्रह्मचर्य. ब्रह्मप्राप्तीचें आचरण म्हणजे ब्रह्मचर्य. ब्रह्म म्हणजे काय ? ब्रह्म म्हणजे आपलें ध्येय. आपणांस जें परमोच्च प्राप्तव्य वाटतें तें आपलें ब्रह्म. ज्याच्यासाठीं जगावें किंवा मरावें असें वाटतें, तें आपलें ब्रह्म.



सर्व शक्तींचा उपयोग केल्याशिवाय ध्येय प्राप्त होत नाहीं. ध्येय ज्या मानानें उच्च त्या मानानें अधिकच सामर्थ्य लागणार. सर्व सामर्थ्य असूनहि ध्येयापर्यंत हात पोंचत नाहींत व मग आपण प्रार्थनेची कांस धरतों. स्वतःचें सामर्थ्य गमावून रडत बसणाऱ्यांच्या प्रार्थनेंत तेज नाहीं. स्वतःचें सामर्थ्य इकडे तिकडे थोडेंहि खर्च होऊं न देतां, सर्वच्या सर्व ध्येयावर ओतूनहि जेव्हां ध्येय दूर राहतें, तेव्हांच खऱ्या प्रार्थनेचा उदय होतो.

उपनिषदांत एकेक अक्षर शिकण्यासाठीं सहस्र वर्षें ब्रह्मचर्यपालन करून रहात असे उल्लेख आहेत. ज्ञानाचा एक कण मिळावा यासाठीं अशी तपस्या लागते.

ब्रह्मचारी तरुणानें कसें रहावें, याचें उपनिषदांत एके ठिकाणीं फार सुरेख वर्णन आहे :

"तरुणानें सत्प्रवृत्तीचें असावें. दृढ अभ्यासी, आशावान्, दृढनिश्चयी व सामर्थ्यसंपन्न असा तरुण असावा. ही सर्व धनधान्ययुक्त पृथ्वी त्याच्या पायांशीं लोळण घेईल.

"अशा तरुणानें नाच-तमाशे पाहूं नयेत. निरनिराळ्या बैठकांना जाऊं नये. गप्पा मारीत बसूं नये. त्यानें एकान्तांत बसून अध्ययन करावें. गुरु वेडावांकडा वागत असला तरी त्या गोष्टींचें अनुकरण करूं नये. जरूर पडेल तितकेंच स्त्रियांशीं बोलावें. गोड स्वभावाचा, प्रेमळ, शान्त, विनयी, दृढनिश्चयी, निरलस, दैन्यहीन असा युवक असावा. पदोपदीं त्यानें संतापूं नये. कोणाचा मत्सर करूं नये. सांज-सकाळ गुरुकडे पाणी वगैरे भरावें. रानांत जाऊन मोळी आणावी आणि अध्ययन करावें."

अशा प्रकारचा आदर्श उपनिषदांनीं ठेविला होता. उपनयनाच्या वेळेसहि उपदेश करतांना "स्वच्छ रहा. तूं ब्रह्मचारी आहेस. दिवसा झोंपूं नकोस. सदैव कर्मांत मग्न रहा. आचार्यांची सेवा करून ज्ञान मिळव. ज्ञानप्राप्ति होईपर्यंत ब्रह्मचर्य पाळ." वगैरे सांगितलें आहे.

ब्रह्मचर्य पाळणें ही गोष्ट सध्यांच्या काळांत फार कठिण होऊन बसली आहे. सभोंवतालचें वातावरण फार दूषित झालें आहे. या सिनेमांनीं, फोनोंनीं, रेडिओंनीं सर्व वातावरण दुबळें व नेभळें करून टाकलें आहे. सर्वांचीं मनें जशीं पोखरलीं गेलीं आहेत. सारा लुसलुशीत व भुसभुशीत कारभार !

आपल्या मनांत सर्व प्रकारच्या वासनांचीं बीजें आहेत. परंतु त्यांतील कोणतीं

अंकुरित होऊं द्यावयाचीं आणि कोणतीं नाहीं हें ठरवावयाचें असतें. जीं बीजें अंकुरित व्हावयास नको असतील, तर त्यांना पाणी घातलें नाहीं म्हणजे झालें. तीं तशींच पडूं द्यावीं. तीं मरत नाहींत. तीं फार चिंवट असतात. परंतु अनेक जन्म जर त्यांना ओलावा न मिळाला, तर मग तीं बीजें जळून जातात, मरून जातात.

**डोळे हे जुलमी गडे । आग उगा लावुं नका**

अशीं पदें सारखीं माझ्याभोंवतीं ऐकूं येतील तर माझें ब्रह्मचर्य कसें रहावें? मासिकांतून सारख्या स्त्रैण कथाच येतील, तर माझें ब्रह्मचर्य कसें रहावें? सिनेमांतून मी सारखीं चुंबनें-आलिंगनेंच पाहीन तर माझें ब्रह्मचर्य कसें रहावें? माझ्या आजुबाजूचें सारें वातावरण मला भोगशिक्षण देत असतांना, कामवासनांना उत्तेजन देत असतांना, माझें ब्रह्मचर्य कसें रहावें?

बालवाचनालयें, छात्रवाचनालयें यांची आपणांस अद्याप कल्पना नाहीं. निरनिराळ्या विषयांस वाहिलेल्या मासिकांची आपणांस कल्पना नाहीं. आपल्याकडे प्रत्येक मासिकांत सारे प्रकार असतात. शास्त्रास वाहिलेलें, इतिहासास वाहिलेलें, वाङ्मयास वाहिलेलें, आरोग्यास वाहिलेलें, राजकारणास वाहिलेलें, शिक्षणास वाहिलेलें, व्यापारास वाहिलेलें, खेळास वाहिलेलें, अशा रीतीनीं जीं मासिकें असतील, तींच छात्रवाचनालयांतून हवींत. परंतु अशीं मासिकें आहेत कोठें? निरनिराळ्या विद्यांचें अध्ययन करावयाचें आहे. या शास्त्रांत कामशास्त्रहि येईल. परंतु कामशास्त्र म्हणजे चुंबन-आलिंगन प्रकार नव्हे. मुलांना जननेंद्रियांची माहिती, त्यांचीं कार्यें, त्यांची निगा, त्यांची स्वच्छता, हें सारें शास्त्रीय दृष्टीनें शिकवण्यास हरकत नाहीं. परंतु हें शास्त्रशुद्ध शिक्षण तर मिळत नाहीं आणि केवळ वासना उसळविणारें व लंपट करणारें शिक्षण मात्र पैसे मिळवू कथालेखकांकडून देण्यांत येत आहे. हे कथालेखक म्हणतील, "आमच्या गोष्टी मुलांच्या हातीं देऊं नका." बरोबर आहे त्यांचें म्हणणें; परंतु समाजाचें तिकडे लक्ष नाहीं, शाळांचें नाहीं, ग्रंथालयें-वाचनालयें यांचें नाहीं, पालकांचें नाहीं. मुलांचें मन कोणतें खाद्य खात आहे इकडे कोण बघतो? जेथें देहाला कोणतें खाद्य द्यावें, सडलेले तांदूळ द्यावे कीं न सडलेले द्यावे, शास्त्रीय आहार कोणता याचीहि चिकित्सा व काळजी नाहीं, तेथें मनाच्या खाद्याकडे कोण वळतो?

ब्रह्मचर्याश्रमांत या सगळ्या गोष्टींचा विचार आहे. मीं काय खावें, काय ऐकावें, काय बघावें, काय वाचावें, कसें निजावें, कसें बसावें, केव्हां उठावें वगैरे सर्व गोष्टींचा विवेकपूर्वक निश्चय केला पाहिजे. मीं जीभ वाटेल तशी सैल सोडली, उत्तेजक पदार्थ खाल्ले, शारीरिक श्रम करीत नसतांहि भजीं, कांदे वगैरेंचा भरपूर आहार घेतला, तर माझें ब्रह्मचर्य राहणार नाहीं. मसाले वर्ज्य केले पाहिजेत, तिखटें वर्ज्य केलीं पाहिजेत. शास्त्र म्हणजे थट्टा नाहीं. ब्रह्मचर्याचें एक शास्त्र आहे. तें पाहिजे असेल तर त्या शास्त्राप्रमाणें वागलें पाहिजे.



म्हणून महात्माजी नेहमीं सांगतात, कीं ब्रह्मचर्य म्हणजे एकेंद्रियाचा संयम नव्हे. ब्रह्मचर्य म्हणजे जीवनाचा संयम. ब्रह्मचर्य पाळणें तेव्हांच शक्य होईल, ज्या वेळेस कान, डोळे, जीभ वगैरे सर्वांचें संयमन केलेलें असेल. कानांनीं शृंगारिक गाणीं ऐकणार नाहीं, डोळ्यांनीं शृंगारिक चित्रें पाहणार नाहीं, स्त्रियांकडे रोखून पाहणार नाहीं, वाचन शृंगारिक कथांचें करणार नाहीं, मसालेदार व उत्तेजक पदार्थांचें सेवन करणार नाहीं, मऊ मऊ गाद्यांवर निजणार नाहीं, इत्यादि व्रतें घेतलीं तरच ब्रह्मचर्य शक्य होईल, एरव्हीं नाहीं.

लोकमान्य टिळक परस्त्री पाहतांच खालीं मान घालीत. एका स्त्रीचा तीन तास बसून अर्ज लिहून देत असतांना समोर त्यांनीं त्या स्त्रीकडे पाहिलें नाहीं. लोकमान्यांच्या डोळ्यांत जसें तेज आहे, तसें तेज जगांतील कोणत्याहि महापुरुषाच्या दृष्टींत मीं पाहिलें नाहीं, असें नेव्हिन्सन म्हणाला होता. हें तेज कोठून येतें? ब्रह्मचर्यानें.

महात्माजींच्या दृष्टींत असेंच तेज आहे. आश्रमांतील मंडळी सांगतात, महात्माजींनीं जरा डोळा वांकडा करून पाहिलें कीं मेल्यासारखें होतें. त्यांच्या डोळ्यांची भीति वाटते. ते डोळे जणुं समोरच्या माणसाच्या हृदयाचा ठाव घेतात. त्या दृष्टीपासून तुम्ही कांहीं लपवूं शकणार नाहीं; ते प्रखर किरण आंत घुसल्याशिवाय रहात नाहींत.

बंगालमधील अशुतोष मुकर्जी यांच्या डोळ्यांत असेंच तेज होतें. कलकत्ता विद्यापीठाच्या एका बैठकींत डाक्का कॉलेजचे प्रिन्सिपॉल टर्नरसाहेब अशुतोषांच्या विरुद्ध बोलण्यासाठीं उभे रहात होते. परंतु त्या टर्नरसाहेबांनीं आपल्या आठवणींत लिहिलें आहे. ("The black man stared at me and I staggered back in my chair.") "त्या काळ्या कुळकुळीत पुरुषानें माझ्याकडे तीक्ष्ण नजरेनें पहातांच मी मटकन् खुर्चींत बसलों."

इतिहाससंशोधक राजवाडे नेहमीं घोंगडीवर झोंपावयाचे. ते प्रथम पत्नी

पंचविसाव्या वर्षी मेली त्या वेळेपासून नैष्ठिक ब्रह्मचर्यानें राहिले. म्हणूनच त्यांची धारणाशक्ति अपूर्व होती. त्यांची बुद्धि वाटेल त्या शास्त्रांत चाले. तसेंच स्वामी विवेकानंद. विवेकानंदांच्या एकाग्रतेची कमाल होती. ते परिच्छेदच्या परिच्छेद एकदम वाचीत. त्यांची स्मृति अद्भुत होती. कोणतें शास्त्र त्यांना समजत नसे असें नव्हतें. तसेंच स्वामी रामतीर्थ. ब्रह्मचर्याच्या तेजाच्या जोरावर सर्व गोष्टी साध्य करून घेतां येतात असें म्हणत होते.

असें हें ब्रह्मचर्याचें तेज आहे. हें तेज साऱ्या शरीरांत फांकतें. डोळ्यांत दिसतें, वाणींत उतरतें, तोंडावर फुलतें. विवेकानंदांना पाहतांच दृष्टि दिपून जात असे. रामतीर्थांना पाहतांच प्रसन्न वाटत असे. ब्रह्मचर्याचा अपार महिमा आहे.

ज्याला आयुष्य सार्थकीं लावावयाचें आहे, त्याला ब्रह्मचर्याशिवाय उपाय नाहीं. महात्माजी १८।१८ तास काम न थकतां करतात. हा उरक कोठून आला? इच्छाशक्तीचें हें बळ आहे. लोखंडी इच्छाशक्ति महापुरुषाजवळ असते. परंतु ही इच्छाशक्ति तरी कोठून येते? वासनाजयांतूनच दृढ इच्छाशक्ति येत असते.

ब्रह्मचर्य हें प्रयत्नसाध्य आहे. तें एकदम थोडेंच मिळणार आहे? त्याच्या पाठीस लागलें पाहिजे. पुनः पुनः व्रतच्युत होऊं, परंतु पुनः वर उठूं, अधिक नेटानें पुढें जाऊं. एकदां तें ध्येय मात्र ठरलें पाहिजे. आपणांस अशक्य आहे असें म्हटलें, कीं तें कधींच मिळणार नाहीं.

मनुष्य पुष्कळ वेळां आपल्या दुर्गुणांचीच जास्त चिकित्सा करीत बसतो. कधीं कधीं आपल्या दुर्गुणांचें विस्मरण करणें हाच त्यांना जिंकावयाचा मार्ग असतो. मी असा वाईटच आहें, कसलें ब्रह्मचर्य मला साधतें, मी सुधारणार नाहीं, असाच रड्या मी राहणार, असें म्हणाल तर तसेच पतित रहाल. दुर्गुणांचें चिंतन करीत बसल्यानें ते अधिकच दृढ होतात. "पंचवीस दुणें पन्नास" हे मला विसरूं दे, "पंचवीस दुणे पन्नास" हें मला विसरूं दे, असा सारखा जप केल्यानें पंचवीस दुणे पन्नास आपण विसरणार तर नाहींच, परंतु उलट ते कायमचे ओंठांत व डोक्यांत बसतील! जागृतस्वप्नीं पंचवीस दुणें पन्नास दिसतील. जें तुम्हांला नको आहे त्याची आठवण करूं नका. मी चांगला आहें, मी चांगला होणार आहें, मनानें बळकट होणार, मी पुढें जाणार, असेंच म्हणत राहिलें पाहिजे. भारतीय संस्कृति सत्संकल्पावर भर देते:

अहं ब्रह्मास्मि, शिवः केवलोऽहम्।



"मी ब्रह्म आहें, मी सर्वशक्तिमान् आहें" असें ध्यान करीत जा. अशीच कल्पना ठसवीत जा. जसें म्हणत रहाल तसें होईल. आपली श्रद्धा आपल्या जीवनाला आकार देत असते.

आज राष्ट्रीय ध्येयासाठीं झगडणारे लोक दिसत नाहींत. सर्वत्र निराशा, औदासीन्य, निरुत्साहता. मी ज्ञान मिळवीन, मी शरीर कमवीन, मी मोठा होईन असें तरुणांच्या मनांतच येत नाहीं. महत्त्वाकांक्षा सर्वत्र मेलेली. खेळांत उत्साह नाहीं. अभ्यासांत उत्साह नाहीं. राष्ट्र कसेंतरी जगत आहे. तरुण कसेतरी वागत आहेत. ब्रह्मचर्याचा ऱ्हास हें एक बलवत्तर कारण या सर्वांगीण दैन्याचें आहे.

उत्कृष्ट ब्रह्मचर्यामधूनच उत्कृष्ट गृहस्थाश्रम सिद्ध होत असतो. माझें ब्रह्मचर्य उत्कृष्ट नसेल, तर माझा गृहस्थाश्रमहि रडकाच व्हावयाचा. मानसिक, बौद्धिक व शारीरिक सामर्थ्य संपादून जर मी गृहस्थाश्रमांत पडेन, तरच माझ्या गृहस्थाश्रमांत तेज येईल, तरच माझा गृहस्थाश्रम सुखाचा होईल.

पतिपत्नींची शरीरसंपदा उत्कृष्ट नसेल तर बाळसेदार मुलें कशीं घरांत दिसणार? रोगी, चिरचिरीं मुलें पाहणें म्हणजे मायबापांस केवढें दुःख! लहान मुलाच्या हास्याइतकें पवित्र दुसरें काय आहे? त्या हास्यांत अपार सामर्थ्य असतें. त्या हास्यानें कठोर हृदयें मृदु होतात. त्या हास्यानें दुःख एका क्षणांत पळतें. एकदां एका स्टेशनावर मीं पुढील प्रसंग पाहिला आहे: एक माता आपला मुलगा खांद्यावर घेऊन जात होती. तिचा पति व इतर वरींच मुलेंबाळें बरोबर होतीं. त्या मुलाचें प्रसन्न मुखकमल पाहून तो तिकीट पाहणारा अगदीं गार झाला. त्यानें तिकिटें किती आहेत वगैरे विचारलें नाहीं. तो पिता तिकिटें मोजून घ्या असें म्हणतांच तो तिकिट पाहणारा म्हणाला, "असा गोड मुलगा पाहिल्यावर तिकिटें मी कशीं मोजूं? जा, सारींजणें जा."

परंतु अशीं हंसरीं गोजिरवाणीं मुलें पतिपत्नींच्या पूर्वाश्रमींच्या दृढ ब्रह्मचर्यांतूनच उत्पन्न होत असतात. ज्या जमिनीचा कस गेलेला नाहीं, तेथें भरदार मनगटासारखीं कणसें येतात. त्याचप्रमाणें ज्याच्या जीवनाचा कस गेलेला नाहीं त्यांच्याच जीवनांत अशीं तजेलेदार फुलें फुलतात.

गृहस्थाश्रम म्हणजे सर्व समाजाचा आधार. गृहस्थाश्रम भविष्यकाळ निर्मीत असतो. गृहस्थाश्रम म्हणजे समाजाची धारणा. गृहस्थाश्रमाची थोरवी सर्वांनी गायिली आहे.

धन्यो गृहस्थाश्रमः ।

हा गृहस्थाश्रम धन्य आहे. परंतु अशी धन्यता फुकाफुकी लाभत नसते. ती प्रयत्नसाध्य आहे, कष्टसाध्य आहे.

गृहस्थाश्रमांत पतिपत्नींचीं शरीरें सुंदर, निरोगी हवींत. त्याचप्रमाणें त्यांचीं मनेंहि निरोगी हवींत. पतिपत्नींनीं परस्परांशीं निष्ठेनें वागलें पाहिजे. ज्या विवाहविधीनें पतिपत्नींचें नातें निर्माण केलें गेलें, त्या विवाहविधींत कांहीं कांहीं मंत्र फारच सुंदर आहेत. वाङ्‌निश्चयाचे वेळेस ब्राह्मण म्हणतात :

समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।
समानमस्तु वो मनः यथा वः सुसहासति ॥

"तुमचा हेतु एक असो. तुमचीं मनें एक असोत. तुमचीं हृदयें एकरूप असोत. तुमच्या सर्व संघटनांस सामर्थ्य येईल अशा रीतीनें वागा."

तसेंच विवाहहोमाच्या वेळेस वर म्हणतो :

द्यौरहं पृथ्वी त्वं सामाहमृक्त्वम्
संप्रियौ रोचिष्णू सुमनस्यमानौ जीवेव शरदः शतम् ।

"मी आकाश आहें, तूं पृथ्वी आहेस. मी सामवेद आहें, तूं ऋग्वेद आहेस. आपण एकमेकांवर प्रेम करूं, एकमेकांस शोभवूं, एकमेकांस आवडतीं होऊं. एकमेकांशीं निष्कपटपणें वागून शतायुषी होऊं."

सप्तपदी वगैरे झाल्यावर जेव्हां गृहप्रवेश होत असतो. त्या वेळेस वर म्हणतो :

"हे वधू! तूं सासूसासऱ्यांवर, नणंदांदिरांवर प्रेमाची सत्ता चालविणारी हो."

"सर्व देव आमचीं हृदयें मोकळीं करोत. उदकें आमचीं मनें निर्मळ करोत. मातरिश्वा, विधाता व सरस्वती आमचीं जीवनें परस्परांशीं जोडोत."

गृहप्रवेशाच्या वेळेस मंत्र म्हणतात :

"हे वधू! तूं या कुळांत येत आहेस. येथें संततियुक्त होऊन तुला आनंद मिळो. या घरांत खऱ्या गृहिणीचीं कर्तव्यें तूं दक्षतेनें पार पाड. या पतीसह वर्तमान आनंदानें रहा. तुम्ही या घरांत बहुत काळ राहून वृद्ध झालांत असें लोक म्हणूं देत."

"चाळणीनें धान्य शुद्ध करून घेतात, त्याप्रमाणें या घरांत शुद्ध, संयमपूर्वक वाणीचा उपयोग केला जातो. म्हणून थोरांमोठ्यांची या घराशीं मैत्री जुळते. अशा गोड भाषा बोलणाऱ्यांच्या जिभेवर लक्ष्मी वास करते."



विवाहसूक्तांत वधूला अघोरचक्षु व शिवा, सुमना व तेजस्वी, वीरप्रसू व श्रद्धाळू अशीं विशेषणें लावलेलीं आहेत. अघोरचक्षु हें विशेषण वधू व वर दोघांनीं ध्यानांत धरण्यासारखें आहे. एकमेकांची दृष्टि प्रेमळ असूं दे. भयावह, क्रूर नसूं दे.

लग्न म्हणजे केवळ बाह्य लग्न नाहीं. हृदयाचें लग्न. मनाचें लग्न. वधूनें वरास माळ घालणें, वरानें वधूस माळ घालणें, म्हणजे एकमेकांचीं निर्मळ हृदयपुष्पें एकमेकांस वाहणें हाच त्याचा अर्थ. अग्नीभोंवतीं सात पावलें चालणें म्हणजे जन्मोजन्मीं बरोबर चालणें; सहकार करणें. पतिपत्नी सुखांत वा दुःखांत सदैव बरोबर असतील, बरोबर चढतील, बरोबर पडतील. त्यांच्याभोंवतीं सूत गुंडाळलें जात असतें. पतिपत्नींचा जीवनपट आतां एकत्र विणला जाणार. ताणा व बाणा एकत्र होणार. आतां पृथक् कांहीं नाहीं, अलग कांहीं नाहीं.

देहावर प्रेम असल्यानें खरें प्रेम जडत नाहीं. देह उद्यां रोगानें कुरूप झाला तर? आपण प्रारंभ देहापासून करूं, परंतु देहातीत होऊं. देहाच्या आंत असलेला आत्मा ओळखून त्याची गांठ घेतली पाहिजे. मनुष्य अंगणांतून ओसरीवर येतो, माजघरांत येतो, मग देवघरांत जातो. तसें वधू-वरांनीं शेवटीं परस्परांच्या हृदयांतील देवघरांत शिरलें पाहिजे. माझ्या फक्त देहाची पूजा करणारा पति माझा अपमान करतो असें वाटलें पाहिजे. हा मातीचा गोळा म्हणजे कांहीं आपण नाहीं. पतिपत्नींनीं परस्परांस मातीचे गोळे, मांसाचे गोळे, समजूं नये. हळूहळू या मातीच्या आंत जी उदात्तता आहे, जी वर जाण्याची शक्ति आहे, तिच्यावर परस्परांनीं ध्यान दिलें पाहिजे. पतीला पाहतांच पतींतील दिव्यता पत्नीस दिसावी. पत्नीस पाहतांच ती देवता पतीला वाटावी. भोग भोगतां एक दिवस विरक्त व्हावयाचें. देहाच्या आंत शिरून आत्मा आत्म्याशीं जोडावयाचा.

दिव्याच्या कांचेला आंतील ज्योतीमुळें महत्त्व आहे. त्या ज्योतीचे उपासक आपण झालें पाहिजे. जोंपर्यंत आत्म्याचा मोठेपणा कळत नाहीं, तोंपर्यंत खरें प्रेम नाहीं. पत्नीच्या आत्म्याचा मोठेपणा दिसूं लागतांच पति तिला ज्ञान देईल, ध्येयें देईल. तिला केवळ वस्त्रालंकारांनीं बाहुलीप्रमाणें नटवीत बसणार नाहीं. त्याप्रमाणें ज्या दिवशीं पतीमधील दिव्यता पत्नीस दिसेल, त्या दिवशीं ती पतीस वाटेल तसें वागूं देणार नाहीं; वाटेल त्या मार्गानें पैसे मिळविण्याचें काम करूं देणार नाहीं.

गृहस्थाश्रमांत याप्रमाणें पावित्र्य आणावयाचें. एकमेकांनीं एकमेकांस सावध करीत कधीं प्रेमानें, कधीं रागानें संबोधीत वर वर जावयाचें. पतिपत्नींनीं शेवटीं बहीण-भावाप्रमाणें व्हावयाचें. आसक्तीमय प्रेमांतून शेवटीं अनासक्त प्रेम निर्माण करावयाचें. चिखलांतून कमळें फुलवावयाचीं. संसारांतच मोक्षश्री आणावयाची.

भारतीय संस्कृतींतील गृहस्थाश्रम हा मोक्षाकडे जाण्याचा एक मार्ग आहे. ही पायरी आहे. येथेंच कायमचें रहावयाचें नाहीं. गृहस्थाश्रमांत राहून संतति निर्माण करून, वासनाविकार शान्त करून, नाना प्रकारचे त्यागाचे धडे शिकत शिकत, शेवटीं या छोट्या संसारांतून एक दिवस मोठ्या संसारांत जावयाचें आहे, ही गोष्ट पतिपत्नींनीं विसरतां कामा नये.

गृहस्थाश्रम! हाहि एक आश्रमच आहे. आश्रमाचेंच पावित्र्य येथेंहि पाहिजे. पतिपत्नी, मुलेंबाळें यांचा हा आश्रम आहे. सर्वांनीं सहकार्य करावयाचें, प्रेमानें नांदावयाचें, ध्येयाची पूजा करावयाची. कुलपरंपरा म्हणून कांहीं असते. त्या कुलपरंपरेला मरूं न देणें हें काम असतें. रघुवंशांत राम सीतेला विमानांतून खालचीं स्थळें दाखवीत आहेत असा एक भाग आहे. एका तपोवनाकडे बोट करून राम म्हणतात, "येथें एक ऋषि रहात असत. आल्यागेल्याचें ते मनापासून आदरातिथ्य करीत. परंतु त्या ऋषीला मूलबाळ नव्हतें. तो ऋषि निवर्तला परंतु त्या ऋषीचें आदरातिथ्याचें व्रत तपोवनांतील हे वृक्ष करीत असतात. जो कोणी येईल त्याला फुलेंफळें, छाया देतात."

अशा रीतीनें कुळाची परंपरा चालवावयाची असते. माझ्या कुळांत कोणी खोटें बोलणार नाहीं, माझ्या कुळांत कोणी चोरी करणार नाहीं, माझ्या कुळांत कोणी अपमान सहन करणार नाहीं, माझ्या कुळांत अतिथीला नकार मिळणार नाहीं, अशा प्रकारची विशिष्ट प्रथा त्या त्या कुळांत असते.

त्या त्या कुळपरंपरेसाठीं सर्वस्वाचा त्याग करावा लागला तरी तो करावयाचा असतो. हरिश्चंद्र सर्वस्वास मुकला. श्रियाळ-चांगुणा यांनीं मुलगा अर्पण केला. कुटुंबांत जणुं एक देव. त्याच्यासाठीं कुटुंबांतील सर्व मंडळी सिद्ध असत. हरिश्चंद्र निघतांच तारामती त्याच्या पाठोपाठ जाते. हरिश्चंद्र-तारामती यांच्या पाठोपाठ चिमणा रोहिदास धांवत जातो. त्या रोहिदासास मायबाप नको म्हणत नाहींत. "तूं लहान आहेस, कशाला हालांत येतोस?" असें म्हणत नाहींत. स्वतःच्या



तालमींत आपल्या मुलालाहि त्यांना तयार करावयाचें असतें. ध्येयपूजा स्वतःच्या उदाहरणानें आपल्या मुलांबाळांस त्यांना शिकवावयाची असते.

असे गृहस्थाश्रम आज कोठें आहेत? पति तुरुंगांत जातांच पत्नी पाठोपाठ निघत नाहीं. पत्नी निघतांच पति निघत नाहीं. आईबाप जातांच मुलें धांवत नाहींत. मुलें जातांच आईबाप प्रेमानें त्यांच्या मागें लागत नाहींत. एका ध्येयाची पूजा नाहीं. ध्येयेंच विचित्र असतील तर गोष्ट निराळी. परंतु आसक्ति व भीति आड येत असतील तर मात्र वाईट आहे.

याचें कारण काय? याचें कारण घरांत ज्ञानचर्चा नाहीं. पति जें ऐकतो तें पत्नीला सांगणार नाहीं. राष्ट्रांत जे विचार उत्पन्न झाले आहेत त्यांची घरांत उजळणी होणार नाहीं. पति हा पत्नीचा गुरु. मुलींचें मौंजीबंधन बंद झालें. पति हाच गुरु असें ठरलें. परंतु हा पति गुरूचें काम करतो का? ज्ञानदान, विचारदान करतो का? आजुबाजूचें जगाचें ज्ञान पत्नीला करून देतो का?

पत्नी ज्वारीची भाकर भाजून देते. पति कोणती विचाराची भाकर तिला देतो? परंतु पतीच्या डोक्यांत हा विचार येतच नाहीं. माझ्या पत्नीला मन आहे, बुद्धि आहे, हृदय आहे अशी पतीला जाणीव नसते. त्यामुळें जगांतील घडामोडी तो घरांत बोलणार नाहीं. मग मुलांबाळांनाहि काय कळणार? पत्नीच जेथें विचारांच्या आज्ञानांत, तेथें मुलेंहि आज्ञानांतच वाढणार.

भारतीय संस्कृतींतील गृहस्थाश्रम असा नाहीं. ज्या ब्राह्मणावर बकासुराकडे जावयाची पाळी आली, त्याच्या कुटुंबांतील प्रत्येक घटक मरावयास तयार होतो. पति म्हणतो मला मरूं दे. पत्नी म्हणते मला मरूं दे. मुलगी म्हणते मला मरूं दे. मुलगा म्हणतो मला मरूं दे. याला म्हणतात गृहस्थाश्रम. याला म्हणतात कुटुंब. एका विचारानें सारे प्रेरित आहेत. एका ध्येयाची पूजा होत आहे.

गृहस्थाश्रम म्हणजे संयमाची शाळा. गृहस्थाश्रम म्हणजे तपश्चर्या आहे. आपण आपल्या शेंकडों वृत्तींना लगाम घालावयास गृहस्थाश्रमांत शिकतों. मुलें आजारी पडलीं, त्यांची शुश्रूषा करावी लागते. मुलांच्या लहरी सांभाळाव्या लागतात. पदोपदीं रागावून थोडेंच भागणार आहे?

गृहस्थाश्रमांत आपण त्यागाचे धडे घेतों. पति पत्नीला सारें देऊं पाहतो. पत्नी पतीला सुखवूं पाहते. आईबाप फाटके कपडे घालून आधीं मुलांना नटवि-

तात. दुसऱ्याचें सुख पाहणें, दुसऱ्याच्या आनंदांत आनंद मानणें, हें गृहस्थाश्रमाचें शिक्षण आहे.

अर्धनारीनटेश्वर हें माणसाचें ध्येय आहे. पुरुष कठोर असतो. स्त्री मृदु असते. पुरुषानें पत्नीपासून मृदुता शिकावयाची. स्त्रीनें पतीपासून कठोर व्हावयास शिकावयाचें. प्रसंगीं मेणाहून मऊ व वज्राहून कठोर होतां आलें पाहिजे. केवळ पुरुष अपूर्ण आहे, केवळ स्त्री अपूर्ण आहे. दोघांच्या गुणांच्या मीलनांत पूर्णता आहे. गृहस्थाश्रम म्हणजे पतिपत्नींनीं पूर्ण होण्याची शाळा. सर्वांगीण विकास करून घेण्याचें स्थान. हृदयाचे व बुद्धीचे गुण शिकण्याची जागा. उत्कृष्ट मुलें तयार करून समाजाला देणें हें महत्त्वाचें काम आईबापांस करावयाचें असतें. परंतु, मुलें चांगलीं व्हावींत म्हणून स्वतः चांगलें राहिलें पाहिजे. उच्चारानें, विचारानें, आचारानें चांगलें रहावयाचें. आपलीं मुलें चांगलीं व्हावींत असें मानणाऱ्या आईबापांनीं अत्यंत जागरूकतेनें वागलें पाहिजे. प्रेम, कर्तव्य, सहकार्य दिसलीं पाहिजेत. आईबापांचीं भांडणेंच जर मुलें रोज पाहतील, तर त्यांच्या जीवनावर किती अनिष्ट परिणाम होईल! आळशी व विलासी आईबाप जर समोर असतील तर मुलेंहि पोशाखीच होतील.

आपलीं मुलें शरीरानें बळकट, हृदयानें विशुद्ध व उदार, बुद्धीनें विशाल व निर्मळ होतील असें आईबापांनीं पाहिलें पाहिजे. ज्या काळांत आपण राहतों, त्या काळाची कल्पना मुलांबाळांस दिली पाहिजे. जेवतांना, हसतां-खेळतांना मुलांना इतिहासाचें हें सारें ज्ञान दिलें पाहिजे. विसाव्या शतकांतील मुलांचीं मनें "मांजर आडवें गेलें तर काम फसेल" अशा कल्पनांनीं भरून जाणार नाहींत असें केलें पाहिजे. माझे एक मित्र आहेत. ते म्हणाले, "माझ्या मुलांबाळांच्या देखत असें जर कोणी बोलला तर मला चीड येते. आमच्या मनावर लहानपणीं संस्कार झाले, परंतु आमच्या मुलांच्या मनांवर तरी असले बाळबट संस्कार नकोत व्हायला." मुलांच्या मनाबद्दल किती ही काळजी!

आपल्याला किती मुलांबाळांची जोपासना करतां येईल, कितींचा विकास करतां येईल हें आईबापांनीं पाहिलें पाहिजे. कारण पुढें वानप्रस्थाश्रम व संन्यास आहेतच. मरेपावेतों कांहीं पाळणा खेळवावयाचा नाहीं आणि वानप्रस्थाश्रमांत शिरतांना मुलें संसार स्वतः अंगावर घेण्यास योग्य झालीं असलीं पाहिजेत. समजा, साठाव्या वर्षीं वानप्रस्थाश्रम घ्यावयाचा तर त्याचा अर्थ काय? साठाव्या



वर्षीं माझें सर्वांत लहान मूल वीस-पंचवीस वर्षांचें असेल. त्याचें शिक्षण झालेलें असेल. त्याची संपूर्ण वाढ झालेली असेल. आईबापांच्या छत्राची त्याला आतां जरूर नाहीं. असें सर्व पाहिजे. म्हणजे चाळिसाव्या वर्षापासून पतिपत्नींनीं निवृत्तकाम झालें पाहिजे. चाळीस वर्षांपर्यंतहि प्रमाणानें प्रजोत्पादन केलें पाहिजे. कारण चाळिसाव्या वर्षापर्यंतहि आठ-दहा मुलें व्हायला काय हरकत? परंतु नुसतीं मुलें उत्पन्न करणें हें काम नाहीं. त्या मुलांची आपणांस व्यवस्था लावतां आली पाहिजे. त्यांचें सर्वांचें संगोपन व संरक्षण-शिक्षण करतां आलें पाहिजे.

आपणांस संयम न साधला तर संततिनियमनाचे उपाय योजण्यास हरकत नसावी; परंतु माणसास संयमच साजून दिसतो.

गृहस्थाश्रमांत संयम, त्याग, वासना-विकारांना आळा घालणें, प्रेम, सहकार्य इत्यादि गुणांचें शिक्षण मिळतें. आपण जरा पिकत जात असतों. उच्छृंखळपणा कमी होतो. पोक्तपणा येतो. जीवनाचा नानाविध अनुभव येतो. आंबटपणा जाऊन जीवनांत मधुरता येते.

मर्यादित कुटुंबाची आपण सेवा केली. त्या मर्यादित कुटुंबांत जे सेवेचे गुण आपण शिकलों, ते आतां समाजास द्यावयाचे. आपण आपल्या कुटुंबाच्या बाहेर येऊन समाज हेंच कुटुंब मानावयाचें. अधिक अनासक्त व्हावयाचें. अधिक व्यापक व्हावयाचें. अधिक वाढावयाचें. आत्म्याचें राज्य वृद्धिंगत करावयाचें.

वानप्रस्थ म्हणजे वनास निघालेला. भवन सोडून वनांत जावयास निघाला. हे वानप्रस्थ वनांत रहात. तेथें आश्रम चालवीत. तेथें शाळा चालवीत. वानप्रस्था-सारखा उत्कृष्ट शिक्षक नाहीं. अनुभवी, पोक्त, शांत-काम, हंसतखेळत शिकविणारा असाच शिक्षक हवा. आणि वानप्रस्थाला कांहीं फार लागतहि नाहीं. त्याच्या पोटाला दिलें म्हणजे झालें.

आज हजारों पेन्शनर आहेत. त्यांनीं खरें म्हटलें तर जिकडे तिकडे शाळा काढल्या पाहिजेत. शिक्षण दहा वर्षांत सर्वत्र फैलावेल. परंतु भारतीय संस्कृतीचे गोडवे गात पुण्याला बंगले बांधून नातवांस खेळवीत ते बसतात! आतां त्यांनीं सर्वांचे नातू खेळवले पाहिजेत. त्यांना शिकविलें पाहिजे. त्यासाठीं सुंदर आश्रम काढून राहिलें पाहिजे. आज समाजांत वानप्रस्थ कोणीहि नाहीं. कुटुंबाची मर्यादित आसक्ति सोडून समाजाची सेवा जो निःस्वार्थपणें करूं लागला, तो वानप्रस्थ.

आणि मग संन्यास! संन्यासांत अमक्याच समाजाची सेवा हीहि आसक्ति नाहीं! संन्याशाला हिंदु नाहीं, मुसलमान नाहीं, तो सेवाच करीत राहील. भेदातीत प्रेम देईल. जो पशुपक्षी, कीडमुंगी, वृक्षवनस्पती यांचाहि मित्र होणार, तो का मानवांत खंड पाडीत बसेल? संन्यासी न ओळखील महाराष्ट्रीय, न पाहील गुजराथी, तो सर्वांच्या वर जाईल. या भेदांच्या चिखलांतून अतीत होईल.

संन्यास म्हणजे निर्वाण. स्वतःला पूर्णपणें मालविणें. माझें कुटुंब, माझा समाज, माझी जात, माझा देश असें तेथें महत्त्व नाहीं. माझा मान, मला खायला, मला पैसा, असला तेथें प्रकार नाहीं. संन्यास म्हणजे समदृष्टि. सूर्याचे किरण सर्वांसाठीं, तसा संन्यास सर्वांसाठीं. माझ्याकडे कोणीहि येवो, त्याच्यासाठीं मी आहें.

म्हणूनच संन्याशानें एके ठिकाणीं राहूं नये असें सांगितलें आहे. तो वाऱ्याप्रमाणें जीवन देत विचरत राहील. सूर्याप्रमाणें पावित्र्य व प्रकाश देत फिरत राहील.

अशा रीतीनें या चार आश्रमांतून शेवटीं केवळ निरहंकार व्हावयाचें, विश्वाकार व्हावयाचें. माझ्या आत्म्यानें वाढत वाढत सर्वांना प्रेमानें मिठी मारावयाची!

आज आपल्या समाजांत ब्रह्मचर्याचा लोप झाला आहे. वानप्रस्थ व संन्यास हीं नांवेंच उरलीं आहेत. एक गृहस्थाश्रम उरला आहे. तोहि रडका व निस्तेज!

आज वर्णाश्रमधर्म थोडाबहुत कोठें आहे का असें जेव्हां मी पाहूं लागतों, तेव्हां तो जवळजवळ कोठेंच दिसत नाहीं. वर्णधर्म तर स्वराज्य येईल तेव्हांच त्याचा प्रयोग सुरू होणें शक्य आहे; आणि आश्रमधर्म आहेत ते प्रत्येकाच्या विवेकांतून जन्माला यावयाचे आहेत. ते लादावयाचे थोडेच आहेत? वर्ण एक वेळ लादतां येईल. "तुला हेंच काम चांगलें करतां येईल, हेंच कर" असें सांगतां येईल. परंतु वानप्रस्थ व संन्यास म्हणजे का लाल कपड्यांचें वस्त्रदान? दुःखी जीवांना आनंदमूर्ति नांवें देणें म्हणजे का संन्यास? संन्यास म्हणजे धंदा नव्हे. संन्यासाची आंतून प्रेरणा हवी. स्वतःच्या विकासाची इच्छा हवी. उत्तरोत्तर मी वाढत गेलें पाहिजे अशी तहान हवी.

समाजाला आज सर्वत्र वानप्रस्थ व संन्यास यांची जरुरी आहे. शेंकडों प्रचारक पाहिजे आहेत. शेंकडों संघटना करणारे पाहिजेत. औद्योगिक, आरोग्यविषयक, धार्मिक, आर्थिक, शैक्षणिक सर्व प्रकारचें ज्ञान देणारे हजारों व्रती लोक पाहिजे आहेत. परंतु एकहि मिळत नाहीं. समाज हें मोठें कुटुंब मानून त्या



समाजांत कामें करण्यासाठीं लोक पाहिजे आहेत. वर्णाश्रमधर्माच्या पाट्या लावून सारे बसत आहेत! परंतु नेभळट गृहस्थाश्रमापलीकडे पाऊल तर टाकावयास कोणी तयार नाहीं!

आज महात्माजी वर्णाश्रमधर्म सांभाळीत आहेत. ते अनेकांना वर्ण देत आहेत. "ये, तुला काम देतों. गोरक्षण आवडतें, ये; खादीकाम आवडतें, ये; सफाईचें काम करावयाचें आहे, ये; मधुसंवर्धनविद्या शिकावयाची आहे, ये; खेड्यांत शाळा शिकवशील, ये; कागदाचा धंदा करशील, ये; तेलाचा घाणा चालवशील, ये." निरनिराळे धंदे निर्माण करून हा महापुरुष निरनिराळ्या वृत्तींच्या माणसांस कामाला लावीत आहे. म्हणजेच वर्णधर्म निर्माण करीत आहे.

राष्ट्रांतील कोट्यवधि बेकार माणसांना त्यांच्या त्यांच्या गुणधर्मानुसार त्यांना काम देण्याची व्यवस्था जोंपर्यंत होत नाहीं, तोंपर्यंत वर्णाश्रम हा शब्द म्हणजे थट्टा आहे. आणि जो थोर पुरुष अशीं कामें शोधून काढतो आहे, त्यासाठीं सतत आशावादी राहून हिमालयासारख्या कष्टराशी उचलीत आहे, त्यालाच धर्मनाश करणारा असें कांहींनीं संबोधावें हें त्या वर्णधर्माचें दुर्दैव आहे.

ज्याप्रमाणें वर्णधर्माची सेवा महात्माजी करीत आहेत, त्याचप्रमाणें आश्रमधर्मालाहि उजळा ते देत आहेत. स्वतःच्या जीवनांत गेलीं तीस-पस्तीस वर्षें पूर्ण ब्रह्मचर्य पाळून त्यांनीं कामावर विजय मिळविला आहे. ब्रह्मचर्याची महति शतदां ते सांगत असतात. राष्ट्रांत ब्रह्मचर्याचा महिमा त्यांनीं वाढविला आहे. ब्रह्मचर्य कसें शक्य होईल यासंबंधीं अनुभवाच्या व व्यावहारिक अशा सूचना त्यांनीं दिल्या आहेत.

ब्रह्मचर्याप्रमाणेंच गृहस्थाश्रमासहि ते उज्ज्वल करीत आहेत. वधूवरांस उज्ज्वल पथदर्शन ते करीत आहेत. पतिपत्नींचीं ध्येयें काय, याविषयीं त्यांनीं लिहिलें आहे.

वानप्रस्थ व संन्यास ते स्वतःच्या उदाहरणानें शिकवीत आहेत. महात्माजींहून आज थोर संन्यासी कोण आहे? आंध्र प्रांतांत एक भक्त महात्माजींस त्यांची स्वतःच्या हातानें तयार केलेली एक तसबीर अर्पण करीत होता. महात्माजी म्हणाले, "ही तसबीर मी कोठें लावूं? माझी खोली तरी कोठें आहे? आतां हा देह अजून उरला आहे. या देहाचेंहि ओझें आतां कमी झालें तर बरें!"

महात्माजींच्या उदाहरणानें आज भारतवर्षांत शेंकडों कार्यकर्ते वानप्रस्थ

होऊन निरनिराळीं कर्में करीत आहेत. संन्यास हा शब्द न उच्चारणेंच बरें. परंतु महात्माजींनीं वानप्रस्थ निर्माण केलें आहे. ब्रह्मचर्य व आदर्श गृहस्थाश्रम यांसाठीं रात्रंदिवस धडपडणारे मुमुक्षू निर्माण केले आहेत.

शेंकडों विचारप्रचारक निर्मून महात्माजींनीं खरे ब्राह्मण निर्माण केले आहेत. राष्ट्रासाठीं मरण्याची वृत्ति निर्माण करून त्यांनीं क्षत्रिय निर्माण केले आहेत. राष्ट्रांतील लाखों खेड्यांतील लोकांना घांस देण्याची व्यवस्था करतील, असे खरे वैश्य ते निर्माण करीत आहेत. राष्ट्रांतील घाण दूर करतील, स्वतः झाडतील, विष्ठा उचलतील, नवीन शौचकूपपद्धति शिकवितील, असे खरे शूद्र ते निर्माण करीत आहेत. ज्याला वर्णाश्रमधर्माची आंतरिक तळमळ असेल, तो या महापुरुषाच्या चरणांशीं जाऊन या वर्णाश्रमधर्माच्या सेवेला वाहून घेईल.

शुद्ध वर्णाश्रमधर्माची महात्माजी मूर्ति आहेत. त्या धर्माचे सच्चे उपासक ते आहेत. भारतीय संस्कृतींत हें वर्णाश्रमधर्माचें थोर तत्त्व ते वाढवीत आहेत. जीवनांत वर्णाश्रमधर्म सत्यार्थानें यावेत म्हणून ते अहर्निश खटपट करीत आहेत. हे भारतीय संस्कृतीच्या थोर उपासका! तुझ्यामुळें भारताचें मुख उजळ होत आहे, भारतीय संस्कृतीचें सत्स्वरूप जगाला कळत आहे. भारतीयांवर तुझे अनंत उपकार!

## स्त्रीस्वरूप : : १४

भारतीय स्त्रिया म्हणजे त्यागमूर्ति. भारतीय स्त्रिया म्हणजे तपस्या, मूक सेवा. भारतीय स्त्रिया म्हणजे अलोट श्रद्धा व अमर आशावाद. निसर्ग ज्याप्रमाणें गाजावाजा न करितां काम करीत असतो व फुलें फुलवीत असतो, त्याप्रमाणें भारतीय स्त्रिया कुटुंबांत सतत कष्ट करून, निमूटपणें श्रम करून आनंद निर्माण करीत असतात. प्रत्येक कुटुंबांत तुम्ही पहा. पहांटेपासून रात्रीं अकरा वाजेपर्यंत राबणारी ती कष्टाळू मूर्ति तुम्हांला दिसेल. क्षणची विश्रांति नाहीं. फारसा आराम नाहीं.

सीता-सावित्री, द्रौपदी-गांधारी, हे त्यांचे आदर्श आहेत. त्यागमूर्ति व प्रेममूर्ति अशीं हीं भारतीय स्त्रियांचीं दैवतें आहेत. सीता म्हणजे चिरयज्ञ. भारतीय संस्कृतींत स्त्रीचें जीवन म्हणजे पेटलेलें होमकुंड आहे. लग्न म्हणजे यज्ञ. पतीच्या



जीवनाशीं लग्न झाल्यापासून स्त्रीच्या जीवनयज्ञास आरंभ होतो आणि हा यज्ञ मरणानेंच शान्त होतो!

स्त्री म्हणजे मूर्त कर्मयोग! तिला स्वतंत्र अशी जणुं इच्छाच नाहीं. पतीच्या व मुलांच्या इच्छा म्हणजेच तिची इच्छा. पतीला आवडेल ती भाजी करा, पतीला आवडेल तो खाद्यपदार्थ करा, मुलांना आवडेल तें पक्वान्न करा. ज्या दिवशीं घरांत पति जेवावयास नसतो, त्या दिवशीं पत्नी स्वतः भाजी वगैरे करणार नाहीं. पिठलें ढवळील, नाहीं तर लोणच्याची चिरी घेईल; स्वतःसाठीं कांहीं एक नको. पतीला आवडणारें लुगडें नेसणें, पतीला आवडणारें पुस्तक वाचणें, पतीला आवडणारें गाणें गाणें, पतीसाठीं विणणें, पतीसाठीं शिणणें, त्याचे कपडे स्वच्छ ठेवणें, त्याच्या प्रकृतीस जपणें; पति हेंच पत्नीचें दैवत.

"चरणांची दासी" हेंच त्यांचें भाग्य! कबीर ईश्वराला म्हणतो :

"मैं गुलाम मैं गुलाम मैं गुलाम तेरा। तूं साहेब मेरा॥"

भारतीय स्त्री न कळत न वळत पतीला हेंच म्हणत असते. ती सर्वस्व पतीला अर्पण करते. सर्वस्वानें त्याची पूजा करते.

भारतीय स्त्रीनें स्वतःला पतींत मिळवून टाकिलें आहे, परंतु पतीनें काय केलें आहे? भक्त देवाचा दास होतो. परंतु देवहि मग भक्ताच्या दारांत तिष्ठत उभा असतो. नारद एकदां विष्णूच्या भेटीसाठीं गेले, तों भगवान् विष्णु पूजा करीत होते! नारदाला आश्चर्य वाटलें. सारें त्रिभुवन ज्याची पूजा करतें, तो आणखी कोणाची पूजा करीत बसला आहे? भगवान् विष्णु बाहेर येऊन म्हणाले :

"प्रल्हादनारदपराशरपुंडलीक
व्यासांबरीषशुकशौनकभीष्मदाल्भ्यान्
रुक्मांगदार्जुनवसिष्ठबिभीषणादीन्
पुण्यानिमान् परमभागवतान् स्मरामि"

भक्त हे देवाचे देव होत असतात. ज्ञानेश्वरींत एके ठिकाणीं फारच सुंदर ओंव्या आहेत. श्रीकृष्ण म्हणतात, "अर्जुना! भक्त हें माझें परम थोर दैवत."

"तया पहावयाचे डोहळे। म्हणून अचक्षूसि मज डोळे
हातींचेनि लीलाकमळें। तयासि पूजूं
दोवरी दोनी। भुजा आलों घेवोनी
आलिंगावया लागोनी। तयाचा देह॥"

भक्ताला पूजिण्यासाठीं देवाच्या हातांत कमळ, भक्ताला मिठी मारण्यासाठीं दोन हात पुरणार नाहींत म्हणून चार हात! भक्ताला पहावयाचे डोहाळे होतात म्हणून निराकार प्रभु साकार होतो! किती गोड आहे हा भाव!

आपण प्रेमानें ज्याचे दास होऊं, तो आपलाहि दास होतो. प्रेमानें दास होणें म्हणजे एक प्रकारें मुक्त होणें. परंतु आपल्या कुटुंबांत काय अनुभवास येतें? स्त्री सर्वांची सेवा करीत आहे, ती सर्वांची प्रेममयी दासी आहे; परंतु तिचे दास कोण आहे? तिला सुख व्हावें, तिला आनंद व्हावा, तिच्या हृदयाला विसांवा मिळावा म्हणून कोणाला चिंता आहे का? स्त्रीच्या मनाच्या व हृदयाच्या भुका कोणाला माहीत आहेत का? तिचीं आंतरिक दुःखें कोणाला कळतात का? तिची कोणी प्रेमानें विचारपूस करतो का?

स्त्रीच्या हृदयांत कोणीच शिरत नसेल! सारे स्त्री-जीवनाच्या अंगणांत खेळत असतात. तिच्या अंतरंगाच्या आंतरगृहांत कोणीहि जात नाहीं. तें अंतर्गृह उदास आहे. तेथें प्रेमाचे कलश घेऊन कोणी जात नाहीं. स्त्रीहृदय हें सदैव मुकेंच आहे! स्त्रिया मुक्या असतात. त्यांचीं हृदयें फार गूढ व गंभीर असतात. त्या प्रेमयाचना करीत नाहींत. हृदयाला ज्याची तहान आहे तें प्रेम असो कीं बाहेरची भाजी असो, स्त्री त्याची मागणी करणार नाहीं. जें आणून द्याल तें ती घेईल.

भारतीय स्त्रियांच्या हृदयाची कल्पना भारतीय पुरुषांस फारशी नसते. स्त्रियांना खायला-प्यायला असलें, थोडेंसें नीट नेसायला असलें म्हणजे झालें; त्यापेक्षां स्त्रियांना कांहीं अधिक पाहिजे असतें असें त्यांना वाटतच नाहीं! त्यांना स्त्रियांच्या आत्म्याचें दर्शन नसतें. स्त्रियांना आत्माच नाहीं असें म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली आहे. आणि जेथें आत्माच नाहीं, तेथें मोक्ष तरी कशाला?

भारतीय स्त्रियांच्या कष्टाळूपणाचा पुरुष अगदीं अनाठायीं फायदा घेतात. कधीं कधीं ते घरांत काडीइतकेंहि लक्ष देत नाहींत. मुलांबाळांचें पाहणार नाहींत. दुखलेंखुपलेलें पाहणार नाहींत. रात्रीं जागरण करणार नाहींत. मूल रडूं लागलें तर आदळआपट करतील. बिचारी माता त्या मुलाला मांडीवर घेऊन बसते. त्याला पायांच्या पाळण्यांत घालते. ती रडकुंडीस येते. पतीची झोंपमोड होऊं नये म्हणून किती जपत असते!

पति कसाहि असो त्याला पत्नी सांभाळून घेते. कुटुंबाची अब्रू ती संरक्षिते. कुटुंबाची लाज ती उघडी पडूं देणार नाहीं. स्वतः उपाशी राहील, दळणकांडण करील, परंतु कुटुंब चालवील. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत मुलांबाळांचें करील. खाऊ द्यावयास नसेल तर मुके घेईल व त्यांना हंसवील! स्वतःचे अश्रू, स्वतःचें दुःख ती कोणास दाखवणार नाहीं! तिचें दुःख केवळ तिलाच माहीत असतें.



पतीची लहर सांभाळणें म्हणजे तिचा धर्म होऊन बसतो. रात्रीं आठ वाजतां येतात का दहा वाजतां येतात, ती बिचारी वाट पहात बसते. पति उशिरां आल्यावर म्हणतो, "तूं जेवून कां नाहीं घेतलेंस?" तो जर पत्नीच्या हृदयांत कधीं डोकावता, तर असे शब्द त्यानें कधीं काढले नसते.

पतिमुखावरचें हास्य म्हणजे पत्नीचें सुखसर्वस्व! ती पतीच्या मुद्रेकडे पहात असते. पतीचे डोळे हंसले, ओंठ हंसले कीं तिला मोक्ष मिळतो. पति गोड शब्द बोलला कीं तिला सारें मिळालें. किती अल्पसंतोषी भारतीय सती! परंतु हा अल्पसंतोषहि त्यांना मिळत नसतो.

पापी, दुर्गुणी, दुराचारी पतींचीहि सेवा भारतीय स्त्रिया करीत असतात. एकदां ज्याच्याशीं गांठ पडली, ती कशी सोडावयाची? जरी कांहीं जातींत काडीमोड होत असली, तरी काडीमोड हें संस्कृतीचें चिन्ह समजलें जात नाहीं. जरी कांहीं जातींत पुनर्विवाह लागत असला तरी पुनर्विवाह हें सांस्कृतिक लक्षण गणलें जात नाहीं. पति म्हणजे त्यांचा देव. त्यांचा महान् आदर्श! त्यांचें दिव्य ध्येय!

पति दुर्वृत्त असला तरी त्याला थोडेंच टाकावयाचें? एकदां त्याला मीं माझा असें म्हटलें. आपलेपणाचें नातें हा परीस आहे. माझा मुलगा खोडकर असला म्हणून का त्याला मी टाकीन? सारें जग माझ्या मुलाला नांवें ठेवील, म्हणून का मींहि ठेवावीं? मग त्याच्यावर मायेचें पांघरूण कोणीं घालावयाचें? कोणाच्या तोंडाकडे त्यानें बघावें, कोणीकडे जावें? जसें मूल, तसाच पति. साऱ्या जगानें माझ्या पतीची छीथू केली, त्याला हिडीसफिडीस केलें, तरी मी नाहीं करतां कामा. मींहि त्याला दुःख दिलें, मींहि त्याला प्रेमाचा शब्द दिला नाहीं, प्रेमानें जेवूं घातलें नाहीं, तर मग हें घर तरी कशाला? सारें जग लोटील, परंतु घर लोटणार नाहीं. घर म्हणजे आधार, घर म्हणजे आशा, घर म्हणजे विसांवा, घर म्हणजे प्रेम, घर म्हणजे आत्मीयता! हें घर माझ्या पतीसाठीं व माझ्या मुलांसाठीं मी प्रेमानें भरून ठेवीन.

आशा ही भारतीय स्त्रियांची दृष्टि आहे. पति वाईट आहे, पतीशीं माझें

पटत नाहीं म्हणून भराभर जर घटस्फोट होऊं लागले, तर काय साधणार आहे? मग जगांत प्रेम, त्याग, या शब्दांना अर्थ तरी काय? जगांत पटवून घ्यावें लागत असतें. जग म्हणजे सहकार्य. जग म्हणजे तडजोड. संसार म्हणजे देवाण–घेवाण. परंतु पति सहकार्य करीत नसेल, तर मी का त्याला सोडून जाऊं? त्यागमय प्रेमानें मी त्याच्याशींच राहीन. माझ्या प्रेमाचें त्यांतच बळ आहे. दुर्गुणालाहि सांभाळील तेंच प्रेम. मी आशेनें सेवा करीन, प्रेम देईन. मनुष्य हा शेवटीं किती झालें तरी ईश्वरी अंश आहे: एक दिवस माझ्या पतींतील दिव्यता प्रकट होईल. त्याच्या आत्मचंद्राला ग्रहण लागलें म्हणून का मी त्याला सोडूं? उलट, त्याच्याबद्दल मला अनुकंपा वाटली पाहिजे, मला वाईट वाटलें पाहिजे. सारें जग त्याला हंसत आहे. मीहि का हंसूं? नाहीं, नाहीं. माझ्या प्राणांनीं मी त्याला सांभाळीन. त्याला सांभाळतां सांभाळतां कदाचित् मला माझें बलिदानहि द्यावें लागेल. कांहीं हरकत नाहीं. तें बलिदान व्यर्थ जाणार नाहीं. माझ्या जीवनानें जें झालें नाहीं तें मरणानें होईल. सिंधूच्या मरणानें सुधाकराचे डोळे उघडतील. सिंधूचें मरण फुकट नाहीं गेलें.

जगांत आपणांस एकमेकांना सुधारावयाचें आहे. दगड मुलाला शिकविण्यांतच गुरूची कसोटी. दगडांना जर गुरु दूर लोटील तर तो गुरु कसचा? दगड पाहून गुरूच्या प्रतिभेला पाझर फुटले पाहिजेत. येथें आपल्या कलेला खरा अवसर आहे, प्रयोगाला पूर्ण वाव आहे, असें त्याला वाटलें पाहिजे. स्त्रीहि पतीच्या बाबतींत असेंच म्हणेल. "माझ्या नाठाळ पतीची मी गुरु होईन. त्यांना सुधारणें हेंच माझें दिव्य कर्म. मी आशेनें प्रयत्न करीत राहीन."

इब्सेनचें 'पीर जिन्ट' म्हणून एक काव्यात्मक नाटक आहे किंवा नाट्यमय काव्य आहे. पीर जिन्टची पत्नी रानांतील एका झोंपडींत त्याची वाट पहात असते. पीर जिन्ट जगभर भटकत असतो. जगांतील नानाविध अनुभव घेतो. किती तरी वर्षांनीं भारावलेला असा तो आपल्या पत्नीच्या दारांत उभा राहतो. पत्नी आंधळी झालेली असते. ती चरख्यावर सूत काढीत असते. पति येईल असें आशेचें गाणें म्हणत असते.

पीर जिन्टः—हा पहा, मी आलों आहें. दमून भागून आलों आहें.

तीः—या; आलेत? मला वाटलेंच होतें तुम्ही याल. या तुम्हांला थोपटतें. माझ्या मांडीवर निजवतें. तुम्हांला ओंव्या म्हणतें.



पीर जिन्टः—तुझें माझ्यावर अजून प्रेम आहे?

तीः—तुम्ही चांगलेच आहांत.

पीर जिन्टः—मी का चांगला आहें? सारें जग मला वाईट म्हणतें. मी का तुला चांगला दिसतों?

तीः—हो.

पीर जिन्टः—मी तर वाईट आहें. कोठें आहें मी चांगला?

तीः—माझ्या आशेंत, माझ्या प्रेमांत, माझ्या स्वप्नांत तुम्ही मला चांगलेच दिसत आहांत!

अशा स्वरूपाचा त्या पुस्तकाचा अंत आहे. "माझ्या आशेंत, माझ्या प्रेमांत, माझ्या स्वप्नांत" हे शेवटचे शब्द आहेत. त्या शब्दांत स्त्रीचें सारें जीवन आहे. पतीकडे पाहण्याचे तिचे डोळेच निराळे असतात. ती ज्या डोळ्यांनीं पाहते, त्या डोळ्यांची आपणांस कशी कल्पना येणार? कितीहि दुर्वृत्त पति असो, एक दिवस तो चांगल्या रीतीनें वागेल अशी अमर आशा प्रेमळ स्त्री–हृदयांत असते.

घर म्हणजे एकमेकांना माणसाळविण्याची शाळा आहे. पिसाळलेलें कुत्रें असतें. तें जगाला कां चावतें? तें कुत्रें जगाचा द्वेष करीत नसतें. त्याच्या दातांत विष लसलसतें. तें विष कोठें तरी ओतावें असें त्याला वाटत असतें. त्याप्रमाणेंच माणसाचें आहे. स्वतःचे काम-क्रोध कोणावर तरी ओतावे असें त्याला वाटत असतें. ते कोठें तरी ओतले म्हणजे मग शान्त होतात. हें पोटांतील विष ओतण्याची जागा म्हणजे घर. पति येईल व पत्नीवर रागावेल. सासुरवाशीण मुलावर रागावेल. कोठें तरी आपल्या विकारांना प्रकट व्हावयास अवसर हवा असतो.

पत्नी म्हणते, "घरांत कांहीं करा; परंतु जगांत नीट वागा. आणा सारी घाण घरांत. ती काढायला मी समर्थ आहें. ओरडा माझ्यावर, रागवा माझ्यावर. तुमचा काम-क्रोध होऊं दे शान्त. पशुत्व माझ्या ठायीं होमा. तुमचें पशुत्व होमण्याची मी पवित्र वेदी आहें. बाहेर जाल ते माणूस होऊन जा, पशुपति होऊन जा, शिव होऊन जा." सत्स्वरूपी पतीला शिवशंकर करणारी स्त्री ही शक्ति आहे. पत्नी पतीला माणसाळविते. शान्त करते, स्थिर करिते, आळा घालते, संयम घालते, मर्यादा घालते.

परंतु हें सारें करावयास पत्नीच्या प्रेमांत शक्तीहि हवी. तिचें प्रेम दुबळें असतां

कामा नये. तिची सेवा शक्तिहीन असतां कामा नये. एक प्रकारचें तेज व प्रखरता त्या प्रेमांतहि हवी. धीरोदात्तता हवी. मुळूमुळू रडणें म्हणजे प्रेम नव्हे. प्रेम रडत नाहीं बसत. प्रेम कर्तव्य करावयाला पदर बांधतें. पति दारू पितो, नाहीं मी पिऊं देणार. पति सिगारेट ओढतो, नाहीं मी ओढूं देणार. हें मुखकमल त्या घाणेरड्या धुरानें भरावयाचें? ते सुंदर ओठ काळेकुट्ट व्हावयाचे? विडा खाऊन सारख्या पिचकाऱ्या मारतात, नाहीं मी घाण करूं देणार. पति म्हणजे माझें ठेवणें. मी तें सांभाळीन. मलिन होऊं देणार नाहीं. पतीला निर्मळ ठेवण्यासाठीं मला मरावें लागलें तरी चालेल. पतीच्या व्यसनांत मी त्याला साहाय्य नाहीं करणार. मी आड उभी राहीन. मी जिवंत असतांना पतीकडे व्यसन कसें येईल? माझ्या जीवनाचें सुदर्शन मी आड घालून ठेवीन.

भारतीय संस्कृतींत मांडव्य ऋषीला त्याची पत्नी वेश्येकडे घेऊन जाते, अशी कथा आहे. आदर्शाची ही पराकाष्ठा होय! ह्या त्यागाची व धैर्याची कल्पना करवत नाहीं. पतीची इच्छा म्हणजे माझी इच्छा. त्यानें शेण मागितलें तरी मी निरहंकारपणें शेण देईन. माझे हात म्हणजे पतीचे हात. माझ्या हातून त्याला पाहिजे तें तो घेईल. माझे हात तदर्थ आहेत. मी केवळ एक किंकरी!

परंतु ह्या आदर्शाची मला कल्पना करवत नाहीं. भारतीय सतींचा आदर्श दुबळा नसावा असें मला वाटतें. वरच्या उदाहरणांतील आदर्श दुबळा आहे असें माझ्यानें म्हणवत नाहीं. पतीबरोबर मी चढेन किंवा पडेन. जेथें पति तेथें मी, जेथें त्याची इच्छा तेथें मी. ह्या वरील आदर्शासमोर माझे डोळे मिटून जातात. मला घेरी येते.

सुधारणा करण्याचे अनेक मार्ग असतात. त्यांतील हाहि एक असूं शकेल. परंतु हा फारच दुस्तर आहे. भारतीय स्त्रीचा हा सर्वमान्य आदर्श होऊं शकणार नाहीं. भारतीय स्त्रियांचा आदर्श आज दुबळा झाला आहे. तो प्रखर व्हावा एवढेंच मला म्हणावेसें वाटतें. घटस्फोटाचा कायदा झाला तर मी त्याला नांवें ठेवणार नाहीं. परंतु प्रेम, त्याग, सहकार्य, सुधारणा या शब्दांना कांहीं अर्थ उरावा असें जर वाटत असेल, तर पतिपत्नींनीं एकमेकांचा कालत्रयीं कोणत्याहि परिस्थितींत त्याग न करणें हेंच मला श्रेयस्कर वाटतें. यांतच माणुसकी आहे. यांत माणसाची दिव्यता आहे.

भारतीय स्त्रियांच्या व्रतांतील दुबळेपणा जाऊन प्रखरपणा यावा, त्याचप्रमाणें



त्यांच्या प्रेमवृत्तींत विशालता यावी. स्त्रियांचें प्रेम खोल असतें, परंतु लांबरुंद नसतें. त्यांच्या दृष्टीची मर्यादा फारच संकुचित असते. कुटुंबापलीकडे त्यांचें फारसें लक्ष नसतें. आणि यामुळेंच 'स्त्रिया भांडणाला कारण' असें कुटुंबांत म्हणतात. स्त्रियांचें क्षितिज मोठें झालें पाहिजे. आजुबाजूच्या जगाचा विचार त्यांना असला पाहिजे. जगांतील सुख-दुःखांची कल्पना त्यांना हवी. भेदभाव कमी करायला हवा. पति व आपलीं मुलेंबाळें यांच्यापलीकडे जग नाहीं, असें त्यांना वाटतां कामा नये.

वकिलाच्या पत्नीला वाटेल कीं, "आपण सुखी आहोंत. आपला पति पुष्कळ पैसे मिळवितो. आपल्या मुलांबाळांना कपडे आहेत. त्यांना नीट शिकतां येतें. रहायला सुंदर बंगला, लावायला फोनो, घरांत गडीमाणसें, सारें कांहीं आहे."

परंतु तिनें दृष्टि विशाल केली पाहिजे. "हे पैसे कोठून येतात? माझा पति खोटेंनाटें नाहीं ना करीत? शेतकऱ्यांचीं भांडणें तोडण्याऐवजीं तीं कशीं वाढतील, असें तर नाहीं ना पति बघत? पति माझ्या अंगाखांद्यावर दागिने घालीत आहे, माझ्यासाठीं रेशमी लुगडीं आणीत आहे. परंतु ह्या वैभवासाठीं तिकडे कोणी उघडें तर नाहीं ना पडत?" असा विचार स्त्रीनें केला पाहिजे.

व्यापाऱ्याच्या पत्नीनें असेंच मनांत विचारिलें पाहिजे, "माझा पति गरिबांस छळीत तर नाहीं ना? गरिबांचीं मुलेंबाळें उपाशी तर नाहींत ना? फाजील फायदा नाहीं ना घेत? फाजील व्याज नाहीं ना घेत? परदेशी मालाचा व्यापार नाहीं ना करीत?"

सरकारी नोकराच्या पत्नीनें म्हटलें पाहिजे, "माझा पति लांचलुचपत तर नाहीं ना घेत? कोठून येतात हे पैसे? कोठून येतें हें तूप, हा भाजीपाला? माझा पति अन्यायानें तर नाहीं ना वागत? अन्यायी कायद्यांची तर अंमलबजावणी नाहीं ना करीत? नीट जनतेचें खरें हितच करीत आहे ना?"

भारतीय स्त्रिया असे प्रश्न स्वतःच्या मनास कधींहि विचारीत नाहींत. पति त्यांना अज्ञानाच्या अंधारांत ठेवतात. परंतु पतीच्या पापांत त्याहि भागीदार असतात, हें त्यांनीं विसरतां कामा नये. माझा सावकार पति, हजारों शेतकऱ्यांना रडवून मला सोन्यामोत्यांनीं नटवीत आहे, माझा वकील पति शेंकडों शेतकऱ्यांस भिकेस लावून मला शेला-शालू घेत आहे, माझा डॉक्टर पति गरीब भावांबहिणींपासूनहि किती तरी फी उकळून मला फोनो देत आहे, माझा कारखानदार पति

हजारों मजुरांना पिळून पिळून मला माझ्या महालांत हंसवीत आहे, माझा अधिकारी नवरा रयतेला गांजून पैसे आणीत आहे, असा विचार जर भारतीय स्त्रियांच्या हृदयांत जागा झाला तर त्या खडबडून उठतील. कारण धर्म हें भारतीय स्त्रियांचें जीवन आहे.

भारतीय स्त्रिया देवदेव करतात. परंतु आपला संसार पापावर चालला आहे, ही गोष्ट अज्ञानानें त्यांना कळत नाहीं. भारतीय स्त्रियांनीं असें अज्ञानांत नाहीं राहतां कामा. दृष्टि व्यापक व निर्भेळ केली पाहिजे. तरच जीवनांत धर्म येईल. पति पैसे कोठून कसे आणतो तें माहीत नाहीं आणि दानधर्म केलेला, देवापुढें टाकलेला, क्षेत्रांत दिलेला पैसा कोठें जातो, त्याचाहि पत्ता नाहीं. घरीं पति पैसे आणीत आहे तेहि पापानें व दानधर्मांतील पैसेहि चालले आलस्य, दंभ, पाप, व्यभिचाराकडे! ही गोष्ट स्त्रिया विचार करूं लागतील तरच त्यांना कळेल.

आणि मग तीं रेशमी वस्त्रें त्यांचें अंग जाळतील! ते दागिने निखारे वाटतील! त्या माड्या नरकाप्रमाणें वाटतील! आपल्या पतीला सन्मार्गावर आणण्याची त्या खटपट करतील.

भारतीय स्त्रिया ध्येयें पाळणाऱ्या आहेत. समाजांत जीं जीं नवीन ध्येयें उत्पन्न होतील तीं तीं स्त्रियांपर्यंत गेलीं पाहिजेत. तरच तीं अमर होतील. गायीचें माहात्म्य भारतांत उत्पन्न झालें, स्त्रियांनीं तें टिकविलें. शुचिर्भूतपणाचें तत्त्व उत्पन्न झालें, त्यांनीं तें पराकोटीला नेलें. पातिव्रत्याचें ध्येय निघालें त्यांत त्यांनीं पराकाष्ठा केली. दारांत कोणीहि येवो त्याला मूठभर दाणे घातल्याशिवाय त्या राहणार नाहींत. "कोणी देवहि असेल रूप घेऊन आलेला" असें म्हणतील. एकीकडे शुचिर्भूतपणाच्या ध्येयामुळें सोंवळेपणाची कमाल, तर दुसरीकडे देव सर्वत्र आहे या तत्त्वाचा 'कोणीहि दारांत येवो त्याला मूठभर द्या' असें म्हणण्यांत प्रत्यक्ष आचार. एकादशी वगैरे उपवास त्यांनींच ठेविले आहेत. नदीवर स्नानास जाणें, यात्रा करणें यांची त्यांनाच हौस असते.

स्त्रिया ध्येयें कदाचित् निर्माण करणार नाहींत; परंतु निर्माण झालीं कीं त्यांना मरूंहि देणार नाहींत. त्याप्रमाणें पुरुष बाहेरून धान्य वगैरे माल आणतो परंतु घरांत तो सांभाळणें, तो सांडूं न देणें, घाण होऊं न देणें हें स्त्रियांचें काम असतें, त्याप्रमाणें समाजांत जीं जीं ध्येयें निर्माण होतील तीं तीं मरूं न देणें हें स्त्रियांचें



काम असतें. मुलें आजारी पडलीं तर त्यांना सांभाळणें हें जसें मुख्यत्वें त्यांचेंच काम, तद्वत् ध्येयबाळेंहि सुरक्षित ठेवणें हें त्यांचेंच काम.

पुरुष पोटच्या पोरांची उपेक्षा करील, परंतु स्त्री करणार नाहीं. त्याप्रमाणेंच पुरुषांनीं निर्माण केलेलीं ध्येयें पुरुष सोडूं पाहील, परंतु स्त्री सोडणार नाहीं. श्रियाळ राजा आयत्या वेळेस अतिथीबरोबर जेवावयास कुरकुरतो. त्याला धैर्य होत नाहीं. परंतु पतीचा हात धरून चांगुणा त्याला बसविते. ती ध्येयबाळाला मरूं देणार नाहीं.

भारतीय स्त्रियांचा हा महान् विशेष आहे. आणि तो लक्षांत घेतला पाहिजे. जीं जीं नवीन ध्येयें आज उत्पन्न होत आहेत तीं तीं स्त्रियांपर्यंत गेलीं पाहिजेत. तरच तीं टिकतील. हरिजनसेवा, ग्रामोद्योग, खादी, स्वदेशी, इत्यादि नवीन व्रतें, हा नवीन दयामय व प्रेममय धर्म, हा सेवाधर्म त्यांच्या हृदयापर्यंत गेला पाहिजे. स्त्रियांच्या धर्मबुद्धीला जागृत करा. हा नवधर्म त्यांना पटवा. त्यांना पटला कीं तो राष्ट्राचा झाला. स्त्रियांच्या पेटींत जें जाईल तें नष्ट होणार नाहीं.

म्हणून माता या दृष्टीनेंच भारतीय स्त्रियांचा अपार महिमा. त्या सांभाळणाऱ्या आहेत. मुलें सांभाळणाऱ्या, पतीला सांभाळणाऱ्या, ध्येयांना सांभाळणाऱ्या! त्या कोणाला मरूं देणार नाहींत. त्या सर्वांना प्रेम देतील, आशीर्वाद देतील, सेवा देतील. ईश्वराचेंच रूप! ईश्वराला भक्तांनीं माता हाच शब्द योजिला आहे. कारण ईश्वराचें जें हें सांभाळण्याचें मुख्य कर्म, सर्वांवर पांघरूण घालण्याचें कर्म, तें या जगांत माता करीत असतात. ईश्वराला 'आई' म्हणून हांक मारणें याहून दुसरी थोर हांक नाहीं—अन्वर्थक हांक नाहीं! ईश्वराच्या प्रेमाची कल्पना आणून देणारी जर कोणती वस्तु असेल, तर ती ही माता होय.

म्हणून भारतीय संस्कृति सर्वत्र मातृवंदन करीत आहे. उपनिषदांतील आचार्य ऐहिक देवतांचीं नांवें सांगतांना, प्रत्यक्ष संसारांतील देवतांचीं नांवें सांगतांना प्रथम "मातृदेवो भव" असें सांगतो. आधीं माता, मग पिता. पतिपत्नींमध्यें आधीं पति आहे. परंतु आईबापांमध्यें आधीं आई आहे! पतीला पिता व्हावयाचें आहे. पत्नीला माता व्हावयाचें आहे. आणि या दोन स्वरूपांत माता हें उदात्ततर, श्रेष्ठतर स्वरुप होय.

म्हणून शेवटीं भारतीय संस्कृति मातृप्रधान संस्कृति आहे. मातेला तीन प्रदक्षिणा घालणें म्हणजे सर्व पृथ्वीला प्रदक्षिणा घालणें होय. आईबापांची सेवा

करणें म्हणजे मोक्ष मिळविणें. "न मातुः परदैवतम्" आईविना दैवत नाहीं. आईचें ऋण कधीं फिटत नाहीं.

विठ्ठल म्हणजे आई, भारत म्हणजे आई, गाय म्हणजे आई! भारतवर्षांत सर्वत्र मातेचा महिमा आहे. आईला आधीं वंदन. कोणताहि मंगल विधि असो, आधीं आईचा आशीर्वाद, तिला नमस्कार.

पतीचे सहस्र अपराध पोटांत घालून त्यालाहि सांभाळणारी, आपल्या मुलांबाळांना सांभाळणारी, आणि भारतीय ध्येय सांभाळणारी अशी जी ही भारतीय माता, तिला अनंत प्रणाम!

आणि पतीबरोबर चितेवर हंसत चढणारी सती किंवा पतिनिधनोत्तर त्याचें चिंतन करीत वैराग्यानें व्रतमय जीवन कंठणारी गतभर्तृका! या दोन वस्तूंचें कोण वर्णन करील? भारतांतील सतींचीं वृंदावनें लग्न म्हणजे काय यावरचीं मूक प्रवचनें आहेत. हीं वृंदावनें भारतास पावित्र्य देत आहेत. ठिकठिकाणीं हे यज्ञमय इतिहास लिहिलेले आहेत.

आणि गतधवा? गतधवा नारी म्हणजे क्षणोक्षणींचें चितारोहण! भारतीय बालविधवा म्हणजे करुणकरुण कथा आहे. आजुबाजूच्या विलासी जगांत तिला विरक्त रहावयाचें असतें. प्रत्येक क्षण म्हणजे कसोटी! मंगल वाद्यें तिच्या कानांवर येतात. मंगल समारंभ होत असतात. कोठें विवाह आहे, कोठें डोहाळेजेवण आहे, कोठें ओटीभरण आहे, कोठें बारसें आहे, परंतु तिला सारे समारंभ वर्ज्य! कोपऱ्यांत गळा कापलेली ही कोकिळा बसलेली असते! व्रतें-वैकल्यें तिच्यावर लादण्यांत येतात! सारे विधिनिषेध तिच्यासाठीं! सारे संयम तिच्यासाठीं!

अशा आगींतून ती दिव्य तेजानें बाहेर पडते. बाळकृष्णाशीं बोलते. त्याला नटवते. त्याला नैवेद्य देते. देव हें तिचें मूल. देवाची ती माता होते. ती यशोदा होते, परंतु या यशोदेला अपशयी समजण्यांत येतें! तिचें दर्शन नको! जिच्या पायांचें तीर्थ घेऊन सारे गायांवरचे संत उद्धरून जातील, तिला हे सारे गादीमहाराज अशुभ समजत असतात!

सर्वांची सेवा हें तिचें काम. कोणाचीं बाळंतपणें करील, कोणाचे स्वयंपाक करील. कोठें कुटुंबांत अडलें कीं तिकडे झाली तिची पाठवणी. तिला मोकळीक नाहीं, गंमत नाहीं, आनंद नाहीं. जगांतील सारे अपमान सोसून जगाचें भलें चिंतणें हें तिचें ध्येय असतें.



भगवान् शंकर हलाहल पिऊन जगाचें कल्याण करितात. तसेंच गतधवेचें आहे. ती निंदा, अपमान, शिव्याशाप यांचें विष मुकाट्यानें पीत असते. आणि पुन्हां सेवेस सिद्ध!

आदर्श विधवा जगाची गुरु आहे. ती संयम व सेवा यांची मूर्ति आहे. स्वतःचें दुःख गिळून जगासाठीं झटणारी ती देवता आहे.

भारतीय संस्कृतींत हा महान् आदर्श आहे. अशा दिव्य देवतेसमोर सतरादां लग्नें करणारे पुरुष सूकरासारखे वाटतात. स्त्रीजातीची धन्यता वाटते.

आदर्श उच्च असावा. परंतु ज्याला तो झेपत नसेल, त्याला तो देण्यांत अर्थ नाहीं. श्रीकृष्ण मारूनमुटकून अर्जुनाला संन्यासी करूं इच्छीत नाहीं. बालविधवांना तर आईबापांनीं कुमारिका समजूनच त्यांचे पुन्हां विवाह लावून द्यावेत. परंतु यांतहि त्यांना स्वातंत्र्य असावें. स्त्रीजातीचें उदात्त ध्येय त्यांना पूजावयाचें असेल तर मोकळीक असावी. परंतु फार उंच ध्येय पकडावयाला गेल्यामुळें पडण्याचा संभव असतो. त्यापेक्षां जरा खालचें ध्येय घेऊन तेथें नीट पाय रोवून उभें राहणें अधिक श्रेयस्कर आहे.

भारतीय स्त्रियांच्या पावित्र्याची, संयमाची, वैराग्याची धन्य आहे! भारतांत आज शेंकडों वर्षें ओतलेलें हें वैराग्य व्यर्थ का जाईल? भारतीयांच्या उज्ज्वल भवितव्यास त्यापासून खत नाहीं का मिळणार? भारतीय सतींनो! तुमचा दिव्य महिमा वर्णावयास मला शक्ति नाहीं! तुमचीं चित्रें माझ्या अंतश्चक्षूंसमोर मी आणतों व तुमचे पाय भक्तीच्या अश्रुजलानें धुतों. दुसरें मी क्षुद्र पामर काय करणार?

## मानवेतर सृष्टीशीं प्रेमाचे संबंध : : १५

मनुष्याच्या नीतिशास्त्रांत सर्व चराचर सृष्टीचा विचार केलेला असला पाहिजे. मानवहि मानवापुरतेंच जर पाहील, तर तोहि इतर पशुपक्ष्यांच्याच पायरीचा होईल. मानव मानवेतर सृष्टीचेंहि शक्य तितकें प्रेमानें संगोपन करील. मानवेतर सृष्टीशींहि जर जिव्हाळ्याचे संबंध जोडील, तरच तो सर्व सृष्टींत श्रेष्ठ असें सिद्ध होईल. आपण सर्व सृष्टीचा संहार करतों म्हणून मोठे, असें म्हणून घेण्यापेक्षां

सर्व सृष्टीवर आपण प्रेम करतों म्हणून मोठे, असें म्हणून घेण्यांत मानवाचा खरा मोठेपणा आहे.

पशु, पक्षी, वृक्ष-वनस्पती यांच्याशीं असे जिव्हाळ्याचे संबंध जोडण्याचा भारतीय संस्कृतीनें प्रयत्न केला आहे. मानवी कुटुंबांत त्यांना प्रेमाचें स्थान दिलें आहे. मानवी शक्ति मर्यादित आहे. परंतु त्या मर्यादित शक्तीनें जें कांहीं करतां येईल तें मानवानें करावें असें भारतीय संस्कृति सांगते. आपण सर्व पशूंचा सांभाळ करूं शकणार नाहीं. सर्व पशूंशीं प्रेमानें वागूं शकणार नाहीं. परंतु निदान गायी-बैलांशीं तरी प्रेम जोडूं या. सर्व पशुसृष्टि दूर राहिली. परंतु गायीच्या निमित्तानें पशुसृष्टीशीं जोडले जाऊं या. गाय हा पशुसृष्टीचा एक प्रतिनिधि.

भारतीय संस्कृतींत गाय केवळ उपयुक्त वस्तु म्हणून राहिली नाहीं. गाय सर्वतोपरी उपयोगी म्हणून मानवानें तिला जवळ केलें ही गोष्ट खरी. परंतु एकदां गाय अंगणांत आल्यावर ती कुटुंबांतील एक वस्तु झाली. आपण आपले आईबाप म्हातारे झाले म्हणजे का त्यांना खाटकास विकावयाचें? त्यांना मारून त्यांचें का खत करावयाचें? हे निरुपयोगी दुबळे मायबाप ठेवण्यांत काय अर्थ, असें का म्हणावयाचें?

आईबाप म्हातारे झाले तरी त्यांना आपण मारीत नाहीं. त्यांचे पूर्वीचे उपकार आपण स्मरतों. त्यांचा देह रात्रंदिवस आपणांसाठीं झिजला हें आठवतों. त्यांचें प्रेम, त्यांचा त्याग, त्यांचे कष्ट, त्यांचे अपार श्रम सारें आपल्या डोळ्यांसमोर असतें. आपण त्या वृद्ध मायबापांना म्हणतों, "आतां तुम्ही स्वस्थ बसा. स्वस्थ बसून खाण्याची तुमची योग्यता आहे. तुमचें आम्हांस ओझें नाहीं. तुमच्या अनंत सेवेबद्दल आम्हीं कितीहि दिलें तरी तें थोडेंच होईल. तुमचा आशीर्वाद आम्हांस द्या. कृतज्ञतापूर्वक तुमची आतां आम्ही सेवा करूं."

गायी-बैल म्हातारे झाले तर त्यांची खाटकाकडे रवानगी करा, असें भारतीय संस्कृति सांगत नाहीं. ज्या गायीनें दहादहा, पंधरापंधरा वर्षें भरपूर दूध दिलें, जिच्या दुधावरच आपलें सर्वांचें पोषण झालें, जिनें शेतीसाठीं व इतर कामासाठीं आपणांस खंदे बैल दिले, अशा गायीस ती केवळ आतां म्हातारी झाली म्हणून का सोडावयाचें? ती कृतघ्नता आहे. मनुष्य केवळ उपयुक्ततेवर जगूं शकत नाहीं. मनुष्याला कांहीं थोर भावना आहेत. त्या भावनांमुळें मानवाला किंमत आहे. या



सर्व थोर भावना उपयुक्ततावादाच्या हत्यारानें जर मारून टाकीत असाल, तर माणसाची किंमत शून्य होईल हें ध्यानांत धरलें पाहिजे.

गायीचें जर नीट संवर्धन झालें तर दहापंधरा वर्षांत त्या आपणांस इतकें दुग्ध-रूप द्रव्य देतील, कीं त्या द्रव्याच्या व्याजांतहि त्यांच्या म्हातारपणीं त्यांचा सांभाळ आपण करूं शकूं. आजकाल बोंडलेंभर दूध देणाऱ्या गायी या गोपूजक भारतांत दिसत आहेत! अकबराच्या कारकीर्दींत तीसतीस शेर दूध देणाऱ्या गायी होत्या, असे 'ऐने अकबरीं'त उल्लेख आहेत. आजहि युरोप-अमेरिकेंत अशा गायी गांवोगांव आहेत. हिंदुस्थानांत सरकारी गोवर्धनगृहांत अशा गायी दिसतात. नवीन शास्त्रीय ज्ञानाची कांस धरून आपण गोसंगोपन व गोसंवर्धन केलें पाहिजे. असें करूं तर पुन्हां चार सागरांप्रमाणें ज्यांचे चार सड दुधानें भरलेले आहेत, अशा गायी भारतांत दिसूं लागतील. पुन्हां ठायींठायीं गोकुळें होतील. आणि मग गाय पोसायला जड वाटणार नाहीं. ती वृद्ध झाल्यावरहि तिला आपण कृतज्ञतेनें व प्रेमानें खायला-प्यायला देऊं.

कुटुंबांतील एक माणूस अशा दृष्टीनें भारतीय संस्कृति गायीकडे पहावयास शिकविते. आपण गायीसाठीं गोग्रास काढून ठेवतों. आधीं गायीसाठीं पान वाढा-वयाचें व मग आपण जेवावयाचें. जेवतांना तिची आठवण ठेवावयाची. आपण कपाळाला गंध लावतों. कुंकूं लावतों. गायीच्याहि कपाळीं तें लावावयाचें. मनुष्य म्हणतो, "गायी! तूं मुकी, तुझें स्मरण आधीं. तुझ्या रूपानें सर्व पशूंचें मी स्मरण करतों. तुझें तर्पण करून सर्व पशूंचें तर्पण झालें असें मी समजतों."

भारतीय संस्कृतींत सर्वत्र गाय भरली आहे. लहान मुलांना आया ज्या ओंव्या म्हणतात, त्या ओंव्यांत गायीवर किती गोड विचार लिहिलेले आहेत. त्या गायी-वरच्या ओंव्या अत्यंत सहृदय अशा आहेत :

ये ग ये ग गायी। चरुनी वरुनी
तान्ह्या बाळाला म्हणूनी। दूध देई
गायी ग चरती। कोंवळीं कणसें
तान्ह्या बाळा नीरसें। दूध पाजूं
गायी हंबरती। प्रेमाचा पान्हा फुटे
गळयाचें दावें सुटे। वासरांच्या

अंगणांत गाय । दाखविते माय
गोड घांस खाय । राजा माझा
गायीचा गोवारी । म्हशीचा खिलारी
तान्ह्या बाळाचा कैवारी । गोकुळींचा
गायी ग चरती । वांसरें कोठें गेलीं
गंगेच्या पाण्या नेलीं । तान्ह्या बाळानें
गायी ग चरती । कोंवळा ग चारा
दुधाच्या चारी धारा । वांसरांना
गायी ग चरती । वांसरें हंबरती
वाडा आहे हा श्रीमंती । तान्ह्या बाळाचा
गायीचा ग गोऱ्हा । मांडी वळूनीया बसे
वाडा शोभिवंत दिसे । माझ्या बाळानें

अशा प्रेमळ गोप्रेमाच्या ओंव्या शेंकडों आहेत. गायीच्या वांसरांबरोबर खेळत भारतीय बाळें वाढत असतात. गायींचीं वांसरें म्हणजे जणुं आपलीं भावंडें.

आपण बाळाचें बारसें करतों. त्याप्रमाणें गायीच्या वांसराचेंहि बारसें करण्याचा एक दिवस आपण ठरविला आहे. दिवाळीच्या आधीं अश्विन वद्य द्वादशीला आपण गायगोऱ्ह्यांची बारस किंवा गोवत्सबारस किंवा वसुबारस हें नांव दिलें आहे. बारस म्हणजे द्वादश, द्वादशी. बारसें म्हणजे बारावा दिवस. आश्विनांतील कृष्णपक्षांतील हा हेतुपुरस्सर बारावाच दिवस गायवांसरांसाठीं आपण नियुक्त केला आहे. त्या दिवशीं गायवांसरांची आपण पूजा करतों. त्या दिवशीं त्यांचा उत्सव. माणसाच्या दिवाळीच्या आधीं गायवासरांची दिवाळी. गायीच्या वांसराचा जन्मल्यापासूनचा बारावा दिवस जणुं आपण साजरा करतों. त्याचें बारसें करतों. किती सहृदय आहे ही भावना !

गायीवांसरांची पूजा करतों, त्याचप्रमाणें बैलांचीहि आपण पूजा करतों. पोळ्याचा सण आपण करतों. सातारकडच्या बाजूला बेंदराचा सण म्हणतात. बेंदराच्या दिवशीं, या पोळयाच्या दिवशीं, बैलाला विश्रांति. त्याला सजवावयाचें, त्याच्या गळयांत माळा घालावयाच्या; शेतकऱ्यांच्या बायकांच्या पायांतील तोडे बैलांच्या पायांत घालण्यांत येतात ! पोळ्याच्या सणाचे दिवशीं गरीब शेतकरीसुद्धां पुरण घालतो. बैलाला पुरणपोळीचा नैवेद्य, त्यावर तुपाची धार. बैलांची थाटामाटानें मिरवणूक निघते. वाजंत्री वाजतात, बार उडतात, आनंद असतो. हा कृतज्ञतेचा आनंद असतो. ज्या बैलाच्या मानेवर आपण जूं दिलें, त्याच्या मानेला घट्टे पडले; उन्हातान्हांत, चिखलांत ज्यांना राबविलें, ज्यानें नांगर ओढले, मोटा ओढल्या, गाड्या ओढल्या, ज्याला रागाच्या भरांत आपण आसुड मारले, पुरण टोंचलें, ज्याच्या श्रमामुळें आपलीं शेतें हिरवीगार डोलूं लागलीं, धान्यानें नटूं लागलीं, ज्याच्या श्रमामुळें मोत्यासारखी ज्वारी, सोन्यासारखे गहूं पिकतील, अशा त्या कष्टमूर्ति बैलाबद्दल कृतज्ञता दाखविण्याचा हा परम मंगल दिवस ! या पोळ्याच्या सणाची कल्पनाच नुसती मनांत येऊन माझे डोळे प्रेमाश्रूंनीं भरून येतात व भारतीय संस्कृतीचा आत्मा मला दिव्य असा दिसूं लागतो.



भारतीय संस्कृतीचे उपासक आज गायीबैलांना कसें वागवीत आहेत, हें दिसतच आहे ! परंतु दास्य, दारिद्य, अज्ञान यांचा हा परिणाम आहे. इतर गोष्टी ज्याप्रमाणें यांत्रिक झाल्या आहेत, तसे हे सणहि यांत्रिक झाले आहेत. त्यांतील खोल भाव हृदयावर ठसत नाहीं. असें असलें तरी आजहि गायीबैलांवर अपार प्रेम करणारे शेतकरी भारतांत आहेत. मुळशीच्या सत्याग्रहांत भाग घेणारे माझे एक खानदेशी स्नेही एकदां एक अनुभव मला सांगत होते. मुळशी पेट्यांत बैलगाडींतून ते जात होते. बैलांना हांकण्याची त्यांना हुक्की आली. गाडीवानास ते म्हणाले, " तूं मागें बैस, मी गाडी हांकतों. " गाडीवान मागें बसला. खानदेशी मित्र बैल हांकूं लागले. बैलांच्या शेपट्या पिळवटूं लागले. बैल पळावे म्हणून ते शिव्या देऊं लागले. बैलांना शिवी दिलेली ऐकतांच तो शेतकरी संतापला. तो म्हणाला, " माझ्या बैलांना शिवी दिलेली मला खपणार नाहीं. तुम्ही मागें बसा. द्या कासरा माझ्या हातांत. माझे बैल म्हणजे माझे प्राण. "

भारतीय संस्कृति सांगते, " गायीबैलांस प्रेम द्या. त्यांच्यापासून भरपूर काम घ्या. परंतु त्यांची निगाहि राखा. त्यांना वेळेवर पाणी द्या, वेळेवर चारा द्या, चाबूक मारूं नका, आर टोंचूं नका. एकादे वेळेस राग येऊन माराल; कारण किती झालें तरी तुम्ही माणसेंच; परंतु त्यांत खुनशीपणा नको. माणुसकी नका विसरूं. बोट बोट पुरण टोंचून बैलांच्या अंगाची चाळण नका करूं. त्या मुक्या जनावरांचे आशीर्वाद घ्या, त्यांचे शिव्याशाप नका घेऊं. तुमच्यासाठीं मरमर

मरणाऱ्या बैलांची हायहाय तुमचें कल्याण करूं शकणार नाहीं. गायीगुरें किती प्रेमळ असतात. तुमचा आवाज ऐकतांच हंबरतात. तुमचा स्पर्श होतांच नाचतात. धनी मेल्यावर चारापाणी न घेतां प्राण सोडणाऱ्या गायीबैलांचीं उदाहरणें आहेत. "

कुराणांत महंमद पैगंबर म्हणतात, "सायंकाळ होतांच गायी-गुरें रानांतून तुमच्यावरच्या प्रेमामुळें तुमच्या घरीं परत येतात, ही किती थोर गोष्ट आहे!" खरोखरच ही मानवाला भूषण अशी गोष्ट आहे.

गायींच्या स्वरूपांत आपण पशूंशीं संबंध जोडला; त्याचप्रमाणें पक्ष्यांशींहि आपण संबंध जोडले आहेत. ज्याप्रमाणें सर्व पशूंशीं आपण आपल्या दुबळेपणामुळें व अल्प शक्तीमुळें संबंध ठेवूं शकत नाहीं, त्याचप्रमाणें सर्व प्रक्षीसृष्टीशीं आपण संबंध ठेवूं शकणार नाहीं. परंतु जे दोन-चार पक्षी घराच्या आजुबाजूला असतात, त्यांचें आपण स्मरण ठेवतों. आपण जेवावयाच्या आधीं गायीला गोग्रास देतों, त्याचप्रमाणें आपण जेवावयाच्या आधीं काव काव करून कावळ्याला घांस टाकतों. चिमण्या, कावळे हेच आपल्या सभोंवतालचे पक्षी. त्यांचें स्मरण आपण करतों. लहान मुलाला जेवतांना, "तो बघ काऊ, ती बघ चिऊ," असें म्हणत म्हणत माता त्याच्या तोंडांत घांस भरवते.

**काऊ काऊ चिऊ चिऊ**<br>
**येथें बस दाणा खा, येथें बस पाणी पी**<br>
**बाळाच्या डोक्यावरून भुरकन् उडून जाई**

अशा रीतीनें माय मुलास खेळवीत असते. ज्या चिमण्या-कावळ्यांच्या संगतींत मुलें लहानाचीं मोठीं होतात, त्यांच्याबद्दल कृतज्ञता नको का दाखवायला? कावळ्याला हांक मारून त्या निमित्तानें सर्व पक्ष्यांचें स्मरण मनुष्य करतो. स्वतः जेवावयाच्या आधीं गायींच्या निमित्तानें पशूंचें स्मरण केलें, कावळ्याच्या निमित्तानें पक्ष्यांचें स्मरण केलें.

भारतीय संस्कृतींत पक्ष्यांचा पुष्कळच महिमा आहे. सुंदर सुंदर पक्ष्यांचा आपल्या जीवनांत आपण संबंध आणला आहे. भव्य पिसारा उभारणारा मोर आपण कसा विसरूं? मोराला आपण पवित्र मानलें. सरस्वतीला वीणा हातांत देऊन त्या मोरावर बसविलें. आपण आपल्या जुन्या लामण दिव्यावर मोराची



आकृति करून बसवीत असूं. कारण मोराचें दर्शन म्हणजे शुभ दर्शन. पहांटे दिवा लावतांच दिव्यावरचा मोर आधीं दृष्टीस पडे.

कोकिळेची तशीच गोष्ट. आठ महिने मुकी राहून वसंत ऋतु येतांच 'कुऊ कुऊ' ध्वनीनें सर्व प्रदेश नादवून सोडणारी ती कोकिळा! भर उन्हाळ्यांत झाडांमाडांना नवपल्लव फुटलेले पाहून त्या कोकिळेच्या प्रतिभेलाहि पल्लव फुटतात. ती 'कुऊ' गाणें गाऊं लागते. परंतु ती विनयी असते, लाजाळू असते, झाडांच्या गर्द फांद्यांत लपून तेथून ती कुऊ कुऊ करते. तो पवित्र, मधुर-गंभीर उत्कट आवाज म्हणजे सामगायन वाटतें; उपनिषदच वाटतें. भारतीय संस्कृतीनें कोकिळाव्रत घालून दिलें. कोकिळेचा आवाज ऐकल्याशिवाय या व्रतांत जेवावयाचें नसतें. तो आवाज कानीं पडावा म्हणून हें व्रत घेणाऱ्या बायका दूर दोनदोन कोस रानावनांत जातात. तो आवाज ऐकल्यावर जेवतात.

जशी कोकिळा तसाच पोपट. पोपट, मैना यांचा आपणांस विसर पडणार नाहीं. हिरव्या हिरव्या पानासारख्या रंगाचा तो पोपट, कशी त्याची बांकदार लाललाल चोंच, कसे सुंदर पंख! कशी मान मुरडतो, कशी शीळ घालतो! कसे ते बारीक गोलगोल डोळे! कसा त्याचा तो काळा कंठ! कसा तो विठ्ठल विठ्ठल म्हणतो! कसा बोलतो! पोपटाला तें पिंजऱ्यांत राहणें आवडत नसेल, परंतु माणसाला त्याच्याशीं प्रेम जोडावेसें वाटतें. त्याची तो काळजी घेतो. स्वतःच्या तोंडांत पेरूची फोड धरून ती तो पोपटासमोर करतो. तोंडांतील घांस पोपटाला देतो. हिरवा हिरवा पिंजरा करून हिरव्या झाडांची त्याला विस्मृति पाडूं पाहतो. मनुष्य हें सारें प्रेमानें करतो. पांखराला असें बंधनांत घालून प्रेम जोडणें कसें तरी वाटतें. परंतु मानवाचा आत्मा इतर सृष्टीशीं संबंध जोडण्यासाठीं कसा तडफडत असतो त्याचें हें उदाहरण आहे.

आपण आपल्या मुलांबाळांस पांखरांचीं नांवें ठेवतों. राघू, पोपट, मिठूलाल, मैना, हंसी, चिमणी, कोकिळा वगैरे नांवें आपणांस माहीत आहेत. अशा रीतीनें निरनिराळ्या प्रकारचा स्नेहसंबंध, आपलेपणा भारतीय संस्कृतींत पांखरांच्या सृष्टीशीं जोडण्यांत आलेला आहे.

पशुपक्ष्यांप्रमाणें तृण-वृक्ष-वनस्पति यांच्याशींहि भारतीय संस्कृति प्रेमळ संबंध जोडते. मनुष्य सर्व वनस्पतींना वाढवूं शकणार नाहीं. तें आकाशांतील मेघांचें काम आहे. परंतु आपण एक तुळशीचा माडा लावूं. वनस्पतिसृष्टीचा एक प्रति-

निधि म्हणून ही तुळस मानूं. तिची आधीं पूजा. तिला आधीं पाणी. तुळशीला पाणी घातल्याशिवाय बायका पाणी पिणार नाहींत. आधीं तुळशीचें स्मरण. तुळशीचें स्मरण म्हणजे सर्व वनस्पतींचें स्मरण.

आपण तुळशीचें वृंदावन रंगवितों. तिचें लग्न लावतों. तिच्या लग्नांत आंवळे, चिंचा, ऊंस या वनस्पतींचेंच, वन्य फळांचेंच महत्त्व. तुळस जणुं कुटुंबांतील एक व्यक्ति. तिला जणुं साऱ्या भावना आहेत. तिचे सारे सोहाळे करावयाचे.

आपण वटवृक्षाची, पिंपळाची मुंज लावतों. त्यांना पार बांधून देतों. वनस्पति-सृष्टींतील जणुं हे महान् ऋषीच. त्यांची पूजा करतों. सृष्टींतील हें थोर ईश्वरी वैभव पाहून आपण प्रदक्षिणा घालतों, प्रणाम करतों.

आंवळीभोजन करावें, वनांत जेवावें, अशा किती तरी गोष्टी वनस्पतिप्रेमाच्या आपण निर्माण केल्या आहेत. झाडांच्या पानांवर जेवण्याचीं व्रतें आहेत. देवाला फुलें वाहावयाचीं. परंतु देवाला पत्री फार प्रिय असें आपण ठरवलें आहे. देवाला तुळस हवी, बेल हवा, दुर्वा हव्यात, शमी हवी. देवाच्या पूजेच्या निमित्तानें रोज सकाळीं आधीं फुलांशीं भेट, दुर्वा-तुळशी-बेलाशीं भेट ! घराभोंवतीं तुळशी हव्यात, हिरव्यागार दुर्वा हव्यात, पारिजातक, जासवंद, धोतरा, कण्हेर, जाई, जुई, गुलाब, मोगरा, चमेल, तगर वगैरे फुलझाडें हवींत. कदंब, आंवळी, डाळिंब यांचीं झाडें हवींत. देवाला जी पत्री वाहावयाची त्यांत या सर्व झाडांचीं पानें सांगितलीं आहेत. फुलें नेहमीं नसतात. परंतु पानें तर नेहमीं आहेत. देवाला पानच प्रिय आहे. तीं पानें रोज आणून वाहा. त्या निमित्तानें फुलें, फळझाडें लावू. त्यांच्याशीं प्रेमसंबंध जोडूं.

भारतीय साहित्यांत तरुलतावेलींचें अपार प्रेम आहे. कालिदासाच्या काव्य-नाटकांत पहा. हें प्रेम तेथें दिसून येईल. शकुंतला आम्रवृक्ष व अतिमुक्तलता यांचें लग्न लाविते. झाडावर वेल चढवावयाची. वेल झाडाला विळखा देऊन बसते. वेलीमुळें वृक्षाला शोभा. वृक्षामुळें वेलीला आधार. किती कोमल भावना आहेत ह्या ! शकुंतलेचें वर्णन करतांना कण्व महर्षि म्हणतात, "शकुंतला झाडांना पाणी घातल्याशिवाय स्वतः आधीं पाणी पीत नसे. तिला फुलांची, पल्लवांची हौस होती; तरीहि झाडांचीं फुलें ती तोडीत नसे, पल्लव खुडीत नसे."

अशा शकुंतलेला प्रेमाचा निरोप देण्यासाठीं कुलपति कण्व आश्रमातील तरु-



लतावेलींना सांगत आहेत. त्या प्रेमळ शकुंतलेच्या वियोगामुळें आश्रमांतील वृक्षांनींहि, लतावेलींनींहि टपटप अश्रू ढाळले असतील.

राम बारा वर्षें वनवासास निघाला. परंतु रामाला वनवास म्हणजे संकट नव्हतें. रामाला अयोध्येंतील त्या पाषाणरचित प्रासादापेक्षां रानावनांतील लताकुंज प्रिय होते. वनें-काननें त्याला प्रिय होतीं. रामायणांत रामाला "वनप्रिय" असें विशेषण अनेकदां लावलेलें आहे. वृक्षवल्ली त्याला सखेसोयरे वाटत होते. राम म्हणतांच 'पंचवटी' आठवते. विशाल वटवृक्षांच्या शीतल छायेंत राम, सीता, लक्ष्मण आनंदानें राहिलीं. सीतेनें पर्णकुटीभोंवतीं झाडें लाविलीं. गोदावरीचें पाणी घालून त्यांना ती वाढवी. उत्तररामचरित नाटकांत पुन्हां पंचवटींत आलेला राम सीतेनें लावलेलीं झाडें पाहून रडतो, असें सहृदय वर्णन आहे.

रघुवंशांत शंकराच्या पार्वतीनें कमरेवर घडे घेऊन देवदारु वृक्ष मुलांप्रमाणें वाढवले असें वर्णन आहे, आणि हत्ती वगैरे येऊन आपलें अंग त्या देवदारु वृक्षांच्या अंगांवर घाशीत व त्यांचीं सालडें काढीत म्हणून ती दुःखी होई असें सांगितलें आहे. शंकरांनीं मग पहारेकरी ठेवले.

**अमुं पुरः पश्यसि देवदारुम्**
**पुत्रीकृतोऽसौ वृषभध्वजेन**

असें दिलीपराजाला तो पहारेकरी सिंह मोठ्या प्रेमानें सांगत आहे.

वृक्षवनस्पतींना आपण मानवी भावना दिल्या आहेत. उन्हाळ्यांत तुळशीवर पाण्याची गळती लावावयाची व तिला उन्हाळा भासूं द्यावयाचा नाहीं. सायंकाळ झाली, रात्र बाहेर पडली, कीं फूल-फळ तोडावयाचें नाहीं, तृणांकुर-पल्लव खुडायचा नाहीं, अशी पद्धत आहे. संकष्टी चतुर्थीच्या रात्रीं मंगलमूर्तीची पूजा करावयाची असते. परंतु दिवसा उजेडीं फुलें-दुर्वा आणून ठेवण्याची रीत आहे. झाडें रात्रीं निजतात अशी भावना आहे. त्यांची झोंप मोडूं नये म्हणून कोण ही काळजी ! एकदां महात्मा गांधींना पिंजणाच्या तांतीला लावावयाला थोडा पाला पाहिजे होता. रात्रीची वेळ होती. त्यांनीं मिराबाईंना पाला आणावयास सांगितलें. मिराबेन बाहेर गेल्या. लिंबाच्या झाडाची एक फांदी त्यांनीं तोडून आणली. महात्माजी म्हणाले, "इतका पाला काय करावयाचा ? मूठभर पानें आणावयाचीं. हीं पाहिलींस का पानें कशीं झोंपलीं आहेत तीं ! कशीं मिटलीं आहेत. रात्रीं पानें तोडूं नये. परंतु अगदीं जरूरच पडली तर हलक्या हातानें आणावीं जरूर

तितकीच. अहिंसेचा विचार करावा तेवढा थोडाच!" महात्माजींचे ते शब्द ऐकून मिराबाई सद्गदित झाल्या.

कोंकणांत ज्या वेळेस गणपती आणतात, त्या वेळेस त्यांच्यावर पावसाळी वस्तू टांगण्यांत येतात. काकडी, सहस्रफळ, दोडकीं देवावर टांगतात. कांगण्या, कवंडलें देवावर टांगतात. नारळ, ओल्या सुपाऱ्या टांगतात. सृष्टीचा सहवास देवाला प्रिय आहे.

मंगल समारंभांत आम्रवृक्षाच्या पल्लवाशिवाय कधीं चालावयाचें नाहीं. आंब्याचा टाळा नेहमीं हवा. लग्न असो, मुंज असो, सत्यनारायण असो, घरभरणी असो, उदकशान्त असो, ऋतुशान्त असो, आम्रवृक्षाचे हिरवे पल्लव हवेत. सृष्टीचा आशीर्वाद हवा. आम्रवृक्ष म्हणजे प्रेम व पावित्र्य, माधुर्य व मांगल्य!

कोंकणांत नवान्नपौर्णिमा असते. त्या दिवशीं दारावर शेतांतील धान्याचीं तोरणें लावतात. भाताच्या लोंबी, नाचणीचीं कणसें, झेंडू, कुरडू यांचीं फुलें, आंब्याचीं पानें, या सर्वांमिळून तें तोरण गुंफतात. त्या तोरणाला "नवें" हाच शब्द आहे. इंदूरला राजवाड्याच्या दरवाजावर गहूं व खसखस यांचीं पिकें दाखविलेलीं असतात.

पशु-पक्षी, वृक्ष-वनस्पती यांच्याशीं असे स्नेहसंबंध भारतीय संस्कृतीनें निर्माण केले आहेत. पशुपक्षी, वृक्षवनस्पती यांना जीव आहे. त्यांच्यांतील चैतन्य दिसतें. त्यांना जन्ममरण आहे, म्हणून सुखदुःखहि आहे, असें आपण समजतों. परंतु भारतीय संस्कृति याच्याहि पलीकडे गेली आहे.

शिळासप्तमीच्या दिवशीं मातीच्या चुलीची पूजा आहे. त्या दिवशीं चूलमाईला विश्रांति. आदल्या दिवशींचें शिळेंच त्या दिवशीं खावयाचें. वर्षभर ती मातीची वा दगडाची चूल आपणांसाठीं तापली. एक दिवस तरी कृतज्ञतेनें तिचें स्मरण करूं या. शिळासप्तमीच्या दिवशीं चूल नीट सारवतात, तिला नीट लिंपतात. नंतर लहानसा आंब्याचा रोपा चुलीमध्यें लावतात. तापलेल्या चूलमाईला आंब्याची शीतल छाया! मातीच्या निर्जीव चुलीबद्दलहि किती ही कृतज्ञता!

शिळासप्तमीप्रमाणेंच दिव्यांची अंवस. जो दिवा आपल्यासाठीं जळतो, अंधारांत प्रकाश देतो, जो दिवा आपल्यासाठीं तेलकट होतो, ओशट होतो, जो दिवा आपल्यासाठीं तापतो, काळा होतो, त्या दिव्याबद्दल कृतज्ञता दाखविण्याचा हा दिवस. प्रकाशाइतकें पवित्र काय आहे? सूर्य, अग्नि यांची भारतीय संस्कृतींत फार महती



आहे. प्रकाश देणाऱ्या दिव्याचें उतराई कसें व्हावयाचें? रोज सायंकाळीं दिवा लावतांच त्या प्रकाशाला आपण प्रणाम करतोंच. दिव्याला प्रणाम करून आपण प्रकाशांत असलेले सारे एकमेकांसहि प्रणाम करतों. सायंकाळीं 'दिव्या दिव्या दिपोत्कार' अशीं गाणीं म्हणतों. परंतु वर्षांतून एक विशिष्ट दिवसहि त्या दिव्याबद्दल कृतज्ञता प्रकट करण्यासाठीं नेमला आहे. त्या दिवशीं दिव्यांची पूजा, दिव्यांचें महत्त्व.

हातांतून भांडें पडलें किंवा भांड्यावर भांडें आपटलें, तर लगेच "नाद धरा" असें आपण म्हणतों. जणुं तें भांडें रडत असतें. ह्या दुःखी भांड्याला उगी करावयाचें. त्या भांड्याच्या वेदना ओळखायच्या.

अशा प्रकारची ही प्रेममयी भारतीय संस्कृति आहे. नागपंचमीचा दिवस योजून त्या तेजस्वी, धगधगीत, स्वच्छ, संयमी अशा नागाचीहि पूजा करावयास सांगण्यांत आलें आहे. नाग आधीं रानावनांत राहतो. परंतु पावसाळ्यांत त्याचें भवन पाण्यानें भरून गेलें तर तुमच्या वळचणीस क्षणभर येऊन तो बसतो. क्षणभर आश्रय मागावयास आलेला जणुं तो अतिथि असतो. त्याला वनांत राहणेंच आवडतें, त्याला पावित्र्य आवडतें. स्वच्छता आवडते, सुगंध आवडतो. तो फुलांजवळ वास करील, केतकीजवळ जाईल, चंदनाला विळखा घालील! होतांहोईतों नाग चावणार नाहीं. परंतु चावला म्हणजे मात्र मरण. वर्षानुवर्षे श्रम करून मिळविलेलें सामर्थ्य तो उगीच व्यर्थ दवडीत नाहीं. म्हणूनच त्याच्या दंशांत अमोघपणा असतो.

नाग शेतांची राखणहि करतात. उंदीर वगैरे शेतास लागूं देत नाहींत. नागांचा हाहि एक उपकारच म्हणावयाचा. अशा या नागालाहि त्या दिवशीं पूजावयाचें, त्याच्या वारुळाजवळ दूध, लाह्या नेऊन ठेवावयाच्या. विषारी सर्पांतीलहि चांगुलपणा पहावयास भारतीय संस्कृति सांगत आहे.

व्यापक जीवनाकडे पहावयाची अशी ही भारतीय दृष्टि आहे. नद्यांचे उत्सव करा, त्यांची पूजा करा, त्यांना पाहून प्रणाम करा. कारण नद्यांचे अपार उपकार आहेत. गोवर्धन पर्वताची पूजा करा. कारण पर्वतावर, डोंगरावर गायींचें वर्धन करणारें गवत होतें. पर्वतांवरच्या पाण्याच्या नद्या होतात. पर्वतांची माती धुऊन खालीं येते व शेतें सुपीक होतात. पर्वत उपकारक आहेत.

नद्यांना आपण माता म्हणतों. त्यांच्या जीवनरसानें आपण जगतों. आईचें

दूध नसलें तरी चालेल, परंतु ह्या आपोमातांचें पय पाहिजेच. नद्यांचीं नांवें आपण आपल्या मुलींना ठेवतों. नद्यांना आपण कधीं विसरणार नाहीं.

आणि सर्वांत थोर ही पृथ्वी ! किती क्षमावान् ! किती उदार ! तिला आपण नांगरानें टोचतों, परंतु ती कणसें घेऊन वर येते ! आपण तिच्यावर किती घाण करतों. तिच्यावर नाचतों, कुदतों. परंतु ही भूमाता रागवत नाहीं.

" ऐशी ही धरणीमाय करि क्षमा जगाला "

ती आपल्या सर्व लेकरांना क्षमा करते. भारतीय संस्कृति म्हणते, " भूमातेचें स्मरण ठेव. तिला विसरूं नको. " आपल्या कहाण्यांत पृथ्वीची कहाणी आहे. पृथ्वीचा महिमा आपण विसरलों नाहीं. चंद्र-सूर्य-तान्यांचीं फुलें तिच्या खोप्यांत आहेत. समुद्राचें वस्त्र ती नेसली आहे. फुलांचे हार तिनें घातले आहेत. हिरवी चोळी तिनें घातली आहे. शेष-वासुकींचे तोडेतोरड्या तिच्या पायांत आहेत. भव्य महान् महीमाता !

प्रातःकाळीं उठतांना त्या पृथ्वीमातेला म्हणावयाचें, " आई ! माझे पाय तुला आतां शतदां लागतील. रागावूं नको. "

" विष्णुपत्नि नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे "

चराचरावर प्रेम करूं पाहणारी, कृतज्ञता सर्वत्र प्रकट करणारी ही भारतीय संस्कृति आहे. ह्या संस्कृतीचा अंतरात्मा ओळखा. तिचा सूर ओळखा. ह्या संस्कृतीचें स्वरूप लक्षांत आणा. ह्या संस्कृतीचें ध्येय काय, गन्तव्य-मंतव्य-प्राप्तव्य काय, याचा सहृदयतेनें व बुद्धिपूर्वक विचार करा, आणि पूर्वजांची ही थोर दृष्टि घेऊन पुढें जा. तसा प्रयत्न करा. ध्येयाकडे जाण्याचा अविरत प्रयत्न करणें हेंच आपलें काम आहे.

विश्वावर प्रेम करण्याचें विशाल ध्येय देणान्या हे थोर भारतीय संस्कृति, तुला शतशः प्रणाम असोत ! तुला वाढविणान्या त्या थोर पूर्वजांनाहि अनंत वंदनें !

# अहिंसा : : १६

' अहिंसा परमो धर्मः ' हें भारतीय संस्कृतीचें जीवनभूत तत्त्व आहे. भारतीयांच्या रोमरोमांत हें तत्त्व बिंबलेलें आहे. आईच्या दुधाबरोबर मुलाला हें तत्त्व मिळत असतें. भारताच्या वातावरणांत हें तत्त्व भरलेलें आहे. भारतीय हवा म्हणजे अहिंसेची हवा. भारतांत जो श्वासोच्छ्वास करूं लागेल, त्याच्या जीवनांत हळूहळू हें अहिंसातत्त्व शिरल्याशिवाय राहणार नाहीं.

परंतु या ' अहिंसा परमो धर्मः ' तत्त्वाची महती भारतास एकाएकीं कळली असें नाहीं. फार मोठी तपश्चर्या या तत्त्वाच्या पाठीमागें आहे. मोठमोठे प्रयोग या गोष्टीसाठीं झाले. वेदकाळापासून तों आजपर्यंत भारतीय संस्कृतींतील सोनेरी सूत्र म्हणजे अहिंसा हें होय. या सूत्राच्याभोंवतीं भारतांतील धार्मिक, राजकीय, सामाजिक चळवळी गुंफिलेल्या आहेत. भारतवर्षाचा इतिहास म्हणजे एक प्रकारें अहिंसेच्या प्रयोगाचा इतिहास.

मनुष्यप्राणी हळूहळू उत्क्रांत होत आला आहे. मुंगीच्या पावलानें मानवजातीची प्रगति होत असते. भारतांतील अहिंसेचा इतिहास पहावयास लागूं तर ही प्रगति कशी आस्ते आस्ते होत आली, तें आपणांस दिसून येईल.

अहिंसा या शब्दाचा अर्थ आज किती तरी व्यापक झाला आहे. शब्दानें कोणाचें मन दुखविणें हीहि हिंसा आज आपण मानतों. विचारानें, आचारानें, उच्चारानें कोणाचेंहि अकल्याण न चिंतणें, हा आजचा अहिंसेचा अर्थ आहे.

प्राचीन काळापासून मुख्यतः दोन गोष्टींसाठीं हिंसा होत आली आहे : भक्षणासाठीं व रक्षणासाठीं. मनुष्य खाण्यासाठीं हिंसा करतो व स्वतःचें संरक्षण व्हावें म्हणून हिंसा करतो. तिसरेंहि एक कारण हिंसेसाठीं असे. तें म्हणजे यज्ञ. परंतु या यज्ञीय हिंसेचाहि भक्षणांतच अंतर्भाव होतो. कारण मनुष्य जें खातो तेंच देवाला देतो. यज्ञ म्हणजे देवांना आहुति देणें हा मूळ अर्थ होता. आपल्यासाठीं ऊन, पाऊस, फुलेंफळें सर्व कांहीं देणारे जे देव, त्यांना आपणहि कांहीं दिलें पाहिजे, यांतून यज्ञकल्पना निघाली. मग देवांना काय द्यावयाचें हा प्रश्न उत्पन्न झाला. साहजिकच जें आपल्याला आवडतें तें देवाला द्यावें असें ठरलें. आपल्याला मांस आवडतें तर देवालाहि तेंच द्या असा धर्म झाला. म्हणून यज्ञीय हिंसा हीसुद्धां मनुष्याच्या भक्षणांतूनच निर्माण झाली असावी असें वाटतें.

अत्यंत प्राचीन काळीं माणूस माणसासहि खात असे. माणसाचें मांस सर्वांत चांगलें असें त्यास वाटत असे. ज्या वेळेस माणूस माणसास खाई, त्या वेळेस देवासहि माणसाचाच बळी देण्याची चाल असेल यांत शंका नाहीं. राजेंद्रलालासारख्या पंडितांनीं भारतवर्षांत प्राचीन काळीं नरमेधहि होता असें लिहिलें आहे.

परंतु विचारवन्त मनुष्य विचार करूं लागला. त्याला लाज वाटूं लागली. आपल्यासारखींच सुखदुःखें असणारा हा जो मनुष्य, त्याला आपण कसें मारावें, त्यालाच कसें भाजून खावें, असा त्याच्या मनांत विचार आला. आणि नरमांस खाण्याचें कांहीं विचारी माणसांनीं बंद केलें. परंतु समाजांतील सवयी एकदम जात नसतात. कोणीहि नवीन विचार समाजाला दिला, तर त्याचा छळ होतो. त्याची टर उडविण्यांत येते. प्राचीन काळींहि असेंच झालें असेल.

मांस खा पण निदान नरमांस तरी खाऊं नका, असें हे पहिले अहिंसेचे आचार्य आपल्या समाजास सांगूं लागले. नरमांस भक्षावयाचें नाहीं अशा आणाशपथा लोक घेऊं लागले; परंतु ज्यांना ही चटक होती, त्यांना हें पाहवेना. नवीन व्रतें घेणाऱ्यांना ते मुद्दाम नरमांस फसवून खावयास घालीत. वसिष्ठ ऋषि व कल्माषपाद राजा यांची अशीच गोष्ट आहे. वसिष्ठादि कांहीं ऋषींना तेथें मुद्दाम फसवून नरमांस वाढण्यांत आलें. मागून ही गोष्ट कळल्यावर वसिष्ठानें त्या राजास शाप दिला.

वसिष्ठ हा नरमांस खाणारा आहे, उगीच बढाया मारतो असेंहि कांहीं म्हणत. नवव्रत घेणाऱ्या वसिष्ठास अर्थात् याचें वाईट वाटे. खादी वापरण्याचें व्रत असणाऱ्या व्यक्तीस जर कोणीं म्हटलें, "अहो, तुम्ही चोरून विलायती वापरतां, माहीत आहे!" तर त्याला कसें वाटेल बरें? वसिष्ठांची अशीच तगमग होत असेल. ऋग्वेदांत एके ठिकाणीं वसिष्ठ म्हणतात,

"अद्य मुरीय यदि यातुधानोऽस्मि"

"मी जर यातुधान असेन, तर या क्षणीं माझे प्राण जावोत." यातुधान म्हणजे राक्षस. यातुधान म्हणजे विशेषतः नरमांस भक्षण करणारे राक्षस असाच अर्थ असावा.

अशा रीतीनें समाजाचा छळ सोसून मानवाला विकासाकडे वसिष्ठादि विचारवंत नेत होते. नरमेध बंद पडले. हळूहळू नरमांसभक्षणहि बंद झालें. परंतु मांसाशन थोडेंच सुटलें होतें? पशुमांसभक्षण सुरू होतेंच. वाटेल त्या



पशूंचें मांस खात असत. परंतु त्यांतहि चवी असतातच. गायीचाहि त्या वेळेस वध होत असे. गोमांस खाण्यांत येत असे. परंतु ऋग्वेदांतच गायीचा वध करूं नका, गायीचा महान् महिमा ओळखा, असें सांगणारे महर्षी दिसतात. गायीच्या महिम्याच्या सुंदर ऋचा ऋग्वेदांत कुठें कुठें आहेत:

माता रुद्राणां दुहिता वसूनां। स्वसाऽऽदित्यानां अमृतस्य नाभिः

"अरे ही गाय रुद्रदेवांची माता आहे; वसुदेवाची दुहिता आहे; ही आदित्याची बहीण आहे; ही अमृताची झरी आहे," असें दिव्य, भव्य वर्णन प्रतिभावान् ऋषि करीत आहे. त्याच सूक्तांत "या निरपराध गायीला वधूं नका" असा स्पष्ट आदेश ऋषि देत आहे.

वेदांतच गाय वांचविण्याचे जरी प्रयत्न दिसले, तरी गाय म्हणतांच गोपाळकृष्ण डोळ्यांसमोर उभा राहतो. गायीची खरी थोरवी भगवान् श्रीकृष्णांनींच भारतवासीयांस पटविली. या कृषिप्रधान देशाला गायी मारून कसें चालेल? गाय दूधहि देते व शेतीला बैलहि देते. अशा रीतीनें गायीचा दुहेरी फायदा आहे. नर व मादी दोहोंचा जेथें उपयोग नाहीं, तेथें एकाला मारावेंच लागतें. कारण नराचें काय करावयाचें तें समजत नाहीं. कोंबडी मारणार नाहींत, परंतु कोंबड्याचें काय करावयाचें? उत्पत्तीसाठीं एक कोंबडा पुरे. बकरी मारणार नाहींत, परंतु बकऱ्याचें काय करावयाचें? शेळी मारणार नाहींत, परंतु बोकडाचें काय करावयाचें? म्हैस पाळतील, परंतु रेड्याचें काय करावयाचें?

गायच असा एक प्राणी आहे, जो दुधासाठींहि उपयोगी आहे व जिचे पुत्र बैल शेतीसाठीं उपयोगी आहेत. मनुष्य तोच प्राणी, तोच पशु अहिंसेशिवाय पाळूं शकेल, ज्यांतील नरमादींचा दोहोंचा उपयोग तो करून घेऊं शकेल. उपयोगाशिवाय आपण कोणासहि पाळूं शकणार नाहीं. मानवाचें तें सामर्थ्य नाहीं. जे कांहीं काम करीत नाहींत, जे कांहीं मिळवीत नाहींत, अशा माणसांचाहि जर घरांत बोजा वाटतो, तर रिकामटेकडे पशू आणखी कोण बाळगणार?

गाय, बैल, मांजर, कुत्रा वगैरे प्राणी उपयोगी म्हणून माणसानें पाळले आहेत. श्रीकृष्णानें गायीचा अत्यंत उपयोग ओळखला. गोकुळांत वाढलेल्या या कृष्णाला गायींचा महिमा कळला. मोठेपणीं सर्वत्र गायींचा महिमा तो वर्णूं लागला. 'गवळट कृष्ण' अशी त्याची थट्टा होऊं लागली. कृष्णहि अभिमानानें म्हणूं लागला, "होय, मी नुसता कृष्ण नाहीं. मी गोपाळकृष्ण. गोपाळ हें

माझें दूषण नसून माझें भूषणच आहे. चक्रवर्ती श्रीकृष्ण म्हणून मिरविण्याची मला इच्छा नाहीं. गोपाळकृष्ण या नांवानेंच माझी ओळख जगाला व्हावी अशी माझी इच्छा आहे."

गाय म्हणजे देवता मानली जाऊं लागली. तिच्या रक्षणासाठीं राजे प्राण पणाला लावूं लागले. दिलीप राजानें गायीला वांचविण्यासाठीं स्वतःचा देह सिंहापुढें केला. ज्या वेळेस राष्ट्राला नवीन ध्येय द्यावयाचें असतें, त्या वेळेस त्या ध्येयासाठीं सर्वस्वाचें बलिदान करावें लागतें. तें ध्येय म्हणजेच देव, तें ध्येय म्हणजेच भगवान्. आज खादी, चरखा वगैरे गोष्टींसाठीं तुरुंगांत मरेपर्यंत उपवास करूं पाहणारे सत्याग्रही निघाले. त्या त्या नवीन ध्येयासाठीं तें ध्येय देणारा कितपत कष्ट करावयास तयार आहे, हें जनता पहात असते. प्रत्येक ध्येयार्थीला मरणाची परीक्षा द्यावी लागते. गायीचें ध्येय देणाऱ्यांनीं असेंच केलें. समाजाला गोसेवेचें महत्त्व पटविण्यासाठीं प्राण देणारे निघाले. आज भारतवासीयांत गायीचा जो एवढा महिमा आहे तो फुकाफुकीं आलेला नाहीं. परंतु गायीचें दूध न पितां, तिची निगा न राखतां उगीच तिची शेपटी तोंडावरून फिरविणें, तिला रस्त्यांत नमस्कार करणें, म्हणजे दंभ आहे. असला यांत्रिक धर्म केव्हांहि तिरस्करणीयच होय.

एकाएकीं गोमांसभक्षण बंद झालें नाहीं. भवभूति हा थोर महाराष्ट्रीय नाटककार सहाव्या-सातव्या शतकांत झाला असावा. त्याच्या उत्तररामचरित या उत्कृष्ट नाटकांत वाल्मिकीच्या आश्रमांत वसिष्ठ-जनक वगैरे आले, त्या वेळेस अतिथीच्या सत्कारार्थ म्हणून कालवड मारण्यांत आली असा उल्लेख आहे. त्या दाढीवाल्या ऋषीनें आपली कालवड मटकावली असें आश्रमीय मुलें म्हणतात. याचा अर्थ असा, कीं भवभूतीला आपल्या नाटकांत असा उल्लेख घालण्यांत संकोच वाटला नाहीं. कदाचित् प्राचीन काळची पद्धत म्हणून नाटककारानें तसें लिहिलें असावें.

उपनिषदांतून गोमांसभक्षणाचे उल्लेख आहेत. याज्ञवल्क्यासारखा तत्त्वज्ञानी गोमांस गोड लागतें असें म्हणतांना आढळतो. परंतु उपनिषदांतच मांसाशन बरें नाहीं असे उल्लेख आढळतात. ओदनमहिमा सुधारक ऋषी वाढवूं लागले होते.

**ओदनमुदब्रुवते परमेष्ठी वा एषः**



हें ओदन म्हणजे परमेश्वराचें स्वरूप आहे असें म्हणतात, असें हा मंत्रद्रष्टा सांगत आहे. आणि हा मंत्र विशेषतः जेवावयाच्या वेळेस म्हणावयाचा आहे हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

आहाराचा विचारांवर परिणाम होतो असें कांहीं म्हणूं लागले. "आहारशुद्धेः सत्त्वशुद्धिः" अशीं तत्त्वें रूढ होऊं लागलीं. निरनिराळे खाण्याचे प्रयोग होऊं लागले. 'नुसतें मांसाशन करून बुद्धि चांगली होत नाहीं. ओदन व मांस या दोहोंच्या सेवनानें बुद्धि तेजस्वी होते,' असें कोणी म्हणूं लागले. अशा रीतीनें हळूहळू मांसाशनाकडून जनता वनस्पत्याहाराकडे अधिकाधिक वळूं लागली.

जी नवी दीक्षा द्यावयाची, जें नवीन व्रत द्यावयाचें, तेंच अत्यंत उत्कटपणें सांगावयाचें हा नेहमींचा ध्येयवादी पुरुषांचा नियम येथेंहि दिसतो. ओदन म्हणजे देव, ओदन म्हणजे परमेष्ठी; ओदन श्री देईल, सर्व कांहीं देईल, असें मंत्रांतून सांगण्यांत येऊं लागलें. गायीच्या दुधातुपाचाहि याच वेळेस महिमा वाढविण्यांत येऊं लागला. मांसानेंच आयुष्य वाढेल, बळ वाढेल असें नाहीं; हें तूप म्हणजेच आयुष्य, हें तूप म्हणजेच सर्व कांहीं. तूप खा. देवांना तूपच आवडतें.

**आयुर्वै घृतम्**

अशीं श्रीदवाक्यें फडकूं लागलीं. घृताचा व ओदनाचा महिमा अशा रीतीनें हे मांसाशननिवर्तक वाढवीत होते.

मनुष्याचें नरमांस सुटलें, गोमांस सुटलें, परंतु इतर मांसें सुटलीं नाहींत. गायीचा महिमा कळला; परंतु बोकडाचें मांस कां खाऊं नये, कोंकराचें मांस कां खाऊं नये हें माणसास समजेना! शेळ्या, मेंढ्या, बकऱ्या, त्याला पाळाव्या लागत. दुधासाठीं, लोंकरीसाठीं, त्या पाळण्यांत येत; परंतु बोकड, बकरे यांची वास्त काय लावायची? मनुष्य त्यांना खाऊं लागला. त्यांचे हवी देऊं लागला. देवांना त्यांचे बळी मिळूं लागले. ज्याप्रमाणें बकरे, बोकड, तसेंच हरणांचें. हिंदुस्थानांत हरणांचे मोठमोठे कळप आजहि दिसतात. प्राचीन काळीं हिंदुस्थान हरणांनीं गजबजलेलें असेल. कृषि करूं पाहणाऱ्या समाजाला हरणांपासून त्रास होत असेल. मांसाशन कमी कमी होऊन मनुष्य कृषीकडे अधिक लक्ष देऊं लागला. परंतु जिकडे तिकडे हरणांचे कळप. शेती नीट होईना. हरणांना मारणें हा राजाचा धर्म झाला. शेतीचें रक्षण करणें हा राजधर्म होता. राजे मृगयेला निघत. मृगया म्हणजे गंमत नव्हती! लीलेनें खेळ म्हणून हरणांचे कोंवळे प्राण घेणें हा

हेतु त्यांत नव्हता. मृगया ही नृपाची लीला नसून त्याचा धर्म होता. शेती सांभाळण्यासाठीं हा कठोर धर्म राजाला पाळावा लागे. राजानें तें मृगयेंतील मांसच खावें असाहि दंडक होता. जिभेसाठीं आणखी हिंसा त्यानें करूं नये. हें हरणाचें मांसच त्यानें पवित्र मानावें, तेंच भक्षावें.

हरणें मारलीं जात याचें दयावंतांना वाईट वाटे. परंतु अपूर्ण मनुष्याचा इलाज नव्हता. आश्रमांतून मुद्दाम हरणें थोडीं सांभाळलीं जात. ऋषींचे आश्रम म्हणतांच हरणें डोळ्यांसमोर येतात. शाकुंतलांतील हरणावरचें प्रेम डोळ्यांत पाणी आणतें. राजे लोक लाखों हरणें शेतीसाठीं मारीत. त्या हरणांच्या कांतड्यांना पवित्र मानण्यांत आलें. आपल्या शेतीसाठीं हरणें मारावीं लागलीं, त्या हरणाचें कांतडें आपण बसावयाला घेऊं. जानव्यांत त्याच्या कांतड्याचा तुकडा घालूं. हरणाला मारावें लागे, परंतु ही मारल्यानंतरची कृतज्ञता होती. अपूर्ण मानवाची ही हृदयांतील भावना होती.

विचारप्रसार चाललाच होता. मांसाशननिवृत्तीचे प्रयोग होतच होते. मांस एकदम तुम्हांला सुटणार नाहीं हें खरें. मधूनमधून खात जा असें सुधारक सांगूं लागले. " रोज बोकड, बकरें-कोंकरें नका मारूं. यज्ञांत मारलें तरी चालेल. यज्ञाचे वेळेस हजारों लोक येतात. मेजवानी होते, त्या वेळेस खा तर मांस " असें ऋषी सांगत. परंतु लोकांना काय, पडत्या फळाची आज्ञा! " यज्ञांत मांस खाल्लें तरी चालेल, " असे म्हणतांच दररोज यज्ञ होऊं लागले! बारा बारा वर्षें चालणारे यज्ञ निर्माण करण्यांत आले! खाण्यासाठीं कशा युक्त्या शोधण्यांत येऊं लागल्या! जिकडे तिकडे यज्ञ होऊं लागले, आणि ते पुन्हां देवासाठीं!

आणि भारताचे महान् भूषण भगवान् बुद्ध जन्माला आले. श्रीकृष्णानें गाय वांचवली. बुद्ध भगवान् कोंकराला वांचवूं लागले. धर्माच्या नांवाखालीं तरी पशुहत्या करूं नका असें त्यांचें सांगणें असे. " अशा बलिदानानें स्वर्ग कसा मिळेल? मग आपल्या भावांचाच बळी द्या, म्हणजे फार मोठा स्वर्ग मिळेल; स्वतःचाच बळी दे, " असें ते सांगत. ज्या यज्ञांत शेंकडों कोंकरांचें हनन व्हावयाचें होतें त्या ठिकाणीं कारुण्यसिंधु बुद्ध जाऊन उभे राहिले. एक लंगडें कोंकरूं त्यांच्या खांद्यावर होतें. प्रेममूर्ति बुद्धांनीं राजाचें मन वळवलें व तें हनन बंद केलें.

बुद्धांनीं यज्ञीय हिंसा जरी बंद केली, तरी मांसाशन सुटलें नाहीं. कारण दुधासाठीं, खतासाठीं शेळ्या-बकऱ्या माणूस पाळतो. परंतु बोकड व बकरे हे कांहीं



शेतीच्या कामाला येत नाहींत. त्यांना पोसणें म्हणजे जड काम. तें पोसणें कांहीं मोबदला देत नाहीं. यामुळें मनुष्य त्यांना मारतो व खातो. शेळ्याबकऱ्या पाळणें सोडून दिलें पाहिजे, किंवा बकरे-बोकड यांजकडून कांहीं उपयोगी काम करून घेण्याची युक्ति शोधली पाहिजे. या दोन्ही गोष्टी जोंपर्यंत होत नाहींत, तोंपर्यंत बकरे-बोकड कापले जाणार व खाल्ले जाणार हें उघड आहे.

वेदांतील ऋषी, श्रीकृष्ण, भगवान् बुद्ध, श्रीमत् महावीर यांच्या दिव्य कर्मामुळें अहिंसेचा महिमा अपार वाढला. मांसाशनाची माणसास लाज वाटूं लागली. मांसाशन हें भूषण आहे असें वाटेनासें झालें. खाण्यासाठीं पशु मारावयाचाच असेल तर तो गाजावाजा करून, सोहळा करून तरी निदान मारूं नका. माणसास हें शोभत नाहीं. नवीन पिढीच्या मुलांबाळांच्या देखत तरी नका मारूं. बोकड मारावयाचा असेल तर

'असंदर्शने ग्रामात्'

गांवापासून दूर कोणाला दिसणार नाहीं अशा ठिकाणीं मारा, असें सूत्रकार सांगूं लागले.

यज्ञीय हिंसा बंद होऊं लागली. परंतु यज्ञांत बोकड हा पाहिजेच अशी कांहींची भावना होती. ऋषी म्हणूं लागले, " पिठाचा बोकड करा व मारा." " पिष्टमयी आकृतिं कृत्वा " अशीं सूत्रें रचलीं जाऊं लागलीं. यज्ञाचे वेळेस पौष्टिक सातूच्या पिठाचे बोकड बनविण्यांत येऊं लागले व त्या पिष्टमय आकृतीचे भाग यज्ञांत हविले जाऊं लागले.

श्रावणी करतांना आपण पिठाच्या गोळ्या खातों. हा त्या प्राचीन मांसाशननिवृत्तीच्या प्रयोगांतील भाग आहे. पौष्टिक मांसाशनाऐवजीं कोणतें पौष्टिक अन्न देतां येईल याचा विचार सुरू झाला. गायीचें तूप खा, सातूचें पीठ खा, तेंच देवांनाहि यज्ञांत द्या, असें प्रयोग करणारे सांगूं लागले. लाखों, कोट्यवधि लोकांना मांसाशनापासून परावृत्त करणें सोपी गोष्ट नव्हती, लोकांचें समाधान करणें कठिण होतें. देवाला बोकडच पाहिजे असा हट्ट धरणाऱ्या आडमुठ्यास " पिठाचा बोकड कर, बोकड असला म्हणजे झालें " असें कसें तरी बाबापुता करून समजावून सांगण्यांत आलें. कांहीं बुद्धिमान् प्रयोग करणाऱ्यांनीं देवाला नारळ द्यावा अशी उपाययोजना सुचविली. नारळ म्हणजे विश्वामित्राच्या सृष्टींतील

मनुष्य. कदाचित् नरमेध करणाऱ्या लोकांना परावृत्त करण्यासाठीं विश्वामित्र वगैरे लोकांनीं नारळाचा मनुष्य बळी या असें सुचविलें असेल. "ही पहा नारळाची शेंडी, हे पहा नारळाचे डोळे" असें अडाणी लोकांना समजावून सांगण्यांत आलें असेल. माणसाचें मुंडकें कापून तें त्याच्या केसांनीं हातांत धरून त्यांतील रक्ताचा देवावर अभिषेक करावयाचा, तें मुंडकें देवासमोर टांगून ठेवावयाचें, बाकीचें धड भाजून खावयाचें, असा प्रघात असावा. देवापुढें नारळ फोडण्यांत अगदीं असेंच सारें आहे. नारळाला शेंडी नसेल तर तो नारळ फोडण्यास योग्य नसतो. नारळ फोडावयाचा, त्यांतील पाणी देवावर उडवावयाचें, एक करवटी देवापुढें ठेवावयाची; कोठें कोठें देवीसमोर नारळाची एक करवंटी टांगण्यांत येते. उरलेली फोडून वांटण्यांत येते. नारळ पौष्टिकहि आहे. हें नारळाचें बलिदान ज्यानें शोधून काढलें त्याच्या कल्पनेची धन्य होय. नारळाच्या बलिदानानें नरमेध बंद झाले. छागमेधहि बंद झाले असतील.

देवांना शेंदूर लावावयाचा, याच्या मुळाशींहि हिंसाबंदीचा प्रयोग आहे. ज्याचा बळी द्यावयाचा, त्याच्या रक्तानें देवाला लाल स्नान घालावयाचें. हजारों बलिदानें होत असतील व देव लाल होऊन जात असेल. नारळाच्या पाण्यानें देव लाल थोडाच होणार? म्हणून देवाला लाल रंग देण्यांत येऊं लागला. देवावर रक्ताचा अभिषेक करून त्या रक्ताचा टिळा स्वतःच्या कपाळाला लावीत. आतां देवाच्या अंगच्या शेंदराचें बोट भक्त कपाळाला लावतात! आपण भोजनपंक्तींत अद्याप लाल गंध ठेवलें आहे. तें लाल गंध म्हणजे यज्ञीय बलिदानांतील रक्ताची आठवण आहे! ती अद्याप आपण विसरूं इच्छीत नाहीं. रक्ताचा विसर मानवाला पडेल तो सुदिन!

मांसाशननिवृत्तीचा हा प्रयोग अशा रीतीनें चालत आला आहे. त्याच्यासाठीं नवीन नवीन कल्पना मांडाव्या लागल्या. बहुजनसमाजाला चुचकारून वळवावें लागलें. मनाच्या कल्पनेचाहि विकास झाला. त्रिसुपर्णाच्या मंत्रांत तर

"आत्मा यजमानः, श्रद्धा पत्नी, मन्युः पशुः"

अशी भव्य कल्पना यज्ञाची मांडली आहे. त्रिसुपर्णाचा ऋषि म्हणतो, "अरे, बोकड काय बळी देतां! तुमचे नाना विकार हेच पशू आहेत. या वासना-विकारांचे बळी द्या."



तुकारामांच्या एका अभंगांत आहे :

**एकसरें केला नेम। देवा दिले क्रोध-काम**

हे कामक्रोधरूपी पशू सारखे थैमान घालीत आहेत. आपण त्यांना बांधू व कापू त्यांच्या मुंड्या. देवाला हें बलिदान सर्वांत आवडेल. आपणांला कोंकराचें मांस आवडतें म्हणून देवाला कोंकरूं देऊं लागलों. आपण मधुदधिदुग्धघृत यांचे भक्त होतांच देवाला पंचामृत मिळूं लागलें. जें आपणांस आवडतें तें आपण देवाला देतों. परंतु आपणांला सर्वांत आवडणारी जर कोणती गोष्ट असेल, तर आपल्या वासना. आपण आपल्या वासनांचे गुलाम असतों. वासनांचा त्याग मरतांनाहि करवत नाहीं. अशा ज्या या अनंत वासना, त्यांचेंच बलिदान कर. देऊन टाक हे विकार देवाला. या मन्युपशूचें हनन कर, हवन कर, म्हणजे मोक्ष दूर नाहीं!

निरनिराळे प्रयोग, यज्ञाच्या या भव्य उत्क्रान्त कल्पना, संतत प्रचार, इत्यादींमुळें व विभूतींच्या जीवमात्राबद्दलच्या प्रत्यक्ष कृतींत प्रकट झालेल्या अपार प्रेमामुळें भारतवर्षात मांसाशननिवृत्ति झपाट्यानें होऊं लागली. हिंदुस्थानभर वैष्णवधर्माची जी प्रचंड लाट तेराव्या-चौदाव्या शतकापासून उठली, तिनेंहि हेंच काम पुढें चालविलें. महाराष्ट्रांतील वारकरी संप्रदायांत मांशासननिवृत्तीवर कटाक्ष असे. वारकऱ्याच्या व्रतांत मांशासनास थारा नाहीं. संतांच्या प्रचंड चळवळीमुळें लाखों लोक मांसाशनापासून परावृत्त झाले.

हिंदुस्थानांत निरनिराळ्या जातींत रोटीबेटी-बंदी होण्याला मांसाशननिवृत्ति हें मोठें कारण होतें. ज्या जाती मांसाशन करीत, त्या जातीशीं मांसाशन न करणाऱ्यांकडून रोटीबेटी-व्यवहार बंद करण्यांत येई. निरनिराळ्या जातींत व त्यांच्या पुन्हां पोटजातींत जे श्रेष्ठकनिष्ठपणाचे भाव आजहि आहेत, त्यांच्या मुळाशीं मांसाशनाचा प्रश्न आहे. ज्या जातींनीं किंवा पोटजातींनीं मांसाशन सोडलें, त्या इतर मांसाशन करणाऱ्या जाती व पोटजाती यांच्यापेक्षां स्वतःला श्रेष्ठ समजूं लागल्या. भारतीय समाजशास्त्रांत मांसाशननिवृत्तीला महान् स्थान आहे. मांसाशननिवृत्तीच्या चळवळीमुळें मोठमोठ्या उलथापालथी झाल्या आहेत.

आजहि आपण अशा गोष्टी पाहतों. खादी वापरणारा मनुष्य खादीवाल्याशींच सोयरीक जोडील. आपण नेहमीं समान आचारविचार पहात असतों. ज्यांचा आहार, आचारविचार समान, त्यांची जात एक. आज खादी वापरणारे, ग्रामो-

योगी वस्तू वापरणारे, यांची एक नवीनच जात होत आहे. त्यांच्या परस्परांशीं सोयरिकी होत आहेत. नवीन ध्येय आलें, कीं नवीन जात निर्माण होते. त्या ध्येयाचे उपासक परस्परांच्या जवळ जवळ येतात. त्यांचे संबंध वाढतात. वाढलेल्या संबंधानें जात वाढते, म्हणजे तें ध्येयच वाढतें.

भक्षणहिंसा कमी करण्याचा प्रयोग भारतांत झाला, त्याचप्रमाणें रक्षणार्थ हिंसाहि कमी करण्याचे प्रयोग भारतीय संस्कृतीनें केले व धन्यतेची गोष्ट आहे, कीं आजहि तसे प्रयोग भारतांत होत आहेत.

माणसानें माणसास खाऊं नये आणि माणसानें माणसास मारूं नये, हा माणुसकीचा पहिला धडा आहे. आज माणूस माणसास प्रत्यक्ष फारसा खात नाहीं, ही गोष्ट खरी. अजूनहि पृथ्वीच्या पाठीवर नरमांसभक्षक जाती क्वचित् कोठें आहेत. सुधारलेला मनुष्य त्यांना रानटी म्हणून संबोधतो; परंतु सुधारलेला मनुष्य मनुष्यास जाळून भाजून खात नसला, तरी खाण्याचे अप्रत्यक्ष मार्ग त्यानें शोधून काढले आहेत! रक्तशोषणाचे अन्य प्रकार सुधारलेल्या मानवानें प्रसृत केले आहेत! शस्त्रास्त्रसंपन्न होऊन दुर्बळांना गुलाम करावयाचें, त्यांची आर्थिक पिळणूक करावयाची आणि अशा सुधारलेल्या रीतीनें जळूप्रमाणें त्यांचें रक्त प्यावयाचें, असा प्रचार इतिहासांत रूढ झाला आहे.

अशा रीतीनें दुसरा आपणांस जर गुलाम करावयास आला, तर आपण काय करावयाचें? स्वसंरक्षणार्थ कोणता उपाय? स्वसंरक्षणार्थ हिंसेचा अवलंब केल्याशिवाय गत्यंतर नव्हतें; परंतु कांहीं लोकांना असें वाटूं लागलें, कीं अशी हिंसा करणें वाईट. निदान आपल्या हातून तरी अशी हिंसा होऊं नये. हिंसा करावयाचीच तर कांहीं लोकांनीं ती करावी. त्यांत त्यांनाच निष्णात होऊं द्यावें. ब्राह्मण क्षत्रियांना म्हणाले, "आम्ही हिंसा करणार नाहीं, आम्ही अहिंसेचें व्रत घेतों. आमच्यावर जर कोणीं हल्ला केला तर तुम्ही आमचें संरक्षण करा."

परंतु हा विचार बरोबर नव्हता. विश्वामित्रानें आपल्या यज्ञरक्षणार्थ रामलक्ष्मणांस बोलावलें. स्वतः विश्वामित्रानें त्यांना धनुर्विद्या शिकविली. विश्वामित्र ब्रह्मर्षि झाला होता. तो रामलक्ष्मणांस म्हणाला, "राक्षस माझ्या यज्ञावर हल्ला करतील. तुम्ही त्या राक्षसांचा वध करा. मी तुम्हांला धनुर्विद्या शिकवितों. या विद्येनें तुम्ही अजिंक्य व्हाल व राक्षसांचा सहज निःपात कराल."

विश्वामित्र धनुर्विद्यावेत्ता होता; परंतु त्यानें अहिंसेचा वसा घेतला. स्वतःचें



संरक्षण व्हावें अशी तर इच्छा! तेव्हां परभारें रामलक्ष्मणांकडून राक्षसांचा निःपात करण्याचें त्यानें ठरविलें आणि हिंसेचें साधनहि त्या राजकुमारांच्या हातांत त्यानें दिलें; परंतु अशानें त्या हिंसेची जबाबदारी त्या विश्वामित्रावर नव्हती का येत? रामलक्ष्मणांपेक्षां त्यांना हिंसेचें साधन देऊन हिंसा करावयास शिकविणारा विश्वामित्रच अधिक हिंसक ठरतो. अहिंसेचें पुण्य अशा लटपटीनें पदरांत पडत नसतें.

एकादा मनुष्य विंचू पाहतांच दुसऱ्याला हांक मारतो. त्याच्या हातांत चप्पल देतो. त्याला विंचू दाखवतो आणि म्हणतो, "मार, मार लौकर, पळेल, जाईल." अशा माणसाला अहिंसेचें पुण्य कसें लाभणार? त्याचप्रमाणें विश्वामित्रासारख्यांची स्थिति.

केवळ क्षत्रियांवरच हिंसेचें कर्म सोंपविल्यामुळें ते भयंकर हिंसक झाले. ते बलवान् झाले. शत्रु नसेल तेव्हां ते प्रजेलाच छळूं लागले! परशुरामाला हें सहन झालें नाहीं. हे माजलेले क्षत्रिय नाहींसे करावे असें त्याला वाटूं लागलें. हिंसेचें थैमान घालणाऱ्या क्षत्रियांचा संपूर्णपणें निःपात करावा असें त्यानें निश्चित केलें. हातांत धनुष्यबाण व खांद्यावर कुऱ्हाड घेऊन तो क्षत्रियांना निपटीत चालला. क्षत्रियांचा तो कर्दनकाळ झाला. पुनःपुन्हां क्षत्रियांची छाटणी त्यानें चालविली. बियालाहि कोणी क्षत्रिय उरूं नये असें त्याला वाटत होतें. एकवीस वेळां त्यानें पृथ्वी निःक्षत्रिय केली; परंतु पुन्हां क्षत्रिय उगवतच!

शस्त्रानें शस्त्र बंद करतां येत नाहीं. तलवारीनें तलवार दूर होणार नाहीं. युद्धानें युद्ध बंद होणार नाहीं. परशुरामाचा प्रयोग अपयशी झाला. सर्वांना पुनः पुनः मारीत सुटण्याच्या अभ्यासानें स्वतः परशुरामच एक भयंकर क्षत्रिय झाला! तो ब्राह्मणांना क्षत्रिय बनवूं लागला. स्वतःजवळची शस्त्रविद्या ब्राह्मणांस शिकविण्याचें त्यानें ठरविलें. ब्राह्मणांशिवाय कोणासहि मी शस्त्रविद्या शिकविणार नाहीं असें त्यानें घोषित केलें. भीष्माला त्यानें आधीं ही विद्या दिली होती. कर्ण त्याच्याजवळ चोरून शिकला. परशुरामापासून शेंकडों क्षत्रिय या प्रकारें तयार झाले. हिंसेनें अहिंसा निर्माण करणाऱ्या परशुरामानें अधिक हिंसक निर्माण केले!

परशुरामाचा हेतु चांगला होता; परंतु त्याचा मार्ग चुकला. त्याचा प्रयोग सिद्धीस गेला नाहीं. ययातीच्या प्रयोगाप्रमाणेंच हाहि एक मोठा प्रयोग होता. भोग भोगून भोगून ययाति विरक्त होऊं पहात होता. जगांत वीस वीस वर्षें

हिंसाकांड माजवून अहिंसा स्थापण्याचा प्रयोग परशुराम करूं पहात होता; परंतु जगांत जें पेरूं तेंच उगवेल. हिंसेला अहिंसेचीं फळें कशीं लागणार ?

हिंसेनें हिंसा संपणार नाहीं, युद्धानें युद्ध थांबणार नाहीं. असें जर असेल तर या युद्धांतच जितकी कमी हिंसा करतां येईल तितकी करावी असें ठरलें. युद्ध टळत नाहीं; परंतु इतकें तरी करूं या. लहान मुलांना मारूं नये. स्त्रियांवर हत्यार चालवूं नये, वृद्ध अवध्य समजावेत. ज्याच्याजवळ शस्त्र नाहीं, त्याच्यावर शस्त्र उगारूं नये. एकावर अनेकांनीं हल्ला करूं नये. दुसरा अडचणींत असतां त्याच्याशीं लगट करूं नये. रात्रीं युद्ध करूं नये. पदातींनीं पदातींशीं, रथींनीं, रथींशीं, गदीनांनीं गदीनांशीं लढावें, असे निरनिराळे युद्धधर्म निश्चित करण्यांत आले. या सर्वांचा हेतु हिंसा कमी व्हावी, आवश्यक तेवढीच व्हावी, असा होता. या हिंसेंतहि अहिंसेची आठवण माणसानें ठेवली होती.

विश्वामित्र परभारें हिंसा करून अहिंसेचें पुण्य जोडूं पहात होता. परशुराम स्वतः हिंसक बनून अहिंसा स्थापूं पहात होता. हे दोन्ही प्रयोग चुकीचे होते. परंतु विचारी मनुष्य स्वस्थ बसला नाहीं. हिंसेवर उपाय शोधून काढणें जरूरच होतें. हिंसेनें हिंसा शमत नाहीं, हें पाहिल्यावर स्वतः अहिंसक होऊन हिंसेला तोंड देण्याचें महात्म्यांनीं ठरविलें. स्वतःच्या जीवनांत हा अहिंसेचा प्रयोग हळूहळू त्यांनीं सुरू केला. मुलाला मारून मुलगा सुधारतो, कीं त्याला न मारतां प्रेमानें त्याला समजावून दिल्यानें तो सुधारतो ? चाबकानें घोडा ताब्यांत येतो, कीं त्याला वेळेवर चंदी दिल्यानें, त्याचा खरारा केल्यानें ताब्यांत येतो ? क्षमेचें सामर्थ्य अधिक कीं शस्त्राचें बळ अधिक ? प्रेम बळवान् कीं प्रहार बळवान् ?

संत या गोष्टींचा प्रयोग करूं लागले. स्वतःच्या वैयक्तिक, मर्यादित जीवनांत या प्रयोगाचा त्यांनीं अवलंब केला. प्रेमाचीच शक्ति अपार आहे असा त्यांना अनुभव आला. बंगालमध्यें चैतन्य म्हणून थोर संत होऊन गेले. एके दिवशीं चैतन्य आपल्या शिष्यांसमवेत नामसंकीर्तन करीत रस्त्यानें जात होते. टाळ-मृदंगांचा घोष सुरू होता. सारे रंगले होते.

हरी बोल हरी बोल । भवसिंधु पार चल

असा गजर गगनांत जात होता. इतक्यांत दोघां दुष्टांनीं येऊन चैतन्यांच्या मस्तकावर प्रहार केला. भळभळ रक्त वाहूं लागलें. चैतन्यांचा ब्रह्मचारी शिष्य



नित्यानंद त्या दुष्टांवर धांवला; परंतु थोर चैतन्य म्हणाले, " निताई ! त्यांनीं मला मारलें तरी मी त्यांना प्रेमच देणार ! "

भजन सुरू होतें. चैतन्य ' हरी बोल ' म्हणत होते. सारे नाचत होते. ते दोघे दुष्टहि नाचूं लागले. त्या भजनरंगांत तेहि रंगले. चैतन्यांची अहिंसा अत्यंत प्रभावी ठरली. त्या दिवसापासून ते दुष्ट दारुडे अगदीं निराळे झाले. चैतन्यांचे ते एकनिष्ठ सेवक झाले.

प्रेमानें पशूहि क्रूरता विसरतात. अँड्रोक्लिस व सिंह ही गोष्ट जगांत सुप्रसिद्धच आहे. सेवेनें, प्रेमानें क्रूर पशूहि जर माणसाळतात, तर प्रेमानें मनुष्य सुधारणार नाहीं का ?

केलेलें प्रेम व्यर्थ जात नाहीं. समजा, चैतन्यांच्या डोक्यावर आणखी प्रहार बसते व चैतन्य मरते तर ? तें मरणहि सुपरिणामी झालें असतें. त्या मरणाचा त्या दोघांवर कांहींच परिणाम नसता का झाला ? कदाचित् एक मरण त्यांना सुधारावयास पुरें पडलें नसतें. परंतु याचा अर्थ असा नाहीं, कीं तें वाया गेलें. सती सिंधूचें मरण शेवटीं सुधाकराचे डोळे उघडल्याशिवाय राहिलें नाहीं. महान् व्यक्तींनीं आपापल्या वैयक्तिक जीवनांत हिंसेवर अहिंसेचा प्रयोग लहानमोठ्या गोष्टींत आजपर्यंत अनेकदां करून पाहिला. सर्वांनीं हेंच सांगितलें कीं, हिंसेपेक्षां अहिंसेचें सामर्थ्य अपार आहे. शिक्षणशास्त्रज्ञ शेंकडों पुस्तकांत सांगत आहेत कीं, मुलांना छड्या मारून सुधारूं पाहणें हा चुकीचा मार्ग आहे. " छडी वाजे छम् छम्, विद्या येई घम् घम् " हा सिद्धान्त शास्त्रीय नाहीं. शिक्षणशास्त्रांतील नवीं तत्त्वें सर्व जागतिक व्यवहारांत आणावयास हवींत. जग ही एक शाळाच आहे. आपणांस एकमेकांस सुधारावयाचें आहे. हें काम दंडुक्यापेक्षां दुसऱ्याच मार्गानें होणें शक्य आहे.

शास्त्रज्ञ प्रथम आपल्या लहानशा खोलींत पुनः पुनः प्रयोग करून पाहतो आणि तो संशयातीत असा जर यशस्वी झाला तर जगापुढें मांडतो. मग तो प्रयोगालयांतील प्रयोग सर्व जगांत रूढ होतो. कोणत्याहि ज्ञानाचें असेंच आहे.

संतांच्या वैयक्तिक जीवनांत अहिंसेचा प्रयोग यशस्वी झाला होता. हा प्रयोग व्यक्तिगत जीवनांतून समाजाच्या जीवनांत आणावयाचा होता. खोलींत सिद्ध झालेलें ज्ञान समाजाच्या व्यवहारांत रूढ करावयाचें होतें. महात्मा गांधींनीं हें काम हातीं घेतलें. संतांच्या जीवनांतील अहिंसेचा प्रयोग महात्माजींनीं

सार्वजनिक जीवनांत आणला. वर्गावर्गांचे, जातीजातींचे, राष्ट्राराष्ट्रांचे तंटे या अहिंसेच्या मार्गानें सोडवावयाचे असें त्यांनीं ठरविलें.

हिंसक व्यक्तीसमोर अहिंसक संत उभा राहतो, त्याप्रमाणें हिंसक वर्गाविरुद्ध अहिंसक वर्गानें उभें रहावयाचें. हिंसक जमीनदारांविरुद्ध अहिंसक शेतकऱ्यांनीं उभें रहावयाचें. हिंसा हिंसेनें शमत नाहीं. हिंसेवर अहिंसाच पाहिजे.

अहिंसेनें हिंसा जिंकल्याचें इतिहासांत उदाहरण नाहीं असें सांगण्यांत येतें. व्यक्तिगत उदाहरणें तर पुष्कळ आहेत. सामुदायिक उदाहरणें मात्र नाहींत. पूर्वींच्या इतिहासांत उदाहरण नाहीं म्हणून पुढें होणार नाहीं, असें कसें म्हणावयाचें ? मानवी इतिहास कांहीं पुरा झाला नाहीं. पूर्वींचेंच सारखें करीत बसणें हें मंदगतीचें लक्षण आहे. आज दहा हजार वर्षें जगांत लढाया होत आहेत. युद्धानें युद्ध थांबवूं पहात आहेत. परंतु युद्ध थांबत नाहीं. १८७० मध्यें जर्मनीनें फ्रान्सला लोळविलें. तर त्या तहांतच १९१४ चें युद्ध पेरलेलें होतें. जर्मनीचा सूड उगविण्यासाठीं फ्रान्स अधीर होतें. फ्रान्सनें सूड उगविला. आतां पुनः हिटलरनें फ्रान्सचा सूड पुरेपूर उगवून घेतला आहे. एका लढाईत पुढील दहा लढायांचें बीज असतें.

दहा हजार वर्षांच्या या अनुभवानें माणसानें शहाणें झालें पाहिजे. हा मार्ग चुकला. दहा हजार वर्षें हिंसा हिंसेशीं झगडत आहे. परंतु हिंसा कमी होत नाहीं. हिंसा वाढतच आहे. ती अधिकच उग्र स्वरूप धारण करीत आहे. सोडूं या हा मार्ग. नवीन मार्ग घेऊं. अहिंसेनें हिंसा शमते का पाहूं या, अशी महात्मा गांधींनीं घोषणा केली. दक्षिण आफ्रिकेंत, चंपारण्यांत, बार्डोलींत त्यांनीं प्रयोग केले. भारतव्यापक अशीहि दोन-तीन वेळां त्यांनीं ही अहिंसक चळवळ करून पाहिली.

जगांतील ही अपूर्व गोष्ट होती. ज्या भारतांत प्राचीन काळापासून अहिंसेचे प्रयोग होत आहेत, त्याच भारतांतील एका महात्म्यानें भारतांत हा व्यापक व अभिनव प्रयोग केला. मानवजातीच्या इतिहासांत एक नवीन पान उलटलें गेलें. दहा हजार वर्षांनंतर एक नवीन गोष्ट मानवी इतिहासांत लिहिली गेली.

हा प्रयोग बाल्यावस्थेंत आहे. आजपर्यंत असा प्रयोग झाला नव्हता. संकुचित लोक म्हणतात, "हा प्रयोग फसला." त्यांना हेंच उत्तर कीं, "आजपर्यंत युद्धाच्या प्रयोगास दहा हजार वर्षें देण्यांत आलीं. या अहिंसेच्या प्रयोगालाहि दहा हजार वर्षें द्या, आणि मग हा प्रयोग फसला कीं यशस्वी झाला तें ठरवूं." साठ-



सत्तर हजार लोक सहा महिने तुरुंगांत बसून हा प्रयोग अजमावयाचा नसतो; आणि या साठ-सत्तर हजारांतीलहि "केव्हां आम्ही सुटूं" अशी चिंता बाळगणारेच पुष्कळ ! शस्त्रास्त्रांच्या युद्धांत पन्नासपन्नास लाख सैन्य आठआठ कोटी लोकसंख्येचीं राष्ट्रें उभारतात, त्याप्रमाणें या अहिंसक युद्धांतहि पस्तीस कोटी लोकांतून दोनअडीच कोटी लोक जेव्हां मरावयास उभे राहतील, तेव्हांच या प्रयोगाची कदाचित् सफलता वा विफलता दिसेल.

हिंसेच्या प्रयोगाला दहादहा हजार वर्षें मानवजात देते आणि अहिंसेच्या प्रयोगाला म्हणे मुदत सहा महिने आणि सैन्य सहा महिने तुरुंगांत जाणारे पन्नाससाठ हजार लोक ! आणि तेवढ्यावरून हा प्रयोग फसला असें म्हणावयाचें ! वाहवा रे बुद्धि !

ज्याप्रमाणें शस्त्रास्त्रांच्या युद्धांत दहादहा-वीसवीस वर्षें शिकलेले-कसलेले सैनिक असतात, त्याप्रमाणें या अहिंसक सेनेंतहि अहिंसेची शिकवण दहादहा वीसवीस वर्षें ज्यांनीं अंगीं बाणविण्याची खटपट केली आहे, असे लोक लागतात. असे हे नवे सैनिक निर्माण करण्याचा आरंभ महात्माजींनीं केला आहे. जगांतील एक प्रयोग ते करीत आहेत. हा प्रयोग जगांत पुढेंमागें वाढत जाईल. असले प्रयोग मरत नसतात. असलेच प्रयोग मानवजातीला पुढें नेत असतात. हेच तारक प्रयोग होत.

अहिंसा म्हणजे नेभळेपणा व दुबळेपणा नाहीं. पळून जाणें म्हणजे अहिंसा नव्हे. शत्रूसमोर निःशस्त्र उभें राहतां येत नसेल, तर त्याच्यावर घाव घालण्याच्या तयारीनें उभे रहा. परंतु पळून जाणें हें सर्वस्वीं त्याज्य व निंद्य होय. ही गोष्ट महात्माजींनीं शंभरदां सांगितली आहे. "शस्त्रांनीं स्वराज्य घेतां येत असेल तर तें घ्या. मी दूर उभा राहीन. परंतु गुलाम राहूं नका. शस्त्रांनीं लढतां येत नसेल, तर माझ्या निःशस्त्र लढ्यांत या. स्वातंत्र्याचा लढा चालविलाच पाहिजे. दास्यांत तसेंच खिचपत पडणें मानवाला शोभत नाहीं," असें ते म्हणतात.

उद्यां जगांतील सारीं लष्करें चुटकीसरशीं नाहींशीं होतील असें महात्माजी म्हणत नाहींत. हिंदुस्थानांतहि लष्कर, आरमार सारें लागेल. शस्त्रास्त्रांची बंदी उठवावी अशी दहा मागण्यांतलि त्यांची एक मागणी होती. जगाचें आजचें स्वरूप ते ओळखतात. परंतु जगांत नवीन आरंभ कोणीं तरी केला पाहिजे. संतांचें

काम वाढील लाविलें पाहिजे. अहिंसेचे प्रयोग पुढें नेले पाहिजेत. भारतीय पूर्वजांचे हे थोर प्रयोग महात्माजी पुढें चालवीत आहेत. त्यांची केवळ थट्टा करणें हें हृदय व बुद्धि असलेल्या माणसास शोभत नाहीं.

भक्षणांतील हिंसा व रक्षणांतील हिंसा, दोन्हींमध्यें महात्माजी आपले पूर्वजांचे अहिंसेचे प्रयोग पुढें नेत आहेत. दूध पिणें म्हणजेहि एक प्रकारें मांसाशनच आहे. दूध हा वनस्पत्याहार नाहीं. दूध ही प्राणिज वस्तु आहे. अहिंसेचें मांसाशनवर्जनाचें व्रत चालवणाऱ्यास पुढेंमागें दूधहि वर्ज्य करावें लागेल, असे विचार आज प्रकट होत आहेत. आपण देवीची लस टोंचून घेतों. यांत हिंसा तर आहेच. गायींना अपार त्रास असतो हें तर खरेंच. परंतु लस टोंचणें म्हणजे काय? गायीच्या अंगांतील लस आपल्या रक्तांत भरून घेणें, याचा अर्थ काय? आपण जिभेनें गोमांस खाल्लें नाहीं, परंतु आपल्या शरीरांतील रक्तांत तर तें क्षणांत गेलें! विचार करून आचाराकडे पाहूं लागलें म्हणजे अंगावर शहारेच येतील!

याचा अर्थ असा नाहीं कीं दूध पिऊं नका, टोंचून घेऊं नका. दुधाची जागा भरून काढणारा दुसरा पदार्थ मिळेपर्यंत दूध प्या, असेंच अहिंसेचा उपासक म्हणेल. परंतु स्वतःच्या जीवनांत तो प्रयोग करीत राहील. खाण्यापिण्याचे प्रयोग करील आणि दुधासारखी वनस्पति शोधील. देवी न टोंचता देवी येणार नाहींत असा एखादा उपाय शोधील.

अहिंसा अनंत आहे. महात्मे आपल्या जीवनांत जेव्हां इतकी आणतात, तेव्हां कोठें आपल्या जीवनांत ती अल्पशी येते. आकाशांत लाखों मेणबत्तींच्या शक्तीचा सूर्य जेव्हां सारखा जळत असतो, तेव्हां कोठें आपल्या अंगांत ९८ अंश उष्णता जगण्यापुरती राहते.

महात्माजींसारखा अहिंसेचा उपासक आज कोण आहे? परंतु त्यांनाहि आश्रमांत वानर मारावे लागले. पिसाळलेलीं कुत्रीं मारावीं लागलीं. बोरसद तालुक्यांत प्लेग आला असतां उंदीर मारण्याचा उपदेश कष्टानें त्यांना करावा लागला. त्या वेळेस त्यांनीं जें लिहिलें होतें तें किती हृदय पिळवटून लिहिलें होतें! "माझ्याइतकाच पिसवां-डासांना, उंदीर-घुशींना जगण्याचा अधिकार आहे. माझ्या मरणानें त्यांना जगूं यावें असें मला वाटतें. माझ्या हृदयांत अनंत वेदना होत आहेत," अशा अर्थाचे ते करुण उद्गार होते!

गांधींनीं पिसाळलेलें कुत्रें मारलें, प्लेग आणणारे उंदीर मारले. त्याच न्यायानें



जीं माणसें आम्हांस पिसाळलेलीं वाटतात, जीं माणसें प्लेग आणणारीं अशीं वाटतात, त्यांना कां मारूं नये, असे कोणी कोणी प्रश्न करीत असतात.

कुत्रा मारतांना गांधींचें हृदय पिळवटत होतें. स्वतः मरून कुत्रा जगूं यावा, असें त्यांच्या मनांत येत होतें. कुत्रा मारणें यांत प्रौढी न समजतां, ते तो दुबळेपणा व स्वतःच्या जीवनाची आसक्ति समजत होते. तशी स्थिति आहे का? तुम्ही तर मारण्यांत प्रौढी व पुरुषार्थ मानतां! तो स्वतःचा कमकुवतपणा न समजतां परम धर्म समजतां! मारण्याचें अंतिम तत्त्वज्ञान तयार करतां! हिंसेचा वेद बनवितां!

गीतेच्या अठराव्या अध्यायांत "मारूनहि मारणें होत नाहीं" असें सांगितलें आहे; परंतु ही कोणाची स्थिति? सर्व विश्व ज्याला आपलेंसें वाटलें, त्याच्या मारण्यांतहि जीवनच आहे. आई मुलाला मारते; परंतु मूल आईच्याच ओच्यांत तोंड खुपसून रडतें. मारणाऱ्या आईला तें मूल सोडीत नाहीं. तिलाच तें बिलगतें. आईचें तें मारणें, मारणें नसतें.

हिंसेची तरफदारी करणाऱ्यांची हिंसा या परमोच्च स्थितीची असेल तर ती हिंसा, हिंसा नसून अहिंसाच होय असें म्हणतां येईल. रामानें रावणास मारलें; परंतु रावण उद्धरून गेला असें आपण म्हणतों यांतील हाच भावार्थ. रामाला आपण परमेश्वर एकदां म्हटलें, म्हणजे त्याचें मारणें हें तुमचें आमचें हिंसक मारणें न राहतां तें तारक मारणें होतें. तें आईच्या हातचें मारणें होतें.

अर्जुनाला हिंसा करावयास श्रीकृष्णानें सांगितलें. कारण त्याचा तो स्वभाव होता. 'हिंसा म्हणजे परम धर्म' अशा रीतीनें तें सांगितलेलें नाहीं. आदल्या दिवसापर्यंत हिंसेच्या गप्पा मारणारा अर्जुन एका क्षणांत अहिंसक कसा होणार? हिंसा-अहिंसा हा अर्जुनासमोर प्रश्न नसून आसक्ति व मोह हा प्रश्न होता. मोह सोड, एवढेंच श्रीकृष्णाचें सांगणें होतें. "स्वजन आहेत म्हणून मारूं नये असें तुला वाटतें. दुसरे असते तर तूं खुशाल त्यांचा फन्ना पाडला असतास. आकार तुला प्रिय आहेत. विशेष नामरूपें प्रिय आहेत. ही आसक्ति आहे. हा मोह आहे, हा मोह टाक," असें भगवान् श्रीकृष्ण म्हणाले; आणि अर्जुनहि शेवटीं म्हणतो, "नष्टो मोहः!"

गीतेचा हिंसा हा परम सिद्धान्त नाहीं. हिंसेतून हळूहळू मनुष्य पूर्ण अहिंसेकडे जाईल. अहिंसा हाच अंतिम सिद्धान्त होय. तें ध्येय गांठीपर्यंत आपला

दुबळेपणा म्हणून मनुष्य हिंसा करीत राहील; परंतु मी हिंसा करणार अशी जेव्हां तो ऐट मिरवूं लागतो, तेव्हां मात्र तो मानवजातीचा अधःपात असतो.

आपण सारे घाव घालण्याचा हक्क मिळवायला अधीर असतों; परंतु प्रेम करण्याचा अधिकार आधीं मिळवून घ्या. आई अपार प्रेम करते, म्हणून तिला मारण्याचा अधिकार आहे.

मानवी जीवनांत संपूर्ण अहिंसा शक्य नाहीं. संपूर्णता हें ध्येयच राहणार. ज्याप्रमाणें भूमितींतील बिंदु हा प्रत्यक्षांत कधीं दाखवितां येणार नाहीं, भूमितींतील रेखा प्रत्यक्षांत दाखवितां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच परिपूर्ण ज्ञानी, संपूर्ण प्रेमी प्रत्यक्ष संसारांत दाखवतां येणें शक्य नाहीं. ज्याला लांबी नाहीं, रुंदी नाहीं, असा बिंदु अगदीं लहानसा आपण फळ्यावर काढतों. ध्येयभूत बिंदूच्या-जवळ असलेला असा बिंदु आपण काढतों. त्याप्रमाणें ध्येयभूत पुरुषाच्या जवळ जवळ गेलेले शुक-जनकादिक आपण दाखवितों; परंतु पूर्णत्वाच्या जवळ जवळ जाणें म्हणजे संपूर्ण पूर्णता नव्हे.

किती झालें तरी या मृण्मय शरीरांत आपण कोंडलेले आहोंत. या मातीच्या मडक्यांत संपूर्ण ज्ञान मावणार नाहीं. ज्याप्रमाणें एकाद्या मडक्यांतील पाण्याचें थंडीनें जर स्वच्छ शुभ्र बर्फ झालें तर तें मडकें फुटतें, त्याप्रमाणें स्वच्छ व शुद्ध ज्ञान या देहांत न मावल्यामुळें देहाचें मडकें फुटतें. ही देहाची खोळ गळल्या-शिवाय परिपूर्णतेची भेट नाहीं.

"पडलें नारायणीं मोटळें हें"

हें देहाचें मोटळें पडल्यावरच आत्मा परमात्म्याशीं मिळून जातो.

परंतु संपूर्णपणें अहिंसा शक्य नाहीं म्हणून मुळींच आचरूं नये असें नाहीं. शक्य तितकें आपण पुढें पुढें जावें. शेतींतील शेंकडों-लाखों किड्यांची हिंसा आपणांस टाळतां येणार नाहीं. हजारों जीवजंतू न कळत आपल्या पायांखालीं चुडरले जात असतील; परंतु असें हें चालणारच. जें अपरिहार्य आहे तें होईल. आपलें काम इतकेंच, कीं मुद्दाम हिंसा करूं नये. जीवनांत अधिकाधिक अहिंसा आणण्याची खटपट करावी. चालतांना काळजीपूर्वक चालावें, बोलतांना काळजी-पूर्वक बोलावें, कोणाचें मन दुखवूं नये, कोणाचें अकल्याण चिंतूं नये, कोणाचा तळतळाट घेऊं नये, घरोबा असावा, प्रेम जोडावें, सहकार्य वाढवावें, पशुपक्षी, कीडमुंगी यांची उगीच हिंसा करूं नये. अशा रीतीनें रोजच्या जीवनांतच आपण



अहिंसा अधिकाधिक आणूं या. दररोज कांहीं लढाई नाहीं. प्रत्येक क्षणीं पायां-समोर कांहीं सापविंचू नाहींत. अंगावर वृकव्याघ्र हरघडीला येत नाहींत. ते अपवादात्मक प्रसंग आहेत. त्या अपवादात्मक प्रसंगीं दुबळेपणानें, लाजेनें करा हिंसेचा वाटलें तर अवलंब. परंतु इतर दैनंदिन व्यवहारांत, समाजांत, हरघडी वागतांना आपण उत्तरोत्तर अधिक प्रेमळ, अधिक सहानुभूति दाखविणारे, अधिक सहकार्याला उत्सुक असे होऊं या. हें जीवन सुखमय व निर्भय असें करूं या.

भारतांत प्राचीन काळीं आश्रम असत. जेथें अहिंसेचा अधिकांत अधिक प्रयोग करून दाखवितां येईल अशीं तीं स्थानें असत. शहरांत बाग असते. त्या बागेंत गेल्यावर प्रसन्न वाटतें. त्याप्रमाणें आजुबाजूच्या हिंसक संसारांत अहिंसेला पूजणारे व भजणारे असे पावन व प्रसन्न आश्रम त्या काळांत असत. सामान्य जनता मधूनमधून तेथें जाई व प्रेम शिकून येई.

दुष्यंत इतर ठिकाणीं हिंसा करीत होता; परंतु आश्रमाजवळ येऊनहि जेव्हां तो हिंसा करूं लागला तेव्हां आश्रमांतील मुनि म्हणाले,

"न खलु न खलु बाणः सन्निपात्योऽयमस्मिन्
मृदुनि मृगशरीरे पुष्पराशाविवाग्निः ॥"

"राजा ! या कोमल हरणावर नको रे नको बाण मारूं." एकीकडे आकर्ण धनुष्य ओढणारा राजा दुष्यंत व एकीकडे त्या हरणांना अभय देणारे ते तपोधन ! एकीकडे हिंसेंत रमणारा राजस राजा व दुसरीकडे प्रेमाची पूजा करणारा सात्त्विक ऋषि ! राजाचें धनुष्य नमलें, त्याचें हृदय विरघळलें. आश्रमानें त्याच्यावर अहिंसेचा संस्कार केला.

विक्रमोर्वशीयम् नाटकांत पुरुरवस् राजाचा मुलगा आयु हा ऋषींच्या आश्रमांत अध्ययनार्थ ठेवण्यांत आलेला असतो; परंतु एके दिवशीं आयु हिंसा करतो. एका सुंदर पक्ष्याला तो बाण मारतो. त्या कोंवळ्या पंखांत तो प्रखर बाण घुसतो. ऋषींला ही गोष्ट कळते. आश्रमांत हिंसा, ही गोष्ट त्याला सहन होत नाहीं. आश्रमाचें पवित्र व प्रेमळ वातावरण भंगविणारा आश्रमांत नको असें ऋषींला वाटतें. त्या मुलाच्या धात्रीला तो सांगतो,

"आश्रमविरुद्धमनेन आचरितम् । निर्यातय हस्तन्यासम् ॥"

आश्रमाच्या प्रणालीविरुद्ध यानें वर्तन केलें आहे, याला परत पाठवा. ...

असे हे ठायीं ठायीं असणारे आश्रम भारतीय संस्कृति वाढवीत होते. या आश्रमांत प्रयोग होत होते. साप, मुंगूस, हरिण, सिंह, एके ठिकाणीं प्रेमानें नांदविण्याचे प्रयोग होत होते. आणि सर्पसिंहांनाहि आश्रमांत प्रेम दिलें जात आहे, त्या प्रेमामुळें सर्पसिंहहि प्रेमळ होत आहेत, असें दिव्य दृश्य जेव्हां आश्रमाला भेट देणारे बघत, तेव्हां ते गहिंवरून जात. सर्प, सिंह, दूर राहिले. आपण आपल्या शेजारच्या लोकांजवळ तरी प्रेमानें वागूं या, समाजांत तरी सहकार्यानें-आनंदानें नांदूं या, घरांत तरी गोड राहूं या, नांदूं या, असें ते मनाशीं ठरवीत. आश्रमाच्या दर्शनानें प्रेमाचा धडा शिकून ते संसारांत जात व संसार सुंदर करण्याचा प्रयत्न करीत.

आजहि भारतवर्षांत भारतीय संस्कृतीस उजळा देणारे आश्रम आहेत. वर्ध्याच्या आश्रमांत सापांना कोणी मारीत नाहीं. त्यांना धरून दूर सोडून देण्यांत येतें. विंचवांच्या नांग्या धरून त्यांना दूर सोडण्यांत येतें. एका गांवांत कॉलरा आला असतांना त्या गांवांतील लोकांनीं एक बोकड जिवंत पुरून देवीला बळी द्यावा असें ठरविलें. देवीच्या मंदिरासमोर खोल खळगा खणण्यांत आला. तिकडून बोकडाच्या बलिदानाची मिरवणूक आली. परंतु लोक येतात तों त्यांना रामनामाची धून ऐकूं आली. वर्ध्याच्या आश्रमांतील एक सत्याग्रही त्या खळग्यांत उभा होता. रामरायाचें भजन त्यानें चालविलें होतें.

लोक म्हणाले, “ बाहेर या. ”

तो नम्रपणें म्हणाला, “ बोकडाला पुरून कॉलरा जाणार असेल, तर मलाच पुरा. माणसाला पुरल्यानें देवी अधिकच प्रसन्न होईल व कायमचा कॉलरा जाईल.”

भगवान् बुद्धांच्या आत्म्याला हें विसाव्या शतकांतील दृश्य पाहून केवढें समाधान झालें असेल ! त्या सत्याग्रहीचा विजय झाला. प्रेमाचा विजय झाला. ज्ञानाचा विजय झाला.

अहिंसेचा, प्रेमाचा पंथ दाखवणारे हे नव आश्रम भारतवर्षाची आशा आहेत. हें प्रेम भारतीय संसारांत आल्याशिवाय राहणार नाहीं. भारतीय संसार सहानुभूतीचा व सहकार्याचा झाल्याशिवाय राहणार नाहीं.

जगांत एकीकडे तोफा ओतल्या जात असतां भारतांत प्रेमाचे प्रयोग होत आहेत. सरहद्दीवरचे झुंझार पठाण अहिंसेचे उपासक होत आहेत. शूर शिखांनीं अनत्याचारी सत्याग्रह केले. आश्रमांतून सर्पविंचवांनाहि प्रेम मिळत आहे.



हजारों-लाखों लोक अहिंसेच्या झेंड्याखालीं हिंसेसमोर उभे रहात आहेत. भारतांतील हा देखावा पाहून देवाचेंहि डोळे भरून आले असतील. या भरतभूमींतील या अहिंसेच्या कथा ऐकावयास, अहिंसेच्या महान् प्रयोगांची हकिकत ऐकावयास भगवंताचेहि कान उत्सुक असतील !

धन्य ही ‘ अहिंसा परमो धर्मः ’ सांगणारी भारतीय संस्कृति ! धन्य ही प्राचीन ध्येयपरंपरा पुढें नेणारे आजचे विश्ववंद्य महात्माजी !

## बलोपासना : : १७

भारतीय संस्कृतीनें ज्ञानावर व प्रेमावर भर दिला, त्याप्रमाणेंच बळावर भर दिला आहे. बळ नसेल तर ज्ञान व प्रेम हीं मनांतल्या मनांत मरून जातील. ज्ञान-प्रेमाला संसारांत आणण्यासाठीं, सुंदर व सुखकर करण्यासाठीं बळाची नितान्त आवश्यकता आहे. बळवान् शरीर, निर्मळ व सतेज बुद्धि, प्रेमळ परंतु प्रसंगीं वज्राप्रमाणें कठोर होणारें हृदय, या सर्वांची जीवनाच्या विकासास जरूरी आहे. जीवनाला समतोलपणा तरच येईल.

शरीरच नसेल तर हृदय-बुद्धि राहणार तरी कोठें ? या शरीराच्या द्वारांच सर्व पुरुषार्थ प्राप्त करून घ्यावयाचा आहे. निराकार आत्म्याला साकार होऊनच सर्व कांहीं करतां येतें. बाहेरची कांच नसेल, तर आंतील ज्योतीची प्रभा तितकी स्वच्छ पडणार नाहीं. बाहेरची कांच सुंदर-स्वच्छ असेल तरच दिव्याचा प्रकाश चांगला पडेल. आपल्या शरीरांतून आत्मसूर्याचा प्रकाश बाहेर पडावयाचा आहे. हें शरीर जितकें निरोगी, सुंदर, स्वच्छ व पवित्र राखूं तितकें आत्म्याचें प्रकाशन सुरेख रीतीनें होईल.

उपनिषदांतून बळाचा महिमा गायिलेला आहे. दुर्बळाला कांहीं करतां येत नाहीं. एक बळवान् मनुष्य येतो व शेंकडों लोकांना तो नमवितो. बळ नसेल तर बसतां येणार नाहीं, उठतां येणार नाहीं. बळ नसेल तर हिंडतां-फिरतां येणार नाहीं, हिंडतां-फिरतां आलें नाहीं तर ज्ञान मिळणार नाहीं, अनुभव मिळणार नाहीं, थोरांच्या गांठीभेटी होणार नाहींत, गुरुसेवा होणार नाहीं. बळ नसेल तर कांहीं नाहीं. म्हणून बळाची उपासना करा असें ऋषी सांगतात.

"नायमात्मा बलहीनेन लभ्यः" असें श्रुतिवचन आहे. दुर्बळाला दास्य व दुःख हीं सदैव ठेवलेलीं. अंगांत ताकदच नाहीं तर कांहीं एक नाहीं. इमारतीचा पाया खोल, मजबूत लागतो. चांगले भक्कम दगड तेथें रचावे लागतात. खडकावर उभारलेली इमारत पडणार नाहीं. वाळूंत रचलेली इमारत केव्हां कोसळेल वा खचेल त्याचा नेम नाहीं. शरीर सर्व गोष्टींचा पाया आहे.

"शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम्" सर्व धर्माचें मुख्य साधन म्हणजे हें शरीर. या शरीराची उपेक्षा करणें मूर्खपणा आहे. तें पाप आहे. तो देवाचा व समाजाचा घोर अपराध आहे. शरीर बळवान् असल्याशिवाय आपणांस कोणतेंहि ऋण फेडतां येणार नाहीं. समाजसेवा करून देवऋण फेडतां येणार नाहीं. सुंदर संतति निर्माण करून पितृऋण फेडतां येणार नाहीं. ज्ञानार्जन करून ऋषिऋण फेडतां येणार नाहीं. हीं तीन ऋणें आपल्या माथ्यावर असतात. हीं तीन ऋणें बरोबर घेऊन आपण जन्मत असतों. त्यांची फेड करावयासाठीं शरीर धडधाकट ठेवलें पाहिजे.

ब्रह्मचर्य हा बळाचा पाया आहे. त्या ब्रह्मचर्याची महति स्वतंत्र प्रकरणांत सांगितली आहे. मिळविलेलें बळ राखणें म्हणजे ब्रह्मचर्य. बळ मिळवा व तें नीट राखा.

बळ मिळविण्यासाठीं शरीराला व्यायाम हवा. केवळ पोषाखी बनून भागणार नाहीं. भारतीय संस्कृतींत नमस्कारांचा व्यायाम घालून देण्यांत आला आहे. सूर्याला नमस्कार घालावयाचे, स्वच्छ हवेंत तेजस्वी सूर्याला साक्ष ठेवून नमस्काराचा व्यायाम घ्यावयाचा. प्राणायामाचा व्यायामहि नित्य सांगितला आहे. संध्या करतांना अनेकदां प्राणायाम करावा लागतो. नमस्कार व प्राणायाम यांचा व्यायाम मरेपावतों घ्यावा.

निरनिराळ्या मल्लविद्या भारतांत होत्या. मल्लविद्येसाठीं भारतवर्ष प्रसिद्ध आहे. प्रत्येकजण मल्लविद्या शिके. व्यायामाचे अनेक प्रकार होते. कांहीं व्यायाम शरीर सुदृढ व सुंदर व्हावें म्हणून असत, कांहीं व्यायाम स्वसंरक्षणाचीं साधनें म्हणून असत. लाठी, दांडपट्टा, भाला, तरवार वगैरे स्वसंरक्षणाचीं साधनें म्हणून शिकविण्यांत येत.

नाना प्रकारचे खेळ भारतवर्षांत होते. साधे सुटसुटीत सांघिक खेळ हुतुतु, हमामा, सुरपाट्या असे किती तरी प्रकार होते. श्रीकृष्ण खेळांचा भोक्ता होता.



बाळगोपाळ जमवून तो खेळ मांडी. खेळासारखी पवित्र वस्तु नाहीं. निवेदिता-देवींनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे, "कृष्णानें खेळांना दिव्यता दिली. Krishna made play divine." कृष्ण म्हटलें कीं त्याची क्रीडा आठवते. कृष्ण म्हणजे ज्याप्रमाणें गायींची आठवण, त्याचप्रमाणें कृष्ण म्हणजे नदीतीरावरचा खेळ.

खेळांत आपण अनेक गोष्टी शिकतों. लहानथोर सारें विसरतों. आसक्ति विसरतों. विरुद्ध पक्षाला माझा मित्र किंवा भाऊ असला, तरी तो आतां माझा भाऊ किंवा मित्र नाहीं. त्यालाहि धरावयाचें, पकडावयाचें. खेळ म्हणजे निष्ठा, खेळ म्हणजे सत्यता, खेळ म्हणजे स्वतःचा विसर.

मुलांच्या खेळांप्रमाणें मुलींचेहि खेळ होते. नाना प्रकारच्या फुगड्या, नाना प्रकारचे पिंगे, यांमुळें शरीरास सौष्ठव येई. अंगांत चपळाई येई. नागपंचमीच्या वगैरे दिवशीं मुलें-मुली झोके घेतात. टिपऱ्यांचा खेळ मुलेंहि खेळतात, मुलीहि खेळतात.

निरनिराळ्या प्रकारचीं आसनें शरीराच्या आरोग्यार्थ शोधण्यांत आलीं आहेत. आसनांनीं थोडक्या वेळांत भरपूर व्यायाम होतो. आसनांमध्यें प्राणायामाचीहि जोड असते. भुजंगासन, गरुडासन, कुक्कुटासन, शीर्षासन, वगैरे पांचदहा आसनें दररोज नियमित केलीं, तर प्रकृति निकोप राहिल्याशिवाय राहणार नाहीं.

काम करतांना मिळणारा व्यायाम हा सर्वोत्कृष्ट होय. व्यायाम हासुद्धां कांहीं-तरी निर्माण करणारा असावा. शाळेंतील मुलांना बागेला पाणी घालावयास लावावें; खणावयास सांगावें; व्यायामापरी व्यायाम होतो व सृष्टींत फुलें-फळेंहि निर्माण होतात. कण्वाच्या आश्रमांत शिकावयास असलेल्या प्रियंवदा, अनसूया वगैरे विद्यार्थिनी झाडाला पाणी घालीत आहेत, असें शाकुंतलांत दाखविलें आहे. पाणी घालून शकुंतला दमते व घामाघूम होते.

स्वतःचे कपडे धुवावेत, स्वतःची खोली स्वच्छ करावी, स्वतःचें भांडें घांसावें, घरांत पाणी भरावें, अशा रीतीनें सहज व्यायाम होतो. आपल्याकडे जुने लोक असेच श्रमाचे भोक्ते होते. ते पोश्ये नव्हते. श्रमाचा कमीपणा त्यांना वाटत नसे.

सांदीपनीच्या आश्रमांतील विद्यार्थी पाणी भरीत, लांकडें फोडीत, जंगलांत जाऊन मोळ्या आणीत. हा श्रीमंत विद्यार्थी व हा गरीब असा भेद नसे. गरीब

सुदामा व सुखी कृष्ण रानांत बरोबर जात. गुरुजवळ सारे समान. सारे श्रम करीत. गरिबांचें काय, श्रीमंतांचें काय, शरीर निरोगी हवें. आरोग्य सर्वांना हवें. प्राचीन भारतीय आश्रमांत विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना कटक बनविण्यांत येई. थंडी असो, वारा असो, ऊन असो, पाऊस असो, त्याची त्यांना चिंता वाटत नसे. अंगाला वारा लागला पाहिजे, ऊन लागलें पाहिजे. पाऊस पडूं लागला म्हणजे मुलांना सुट्टी द्यावी, असें मनुस्मृतींत सांगितलें आहे. नाचूं दे पावसांत. पहांटे मुलें उठत. नदीवर स्नानास जात. तेथें डुंबत, पोहत. मग नमस्कार घालीत. त्यानंतर दूध पीत. असा भारतीय संस्कृतीचा प्रकार आहे.

आपण जुने लोक पाहिले तर त्यांचीं शरीरें निरोगी दिसतात. साठी उलटली तरी डोळ्यांना आरशी नाहीं, दांत सारे बळकट, कान तीक्ष्ण, पचनेंद्रियें चांगलीं, हातपाय बळकट, पांचदहा कोस सहज चालतील, असे दिसतात. तशाच जुन्या बाया.

परंतु हल्लीं शरीरें म्हणजे सांपळे झाले आहेत. बसके गाल, खोल गेलेले डोळे हातापायांच्या काड्या, डोळे मंद झालेले, दांत किडलेले, शौचाची सदैव तक्रार, असा सर्वत्र देखावा दिसेल. सारे पोषाखी सरदार! पाऊस लागला कीं आलें पडसें; थंडी लागली कीं आला हिंवताप; ऊन लागलें कीं आली भोंवळ; असे आपण झालों आहोंत. वरच्या पांढरपेशांची ही अशी दैना आहे.

कामकरी-शेतकरी, त्यांना श्रम भरपूर होतात; परंतु पोटभर खायला नसल्यामुळें त्यांचीं शरीरें कृश होत आहेत. पांढरपेशांना श्रम नाहींत व श्रमजीवी जनतेस अपार श्रम असा हा देखावा आहे. श्रमजीवी लोकांस विसांवा व भरपूर अन्न दिल्याशिवाय त्यांचें आरोग्य सुधारणार नाहीं. श्रमहीनास श्रम करावयास लावल्याशिवाय ते सुदृढ होणार नाहींत.

शरीराला व्यायाम पाहिजे, श्रम पाहिजेत, त्याप्रमाणें भरपूर खायलाहि पाहिजे. परंतु काय खावेंप्यावें तेंहि आपणांस समजेनासें झालें आहे. सकस अन्न आपल्या पोटांत जात नाहीं. ज्ञानाचा दिवा सर्वत्र नेला पाहिजे. कोणत्या भाज्या चांगल्या, कोणते पाले चांगले, कोणत्या डाळी चांगल्या, कच्चें खावें कीं शिजवलेलें खावें, कोरडें खावें का पातळ खावें, मसाले चांगले का वाईट, एक का दोन—शेंकडों गोष्टींवर ज्ञानाचा प्रकाश पडावयास हवा.

जीवनसत्त्वांचें नवीन शास्त्र निर्माण झालें आहे. आपण कणीक चाळून घेतों



व कोंडा फेंकून देतों. शास्त्र सांगतें, कीं हा मूर्खपणा आहे. कोंड्यासकट कणकेची पोळी करा. कोंड्यांत सत्त्व आहे. तो प्रकृतीस फार चांगला. आपण गिरणींत सडलेले पांढरेशुभ्र तांदूळ खातों. परंतु शास्त्र सांगतें, कीं ही चूक आहे. न सडलेले तांदूळ खाणें चांगलें; असडिक तांदुळांत शर्करा असते. सडलेले व बिनसडलेले असे तांदूळ ठेवा. बिनसडलेल्या तांदुळांत आधीं किडी होतील. कारण त्यांत शर्करा अधिक आहे. ही शर्करा हाडांना फार चांगली. परंतु ते पांढरे फटफटीत तांदूळ खाऊन आपण पांढरे फटफटीत होत आहोंत. तोंडावरचा तजेला जात आहे. परंतु इकडे कोणीं लक्ष द्यावयाचें?

यंत्रानें सडलेले तांदूळ खाऊन बेरीबेरी रोग होतो. कांहीं देशांत असे तांदूळ खाऊं नयेत म्हणून कायदे झाले आहेत; परंतु आपल्याकडे कोण करणार? आपलें सरकार आहे परकी. तें कशाला काळजी घेईल? परंतु आपल्या शरीराची नको का काळजी घ्यावयास? नवीन सुशिक्षित बुद्धीची व स्वतंत्र विचारांची ऐट दाखवीत असतात. परंतु एकीकडे सायन्स जें सांगतें, त्याप्रमाणें वागावयासहि तयार नाहींत. सडलेले तांदूळ व बिनसडलेले तांदूळ निरनिराळ्या उंदरांस खाण्यास देण्यांत आले; बिनसडलेले तांदूळ खाणारे उंदीर धष्टपुष्ट झालेले दिसले.

गायीचें दूध नाहींसें होत चालल्यानें उंची कमी होत आहे. दुग्धाहाराला आपण फार महत्त्व दिलें होतें. तसेंच ताकासहि. मधपाणी प्यावयाचीहि प्रथा होती. पाहुणा आला कीं त्याला मधपाणी देत. मधपाणी नियमित प्याल्यानें आयुष्य वाढतें. प्रयोगांनीं हें सिद्ध झालें आहे. मध फार आरोग्यदायक वस्तु आहे. इतिहासाचार्य राजवाडे भातावर मध ओतीत व खात.

फलहाराचेंहि फार महत्त्व आपण ओळखलें होतें. मधूनमधून मुद्दाम उपवासांची योजना करून त्या दिवशीं तरी फलाहार करावा अशी योजना पूर्वजांनीं केली. परंतु फराळाच्या दिवशींहि आपण साबुदाण्याचा चिवडा करतों व खातों! आपण तेलातिखटाचे, तळलेल्या वस्तूंचे भोक्ते झालों आहोंत. चणे चटपटे, चिवडा मसालेदार यांची घातुक चटक आपणांस लागत आहे. एक आण्याचा चिवडा खाण्याऐवजीं एक आण्याचीं केळीं घेऊन खाल्लीं, तर शरीराला किती तरी फायदा होईल! परंतु विचाराचा डोळा आज फुटलेला आहे. आंधळें आचरण चाललें आहे.

पूर्वजांनीं काय खावें, काय प्यावें याचें शास्त्र बनविलें होतें. असुक निषिद्ध

म्हणून खाऊं नये, अमुक चांगलें आहे म्हणून खावें, असे त्यांनीं नियम केले होते. त्यांचे नियम नवीन शास्त्रीय प्रकाशांत तपासले पाहिजेत. नवीन संशोधन केलें पाहिजे. निषिद्ध कां? केवळ लाल रंग दिसतो म्हणून का? मसुरीची डाळ रक्त शुद्ध करणारी, बद्धकोष्ठ दूर करणारी आहे, मग कां न खावी? केवळ भावना कीं काय? कांदा निषिद्ध कां? चातुर्मास्यांत कांदा-वांगें कां खाऊं नये? कांद्यांत फॉस्फरस आहे. कांदा शक्तिवर्धक आहे. परंतु केवळ बौद्धिक श्रम करणाऱ्यांस तो अपायकारक असेल. शेतांत श्रमणाऱ्या शेतकऱ्यांस तो हितकर असेल. हे आहाराचे नियम सर्व शोधले पाहिजेत. शास्त्रीय आहार बनविला पाहिजे. त्याचा प्रसार केला पाहिजे. टोमॅटो, बटाटा, बीट वगैरे नवीन पदार्थ आले आहेत. त्यांचेंहि परीक्षण झालें पाहिजे. पुण्याला वीसपंचवीस वर्षांपूर्वीं लाल टोमॅटो निषिद्ध मानीत. परंतु टोमॅटो प्रकृतीस फार चांगला असें आतां कळूं लागलें आहे.

आलें व लिंबू यांचें भारतीय आहारांत फार महात्म्य आहे. आलें व लिंबू म्हणजे साठ चटण्या व साठ कोशिंबिरी! आल्याचा तुकडा व लिंबाची फोड असली म्हणजे सर्व कांहीं आलें. आलें-लिंबू हें आरोग्याला फार हितकर आहे. लिंबाच्या रसानें कैंसहि पचेल अशी जुनी म्हण आहे.

आहारविहारावर तर आरोग्य अवलंबून आहे. विहार म्हणजे व्यायाम, खेळ. योग्य विहार व योग्य आहार यांची जर जोड असेल, तर शरीर सुंदर व सतेज राहील. उदंड सेवा करतां येईल.

आजारी पडणें म्हणजे पाप असें वाटलें पाहिजे. बर्नार्ड शॉ तर एके ठिकाणीं म्हणतो, "कोणी आजारी पडला तर त्याला मी तुरुंगांत पाठवीन.." सृष्टि-नियमाप्रमाणें वागला नसेल, व्यायाम घेतला नसेल, प्रमाण ठेवलें नसेल, वेळेवर झोंपला नसेल, वेळेवर जेवला नसेल, म्हणून आजारीपण आलें. आजारीपण म्हणजे निसर्गाची शिक्षा आहे. आपण आजारी पडल्यामुळें आपली समाजसेवा तर अंतरतेच, परंतु आपल्या शुश्रूषेसाठीं दुसऱ्यांचाहि वेळ मोडतो. घरांत चिंता पसरते. आरोग्य म्हणजे आनंद आहे. आजारीपण म्हणजे दुःख आहे.

निरोगी शरीर सुंदर दिसतें. रोगट-फिक्कट शरीर कितीहि सजवलें तरी तें विद्रूप दिसतें. पीळदार शरीराला फाटका कपडाहि शोभून दिसतो. आरोग्य म्हणजे सौंदर्य पाहिजे असेल तर निरोगी रहा. व्यायाम करा. शरीरश्रम करा. शरीराला ऊन, पाऊस, वारा लागूं दे. तो सृष्टीचा स्पर्श तजेला देईल.



सकाळ-सायंकाळ गांवाबाहेर असलेल्या महादेवाला जावें अशी परंपरा आहे. त्यांत बाहेरची हवा लागावी, क्षणभर संसाराच्या बाहेर मन जावें, मोकळें वाटावें, हाच हेतु असे. पाय मोकळे होतात. मन मोकळें होतें. विशाल आकाश दिसतें, हिरवीं झाडें दिसतात, वाहणारी नदी दिसते. मन रमतें, प्रसन्न होतें. देवाला, तुळशीला प्रदक्षिणा घालाव्या, यांतहि व्यायामाचाच हेतु होता. शरीरास आरोग्य व मनासहि आरोग्य.

भारतीय संस्कृतींत व मुसलमानी संस्कृतींत धर्माशीं आरोग्याची सांगड घातली आहे. नमाज पढावयाच्या वेळेस मुसलमान भाई बसतो, उठतो, वांकतो. शरीराच्या निरनिराळ्या हालचालींत आरोग्याचीं तत्त्वें गोंवलेलीं आहेत. दिवसा-तून पांच वेळां नमाज पढावयाचा, पांच वेळां शरीरास हा नियमित व्यायाम होतो. शरीरास आरोग्य व प्रार्थनेमुळें मनासहि आरोग्य. नमस्कार, प्रदक्षिणा वगैरे गोष्टींत भारतीय संस्कृतीनें असाच मेळ घातला आहे.

स्वच्छतेवर भारतीय संस्कृतीचा कटाक्ष आहे. या उष्ण हवेंत दररोज स्नान हवेंच. तीन वेळांहि स्नान सांगितलें आहे. स्नानाचा महिमा सांगिणारीं पुराणें आहेत. कार्तिकस्नान, माघस्नान, वैशाखस्नान, वगैरे स्नानांचीं व्रतें सांगितलीं आहेत. स्नानांचा हा केवढा महिमा! स्नान केल्याशिवाय खाऊं नये, असा दंडक होता. जेवतांना जंतू जाऊं नयेत म्हणून कोण ही दक्षता! जेवावयास जाण्याआधीं हातपाय धुवावयाचे, बाहेरून येतांच हातपाय धुऊन घरांत जावयाचें. स्वयंपाकघर, देवघर हीं तरी पवित्र ठेवावयाचीं. घरांत धूप वगैरे घालावयाचा. स्वच्छतेसंबंधीं भरपूर काळजी घेण्यांत येत होती. दररोज धुतलेलें धोतर नेसावयाचें. शिळें खाऊं नये, तेंच वस्त्र वापरूं नये अशी आज्ञा आहे. जेवतांना वस्त्रांतर करून बसावें. ज्या वस्त्रानें बाहेर हिंडतों, फिरतों, तें वस्त्र जेवतांना नको. ते घामट सदरे वगैरे काढून ठेवा. स्वच्छपणें जेवा.

केंस काढण्यांतहि स्वच्छतेची दृष्टि होती. या उष्ण हवेंत घाम येतो. केसांत घामानें घाण होते, मळ सांचतो. म्हणून फार केंस वाढूं न देणें अशी पद्धत अनु-भवानें पडली. केंस ठेवावयाचेच असतील तर ते स्वच्छ राखावे, शिकेकाईनें धुवावे असें सांगण्यांत येई. स्वच्छता म्हणजेच सौंदर्य हें ज्या दिवशीं कळेल तो सुदिन.

आरोग्य कां मिळवावयाचें? शरीरसंपदा कां मिळवावयाची? बळाचा उपयोग काय? भारतीय संस्कृति सांगते, कीं बळ हें स्वधर्माचरणासाठीं आहे. आपली

त्रिविध ऋणें पार पाडण्यासाठीं आहे. तसेंच बळ दुसऱ्यास पिळण्यासाठीं नको आहे. बळ दुसऱ्यांचें रक्षण करण्यासाठीं आहे.

आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि ।

तुझें शस्त्र पीडितांचा सांभाळ करण्यासाठीं असूं दे. निरपराधी जनतेची कत्तल करण्यासाठीं म्हणून नको.

जे दुर्बळ असतील त्यांना मी दरडावणार नाहीं. दुर्बळांना हात देऊन उठवण्यासाठीं माझें बळ आहे. दुर्बळांना बळवान् करण्यासाठीं माझें बळ आहे. पाश्चिमात्य देशांत नित्शेचें एक बळाचें तत्त्वज्ञान आहे. 'बळी तो कान पिळी' अशा स्वरूपाचें तें तत्त्वज्ञान आहे. दुर्बळांचें जगांत काय काम, दुर्बळाची कींव करतां कामा नये, दुर्बळाला फेंकून द्यावें, असें तें तत्त्वज्ञान आहे. परंतु अशा तत्त्वज्ञानावर जग चाललें नाहीं. दुर्बळाला फेंकून द्यावें, असें तत्त्वज्ञान अंगीकारलें तर समाज टिकणार नाहीं. मातेनें दुबळ्या मुलाला कां वाढवावें ? तें शेंबडें, रडवें मूल, त्याची काळजी कां घ्यावी ? माता म्हणते, "माझें दुबळें बाळ बळवान् होईल. मी आज त्याचें बोट धरीन व तें चालूं लागेल. माझ्या साहाय्यानें एक दिवस तें समर्थ होईल. माझी त्याला जरूर लागणार नाहीं. दुबळ्या बाळाला बळवान् करण्यासाठीं स्वाश्रयी, स्वावलंबी करण्यासाठीं माझें बळ आहे."

जग शेवटीं सहकार्यावर चाललें आहे. मी दुसऱ्याला हात देईन व तोहि उठेल. सारे उठूं देत, सारे आनंदानें नांदूं देत.

शरीराचें बळ, तसें ज्ञानाचें बळ, तसेंच प्रेमाचें बळ. उत्तरोत्तर हीं बळें श्रेष्ठतर अशीं आहेत. प्रेमानें रानटी क्रूर पशूसहि आपण जिंकून घेतों. शास्त्रीय ज्ञानानें आपण रोग जिंकतों. अंगबळापेक्षां अकलेचें बळ अधिक आणि अकलेच्या बळापेक्षां प्रेमाचें, पावित्र्याचें, शीलाचें, चारित्र्याचें बळ अधिक ! हीं तिन्ही बळें आपण प्राप्त करून घेतलीं पाहिजेत. निरोगी शरीर, प्रेमळ व उदार हृदय, विशाल व कुशाग्र बुद्धि, या तिन्हींच्या समन्वयापासून जें बळ निर्माण होईल तें अपूर्व होय.

रवींद्रनाथ गीतांजलींत म्हणतात, "देवा ! हें शरीर तुझें मंदिर आहे म्हणून तें मी सदैव पवित्र राखीन. हें हृदय तूं मला दिलें आहेस, प्रेमानें भरून तुला तें मी आणून देईन. ही बुद्धि तूं मला दिली आहेस. हा बुद्धीचा दीप निर्मळ व सतेज असा मी सदैव पेटत ठेवीन."



भारतीय संस्कृतींत हनुमान हा बळाचा आदर्श आहे. सर्व प्रकारचीं बळें त्याच्या ठिकाणीं संपूर्णपणें विकसित झालीं आहेत.

मनोजवं मारुततुल्यवेगं
जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम्
वातात्मजं वानरयूथमुख्यं
श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥

मारुती केवळ बलभीम नव्हता. तो मनाप्रमाणें चपळ होता. मोठमोठे पहिलवान असतात, त्यांना जरा पळवत नाहीं. चपळ मुलें त्यांना चिमटे घेऊन बेजार करतील ! त्यांना पटकन् मागें वळतां येत नाहीं, पुढें वळतां येत नाहीं. सर्व प्रमाणांत पाहिजे. मारुतीचा वाऱ्याप्रमाणें वेग होता. तो नुसता लठ्ठंभारती नव्हता. मारुतिरायांचें शरीर वज्राप्रमाणें दणगट होतें व वाऱ्याप्रमाणें चपळ होतें. त्यांच्या पायांनीं दगडाचा चुरा केला असता व तेच पाय द्रोणागिरी आणावयास क्षणांत दहा कोस जाते.

या शारीरिक बळाबरोबरच मनोबळहि त्यांच्याजवळ होतें. ते जितेंद्रिय होते, संयमी होते. शीलवान्, चारित्र्यवान्, व्रती होते. मिळविलेल्या बळाची उधळपट्टी त्यांनीं केली नाहीं. वासनाविजय त्यांनीं केला होता. शरीराच्या अवयवांवर ज्याप्रमाणें त्यांनीं विजय मिळविला होता, स्नायूंवर ज्याप्रमाणें सत्ता त्यांनीं मिळविली होती, त्याचप्रमाणें मनाच्या उर्मीवरहि त्यांनीं सत्ता मिळविली होती. मनोविजय ज्यानें मिळविला, त्यानें सर्व कांहीं मिळविलें.

शरीर बळवान्, हृदय शुद्ध व पवित्र, त्याचप्रमाणें मारुतिरायांची बुद्धीहि अलौकिक होती. ते बुद्धिमंतांचे राजे होते. बुद्धीचें त्यांना वावडें नव्हतें. आपल्याकडे एक कल्पना रूढ झाली आहे, कीं जो बलवान् आहे तो बुद्धिमान् नसावयाचा; आणि जो बुद्धिमान् आहे तो बलवान् नसावयाचा. परंतु मारुतिराय म्हणतात दोन्ही पाहिजेत.

शरीर, हृदय व बुद्धि, तिहींचा उत्कृष्ट विकास आहे; तरीहि आणखी एका वस्तूची जरुरी आहे. ती म्हणजे संघटना-कुशलता. आपण स्वतःशीं पुष्कळ चांगलें असतों. परंतु जर समाजांत मिसळलों नाहीं, तर कामें उठत नाहींत. तेज पसरत नाहीं. मारुति हा वानरयूथमुख्य होता. तरुणांच्या संघटणा हातीं घेतल्या पाहिजेत, त्यांच्यांत घुसलें पाहिजे, त्यांना बलोपासना शिकविली पाहिजे.

शारीरिक, मानसिक व बौद्धिक अशी त्रिविध बलोपासना. तरुणांबरोबर खेळलें पाहिजे. त्यांचे संघ स्थापन केले पाहिजेत. त्यांच्याबरोबर चर्चा केल्या पाहिजेत. तरच कार्य झपाट्यानें पुढें जातें.

समर्थांनीं अशीच संघटना केली. ही त्रिविध बलोपासना त्यांनीं शिकविली. हजारों मारुती त्यांनीं स्थापन केले. गांवोगांवीं आखाडे उभे राहिले. दंड वाजूं लागले. कुस्त्यांचे फड पडूं लागले. यात्रांतून कुस्त्या होत होत्या. या आखाड्यांबरोबरच रामकथाहि गांवोगांव गेली. रामकथा म्हणजे साम्राज्यनाशार्थ संघटना. हे विचारहि सर्वत्र गेले. पीळदार दंड जनतेला स्वराज्य देण्यासाठीं उपयोगांत येऊं लागले. 'मराठा तितुका मेळवावा' हा मंत्र देऊन हृदयांत ऐक्य निर्माण करण्यांत आलें. हृदय, बुद्धि, शरीर, तिघांना तेजस्विता आली. करंटेपण दूर होऊं लागले. 'जो तो बुद्धिच सांगतो' असला चावटपणा नाहींसा होऊन श्रीशिवाजीमहाराजांभोंवतीं सारे जमा होऊं लागले. धर्माभोंवतीं गोळा होऊं लागले.

कारण शरीरबळ, पवित्र हृदय, व प्रखर बुद्धि, त्याचप्रमाणें सारी संघटना, यांचा उद्देश काय ? या सर्व साधनांचा उपयोग रामसेवेंत करावयाचा 'रामदूत' यांत मारुतीचा मोठेपणा आहे. माझी शक्ति दुसऱ्यांस गुलाम करण्यासाठीं नाहीं. माझी बुद्धि दुसऱ्यांवर साम्राज्यें लादण्यासाठीं नाहीं. माझी अंतर्बाह्य शक्ति रामाच्या सेवेसाठीं आहे. आणि रामसेवा म्हणजे तेहतीस कोटी देव दास्यांतून मुक्त करणें.

हे तेहतीस कोटी देव कोणते ? रावणाकडे हे देव झाडीत होते, पाणी भरीत होते, सारीं श्रमकर्मे करीत होते. साम्राज्य स्थापन करणारे सर्व दुनियेला दास करतात. तिला केवळ हमाल बनवतात. देवाप्रमाणें शोभणारीं माणसें दास होतात. रामाला मानवाचा मोठेपणा सिद्ध करावयाचा होता. देवांचे दास करणें हें त्याचें काम नव्हतें. प्रत्येक मनुष्यांत दिव्यता आहे. प्रत्येकजण देव आहे. परंतु त्याच्यांतील दिव्यता प्रकट व्हावयास अवसर नसतो. सत्तावान् त्याला मजूर व पाणक्ये करून ठेवतो. तेहतीस कोटी देव म्हणजे कोट्यवधि माणसें हाच अर्थ आहे. या माणसांस मुक्त करणें हें प्रभु रामाचें काम होतें.

मारुतीनें आपली सारी संघटना रामाच्या ध्येयार्थ अर्पण केली. स्वतःचें सारें बळ रामाला दिलें. साम्राज्यशाही दूर करणारा राम दिसतांच मारुति उठला.



त्याच्याबरोबर अठरा पद्म वानर उठले. आपल्या बांधवांस स्वातंत्र्य व स्वराज्य देण्यासाठीं त्यांचें सर्व बळ होतें.

भारतीय संस्कृति ही वस्तु आपणांस सांगत आहे. शरीर, हृदय व बुद्धि यांचें बळ मिळवा, संघटना करा, संघ स्थापा, वातावरण तेजस्वी करा, आणि ही सर्व संघटना महान् ध्येयासाठीं उपयोगांत आणा. राम आर्य व अनार्य पहात नाहीं. तुडवले जाणारे जे जीव त्यांना राम बघतो. त्यांचा कैपक्ष घेतो. आणि जे तुडवणारे असतात, त्यांचा निःपात करतो. तुडवणारे मग कोणीहि असोत. तुडवणारे हिंदू असोत, मुसलमान असोत, इंग्रज असोत, जपानी असोत; राम दोनच वर्ग ओळखतो. पददलित व मदोद्धत. तो पददलितांची बाजू घेऊन उठेल.

भारतीय संस्कृति आर्य व अनार्य हे शब्द वंशवाचक समजत नाहीं. आर्य म्हणजे उदार, आर्य म्हणजे श्रेष्ठ, आर्य म्हणजे विशाल दृष्टीनें पाहणारा, अनासक्त, विमोह. अर्जुन केवळ आपले नातलग पाहून धनुष्यबाण टाकतो. या कर्माला श्रीकृष्ण "अनार्यजुष्ट" म्हणतात. अन्याय करणारा कोणीहि असो, त्याला दंड देणें हें आर्यांचें काम. हा आपला म्हणून त्याचे दोष झांकणें अनार्यांचें म्हणजेच मोहग्रस्तांचें, मूढांचें, आसक्तिमयांचें काम आहे.

"कृण्वन्तो विश्वमार्यम्" याचा अर्थ सर्वांना हिंदू करावयाचें व सर्वांना शेंड्या-जानवीं द्यावयाचीं असा नाहीं. सर्व जगाला आपण उदार करूं, सर्व विश्वाला माणुसकी ओळखावयाला शिकवूं, सर्वजण खरींखुरीं माणसें होऊं, असा त्याचा अर्थ आहे.

स्वतः उदार झाल्याशिवाय जगाला उदार करतां येत नाहीं. स्वतः मोहरहित झाल्याशिवाय, आपापल्या डबक्यांत राहणें सोडल्याशिवाय आर्य होतां येत नाहीं. आमच्या संस्कृतींत मानव्याचा महिमा आहे, डबक्यांचा महिमा नाहीं. फार तर सत् व असत् हीं दोन डबकीं आम्हीं मानलीं आहेत. हे दोन भेद आहेत. जगांत सदसतांचा लढा आहे. हिंदू-मुसलमानांचा नाहीं. हिंदु हा भारतीय संस्कृतीचा शब्द नाहीं. भारताबाहेरच्या लोकांनीं आम्हांस हिंदू करून एका डबक्यांत, एका खोलींत बसविलें आणि आम्हीहि त्या डबक्यांत आनंद मानूं लागलों !

जी घटना जें जें असत् आहे त्याच्याविरुद्ध लढावयास उठेल, ती भारतीय संस्कृतीची संघटना आहे. ती गीताप्रणीत आर्यजुष्ट संघटना आहे. अशी संघटना

आज या भारतवर्षांत राष्ट्रीय सभा निर्माण करीत आहे. भारतीय संस्कृतीचा आत्मा राष्ट्रीय सभा ओळखते. राष्ट्रीय सभा सर्व पददलितांसाठीं झुंजावयास तयार आहे.

## नाठाळाच्या काठी हाणूं माथां

जो जो नाठाळ असेल, त्याच्यावर तिचा प्रहार आहे. जिना, शौकतअली यांच्यावरहि तितक्याच तेजस्वितेनें त्यागमूर्ति जवाहरलाल कोरडे उडवितात, जितक्या प्रखरतेनें ते संकुचित डबकेवाल्या हिंदूंवर उडवतात. जे जे गरिबांची पायमल्ली करतील, भ्रामक व खोटे भेदाभेद आणि स्वार्थी क्षुद्र धर्म यांच्या बळावर जगांत हैदोस घालीत असतील, त्या सर्वांवर नरवर जवाहरलाल घसरतील. खऱ्या सज्जनाचे ते कैपक्षी आहेत. जें जें असत् आहे, त्याच्याशीं त्यांचा विरोध आहे. मग त्या असताच्या बाजूस माझे जातभाई असले तरीहि माझी गीता मला सांगते, " मामनुस्मर युद्धय च । " परमश्रेष्ठ सत्याचें स्मरण ठेवून घे झुंज, कर प्रहार.

याला आर्यधर्म म्हणतात. याला अनासक्त आर्यकर्म म्हणतात. हा गीतेचा संदेश. हा भारतीय संस्कृतीचा महान् विशेष. हेंच रामचरित्राचें रहस्य.

भारतांतील बलोपासना या ध्येयासाठीं सुरू होऊं दे. ती सुरू झाली आहे. आज हें ध्येय युगधर्म होत आहे. आज स्पेनमधील पददलितांची बाजू घ्यावयास आंतरराष्ट्रीय स्वयंसेवक शिरकमळें वहात आहेत. जगांत न्यायी व अन्यायी दोनच पक्ष राहणार. राम आणि रावण दोनच पक्ष. हिंदु-मुसलमान पक्ष ही फार जुनी गोष्ट आहे. जग झपाट्यानें पुढें जात आहे. खरें म्हटलें तर भारतीय संस्कृतीच्या उपासकांना हा युगधर्म आधीं कळला पाहिजे.

भारतीय संस्कृतीचीं महान् ध्येयें पूजणाऱ्या राष्ट्रीय सभे, तुझे अनंत उपकार! तुझी आज थट्टा होईल. जातीय मुसलमान तुला दगड मारतील. जातीय हिंदु तुला दगड मारतील. तुला हुतात्मत्व स्वीकारावें लागेल. भरडणाऱ्या जात्याच्या दोन तळी असतात, मोत्यासारखे टपोरे ज्वारीचे दाणे भरडणें हें त्या दोन्ही तळींचें काम असतें. सनातनी हिंदू व सनातनी मुसलमान, जातीय हिंदू व जातीय मुसलमान दोहोंकडून तुला भरडतील. परंतु भरडलेली तूं त्यांच्याच उपयोगी येशील. तें ज्वारीचें पीठ भरडणाऱ्यालाच पुष्टि देईल!

हे दिव्य स्तव्य राष्ट्रीय सभे! तूं जी थोर बलोपासना शिकवीत आहेस, ती एकदम फोंफावणार नाहीं. या जातीय कर्दमांत जें बीं तूं पेरूं पहात आहेस, तें



तुडवलें जाईल. परंतु तें बीं मरणार नाहीं. बर्फाच्या ढिगाऱ्याखालीं ओकवृक्षाचीं बीजें असतात. तीं मरत नाहींत. प्रचंड ओकवृक्ष त्यांतून निर्माण होतात. त्याप्रमाणें तूं पेरलेले दाणे एक दिवस वर येतील. ते फोंफावतील, वाढतील आणि या भारताला खरी शांति मिळेल! भारताच्या द्वारां जगालाहि ती मिळेल!

माझ्या डोळ्यांना तो देखावा दिसत आहे. " जगांतील पिळले जाणाऱ्यांनो, एक व्हा " अशी घोषणा आज होत आहे. जागतिक संघटनेचे हे मंगल वारे वाहत आहेत. हे वारे भारतीय संस्कृतीचेच आहेत. भारतांत या वाऱ्यांचें स्वागत होईल. या वाऱ्यांना भारत माहेरघर वाटेल. कारण डबकीं करून न राहतां मानवजात ओळखा अशी शिकवण येथील थोर पूर्वजांनीं दिलेली आहे. क्रांतिकारकांचा मुकुटमणि लेनिन मला परका नाहीं वाटत. माझा भगवान् श्रीकृष्णच मोरमुकुटपीतांबर सोडून हॅट, बूट-सूट घालून माझ्यासमोर उभा आहे, असें मला वाटतें. तो गोकुळांतील लोणी चोरून गरिबांना वांटणारा श्रीकृष्णच मला लेनिनमध्यें दिसतो. अन्यायाच्या बाजूला उभे असलेले सगेसोयरे एका रक्ताचे व एका जातीचे असले, तरी त्यांच्याशीं लढ, असें सांगणारा श्रीकृष्णच मला लेनिनमध्यें दिसतो. त्या वेळच्या त्रैगुण्यविषयक वेदांविरुद्ध बंड करणारा, " स्त्रियो वैश्यास्तथा शूद्राः तेऽपि यांति परां गतिम् " असें म्हणून मोक्षाचीं दारें खाडखाड सर्वांना उघडणारा, स्वर्गांत अप्सरा व अमृताचे पेले मिळतील अशा लाळघोट्या व जिभलीचाट्या पुष्पिताबाणीच्या वेदवादरतांची टर उडविणारा, " स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः " असें सांगून श्रमाचा सार्वभौम धर्म स्थापून यज्ञयागादिकांचा धर्म दूर करणारा, " यथेच्छसि तथा कुरु " असें सांगून पुन्हां बुद्धिस्वातंत्र्य देणारा, असा हा जो महान् क्रांतिकारक श्रीकृष्ण तो मला लेनिनमध्यें दिसतो.

श्रीकृष्णाचीं तींच थोर ध्येयें, भारतीय संतांचीं तींच मानव्याला ओळखणारीं ध्येयें, आज जगांत व या भारतांत पुन्हां दिसूं लागलीं जात आहेत. हृदय विशाल व शुद्ध होत आहे. बुद्धीचा दिवा पेटवला जात आहे. गायत्रीमंत्राची उपासना पुनश्च नव्यानें सुरू होत आहे. आणि या ध्येयासाठीं मध्यंतरीं लुप्त झालेलीं परंतु आज पुन्हां प्रकट होणारीं जीं हीं अभिजात भारतीय ध्येयें त्यासाठीं श्रमावयास, झिजावयास व मरावयास नवसंघटना होत आहे. नव-बलोपासना होत आहे. धन्य, त्रिवार धन्य आहे हें दृश्य! जो जो भारतीय

संस्कृतीचा खरा अभिमानी असेल, अनासक्त आर्यजुष्ट असा कर्मधर्म शिकविणाऱ्या गोपाळकृष्णाचा भक्त असेल, तो तो या राष्ट्रीय सभेच्या बलसंघटनेंत शिरल्याशिवाय राहणार नाहीं !

## ध्येयांची पराकाष्ठा : : १८

भारतीय संस्कृतींत एकेका सद्गुणासाठीं, एकेका ध्येयासाठीं, सर्वस्वाचें समर्पण करणाऱ्या महान् विभूती आपणांस दिसतात. भारतीय संस्कृति म्हणजे या विभूतींचा इतिहास. 'थोर पुरुषांचीं चरित्रें म्हणजे इतिहास' असें एक वचन आहे. भारतीय संस्कृतीचा इतिहास म्हणजे भारतीय संतांचा इतिहास, भारतीय वीरांचा इतिहास.

सत्यासाठीं रामचंद्र वनांत गेला. पित्याचा शब्द खोटा पडूं नये, यासाठीं तो बारा वर्षें रानावनांत रहावयास आनंदानें सिद्ध झाला. आणि बारा वर्षांनंतर पुन्हां जेव्हां आयोध्येचें राज्यपद त्याला मिळालें, त्या वेळचें त्याचें वर्तन किती उदात्त ! भगवती सीतादेवीच्या पावित्र्याविषयीं प्रजेच्या मनांत शंका आहे, असें कळतांच तो थोर प्रभु गर्भवती सीतेचा त्याग करतो. प्रजेच्यासमोर धुतल्या तांदळासारखी दानत हवी. इवलीहि संशयाला जागा देतां कामा नये. एकादा वात्रट मनुष्य कांहीं तरी बोलला, त्याचा रामानें एवढा बाऊ करावयाला नको होता असें आपण म्हणूं. परंतु रामासमोर भिन्न आदर्श होता. राम सर्व प्रजेचें पुंजीभूत पावित्र्याचें प्रतीक होता. प्रजेला पवित्र ठेवूं पाहणारा राजा स्वतः संशयातीत हवा. प्रजेचें पापपुण्य राम स्वतःच्या शिरावर घेत होता. अल्पायुषी ब्राह्मणकुमार मेला याचा दोषहि तो स्वतःकडे घेत होता. कांहीं तरी आपलें चुकलें असें त्याला वाटे.

भारतीय संस्कृतींत त्याग व पावित्र्य या दोन गुणांना अत्यंत मोठें स्थान आहे. भारतीय मनुष्य केवळ पैशाला, केवळ सत्तेला मान देत नाहीं. त्या गुणाबरोबर त्याग व पावित्र्य हवें. दरिद्री शुक्राचार्याला भारतीय जनता देवाप्रमाणें मानील. भारतीय जनतेनें राजांच्या पालख्या कधीं उचलल्या नाहींत. परंतु संतांच्या पालख्या दरवर्षीं लाखों लोक घेऊन जातात. जनक केवळ राजा होता म्हणून नाहीं, तर ज्ञानी असून विरक्त होता म्हणून तो प्रातःस्मरणीय. त्यागा-



शिवाय ज्ञान नाहीं. आसक्ताला ज्ञान कोठून असणार ? ज्ञान म्हणजे अद्वैतज्ञान. ज्ञान म्हणजे अद्वैताची अनुभूति. ही अद्वैताची अनुभूति जसजशी अधिकाधिक जीवनांत येते तसतसा अधिकाधिक त्याग होऊं लागतो. म्हणून त्याग हें अद्वैताचें लक्षण भारतीय संस्कृति मानते.

अशा त्यागाबरोबर पावित्र्यहि येतेंच. जो त्याग अद्वैताच्या अनुभूतींतून होतो, तो पावित्र्य बरोबर आणल्याशिवाय रहात नाहीं. भारतांत स्त्री-पुरुषविषयक संबंध कसे आहेत, इकडे सर्वांचे डोळे असतात. हें काम-पावित्र्य आधीं पाहिलें जातें. तुमच्याजवळ इतर शेंकडों गुण असून हा काम-पावित्र्याचा महनीय गुण नसेल, तर जनता तुम्हांला मानणार नाहीं. जनतेच्या हृदयाचे स्वामी तुम्ही होणार नाहीं.

लोकमान्य, महात्माजी, यांच्याविषयींच्या अलोट भक्तीचें कारण त्यांच्या निष्कलंक चारित्र्यांत, अपरंपार त्यागांत आहे. भारतीय जनता हें काम-पावित्र्याचें थर्मामिटर सर्वांस लावून बघते. त्यागाचें थर्मामीटर सर्वांस लावून बघते. या दोन्ही कसोटींत जो उतरला, त्याचें वेड तिला लागतें. त्या महापुरुषाला डोक्यावर घेऊन ती नाचेल.

लोकांच्या मनांवर हे दोन गुण ठसण्यासाठीं या भारतवर्षांत अपरंपार त्याग ओतलेला आहे. पावित्र्याची शंका येतांच राम सीतेचा त्याग करतो. आपल्या पावित्र्याचा भंग होईल या भीतीनें रजपूत रमणी जीवनाच्या होळ्या पेटवीत. पतिमरणानंतर आपल्याला तनमनानें पवित्र राहतां येईल कीं नाहीं या शंकेनें स्त्रिया पतीबरोबर हंसत हंसत चितेवर चढत व ज्वाळांना मिठी मारीत ! ती ज्वाळांना मिठी नसून पावित्र्याला मिठी होती ! सूरदासांचे कमळासारखे कमनीय व रमणीय डोळे पाहून एका स्त्रीच्या मनांत कामवासना उत्पन्न झाली. हें सूरदासांना कळतांच त्यांनीं आपले डोळे काढून काढले ! त्या प्रेमविव्हळ रमणीनें विचारिलें, "देवानें दिलेले डोळे असे कां काढले ?" सूरदास म्हणाले, "या सुंदर डोळ्यांमुळें सुंदरतम परमेश्वराचें स्मरण तुम्हांला झालें असतें, तर या डोळ्यांना मीं धन्यवाद दिले असते. हे सुंदर डोळे देणारा देव किती बरें सुंदर असेल, असा विचार तुमच्या मनांत येता तर किती गोड झालें असतें ! माझे डोळे कृतार्थ झाले असते. परंतु माझ्या या गोड डोळ्यांनीं तुमच्या हृदयांत आगडोंब पेटवला, क्षुद्र कामभोगाची लालसा उत्पन्न केली. या डोळ्यांनीं तुम्हांला

चिखलांत ओढलें. जे विषारी डोळे लोकांचा असा अधःपात करतात ते कशाला ठेवूं? त्यांना दूर करणें हेंच योग्य होतें."

राम राजा होता. त्याचें उदाहरण जनता डोळ्यांसमोर ठेवणार. 'यथा राजा तथा प्रजा' ही म्हणच आहे. म्हणूनच राजांवर अपार जबाबदारी आहे. भारतवर्षांतील पुढाऱ्यांनीं हें रामाचें उदाहरण कधीं विसरतां कामा नये. रामानें ध्येयाची पराकाष्ठा गांठली. पावित्र्यासाठीं, लोकांची पावित्र्यावरची श्रद्धा अविचल रहावी म्हणून असा त्याग जेव्हां जनता पाहील, तेव्हांच त्या पावित्र्याची महती थोडी थोडी बहुजनसमाजाला कळेल; एरव्हीं नाहीं.

रामाची हिमालयाच्या धवल शिखरासारखी ही उदात्तता जशी दिसते, तितकीच सीतेची सहनशीलता दिसते. पतीला बोल लागलेला तिला कसा खपेल? स्वतःची निंदा झाली ह्या दुःखापेक्षां रामाच्या चारित्र्याची निंदा तिला अधिक झोंबली असेल! आणि राम-सीता निरनिराळीं थोडींच होतीं? तीं एकरूपच होतीं! सीता कोठेंहि गेली तरी तिच्या जीवनांत रामच ओतप्रोत भरलेला होता, आणि सीता कोठेंहि असली तरी ती रामाच्या जीवनांत मिसळलेली होती.

सीता दुबळी स्त्री नव्हती. पावित्र्याचें सामर्थ्य तिच्याजवळ होतें. पतिप्रेमाचें कवच ती ल्यायली होती. पतीची इच्छा तीच तिची इच्छा. स्वतःला स्वतंत्र इच्छाच तिनें ठेवली नाहीं. ती प्रेमांत मिळून गेली होती. सीता केव्हांच मरून गेली होती, रामरूप झाली होती. रामानें सीतेला नाहीं वनांत टाकलें. स्वतःचेंच अर्धें अंग जणुं कापून त्यानें फेंकून दिलें होतें! प्रेम म्हणजे प्रिय वस्तूंत बुडून जाणें. प्रेम म्हणजे "आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां." सीतेचें प्रेम पराकोटीला पोंचलें होतें. प्रेमाची परम सीमा ती होती. म्हणून सीता भारतीय स्त्रियांचा महान् धर्म झाला आहे. स्त्रियांचा धर्म म्हणजे सीता. बायकांच्या शेंकडों ओंव्यांत सीतेचा हा महिमा आहे.

**सीता वनवासी। दगडाची केली बाज**
**घोर अरण्यांत। अंकुशवाळा नीज**

दगडाची बाज करून सीता अरण्यांत राहिली आहे! दगडावर बाळाला जवळ घेऊन निजली आहे. किती करुणगंभीर आहे ही ओंवी!

आणि भरताचें तें बंधुप्रेम! माझा राम वनांत जातो आणि मी का गादीवर बसूं? राम कंदमुळें खाणार आणि मी का लाडू-जिलबी खाऊं? भरतहि नंदिग्रामीं



बारा वर्षें रामाचें स्मरण करीत राहिला. त्यानेंहि वल्कलें धारण केलीं. त्यानेंहि जटा धारण केल्या. तोहि कंदमुळांवर राहिला.

लक्ष्मण तर प्रत्यक्ष रामाबरोबर वनांत गेला. भरत रामाचें चिंतन करून जगला. परंतु लक्ष्मण रामाच्या दर्शनानेंच जगला असता. तुळशीदासांच्या रामायणांत हा प्रसंग फारच सुंदर रंगविलेला आहे. लक्ष्मण म्हणतो, "रामा! पाण्याशिवाय मासा कसा राहील? आईशिवाय बाळ कसें राहील? तसा तुझ्याशिवाय मी कसा राहूं?"

"रामा! काठीवर ध्वज फडकत असतो. तुझ्या यशोध्वजासाठीं या लक्ष्मणाची काठी होऊं दे. तुझ्यासाठीं लक्ष्मण आहे. तुझ्याशिवाय लक्ष्मणाला अर्थ नाहीं."

भारतीय संस्कृति राम-लक्ष्मण, भरत-सीता यांनीं बनविली आहे. भारतीयांच्या रक्तारक्तांत त्यांचीं चरित्रें गेलीं आहेत. हे महान् आदर्श अमर असे भारतीयांच्या डोळ्यांसमोर लिहिलेले आहेत.

भिन्न भिन्न आदर्शांचा तोटा नाहीं. ब्रह्मचर्याच्या ध्येयाचे भारतीय उपासक पहा. हनुमान पहा. लंकेचें शोधन करीत असतां स्त्रीनिवासाकडे तो वळत नाहीं. फक्त एका खोलींत रामनामाचा जप त्याला ऐकूं आला म्हणून तेथें तो डोकावला. तेथें त्रिजटा होती. तसेच ते अलोट इच्छाशक्तीचे इच्छामरणी भीष्म! आणि पूर्ण वैराग्यानें रंगलेले शुक!

भारतीय साहित्यांत कांहीं प्रसंग असे आहेत, कीं त्यांना जगाच्या वाङ्मयांत तोड नाहीं. शुकपरीक्षेचा प्रसंग असाच आहे. वसंत ऋतु आपलें सारें उन्मादक वैभव तेथें पसरतो. कोकिळा प्रेमोत्कट कुऊ करते. पांखरें प्रेमानें परस्परांस खाजवीत आहेत. फुलांचा घमघमाट सुटला आहे. प्रसन्न वारा वहात आहे. नवपल्लव कोंवळे कोंवळे फुटले आहेत. सारें वातावरण जसें मादावलेलें आहे. आणि ती शुभांगी रंभा शेंकडों विलासी हावभाव करीत उभी आहे. वारा तिचा पदर ओढीत आहे. साऱ्या सृष्टींतील मोहक सुंदरता आसमंतात् ओतलेली आहे. ती रंभा त्या शुकाच्या गळ्याला मिठी मारते. परंतु त्याचा रोमहि वांकडा होत नाहीं!

धन्य तो शुक! धन्य ही भारतभूमि! धन्य त्या शुकाला रंगविणारी कवीची प्रतिभा!

वैराग्यमूर्ति शुकाबरोबर निश्चयमूर्ति ध्रुव डोळ्यांसमोर येतो. बापानें मांडी-

वरून ढकललें हा अपमान त्याला सहन होत नाहीं. जेथून कोणी ढकलणार नाहीं असें अटळ पद घेण्यासाठीं तो तेजस्वी बाळ घराबाहेर पडतो. बापाला लाज वाटून तो त्या मुलाच्या मागें लागतो.

"फीर बाळा देईन दोन गांव। ध्रुव बोले देईल देवराव"

बाप सारें राज्य देऊं करतो, तरी दृढव्रत ध्रुव माघारां वळत नाहीं. आज भारतवर्षीयांस या ध्रुवाची आठवण नाहीं. ती आठवण असती तर फेंकलेल्या तुकड्याकडे आशाळभूतपणानें पहात ते बसले नसते. "आमचें ध्येय आम्ही गांठूं. हे मधले मोह नकोत" असें ध्रुवाच्या वारसदारांनीं म्हटलें पाहिजे.

तसाच तो बालभक्त प्रल्हाद. नाहीं म्हणजे नाहीं. पर्वतावरून लोटा, आगींत लोटा, सुळावर चढवा वा फांसावर चढवा, नारायणाचें स्मरण केल्याशिवाय मी राहणार नाहीं. असा हा ध्येयवादी प्रल्हाद भारतास सदैव स्फूर्ति देईल. वन्दे मातरम्, स्वराज्य, इन्क्लिाब जिन्दाबाद, मी म्हणणार! साम्राज्यशाही नष्ट होवो, भांडवलशाही नष्ट होवो, मी म्हणणार! मग या देहाचें कांहींहि करा. माझें ध्येय माझ्या जीवनांतून प्रकट होणार! ओंठांत तेंच, पोटांत तेंच. हातांत तेंच, डोळ्यांत तेंच. नारायणाचें स्मरण म्हणजे सर्व मानवजातीचें स्मरण! सर्व नरांचें जेथें अयन होतें, तें नारायणाचें स्वरूप. सर्व मानवजातीस सुखी करूं पाहणें म्हणजेच नारायणाचा झेंडा फडकवणें!

आणि सत्यमूर्ति सत्त्वसागर राजा हरिश्चंद्र? स्वप्नांतील शब्द खरा करण्यासाठीं केवढा त्याग! किती कष्ट! स्वप्नांतहि असत्याचा स्पर्श नको. तारामती, रोहिदास, हरिश्चंद्र! त्रिभुवन मोलाचीं तीन नांवें. पाणपोयीवरचें फुकाचें पाणी बाळ रोहिदास पीत नाहीं! आणि आज भारत देशांत श्रीमंतांचीं मुलेंहि शाळांतून नादारीसाठीं अर्ज करतात! श्रीमंत लोक मोफत दवाखान्यांतून दवा नेतात! स्वाभिमान! भारतवर्षांत सत्त्वाची व स्वाभिमानाची पूजा केली जात असे. लाचारपणाची लाज वाटत असे.

डोंबाकडे नोकरी करतांना कसे हृदयद्रावक प्रसंग! स्वतःच्या मुलाला अग्नि देतां येत नाहीं, स्वतःच्या पत्नीवर घाव घालण्याची पाळी! कशीं तीं फुलाप्रमाणें कोमल परंतु वज्राप्रमाणें कठोर मनें!

ध्येयापासून अल्पशा झालेल्या च्युतीचेंहि प्रायश्चित्त भोगावें लागतें. ध्येय म्हणजे ध्येय. कापराच्या राशीला एक काडी लागली तरी सर्व भस्म होणार!



'नरो वा कुंजरो वा' असें म्हणतांच धर्मराजाचा पृथ्वीपासून चार अंगुळें वर चालणारा रथ इतरांच्या रथांप्रमाणें पृथ्वीवरून चालूं लागला! पवित्रतम नळराजाच्या पायाचें एक बोट नीट धुतलें गेलें नाहीं, तें जरा मलिन राहिलें, तेवढ्या त्या तिळाएवढ्या जागेंतून कलि नळराजाच्या जीवनांत शिरला.

या प्रसंगांतून महान् सत्य सांगितलें आहे. पाप असें हळूच न नकळत शिरत असतें. एकच प्याला! हा एकच प्याला फेंकून दिला पाहिजे. पहिलें चुकीचें पाऊल, तेंच पडूं न देण्याची दक्षता व सावधानता घेतली पाहिजे. रवींद्रनाथांच्या गीतांजलींत एक सुंदर गीत आहे :

"तो म्हणाला, मला एका कोपऱ्यांत जागा द्या. मी गडबड करणार नाहीं. परंतु रात्रीच्या वेळेस त्यानें बंड केलें व तो माझ्या हृदयावर येऊन बसला. हृदयसिंहासनावरची मूर्ति ढकलून त्यानें आपलें राज्य स्थापलें."

या गीतांत हाच भाव आहे. सैतानाचें आगमन असें फसवीत असतें. रोगाचा जंतु हळूच शिरतो व सर्व देह व्यापून टाकतो. परकी सत्ता हळूच येते व सर्वत्र पसरते. म्हणून प्रारंभींच दक्ष रहा.

महारथी कर्ण व थोर राजा बळी यांनीं दातृत्वाची कमाल केली. स्वतःला मरण येईल असें नक्की माहीत असतांहि कर्ण आपल्या अंगचीं कवचकुंडलें कापून काढून देतो. तोंडांतून नकार येण्यापेक्षां मरण पत्करलें, अशी त्याची वृत्ति आहे. तो स्वतःच्या पित्याला–सूर्याला म्हणाला, "मी मूर्ख नाहीं. मी व्यवहारी आहें. थोड्या किमतींत पुष्कळ मिळवितो, त्याला जग व्यवहारी म्हणतें. मी हें मर्त्य शरीर देऊन अमर कीर्ति मिळवींत आहें. ही माती देऊन जगाच्या अंतापर्यंत टिकणारें यश मिळवींत आहें. कसा सुंदर व छान सौदा केला!"

आणि तसाच तो बळी. वामनाला पाऊल ठेवावयास जागा नाहीं, तर स्वतःचा माथा तो पुढें करतो. बळीची फजिती झाली म्हणून मत्सरी देव नगारे वाजवतात, दुंदुभी वाजतात; परंतु धीरोदात्त बळी म्हणतो :

"न भीं सुरांच्या जयवाद्यनादा
भीतों जसा मी अपकीर्ति-वादा"

माझ्या यशाची मला चाड आहे. या देवांच्या गोंगाटाची मला पर्वा नाहीं. चारुदत्तानें मृच्छकटिकांत असेच उद्‌गार काढले आहेत :

" विशुद्धस्य हि मे मृत्युः
पुत्रजन्मसमः किल ॥ "

भारतीय संस्कृतीचा हा आवाज आहे.

आश्रय मागणाऱ्या कपोताचें संरक्षण शिबी राजा मांडीचें मांस कापून देऊन करतो. मयूरध्वज अतिथीला अर्धे अंग कापून देतो, आणि डाव्या डोळ्यांतून पाणी आलें म्हणून अतिथि निघून जाऊं लागतांच मयूरध्वज म्हणतो, " हें शरीर करवतून यावें लागत आहे म्हणून हें पाणी नाहीं. उजवें अंग सार्थकीं लागलें, आपलें तेवढें भाग्य नाहीं, म्हणून या डाव्या आंगचा डावा डोळा भरून आला आहे ! "

अतिथीला एकुलता एक पुत्र शिजवून वाढणारी चांगुणा आपल्या मुलाचें मस्तक ओंव्या म्हणत कांडतें ! केवढें धैर्य, किती त्याग, कशी ध्येयोत्कटता ! आणि शेवटीं अतिथि राजाला जेवावयास बोलावितो. राजा श्रियाळ कचरतो, त्या वेळेस ती थोर सती पतीला धीर देते व म्हणते :

" नवमास वाहिला म्यां उदरांत । तुम्हां जड नव्हे चौ प्रहरांत "
" आपल्या बाळाला मीं नऊ महिने पोटांत ठेवलें. तुम्हांला चार प्रहर ठेववत नाहीं का ? "

जो युद्धाला बाहेर पडणार नाहीं, त्याला तापलेल्या तेलांत टाकण्यांत येईल, अशी हंसध्वज राजा दवंडी पिटवितो. परंतु त्याचा प्रिय पुत्र सुधन्वा पत्नीप्रेमानें घरीं राहतो. त्याला यावयास उशीर होतो. परंतु न्यायी हंसध्वज मागेंपुढें पहात नाहीं. जी शिक्षा मीं इतरांस केली असती, ती माझ्या मुलास नको का ? सुधन्वा तप्त तेलांत टाकला जातो !

सावित्री पतीसाठीं मरणापाठोपाठ जावयास तयार होते ! घोर अरण्य ! रात्रीची वेळ ! समोर मृत्युदेव ! परंतु ती सती भीत नाहीं. ती मृत्यूचेंहि मन वळवतें.

आणि ती गांधारी ! पतीला दृष्टिसुख नाहीं, मग मी तें कसें भोगूं ? ती आपले डोळे जन्मभर बांधून ठेवते ! ह्या त्यागाची कल्पनाच करवत नाहीं. समान हक्कासाठीं भांडणाऱ्या भारतीय नारींनो ! हा पहा सती गांधारीचा समान हक्क ! गांधारीसमोर भगवान् श्रीकृष्ण थरथरत उभा रहात असे. भारतीय पतिव्रतांनो ! तुम्हांस अनंत प्रणिपात !

विश्वावर प्रेम करणारे भगवान् बुद्ध उपाशी वृद्ध वाघिणीच्या तोंडांत आपली मांडी देतात ! संत नामदेव कोरडी पोळी कुत्रा कसा खाईल, म्हणून त्याच्या पाठोपाठ तूप घेऊन धांवतात ! झाड तोडणाऱ्या समोर तुळशीदास जाऊन उभे राहतात, आणि म्हणतात, " माझ्या मानेवर घाव घाल. त्या सुंदर झाडावर नको. " कबिराच्या आज्ञेवरून रानांतून गवत कापून आणण्यासाठीं गेलेला कुमार कमाल तें प्रभातकाळच्या मंद वाऱ्यानें डुलणारें गवत पाहून विरघळतो. " नको रे कापूं, नको रे कापूं " असें जणुं तें म्हणत आहे असें त्याला वाटतें. त्याच्या हातांतील विळा गळून पडतो. डोळ्यांतून प्रेमाश्रू गळतात. तसाच तो माघारा येतो. कबीर कमालच्या चरणीं लागतो.



जगन्नाथपुरीजवळचा निळा निळा सागर पाहून हा माझा मेघश्याम कृष्णच पसरला आहे असें मनांत येऊन, त्या समुद्रांत बाहू उभारून नाचत नाचत फिरूं पाहणारे थोर बंगाली वैष्णव वीर चैतन्य ! विषाचा पेला पिणारी, कृष्णसर्पाला शालिग्राम मानणारी, भक्तिप्रेमानें नाचणारी मीरा ! स्वामिकार्यार्थ स्वतःच्या पुत्राचें बलिदान करणारी पन्ना !

दिवसाच्या चोवीस तासांऐवजीं पंचवीस असते तर प्रजेचें कल्याण आणखी करतां आलें असतें, असें म्हणणारा विश्वभूषण राजा अशोक !

प्रत्येक पांच वर्षांनीं सर्व खजिना वांटून देऊन केवळ अकिंचनत्वानें शोभणारा राजा हर्ष !

रानांत कंदमुळांवर जगणारा व गवतावर झोंपणारा स्वातंत्र्यसूर्य राणा संग !

प्रजेनें लावलेल्या झाडासहि हात लावूं नका असें आज्ञापत्र काढणारे व परस्त्री मातेप्रमाणें मानणारे थोर शिवछत्रपति !

धन्याच्या फळबागेंतील एक फळ हातून तोडलें गेलें म्हणून स्वतःचा हात छाटूं पाहणारे दादोजी कोंडदेव !

" मीं पांच तोफा ऐकल्या; आतां सुखानें मरतों " असें म्हणणारे बाजी !

" आधीं कोंडाण्याचें लग्न, मग रायबाचें ! " असें म्हणणारा महात्मा वीरमणि तानाजी !

धर्मासाठीं राईराईएवढे तुकडे करून घेणारा शौर्यमूर्ति संभाजी !

स्वामिकार्यासाठीं सर्वस्व वेंचणारे खंडो बल्लाळ !

" बचेंगे तो और लडेंगे " असें म्हणणारा शूर दत्ताजी !

" तोंडांतील कफ शौचाच्या द्वारां पडेल असें करा, म्हणजे माझें तोंड रामनाम

घ्यावयास मोकळें राहील !" अशी वैद्यांना विनवणी करणारे पुण्यमूर्ति पेशवे पहिले माधवराव !

"तुम्हांला देहान्त प्रायश्चित्तच पाहिजे" असें राघोबाला सांगणारे थोर रामशास्त्री !

प्रजेला त्रास देणाऱ्या स्वतःच्या पुत्राचाहि त्याग करणारी देवी अहल्याबाई !

"माझ्या देहाला मरतांना परस्पर्श होऊं देऊं नका" असें सांगणारी रणरागिणी राणी लक्ष्मी !

"मीं योग्य तेंच केलें. खुशाल फांशीं द्या" असें सांगणारा तात्या टोपे !

अशी ही भारतीय परंपरा आहे. अशी ही ध्येयपूजा आहे. भारताच्या प्रांता-प्रांतांत अशी ध्येयपूजक नरनारीरत्नें सतत निघालीं आहेत.

भारतवर्ष आजहि कांहीं वांझ नाहीं. या पारतंत्र्याच्या सर्वभक्षक काळांतहि भारतानें सदैव हृदयाशीं धरावीं अशीं ध्येयनिष्ठ माणसें येथें झालीं आहेत.

"मला फांशीं दिलें तरी चालेल, परंतु बंडवाल्या फडक्याचें वकीलपत्र मी घेणार" असें म्हणणारे स्वदेशीचे आचार्य सार्वजनिक काका ! पुत्र लेगानें आजारी असतांहि शांतपणें 'केसरी' लिहिणारे लोकमान्य ! आज दोन तपें केवळ ध्यानांत रमणारे अरविंद ! "सरकारी धोरणाप्रमाणें पत्र चालवा, म्हणजे तुम्हांला मदत देऊं" असें बंगालचा गव्हर्नर सांगत असतां "देशांत एक तरी प्रामाणिक संपादक नको का ?" असें म्हणून निघून जाणारे 'अमृतबझार-पत्रिके'चे आद्य संपादक बाबू शिशिरकुमार घोष ! नागपूरच्या १९२० मधील राष्ट्रीय सभेंत असहकारितेचा ठराव मांडीत असतां "अहो, तुम्ही अजून बॅरिस्टरी चालवीतच आहांत !" असें श्रोत्यांतून कोणी म्हणतांच "चित्तरंजन जें बोलतो तें करतो" असे गर्जणारे व दुसऱ्याच दिवशीं सर्वस्वत्याग करणारे देशबंधु ! एके दिवशीं मनांत विषयवासना आली म्हणून स्वतःवर संतापून तापलेल्या तव्यावर जाऊन बसणारे स्वामी विवेकानंद ! आईनें बोलावलें, परंतु साहेब जाऊं देत नाहीं, असें पाहतांच राजीनामा देणारे व वाटेंत प्रचंड पूर आला असतांहि नदींत आईच्या नांवानें उडी टाकणारे ईश्वरचंद्र विद्यासागर ! माझ्या पत्नीकडे गेलीं वीस वर्षें मी माता म्हणूनच पहात आहें, असें सीलोनमध्यें सांगणारे महात्माजी ! "चलाव तेरी गोली" असें म्हणून गुरखा शिपायासमोर आपली विशाल छाती उघडी करणारे स्वामी श्रद्धानंद ! "गांधी टोपी काढ, नाहीं तर गोळी झाडतों," असें पिस्तूल



रोखून सांगितलें जात असतांहि अविचल उभे राहणारे सोलापूरचे वीर तुळशीदास जाधव ! मोटारीखालीं चिरडून घेणारा हुतात्मा बाबू गेनू ! गीतेचें स्मरण होतांच, रामनाम मनांत येतांच, तनु पुलकित होऊन ज्यांच्या डोळ्यांतून घळघळ अश्रुधारा वाहूं लागतात असे ते वर्ध्याचे ज्ञान-कर्म-भक्तीची मूर्ति पूज्य विनोबाजी ! "जगांतील कोणती शक्ति माझ्या मोटारीवरचा झेंडा काढते बघूं दे" असें गर्जणारे निर्भयमूर्ति ध्येयरत जवाहरलाल !

किती ज्ञात-अज्ञात नांवें ! भारतीय संस्कृति मेली नाहीं. स्वातंत्र्य व पारतंत्र्य या लाटा आहेत ! कधीं जय वा कधीं पराजय ! परंतु राष्ट्राचें चारित्र्य मरतां कामा नये. पूर्वजांनीं जें चारित्र्यधन मिळविलें तें गमावतां कामा नये. तें चारित्र्य वाढवलें पाहिजे. तें चारित्र्य जोंपर्यंत वाढत आहे, तोंपर्यंत भारतवर्ष जिवंत आहे. तें चारित्र्य जोंपर्यंत जिवंत आहे, प्रकट होत आहे, तोंपर्यंत भारतीय संस्कृति जिवंत आहे.

## अवतार-कल्पना : : १९

अपौरुषेयवाद व अवतारवाद या दोन गोष्टींनीं भारतीयांचा अधःपात झाला असें समजण्यांत येतें. अपौरुषेयवाद आतां कोणी मानीत नाहीं. वेद माणसांनीं न लिहितां ते आकाशांतून पडले, असें आज विसाव्या शतकांत तरी कोणी मानणार नाहीं. वेदांमध्यें अनेक स्तोत्रें "हें मी आज नवीन स्तोत्र रचीत आहें" असे उद्गार काढतांना आढळतात. वेद याचा अर्थ विचार, ज्ञान, अनुभवसंपदा एवढाच आतां घ्यावयाचा. वेदांवर उभारलेला धर्म म्हणजे ज्ञानावर, अनुभवांवर उभारलेला धर्म. जसजसें ज्ञान वाढत जाईल, अनुभव नवीन येत जाईल, तसतसें सनातन धर्माचें स्वरूपहि नवनवीन होत जाईल. सनातन धर्म म्हणजे वाढता धर्म.

परंतु अवतारवादानें नुकसान कां व्हावें, हें समजत नाहीं. अवतारवादांतील मूलभूत कल्पना त्रिकालाबाधित आहे. अवतारवाद म्हणजे दुर्बलतावाद नव्हे. अवतारवाद म्हणजे प्रयत्नांचा अभाव नव्हे. अवतारवाद म्हणजे अपरंपार प्रयत्नवाद. अवतारवाद म्हणजे अविरत कर्म, अखंड उद्योग.

आपण स्वस्थ बसून अवतार होत नसतो. घुसळल्याशिवाय नवनीत हातांत

येत नाहीं. धडपडीशिवाय फळ नाहीं. कष्टाशिवाय कार्य नाहीं. त्याप्रमाणें प्रयत्नाशिवाय अवतार नाहीं. प्रयत्नांच्या पराकाष्ठेला अवतार हें फळ लागत असतें.

आपल्या मनांतील आशा-आकांक्षा ज्याच्या ठायीं अवतरलेल्या आपणांस दिसतात, तो अवतार होय. आपल्या मनांतील ध्येयें, आपल्या भावना, आपलीं सुखदुःखें, आपलीं मनोगतें ज्याच्या ठायीं मूर्तिमंत्र दिसतात तो अवतार होय.

अवतार आधीं नाहीं. आधीं आपण आणि नंतर अवतार. आपण सारे धडपड करीत असतों. लहानमोठे प्रयत्न करीत असतों. जो तो आपल्या परीनें समाजांत सुखस्वास्थ्य निर्माण करण्यासाठीं प्राणपर कष्ट करीत असतो. परंतु आपल्या सर्वांच्या प्रयत्नांत एकसूत्रता नसते, एकवाक्यता नसते. आपण कोठें तरी धांवत असतों, कोठेंतरी घाव घालीत असतों. आपणांस नवीन सृष्टि निर्मावयाची आहे याची सर्वांना जाणीव असते. सर्वांना उत्कटता असते, तळमळ असते. परंतु हे सारे प्रयत्न अलग अलग होत असतात.

मनांत कांहीं तरी कल्पना असते. परंतु ती कल्पना स्पष्ट नसते. ध्येय अस्पष्ट असें डोळ्यांसमोर असतें. हें अस्पष्ट ध्येय स्पष्ट करण्यासाठीं अवतार लागत असतो; तो येतोच. ती सामाजिक जरुरीच असते. अवतार अकस्मात् होत नाहीं. धूमकेतूसारखा तो कोठून तरी येतो असें नाहीं. लाखों लोकांच्या अस्पष्ट प्रयत्नांतून स्पष्ट ध्येय देणारा अवतार सृष्टीच्या नियमानुसारच उत्पन्न होत असतो.

भिरीभिरी फिरणारे अणू ज्याप्रमानें स्थिर होतात, त्याप्रमाणें भिरीभिरी फिरणारे सामान्य जीव ध्येयाची स्पष्ट दिशा दाखवणाऱ्यांभोंवतीं स्थिर होतात. लोखंडाचे अणू ज्याप्रमाणें चुम्बकाभोंवतीं येतात, ग्रह ज्याप्रमाणें सूर्याभोंवतीं फिरूं लागतात, त्याप्रमाणें धडपडणारे जीव धडपडीचें गन्तव्य दाखविणाऱ्या महापुरुषाभोंवतीं फिरूं लागतात.

श्रीरामचंद्राचा जन्म होण्यापूर्वींच वानर धडपडत होते. त्या वानरांच्या धडपडींत रामाचा जन्म होता. गोकुळांतील गोपाळांच्या धडपडींत श्रीकृष्णाचा जन्म होता. गोपाळांच्या हातांत काठ्या होत्या, परंतु त्या काठ्यांना एका ध्येयावर केंद्रित करण्यासाठीं श्रीकृष्णाची आवश्यकता होती. हातांत काठ्या घेऊन फिरणाऱ्या गोपाळांना कृष्ण हांक मारून म्हणाला, "या रे, या रे अवघेजण. इंद्राचा हा जुलूम दूर करावयाचा आहे ना ? या, हा गोवर्धन पर्वत सारे मिळून उचलूं. लावा एकदम काठ्या. एका ध्येयासाठीं सारे उठा." गोपाळांनींच काठ्या उचलल्या,



त्यांनींच पर्वत उचलला. कृष्णानें काय केलें ? केवळ बोट दाखविलें. येथें काठ्या लावा. येथें एके ठिकाणीं या, हा पर्वत उचला. हा जुलूम दूर करा. कृष्ण नुसतें दिग्दर्शन करीत होता. अवतारी पुरुष जनतेच्या प्रयत्नांना विशिष्ट दिशेनें वळण देतो. जनतेचीच शक्ति, परंतु ती केंद्रीभूत व सुसंघटित नसल्यामुळें कार्यकर होत नव्हती. परंतु त्या शक्तीला व्यवस्थित स्वरूप देतांच ती अमोघ होते, तेजस्वी, अप्रतिहत होते. सर्व संकटांचा ती चुरा केल्याशिवाय रहात नाहीं.

छत्रपति श्रीशिवाजीमहाराज म्हणजे महाराष्ट्रांतील लाखों धडपडणाऱ्या जीवांना एकत्रित करणारी शक्ति. बलवान् मूर्ति डोळ्यांसमोर दिसतांच सारे धडपडणारे जीव भराभर अनाहूत त्या मूर्तीभोंवतीं उभे राहतात. तिचा आदेश पार पाडण्यास सिद्ध होतात. अवतारी विभूति म्हणजे स्थिर विभूति. ध्येयावर दृष्टि ठेवून अचल उभी राहणारी विभूति. आपण सारे ध्येयपूजक असतों. परंतु त्या ध्येयाला आकाश कोसळो वा पृथ्वी गडप होवो, मी मिठी मारून राहीन, असा आपला निश्चय नसतो. आपण मोहाला बळी पडतों. सुखाला लालचावतों. कष्टांना कंटाळतों, हालांना भितों, मरणापासून पराङ्मुख होतों. ध्येयासाठीं आपण धडपडतों, परंतु ती धडपड कधीं थंडावेल, कधीं गारठेल याचा नेम नसतो.

महापुरुष अशा चंचलांची ध्येयश्रद्धा दृढ करतो. त्या महापुरुषाची जग परीक्षा घेतें. सॉक्रेटिसाची परीक्षा होते. ख्रिस्ताची परीक्षा होते. परंतु ते महान् पुरुष अविचल उभे राहतात. जगाची श्रद्धा ते ओढून घेतात. जगाच्या प्रयत्नांना आपल्या दिव्य-भव्य धैर्यानें व आत्मत्यागानें नीट वळण देतात.

महात्मा गांधींच्या पाठीमागें कोट्यवधि हिंदी जनता कां उभी राहते ? कारण कोट्यवधि हिंदी लोकांच्या तिळतिळ प्रयत्नांतून ते निर्माण झाले आहेत. कोट्यवधि हिंदी लोकांना स्वतःचीं ध्येयें, स्वतःच्या आशा-आकांक्षा त्या महापुरुषाच्या ठायीं अत्यंत उत्कटतेनें प्रतीत होत आहेत. आपल्या हृदयांतील ध्येय ज्याच्या ठिकाणीं अत्यंत प्रखरतेनें व स्पष्टपणें मूर्तिमंत झालेलें दिसतें, तो आपला अवतारी पुरुष होय. आपल्या प्रयत्नांचें पराकाष्ठेचें स्वरूप परिणत जेथें आपणांस दिसून येतें, तेथें आपला अवतार असतो.

मग अवतार म्हणजे काय ? अवतार म्हणजे मीं कसोशीनें प्रयत्न करणें. माझ्या लहान प्रयत्नांतून लहान अवतार निर्माण होईल. माझ्या मोठ्या प्रयत्नांतून महान् अवतार निर्माण होईल. महात्माजींची शक्ति वाढविणें हें आमच्या हातीं आहे.

रामाच्या शब्दाची किंमत वाढवणें हें वानरांच्या हातीं होतें. महात्मा गांधी मागें इंग्लंडमध्यें जातांना म्हणाले, "मी तिकडून काय आणणार? आणणारा मी कोण? तुम्ही द्याल तेंच मी आणीन. मी म्हणजे तुमची शक्ति." महापुरुषाची शक्ति बहुजनसमाजाच्या शक्तीनें मर्यादित असते. ज्या मानानें बहुजनसमाज प्रयत्नांची पराकाष्ठा करील, त्या मानानें अवतारी पुरुषाची प्रभा फांकेल.

तुम्हांला अवतार पाहिजे ना? तर मग भारतीय संस्कृति सांगते, "स्वतः-मधील सर्व सामर्थ्यानें ध्येयाकडे जाण्यासाठीं उभे रहा. स्त्री-पुरुष, लहान-थोर, राव-रंक सारे उठा. शर्थ करा. आंच लागूं दे. हृदय पेटूं दे. हातपाय हालूं देत. कोट्यवधि लोकांच्या अशा हृदयपूर्ण चळवळींतून महापुरुष प्रकट होतो व त्याच्या प्रयत्नांना पुढें सिद्धीचें फळ लागतें.

इमर्सन या अमेरिकन ग्रंथकारानें एके ठिकाणीं म्हटलें आहे, "महापुरुष म्हणजे लाटेवरचा फेंस होय." किती सुंदर उपमा आहे! लाट किती तरी दुरून चढत पडत येत असते. वाढत वाढत येत असते. शेवटीं ती पराकाष्ठेची उंच होते, त्या वेळीं त्या लाटेच्या शिखरावर स्वच्छ फेंस उसळतो. त्या लाटेचें तें निर्मळ अंतरंग असतें. समाजामध्यें कित्येक वर्षें चळवळ चालत असते. प्रयत्न होत असतात. पाऊल पुढें पडत असते. समाजांतील चळवळ वाढत वाढत तिची प्रचंड लाट होते आणि त्या लाटेच्या शिरावर महापुरुष उभा राहतो! त्या लाटेंतील स्वच्छता म्हणजे तो अवतार. जनतेच्या अनंत प्रयत्नांतील खळमळ जाऊन जें स्वच्छ पवित्र स्वरूप वर येतें, तें स्वरूप म्हणजे महापुरुष. जनतेच्या प्रयत्नांतील सारी प्रखरता, सारी पवित्र मंगलता, सारी निर्दोष विशालता त्या अवतारी पुरुषाच्या द्वारां जगाला दिसते. लोकांच्या प्रयत्नाचें सुंदर अपत्य म्हणजे ती महान् विभूति होय!

सत्पुत्र सत्कुळांत निर्माण होतो यांतील अर्थ हाच होय. तपस्येच्या पोटीं सदंकुर निर्माण होतात. ज्या समाजांत तपस्या आहे, तळमळ आहे, धडपड आहे, ध्येयाचा ध्यास आहे, त्या समाजांत महात्मे अवतीर्ण होतात. भगवान् बुद्ध जन्माला येण्यापूर्वी भारतांत प्रचंड वैचारिक चळवळ सुरू होती. हें खरें कां तें खरें, याचे वाद उत्कटपणानें ठायीं ठायीं चालले होते. ठिकठिकाणीं चर्चा व अभ्यास-मंडळें दिसत होतीं. अशा त्या प्रचंड वैचारिक खळबळींतून भगवान् बुद्ध जन्माला आले. त्या वैचारिक लाटेवरचा शुद्ध-स्वच्छ फेंस म्हणजे हा महान् सिद्धार्थ!



आपल्या अनंत धडपडींना वळण देणारा, आपल्या अपरंपार प्रयत्नांना अर्थ प्राप्त करून देणारा असा महापुरुष पाहिला म्हणजे हृदयें उचंबळून येतात. आईला आपल्या नऊ मास वाहिलेल्या कष्टांचें व प्रसववेदनांचें प्रत्यक्ष गोरेंगोमटें साजिरेंगोजिरें फळ पाहून जसें प्रेमाचें भरतें येतें, तसेंच जनतेला होतें. जनता महापुरुषाची जननी असते. या महापुरुषाचें नामोच्चारण करतां करतां जनतेला अपूर्व स्फूर्ति येते.

नाम जपण्यांत काय अर्थ आहे, असें आपण सहज म्हणतों. परंतु नामजपनांत अपार सामर्थ्य आहे. 'वंदे मातरम्' मंत्राचा जप करीत लहान मुलें फटके हंसत खातात! 'भारतमाता की जय' म्हणत हुतात्मे फांशीं जातात! 'महात्मा गांधी की जय' म्हणत स्त्रिया लाठीमार शिरावर घेतात! 'इन्किलाब जिंदाबाद' म्हणत क्रांतिकारक गोळीसमोर उभे राहतात!

नामजपन म्हणजे ध्येयाचें जपन. महात्मा गांधी म्हणजे हिंदुस्थानचें स्वातंत्र्य. रामनाम म्हणजे रावणाचें निर्दालन व पददलितांचें उद्धरण. गोपाळकृष्ण म्हणजे वेदवादाविरुद्ध बंड व शुद्ध कर्मयोगाचा महिमा. गोपाळकृष्ण म्हणजे भेदातीत प्रेम, स्त्री-शूद्र-वैश्यांस प्रेमानें समान लेखणें. कार्ल मार्क्स् की जय, लेनिन की जय, म्हणजे सर्व श्रमजीवी लोकांचें महान् वैभव. त्या एकेका नांवांत अनंत अर्थ असतो. त्या एका नामोच्चरणांत अपार स्फूर्ति असते. माझ्या ध्येयाचें तें मूर्तिमंत स्मरण असतें. तें स्मरण माझ्या मरणावर स्वार होतें.

अवतारी पुरुष तरी निर्भय कां असतो? त्याच्या ठिकाणीं ती वज्रालाहि चांकवणारी शक्ति कोठून येते? अवतारी पुरुषाला माहीत असतें, कीं मी एकटा नाहीं. मी म्हणजे हे लाखों लोक. या लाखों लोकांचें मी प्रतीक आहें. लाखों लोकांशीं मी जोडलेला आहें. लाखों लोकांचें लाखों हात माझ्याभोंवतीं आहेत. माझ्या अंगाला हात लावणें म्हणजे लाखों लोकांच्या अंगाला हात लावणें आहे. माझा अपमान करणें म्हणजे लाखों लोकांचा तो अपमान आहे.

आज महात्मा गांधी का एकटे आहेत? लाखों चरख्यांवर सूत कांतणारे लाखों लोक त्या सुतानें त्यांच्याशीं चिरबद्ध झालेले आहेत. ग्रामसेवा करणारे हजारों लोक महात्माजींशीं जोडलेले आहेत. हरिजनसेवा करणारे शेंकडों बंधू महात्माजींशीं जोडलेले आहेत. हिंदु-मुस्लिम ऐक्य करूं पाहणारे, जातीय तंटे मिटविणारे, दारूबंदी करूं पाहणारे, सारे महात्माजींशीं जोडलेले आहेत. या

कोट्यवधि लोकांची ही जनताजनार्दनाची सुदर्शनशक्ति महात्माजींच्याभोंवतीं फिरत आहे.

आणि जवाहरलाल का एकटे आहेत? पददलितांची बाजू घेणारे, मदोन्मत्तांचा व खुशालचेंडूंचा नक्षा उतरूं पाहणारे, श्रमाची महती ओळखणारे, शेतकरी-कामकरी लोकांसाठीं बलिदान करूं पाहणारे, त्यांची संघटना करणारे, मानव्याचा खरा धर्म ओळखणारे, बाकी सारे दंभ दूर भिरकावून देणारे असे हजारों लोक जवाहरलालांभोंवतीं उभे आहेत; आणि ज्यांच्यासाठीं जवाहरलाल जळफळत आहेत, तडफडत आहेत ते कोट्यवधि हिंदु-मुसलमान भाई त्यांच्याशीं जोडलेले आहेत. म्हणून जवाहरलाल यांच्या शब्दांत तेज आहे, वाणींत ओज आहे, दृष्टींत तेजस्विता आहे.

महापुरुष म्हणजे पुंजीभूत विराट् जनता. म्हणून बलवंत सरकारेंहि अशा महापुरुषाला वांकून असतात. महापुरुषांचें रक्त सांडणें सोपी गोष्ट नाहीं. संभाजीचें रक्त मोंगली साम्राज्य धुळीला मिळवील. गुरु गोविंदसिंहाचें रक्त शिखांचें साम्राज्य उभारील.

विराटाच्या दरबारांत अक्षक्रीडा चालली होती. खेळतां खेळतां संतापलेल्या विराटानें धर्मराजास फांसा मारला. धर्माच्या कपाळांतून भळभळां रक्त वाहूं लागलें. धर्मानें तें रक्त खालीं पडूं दिलें नाहीं. सैरंध्री ताम्हण घेऊन आली. त्या ताम्हणांत तें रक्त धरण्यांत आलें. धर्माला कोणी तरी प्रश्न केला, " आपण अंजुलींत रक्त कां धरून ठेविलें? खालीं पडलें असतें म्हणून काय बिघडलें असतें?" धर्मराजा म्हणाला, "या रक्ताचा बिंदु जर जमिनीवर पडता, तर विराटाच्या राज्याचें भस्म होऊन गेलें असतें."

अवतारी पुरुषांच्या रक्तांतहि शक्ति असते. ख्रिस्ताचें रक्त सांडण्यांत आलें, परंतु त्या रक्तानें जग जिंकलें. अवतारी पुरुषांची ही प्रचंड शक्ति कधीं कधीं सत्तालोलुप लोक विसरतात. ते अवतारी पुरुषांचें रक्त सांडतात आणि तें रक्त सांडतांच त्या सत्ताधीशांची सत्ता रसातळास जाते. इतिहासाचा हा सिद्धान्त आहे.

आपल्या प्रयत्नांची शर्थ करून असा अवतारी पुरुष जे बघतात ते धन्य होत. असा अवतारी पुरुष उत्पन्न होण्यासाठीं जे आपल्या श्रमाचें सहकार्य करतात, जे एकत्र येतात, लहान-मोठे स्त्री-पुरुष सर्व श्रेष्ठ-कनिष्ठपणा बाजूस सारून कर्मयज्ञ करतात ते धन्य होत. हें महान् सहकार्य होय. या कर्मांत सर्वांना वाव आहे.



पतित असोत वा पुण्यपावन असोत, या सर्वजण प्रयत्न करण्यासाठीं. आपापल्या या लहानशा कर्मांनीं आपण महापुरुषाला ओढून आणूं. आपण कर्मांचें डोंगर उभारूं, प्रयत्नांचे पर्वत रचूं. कणाकणांचेच पर्वत असतात. हे सेवेचे व श्रमाचे पर्वत महापुरुषरूपी जीवनदायी मेघाला ओढून घेतील व समाज सुखी-समृद्ध होईल.

भारतीय संस्कृति सांगते, कीं महापुरुष जन्मास यावा असें वाटत असेल तर स्वस्थ बसूं नका. केवळ हरि हरि म्हणत खाटल्यावर बसल्यानें श्रीहरि जन्मास येत नसतो.

न हि श्रांतस्य ऋते सख्याय देवाः ।

असें श्रुतिवचन आहे. जे दमले-भागले असतील अशांचाच प्रभु मित्र होतो, पाठीराखा होतो. जे श्रमत नाहींत, दिलेल्या हातांपायांचा, हृदयबुद्धीचा उपयोग करीत नाहींत, अशा कर्मशून्यांसाठीं परमेश्वर उभा नसतो.

अवतारी पुरुष डोळ्यांनीं पाहणें याहून भाग्य कोणतें? असा पुरुष आपली आशा असते; असा पुरुष आपलें सामर्थ्य असतें; अशा पुरुषाला पहाण्याचे आपणांस डोहाळे असतात. अशा विभूतीला पहाण्यासाठीं डोळे भुकेलेले असतात. ईश्वराचा महिमा अशांकडूनच कळतो. मानवाचा महिमाहि अशांकडूनच प्रकट होतो. मानवाची शक्ति महापुरुष दाखवून देत असतात. मनुष्याला किती उंच जातां येईल याची खूण असे महापुरुष करून ठेवतात.

भारतीय संस्कृतींत कर्मशून्यतेला, आलस्याला, नैराश्याला स्थान नाहीं. भारतीय संस्कृति म्हणजे प्रयत्नांची पराकाष्ठा; भारतीय संस्कृति म्हणजे अमर आशावाद; भारतीय संस्कृति म्हणजे कोट्यवधि लहान-थोरांचें सहकार्य. अवतार-कल्पनेंत या सर्व गोष्टींचें स्वच्छ प्रतिबिंब पडलेलें आहे. तें सर्वांस ज्या दिवशीं समजेल तो सुदिन !

## मूर्तिपूजा : : २०

भारतीय संस्कृतींत मूर्तिपूजा ही एक फार थोर व मधुर अशी कल्पना आहे. मानवाला उत्तरोत्तर स्वतःचा विकास करून घेतां यावा म्हणून जीं अनेक साधनें भारतीय संस्कृतीनें निर्माण केलीं आहेत त्यांतील हें एक महान् साधन आहे.

मूर्तिपूजेचा जितका विचार करावा, तितका तितका तिच्यांतील भाव खोल असा वाटूं लागतो.

मनुष्यप्राणी हा विभूतिपूजक आहे. आपणांमध्यें ही प्रवृत्ति स्वयंभूच आहे. आपल्यापेक्षां जें मोठें आहे त्याचें आपण कौतुक करतों. आपल्याहून जे थोर आहेत—बुद्धीनें, हृदयानें महान् आहेत—त्यांची पूजा करावी असें वाटतें. ही महान् विभूतीची पूजा करण्याची वृत्ति जर आपणांत नसती, तर आपला विकास होता ना. विभूतिपूजा विकासाचें प्रभावी साधन आहे.

मूर्ति म्हणजे आकार. मूर्तिपूजा म्हणजे आकारपूजा, प्रत्यक्ष पूजा. आपल्या डोळ्यांसमोर कांहीं तरी प्रत्यक्ष आपणांस लागत असतें. आपण जीवनाच्या प्रथमावस्थेंत सारे आकारपूजक असतों. आपण व्यक्तीभोंवतीं जमतों. व्यक्तीशिवाय आपलें चालत नाहीं. जिचें डोळ्यांनीं दर्शन घेऊं, जिचे शब्द कानांनीं ऐकूं, जिचे पाय हातांनीं धरूं अशी मूर्ति आपणांस पाहिजे असते. म्हणूनच बुद्धधर्मांत तीन साधकावस्था सांगितल्या आहेत :

बुद्धं शरणं गच्छामि
संघं शरणं गच्छामि
धर्मं शरणं गच्छामि

या तीन स्थितींतून मनुष्याला जावें लागतें. मनुष्य प्रथम महान् व्यक्तीला शरण जातो. आपल्या डोळ्यांसमोर जी थोर विभूति असते, तिच्याजवळ आपण जातों. कोणी महात्माजींच्याभोंवतीं जमतील. कोणी अरविंदांच्या चरणांजवळ जातील. कोणी रवींद्रनाथांच्या विश्वभारतींत शिरतील. अशा रीतीनें मनुष्य विकासाकडे जाऊं बघतो.

परंतु व्यक्ति ही क्षणभंगुर आहे. आज ना उद्यां व्यक्तीला पडद्याआड जावयाचें आहे. ज्या महापुरुषाच्या शरीरावर आपण प्रेम केलें, तें शरीर एक दिवस गळून पडतें. ते प्रेमळ पवित्र डोळे मिटतात. तें सुधा स्रवणारें मुख बंद पडतें. ते आशीर्वाद देणारे हात थंडगार होतात.

ज्या विभूतीच्या चरणाशीं आपण येऊन बसलों ती विभूति अदृश्य होते. परंतु त्या विभूतीचा बाह्य आकार हा महत्त्वाचा नाहीं. त्या आकारांतून जें दिव्य तत्त्व बाहेर पडत होतें, तें तत्त्व महत्त्वाचें होतें. तें तत्त्व काय होतें ? तें तत्त्व कसें होतें !

त्या महापुरुषाभोंवतीं जमलेले सारे एकत्र बसतात. त्यांचा भ्रातृसंघ होतो. एका गुरूचे ते शिष्य. गुरूच्या उपदेशाचें ते अनुकरण करूं पाहतात; परंतु गुरूच्या उपदेशाबद्दल त्यांच्यांत मतभेद होतात. तो भ्रातृसंघ टिकत नाहीं. त्याच्या शाखा होतात. निरनिराळे पंथ होतात. अशा वेळेस काय करावयाचें ?



व्यक्ति गेली. संघ गेला. आतां काय राहिलें ? धर्म राहिला. माझा गुरु ज्यासाठीं जगला व मेला असें मला वाटतें, त्या धर्माला मी शरण जातों. त्या महाविभूतीचें जें तत्त्वज्ञान मला वाटतें, त्या तत्त्वज्ञानाची मी पूजा करूं लागतों. माझ्या दृष्टीनें त्या महापुरुषाचें जें स्वरूप मला वाटतें, त्या स्वरूपाची मी उपासना करूं लागतों.

व्यक्तिपूजेपासून आपण आरंभ करतों व तत्त्वपूजेंत त्या आरंभाचें पर्यवसान होतें. मूर्तापासून निघून आपण अमूर्ताकडे जात असतों. मूर्तिपूजेची ही मर्यादा आपण ओळखली पाहिजे. शेवटीं कधींतरी व्यक्तांतून अव्यक्ताकडे, मूर्तांतून अमूर्ताकडे, आकारांतून आंतरिक तत्त्वाकडे आपणांस गेल्यावांचून गत्यंतर नाहीं.

आपण मंगलमूर्तींची पूजा करतों. गणेशचतुर्थीच्या दिवशीं आपण गणरायाची मूर्ति आणतों. त्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करतों; परंतु दोन दिवस, चार दिवस, दहा दिवस ठेवून त्या मूर्तीचें आपण विसर्जन करीत असतों. त्या मूर्तींतून अव्यक्त, अमर असा भाव कायमचा जीवनाशीं जोडून त्या मूर्तीला आपण बुडवितों. मूर्तिपूजा हें कायमचें ध्येय नाहीं. केव्हां तरी मूर्तिपूजेच्या वर मला गेलें पाहिजे, हा यांतील अर्थ आहे.

मानवी विकासाला मूर्तिपूजेइतकीच मूर्तिभंजकता आवश्यक आहे. आपण मूर्तिपूजक असतों व मूर्तिभंजकहि असतों. काल ज्या मूर्तीची मी पूजा करीत होतों, त्याच मूर्तीची आज करीत असेन असें नाहीं. माझ्या मूर्तीचा उत्तरोत्तर विकास होत असतो. जुनी मूर्ति जाऊन नवीन मूर्ति येत असते. समजा, लहानपणीं मी माझ्या आईबापांचीच मूर्ति पूजीत होतों; परंतु मोठा झाल्यावर ही मूर्ति दूर करून मी भारतमातेची मूर्ति पूजूं लागतों. लहान आईचें मोठ्या आईत पर्यवसान झालें. लहान मातेची मूर्ति मोडून मी महान् मातेची मूर्ति बनवितों. मी आणखीहि पुढें जातों. भारतमातेची मूर्तीहि मला मग आवडत नाहीं. मी विश्वंभराची मूर्ति बनवून तिची पूजा करतों. सर्व मानवजातीची मूर्ति करून तिची मी उपासना करतों. जन्मदात्री माता जाऊन भारतमाता आली; भारतमाता

जाऊन मानवजातीची माता आली. अशा प्रकारें उत्तरोत्तर आपण आपली मूर्तिपूजा विशाल करीत असतों.

रामाची मूर्ति मग केवळ रामाची रहात नाहीं. वालीला मारणारा, शंबुकाला मारणारा असा राम डोळ्यांसमोर नसतो. रामाची मूर्ति वाढत वाढत ती जगदीश्वराची मूर्ति होते. अयोध्यापति राम विश्वव्यापी राम होतो. रामाची मानुष कल्पना नाहींशी होऊन अतिमानुष कल्पना उभी राहते.

अशा रीतीनें मूर्तिपूजा ही विश्वपूजा होते. ती लहानशी मूर्ति म्हणजे अनंताची मूर्ति होते. परंतु मूर्तिपूजेंतील हा विकास आपणांपैकीं पुष्कळांजवळ नसतो. त्या मूर्तीतील अनंतता आपल्या अनुभवास येत नाहीं. देवळांतून बाहेर पडल्यावर त्या मूर्तीचें भान आपणांस रहात नाहीं. त्या पाषाणमयी मूर्तीची पूजा करतां करतां सर्वत्र प्रभूच्या मूर्ती दिसूं लागण्याचा योग कधीं येत नाहीं. देवाची मूर्ति त्या मूर्तीच्या पलीकडे कधीं जात नाहीं. परंतु मूर्तातून अमूर्ताकडे गेल्याशिवाय तर समाधान नाहीं.

लहान मुलाला आई सारखी जवळ हवी असते. जरा दृष्टिआड होतांच मूल रडतें. परंतु त्या मुलाला आईपासून दूर राहण्याची संवय करावीच लागेल. आईची भावना मनांत ठेवून जगांत वावरावें लागेल. मूर्तातून अमूर्ताकडे जावें लागेल. त्या आकारांत कोंडलेली आई त्याला विशाल करावी लागेल. आईची प्रेममयी, स्नेहमयी, ज्ञानमयी मूर्ति हृदयांत निर्मावी लागेल. मग ती जेथें जाईल तेथें आई आहे.

**जेथें जातों तेथें तूं माझा सांगाती।**

आपण सारे ज्या वेळेस देवळांत जातों, त्या वेळेस भक्तिभाव हृदयांत असतो. परमेश्वरासमोर उभे राहून आपण आपले कान उपटतों, हळूच थोबाडींत मारून घेतों, साष्टांग लोटांगण घालतों. प्रदक्षिणा घालून देवाची मूर्ति हृदयांत ठसावी म्हणून प्रयत्न करतों; परंतु देवळाच्या बाहेर येतांच आपला व्यवहार पूर्ववत् सुरू होतो! देवळाच्या बाहेरहि जेव्हां देव आपल्या बरोबर येऊं लागेल, तेव्हांच मूर्तिपूजेचें सार्थक होईल. आजकाल देवळांतील देव देवळांतच राहतो. तो आपण बाहेर आणीत नाहीं, आणि यामुळेंच समाजांत अपार दुःख व विषमता आहे.

घरच्या आईचें स्मरण मला सदैव हवें, त्याप्रमाणें मंदिरांतील मूर्तीचें स्मरण



मला सर्वत्र हवें. ती मूर्ति त्रैलोक्यीं संचरणारी झाली पाहिजे. मला सर्वत्र तिचें दर्शन झालें पाहिजे.

हिंदु लोकांनीं मूर्तिपूजेचा जरी असा विकास केला नसला, असा विकास करण्याकडे जरी त्यांचें लक्ष नसलें, तरी इतर धर्मीयांपेक्षां अधिक विकास त्यांनीं केला आहे. हिंदुधर्मापेक्षां इतर धर्मांतच मूर्तिपूजा अधिक आहे. हिंदुधर्मातील मूर्तिपूजेपेक्षां इतर धर्मीयांची मूर्तिपूजा कमी उदार आहे. उदाहरणार्थ, ख्रिस्ती लोकांचा क्रॉस किंवा मुस्लिमांचा काबा यांच्यांतहि हिंदुधर्मी मनुष्य पावित्र्य पाहील. जशी माझी शाळिग्रामाची मूर्ति तशी ही त्यांची, असें हिंदु म्हणेल. माझ्या रामाच्या त्या अडीच हाती मूर्तीबाहेर जगांत कोठें पावित्र्य नाहीं असें हिंदु मनुष्य म्हणणार नाहीं; परंतु याच्या उलट, क्रॉसला पवित्र मानणारा ख्रिश्चन मनुष्य रामाच्या मूर्तींत पावित्र्य पाहूं शकणार नाहीं. काबाला भजणारा मुसलमान हनुमंताच्या मूर्तीला पवित्र मानणार नाहीं. आपल्या धर्माचीं प्रतीकें, आपल्या धर्मांतील चिन्हें, यांच्या पलीकडे जगांत पावित्र्य असूं शकेल, अशी कल्पनासुद्धां त्यांना सहन होत नाहीं! क्रॉस एवढेंच काय तें सत्य, काबा एवढेंच काय तें सत्य, असें ते समजतात. त्या मूर्तीच्या, त्या चिन्हांच्या पलीकडे त्यांना जातां येत नाहीं. अशा रीतीनें पाहिलें म्हणजे इस्लामी मनुष्य, ख्रिश्चन मनुष्य हेच केवळ आकारपूजक, अत्यंत संकुचित मूर्तिपूजक आहेत असें दिसून येईल. हिंदु त्या आकारांच्या पलीकडे जाऊन अन्य मूर्तींहि तितक्याच पवित्र मानूं शकतो.

मूर्तिपूजा कधींपासून सुरू झाली? मनुष्य जन्मल्यापासून. सूर्याची पूजा, समुद्राची पूजा, झाडांची पूजा, सर्पांची पूजा, हे पूजाप्रकार अनादि आहेत. परंतु दगडांचे आकार करून, मंदिरें करून, मूर्तिपूजा केव्हांपासून रूढ झाली? बहुतेक सारे म्हणतात, कीं बुद्धांच्या निर्वाणानंतर ही मंदिरी मूर्तिपूजा अस्तित्वांत आली. बुद्धांच्या निधनानंतर त्यांचे शेंकडों पुतळे तयार झाले. निरनिराळ्या संघारामांतून बुद्धांच्या मूर्ती स्थापन करण्यांत आल्या. बुद्धधर्माला आत्मसात् करून घेतल्यानंतर हिंदुधर्मानें तीच प्रथा उचलली. शेंकडों देवतांचीं शेंकडों मंदिरें झालीं.

पाषाणमय आकारांची पूजा बुद्धांपासून सुरू झाली असली तरी मूर्तिपूजा ही सनातन आहे, हें विसरून चालणार नाहीं. शिल्पकलेचा विकास झाल्यावर महान् विभूतींचें सदैव स्मरण रहावें, म्हणून त्यांच्या मूर्ती करण्यांत येऊं लागल्या, पुतळे होऊं लागले. थोर पुरुष कसे दिसत हें समजण्याची सर्वांस उत्कंठा असते.

परमेश्वरहि कसा असेल याची आपण कल्पना करूं लागलों. आपणांस दोन हात आहेत, त्याला चार असतील; आपणांस एक तोंड आहे, त्याला चार असतील; अशा कल्पना मनुष्य करूं लागला. परंतु परमेश्वराची खरी मूर्ति कोण कल्पिणार?

नमोऽस्त्वनन्ताय सहस्रमूर्तये
सहस्रपादाक्षिशिरोरुबाहवे
सहस्रनाम्ने पुरुषाय शाश्वते
सहस्रकोटियुगधारिणे नमः ॥

हेंच त्याचें शेवटीं स्वरूप ठरविण्यांत आलें.

परमेश्वराची तरी कल्पना आपण कशावरून करावयाची? बायरन् कवि म्हणतो, "देवा! समुद्र हें तुझें सिंहासन आहे!" या भव्य सिंहासनावरून सिंहासनावर बसणाऱ्या राजाधिराजाची कल्पना करावयाची. सृष्टींत ज्या थोर वस्तू दिसतात, त्यांतून परमेश्वराच्या अपार वैभवाची आपणांस कल्पना येते. म्हणून त्या वस्तूंचीच भगवंत म्हणून आपण पूजा करतों. सागरावरून परमेश्वराच्या वैभवाची कल्पना येते. म्हणून वाटतें, कीं सागर ही ईश्वराची एक मूर्ति आहे. सागराला पाहून आपण हात जोडतों. अनंत लाटांनीं अहोरात्र उचंबळणारा, संतत गर्जना करणारा असा जो हा सागर त्याला प्रणाम नाहीं करावयाचा, तर मग कोणाला करावयाचा?

आकाशांतील सूर्य ही देवाचीच मूर्ति. ज्याच्याजवळ अंधार नाहीं, जो रात्रंदिवस जळत आहे, जगाला जीवन देत आहे, अशा या धगधगीत तेजोगोलाच्या ठायीं परमेश्वरी अंश नको मानूं, तर कोठें मानूं?

गंगेसारख्या हजारों एकर जमीन सुपीक करणाऱ्या नद्या, हिमालयासारखे गगनचुंबी बर्फाच्छादित पर्वत, आकाशाला भिडूं पाहणारे प्रचंड वटवृक्ष, उदार धीरगंभीर वनराज केसरी, भव्यदिव्य पिसारा उभारणारा तो सौंदर्यमूर्ति मयूर, अशांच्या ठायीं देवाचें वैभव नको मानूं, तर कोठें मानूं?

विश्वामित्रानें एकशें एक मुलगे डोळ्यांदेखत ठार केले तरीहि शांति न सोडणारे भगवान् वसिष्ठ, सत्यासाठीं राज्यपद त्यागून वनांत जाणारे प्रभु रामचंद्र, अंगाचें मांस कर्वतून देणारे मयूरध्वज, बालवयांत रानांत जाणारा तेजस्वी ध्रुव, महाभारत रचणारे श्रीमत् व्यास, या सर्व ईश्वराच्याच विभूती होत.



मुलाचें लालनपालन करणारी, मुलाला जरा दुखलें-खुपलें तर कावरीबावरी होणारी, स्वतःच्या प्राणांचें पांघरूण घालून बाळाचे प्राण वांचवूं पाहणारी, कुठें कांहींहि गोड मिळो, आर्धी बाळाला आणून देणारी, बाळाला आर्धी गोड घांस, बाळाला नीट कपडे, बाळाचें आर्धी सारें, असें पुत्रमय जणुं जिचें जीवन झालें आहे अशी प्रेमसागर माता, तिला देव नाहीं म्हणायचें, तर कोणाला?

मातृ देवो भव

अशी श्रुतीची आज्ञा आहे. देवाची पूजा तुला करावयाची आहे का? तुझ्या मातेची पूजा कर, म्हणजे ती देवालाच मिळेल. ईश्वराच्या अपार प्रेमाची कल्पना मातेच्या प्रेमावरूनच आपणांस येऊं शकेल.

आणि पशूचा माणूस करणारा तो थोर सद्गुरु! तोहि ईश्वराचीच मूर्ति. आईबापांनीं देहच दिला. परंतु गुरूनें ज्ञानचक्षु दिले. मानवी जन्माचें सार्थक करावयाचें त्यानें शिकविलें. तो गुरु म्हणजे माझा देव.

या साऱ्या ईश्वराच्याच मूर्ती. जगांत या थोरांचीं मंदिरें आहेत. जिकडे तिकडे पुतळे आहेत, तसबिरी आहेत, स्मारकें आहेत. युरोप खंडांत जाल तर सर्वत्र विभूतिपूजा दिसेल. ईश्वराची अनंत स्वरूपांत तेथें पूजा आहे. संतांमधील दिव्यता भारतीय संस्कृति ओळखते. परंतु युरोपीय संस्कृति कवी, तत्त्ववेत्ते, गणिती, विज्ञानवेत्ते, वीर, मत्सद्दी, संगीततज्ज्ञ, चित्रकार, शिल्पकार, अभिनयविशारद, सर्व प्रकारच्या स्वरूपांत परमेश्वराच्या विभूतिमत्त्वाचें पूजन करीत असते.

भारतीय मूर्तिपूजा शेवटीं काय संदेश सांगते? भगवद्गीतेंतील दहावा अध्याय मूर्तिपूजा शिकवीत आहे. जगांत जेथें जेथें विभूतिमत्त्व दिसेल, तेथें तेथें माझा अंश तूं मान, असें गीता सांगत आहे. परंतु एवढ्यावरच गीता थांबत नाहीं. गीता सांगते:

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन।
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥

या चराचरांत सर्वत्रच मी भरून राहिलों आहें. महान् विभूतींत मला प्रथम पहावयास शीक. परंतु तेवढ्यानें भागणार नाहीं. ज्याप्रमाणें लहान मुलाला शिकवितांना प्रथम सोपीं अक्षरें देतात, तीं अक्षरें मोठ्या आकारांत काढतात, परंतु एवढ्यानें मुलाचा वाङ्मयांत प्रवेश होणार नाहीं. मुलाला समजलें पाहिजे,

कीं मोठें अक्षर तेंच बारीक अक्षर. पाटीवरचा मोठा ग व पुस्तकांतील रोडका ग दोन्हीं एकरूपच. साधीं अक्षरें शिकून झाल्यावर, लहान-मोठीं अक्षरें एकच हेंहि समजल्यावर, लहान मुलानें जोडाक्षरेंहि समजून घेतलीं पाहिजेत. जोडाक्षरें त्याला जर न समजतील तर तो पदोपदीं अडेल, रडेल.

आई हें सोपें सुटसुटीत अक्षर आहे. आई म्हणजे देव हें समजलें. रामकृष्ण म्हणजे देव हें समजलें. सागर व वटवृक्ष हे देव हें समजलें. परंतु रावण? कंस? चावायला येणारा विषारी भुजंग? भयंकर व्याघ्र? हीं कोणाचीं रूपें?

हींहि देवाचींच रूपें; परंतु हीं जोडाक्षरें आहेत. हीं समजायला जरा कठिण आहेत. परंतु हीं समजून घेतलींच पाहिजेत. नाहीं तर जीवनांत आनंद नाहीं, मोक्ष नाहीं. पाव्हरीबाबांना सर्प चावला; ते म्हणाले, "देव चुंबन देऊन गेला!"

शेवटीं सर्वत्र देवाचें दर्शन घ्यावयास शिकावयाचें आहे. मूर्तिपूजेचें हें पर्यवसान आहे. जेथें जेथें मग त्याच्याच मूर्ती, त्याचींच अनंत राउळें. प्रत्येक वस्तु, प्रत्येक व्यक्ति म्हणजे त्या चिदंबराचें-दिगंबराचें मंगल मंदिरच होय! खऱ्या भक्ताला प्रत्येक पदार्थांतून चिन्मयाचेंच दर्शन होतें. तो सर्व सृष्टीकडे भक्तिप्रेमानें पहात राहतो व त्याचे डोळे आनंदाश्रूंनीं भरून येतात!

मूर्तिपूजा करतां करतां विश्व हीच मूर्ति वाटूं लागली पाहिजे. परंतु सर्व चराचर सृष्टि मंगल व पवित्र वाटणें तर दूर राहिलें; निदान मानवप्राणी तरी पवित्र व थोर वाटूं दे. मूर्तिपूजेचा हा पहिला धडा तरी आपण शिकला पाहिजे. परंतु हा धडा अद्याप मानवप्राणी शिकला नाहीं.

आपणांस धर्म यांत्रिक रीतीचा आवडतो. परंतु धर्म म्हणजे संस्कार. प्रत्येक कृतीचा जीवनावर ठसा उमटला पाहिजे. आपण नेहमीं मूर्तिपूजा करतों, परंतु त्याचा कोणता ठसा उमटतो? आपण पूजा करतांना कधीं मनांत म्हणतों का "देवा! आजच्यापेक्षां उद्यां हे माझे हात अधिक पवित्र होतील, आजच्यापेक्षां हे डोळे अधिक प्रेमळ व प्रामाणिक होतील, आजच्यापेक्षां उद्यां हृदय विशुद्धतर व विशालतर होईल, आजच्यापेक्षां उद्यां बुद्धि अधिक स्वच्छ व सतेज होईल?"

आपल्या मनांत कांहींहि नसतें. चोवीस वर्षांपूर्वी हे हात जितके अपवित्र होते, तितकेच किंबहुना, अधिकच अपवित्र चोवीस वर्षांच्या पूजेनेंहि आज आहेत! विकास नाहीं, वाढ नाहीं, पावित्र्य नाहीं, प्रेम नाहीं, भेद गळला नाहीं, अहंकार झडला नाहीं. अशी यांत्रिक पूजा काय कामाची?



मूर्तिपूजेंत कृतज्ञतेची सुंदर कल्पना आहे. कृतज्ञतेसारखी सुंदर वस्तु जगांत कोणतीहि नाहीं. परमेश्वरानें आपणांस सर्व कांहीं दिलें आहे. त्याचें उतराई आपण कसे होणार, हा भाव प्रत्येकाच्या हृदयांत असतो. ज्या ईश्वरानें या विश्वमंदिरांत रवि-शशि-तारे पेटवून ठेवले आहेत, त्याला आपण नीरांजनानें ओवाळतों, काडवातींनीं ओवाळतों. ज्यानें अनंत प्रकारच्या परिमलांचीं कोट्यवधि फुलें पृथ्वीवर फुलविलीं आहेत, त्याला उदबत्तीचा वास आपण देतों. ज्यानें रसाळ फुलें दिलीं, नानाविध धान्यें दिलीं, कंदमुळें दिलीं, दूधदुभतें दिलें, त्या देवाला वाटीभर दुधाचा नैवेद्य दाखवतों. ज्यानें सागर उचंबळत ठेवले आहेत, जो मेघमाला पाठवीत आहे, नद्या-नाले वाढवीत आहे, वापी-तडाग भरवीत आहे, त्याच्यावर तांब्याभर पाण्याचा आपण अभिषेक करतों. ही का देवाची थट्टा आहे?

लोकहितवादींनीं आपल्या एका पत्रांत एके ठिकाणीं लिहिलें आहे, कीं हा सारा बावळटपणा आहे. परंतु हा बावळटपणा नाहीं. ही कृतज्ञतेची खूण आहे. त्या विराट् विश्वंभराला मी माझ्या चिमुकल्या हातांनीं कसा पकडणार? कोणत्या देवघरांत त्याला बसवणार? त्या विश्वंभराची माझ्या मनाच्या सुखार्थ मी एक लहानशी मूर्ति करीन. मला आवडेल तें रूप मी देईन आणि त्या मूर्तीला मी पूजीन, तिला गंध लावीन, फुलें वाहीन, धूप, दीप, नैवेद्य दाखवीन. त्या मूर्तीला प्रदक्षिणा घालीन, त्या मूर्तीला लोटांगण घालीन. माझी कृतज्ञता मी प्रकट करीन. सर्वत्र असणाऱ्या प्रभूला ती पूजा पोंचेल.

बापाच्या ताटांतलें घेऊन बाळ बापाला भरवूं पाहतो. बापाला अपमान वाटत नाहीं. तो प्रेमानें तोंड पुढें ओढतो. तद्वत् तो चराचर पिता भक्तावर रागावणार नाहीं. देवाचेंच घेऊन देवाला द्यावयाचें. गंगेतील पाण्यानें गंगेलाच अर्घ्य द्यावयाचें. कोठूनहि कृतज्ञता प्रकट करण्याचें साधन मिळालें म्हणजे झालें.

मंदिरांतील मूर्तीसमोर आपण भक्तिप्रेमानें, कृतज्ञतेनें कांहीं अर्पण करतों; परंतु आपण देवासमोर जें ठेवतों त्याचा उपयोग काय होतो? देव तर तटस्थ आहे. पुजारी किंवा मालक तें सर्व घेत असतो. आणि त्या पवित्र मंदिरांत व्यभिचारांची पूजा सुरू होते! रामाला वाहिलेला शेला मंदिराचा जो मालक त्याच्या वेश्येच्या अंगावर तो झळकतो! रामाला दिलेले हिरे वारांगनांच्या नाका-कानांत जाऊन बसतात!

आपली होते देवपूजा आणि समाजांत वाढते घाण; परंतु हें होणारच. लोकांना पिळून, छळून आणलेले ते हिरे रामरायाला कसे सहन होतील ? ते घाणेरडे हिरे घाणींतच जावयाचे. आपल्याजवळ देवाला द्यावयाला आले कोठून ? आपल्यासाठीं झिजणाऱ्या आपल्या बांधवांची झीज आपण भरून काढीत नाहीं म्हणून ही धनदौलत उरते. आपलें मन आपणांस खातें. त्या मनाचें मारून मुटकून समाधान करण्यासाठीं आणि गोरगरिबांना छळूनहि पुन्हां प्रतिष्ठित व धार्मिक म्हणून मिरवतां यावें यासाठीं आपण देवाला हिरे-माणकें देतों. लक्षावधि, कोट्यवधि इस्टेटींतील केरकचरा देवापुढें टाकतों. झब्बू लोक धर्मात्मा म्हणून वर्तमानपत्रांतून स्तुति करतात. गरिबांचीं वर्तमानपत्रें असतीं, तर त्यांनीं काय बरें लिहिलें असतें ?

मंदिरांतून जो व्यभिचार चालतो, त्याचें पाप तेथें दिडक्या फेंकणारावर आहे. आपण जें कांहीं करतों, त्याचे परिणाम काय होतील हें न पाहणें म्हणजे घोर अधर्म आहे. देवानें दिलेल्या बुद्धीचा तो अपमान आहे. ईश्वरानें दिलेल्या परमश्रेष्ठ देणगीचा तो उपमर्द आहे.

द्वारकेसारख्या मोठमोठ्या देवस्थानांचे लिलांव होतात ! जसे दारूच्या गुत्त्यांचेच लिलांव ! जो मक्ता घेईल तो मग तेथला राजा. द्वारकेला तो मक्ता घेणारा महंत डुलत डुलत येतो. त्याच्यावर छत्रचामरें वापरण्यांत येतात. तोच जणुं तेथील देव !

मूर्तिपूजेंत घाण शिरली आहे. डोळस मूर्तिपूजा सुरू झाली पाहिजे. मूर्तीपुढें धनद्रव्यें टाकणें बंद झालें पाहिजे. जेथें सर्वांनीं विनम्रभावानें यावें असें स्थान म्हणजे मंदिर. तें स्थान सरकारनें स्वच्छ, पवित्र राखावें. तेथें मंगल भाव मनांत येतील असें करावें म्हणजे झालें. पवित्र मंदिरांत पवित्र होऊन बाहेरच्या जगांत पवित्र व्यवहार करण्यासाठीं जाणें हा मूर्तिपूजेचा हेतु आहे. भारतीय संस्कृतींत मूर्तिपूजेचा महान् महिमा आहे. ज्या संस्कृतींत मूर्तिपूजा आहे, त्या समाजांत प्रेम, स्नेह, दयेचे पूर वाहिले पाहिजे होते; परंतु मोठ्या खेदाची गोष्ट ही, कीं श्रेष्ठकनिष्ठ भावांचीं भुतें या मंदिरांतहि धुडगूस घालीत आहेत ! आमच्या देवांच्या मूर्तीहि बाटतात व विटाळतात ! जेथें देवहि पतित व भ्रष्ट होऊं लागला, तेथें शुद्धि कोण करणार ? भूदेव ब्राह्मण ?

खरोखर मंदिरांची जरूरच नाहीं. या विश्वमंदिरांत अनंत मूर्ती आहेत. या विश्वांतील प्रत्येक अणुरेणूवरून या विश्वाच्या पाठीमागच्या शक्तीची कल्पना येते. एका अरबाला एका ख्रिश्चन मिशनऱ्यानें विचारलें, " देव आहे हें तुला कोणीं शिकविलें ? " तो अरब म्हणाला, " या वाळवंटांतील वाहणाऱ्या झुळझुळ झऱ्यानें. या वाळवंटांत वाढणाऱ्या, रसाळ फळें देणाऱ्या खजुरीच्या झाडांनीं. रात्रीं दिसणाऱ्या हिरव्यानिळ्या ताऱ्यांनीं. " तो मिशनरी खालीं मान घालून निघून गेला.



जिकडे तिकडे देवाच्या मूर्ती आहेत. तारे पाहून हात जोडावेसे वाटतात, फुलें पाहून हात जोडावेसे वाटतात. थोर व्यक्ति पाहून प्रणाम करावासा वाटतो. भव्य देखावा पाहून नमावेसें वाटतें. अनंत विश्वांतील अनंत मंदिरें व अनंत मूर्ती ! परंतु पाहतो कोण ?

विवेकानंद म्हणाले, " ज्या मूर्तिपूजेनें जगाला श्रीरामकृष्ण परमहंस दिले, त्या मूर्तिपूजेंत सहस्र दोष शिरले असले तरी ती मी उराशीं धरीन." साधन पवित्र असतें; परंतु स्वार्थी लोक तें भ्रष्ट करतात. गंगा पवित्र आहे; परंतु तिला घाण करणारे भेटले तर ती बिचारी काय करणार ?

## प्रतीकें : : २१

प्रत्येक संस्कृति कांहीं प्रतीकें निर्माण करते. फळांत सर्व वृक्षाचा विस्तार सांठवलेला असतो, त्याप्रमाणें प्रतीकांत अनंत अर्थ सांठवलेला असतो. आपल्याकडे सूत्रग्रंथांची रचना प्रसिद्ध आहे. त्या त्या शास्त्रांचे सूत्रग्रंथ आहेत. थोडक्यांत त्या त्या शास्त्रांचे सिद्धान्त त्या सूत्रांतून ग्रथित केलेले असतात. प्रतीकें म्हणजे संस्कृतीचीं सूत्रें होत. खरें पाहिलें तर प्रत्येक बाह्य क्रिया आंतरिक विचारांचें प्रतीक आहे. मनच शेंकडों कृतींतून प्रकट होतें. आधीं मन लवतें मग बाहेर शिर लवतें. आधीं हृदय गहिंवरतें मग डोळे भरून येतात. आधीं मन संतापतें मग हात उगारला जातो. मनाला फुटलेले कोंब म्हणजे या क्रिया.

भारतीय संस्कृतींत शेंकडों प्रतीकें आहेत. त्यांचा अर्थ शोधला पाहिजे. ज्या वेळेस अर्थहीन प्रतीकें पूजिलीं जातात, तेव्हां धर्म यंत्रमय होतो. त्या प्रतीकपूजेचा मग जीवनावर कांहींहि संस्कार होत नाहीं. अशीं यांत्रिक प्रतीकें मग निरुपयोगी वाटतात. नवतरुण त्या प्रतीकांना फेंकून देतात. त्या प्रतीकांतील अर्थ सांगा

असें त्यांचें म्हणणें असतें. अर्थ दिसतांच तें प्रतीक जिवंत वाटतें. त्या प्रतीकांत सामर्थ्य येतें.

या भिन्न भिन्न प्रतीकांकडे अर्थपूर्णदृष्ट्या पाहण्याचा मला नादच लागला आहे. ते अर्थ खरे असतील असें नाहीं. तें तें प्रतीक निर्माण होतांना तोच भाव तेथें असेल असें नाहीं; परंतु नवीन अर्थ त्या प्रतीकांत पाहिला म्हणूनहि कांहीं बिघडत नाहीं. अर्थाचा विकास होत असतो.

भारतीय संस्कृतीचें कमळ हें प्रधान प्रतीक आहे. सर्व प्रतीकांचा राजा असें कमळास म्हटलें तरी चालेल. भारतीय संस्कृतीस कमळाचा सुगंध येत आहे. या कमलपुष्पांत कोणता बरें एवढा महान् अर्थ आहे ?

ईश्वराच्या सर्व अवयवांना आपण कमळाची उपमा देतों. कमलनयन, कमलवदन, करकमल, पदकमल, हृदयकमल, असें म्हणण्यांत काय बरें स्वारस्य आहे ? कमळाजवळ अलिप्तपणा हा गुण आहे. पाण्यांत असून तें पाण्यावर राहतें, चिखलांत असून चिखलाच्या वर फुलतें. कमळ अनासक्त आहे. ईश्वर करून अकर्ता असें आपण वर्णितों. या सर्व जगाचा पसारा तो चालवितो; परंतु अनासक्त रीतीनें हा पसारा तो चालवीत आहे.

कमळामध्यें अलिप्तता आहे. तसाच दुसरा गुण म्हणजे वाइटांतूनहि चांगलें घेऊन स्वतःचा विकास करून घेणें हा गुणहि आहे. चिखलांतूनहि रमणीयत्व तें घेतें. रात्रंदिवस तपस्या करून आपलें हृदय मकरंदानें कमळ भरून ठेवतें. सुगंधानें भरून ठेवतें.

सूर्याकडे त्याचें तोंड असतें. प्रकाश पाहतांच तें फुलतें. प्रकाश जातांच मिटतें. प्रकाश म्हणजे कमळाचा प्राण. भारतीय संस्कृति प्रकाशोपासक आहे. ' तमसो मा ज्योतिर्गमय ' ही भारतीय संस्कृतीची आरती आहे.

कमळ शतपत्र आहे, सहस्रपत्र आहे. शंभर पांकळ्या, हजार पांकळ्या कांहीं कमळांना असतात. भारतीय संस्कृतीसुद्धां शतपत्रांची आहे. शेंकडों जाती-जमाती, अनेक वंश, अनेक धर्म, अनेक पंथ, यांच्यांतून सार घेऊन ती वाढत असते. एकेक नवीन पान ती जोडते. भारतीय संस्कृतीचें कमळ अद्याप पूर्ण फुललें नाहीं. तें फुलत आहे. विश्वाच्या अंतापर्यंत तें फुलत राहील. भारतीय संस्कृति अनंत पांकळ्यांचें कमलपुष्प होईल. कारण पृथ्वी अनंत आहे, काळ अनंत आहे, ज्ञान अनंत आहे !

फुललेल्या पवित्र कमळाचीं गाणीं गात शेंकडों भ्रमर येतील; परंतु कमलपुष्प



लक्ष देणार नाहीं. भारतीय संस्कृति स्वतःचीं स्तुतिस्तोत्रें गात बसणार नाहीं. जगाला तिची वाटलें तर स्तुति करूं दे. भारतीय संस्कृति गाजावाजा न करता फुलत राहील. जगाला गीतेची स्तुति करूं दे. जगाला बुद्धांचा महिमा गाऊं दे; जगानें गांधींना म्हणूं दे महात्माजी; जगानें म्हणूं दे रवींद्रनाथांना महर्षि. भारतीय संस्कृति आपल्या लेंकरांस सांगते, " तुम्ही कर्मांत रमा. निंदास्तुतीवर काटी लावून ध्येयांत बुडा. " तुम्ही स्वकर्मांत इतके तन्मय झालेत कीं कीर्ति आपोआप तुमच्याकडे येईल. आपोआप तुमचे पोवाडे जग गाईल.

कमळ म्हणतें, " अनासक्त रहा, प्रकाशाची पूजा करा, अमंगलांतून मंगल घ्या, तपस्या करा, केवळ सत्कर्मांत रमा, नवीन नवीन जोडा. " भारतीय संस्कृति म्हणजे काय, तर ' कमळ. '

दुसरें महान् प्रतीक म्हणजे यज्ञ किंवा होम. भारतीय संस्कृति म्हणजे त्याग. समाजांत एकमेकांसाठीं झिजावें लागेल, त्याग करावा लागेल. एकमेकांनीं एकमेकांचें जीवन व्हावयाचें. कोणताहि संस्कार असो, कोणताहि धार्मिक विधि असो, तेथें होम आहे. तुम्ही कोणतेंहि ध्येय घ्या, कोणतेंहि समाजसेवेचें कर्म उचला, तेथें तुम्हांला होम करावा लागेल. उत्तरोत्तर वाढता होम करावा लागेल.

उपनयनाच्या वेळेस होम आहे. तुला ज्ञान मिळवावयाचें असेल तर इतर सर्व सुखांचा होम करावा लागेल. " सुखार्थिनः कुतो विद्या, कुतो विद्यार्थिनः सुखम् " हें ध्यानांत धरावें लागेल.

विवाहाच्या वेळेस होम आहे. तुम्हांला उभयतांस संसारांत आनंद हवा असेल, तर परस्परांसाठीं वैयक्तिक इच्छांचा होम करावा लागेल. तुमचा गृहस्थाश्रम तरच सुखकर होईल. पति आपलेंच तुणतुणें वाजवील, पति आपलाच हट्ट धरील तर आनंद कसा नांदेल ? संसार म्हणजे सहकार्य, देवाण-घेवाण. आणि शेवटीं तुमचा गृहस्थाश्रमहि समाजासाठीं आहे. समाज मागेल त्या वेळेस तुमचीं मुलेंबाळें, तुमचें घरदार, तुमचें सर्वस्व अर्पण करा. सेवा म्हणजे होम !

पावित्र्य म्हणजे चिरयज्ञ. उत्तरोत्तर अधिकाधिक पावित्र्य मिळविण्यासाठीं क्षुद्र वस्तूंचा होम करावा लागतो. सर्वस्वत्याग म्हणजे निर्वाण, म्हणजेच मोक्ष, म्हणजेच आपलें मरण डोळ्यांनीं पाहणें. म्हणजेच पावित्र्याची पराकाष्ठा !

या यज्ञप्रतीकाचेंच भस्मप्रतीकांत रूपांतर झालें आहे. संध्या करतांना, देवपूजा करतांना अंगाला भस्म लावावयाचें. सर्वांगास भस्म फांसावयाचें. देवाची प्राप्ति,

ध्येयप्राप्ति फुकाफुकीं नाहीं. त्यासाठीं होळी पेटवावी लागते. स्वार्थाची, सुखविलासांची राखरांगोळी करावी लागते. सर्वेंद्रियांच्या वासनांचें भस्म करावें लागतें. शरीराचें भस्म करावें लागतें. देवघरांत शिरत आहेस, भस्म लावून जा. ध्येयाची पूजा करावयाची आहे ना? सर्वस्वावर निखारा ठेवून बाहेर पड. तुकाराममहाराजांनीं म्हटलें आहे :

" संसारास आग लावूनियां हातें। मागुतें परौतें पाहूं नये ॥"

संसारास आग लावून मागें पाहूं नका. मागच्याचें कसें होईल, याची चिंता नका करूं. तुझें ध्येय व तूं. अमळनेरचे थोर संत सखाराममहाराज ज्या वेळेस पंढरपूरला जावयास निघत त्या वेळेस ते आपल्या झोंपडीला प्रथम काडी लावीत आणि मग पंढरपूचा रस्ता धरीत! देवाकडे जातांना मागची भुणभुण नको. देवाकडे जाणें, ध्येयाची पूजा करणें म्हणजे सतीचें वाण आहे!

आपण कपाळाला गंध कां लावतों? देवाला गंध लावल्यावर स्वतःला गंध लावावयाचें. आधीं देवाला गंध मग मला गंध. देवाची पूजा करून त्याच्या चरणीं भक्त मस्तक ठेवतो. देवाच्या पायांवर ठेवलेल्या स्वतःच्या कपाळाला तो गंध लावतो. " हें डोकें आतां माझें नाहीं, हें देवाचें डोकें झालें. देवाला आवडणारे विचारच या डोक्यांत आतां येतील. हें मंगलमूर्तीचें डोकें आहे. हें आतां माकडाचें आग लावणारें, घाणीनें भरलेलें डोकें नाहीं. या डोक्याची आतां पूजा करूं दे. या डोक्यालाहि गंध लावूं दे, " अशी गंधाच्या पाठीमागची भूमिका आहे.

निरनिराळे महाराज व त्यांचे भक्तगण अंगावर मुद्रा ठोकतात. कपाळावर छातीवर, दंडावर, सर्वत्र मुद्रा लावतात, त्यांतील हाच अर्थ आहे. हें कपाळ देवाचें, हे हात देवाचे, हें हृदय देवाचें. सर्व अवयवांवर देवाचा शिक्का. देवाच्या सेवेंत, जनताजनार्दनाच्या सेवेंत, अवघाचि संसार सुखाचा करण्याच्या महान् कर्मांत, हीं गात्रें चंदनाप्रमाणें झिजतील; अशी प्रतिज्ञा—मुद्रा मारण्यांत येते.

आपण यज्ञोपवीत घालतों. पूर्वींचा त्यांतील अर्थ कांहींहि असो; मला एके दिवशीं त्या तीन पदरीं जानव्यांत केवढा थोर अर्थ सांपडला. कर्म, ज्ञान, भक्ति यांचे तीन पदर म्हणजे हें जानवें. या तिन्हींची एकत्र बांधलेली गांठ म्हणजे ब्रह्मगांठ. कर्म, ज्ञान व भक्ति जेव्हां आपण एकमेकांत मिसळूं तेव्हांच ब्रह्माची गांठ पडेल! केवळ कर्मानें, केवळ भक्तीनें, केवळ ज्ञानानें ब्रह्मगांठ पडणार नाहीं. फुलाची पांकळी, तिचा रंग व तिचा गंध यांत अविनाभाव असतो. दूध, साखर



व केशर ज्याप्रमाणें आपण एकजीव करतों, त्याप्रमाणें कर्म—ज्ञान—भक्तींचा एकजीव केला पाहिजे.

आपण देवाला न हुंगलेलें फूल वहातों. किडलेलें, वासलेलें फूल वहात नाहीं. तें फूल म्हणजे काय? तें फूल आपल्या हृदयाचें प्रतीक आहे. त्या फुलाच्या रूपानें आपण आपलें हृदयपुष्पच देवाला वहात असतों. वासनांनीं वास न घेतलेलें असें हृदय देवाला वहा. ज्या हृदयाचा दुसरा कोणींहि वास घेतलेला नाहीं, ज्या हृदयाचा दुसरा कोणी स्वामी नाहीं, दुसरा कोणी भोक्ता नाहीं, असें हृदय देवाला अर्पण करा. भक्ति अव्यभिचारिणी असते. Love is jealous. प्रेमाला दुसरें सहन होत नाहीं. एकालाच हृदय दे. देवाला द्यावयाचें असेल, देवाला दे. जेथें देशील तेथें तें संपूर्णपणें दे. ताजें, रसानें भरलेलें, निर्दोष, पूर्णपणें फुललेलें, सुगंधी असें तुझें हृदयपुष्प सेवेच्या कर्मांत अर्पण कर.

देवाला नैवेद्य दाखवतों म्हणजे काय करतों? कोणता नैवेद्य देवाला प्रिय आहे? आपल्या सर्व क्रिया म्हणजे नैवेद्य. तें लहानसा वाटीभर निर्मळ दूध म्हणजे तुझ्या स्वच्छ सुंदर क्रिया होत. देवाला कर्मांचा नैवेद्य अर्पण करावयाचा. जें केलें तें देवाला अर्पण करावयाचें. " ॐ तत्सत् ब्रह्मार्पणमस्तु " हा प्रत्येक कर्मांचा अंतिम मंत्र आहे.

माझ्या मनांत ज्या दिवशीं ही कल्पना आली, त्या दिवशीं देवाची मला करुणा आली. देव अनंत जन्मींचा उपाशी असेल असें मनांत आलें. घरांत वृद्ध, पवित्र माता असावी. ती इतर कांहीं पदार्थ खात नसते; परंतु तिच्या मुलांनीं तिला कांद्याचीं भजीं, लसणाची चटणी, किंवा असेच पदार्थ नेऊन दिले तर ती व्रतचारिणी माता काय म्हणेल? " बाळांनो! माझी थट्टा नका करूं. या पदार्थांना मी शिवतें का? द्यायचें असेल तर नीट द्या, नाहीं तर कांहींहि देऊं नका; परंतु घाण नका आणूं माझ्यासमोर, " असें ती माउली म्हणेल. देवहि असेंच म्हणत असेल. आपण मानव आज हजारों वर्षें ज्या अनंत क्रिया अंतर्बाह्य करीत आहोंत, त्या सर्व देवाच्याजवळ पडत आहेत. त्या क्रियांचा नैवेद्य त्याला मिळत आहे. परंतु तो नैवेद्य त्याला खाववेल का? त्यांतील एक तरी घांस त्याला गिळवेल का? नैवेद्य दाखवणाऱ्या प्रत्येकानें हा विचार मनांत आणावा.

देवावर आपण अभिषेक करतों. अभिषेक म्हणजे संततधार. घागरभर पाणी एकदम ओतणें म्हणजे अभिषेक नव्हे. अभिषेक हें प्रतीक आहे. ज्याप्रमाणें ती

पाण्याची धार सारखी अखंड देवावर पडत आहे, त्याप्रमाणें सारखी मनाची धार देवाच्या चरणीं पडणें, परमेश्वराच्या स्वरूपीं मनोबुद्धि पूर्णपणें तैलधारवत् जडणें हा त्यांतील अर्थ आहे. तो जलाभिषेक म्हणजे तुझ्या जाणिवेचा अभिषेक आहे.

आपण दक्षिणा ओली करून देतों. समाजाला जी जी देणगी देशील, जें जें दान देशील त्यांत हृदयाचा ओलावा असूं दे. जें कर्म हृदयाचा ओलावा ओतून केलेलें आहे तें अमोल आहे. तुझ्या सर्व क्रिया आर्द्र असूं देत. कोरडी सहानुभूति नको. देखल्या देवा दंडवत नको. कष्टाचा रामराम नको.

आपण त्या दक्षिणेवर तुळशीपत्र ठेवतों. तें रुक्मिणीचें तुळशीपत्र आहे. दक्षिणा रुकाभर असो कीं दशसहस्र रुपये असो. त्या दक्षिणेवर तुळशीपत्र ठेव, तें भावभक्तीचें तुळशीपत्र आहे. पै का रुपया हा प्रश्न नाहीं. तेथें भाव असला म्हणजे झालें. देव भावाचा भुकेला. ज्या देणगीवर हें भक्तिभावाचें तुळशीपत्र नाहीं, ती देणगी मर्यादित आहे. परंतु भावाच्या तुळशीपत्रासह दिलेली दिडकी कुबेराच्या संपत्तीपेक्षां वजनदार आहे.

देवाला पत्री प्रिय आहे. तुळशीपत्र, बिल्वपत्र, दूर्वादळ, यांची देवाला आवड आहे. सामान्य लोकांचीं कर्मे साधीं असतात. त्यांना ना फार गंध, ना फार रंग. परंतु देवाला हीं कर्मे प्रिय आहेत. सुगंधी, रसमय असें कर्म एकादा महात्मा देवाला अर्पील. परंतु आपण सारे दुर्बळ जीव. पण आपलीं हीं साधीं कर्में जर निर्मळ असतील तर तीं देवाला थोरामोठ्यांच्या कर्मापेक्षांहि आवडतील. संगीतज्ज्ञ मुलाच्या रागदारीपेक्षां लहान मुलाचें अकपट बोबडें बोलणें आईला अधिक आवडतें.

स्वस्तिक चिह्न भारतीय संस्कृतींत महत्त्वाचें आहे. भिंतीवर आधीं स्वस्तिक काढा. स्वस्तिक म्हणजे कल्याण. सर्वांचें शुभ असो, सर्वांचें भलें होवो, असा त्या चिह्नाचा भाव आहे.

उपनयनाचे वेळेस लंगोटी लावतात. कमरेला तीन पदरी मौंजी बांधतात. कमर बांधून विद्येसाठीं बाहेर पड. लंगोटी लावणें म्हणजे इंद्रियदमन करणें. लंगोटबंद राहशील तरच गड्या ज्ञान मिळवूं शकशील. स्वछंद व स्वेच्छाचारी राहून कांहींहि मिळवितां येणार नाहीं. संयमी हो.

मांडीवर व दंडांवर दर्भ कापतात. गुरूकडे सेवा करतांना हातपाय झिजून तुटतील, परंतु खंत बाळगूं नको. गायींच्या पाठीमागें रानांत जावें लागेल.



तुझे पाय गळतील. पाणी ओढून तुझे हात तुटतील. विद्येसाठीं सारें केलें पाहिजे. दर्भाच्या टोंकासारखी कुशाग्रबुद्धि मिळवावयाची असेल, तर हातपाय हलविल्याशिवाय कसें होईल ?

मौंजीबंधनाच्या वेळेस मातृभोजन असतें. इतके दिवस आईजवळ होतों, आतां दूर जायचें. ज्ञानासाठीं दूर जावयाचें. शेवटचें तें सहभोजन असतें. आई वांसराला आतां दूर करते. इतके दिवस सगुणभक्ति होती. आतां निर्गुणभक्ति सुरू व्हावयाची. आतां आई मनांत. गुरुगृहीं आतां गुरु हीच माउली. नवीन ज्ञानदात्री माउली आतां जोडावयाची.

ब्रह्मचारी, परिव्राजक, संन्यासी या सर्वांच्या हातांत दंड हवा. दंडधारी असण्यांत खोल अर्थ आहे. दंड ज्याप्रमाणें सरळ असतो, तो वांकत नाहीं व लवत नाहीं, त्याप्रमाणें ब्रह्मचारी व संन्यासी यांनीं वांकावयाचें नाहीं. मोहापुढें मान लववावयाची नाहीं. कामक्रोध समोर आले तर त्यांना हांकून लावावयाचें. विकारांची मस्ती जिरवायची. त्याचप्रमाणें ब्रह्मचारी वा संन्यासी कोणाची हांजी हांजी करणार नाहीं. तो ध्येयनिष्ठ राहील. ध्येयाला सोडणार नाहीं. ध्येयाला तडजोड माहीत नाहीं. सत्याला तडजोड ठाऊक नाहीं. गृहस्थाश्रमांत सारी तडजोड आहे. गृहस्थाश्रम म्हणजे तुझें थोडें, माझें थोडें. परंतु ब्रह्मचर्य, संन्यास म्हणजे प्रखरता. तेथें त्वया अर्धं मया अर्धं असला बाजार नाहीं. तेथें सारें सरळ सीधें काम. ब्रह्मचाऱ्याची वा संन्याशाची मान एका ध्येयासमोर मात्र लवेल. गुरु म्हणजे ध्येयमूर्ति, त्याच्यासमोर लवेल. इतरत्र मात्र ती लवणार नाहीं. ब्रह्मचर्याचें, संन्याशाचें असें हें धगधगीत तेज आहे. त्या तेजासमोर जग वांकेल, जग लोटांगण घालील. ज्याच्यासमोर वासनाविकारांनीं लोटांगण घातलें, त्याच्यासमोर कोण लोटांगण घालणार नाहीं ?

विवाहाच्या वेळेस अंतरपाट धरतात. शेवटची टाळी वाजतांच हा अंतरपाट दूर होतो. वधूवरांत आतां अंतर नको. या घटकेपर्यंत अंतर होतें; परंतु आतां जीवन एकरूप झालें. आतां मिळणी झाली. आतां तूं माझी व मी तुझा. तुझा हात माझ्या हातांत, माझा हात तुझ्या हातांत; तुझी माळ माझ्या गळ्यांत शोभेल, माझी माळ तुझ्या गळ्यांत शोभेल. परस्परांस शोभवूं, संतोषवूं. माझें तें तुझें व तुझें तें माझें.

सप्तपदीचा विधि सर्वांत महत्त्वाचा. सात पावलें बरोबर चालूं. परंतु सात

पावलें म्हणजे का सात पावलेंच ? आपण नेहमीं बरोबर राहूं, बरोबर चालूं.

**संत म्हणति सप्तपदें सहवासें सख्य साधुशीं घडतें**

जो साधु असेल, त्याच्याबरोबर चार पावलें चल. तो तुमचा होतो. तो तुम्हांला विसरणार नाहीं. सात पावलें चालणें म्हणजे कायमचें सांगातीं होणें. वार सात आहेत. आठवड्यांतील सातहि दिवशीं आपण बरोबर आहोंत. प्रत्येक दिवशींचें आपलें पाऊल बरोबर पडत आहे. सप्तपदी म्हणजे जीवनयात्रेंत आपण दोघें बरोबर राहूं, बरोबर चढूं, बरोबर पडूं, सुखदुःखांत एकरूप राहूं, असा भाव. सप्तपदीच्या वेळेसच अग्नीस सात प्रदक्षिणा घालीत असतांना वधूवरांस सूत्रानें वेढितात. वधूवरांच्या भोंवतीं सूत गुंडाळलें जातें. वधूवर एकत्र बांधलीं जातात. वधूवरांचा जीवनपट आतां एकत्र गुंफला जाणार. आतां प्रत्येकाचा अलग जीवनपट नाहीं. दोघांनीं मिळून सुखाचें वा दुःखाचें एकच वस्त्र विणावयाचें. बरें-वाईट काय होईल तें दोघांचें. त्या सूत्रामध्यें एकसूत्रीपणाहि संदर्शिला जातो. आपण संसरांत एकसूत्रीपणानें राहूं. आततायीपणा अन्योन्यांनीं दाखवावयाचा नाहीं, असाहि अर्थ त्या सूत्रवेष्टनांत पाहतां येईल.

वरातीच्या वेळेस झाल असते. वराच्या घरीं वधू येते त्या वेळेस सोळा दीपांनीं त्यांना ओंवाळण्यांत येतें. झाल प्रत्येकाच्या माथ्यास लावण्यांत येते. हे सोळा दिवे काय दाखवितात ? हे सोळा दिवे म्हणजे चंद्राच्या षोडश कला असाव्यात. चंद्र ही मनाची देवता आहे. ‘ चंद्रमा मनसो जातः ’ असें श्रुतिवचन आहे. चंद्राला मनाची देवता मानण्यांत महान् काव्य आहे. चंद्राला सदैव कृष्णपक्ष व शुक्लपक्ष. चंद्र कधीं अर्धा, कधीं पाव, कधीं अजिबात नाहींसा होतो. आपल्या मनाचें असेंच आहे. कधीं तें अत्यंत उत्साही असतें, कधीं अगदीं निराश, कधीं सात्त्विक वृत्तीनें उचंबळलेलें, तर कधीं द्वेषमत्सरांनीं बरबटलेलें. कधीं मनांत अंधार तर कधीं प्रकाश. मन क्षणांत रडतें तर क्षणांत हंसतें. या क्षणीं उंच आकाशांत, दुसऱ्याच क्षणीं खोल अनंत दरींत !

असें जें हें चंचल मन, त्या चंचल मनाचा संपूर्ण रीत्या तुम्हां वधूवरांच्या संबंधांत विकास होवो. मनाच्या षोडश सत्कलाविकासांत अशा ह्या षोडश दीपांनीं एकमेकांस ओंवाळण्यांत, हे षोडष दीप वधूवरांस दाखविण्यांत अर्थ असेल. विवाह कां आहे ? विवाह हा शेवटीं परस्परांच्या विकासासाठीं आहे. एकमेकांनीं एकमेकांस हात देत, एकमेकांस शिकवीत, एकमेकांस सांभाळीत,



उत्तरोत्तर अधिकाधिक विकास करून घ्यावयाचा. केवळ पुरुष अपूर्ण आहे. केवळ स्त्री अपूर्ण आहे. परंतु दोघांनीं एकत्र येऊन जीवनाला पूर्णता आणावयाची, इत्यादि किती तरी भाव त्या झालीमध्यें असतील. फारच पवित्र व सुंदर तो देखावा असतो. रात्रीची वेळ असते. वधू माहेराहून सासरीं आलेली. नवीन जीवनाला प्रारंभ. वधूचें नांव बदलण्यांत येतें. जणुं पूर्वीच्या आयुष्याचा तिनें संन्यास घेतला. संन्यासाश्रमांत पूर्वीचें नांव बदलतात. जणुं नवीनच जन्म सुरू. पूर्वीचे संबंध, पूर्वीच्या आसक्ती, पूर्वीचें सारें पुसून टाकावयाचें. पतीच्या नवीन घरीं नवीन संसार सुरू करावयाचा. हृदयाची गजबज झालेली असते. अशा वेळेस तें षोडश दीपदर्शन असतें. त्या झालींतील दिव्यांच्या ज्योती झळाळत असतात. तुमच्या आत्मचंद्राचा असाच प्रकाश पडो.

**नजर न आवे आतमज्योति**
**तेल न बत्ती बुझ नहिं जाती**
**जैसे माणिकमोतीं ॥**
**झिलमिल झिलमिल निशिदिन चमके**
**जैसी निर्मळ ज्योति ॥**
**कहत कबीर सूनो भाई साधू**
**घरघर वाचत पोथी ॥**

रात्रंदिवस आंत चमकणारें हें दिव्य स्वरूप, त्याची ओळख करून घ्या. घरोघर पोथ्या वाचतात; परंतु जें आत्मतत्त्व, जी कधीं न विझणारी आत्मज्योति, माणिकमोत्यांप्रमाणें, निर्मळ ताऱ्यांप्रमाणें अखंड तेवत आहे, ती कोणाच्या नजरेस येते ? कोणाच्याहि नाहीं. परंतु वधूवरांनो ! तुम्ही या आत्म्याची ओळख करून घ्या. हळूहळू शांतविषय होऊन मनाची प्रसन्नता, संपूर्ण प्रसन्नता, चिरंजीव प्रसन्नता प्राप्त करून घ्या.

भारतीय संस्कृतींतील षोडश संस्कारांत अशीं अनेक प्रतीकें आहेत. मरणानंतर जेव्हां शव नेण्यांत येतें तेव्हां मडकें पुढें धरावयाचें. म्हणजे हा मृण्मय देह होता तो फुटला. त्यांत रडण्यासारखें किंवा अनैसर्गिक असें कांहीं नाहीं हें सूचित केलें आहे. त्या शवाला स्नान घालतात, नवीन वस्त्र देतात. कारण तें नवीन घरीं जावयाचें. शुद्ध, स्वच्छ होऊन देवाकडे जाऊं दे. कोरें करकरीत

वस्त्र नेसून जाऊं दे. मरतांना घोंगडीवर घेतात. त्यांत अनासक्त होऊन, संचयवृत्ति सोडून देवाघरीं जा, हा देह सोड, असें ध्वनित केलें आहे. मरतांना प्राण जातांच तुळशीपत्र तोंडावर ठेवतात. त्याचा अर्थ देहावर तुळशीपत्र ठेवलें. हा देह आतां देवाचा. जिवंतपणींहि तुळशीच्या माळा वगैरे गळ्यांत घालतात. त्यांतील अर्थ हाच असतो कीं देह देवाचा. देहावर तुळशीपत्र ठेवलें.

कानांत रुद्राक्ष घालतात, म्हणजे कान शुभ ऐकोत; शिव, कल्याणकर असेंच ऐकोत हा भाव. कारण रुद्राक्ष शंकराला प्रिय. शंकर म्हणजे कल्याण करणारा. शंकराला तें आवडतें जें सदा शिव असतें; हितकर, मंगल असें असतें. गळ्यांतहि रुद्राक्ष घालतात. बोटांत पवित्रक घालतात. बोटें पवित्र कर्मे करतील हाच भाव.

वारकरी भगवा झेंडा नेहमीं जवळ बाळगतो. जेथें जाईल तेथें देवाचा सैनिक, खुदा–इ–खिदमतगार, असा त्यांत भाव आहे. भगवाच रंग कां? भगवा रंग त्याग सुचवितो. संन्याशाचींहि वस्त्रें लाल. संन्यास म्हणजे संपूर्ण त्याग. महान् यज्ञ. भगवा रंग ज्वाळांचा आहे. ज्वाळा लालसर दिसतात, अगदीं लाल नसतात. म्हणून हा भगवा रंग.

शंकराचार्यांबरोबर नेहमीं मशाल असते. याचा अर्थ सदैव प्रकाशाचीच पूजा करण्यांत येईल असा असावा. धर्माचें ज्ञान देणारा आचार्य अंधारांत राहून कसें चालेल? सदैव ज्ञानयज्ञ पेटता हवा, ज्ञानसूर्य तळपत असला पाहिजे.

आपण मोठी यात्रा वगैरे करून आलों म्हणजे कांहीं तरी सोडतों. भगिनी निवेदितादेवींनीं यांतील रहस्य एके ठिकाणीं सांगितलें आहे. त्या यात्रेचें स्मरण रहावें म्हणून आपण प्रिय वस्तूंचा त्याग करतों. यात्रा म्हणजे पवित्र वस्तूंचें दर्शन. पवित्र स्थलांचें दर्शन. यात्रा म्हणजे जीवनाला पावित्र्य देणारा अनुभव. हा अनुभव आपल्या जीवनांत अमर झाला पाहिजे. नाहीं तर तात्पुरतें गंगेचें दर्शन प्रसन्न, पावन वाटतें. पुन्हां घरीं आल्यावर त्याचें कांहीं स्मारक नाहीं. तर तसें होऊं नये म्हणून आपण कांहीं त्यागसंकल्प करतों. कोणी म्हणतो, मी रामफळ सोडीन, कांदा सोडीन, कोणी म्हणतो डाळिंब सोडीन, असें कांहीं तरी सोडण्याचें निश्चित केल्यामुळें ज्या ज्या वेळेस रामफळ पाहूं, ज्या ज्या वेळेस कांदा व डाळिंब पाहूं, त्या त्या वेळेस काशीयात्रा पुन्हां आठवेल. पुन्हां गंगेचें स्मरण, महादेवाचें स्मरण. गंगातीरावरील प्राचीन ब्रह्मर्षी, राजर्षी यांच्या तपश्चर्येचें स्मरण; शंकराचार्यांच्या अद्वैताचें स्मरण. आपण पुन्हां त्या यात्रेंत जणुं



जातों. एका क्षणांत तो सारा अनुभव पुन्हां जागृत होतो व जीवनांत अधिक खोल जातो. तो अनुभव आपल्या रक्तांत मिसळतो, अधिक आपणांस होतो.

आपण जीवनांतील महान् अनुभवांच्या संपत्तीची काळजी घेत नाहीं म्हणून आपण अंतर्दरिद्री असतों. भिकारी हृदयें व भिकारी मनें.

"भिकारी जरि इतुकी केली मी वणवण
रिकामी झोळी माझी जवळ नाहीं कण"

आपली जीवनाची झोळी नेहमीं रिकामी. कारण सारे अमोल अनुभव गळून जातात. महात्माजींचें दर्शन झालें, तें दर्शन आपल्या जीवनांत सांठवलें गेलें पाहिजे. विलायती वस्त्र सोडल्यानें, ग्रामोद्योगी ज्या वस्तू नाहींत त्यांचा त्याग केल्यानें, अस्पृश्यतेचा त्याग केल्यानें, तें दर्शन अमर होईल.

हे अनुभव दोन रीतींनीं अमर होतील. कांहीं वस्तूंचा त्याग व कांहीं वस्तूंचा स्वीकार. जें अमंगल आहे त्याचा त्याग करूं, जें मंगल आहे तें घेऊं. विदेशी टाकूं व खादीचें व्रत घेऊं. खादीच्यामुळें तें महात्माजींचें दर्शन कायमचें राहील. तो प्रसंग आठवेल. त्या वेळच्या भावना आठवतील. तें वातावरण आठवेल. आपले असे अनुभव उडून जाऊं नयेत. हे मोलवान् अनुभव, पवित्र प्रसंग म्हणजे तर जीवनांतील खरी मिळकत. परंतु तीच आपण विसरत असतों, फेंकून देत असतों.

आपण घरून कोठें दूर जाऊं लागलों म्हणजे आपल्या हातावर दहीं वाढतात. तें दहीं खावयाचें, परंतु हात धुवावयाचे नाहींत. हात तसेच चाटून ठेवावयाचे. आरोग्याच्या दृष्टीनें पहाणाऱ्यास ह्यांत बावळटपणा वाटेल; परंतु भावनांच्या दृष्टीनें पाहणाऱ्यास त्यांत सहृदयता दिसेल. दहीं स्निग्ध वस्तु आहे. स्निग्धता विसरूं नकोस. स्निग्धता धुऊन टाकूं नकोस. जातांनाहि तुझ्या हातावर मी स्नेहाची स्निग्धता ओतीत आहें. ते चिकट-ओशट हात, म्हणजे प्रेमानें हृदयें चिकटविण्याचीं साधनें आहेत. ओला हात घेऊन जा, येथून कोरडा जाऊं नकोस, असा त्यांत भाव आहे. आणि तो हात तसाच राहूं दे, म्हणजे तें प्रेम, ती आर्द्रता कधीं विसरूं नकोस.

जांवयाच्या हातावर लग्नाच्या भोजनाच्या वेळेस तुपाची आपोष्णी वाढतात. त्यांतहि हाच भाव आहे. मुलीची माता म्हणते, "हें प्रेम घ्या. तुमच्या हातीं मुलगी सोंपविली. तो तुमचा हात कठोर नका करूं. तो तुमचा हात स्नेहार्द्र असूं

दे. प्रेमानें भरलेल्या हातानें माझ्या कन्येचा हात धरा." ती तुपाची आपोष्णी घेणारे जांवई आपला हात सदैव प्रेमळ राखतात का ? ती तुपाची आपोष्णी पाहतांच माझें हृदय भरून येतें. जांवयाचें हृदय भरून येतें कीं नाहीं मला माहीत नाहीं. परंतु त्या प्रतीकांत मला सहृदयतेचा सागर दिसून येतो.

वधूवरांच्या अंगाला हळद लावतात. वस्त्रेंहि हळदींत रंगवतात. पिवळ्या रंगाचा काय अर्थ ? हळद आरोग्यदृष्ट्या चांगली म्हणून ती वापरतात असें कोणी म्हणतील; परंतु तें आरोग्याच्या प्रतीकापेक्षां निराळेंच कांहीं आहे असें मला वाटतें. तुमचें सारें सोनें होवो असा त्यांत भाव आहे. सुखाचा संसार सोन्यासारखा होवो. अंगावर पिवळ्या सोन्याचे दागिने नसतील ! ते जड दागिने नसले तरी चालतील. आपल्या संसारांत त्यामुळें व्यत्यय नाहीं येणार. कुठेंहि, कसल्याहि परिस्थितींत आपण आनंदानें राहूं असा त्यांत भाव असावा असें वाटतें. हृदयाची संपत्ति त्यामुळें दिसते. भावनांच्या संपत्तीची, सहानुभूतीच्या सोन्याची वाण न पडो असें हळद ती सुचवते. जीवनाचेंच सोनें करूं असा त्यांत भाव आहे.

संक्रान्तीस आपण तिळगूळ देतों. तिळ म्हणजे स्नेह. त्या स्नेहांत गूळ मिसळावयाचा. म्हणजे कृत्रिम, वरपांगी, अंतर्विष असें प्रेम अतःपर नाहीं देणार; तर त्या स्नेहांत खरोखरच सद्भाव असेल, तें मधुर प्रेम असेल. मागचें सारें विसरूं. आपल्या जीवनाचें संक्रमण होऊं दे. जीवनांत क्रांति होऊं दे. पूर्वीचे द्वेषमत्सर जाऊन प्रेमाचे–सत्प्रेमाचे संबंध आतां जडूं देत.

हुताशनीस होळी करून बोंब मारावयाची. हुताशनीच्या आधीं महिनाभर शिमगा चालतो. मनुष्याच्या मनांतील दबलेल्या वैषयिक वृत्तींस बाहेर काढून त्यांना जाळावयाचें असा त्यांत हेतु आहे. आणखी काय आहे मनांत, ओक. आणखी काय आहे मनांत, बोल. मनांतील सारी घाण बाहेर काढावयाची. दहा दिवस लहान होळ्या; परंतु शेवटीं प्रचंड होळी पेटवावयाची. जीवनांतील सारी घाण जळली हें जगाला जाहीर करावयाचें. "ही पहा घाण जाळली सारी." बोंब मारून, जगाला घाण दाखवून, ती त्याच्या देखत जाळावयाची आणि मग ती राख अंगारा म्हणून लावावयाची. कारण त्या राखेंतून नवजन्म होणार. जीवनाला खरा विशुद्ध रंग चढणार ! होळीशिवाय रंगपंचमी नाहीं. जीवनांतील घाण जाळा च मग रंगपंचमी खेळा. मग खरा आनंद ! शंकराच्याच देवळांत बुडबू करतात.



कारण शंकरानें मदनाची होळी पेटविली होती ! देवालयांत कांसव असतें. कांसवाप्रमाणें इंद्रियांवर संयम मिळवा.

घेई ओढून संपूर्ण विषयांतून इंद्रियें
जसा कांसव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ॥

कांसव म्हणजे इंद्रियसंयमाचें प्रतीक. देवालयांत घंटा वाजवावयाची, यामध्यें योगांतील अनुहतध्वनीची कल्पना असावी असें वाटतें. जिवाशिवाचें ऐक्य झालें. समाधि लागली. आनंदाचें गाणें सुरू झालें. मंगलवाद्यें जीवनमंदिरांत सुरू झालीं. अनुहतध्वनीची गर्जना सुरू झाली. योगमार्गांत तो अनुहतध्वनि ऐकूं येतो असें म्हणतात. अनुहत म्हणजे सारखा वाढणारा. सारखा अखंड असा एक नाद ऐकूं येतो असें म्हणतात ! घंटावादनांत हा अनुहतध्वनि गर्भित असेल वा देवाचें दर्शन झालें म्हणून मंगल वाद्य वाजवावें असाहि अर्थ असेल; किंवा विश्वाचा पसारा चालवण्यांत रंगून गेलेल्या देवाला हांक मारून, घंटा वाजवून, सांगावयाचें कीं, "देवा, क्षणभर तरी तुझ्या दारांत आलों होतों. क्षणभर तरी संसारांतून मन बाहेर काढून, आपल्याच डबक्यांतून बाहेर येऊन तुझें दर्शन घेतलें बरें," असाहि भाव असेल !

भरलेल्या कलशाची फार महती आहे. लग्नाच्या वेळेस वऱ्हाडणी हातांत भरलेले कलश घेऊन उभ्या असतात. जीवन म्हणजे एक मातीचा कलशच आहे. ज्याप्रमाणें रित्या घड्याला महत्त्व नाहीं, त्याप्रमाणें रित्या जीवनाला महत्त्व नाहीं. घडा भरलेला असला म्हणजे त्याला आपण डोक्यावर घेतों, त्याप्रमाणें तुमचा जीवनाचा कलश जर प्रेमानें भराल, सत्कृत्यांनीं भराल, ज्ञानानें भराल, तरच लोक तुम्हांला डोक्यावर घेतील. रिकामी घागर अमंगल आहे. भरलेली घागर मंगल आहे. भारतीय संस्कृतींतील हे मंगल कलश सांगत आहेत, "जीवन मांगल्याचें करा."

देवाला नीरांजन ओंवाळणें म्हणजे काय ? खरोखर हें जीवन पेटवून देवाला ओंवाळावयाचें आहे, जीवनाची मेणबत्ती सारखी पेटत ठेवावयाची. "देवा, ही जीवनाची मेणबत्ती समाजासाठीं वितळली बरें !" असें देवाला नीरांजन ओंवाळून सांगावयाचें. पंचारती म्हणजे पंचप्राण. पंचप्राण ध्येयासाठीं ओंवाळून टाकावे लागतात.

उदबत्ती म्हणजे काय ? " हें जीवन पेटवून मी सुगंध देईन " असें सांगणें. पेटल्याशिवाय सुगंध नाहीं. देवाला चंदन लावणें म्हणजे काय ? " हा देह चंदनाप्रमाणें झिजवून त्याचा गंध तुला देईन " हाच त्यांत अर्थ आहे. देवाला प्रदक्षिणा घालणें म्हणजे काय ? प्रदक्षिणेनें देवाचें स्वरूप मनांत ठसतें. एक प्रदक्षिणा झाली कीं देवाला पहावयाचें, प्रणाम करावयाचा, कीं पुन्हां दुसरी सुरू. प्रदक्षिणा तीन घाल, अकरा घाल, एकशें आठ घाल. जितक्या प्रदक्षिणा अधिक, तितकी मूर्ति अधिक ठसावेल. प्रत्येकानें आपल्या ध्येयाभोंवतीं प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. मजुरांची सेवा हें ध्येय ठरविणाऱ्यानें मजुरांभोंवतीं सारख्या प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. त्यांच्या चाळी पाहिल्या पाहिजेत. त्यांचें जीवन पाहिलें पाहिजे. सारखे मजूर देवाला प्रदक्षिणा घालाल तेव्हांच मजुरांचें खरें स्वरूप कळेल. त्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत कीं आनंद आहे, तोंडावर तेज आहे कीं प्रेतकळा आहे, त्यांना नैवेद्य मिळाला कीं नाहीं, त्यांच्या अंगावर वस्त्रें आहेत कीं नाहींत, तें तेव्हांच कळेल. राष्ट्रीय सभा खेड्यांतील कोट्यवधि शेतकऱ्यांस देव मानीत असेल, तर राष्ट्रीय सभेच्या भक्तांनीं या खेड्यांना प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत ! खेडें म्हणजे महादेवाचें मंदिर ! त्या खेड्यांतील देवाचें कसें स्वरूप आहे, तो कसा राहतो, कसा वागतो, काय खातो, काय पितो, काय वाचतो, ज्ञान आहे कीं नाहीं, घरांत दिवा आहे कीं नाहीं, या देवाचे बैल रस्त्यांतील गाऱ्यांत फसतात कीं काय, उन्हाळ्यांत पाण्याविणें हा देह तडफडतो कीं काय, हें सारें पाहिलें पाहिजे. ज्ञानाचें ध्येय असेल, तर थोर विद्वानांच्या-भोंवतीं फिरा. त्यांची सेवा करा. पृथ्वी, चंद्र, सूर्याभोंवतीं फिरून प्रकाश मिळवितात. तुम्ही निरहंकारपणें ज्ञानसूर्याभोंवतीं फिरा. कलोपासक असाल, तर त्या त्या कलावंताभोंवतीं फिरा.

प्रदक्षिणा घालतां घालतां त्या त्या ध्येयदेवाची जन्मोजन्मीं पूजा करावी असें वाटेल. " सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति " असें वाटेल. साष्टांग लोटांगण मग घालूं. हा देह दंडवत् ध्येयदेवाच्या सेवेस पडेल असें आपण निश्चित करूं. म्हणून प्रदक्षिणेनंतर नमस्कार व शेवटचें मंत्रपुष्प, शेवटचें महासमर्पण. जीवन-पुष्पाचें तें चिरसमर्पण !

उपनिषदांत भगवान् सूर्यनारायण हें प्रतीक सांगितलेलें आहे. हा सूर्य म्हणजे नारायण. सूर्य त्या चैतन्यमय प्रभूचें स्वरूप. सूर्य चराचराला चालना देतो. सूर्य



उगवतांच फुलें फुलतात, पक्षी गातात, उडतात, गायीगुरें हिंडूंफिरूं लागतात. मानवांचे व्यवहार सुरू होतात. त्या विश्वंभराच्या विश्वचालनेची कल्पना या सूर्यावरून येईल. या सूर्याची उपासना म्हणजेच त्या विश्वेश्वराची उपासना !

मूर्तिपूजा म्हणजे प्रतीक आहे. रामाची मूर्ति पाहतांच रामाचें चरित्र डोळ्यां-समोर उभें राहतें. एका क्षणांत सारें रामायण जणुं आठवतें. एका क्षणांत सारें पावित्र्य येऊन सामावतें.

परंतु पाषाणमयी मूर्ति पहावयास जरा दूर जावें लागतें. पाषाणमयी मूर्ति घडविण्यासहि प्रयास. मूर्ती, पुतळे, चित्रें, हीं जीं सारीं थोरांमोठ्यांचीं किंवा प्रिय व्यक्तींचीं आपण प्रतीकें करतों, तीं तितकीं सहजसाध्य नाहींत.

म्हणून नाम हें सर्वांत मोठें प्रतीक आहे. " इंद्राचें स्वरूप काय ? इंद्राची मूर्ति कशी असते ? " ह्या प्रश्नाला मीमांसक उत्तर देतात, " इं आणि द्र–इंद्र–हा शब्द, हीं दोन अक्षरें म्हणजेच इंद्राचें स्वरूप. हीच त्याची अक्षरमूर्ति."

ॐ हें परमेश्वराचें नांव आपण ठेवलें आहे. राम, कृष्ण अशीं अनेक नांवें तरी कशाला ? त्या सर्व नांवांचें सार म्हणजे ॐ. सर्व शब्दसृष्टि कढवून हें एक ॐ अक्षर निर्माण केलें आहे. ॐ मध्यें सारे स्वर आले, सारीं व्यंजनें आलीं. सारीं वाङ्मयें आलीं, सारे वेद आले. ॐ ही परमेश्वराची वाङ्मयी मूर्ति.

पाषाणमयी मूर्ति घडवायला त्रास; पुन्हां भंगुर. परंतु या अक्षरमयी मूर्ती सर्वांना सुलभ–सोप्या असून पुन्हां अक्षर म्हणजे अभंग आहेत. माझ्या ओठां-तील " राम " ही अक्षरमयी मूर्ती कोणता मुसलमान येऊन फोडील ?

म्हणून नाम हें महान् प्रतीक आहे. नाम उच्चारतांच सारें आठवतें. सारा इतिहास एका नांवांत जणुं येऊन बसलेला असतो. आई शब्द उच्चारतांच मातेचें अनंत प्रेम आठवतें. बाळ शब्द आठवतांच मातेला मुलाच्या शतस्मृती आठवतात. आपण ऋषींचें तर्पण करतों, त्या वेळेस त्यांचीं नुसतीं नांवें उच्चारतों. त्यां नांवांतच सारें पावित्र्य येऊन बसतें. जसजसा काळ जातो, तसतसा इतिहास घट्ट होत होत एका नांवांत सामावतो. जसे आकाशांतील दूरचे पवित्र तारे, तशीं तीं दूरचीं नांवें होतात. वसिष्ठं तर्पयामि, अत्रिं तर्पयामि असें आपण म्हणतों; परंतु वसिष्ठ म्हणजे काय ? अत्रि म्हणजे काय ? केवळ पावित्र्य ! तें नाम उच्चारतांच पवित्र वाटतें. राम म्हणतांच निराळा संस्कार होतो. हा प्रिय भारत-वर्ष म्हणतांच सारा थोर इतिहास डोळ्यांसमोर येतो. ते थोर शिवछत्रपति म्हणतांच

सारा रोमहर्षण पराक्रम आठवतो. म्हणूनच नामाला अपार महत्त्व दिलें आहे. तें कोठेंहि घेतां येतें. घरीं, दारीं, बसतां उठतां, हें नामरूप दर्शन आहे. त्याला पैसे नकोत, फी नको, दक्षिणा नको, कांहीं नको. " राधेकृष्ण बोल, तेरे क्या लगेगा मोल । " राधेकृष्ण बोल बाबा. कांहीं किंमत का द्यावी लागणार आहे ?

ह्या अक्षरप्रतीकांत केवढें सामर्थ्य आहे ? चिंच म्हणतांच जिभेला पाणी सुटतें, मिरची म्हणतांच हाय असें होतें, हा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून या नामाला कमी लेखूं नका. सारा संसार नामरूपात्मक आहे; परंतु तें रूपसुद्धां शेवटीं नामांत सामावून जातें व केवळ नाम उरतें !

असो. भारतीय संस्कृति वाढती आहे. वाढत्या संस्कृतींत प्रतीकेंहि नवीन नवीन येणार. नवीत तत्त्वज्ञान येतांच नवीन प्रतीकेंहि येतात. राष्ट्रीय सभेचा तिरंगी झेंडा हें सर्व धर्मांच्या ऐक्याचें चिह्न आहे. त्या झेंड्यावरील चरखा हा कोणाचीहि पिळवणूक न करतां केलेल्या जाणाऱ्या श्रमजीवनाचें चिह्न आहे. चरखा म्हणजे स्वावलंबन. चरखा म्हणजे व्यक्तित्व. चरखा म्हणजे निर्दोष श्रमाची महती. खादी हें एक नवीन प्रतीक निर्माण झालें आहे. खेड्यांतील उपाशी लोकांचें स्मरण म्हणजे खादी ! लाल झेंडा हें नवीन प्रतीक येत आहे. जगांतील श्रमजीवी लोकांचें तें ऐक्यचिह्न. हातोडा, कोयता म्हणजे श्रम-महात्म्याचीं प्रतीकें.

अशा रीतीनें प्रतीकांकडे पहात जावें. खोल पाहण्याची दृष्टि आली म्हणजे एक प्रकारचा आनंद वाटतो. त्या त्या क्रिया, तीं तीं चिह्नें मग अर्थपूर्ण वाटतात. वस्तूंच्या अंतरंगाला हात लागला असें वाटतें. आपण रसग्राही आहोंत. बाह्य सालींनीं कोणाचें समाधान होणार ? भारतीय संस्कृतीच्या अंतरंगाला हात लावावयाचा असेल, तिचें खरें स्वरूप समजावून घ्यावयाचें असेल, तिचे खरे उपासक व्हावयाचें असेल, तर खोल दृष्टि घ्या. म्हणजे मग ह्या संस्कृतीचें अंतरंग प्रेमानें फुललेलें, पावित्र्यानें नटलेलें, त्यागानें पेटलेलें, माधुर्यानें भरलेलें, ज्ञानानें अलंकृत, आशेनें शोभिवंत, उत्साहानें संस्फूर्त, आनंदानें पूरित, असें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं !

# श्रीकृष्ण व त्याची मुरली : : २२

भारतीय हृदयाचे दोन चिरंजीव राजे आहेत. एक अयोध्याधीश राजा रामचंद्र व दुसरा द्वारकेचा राणा श्रीकृष्ण. इतर शेंकडों राजेमहाराजे झाले व गेले; परंतु या दोन राजांचें स्थान अढळ आहे. त्यांच्या सिंहासनांवर दुसरा कोणताहि सत्ताधीश बसूं शकणार नाहीं. भारतीय संस्कृति म्हणजे राम-कृष्ण.

कृष्णाच्या चरित्राकडे एका अगदीं निराळ्या प्रकारानें या प्रकरणांत मी पाहणार आहें. गोकुळांत प्रेमस्नेहाचा साम्यवाद स्थापन करणारा किंवा जरासंध-शिशुपालादि सम्राटांना धुळींत मिळविणारा, छळल्या जाणाऱ्या द्रौपदीसारख्या सतींची बाजू घेणारा किंवा अर्जुनाचे घोडे प्रेमानें हांकणारा अशा त्या कृष्णाचें वर्णन या प्रकरणांत नाहीं. कृष्णाकडे एक प्रत्यक्ष व्यक्ति या दृष्टीनें येथें मी पाहणार नाहीं. कृष्णाकडे एक प्रतीक या रीतीनें मी पाहणार आहें.

गोकुळांतील श्रीकृष्ण यांत फार खोल अर्थ आहे. गोकुळ म्हणजे काय ? गो म्हणजे इंद्रियें. गायी ज्याप्रमाणें हिरवा हिरवा चारा पाहून वाटेल तेथें चरत जातात, त्याप्रमाणें हीं इंद्रियें ते ते विषय पाहून त्यांच्या पाठीमागें स्वैर पळत सुटतात. आपलें जीवन म्हणजेच गोकुळ. कुळ म्हणजे समुदाय. इंद्रियांचा समुदाय जेथें आहे तें गोकुळ. असें हें गोकुळ आपल्या प्रत्येकाजवळ आहे.

परंतु या गोकुळांत आनंद नसतो. या गोकुळांत सुखसमाधान नसतें. येथें संगीत नसतें. मधुर मुरली नसते. येथें व्यवस्था नाहीं, नृत्यगीत नाहीं. या जीवन-गोकुळांत सारें बेसूर काम चाललेलें असतें. इंद्रियांच्या शेंकडों ओढी असतात. हें इंद्रिय खेंचतें, तें इंद्रिय खेंचतें. मनाच्याहि शेंकडों प्रवृत्ती असतात. ह्या प्रवृत्तींत एकवाक्यता नसते. अंतःकरणांत सारा गोंधळ. सारी आदळआपट. या गोकुळांत वणवे पेटलेले असतात. अंतःकरणाच्या यमुनेंत अहंकाराचे कालिये ठाणीं देऊन बसतात. अघासुर, बकासुर ( बकासुर म्हणजे दंभासुर ) या गोकुळांत येऊं पहात असतात. आपल्याला आपल्या हृदयांत सारखा गदारोळ व धांगड-धिंगा ऐकूं येत असतो. रात्रंदिवस हृदयमंथन सुरू असतें. आपण समुद्रमंथनाची गोष्ट वाचतों. समुद्रमंथन म्हणजे हृदयसमुद्राचें मंथन. या हृदयसागरावर अनेक वासनाविकारांच्या लाटा प्रत्येक क्षणाला उसळत असतात. या मंथनांतून नाना प्रकारच्या वस्तू बाहेर पडतात. कधीं लक्ष्मी बाहेर येऊन मोह पाडते, कधीं

अप्सरा भुलविते, कधीं दारू समोर येऊन उभी राहते. कधीं आपण लोकांना चाबूक मारीत सुटतों, तर कधीं आपण शंख फुंकतों. कधीं प्रेमाचा चंद्र उगवतो, तर कधीं द्वेषाचें हालाहल निर्माण होतें. कधीं सद्विचारांचीं फुलें देणारा पारिजात फुलतो, तर कधीं सर्वांना तुडविणारा ऐरावत उभा राहतो. अमृतप्राप्ति होईपर्यंत–खरं समाधान, खरी शांति याचा लाभ होईपर्यंत–हें असें हृदयमंथन सुरूच राहणार.

आपल्या या हृदयांतील अशांतीनें आपली तगमग होते. द्वेषमत्सरांनीं मस्त झालेल्या अशा जीवनगोकुळांत शेवटीं कृष्ण जन्माला येतो. नंद-यशोदेच्या पोटीं कृष्ण जन्मला. नंद म्हणजे आनंद. यशोदा म्हणजे यश देणाऱ्या सद्वृत्ती. आनंदासाठीं तडफडणारा हा जो जीवात्मा आणि या जीवात्म्याला साहाय्य करणाऱ्या ज्या सत्प्रवृत्ती यांच्या तळमळींतून हा श्रीकृष्णच जन्माला येतो. हृदयांतील मोक्षाची तळमळ म्हणजेच कृष्णजन्म.

कृष्णजन्म व रामजन्म केव्हां झाला तें आपण जर पाहूं लागलों, तर त्यांत केवढा अर्थ आपणांस दिसेल. रामजन्म भर दुपारीं झाला.

टळटळीत दुपारीं जन्मला रामराणा. पाय भाजत आहेत, कोठें छाया नाहीं, कोठें विसांवा नाहीं, अशा वेळीं राम जन्मास येतो. ज्या वेळेस जीवात्मा तडफडत असतो, हृदयाची दुःखानें लाही लाही होत असते, संसार म्हणजे पेटलेला वणवा असें वाटतें, अशा वेळेस जीवात्म्याला रमविणारा, हृदयांतील दशेंद्रियमुखी सम्राट् रावणाला मारून टाकणारा राम जन्म घेत असतो.

आणि कृष्ण केव्हां जन्मतो ? राम भर दुपारीं जन्मला, तर कृष्ण भर मध्यरात्रीं जन्मला. श्रावणांतील मुसळधार पाऊस, मेघांचा गडगडाट, विजांचा चमचमाट, यमुना तुडुंब भरलेली, अशा वेळीं कृष्ण जन्म घेतो. ज्या वेळेस जीवनांत कृष्णपक्षांतील अंधार असतो, भयंकर निराशा असते, डोळ्यांतून अश्रूंचा पूर चाललेला असतो, मार्ग दिसत नाहीं, हृदयाची यमुना भरून आलेली असते, दुःखदैन्यांचे काळेकुट्ट मेघ जमून आलेले दिसतात, अशा वेळीं कृष्ण जन्मतो.

कृष्ण म्हणजे व्यवस्था लावणारा. राम रमविणारा, कृष्ण आकर्षून घेणारा. कृष्ण सर्व गोकुळाला वेध लावतो. कृष्ण गोपाल होतो. गोपाल म्हणजे इंद्रियांचा स्वामी. तो इंद्रियांना चरूं देतो, परंतु वाटेल तिकडे जाऊं देत नाहीं. त्या इंद्रियरूपी गायी वाटेल तेथें जाऊं नयेत म्हणून तो गोड मुरली वाजवितो. कृष्ण



सर्व इंद्रियांना सुखसमाधान देतो. त्यांना ओढून, आकर्षून, संयमांत राखून संगीत निर्माण करतो.

आपल्या जीवनांतील अव्यवस्थेंत व्यवस्था लावणारा असा हा श्रीकृष्ण असतो. रवींद्रनाथांनीं गीतांजलींत म्हटलें आहे, "सारा दिवस सतारीच्या तारा लावण्यांतच गेला. अजून सतार लागत नाहीं, संगीत सुरू होत नाहीं." आपली सर्वांची ही स्थिति आहे. आपल्या जीवनांत मेळ नाहीं. जीवनाची सतार नीट लागत नाहीं. ही जीवनाची सतार सात तारांची नसून सहस्र तारांची आहे. ही अनंत तारांची हृदयतंत्री केव्हां नीट वाजणार ?

आपल्या हजारों प्रवृत्ती म्हणजेच या तारा. आज एक वाटतें, उद्यां दुसरें वाटतें. या क्षणीं अमुक करावें असें वाटतें, दुसऱ्या क्षणीं दुसरेंच वाटतें. या हजारों वासना आपणांस नाचवीत असतात. आपली कुतरओढ चाललेली असते. एकाद्या नवऱ्याला दोनच बायका असल्या तरी त्याची किती केंविलवाणी स्थिति होते ! मग या जीवात्म्याच्या त्या हजारों बायका काय दशा करीत असतील बरें ?

सदैव चाले ओढाताण
हृदयावरतीं पडतो ताण
उरतें न मला अल्पत्राण
काय करावें ? मीं केवळ मरुनी जावें !

असें जीवाला वाटूं लागतें.

श्रीकृष्णाला सोळा हजार नारी होत्या असें आपण वाचतों. सोळा हजारच काय, सोळा कोटीहि असतील. आपल्या या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या शेंकडों मनःप्रवृत्ती म्हणजेच या नारी. म्हणजेच या गोपी. या गोपी जीवाला ओढीत असतात. परंतु गोकुळांत जन्मलेला श्रीकृष्ण या गोपींची फजिती करतो. तो गोपींचें वस्त्रहरण करून त्यांना लाजवितो.

प्रत्येक प्रवृत्ति गोंडस स्वरूप घेऊन जीवात्म्याला मोह पाडीत असते. गटेच्या फौस्ट काव्यामध्यें एके ठिकाणीं एक व्यक्ति म्हणते :

"मला माहीत होतें, कीं हें पाप आहे. परंतु ह्या पापानें किती सुंदर वेष धारण केला होता ! हें पाप किती गोड व सुंदर दिसत होतें !"

परंतु श्रीकृष्ण या गोपींच्या बाह्य रूपरंगावर भुलत नाहीं. तो त्यांचें खरें स्वरूप प्रकट करतो. त्यांचें आंतील ओंगळ व हिडीस स्वरूप त्यांच्या निदर्शनास

आणून देतो. त्यांचीं लाक्षणिक वस्त्रें दूर करतो. त्या त्या दुष्ट प्रवृत्ती मग लाजतात, त्या नरमतात, विरमतात. त्या श्रीकृष्णाच्या चरणीं रत होतात. "बा कृष्णा! आतां तूं सांगशील तसें वागूं. तूं सांगशील तें करूं. तूं आमचा स्वामी," असें त्या हात जोडून म्हणतात.

जीवनांत हेंच मुख्य काम आहे. सर्व इंद्रियें, सर्व वृत्ती यांना एका महान् ध्येयाला भजनीं लावणें, जीवनांत स्थिरता आणणें. नदी सागराकडे जाणार, पतंग प्रकाशाकडे जाणार, भुंगा कमळाकडे वळणार, मोर मेघांकडे वळणार. आपल्या सर्व वृत्ती, सारी शक्ति कोणत्या तरी एका ध्येयाकडे घेऊन जाणें हें कार्य असतें.

श्रीकृष्ण हें काम करतो. सर्व प्रवृत्तींना खेंचून ध्येयाकडे त्यांना तो वळवितो. यामुळें जीवनांतील अशांति लयाला जाते. एकच सूर हृदयांत घुमूं लागतो. परंतु हें काम सोपें नाहीं. हृदयांत ऐक्याची मुरली वाजूं लागण्यापूर्वी कृष्णाला किती तरी काम करावें लागतें.

अहंकाराचा कालिमा नाहींसा करावा लागतो. आपला अहंकार सारखा फूत्कार करीत असतो. आपल्या आजुबाजूस कोणी येऊं शकत नाहीं. मी मोठा, मी श्रेष्ठ, इतर सारे मूर्ख, असल्या अहंकाराच्या शेजारीं कोण राहणार?

"समस्तांसि भांडेल तोची करंटा"

अशा सृष्टींत सर्वांशीं भांडत जाणारा हा अहंकारी एकटा जीव कधीं मुक्त होणार?

कृष्ण या अहंकाराच्या फणांवर उभा राहतो. जीवनयमुनेंतून या कालियाला तो हांकलून देतो.

या जीवनगोकुळांतील द्वेषमत्सरांचे वणवे कृष्ण गिळून टाकतो. दंभ, पाप यांचे राक्षस नाहींसे करतो.

अशा प्रकारें जीवन शुद्ध होतें. एक ध्येय दिसूं लागतें. त्या ध्येयाचा ध्यास जिवाला लागतो. जें मनांत तेंच ओठांत, तेंच हातांत; आचार, उच्चार व विचार यांत ऐक्य येतें. हृदयांतील गडबड थांबते. साऱ्या तारा ध्येयाच्या खुंटीला नीट बांधल्या जातात, त्यांतून दिव्य संगीत स्त्रवूं लागतें.

गोकुळांत कृष्णाची मुरली केव्हां वाजूं लागली?

शरद् ऋतु उदय चंद्राचा
वनिं वृंद उभा गवळणिंचा



सुगंध सुटत पवनाचा
ये वास मलयगिरीवरचा

अशी ती प्रसन्न पावन वेळा होती. हृदयाकाशांत शरदृतु पाहिजे. हृदयांत वासना–विकारांचीं वादळें आतां नाहींत. स्वच्छ आकाश आहे. शरदृतूमध्यें आकाश निरभ्र असतें. नद्यांतील खळमळ खालीं बसून स्वच्छ शंखासारखें पाणी वाहत असतें. आपलें जीवन असें झालें पाहिजे. आसक्तीचे ढग जमा होतां कामा नयेत. अनासक्त रीतीनें केवळ ध्येयभूत कर्मांतच जीव रंगून गेला पाहिजे. शुद्ध आचार व शुद्ध विचार रात्रंदिवस होत राहिला पाहिजे.

शरदृतु आहे आणि शुक्लपक्ष आहे. प्रसन्न चंद्र उगवला आहे. चंद्र म्हणजे मनाची देवता. चंद्र उगवला आहे म्हणजे मनाचा पूर्ण विकास झाला आहे. सद्भाव फुलला आहे, सद्विचारांचें स्वच्छ चांदणें पडलें आहे. अनासक्त हृदयाकाशांत शीलाचा चंद्र शोभत आहे. प्रेमाची पौर्णिमा आली आहे.

अशा वेळेस साऱ्या गोपी जमतात. साऱ्या मनःप्रवृत्ती कृष्णाभोंवतीं जमतात. हृदयांत व्यवस्था लावणारा, गोंधळांतून सुंदरता निर्माण करणारा तो श्यामसुंदर कोठें आहे, अशी त्यांना तळमळ लागते. त्या ध्येयगोपाळाची मुरली ऐकावयास साऱ्या वृत्ती अधीर होतात.

एका बंगाली गीतांत एक फारच गोड भाव एकदां मीं वाचला होता. एक गोपी म्हणते :

"माझ्या अंगणांत प्रत्यहीं कांटेसराटे पसरून त्यांच्यावरून चालत जाण्याची संवय मी करीत असतें. कारण, त्याची मुरली कानीं पडतांच मला धांवत जावें लागेल, आणि वाटेंत कांटे असले तर मी अडायची एकादी. संवय असली म्हणजे बरी.

"माझ्या अंगणांत पाणी ओतून मी खूप चिखल करतें, आणि त्या गाऱ्यांतून चालण्याचा अभ्यास मी करीत असतें. कारण, त्याची मुरली ऐकली कीं मला जावें लागेल, आणि वाटेंत चिखल असेल तर फजिती व्हावयाची; परंतु संवय असली म्हणजे पळत जाईन."

ध्येय एकदां ठरलें म्हणजे मग चिखल असो वा कांटे असोत, फांस असो वा विष असो, त्याच्याकडे साऱ्या जिवाची ओढ लागली पाहिजे. कृष्णाची मुरली

ऐकतांच सर्वांनीं धांवत आलें पाहिजे, फेर धरला पाहिजे. हातांत हात घालून नाचलें पाहिजे. अंतर्बाह्य एकता.

हृदय शुद्ध आहे, प्रेमाचा चंद्र फुलला आहे, साऱ्या वासना संयत आहेत, एक ध्येय दिसत आहे; आसक्ति नाहीं, द्वेषमत्सर मालवलेले आहेत, अहंकार शमला आहे, दंभ दुरावला आहे, अशा वेळेस गोकुळांत मुरली सुरू होते. या जीवनांत संगीत सुरू होतें. त्या संगीताची गोडी कोण वर्णील? त्या संगीताची गोडी कोण चाखील?

महात्माजी म्हणाले, "माझ्या हृदयांत तंबोरा लागलेलाच आहे." थोर उद्गार. प्रत्येकाच्या हृदयांत असा तंबोरा लागूं शकेल. प्रत्येकाच्या जीवनगोकुळांत ही मधुर मुरली वाजेल. परंतु केव्हां? व्यवस्था लावणारा, इंद्रियांना आकर्षून घेऊन ध्येयाकडे नेणारा श्रीकृष्ण जन्मेल तेव्हां.

हा श्रीकृष्ण आपल्या सर्वांच्या हृदयांत आहे. ज्याप्रमाणें एकाद्या डोंगरांत बाहेरच्या खडबडीत ओबडधोबड खडकांत एकादें शिवालय असतें, त्याप्रमाणें आपल्या या ओबडधोबड ओंगळ जीवनाच्या आंतील बाजूस एक शिवालय आहे. आपल्या सर्वांच्या हृदयगाभाऱ्यांत हा शंभू, हा मृत्युंजय, हा सदाशिव आहे. तो प्रत्यहीं दिसत नाहीं; परंतु आहे यांत संशय नाहीं. ॲमिल या एका थोर पाश्चिमात्य विचारवंतानें एके ठिकाणीं लिहिलें आहे:

"Deep within this ironical and disappointed being of mine, there is a child hidden, sad simple creature who believes in the ideal, in love, in holiness and all heavenly superstitions."

याचा भावार्थ असा, कीं या माझ्या परस्परविरोधी, संशयी, निराश अशा जीवनाच्या आंतील गाभाऱ्यांत एक लहानसें बालक आहे. ध्येयावर श्रद्धा ठेवणारें, प्रेमावर, पावित्र्यावर, मांगल्यावर विश्वास ठेवणारें, सर्व दैवी वृत्तींवर श्रद्धा ठेवणारें असें हें बालक आहे. हें बालक दिसत नाहीं, परंतु तें आहे. तें अजून लहान आहे, साधें आहे, खिन्न असें आहे; परंतु आहे.

हें बालक म्हणजेच बाळकृष्ण. हा बाळकृष्ण वाढूं लागतो. तो खिन्न न राहतां बळवान् होतो. गुदमरून न जातां प्रकट होऊं लागतो. जीवनगोकुळांत संगीत निर्माण करण्यासाठीं धडपडूं लागतो. या बाळकृष्णाला वाढवणें हें आपलें काम आहे. जीवनांत संगीत पाहिजे असेल, तर ह्या वेणुधराला वाढवा.



हृदयांतील ही वेणु एकादे वेळेस ऐकूं येते. परंतु हा वेणुनाद अखंड ऐकावयास आला पाहिजे. इतर आवाज बंद केल्याशिवाय हा अंतर्नाद ऐकावयास मिळणार नाहीं. इतर वासनांचीं गीतें बंद केल्याशिवाय ध्येयगीत कसें ऐकूं येणार? वरचे दगडधोंडे दूर केले कीं खालचा झुळझुळ वाहणारा झरा दृष्टीस पडतो. त्याचप्रमाणें अहंकार, आसक्ति, रागद्वेष यांचे फत्तर फोडून दूर केले म्हणजे हृदयांतील भावगंगेचें गुणगुणणें ऐकूं येईल. कामक्रोधांचे ताशे बंद करा म्हणजे हृदयांतल्या शिवालयांतील मुरली ऐकूं येईल.

हरिजनांबद्दलच्या उपवासाच्या वेळीं महात्माजींनीं आश्रमांतील बाळगोपाळांस लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें :

"चाळीस वर्षांच्या सेवेनें माझ्या अंतःकरणांत मीं थोडी व्यवस्था निर्माण केली आहे. संयमानें, तपस्येनें मीं जीवनांतील बेसूरपणा दूर केला आहे, म्हणून तो आंतील मंजुळ ध्वनि मी ऐकूं शकतों."

सेवेनें, संयमानें हें संगीत निर्माण करावयाचें आहे. कृष्ण म्हणजे मूर्त संयम. कृष्ण कर्षून घेणारा, अर्जुनाचे घोडे संयमांत राखणारा, इंद्रियांचे घोडे खैर जाऊं न देणारा म्हणजे कृष्ण. संयमाशिवाय संगीत नाहीं. संगीत म्हणजे मेळ, प्रमाण. प्रमाण म्हणजे सौंदर्य. जीवनांत सर्व गोष्टींचें प्रमाण साधणें म्हणजेच संगीत निर्माण करणें. हाच योग.

यासाठीं धडपड हवी. रात्रंदिवस प्रयत्न हवा. ती अत्यंत गोड मुरली ऐकण्याचें भाग्य पाहिजे असेल, तर रात्रंदिवस अविश्रान्त प्रयत्न हवेत. दक्षता हवी.

### रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग
### अंतर्बाह्य जग आणि मन

रात्रंदिवस जनांत व मनांत पदोपदीं झगडे होतील. पुनः पुनः पडूं, परंतु पुनः पुनः चढूं. धडपड हेंच मानवाचें भाग्य आहे. पशूच्या जीवनांत धडपड नाहीं. आजच्यापेक्षां उद्यां पुढें जाऊं, आजच्यापेक्षां उद्यां अधिक पवित्र होऊं ही भावना त्याच्याजवळ नाहीं. जो मुक्त झाला त्याला ही धडपड नाहीं. ज्याच्या जीवनांत धडपड नाहीं तो मुक्त तरी असेल, किंवा पशु तरी असेल.

धडपड हें आपलें ध्येय. आपण सारीं धडपडणारीं मुलें. 'इन्किलाब जिंदाबाद' याचा अर्थ 'क्रांति चिरायु होवो' असा आहे. धडपड चिरायु होवो. उत्तरोत्तर विकास होवो. धडपड करतां करतां एक दिवस परमपद गांठूं.

याजसाठीं केला होता अट्टाहास
शेवटचा दीस गोड व्हावा

हा सर्व अट्टाहास, ही सारी धडपड, तो शेवटचा गोड दिवस यावा म्हणून आहे. तो गोड वेणुध्वनि कानीं पडावा म्हणून आहे. तो दिवस शतजन्मांनीं आला तरी लवकरच आला असें म्हटलें पाहिजे.

फ्रान्समधील विख्यात कथालेखक अनातोले यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे, "देवानें 'तुझें काय दूर करूं' असें मला जर विचारलें, तर मी त्याला म्हणेन, 'माझें सारें कांहीं दूर कर, परंतु माझी धडपड दूर करूं नकोस. माझें दुःख दूर करूं नकोस.'"

कुंती म्हणाली, "सदैव मला विपत्तीच दे." विपत्ति म्हणजे ही धडपडच, ओढाताण. पूर्णतेचें स्मरण ठेवून तिला गांठण्यासाठीं होणारी जिवाची तगमग. ही तगमग ज्याच्याजवळ आहे तो धन्य होय. त्याच्या जीवनांत आज ना उद्यां कृष्णाची मंजुळ मुरली वाजूं लागेल.

श्रीकृष्णानें गोकुळांत आनंदीआनंद आधीं निर्माण केला. गोकुळांत मुरली त्यानें आधीं वाजविली, आणि नंतर जगांत संगीत निर्माण करावयास तो गेला. आधीं गोकुळांतील वणवे त्यानें विझविले. गोकुळांतील कालिये मारले. अघासुर, बकासुर मारले. नंतर समाजांतील कालिये, समाजांतील दंभ, समाजांतील द्वेष-मत्सरांचे वणवे दूर करावयास तो बाहेर पडला. स्वतःच्या जीवनांतील संगीत सर्व त्रिभुवनास तो ऐकवूं लागला. दगडधोंडे पाझरूं लागले.

मनुष्य स्वतःच्या अंतःकरणांत जेव्हां स्वराज्य स्थापील, तेथें संगीत, सुसंबद्धता, ध्येयात्मता, निःशंकता, सुसंवादिता निर्मील, तेथले वणवे विझवील, तेथले असुर संहारील, थोडक्यांत, स्वतःचा जेव्हां स्वामी होईल, तेव्हांच तो जगांतहि आनंद निर्माण करूं शकेल. ज्याच्या स्वतःच्या जीवनांत आनंद नाहीं, तो दुसऱ्यास काय देणार? जो स्वतः शान्त नाहीं, तो दुसऱ्यास काय माती शान्ति देणार? ज्याच्या स्वतःच्या जीवनांत संगीत नाहीं, तो दुसऱ्याच्या जीवनांतील रडगाणीं कशीं दूर करणार? जो स्वतःचा गुलाम आहे तो दुसऱ्यास कसें मुक्त करणार? जो स्वतःस जिंकूं शकत नाहीं, तो दुसऱ्यास काय जिंकणार? स्वतः पडलेला दुसऱ्यास उठवूं शकत नाहीं; स्वत बद्ध असलेला दुसऱ्यास मुक्त करूं शकत नाहीं; स्वतः सदैव ढोपरांत मान घालून रडणारा दुसऱ्यास हंसवूं



शकत नाहीं. स्वतः स्फूर्तिहीन दुसऱ्यास कशी चेतना देणार? स्वतः निरुत्साही दुसऱ्यास उत्साहसागर कसे बनविणार? स्वतःच्या जीवनगोकुळाला आधीं सुखमय, आनंदमय करा. मगच या सभोंवतालच्या संसाराला तुम्ही आनंदमय करूं शकाल. स्वतःची बेसूर जीवनबांसरी सुधारा. मग दुसऱ्यांच्या जीवनबांसऱ्या तुम्ही सुधारूं शकाल.

परंतु तो दिवस कधीं येईल? येईल, एक दिवस येईल. जीवनयमुना तो दिवस येईपर्यंत अशान्त राहील. या जीवनयमुनेवर कधीं क्रोधमत्सरांच्या, कधीं स्नेह-प्रेमाच्या प्रचंड लाटा उसळतील. परंतु या जीवनयमुनेची सारी धडपड, हें वेडेंवांकडें उचंबळणें त्या ध्येयासाठीं आहे. श्रीकृष्णाच्या परमपवित्र पायांचा स्पर्श व्हावा म्हणूनच ही खळबळ आहे. एक दिवस कृष्णाचा पदस्पर्श होईल व यमुना शांत होईल. त्या ध्येयभगवानाच्या चरणांवर स्वतःस ओतण्यासाठीं ही यमुना अधीर आहे. शान्त होण्यासाठीं वादळ उठतें. शान्त होण्यासाठींच जीवन धडपडत आहे. संगीत निर्माण करणाऱ्या प्रभूच्या पायांचा स्पर्श व्हावा म्हणून जीवन अधीर आहे. येईल, तो शरदृतु एक दिवस येईल. तो प्रसन्न सुगंध एक दिवस सुटेल. ती प्रसन्न पौर्णिमा एक दिवस फुलेल. त्या दिवशीं गोकुळांत प्रेमराज्य स्थापणाऱ्या, अव्यवस्था, गोंधळ, बजबजपुरी, घाण, वणवे, दंभ दूर करून मेळ निर्माण करणाऱ्या, त्या कृष्ण-कन्हैयाच्या मुरलीचा अमृत-ध्वनि माझ्या जीवनांत ऐकूं येईल! त्या शामसुंदराची वेड लावणारी वेणु चिरंतन वाजत राहील!

हृदयंगम वाजत वेणू
स्वैर न विचरति इंद्रियधेनू ॥
जीवनगोकुळिं ये वनमाळी
अमित सुखाची सृष्टि पिकली
शिरिं धरिन तदीय पदांबुजरेणू ॥
प्रेमळ गोपी या मम वृत्ती
वेडावुन प्रभुरुपीं जाती
प्रभुविण वदति कीं कांहींच नेणूं ॥

# मृत्यूचें काव्य : : २३

भारतीय संस्कृतींत मृत्यूविषयींचे ठिकठिकाणीं जे विचार आहेत ते किती गोड आहेत व किती भव्य आहेत! मृत्यूची भीषणता भारतीय संस्कृतींत नाहीं. मृत्यु म्हणजे जीवनाच्या वृक्षाला लागलेलें गोड फळ.

मृत्यु हें ईश्वराचेंच एक स्वरूप. जीवन व मरण दोन्हीं परम मंगल भाव. जीवन व मरण वस्तुतः एकरूपच आहेत. निशेंतूनच शेवटीं उषा प्रकट होते व उषेंतूनच पुन्हां निशा निर्माण होते. जीवनाला मरणाचें फळ येतें व मरणाला जीवनाचें फळ येतें.

गीतेनें मरण म्हणजे वस्त्र फेंकणें असें म्हटलें आहे. काम करतां करतां हें वस्त्र जीर्ण झालें, फाटलें. ती त्रिभुवनमाउली नवीन वस्त्रें देण्यासाठीं आपणांस बोलावते. आपणांस ती उचलून घेते. पुन्हां नवीन आंगडें-टोपडें लेववून या जगाच्या अंगणांत खेळावयास आपणांस ती ठेवते व दुरून गंमत बघते. कधीं कधीं जीव जन्मला नाहीं, तोंच जातो. कोणी बालपणीं मरतो, कोणी तरुणपणीं. आई अंगरखा देऊन पाठवते. परंतु जगांत पाठवलें नाहीं तोंच तिला दुरून तो अंगरखा चांगला वाटत नाहीं. पटकन् ती बाळाला मागें नेते व नवीन अंगरखा घालते. आईच्या हौसेला मोल नाहीं.

माझी माता कांहीं भिकारी नाहीं. अनंत वस्त्रांनीं तिचें भांडार भरलेलें आहे. परंतु मातेचें भांडार भरलेलें आहे म्हणून दिलेले कपडे मीं वाटेल तसे फाडून टाकतां कामा नये. शक्य तों काळजीपूर्वक हा कपडा वापरला पाहिजे. तो स्वच्छ, पवित्र राखला पाहिजे, आणि सेवा करतां करतां तो फाटला पाहिजे.

देह म्हणजे मडकें. कोणी मेला तर आपण त्याच्यापुढें मडकें धरतों. हें मडकें होतें, फुटलें. त्यांत रडण्यासारखें काय आहे? सेवेसाठीं हें मडकें मिळालें होतें. महान् ध्येयवृक्षांना पाणी घालण्यासाठीं हें मडकें मिळालें होतें. कोणाचें लहान मडकें, कोणाचें मोठें. नाना प्रकारचीं हीं मडकीं तो महान् कुंभार निर्माण करतो व जगाची बाग तयार करूं बघतो. फुटलेलें मडकें तो पुन्हां नीट करतो. पुनः तें मडकें पाणी घालूं लागतें. असा हा प्रकार चालला आहे.

व्हिक्टर ह्यूगोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, "मनुष्य म्हणजे काय? हा नरदेह म्हणजे काय? हा मातीचा गोळा आहे." परंतु त्यांत एक चित्कळा आहे. त्या चित्कळेमुळें या मातीच्या गोळ्याला महत्त्व आहे.



एक मातीचा गोळा बदलून विश्वंभर दुसरा तयार करतो. ती चित्कळा त्यांत ठेवून पुन्हां या जगांत तो पाठविण्यांत येतो. ज्याप्रमाणें लहान मुलें पतंग फाटला तर पुन्हां नवीन कागद घेऊन दुसरा तयार करतात, तसेंच हें. परमेश्वर जीवरूपी पतंग कोणत्या तरी अदृश्य गच्चींत बसून सारखे उडवीत आहे. त्यांना खालीं-वर खेंचीत आहे. पतंग फाटले तर पुन्हां नीट करतो. नवीन कागद, नवीन रंग. पुन्हां ते उडवतो. नाना रंगांचे, नाना आकारांचे, नाना धर्मांचे, नाना वृत्तींचे असे हे कोट्यवधि पतंग प्रत्यहीं उडत आहेत, फाटत आहेत, नवीन येत आहेत. प्रचंड क्रीडा. विराट् खेळ!

मृत्यु म्हणजे महायात्रा, मृत्यु म्हणजे महाप्रस्थान, मृत्यु म्हणजे महानिद्रा! दररोजच्या धडपडीनंतर आपण झोंपतों. झोंप म्हणजे लघु मरण. सर्व जीवनाच्या धडपडीनंतर-अनेक वर्षांच्या धडपडीनंतरहि-असेंच आपण झोंपतों. रोजची झोंप आठ तासांची. परंतु ही झोंप मोठी असते एवढाच फरक.

मृत्यु म्हणजे आईच्या कुशींत जाऊन झोंपणें! लहान मूल दिवसभर खेळतें, खिदळतें, रडतें, पडतें; रात्र पडतांच आई हळूच त्याला उचलून घेते. त्याचीं खेळणीं वगैरे तेथेंच पडतात. आई त्याला कुशींत घेऊन झोंपते. ती आईची ऊब घेऊन बाळ ताजेंतवानें होऊन सकाळीं पुन्हां दुप्पट उत्साहानें चेष्टा करूं लागतें. तसेंच जीवाचें. जगांत दमलेल्या, श्रमलेल्या जीवाला ती माता उचलून घेते. बाळाची इच्छा नसतांहि उचलून घेते. आपल्या सोबत्यांकडे, आपल्या सांसारिक खेळण्यांकडे बाळ आशाळभूत दृष्टीनें बघत असतो. परंतु आईला बाळाचें हित ठावें. त्या रडणाऱ्या बाळाला ती घेते. कुशींत निजविते. जीवनरस पाजून पुन्हां पाठविते.

मृत्यु म्हणजे माहेरीं जाऊन येणें. सासरीं गेलेली लेक दोन दिवस माहेरीं जाऊन येते. पुन्हां प्रेम, उत्साह, आनंद, मोकळेपणा घेऊन येते. त्याप्रमाणें त्या जगन्माउलीजवळ जाऊन येणें म्हणजेच मृत्यु. लहानपणीं शाळेंत जाणारीं मुलें मध्येंच घरीं जाऊन येतात. पाणी पिण्याचें निमित्त करून, भुकेचें निमित्त करून आजारीपणाचें निमित्त करून मुलें घरीं जातात. त्यांना आईचा मुखचंद्र पहावयाची तहान असते. आईच्या प्रेमाची भूक असते. आई प्रेमानें बघते, पाठीवरून हात फिरविते.

वडी देते, जा म्हणते. मुलें हंसत खेळत पुन्हां प्रसन्नपणें शाळेंत येतात व धडे शिकूं लागतात. तसेंच हे जगाच्या शाळेंत कंटाळलेले किदरलेले जीव आईचा मुखचंद्र पहावयास आसावतात. ते आईकडे जातात. भरपूर प्रेमरस पिऊन पुन्हां या संसाराच्या महान् विद्यालयांत शिकूं लागतात.

मरण म्हणजे विश्रांति. मरण म्हणजे अनंतांत स्नान. थकलेले, कंटाळलेले लोक गांवाबाहेरच्या तलावांत पोहून येतात, समुद्रांत डुंबून येतात. नदीच्या पाण्यांत नाचून कुदून येतात. त्यांचा थकवा जातो, जीवनांत डुंबल्यामुळें जीवन मिळतें. मरण म्हणजे काय ? जगांत दमलेले जीव अनंत जीवनाच्या सिंधूंत डुंबून येतात. हें डुंबावयास जाणें म्हणजे मरण. ही सुटी आहे. मरण म्हणजे अनंत जीवनांत पोहून येण्यासाठीं मिळालेली महान् सुटी. त्या जीवनांत न्हाऊनमाखून पुन्हां तार्जेतवानें होऊन आपण जगांत कर्मे करावयास येतों.

उंच शिखरावरच्या महादेवाच्या मंदिराकडे जाण्यासाठीं पायऱ्या असतात. त्याप्रमाणें परिपूर्णतेच्या शिखराकडे जाण्यासाठीं जन्ममरणाचीं पावलें टाकीत जीव जात असतो. मरण म्हणजे एक पाऊलच. मरण म्हणजेहि प्रगतीच. मरण म्हणजे पुढें जाणें. देवाकडे नेणाऱ्या पायऱ्यांना आपण प्रणाम करतों. त्या पायऱ्या पवित्र वाटतात. ध्येयसाधन वाटतात. त्याप्रमाणें मरणहि पवित्र व मंगल आहे. आंतल्या ध्येयाकडे तें घेऊन जाणारें आहे. मरणाला प्रणाम असो.

मरण म्हणजे एक प्रकारें विस्मरण. जगांत स्मरणाइतकेंच विस्मरणाला महत्त्व आहे. जन्मल्यापासून ज्या ज्या गोष्टी आपण केल्या, जें जें ऐकलें, जें जें पाहिलें, जें जें मनांत आलें, त्या सर्वांचें जर सारखें आपणांस स्मरण राहिलें, तर तो केवढा भार होईल ? त्या प्रचंड पर्वताखालीं आपण चिरडले जाऊं. हें जीवन असह्य होईल.

व्यापारी ज्याप्रमाणें हजारों घडामोडी करतो, परंतु शेवटीं एवढा फायदा किंवा एवढा तोटा, एवढी सुटसुटीत गोष्ट ध्यानांत धरतो, तसेंच जीवाचें आहे. मरण म्हणजे जीवनाच्या व्यापारांतील नफा-तोटा पाहण्याचा क्षण. साठ-सत्तर वर्षें दुकान चालवलें त्याचा आढावा घेण्याची वेळ म्हणजे मरण. त्या नफ्या-तोट्याच्या अनुभवानें शहाणे होऊन आपण पुन्हां दुकान थाटतों. आईची अनुज्ञा घेऊन पुन्हां व्यापार करावयास आरंभ करतों. कनवाळू, स्वातंत्र्य देणारी आई कधीं प्रतिबंध करीत नाहीं.



कारण शंकरानें मदनाची होळी पेटविली होती ! देवालयांत कांसव असतें. कांसवाप्रमाणें इंद्रियांवर संयम मिळवा.

घेई ओढून संपूर्ण विषयांतून इंद्रियें
जसा कांसव तो अंगें तेव्हां प्रज्ञा स्थिरावली ॥

कांसव म्हणजे इंद्रियसंयमाचें प्रतीक. देवालयांत घंटा वाजवावयाची, यामध्यें योगांतील अनुहतध्वनीची कल्पना असावी असें वाटतें. जिवाशिवाचें ऐक्य झालें. समाधि लागली. आनंदाचें गाणें सुरू झालें. मंगलवाद्यें जीवनमंदिरांत सुरू झालीं. अनुहतध्वनीची गर्जना सुरू झाली. योगमार्गांत तो अनुहतध्वनि ऐकूं येतो असें म्हणतात. अनुहत म्हणजे सारखा वाढणारा. सारखा अखंड असा एक नाद ऐकूं येतो असें म्हणतात ! घंटावादनांत हा अनुहतध्वनि गर्भित असेल वा देवाचें दर्शन झालें म्हणून मंगल वाद्य वाजवावें असाहि अर्थ असेल; किंवा विश्वाचा पसारा चालवण्यांत रंगून गेलेल्या देवाला हांक मारून, घंटा वाजवून, सांगावयाचें कीं, " देवा, क्षणभर तरी तुझ्या दारांत आलों होतों. क्षणभर तरी संसारांतून मन बाहेर काढून, आपल्याच डबक्यांतून बाहेर येऊन तुझें दर्शन घेतलें बरें," असाहि भाव असेल !

भरलेल्या कलशाची फार महती आहे. लग्नाच्या वेळेस वऱ्हाडणी हातांत भरलेले कलश घेऊन उभ्या असतात. जीवन म्हणजे एक मातीचा कलशच आहे. ज्याप्रमाणें रिक्या घड्याला महत्त्व नाहीं, त्याप्रमाणें रिक्या जीवनाला महत्त्व नाहीं. घडा भरलेला असला म्हणजे त्याला आपण डोक्यावर घेतों, त्याप्रमाणें तुमचा जीवनाचा कलश जर प्रेमानें भराल, सत्कृत्यांनीं भराल, ज्ञानानें भराल, तरच लोक तुम्हांला डोक्यावर घेतील. रिकामी घागर अमंगल आहे. भरलेली घागर मंगल आहे. भारतीय संस्कृतींतील हे मंगल कलश सांगत आहेत, " जीवन मांगल्याचें करा."

देवाला नीरांजन ओंवाळणें म्हणजे काय ? खरोखर हें जीवन पेटवून देवाला ओंवाळावयाचें आहे, जीवनाची मेणबत्ती सारखी पेटत ठेवावयाची. " देवा, ही जीवनाची मेणबत्ती समाजासाठीं वितळली बरें ! " असें देवाला नीरांजन ओंवाळून सांगावयाचें. पंचारती म्हणजे पंचप्राण. पंचप्राण ध्येयासाठीं ओंवाळून टाकावे लागतात.

उदबत्ती म्हणजे काय? "हें जीवन पेटवून मी सुगंध देईन" असें सांगणें. पेटल्याशिवाय सुगंध नाहीं. देवाला चंदन लावणें म्हणजे काय? "हा देह चंदनाप्रमाणें झिजवून त्याचा गंध तुला देईन" हाच त्यांत अर्थ आहे. देवाला प्रदक्षिणा घालणें म्हणजे काय? प्रदक्षिणेनें देवाचें स्वरूप मनांत ठसतें. एक प्रदक्षिणा झाली कीं देवाला पहावयाचें, प्रणाम करावयाचा, कीं पुन्हां दुसरी सुरू. प्रदक्षिणा तीन घाल, अकरा घाल, एकशें आठ घाल. जितक्या प्रदक्षिणा अधिक, तितकी मूर्ति अधिक ठसावेल. प्रत्येकानें आपल्या ध्येयाभोंवतीं प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. मजुरांची सेवा हें ध्येय ठरविणाऱ्यानें मजुरांभोंवतीं सारख्या प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत. त्यांच्या चाळी पाहिल्या पाहिजेत. त्यांचें जीवन पाहिलें पाहिजे. सारखे मजूर देवाला प्रदक्षिणा घालाल तेव्हांच मजुरांचें खरें स्वरूप कळेल. त्यांच्या डोळ्यांत अश्रू आहेत कीं आनंद आहे, तोंडावर तेज आहे कीं प्रेतकळा आहे, त्यांना नैवेद्य मिळाला कीं नाहीं, त्यांच्या अंगावर वस्त्रें आहेत कीं नाहींत, तें तेव्हांच कळेल. राष्ट्रीय सभा खेड्यांतील कोट्यवधि शेतकऱ्यांस देव मानीत असेल, तर राष्ट्रीय सभेच्या भक्तांनीं या खेड्यांना प्रदक्षिणा घातल्या पाहिजेत! खेडें म्हणजे महादेवाचें मंदिर! त्या खेड्यांतील देवाचें कसें स्वरूप आहे, तो कसा राहतो, कसा वागतो, काय खातो, काय पितो, काय वाचतो, ज्ञान आहे कीं नाहीं, घरांत दिवा आहे कीं नाहीं, या देवाचे बैल रस्त्यांतील गाऱ्यांत फसतात कीं काय, उन्हाळ्यांत पाण्याविणें हा देह तडफडतो कीं काय, हें सारें पाहिलें पाहिजे. ज्ञानाचें ध्येय असेल, तर थोर विद्वानांच्या-भोंवतीं फिरा. त्यांची सेवा करा. पृथ्वी, चंद्र, सूर्याभोंवतीं फिरून प्रकाश मिळवितात. तुम्ही निरहंकारपणें ज्ञानसूर्याभोंवतीं फिरा. कलोपासक असाल, तर त्या त्या कलावंताभोंवतीं फिरा.

प्रदक्षिणा घालतां घालतां त्या त्या ध्येयदेवाची जन्मोजन्मीं पूजा करावी असें वाटेल. "सदा माझे डोळां जडो तुझी मूर्ति" असें वाटेल. साष्टांग लोटांगण मग घालूं. हा देह दंडवत् ध्येयदेवाच्या सेवेस पडेल असें आपण निश्चित करूं. म्हणून प्रदक्षिणेनंतर नमस्कार व शेवटचें मंत्रपुष्प, शेवटचें महासमर्पण. जीवन-पुष्पाचें तें चिरसमर्पण!

उपनिषदांत भगवान् सूर्यनारायण हें प्रतीक सांगितलेलें आहे. हा सूर्य म्हणजे नारायण. सूर्य त्या चैतन्यमय प्रभूचें स्वरूप. सूर्य चराचराला चालना देतो. सूर्य



उगवतांच फुलें फुलतात, पक्षी गातात, उडतात, गायीगुरें हिंडूंफिरूं लागतात. मानवांचे व्यवहार सुरू होतात. त्या विश्वंभराच्या विश्वचालनेची कल्पना या सूर्यावरून येईल. या सूर्याची उपासना म्हणजेच त्या विश्वेश्वराची उपासना!

मूर्तिपूजा म्हणजे प्रतीक आहे. रामाची मूर्ति पाहतांच रामाचें चरित्र डोळ्यां-समोर उभें राहतें. एका क्षणांत सारें रामायण जणुं आठवतें. एका क्षणांत सारें पावित्र्य येऊन सामावतें.

परंतु पाषाणमयी मूर्ति पहावयास जरा दूर जावें लागतें. पाषाणमयी मूर्ति घडविण्यासहि प्रयास. मूर्ती, पुतळे, चित्रें, हीं जीं सारीं थोरांमोठ्यांचीं किंवा प्रिय व्यक्तींचीं आपण प्रतीकें करतों, तीं तितकीं सहजसाध्य नाहींत.

म्हणून नाम हें सर्वांत मोठें प्रतीक आहे. "इंद्राचें स्वरूप काय? इंद्राची मूर्ति कशी असते?" ह्या प्रश्नाला मीमांसक उत्तर देतात, "इं आणि द्र–इंद्र–हा शब्द, हीं दोन अक्षरें म्हणजेच इंद्राचें स्वरूप. हीच त्याची अक्षरमूर्ति."

ॐ हें परमेश्वराचें नांव आपण ठेवलें आहे. राम, कृष्ण अशीं अनेक नांवें तरी कशाला? त्या सर्व नांवांचें सार म्हणजे ॐ. सर्व शब्दसृष्टि कढवून हें एक ॐ अक्षर निर्माण केलें आहे. ॐ मध्यें सारे स्वर आले, सारीं व्यंजनें आलीं. सारीं वाङ्मयें आलीं, सारे वेद आले. ॐ ही परमेश्वराची वाङ्मयी मूर्ति.

पाषाणमयी मूर्ति घडवायला त्रास; पुन्हां भंगुर. परंतु या अक्षरमयी मूर्ती सर्वांना सुलभ–सोप्या असून पुन्हां अक्षर म्हणजे अभंग आहेत. माझ्या ओठां-तील "राम" ही अक्षरमयी मूर्ती कोणता मुसलमान येऊन फोडील?

म्हणून नाम हें महान् प्रतीक आहे. नाम उच्चारतांच सारें आठवतें. सारा इतिहास एका नांवांत जणुं येऊन बसलेला असतो. आई शब्द उच्चारतांच मातेचें अनंत प्रेम आठवतें. बाळ शब्द आठवतांच मातेला मुलाच्या शतस्मृती आठवतात. आपण ऋषींचें तर्पण करतों, त्या वेळेस त्यांचीं नुसतीं नांवें उच्चारतों. त्या नांवांतच सारें पावित्र्य येऊन बसतें. जसजसा काळ जातो, तसतसा इतिहास घट्ट होत होत एका नांवांत सामावतो. जसे आकाशांतील दूरचे पवित्र तारे, तशीं तीं दूरचीं नांवें होतात. वसिष्ठं तर्पयामि, अत्रिं तर्पयामि असें आपण म्हणतों; परंतु वसिष्ठ म्हणजे काय? अत्रि म्हणजे काय? केवळ पावित्र्य! तें नाम उच्चारतांच पवित्र वाटतें. राम म्हणतांच निराळा संस्कार होतो. हा प्रिय भारत-वर्ष म्हणतांच सारा थोर इतिहास डोळ्यासमोर येतो. ते थोर शिवछत्रपति म्हणतांच

सारा रोमहर्षण पराक्रम आठवतो. म्हणूनच नामाला अपार महत्त्व दिलें आहे. तें कोठेंहि घेतां येतें. घरीं, दारीं, बसतां उठतां, हें नामरूप दर्शन आहे. त्याला पैसे नकोत, फी नको, दाक्षिणा नको, कांहीं नको. " राधेकृष्ण बोल, तेरे क्या लगेगा मोल । " राधेकृष्ण बोल बाबा. कांहीं किंमत का यावी लागणार आहे ?

ह्या अक्षरप्रतीकांत केवढें सामर्थ्य आहे ? चिंच म्हणतांच जिभेला पाणी सुटतें, मिरची म्हणतांच हाय असें होतें, हा सर्वांचा अनुभव आहे. म्हणून या नामाला कमी लेखूं नका. सारा संसार नामरूपात्मक आहे; परंतु तें रूपसुद्धां शेवटीं नामांत सामावून जातें व केवळ नाम उरतें !

असो. भारतीय संस्कृति वाढती आहे. वाढत्या संस्कृतींत प्रतीकेंहि नवीन नवीन येणार. नवीत तत्त्वज्ञान येतांच नवीन प्रतीकेंहि येतात. राष्ट्रीय सभेचा तिरंगी झेंडा हें सर्व धर्मांच्या ऐक्याचें चिह्न आहे. त्या झेंड्यावरील चरखा हा कोणाचीहि पिळवणूक न करतां केल्या जाणाऱ्या श्रमजीवनाचें चिह्न आहे. चरखा म्हणजे स्वावलंबन. चरखा म्हणजे व्यक्तित्व. चरखा म्हणजे निर्दोष श्रमाची महती. खादी हें एक नवीन प्रतीक निर्माण झालें आहे. खेड्यांतील उपाशी लोकांचें स्मरण म्हणजे खादी ! लाल झेंडा हें नवीन प्रतीक येत आहे. जगांतील श्रमजीवी लोकांचें तें ऐक्यचिह्न. हातोडा, कोयता म्हणजे श्रम-महात्म्याचीं प्रतीकें.

अशा रीतीनें प्रतीकांकडे पहात जावें. खोल पाहण्याची दृष्टि आली म्हणजे एक प्रकारचा आनंद वाटतो. त्या त्या क्रिया, तीं तीं चिह्नें मग अर्थपूर्ण वाटतात. वस्तूंच्या अंतरंगाला हात लागला असें वाटतें. आपण रसग्राही आहोंत. बाह्य सालींनीं कोणाचें समाधान होणार ? भारतीय संस्कृतीच्या अंतरंगाला हात लावावयाचा असेल, तिचें खरें स्वरूप समजावून घ्यावयाचें असेल, तिचे खरे उपासक व्हावयाचें असेल, तर खोल दृष्टि घ्या. म्हणजे मग ह्या संस्कृतीचें अंतरंग प्रेमानें फुललेलें, पावित्र्यानें नटलेलें, त्यागानें पेटलेलें, माधुर्यानें भरलेलें, ज्ञानानें अलंकृत, आशेनें शोभिवंत, उत्साहानें संस्फूर्त, आनंदानें पूरित, असें दिसून आल्याशिवाय राहणार नाहीं !

## श्रीकृष्ण व त्याची मुरली : : २२

भारतीय हृदयाचे दोन चिरंजीव राजे आहेत. एक अयोध्याधीश राजा रामचंद्र व दुसरा द्वारकेचा राणा श्रीकृष्ण. इतर शेंकडों राजेमहाराजे झाले व गेले; परंतु या दोन राजांचें स्थान अढळ आहे. त्यांच्या सिंहासनांवर दुसरा कोणताहि सत्ताधीश बसूं शकणार नाहीं. भारतीय संस्कृति म्हणजे राम-कृष्ण.

कृष्णाच्या चरित्राकडे एका अगदीं निराळ्या प्रकारानें या प्रकरणांत मी पाहणार आहें. गोकुळांत प्रेमस्नेहाचा साम्यवाद स्थापन करणारा किंवा जरासंध-शिशुपालादि सम्राटांना धुळींत मिळविणारा, छळल्या जाणाऱ्या द्रौपदीसारख्या सतींची बाजू घेणारा किंवा अर्जुनाचे घोडे प्रेमानें हांकणारा अशा त्या कृष्णाचें वर्णन या प्रकरणांत नाहीं. कृष्णाकडे एक प्रत्यक्ष व्यक्ति या दृष्टीनें येथें मी पाहणार नाहीं. कृष्णाकडे एक प्रतीक या रीतीनें मी पाहणार आहें.

गोकुळांतील श्रीकृष्ण यांत फार खोल अर्थ आहे. गोकुळ म्हणजे काय ? गो म्हणजे इंद्रियें. गायी ज्याप्रमाणें हिरवा हिरवा चारा पाहून वाटेल तेथें चरत जातात, त्याप्रमाणें हीं इंद्रियें ते ते विषय पाहून त्यांच्या पाठीमागें स्वैर पळत सुटतात. आपलें जीवन म्हणजेच गोकुळ. कुळ म्हणजे समुदाय. इंद्रियांचा समुदाय जेथें आहे तें गोकुळ. असें हें गोकुळ आपल्या प्रत्येकाजवळ आहे.

परंतु या गोकुळांत आनंद नसतो. या गोकुळांत सुखसमाधान नसतें. येथें संगीत नसतें. मधुर मुरली नसते. येथें व्यवस्था नाहीं, नृत्यगीत नाहीं. या जीवन-गोकुळांत सारें बेसूर काम चाललेलें असतें. इंद्रियांच्या शेंकडों ओढी असतात. हें इंद्रिय खेंचतें, तें इंद्रिय खेंचतें. मनाच्याहि शेंकडों प्रवृत्ती असतात. ह्या प्रवृत्तींत एकवाक्यता नसते. अंतःकरणांत सारा गोंधळ. सारी आदळआपट. या गोकुळांत वणवे पेटलेले असतात. अंतःकरणाच्या यमुनेंत अहंकाराचे कालिये ठाणीं देऊन बसतात. अघासुर, बकासुर ( बकासुर म्हणजे दंभासुर ) या गोकुळांत येऊं पहात असतात. आपल्याला आपल्या हृदयांत सारखा गदारोळ व धांगड-धिंगा ऐकूं येत असतो. रात्रंदिवस हृदयमंथन सुरू असतें. आपण समुद्रमंथनाची गोष्ट वाचतों. समुद्रमंथन म्हणजे हृदयसमुद्राचें मंथन. या हृदयसागरावर अनेक वासनाविकारांच्या लाटा प्रत्येक क्षणाला उसळत असतात. या मंथनांतून नाना प्रकारच्या वस्तू बाहेर पडतात. कधीं लक्ष्मी बाहेर येऊन मोह पाडते, कधीं

अप्सरा भुलविते, कधीं दारू समोर येऊन उभी राहते. कधीं आपण लोकांना चाबूक मारीत सुटतों, तर कधीं आपण शंख फुंकतों. कधीं प्रेमाचा चंद्र उगवतो, तर कधीं द्वेषाचें हालाहल निर्माण होतें. कधीं सद्विचारांचीं फुलें देणारा पारिजात फुलतो, तर कधीं सर्वांना तुडविणारा ऐरावत उभा राहतो. अमृतप्राप्ति होईपर्यंत–खरें समाधान, खरी शांति याचा लाभ होईपर्यंत–हें असें हृदयमंथन सुरूच राहणार.

आपल्या या हृदयांतील अशांतीनें आपली तगमग होते. द्वेषमत्सरांनीं मस्त झालेल्या अशा जीवनगोकुळांत शेवटीं कृष्ण जन्माला येतो. नंद-यशोदेच्या पोटीं कृष्ण जन्मला. नंद म्हणजे आनंद. यशोदा म्हणजे यश देणाऱ्या सद्वृत्ती. आनंदासाठीं तडफडणारा हा जो जीवात्मा आणि या जीवात्म्याला साहाय्य करणाऱ्या ज्या सत्प्रवृत्ती यांच्या तळमळींतून हा श्रीकृष्णच जन्माला येतो. हृदयांतील मोक्षाची तळमळ म्हणजेच कृष्णजन्म.

कृष्णजन्म व रामजन्म केव्हां झाला तें आपण जर पाहूं लागलों, तर त्यांत केवढा अर्थ आपणांस दिसेल. रामजन्म भर दुपारीं झाला.

टळटळीत दुपारीं जन्मला रामराणा. पाय भाजत आहेत, कोठें छाया नाहीं, कोठें विसांवा नाहीं, अशा वेळीं राम जन्मास येतो. ज्या वेळेस जीवात्मा तडफडत असतो, हृदयाची दुःखानें लाही लाही होत असते, संसार म्हणजे पेटलेला वणवा असें वाटतें, अशा वेळेस जीवात्म्याला रमविणारा, हृदयांतील दशेंद्रियमुखी सम्राट् रावणाला मारून टाकणारा राम जन्म घेत असतो.

आणि कृष्ण केव्हां जन्मतो? राम भर दुपारीं जन्मला, तर कृष्ण भर मध्यरात्रीं जन्मला. श्रावणांतील मुसळधार पाऊस, मेघांचा गडगडाट, विजांचा चमचमाट, यमुना तुडुंब भरलेली, अशा वेळीं कृष्ण जन्म घेतो. ज्या वेळेस जीवनांत कृष्णपक्षांतील अंधार असतो, भयंकर निराशा असते, डोळ्यांतून अश्रूंचा पूर चाललेला असतो, मार्ग दिसत नाहीं, हृदयाची यमुना भरून आलेली असते, दुःखदैन्यांचे काळेकुट्ट मेघ जमून आलेले दिसतात, अशा वेळीं कृष्ण जन्मतो.

कृष्ण म्हणजे व्यवस्था लावणारा. राम रमविणारा, कृष्ण आकर्षून घेणारा. कृष्ण सर्व गोकुळाला वेध लावतो. कृष्ण गोपाल होतो. गोपाल म्हणजे इंद्रियांचा स्वामी. तो इंद्रियांना चरूं देतो, परंतु वाटेल तिकडे जाऊं देत नाहीं. त्या इंद्रियरूपी गायी वाटेल तेथें जाऊं नयेत म्हणून तो गोड मुरली वाजवितो. कृष्ण सर्व इंद्रियांना सुखसमाधान देतो. त्यांना ओढून, आकर्षून, संयमांत राखून संगीत निर्माण करतो.



आपल्या जीवनांतील अव्यवस्थेंत व्यवस्था लावणारा असा हा श्रीकृष्ण असतो. रवींद्रनाथांनीं गीतांजलींत म्हटलें आहे, "सारा दिवस सतारीच्या तारा लावण्यांतच गेला. अजून सतार लागत नाहीं, संगीत सुरू होत नाहीं." आपली सर्वांची ही स्थिति आहे. आपल्या जीवनांत मेळ नाहीं. जीवनाची सतार नीट लागत नाहीं. ही जीवनाची सतार सात तारांची नसून सहस्र तारांची आहे. ही अनंत तारांची हृदयतंत्री केव्हां नीट वाजणार?

आपल्या हजारों प्रवृत्ती म्हणजेच या तारा. आज एक वाटतें, उद्यां दुसरें वाटतें. या क्षणीं अमुक करावें असें वाटतें, दुसऱ्या क्षणीं दुसरेंच वाटतें. या हजारों वासना आपणांस नाचवीत असतात. आपली कुतरओढ चाललेली असते. एकाद्या नवऱ्याला दोनच बायका असल्या तरी त्याची किती केंविलवाणी स्थिति होते! मग या जीवात्म्याच्या त्या हजारों बायका काय दशा करीत असतील बरें?

सदैव चाले ओढाताण
हृदयावरतीं पडतो ताण
उरतें न मला अल्पत्राण
काय करावें? मीं केवळ मरुनी जावें!

असें जीवाला वाटूं लागतें.

श्रीकृष्णाला सोळा हजार नारी होत्या असें आपण वाचतों. सोळा हजारच काय, सोळा कोटीहि असतील. आपल्या या क्षणाक्षणाला बदलणाऱ्या शेंकडों मनःप्रवृत्ती म्हणजेच या नारी. म्हणजेच या गोपी. या गोपी जीवाला ओढीत असतात. परंतु गोकुळांत जन्मलेला श्रीकृष्ण या गोपींची फजिती करतो. तो गोपींचें वस्त्रहरण करून त्यांना लाजवितो.

प्रत्येक प्रवृत्ति गोंडस स्वरूप घेऊन जीवात्म्याला मोह पाडीत असते. गटेच्या फौस्ट काव्यामध्यें एके ठिकाणीं एक व्यक्ति म्हणते:

"मला माहीत होतें, कीं हें पाप आहे. परंतु ह्या पापानें किती सुंदर वेष धारण केला होता! हें पाप किती गोड व सुंदर दिसत होतें!"

परंतु श्रीकृष्ण या गोपींच्या बाह्य रूपरंगावर भुलत नाहीं. तो त्यांचें खरें स्वरूप प्रकट करतो. त्यांचें आंतील ओंगळ व हिडीस स्वरूप त्यांच्या निदर्शनास

आणून देतो. त्यांचीं लाक्षणिक वस्त्रें दूर करतो. त्या त्या दुष्ट प्रवृत्ती मग लाजतात, त्या नरमतात, विरमतात. त्या श्रीकृष्णाच्या चरणीं रत होतात. " बा कृष्णा! आतां तूं सांगशील तसें वागूं. तूं सांगशील तें करूं. तूं आमचा स्वामी," असें त्या हात जोडून म्हणतात.

जीवनांत हेंच मुख्य काम आहे. सर्व इंद्रियें, सर्व वृत्ती यांना एका महान् ध्येयाला भजनीं लावणें, जीवनांत स्थिरता आणणें. नदी सागराकडे जाणार, पतंग प्रकाशाकडे जाणार, भुंगा कमळाकडे वळणार, मोर मेघांकडे वळणार. आपल्या सर्व वृत्ती, सारी शक्ति कोणत्या तरी एका ध्येयाकडे घेऊन जाणें हें कार्य असतें.

श्रीकृष्ण हें काम करतो. सर्व प्रवृत्तींना खेंचून ध्येयाकडे त्यांना तो वळवितो. यामुळें जीवनांतील अशांति लयाला जाते. एकच सूर हृदयांत घुमूं लागतो. परंतु हें काम सोपें नाहीं. हृदयांत ऐक्याची मुरली वाजूं लागण्यापूर्वी कृष्णाला किती तरी काम करावें लागतें.

अहंकाराचा कालिमा नाहींसा करावा लागतो. आपला अहंकार सारखा फूत्कार करीत असतो. आपल्या आजुबाजूस कोणी येऊं शकत नाहीं. मी मोठा, मी श्रेष्ठ, इतर सारे मूर्ख, असल्या अहंकाराच्या शेजारीं कोण राहणार?

" समस्तांसि भांडेल तोची करंटा "

अशा सृष्टींत सर्वांशीं भांडत जाणारा हा अहंकारी एकटा जीव कधीं मुक्त होणार?

कृष्ण या अहंकाराच्या फणांवर उभा राहतो. जीवनयमुनेंतून या कालियाला तो हांकलून देतो.

या जीवनगोकुळांतील द्वेषमत्सरांचे वणवे कृष्ण गिळून टाकतो. दंभ, पाप यांचे राक्षस नाहींसे करतो.

अशा प्रकारें जीवन शुद्ध होतें. एक ध्येय दिसूं लागतें. त्या ध्येयाचा ध्यास जिवाला लागतो. जें मनांत तेंच ओठांत, तेंच हातांत; आचार, उच्चार व विचार यांत ऐक्य येतें. हृदयांतील गडबड थांबते. साऱ्या तारा ध्येयाच्या खुंटीला नीट बांधल्या जातात, त्यांतून दिव्य संगीत स्रवूं लागतें.

गोकुळांत कृष्णाची मुरली केव्हां वाजूं लागली?

शरद् ऋतु उदय चंद्राचा
वनिं वृंद उभा गवळणींचा



सुगंध सुटत पवनाचा
ये वास मलयगिरीवरचा

अशी ती प्रसन्न पावन वेळा होती. हृदयाकाशांत शरदृतु पाहिजे. हृदयांत वासना-विकारांचीं वादळें आतां नाहींत. स्वच्छ आकाश आहे. शरदृतूमध्यें आकाश निरभ्र असतें. नद्यांतील खळमळ खालीं बसून स्वच्छ शंखासारखें पाणी वाहत असतें. आपलें जीवन असें झालें पाहिजे. आसक्तीचे ढग जमा होतां कामा नयेत. अनासक्त रीतीनें केवळ ध्येयभूत कर्मांतच जीव रंगून गेला पाहिजे. शुद्ध आचार व शुद्ध विचार रात्रंदिवस होत राहिला पाहिजे.

शरदृतु आहे आणि शुक्लपक्ष आहे. प्रसन्न चंद्र उगवला आहे. चंद्र म्हणजे मनाची देवता. चंद्र उगवला आहे म्हणजे मनाचा पूर्ण विकास झाला आहे. सद्भाव फुलला आहे, सद्विचारांचें स्वच्छ चांदणें पडलें आहे. अनासक्त हृदयाकाशांत शीलाचा चंद्र शोभत आहे. प्रेमाची पौर्णिमा आली आहे.

अशा वेळेस साऱ्या गोपी जमतात. साऱ्या मनःप्रवृत्ती कृष्णाभोंवतीं जमतात. हृदयांत व्यवस्था लावणारा, गोंधळांतून सुंदरता निर्माण करणारा तो श्यामसुंदर कोठें आहे, अशी त्यांना तळमळ लागते. त्या ध्येयगोपाळाची मुरली ऐकावयास साऱ्या वृत्ती अधीर होतात.

एका बंगाली गीतांत एक फारच गोड भाव एकदां मीं वाचला होता. एक गोपी म्हणते :

" माझ्या अंगणांत प्रत्यहीं कांटेसराटे पसरून त्यांच्यावरून चालत जाण्याची संवय मी करीत असतें. कारण, त्याची मुरली कानीं पडतांच मला धांवत जावें लागेल, आणि वाटेंत कांटे असले तर मी अडायची एकादी. संवय असली म्हणजे बरी.

" माझ्या अंगणांत पाणी ओतून मी खूप चिखल करतें, आणि त्या गाऱ्यांतून चालण्याचा अभ्यास मी करीत असतें. कारण, त्याची मुरली ऐकली कीं मला जावें लागेल, आणि वाटेंत चिखल असेल तर फजिती व्हावयाची; परंतु संवय असली म्हणजे पळत जाईन."

ध्येय एकदां ठरलें म्हणजे मग चिखल असो वा कांटे असोत, फांस असो वा विष असो, त्याच्याकडे साऱ्या जिवाची ओढ लागली पाहिजे. कृष्णाची मुरली

ऐकतांच सर्वांनीं धांवत आलें पाहिजे, फेर धरला पाहिजे. हातांत हात घालून नाचलें पाहिजे. अंतर्बाह्य एकता.

हृदय शुद्ध आहे, प्रेमाचा चंद्र फुलला आहे, साऱ्या वासना संयत आहेत, एक ध्येय दिसत आहे; आसक्ति नाहीं, द्वेषमत्सर मालवलेले आहेत, अहंकार शमला आहे, दंभ दुरावला आहे, अशा वेळेस गोकुळांत मुरली सुरू होते. या जीवनांत संगीत सुरू होतें. त्या संगीताची गोडी कोण वर्णील? त्या संगीताची गोडी कोण चाखील?

महात्माजी म्हणाले, "माझ्या हृदयांत तंबोरा लागलेलाच आहे." थोर उद्गार. प्रत्येकाच्या हृदयांत असा तंबोरा लागूं शकेल. प्रत्येकाच्या जीवनगोकुळांत ही मधुर मुरली वाजेल. परंतु केव्हां? व्यवस्था लावणारा, इंद्रियांना आकर्षून घेऊन ध्येयाकडे नेणारा श्रीकृष्ण जन्मेल तेव्हां.

हा श्रीकृष्ण आपल्या सर्वांच्या हृदयांत आहे. ज्याप्रमाणें एकाद्या डोंगरांत बाहेरच्या खडबडीत ओबडधोबड खडकांत एकादें शिवालय असतें, त्याप्रमाणें आपल्या या ओबडधोबड ओंगळ जीवनाच्या आंतील बाजूस एक शिवालय आहे. आपल्या सर्वांच्या हृदयगाभाऱ्यांत हा शंभू, हा मृत्युंजय, हा सदाशिव आहे. तो प्रत्यहीं दिसत नाहीं; परंतु आहे यांत संशय नाहीं. ॲमिल या एका थोर पाश्चिमात्य विचारवंतानें एके ठिकाणीं लिहिलें आहे:

"Deep within this ironical and disappointed being of mine, there is a child hidden, sad simple creature who believes in the ideal, in love, in holiness and all heavenly superstitions."

याचा भावार्थ असा, कीं या माझ्या परस्परविरोधी, संशयी, निराश अशा जीवनाच्या आंतील गाभाऱ्यांत एक लहानसें बालक आहे. ध्येयावर श्रद्धा ठेवणारें, प्रेमावर, पावित्र्यावर, मांगल्यावर विश्वास ठेवणारें, सर्व दैवी वृत्तींवर श्रद्धा ठेवणारें असें हें बालक आहे. हें बालक दिसत नाहीं, परंतु तें आहे. तें अजून लहान आहे, साधें आहे, खिन्न असें आहे; परंतु आहे.

हें बालक म्हणजेच बाळकृष्ण. हा बाळकृष्ण वाढूं लागतो. तो खिन्न न राहता बळवान् होतो. गुदमरून न जातां प्रकट होऊं लागतो. जीवनगोकुळांत संगीत निर्माण करण्यासाठीं धडपडूं लागतो. या बाळकृष्णाला वाढवणें हें आपलें काम आहे. जीवनांत संगीत पाहिजे असेल, तर ह्या वेणुधराला वाढवा.



हृदयांतील ही वेणु एकादे वेळेस ऐकूं येते. परंतु हा वेणुनाद अखंड ऐकावयास आला पाहिजे. इतर आवाज बंद केल्याशिवाय हा अंतर्नाद ऐकावयास मिळणार नाहीं. इतर वासनांचीं गीतें बंद केल्याशिवाय ध्येयगीत कसें ऐकूं येणार? वरचे दगडधोंडे दूर केले कीं खालचा झुळझुळ वाहणारा झरा दृष्टीस पडतो. त्याचप्रमाणें अहंकार, आसक्ति, रागद्वेष यांचे फत्तर फोडून दूर केले म्हणजे हृदयांतील भावगंगेचें गुणगुणणें ऐकूं येईल. कामक्रोधांचे ताशे बंद करा म्हणजे हृदयांतल्या शिवालयांतील मुरली ऐकूं येईल.

हरिजनांबद्दलच्या उपवासाच्या वेळीं महात्माजींनीं आश्रमांतील बाळगोपाळांस लिहिलेल्या पत्रांत म्हटलें होतें :

"चाळीस वर्षांच्या सेवेनें माझ्या अंतःकरणांत मीं थोडी व्यवस्था निर्माण केली आहे. संयमानें, तपस्येनें मीं जीवनांतील बेसूरपणा दूर केला आहे, म्हणून तो आंतील मंजुळ ध्वनि मी ऐकूं शकतों."

सेवेनें, संयमानें हें संगीत निर्माण करावयाचें आहे. कृष्ण म्हणजे मूर्त संयम. कृष्ण कर्षून घेणारा, अर्जुनाचे घोडे संयमांत राखणारा, इंद्रियांचे घोडे स्वैर जाऊं न देणारा म्हणजे कृष्ण. संयमाशिवाय संगीत नाहीं. संगीत म्हणजे मेळ, प्रमाण. प्रमाण म्हणजे सौंदर्य. जीवनांत सर्व गोष्टींचें प्रमाण साधणें म्हणजेच संगीत निर्माण करणें. हाच योग.

यासाठीं धडपड हवी. रात्रंदिवस प्रयत्न हवा. ती अत्यंत गोड मुरली ऐकण्याचें भाग्य पाहिजे असेल, तर रात्रंदिवस अविश्रान्त प्रयत्न हवेत. दक्षता हवी.

## रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग

### अंतर्बाह्य जग आणि मन

रात्रंदिवस जनांत व मनांत पदोपदीं झगडे होतील. पुनः पुनः पडूं, परंतु पुनः पुनः चढूं. धडपड हेंच मानवाचें भाग्य आहे. पशूच्या जीवनांत धडपड नाहीं. आजच्यापेक्षां उद्यां पुढें जाऊं, आजच्यापेक्षां उद्यां अधिक पवित्र होऊं ही भावना त्याच्याजवळ नाहीं. जो मुक्त झाला त्याला ही धडपड नाहीं. ज्याच्या जीवनांत धडपड नाहीं तो मुक्त तरी असेल, किंवा पशु तरी असेल.

धडपड हें आपलें ध्येय. आपण सारीं धडपडणारीं मुलें. 'इन्किलाब जिंदाबाद' याचा अर्थ 'क्रांति चिरायु होवो' असा आहे. धडपड चिरायु होवो. उत्तरोत्तर विकास होवो. धडपड करतां करतां एक दिवस परमपद गांठूं.

याजसाठीं केला होता अट्टाहास
शेवटचा दीस गोड व्हावा

हा सर्व अट्टाहास, ही सारी धडपड, तो शेवटचा गोड दिवस यावा म्हणून आहे. तो गोड वेणुध्वनि कानीं पडावा म्हणून आहे. तो दिवस शतजन्मांनीं आला तरी लवकरच आला असें म्हटलें पाहिजे.

फ्रान्समधील विख्यात कथालेखक अनातोले यानें एके ठिकाणीं लिहिलें आहे, " देवानें ' तुझें काय दूर करूं ' असें मला जर विचारलें, तर मी त्याला म्हणेन, ' माझें सारें कांहीं दूर कर, परंतु माझी धडपड दूर करूं नकोस. माझें दुःख दूर करूं नकोस.' "

कुंती म्हणाली, " सदैव मला विपत्तीच दे. " विपत्ति म्हणजे ही धडपडच, ओढाताण. पूर्णतेचें स्मरण ठेवून तिला गांठण्यासाठीं होणारी जिवाची तगमग. ही तगमग ज्याच्याजवळ आहे तो धन्य होय. त्याच्या जीवनांत आज ना उद्यां कृष्णाची मंजुळ मुरली वाजूं लागेल.

श्रीकृष्णानें गोकुळांत आनंदीआनंद आधीं निर्माण केला. गोकुळांत मुरली त्यानें आधीं वाजविली, आणि नंतर जगांत संगीत निर्माण करावयास तो गेला. आधीं गोकुळांतील वणवे त्यानें विझविले. गोकुळांतील कालिये मारले. अघासुर, बकासुर मारले. नंतर समाजांतील कालिये, समाजांतील दंभ, समाजांतील द्वेष-मत्सरांचे वणवे दूर करावयास तो बाहेर पडला. स्वतःच्या जीवनांतील संगीत सर्व त्रिभुवनास तो ऐकवूं लागला. दगडधोंडे पाझरूं लागले.

मनुष्य स्वतःच्या अंतःकरणांत जेव्हां स्वराज्य स्थापील, तेथें संगीत, सुसंबद्धता, ध्येयात्मता, निःशंकता, सुसंवादिता निर्मील, तेथले वणवे विझवील, तेथले असुर संहारील, थोडक्यांत, स्वतःचा जेव्हां स्वामी होईल, तेव्हांच तो जगांतहि आनंद निर्माण करूं शकेल. ज्याच्या स्वतःच्या जीवनांत आनंद नाहीं, तो दुसऱ्यास काय देणार ? जो स्वतः शान्त नाहीं, तो दुसऱ्यास काय माती शान्ति देणार ? ज्याच्या स्वतःच्या जीवनांत संगीत नाहीं, तो दुसऱ्याच्या जीवनांतील रडगाणीं कशीं दूर करणार ? जो स्वतःचा गुलाम आहे तो दुसऱ्यास कसें मुक्त करणार ? जो स्वतःस जिंकूं शकत नाहीं, तो दुसऱ्यास काय जिंकणार ? स्वतः पडलेला दुसऱ्यास उठवूं शकत नाहीं; स्वत बद्ध असलेला दुसऱ्यास मुक्त करूं शकत नाहीं; स्वतः सदैव ढोपरांत मान घालून रडणारा दुसऱ्यास हंसवूं शकत नाहीं. स्वतः स्फूर्तिहीन दुसऱ्यास कशी चेतना देणार ? स्वतः निरुत्साही दुसऱ्यास उत्साहसागर कसे बनविणार ? स्वतःच्या जीवनगोकुळाला आधीं सुखमय, आनंदमय करा. मगच या सभोंवतालच्या संसाराला तुम्ही आनंदमय करूं शकाल. स्वतःची बेसूर जीवनवांसरी सुधारा. मग दुसऱ्यांच्या जीवनबांसऱ्या तुम्ही सुधारूं शकाल.



परंतु तो दिवस कधीं येईल ? येईल, एक दिवस येईल. जीवनयमुना तो दिवस येईपर्यंत अशान्त राहील. या जीवनयमुनेवर कधीं क्रोधमत्सरांच्या, कधीं स्नेह-प्रेमाच्या प्रचंड लाटा उसळतील. परंतु या जीवनयमुनेची सारी धडपड, हें वेडेंवांकडें उचंबळणें त्या ध्येयासाठीं आहे. श्रीकृष्णाच्या परमपवित्र पायांचा स्पर्श व्हावा म्हणूनच ही खळबळ आहे. एक दिवस कृष्णाचा पदस्पर्श होईल व यमुना शांत होईल. त्या ध्येयभगवानाच्या चरणांवर स्वतःस ओतण्यासाठीं ही यमुना अधीर आहे. शान्त होण्यासाठीं वादळ उठतें. शान्त होण्यासाठींच जीवन धडपडत आहे. संगीत निर्माण करणाऱ्या प्रभूच्या पायांचा स्पर्श व्हावा म्हणून जीवन अधीर आहे. येईल, तो शरदृतु एक दिवस येईल. तो प्रसन्न सुगंध एक दिवस सुटेल. ती प्रसन्न पौर्णिमा एक दिवस फुलेल. त्या दिवशीं गोकुळांत प्रेमराज्य स्थापणाऱ्या, अव्यवस्था, गोंधळ, बजबजपुरी, घाण, वणवे, दंभ दूर करून मेळ निर्माण करणाऱ्या, त्या कृष्ण-कन्हैयाच्या मुरलीचा अमृत-ध्वनि माझ्या जीवनांत ऐकूं येईल ! त्या शामसुंदराची वेड लावणारी वेणु चिरंतन वाजत राहील !

हृदयंगम वाजत वेणू
स्वैर न विचराति इंद्रियधेनू ॥
जीवनगोकुळिं ये वनमाळी
अमित सुखाची सृष्टि पिकली
शिरिं धरिन तदीय पदांबुजरेणू ॥
प्रेमळ गोपी या मम वृत्ती
वेडावुन प्रभुरूपीं जाती
प्रभुविण वदति कीं कांहींच नेणू ॥

## मृत्यूचें काव्य : : २३

भारतीय संस्कृतींत मृत्यूविषयींचे ठिकठिकाणीं जे विचार आहेत ते किती गोड आहेत व किती भव्य आहेत ! मृत्यूची भीषणता भारतीय संस्कृतींत नाहीं. मृत्यु म्हणजे जीवनाच्या वृक्षाला लागलेलें गोड फळ.

मृत्यु हें ईश्वराचेंच एक स्वरूप. जीवन व मरण दोन्ही परम मंगल भाव. जीवन व मरण वस्तुतः एकरूपच आहेत. निशेंतूनच शेवटीं उषा प्रकट होते व उषेंतूनच पुन्हां निशा निर्माण होते. जीवनाला मरणाचें फळ येतें व मरणाला जीवनाचें फळ येतें.

गीतेनें मरण म्हणजे वस्त्र फेंकणें असें म्हटलें आहे. काम करतां करतां हें वस्त्र जीर्ण झालें, फाटलें. ती त्रिभुवनमाउली नवीन वस्त्रें देण्यासाठीं आपणांस बोलावते. आपणांस ती उचलून घेते. पुन्हां नवीन आंगडें-टोपडें लेववून या जगाच्या अंगणांत खेळावयास आपणांस ती ठेवते व दुरून गंमत बघते. कधीं कधीं जीव जन्मला नाहीं, तोंच जातो. कोणी बालपणीं मरतो, कोणी तरुणपणीं. आई अंगरखा देऊन पाठवते. परंतु जगांत पाठवलें नाहीं तोंच तिला दुरून तो अंगरखा चांगला वाटत नाहीं. पटकन् ती बाळाला मागें नेते व नवीन अंगरखा घालते. आईच्या हौसेला मोल नाहीं.

माझी माता कांहीं भिकारी नाहीं. अनंत वस्त्रांनीं तिचें भांडार भरलेलें आहे. परंतु मातेचें भांडार भरलेलें आहे म्हणून दिलेले कपडे मीं वाटेल तसे फाडून टाकतां कामा नये. शक्य तों काळजीपूर्वक हा कपडा वापरला पाहिजे. तो स्वच्छ, पवित्र राखला पाहिजे, आणि सेवा करतां करतां तो फाटला पाहिजे.

देह म्हणजे मडकें. कोणी मेला तर आपण त्याच्यापुढें मडकें धरतों. हें मडकें होतें, फुटलें. त्यांत रडण्यासारखें काय आहे ? सेवेसाठीं हें मडकें मिळालें होतें. महान् ध्येयवृक्षांना पाणी घालण्यासाठीं हें मडकें मिळालें होतें. कोणाचें लहान मडकें, कोणाचें मोठें. नाना प्रकारचीं हीं मडकीं तो महान् कुंभार निर्माण करतो व जगाची बाग तयार करूं बघतो. फुटलेलें मडकें तो पुन्हां नीट करतो. पुनः तें मडकें पाणी घालूं लागतें. असा हा प्रकार चालला आहे.

व्हिक्टर ह्यूगोनें एके ठिकाणीं म्हटलें आहे, " मनुष्य म्हणजे काय ? हा



नरदेह म्हणजे काय ? हा मातीचा गोळा आहे." परंतु त्यांत एक चित्कळा आहे. त्या चित्कळेमुळें या मातीच्या गोळ्याला महत्त्व आहे.

एक मातीचा गोळा बदलून विश्वंभर दुसरा तयार करतो. ती चित्कळा त्यांत ठेवून पुन्हां या जगांत तो पाठविण्यांत येतो. ज्याप्रमाणें लहान मुलें पतंग फाटला तर पुन्हां नवीन कागद घेऊन दुसरा तयार करतात, तसेंच हें. परमेश्वर जीवरूपी पतंग कोणत्या तरी अदृश्य गच्चींत बसून सारखे उडवीत आहे. त्यांना खालीं-वर खेंचीत आहे. पतंग फाटले तर पुन्हां नीट करतो. नवीन कागद, नवीन रंग. पुन्हां ते उडवतो. नाना रंगांचे, नाना आकारांचे, नाना धर्मांचे, नाना वृत्तींचे असे हे कोट्यवधि पतंग प्रत्यहीं उडत आहेत, फाटत आहेत, नवीन येत आहेत. प्रचंड क्रीडा. विराट् खेळ !

मृत्यु म्हणजे महायात्रा, मृत्यु म्हणजे महाप्रस्थान, मृत्यु म्हणजे महानिद्रा ! दररोजच्या धडपडीनंतर आपण झोंपतों. झोंप म्हणजे लघु मरण. सर्व जीवनाच्या धडपडीनंतर-अनेक वर्षांच्या धडपडीनंतरहि-असेंच आपण झोंपतों. रोजची झोंप आठ तासांची. परंतु ही झोंप मोठी असते एवढाच फरक.

मृत्यु म्हणजे आईच्या कुशींत जाऊन झोंपणें ! लहान मूल दिवसभर खेळतें, खिदळतें, रडतें, पडतें; रात्र पडतांच आई हळूच त्याला उचलून घेते. त्याचीं खेळणीं वगैरे तेथेंच पडतात. आई त्याला कुशींत घेऊन झोंपते. ती आईची ऊब घेऊन बाळ ताजेंतवानें होऊन सकाळीं पुन्हां दुप्पट उत्साहानें चेष्टा करूं लागतें. तसेंच जीवाचें. जगांत दमलेल्या, श्रमलेल्या जीवाला ती माता उचलून घेते. बाळाची इच्छा नसतांहि उचलून घेते. आपल्या सोबत्यांकडे, आपल्या सांसारिक खेळण्यांकडे बाळ आशाळभूत दृष्टीनें बघत असतो. परंतु आईला बाळाचें हित ठावें. त्या रडणाऱ्या बाळाला ती घेते. कुशींत निजविते. जीवनरस पाजून पुन्हां पाठविते.

मृत्यु म्हणजे माहेरीं जाऊन येणें. सासरीं गेलेली लेक दोन दिवस माहेरीं जाऊन येते. पुन्हां प्रेम, उत्साह, आनंद, मोकळेपणा घेऊन येते. त्याप्रमाणें त्या जगन्माउलीजवळ जाऊन येणें म्हणजेच मृत्यु. लहानपणीं शाळेंत जाणारीं मुलें मध्येंच घरीं जाऊन येतात. पाणी पिण्याचें निमित्त करून, भुकेचें निमित्त करून आजारीपणाचें निमित्त करून मुलें घरीं जातात. त्यांना आईचा मुखचंद्र पहावयाची तहान असते. आईच्या प्रेमाची भूक असते. आई प्रेमानें बघते, पाठीवरून हात फिरविते.

वडी देते, जा म्हणते. मुलें हंसत खेळत पुन्हां प्रसन्नपणें शाळेंत येतात व धडे शिकूं लागतात. तसेंच हे जगाच्या शाळेंत कंटाळलेले किदरलेले जीव आईचा मुखचंद्र पहावयास आसावतात. ते आईकडे जातात. भरपूर प्रेमरस पिऊन पुन्हां या संसाराच्या महान् विद्यालयांत शिकूं लागतात.

मरण म्हणजे विश्रांति. मरण म्हणजे अनंतांत स्नान. थकलेले, कंटाळलेले लोक गांवाबाहेरच्या तलावांत पोहून येतात, समुद्रांत डुंबून येतात. नदीच्या पाण्यांत नाचून कुदून येतात. त्यांचा थकवा जातो, जीवनांत डुंबल्यामुळें जीवन मिळतें. मरण म्हणजे काय ? जगांत दमलेले जीव अनंत जीवनाच्या सिंधूंत डुंबून येतात. हें डुंबावयास जाणें म्हणजे मरण. ही सुटी आहे. मरण म्हणजे अनंत जीवनांत पोहून येण्यासाठीं मिळालेली महान् सुटी. त्या जीवनांत न्हाऊनमाखून पुन्हां ताजेंतवानें होऊन आपण जगांत कर्मे करावयास येतों.

उंच शिखरावरच्या महादेवाच्या मंदिराकडे जाण्यासाठीं पायऱ्या असतात. त्याप्रमाणें परिपूर्णतेच्या शिखराकडे जाण्यासाठीं जन्ममरणाचीं पावलें टाकीत जीव जात असतो. मरण म्हणजे एक पाऊलच. मरण म्हणजेहि प्रगतीच. मरण म्हणजे पुढें जाणें. देवाकडे नेणाऱ्या पायऱ्यांना आपण प्रणाम करतों. त्या पायऱ्या पवित्र वाटतात. ध्येयसाधन वाटतात. त्याप्रमाणें मरणहि पवित्र व मंगल आहे. आंतल्या ध्येयाकडे तें घेऊन जाणारें आहे. मरणाला प्रणाम असो.

मरण म्हणजे एक प्रकारें विस्मरण. जगांत स्मरणाइतकेंच विस्मरणाला महत्त्व आहे. जन्मल्यापासून ज्या ज्या गोष्टी आपण केल्या, जें जें ऐकलें, जें जें पाहिलें, जें जें मनांत आलें, त्या सर्वांचें जर सारखें आपणांस स्मरण राहिलें, तर तो केवढा भार होईल ? त्या प्रचंड पर्वताखालीं आपण चिरडले जाऊं. हें जीवन असह्य होईल.

व्यापारी ज्याप्रमाणें हजारों घडामोडी करतो, परंतु शेवटीं एवढा फायदा किंवा एवढा तोटा, एवढी सुटसुटीत गोष्ट ध्यानांत धरतो, तसेंच जीवाचें आहे. मरण म्हणजे जीवनाच्या व्यापारांतील नफा-तोटा पाहण्याचा क्षण. साठ-सत्तर वर्षे दुकान चालवलें त्याचा आढावा घेण्याची वेळ म्हणजे मरण. त्या नफ्या-तोट्याच्या अनुभवानें शहाणे होऊन आपण पुन्हां दुकान थाटतों. आईची अनुज्ञा घेऊन पुन्हां व्यापार करावयास आरंभ करतों. कनवाळू, स्वातंत्र्य देणारी आई कधीं प्रतिबंध करीत नाहीं.



मरणाची फारच आवश्यकता असते. कधीं कधीं जगांतून या सद्यःकालीन नामरूपानें नाहींसें होणें हें इष्ट व आवश्यक असतें. एकादा मनुष्य, समजा, वाईट रीतीनें वागत होता. त्या माणसास पश्चात्ताप होऊन तो जरी चांगल्या रीतीनें वागूं लागला, तरी जनतेला त्याच्या काळ्या भूतकाळाचें विस्मरण होत नाहीं. लोक म्हणतात, “ तो अमुक मनुष्य ना ? माहीत आहे त्याचें सारें; ‘ करून करून भागले आणि देवपूजेला लागले. ’ उगीच सोंगें करतो झालें. पुन्हां ये रे माझ्या मागल्या त्याचें सुरू होईल. कसला पश्चात्ताप नि काय ? ” लोकांचे हे उद्गार स्वतःची सुधारणा करूं पाहणाऱ्या त्या अनुतप्त जीवाच्या मर्मीं लागतात. स्वतःचा भूतकाळ तो विसरूं पाहतो; परंतु जग विसरूं इच्छीत नाहीं. अशा वेळेस पडद्याआड जाऊन नवीन रंग व नवीन नांवरूप घेऊन लोकांसमोर पुन्हां येण्यांतच मौज असते.

मरण नसतें तर जग भेसूर दिसलें असतें. मरणामुळें संसाराला रमणीयता आहे. मरणामुळें जगांत प्रेम आहे. आपण सारे अमर असतों तर एकमेकांस विचारलें नसतें. सारे दगडांसारखे दूर दूर पडून राहिलों असतों. उद्यां आपल्याला जावें लागेल तर कां वाईट वागा, असें मनुष्य मनांत म्हणतो व गोड वागतो. इंग्रजी भाषेंत एक कविता आहे : दुःखी भाऊ म्हणतो, कोठें आहे माझा भाऊ ? मी का आतां एकट्यानें खेळूं ? एकटा नदीकांठीं हिंडूं ? फुलपांखरांपाठीमागें धावूं ? कोठें आहे माझा भाऊ ? तो जिवंत असतांनाच त्याच्यावर प्रेम केलें असतें तर किती सुरेख झालें असतें ! परंतु आतां काय ?

मरण उपकारक आहे. जीवनानें जें काम होत नाहीं, तें कधीं कधीं मरणानें होतें. संभाजीमहाराजांच्या जीवनानें मराठ्यांत फूट पडली, परंतु त्यांच्या महान् मरणानें मराठे जोडले गेले. तें मरण म्हणजेच अमृत ठरलें. ख्रिस्ताच्या जीवनानें जें झालें नाहीं तें त्याच्या क्रॉसवरच्या मरणानें झालें. मरणांत अनंत जीवन असतें.

आपल्याला वाटतें, कीं मरण म्हणजे अंधार; परंतु मरण म्हणजे अमर प्रकाश, अनंत प्रकाश. मरण म्हणजे निर्वाण, म्हणजेच अनंत जीवन पेटवणें. भगवान् बुद्ध म्हणत, “ स्वतःचें निर्वाण करा म्हणजेच जगावर खरें प्रेम करतां येईल. स्वतःला विसरा. स्वतःच्या वैयक्तिक आशा, आकांक्षा, क्षुद्र स्वार्थलोभ विसरा. म्हणजेच खरें अमर जीवन प्राप्त होईल.” स्वतःची सर्व आसक्ति

विसरणें, स्वतःच्या देहाच्या, मनाच्या, इंद्रियांच्या स्वार्थी वासना विसरणें म्हणजेच मरण. हें मरण या देहांत असूनहि अनुभवतां येतें. नारळांतील गोटा नारळापासून अलग होऊन जसा खुडखुड वाजतो, त्याप्रमाणें देहेंद्रियांपासून आत्म्याला अलग करून वागणें म्हणजेच मरण. तुकाराममहाराज म्हणूनच म्हणत असत :

**आपुलें मरण पाहिलें म्यां डोळां**
**तो सुखसोहळा अनुपम**

हें मरण ज्यानें एकदां अनुभविलें त्याला पुनश्च मरण नाहीं. जिवंतपणीं जो मरावयास शिकला तो चिरंजीव झाला.

जर्मन दंतकथांमध्यें एक फार भीषण गोष्ट आहे. एक राक्षस आहे. " तूं कधीं मरणार नाहींस " असा शाप त्या दैत्याला देवानें दिलेला असतो. आपल्या देशांतील राक्षसांनीं हा वर मानिला असता. कधींहि मरण न येणें याच्याहून भाग्याची गोष्ट कोणती, असें त्यांनीं म्हटलें असतें. परंतु तो जर्मन देशांतील राक्षस अस्वस्थ होतो. त्याला जीवनाचा कंटाळा येतो. स्वतःच्या त्याच त्या जीवनाचा विसर पडावा असें त्याला वाटतें. स्वतःच्या देहाचा विसर पडावा असें वाटतें. देहाचा चिकटलेला हा मातीचा गोळा पडावा असें त्याच्या आत्म्याला वाटतें. ही देहाची खोळ, हें देहाचें ओझें कधीं गळून पडेल असें त्याला वाटत होतें; परंतु त्याला मरण येत नाहीं. तो उंच कड्यावरून स्वतःला खालीं लोटतो, परंतु चेंडूसारखा तो वर उसळतो. अग्नि त्याला जाळीत नाहीं, पाणी बुडवीत नाहीं, विष मारीत नाहीं. फांसाचा हार होतो, विषाचें अमृत होतें. देवाच्या नांवानें तो दांत-ओंठ खातो. कडकड बोटें मोडतो. त्याच्या हृदयाची होळी पेटते. परंतु ही होळी शान्त करणारे मरणाचे मेघ ओथंबून येत नाहींत. त्या अनुकंपनीय राक्षसाची केविलवाणी दीन दशा सरत नाहीं. मरणाचें सौभाग्य त्याला मिळत नाहीं.

किती असह्य आहे ही दशा ! हें मरण निर्माण करणाऱ्या परमेश्वराचे कितीहि आभार मानले तरी ते पुरेसे होणार नाहींत. मरण म्हणजे जिवाशिवाचें हितगुज. मरण म्हणजे जीवनांतील चिखल खालीं बसणें. मरण म्हणजे पुनर्जन्म.

अमावास्येला आपणांस अंधार दिसतो. अमावास्येला चंद्र नाहीं असें वाटतें; परंतु समुद्राला सर्वांत मोठी भरती अमावास्येच्या दिवशींच येत असते. अमावास्या म्हणजे मोठी पर्वणी. अमावास्येला चंद्रसूर्याची भेट होत असते. चंद्र सूर्याशीं एकरूप होऊन जातो. त्याप्रमाणें मरण म्हणजे जीवनाची अमावास्या



होय. जीव शिवाशीं मिळून जातो. जीवात्मा परमात्म्याशीं एकरूप होतो. जीव दिसत नाहीं, कारण तो विश्वंभरांत विलीन झालेला असतो. आमावास्येला सर्वांत मोठी भरती. त्याप्रमाणें मरण म्हणजे अनंत जीवनांत मिळून जाणें. मरणाची अमावास्या म्हणजे जीवनाची मोठी पौर्णिमा होय.

देशबंधु दास यांनीं मरणसमयीं एक सुंदर कविता केली होती. त्या कवितेंत ते म्हणतात :

" प्रभो ! माझ्या ज्ञानाभिमानाचें गांठोडें माझ्या डोक्यावरून आतां उतर. माझ्या पोथ्या-पुस्तकांची पोटली माझ्या खांद्यावरून खालीं घे. हा बोजा वाहून वाहून मी आतां जीर्णशीर्ण झालों आहें. माझ्यांत राम नाहीं. मी सारखा धापा टाकीत आहें. पावलागणिक मला दम लागत आहे. डोळ्यांसमोर काळोखी येत आहे. उतर, माझा भार उतर.

" डोक्यावर मोरमुकुट आहे, हातांत बांसरी आहे, असा तो राधारमण श्यामसुंदर गोपाळ पहावयासाठीं माझ्या प्राणांना तहान लागली आहे.

" आतां वेद नको, वेदान्त नको. सारें विसरून जाऊं दे. तें तुझें अनंत राज्य मला आतां दिसत आहे. प्रभो ! तुझ्या कुंजद्वारांत मी आलों आहें. माझ्या प्रिय अशा त्या द्वारांत मी आलों आहें. माझा विझूं पाहणारा दिवा पुन्हां प्रज्वलित करण्यासाठीं तुझ्या दारांत मी आलों आहें."

मरण म्हणजे तेल संपत आलेला दिवा भरून आणणें. नंदादीप पुन्हां प्रज्वलित करणें. प्रकाश आणण्यासाठीं जाणें म्हणजे मरण. किती सहृदय आहे कल्पना ! जगण्याचा कंटाळा नाहीं, सेवेचा कंटाळा नाहीं.

**तुका म्हणे गर्भवासीं । सुखें घालावें आम्हांसीं**

संतांचें हेंच मागणें असतें. या अनंत जगांत पुनः पुनः ते खेळावयास येत असतात. मोठे धैर्याचे असे ते खेळिये असतात.

भारतीय संस्कृतींत मरण म्हणजे अमर आशावाद आहे. भारतीय संस्कृतीसारखी आशावादी संस्कृति नाहीं. मरणानंतर पुन्हां तूं खेळावयास येशील. रात्रीं झोंपून सकाळीं उठलेलें बालक पुन्हां पूर्वींच्या खेळण्यांशीं खेळतें, त्याप्रमाणें आपण मेल्यानंतर पुन्हां पूर्वींच्या गोष्टींस आरंभ करतों. आदल्या दिवशीं विणलेलें अर्धवट वस्त्र दुसऱ्या दिवशीं पुन्हां विणकर विणूं लागतो, तसेंच आपण करतों. पूर्वींच्या सर्व गोष्टी हळूहळू आपणांस आठवतात. पूर्वींचें ज्ञान आपल्याजवळ

येतें. पूर्वींचे अनुभव येतात. पूर्वजन्मींच्या इतर सर्व गोष्टींचें विस्मरण पडून ज्ञानानुभवाचा जो अर्क तो आपणांजवळ असतो. पूर्वजन्मींचें सार घेऊन आपण नवीन जन्माला आरंभ करतों.

कांहीं फुकट जात नाहीं; आशेनें काम कर, हळूहळू तूं पूर्ण होशील, असा आशावाद भारतीय संस्कृति देत आहे. धीर सो गंभीर. मरण म्हणजे पुन्हां नवीन जोमानें, नवीन उत्साहानें ध्येयाची गांठ घेण्याची सिद्धता.

मरण म्हणजे सक्तीनें अनासक्ति शिकविणें. उपनिषदें म्हणतात, "तेन त्यक्तेन भुंजीथाः" "अरे, जगांत दुसऱ्याची झीज भरून काढ आणि मग तूं स्वतः उपभोग घे." परंतु आपण हा आदेश विसरत असतों. आपण कोठारें भरतों, स्वतःच्या नांवावर पैसे सांठवतों. शेजारीं दुःखी दुनिया मरत असते. आणि जीवाचा उद्धार करणारें मरण येतें. या संचयाच्या पंकांतून जीवाला वर उचलण्यासाठीं मरण येतें. मरण म्हणजे मातेचे मंगल हात. आसक्तीच्या चिखलांत बरबटलेल्या जीवाला धुऊन स्वच्छ करूं पाहणारे ते हात.

धुळीमध्यें गेलें तन-मन मळून
तुझ्या अमृतहातें टाकी रे धुऊन
तुझ्या पायांजवळीं ठेवी रे निजवून
काय सांगूं देवा कोणा सांगूं ?॥

अशी जिवाची आंतील हृदयाची हांक असते. जगांतील कोणतीहि अन्य वस्तु ही घाण दूर करूं शकणार नाहीं. शेंकडों देवालयें फोडून जमा केलेल्या अगणित संपत्तीच्या चिखलांत महंमद रुतला होता. बेडकाप्रमाणें त्या चिखलांत तो आनंदानें उड्या मारीत होता. देवाला मानवाचा हा अधःपात पाहवला नाहीं. महंमदला उचलण्यासाठीं तो धांवला. महंमद रडूं लागला. तो आसक्तिमय पसारा त्याला सोडवेना, परंतु देवानें त्याला वर उचललें. मरणाचा साबण लावून त्याला धुतलें.

मदीय मालिन्य धुवावयातें
तुझ्याविणें कोण समर्थ मातें ?॥

हें जिवाचें मालिन्य धुवावयास हातांत मरणाचें अमृत घेऊन येणाऱ्या जगन्माउलीशिवाय दुसरें कोण समर्थ आहे ?

मरण आपणांस सावध करतें. सारें सोडून जावयाचें आहे असें स्पष्टपणें समजून



येतें. जीव गादीवरून घोंगडीवर येतो. देवाच्या दारांत नम्र होऊनच गेलें पाहिजे. सुईच्या नेढ्यांतून हत्ती एक वेळ पलीकडे जाईल; परंतु जगाला कृश, हीन, दीन करून स्वतः कुबेर झालेला संपन्मत्त मनुष्य देवाच्या दारांतून आंत जाऊं शकणार नाहीं.

द्वार किलकिलें स्वर्गाचें। सताड उघडें नरकाचें

नरकाकडे यांच्या मोटारी जाऊं शकतील. परंतु स्वर्गाच्या अरुंद रस्त्यांतून दुसऱ्यासाठीं झिजून चिपाड झालेला मनुष्यच जाऊं शकेल.

भारतीय संस्कृति सांगते, "मरतांना तरी गाद्यागिर्द्यांवरून खालीं ये." आपण बाहेर जगांत भिरवतों तेव्हां कोट-बूट घालून जातों. सर्व ऐट त्या वेळेस असते. परंतु सायंकाळीं घरीं येऊन तुळशीच्या अंगणांत बसलेल्या आईला जेव्हां आपण भेटावयास जातों तेव्हां उपरणें, रुमाल, कोट सारें ओटीवरच राहतें. आपण आईचा मंगल हात अंगावरून फिरावा म्हणून तिच्याजवळ उघडें येऊन बसतों. त्याप्रमाणें जगांत भिरवल्यानंतर जेव्हां आयुष्याच्या सायंकाळीं आपण त्या परम थोर मातेला भेटावयास जाऊं, त्या वेळेस उघडें होऊन गेलें पाहिजे. दागदागिने, मोठमोठीं वस्त्रें–सारें वैभव दूर ठेवून गेलें पाहिजे. एक भक्तिप्रेमाचें वैभव घेऊन आईजवळ जावयाचें.

परंतु मनुष्याला कधीं कधीं आईलाहि उघडें होऊन भेटावयाची लाज वाटते. दुर्योधन आईची कृपादृष्टि सर्वांगावर पडून अमर होण्याची इच्छा करीत होता. परंतु त्याला लाज वाटली. फुलांची चड्डी तरी तो नेसलाच. त्याचें इतर शरीर अमर झालें, परंतु मांड्या भीमाच्या गदेनें चूर्ण झाल्या. आईजवळ आडपडदा नको. अमर जीवन पाहिजे असेल, तर मातेजवळ मूल होऊन जा. जन्माला आलेत तेव्हां घोंगडीवर आलेत. आतां मरतांना घोंगडीवर मरा. जन्मतांना बाळ व मरतांना बाळ. फरक इतकाच, कीं जन्मतांना आईपासून दूर आलेत म्हणून रडलेत. आतां मरतांना पुन्हां आईजवळ जावयाचें आहे म्हणून हंसा. जन्मतांना आपण रडलों, परंतु लोक आनंदानें हंसले. आतां मरतांना आपण हंसूं व लोक आपली गोड आठवण करून रडतील असें करूं.

जीवन कसें जगलों याची परीक्षा म्हणजे मरण. तुमच्या मरणावरून तुमच्या जीवनाची किंमत करण्यांत येईल. जो मरतांना रडेल त्याचें जीवन रडकें ठरेल. जो मरतांना हंसेल त्याचें जीवन कृतार्थ समजण्यांत येईल. थोरांचें मरण म्हणजे एक दिव्य वस्तु आहे. तें अनंताचें दर्शन आहे. किती शान्ति, किती समाधान !

सॉक्रेटिस मरतांना अमृतत्व भोगीत होता. गटे मरतांना म्हणाला, "अधिक प्रकाश, अधिक प्रकाश." तुकाराममहाराज 'रामकृष्ण हरि' करीत गेले. समर्थ म्हणाले, "माझा दासबोध आहे. रडतां काय?" लोकमान्य "यदा यदा हि धर्मस्य" हा श्लोक म्हणत गेले. पंडित मोतीलाल नेहरू गायत्री मंत्र म्हणत गेले. देशबंधु दास "आलों, तुझ्या प्रियतम दारांत दिवा पुन्हां पेटवण्यासाठीं आलों" असें म्हणाले. हरिभाऊ आपट्यांजवळ मरतांना नामदार गोखले म्हणाले, "हरिभाऊ! या जगाची गंमत पाहिली. आतां त्या जगांतलि पाहूं." भगिनी निवेदिता निजधामाला जातांना म्हणाल्या, "तो पहा उषःकाल होत आहे, भारताचा उषःकाल येत आहे. प्रकाश पाहून मी मरत आहें. धन्य!" शिशिरकुमार घोष चैतन्य-चरित्रामृताचा जो शेवटला भाग, त्यांतील शेवटच्या पानांतील शेवटच्या ओळींचें मुद्रित पाहून म्हणाले, "आतां माझें काम संपलें. निताई गौर! घ्या आतां मला पदरांत." हे शब्द बोलून त्या महापुरुषानें डोकें उशीवर टेकलें! महात्मा गांधींचे प्राण पुण्यश्लोक मगनलाल गांधी, "मंगल मंदिर खोलो; देवा! दार उघड. दिव्य प्रेमामृताची तहान लागलेला हा बालक तुझ्या दारांत येत आहे. प्रेमाचा पाऊस पाड. या संसारांत भटकून भटकून दमलेल्या या बाळाला पोटाशीं घे. तुला गोड हांका मारणाऱ्या या मुलाजवळ देवा, गोड गोडसें बोल. उघड, तुझें मंगल दार उघड," अशा अर्थाचें दिव्यगीत म्हणत निजधामास गेले.

जगांत अशीं किती तरी थोर महाप्रस्थानें झालीं असतील. मरण म्हणजे मेवा. मरण म्हणजे शान्ति. मरण म्हणजे नवजीवनाचा आरंभ. मरण म्हणजे आनंदाचें दर्शन. मरण म्हणजे पर्वणी. जिवाशिवाच्या ऐक्याचें संगीत. मरण म्हणजे प्रियकराकडे जाणें.

कर ले शृंगार, चतुर आलबेली।
साजन के घर जाना होगा॥
मट्टी ओढावन मट्टी बिछावन।
मट्टीमें मिल जाना होगा॥
न्हाले धूले शीस गुथाले।
फीर वहाँ से नहिं आना होगा॥

"आज प्रियकराच्या घरीं जावयाचें आहे. शृंगार-साज सारा कर. मातीची ओढणी अंगावर घे. मातीच्या शय्येवरच आज मिळून जावयाचें आहे. न्हाऊन माखून तयार हो. नीट केंस वगैरे विंचर. वेणीफणी कर. एकदां त्या घरीं गेल्यावर फिरून नाहीं येणें होणार. कर सारी तयारी."



किती सुंदर आहे हें गाणें! किती सुंदर आहे भाव! मरण म्हणजे जगाचा वियोग, परंतु जगदीश्वराशीं योग. जिवाशिवाची लग्नघटिका म्हणजे मरण! आपण मनुष्य मेला म्हणजे त्याला नवें वस्त्र नेसवतों. त्याला आंघोळ घालतों. त्याला सजवतों. जणुं तें विवाहमंगल असतें! मरण म्हणजे विवाहमंगल! मरण म्हणजे विवाहकौतुक!

भारतीय संस्कृतीनें मरणाची नांगी काढून टाकली आहे. भारतीय संस्कृतीनें मरणाला जीवनाहून सुंदर व मधुर बनविलें आहे. "प्राणो मृत्युः" मृत्यु म्हणजे प्राण असा सिद्धान्त स्थापिला आहे. मरण म्हणजे खेळ. मरण म्हणजे गंमत. मरण म्हणजे मेवा. मरण म्हणजे अंगरखा काढणें. मरण म्हणजे चिरलग्न!

ज्या संस्कृतीनें मरणाचें जीवन बनविलें, त्या संस्कृतीच्या उपासकांत आज मरणाचा अपरंपार डर भरून राहिला आहे. मरण हा शब्दहि त्यांना सहन होत नाहीं. केवळ शरीराला कुरवाळणारे सारे झाले आहेत. महान् ध्येयासाठीं हीं देहाचीं मडकीं हंसत हंसत फोडावयास जे निघतील, तेच भारतीय संस्कृतीचे खरे उपासक! कांतडीं सांभाळणारे भारतीय संस्कृतीचे पुत्र शोभत नाहींत. भारतांतील सर्व प्रकारचें दैन्य-दास्य, सर्व प्रकारचें विषमय वैषम्य, सर्व प्रकारचा अंधार दूर करण्यासाठीं देहाचीं बलिदानें करावयास लाखों कन्यापुत्र उठतील, त्या वेळेसच भारतीय संस्कृतीचा सुगंध दिगंत जाईल व भारत नव-तेजानें फुलेल.

## उपसंहार : : २४

भारतीय संस्कृति या महान् विषयावर थोड्याफार गोष्टी मीं मांडल्या आहेत. भारतीय संस्कृतीवर अपरंपार प्रेम मी करीत आलों आहें. भारतीय संस्कृतीवर ज्ञानानें लिहिण्याचा मला अधिकार नाहीं. परंतु प्रेमानें लिहिण्याचा मला अधिकार आहे. भारतीय संस्कृतीवर प्रेम करण्यांत मी कोणासहि हार जाणार नाहीं. या प्रेमानेंच मला वेडेंवाकडें लिहावयास लाविलें आहें. भक्तीमुळेंच मी बोललों आहें.

भारतीय संस्कृति निर्दोष व्हावी, वाढत जावी, तेजानें फुलावी असें मला उत्कटतेनें वाटतें. ही संस्कृति ज्ञानमय आहे, संग्राहक आहे, कर्ममय आहे. ही संस्कृति सर्वांना जवळ घेईल, नवीन नवीन प्रयोग करील, अविरत उद्योग करील. भारतीय संस्कृति म्हणजे सर्वांगीण विकास, सर्वांचा विकास. भारतीय संस्कृतीचा आत्मा स्पृश्यास्पृश्यें मानीत नाहीं, हिंदु-मुसलमान जाणत नाहीं. प्रेमानें व विश्वासानें सर्वांना मिठी मारून, ज्ञानमय व भक्तिमय कर्माचा अखंड आधार घेऊन मांगल्य-सागराकडे, खऱ्या मोक्ष-सिंधूकडे जाणारी ही संस्कृति आहे.

भारतीय संस्कृतीच्या उपासकांची महान् यात्रा अनादिकालापासून सुरू आहे. व्यास-वाल्मीकि, बुद्ध-महावीर, शंकर-रामानुज, ज्ञानेश्वर-तुकाराम, नानक-कबीर, वगैरे मोठमोठ्या संतांनीं ही यात्रा चालवलेली आहे. आजहि महात्मा गांधी, त्यागमूर्ति जवाहरलाल, महर्षि अरविंद वगैरे महान् विभूती ती भव्य यात्रा पुढें नेत आहेत. चला आपण लहानमोठे या यात्रेंत सामील होऊं.

या रे या रे अवघेजण

अशी हांक हे भारतीय संस्कृतीचे सत्पुत्र सर्वांना मारीत आहेत. ही हांक ज्याच्या हृदयाला पोंचेल तो धन्य होय!

# परिशिष्ट

## १ काळाची कल्पना

भारतीय संस्कृति एक प्रकारें दिक्कालातीताची उपासना करणारी आहे. अनंत काळ तिच्या डोळ्यांपुढें असतो. गीतेमध्यें ब्रह्मदेवाची कालगणनापद्धति आली आहे. हजारों युगें म्हणजे ब्रह्मदेवाचा एक दिवस! या कल्पनेंत मोठें स्वारस्य आहे. मनुष्य जितका विशाल दृष्टीचा, तितकी त्याची काळाची कल्पनाहि विशाल असते. महात्माजी म्हणाले, "मी सहा महिन्यांतच स्वराज्य देतों." परंतु हे महात्माजींचे सहा महिने! पन्नास वर्षांत राष्ट्राला स्वराज्य मिळालें, तरी तें सहा महिन्यांतच मिळाल्यासारखें आहे. राष्ट्राच्या आयुष्यांत शतकें म्हणजे क्षण असतात व विश्वाच्या इतिहासांत युगें म्हणजे क्षण असतात.

महापुरुष या दृष्टीनें पहात असल्यामुळें ते निराश होत नसतात. परंतु याचा अर्थ असा नव्हे, कीं जातो तो क्षण महत्त्वाचा मानावयाचा नाहीं. याच क्षणीं कार्य झालें पाहिजे असा तर निश्चय हवा. परंतु त्याबरोबरच, एकनिष्ठ प्रयत्ना-बरोबर काळ अनंत आहे ही कल्पनाहि जवळ असावी. जगांत कांहीं फुकट जाणार नाहीं. प्रयत्नवाद व आशावाद या दोहोंचा समन्वय भारतीय संस्कृति करते.

## २ श्राद्ध

पूर्वजांबद्दल अत्यंत आदर पौर्वात्यांत आहे. चीन व जपान या देशांत वृद्धपूजा हा धर्मच झाला आहे. भारतीय संस्कृति वृद्धांबद्दल आदर शिकविते. तुम्ही भारतांत कोठेंहि जा, तेथें वृद्धांबद्दलची पूज्यबुद्धि दिसेल. खेड्यांत तुम्ही जा. म्हाताऱ्या मंडळींस मोठ्या आदरानें वागवतात. म्हातारा मनुष्य भेटतांच "या दाजी" असें म्हणून घोंगडी पसरतात.

घरांतहि वृद्धांना फार मान. कांहीं समारंभ असो, आधीं त्यांना नमस्कार. त्यांना लोडाशीं बसवतील, त्यांचा आशीर्वाद घेतील. त्यांचे पाय चेपतील, त्यांच्या गोष्टी ऐकतील.

वृद्धपूजा म्हणजे ज्ञानपूजा. ज्ञानपूजा म्हणजे अनुभव. अनुभव म्हणजे ज्ञान. त्या शुभ्र केसांत अनुभवाचें शुद्ध ज्ञान असतें. त्या वांकलेल्या पाठीवर अनुभवांचें मौल्यवान् गांठोडें असतें. त्या सुरकुतलेल्या शरीरावर कित्येक वर्षांचा इति-

ह्रास असतो. पूर्वींची परंपरा वृद्धांना माहीत असते, त्यांनीं तो परंपरेचा दीप स्वतः पाजळून नवीनांच्या हातांत दिलेला असतो.

भारतीय संस्कृतींत श्राद्धदिन आहे. श्राद्ध म्हणजे पूर्वजांबद्दल आदर. महात्म्यांचें श्राद्ध सर्वांनीं करावयाचें. श्रीरामचंद्र किंवा श्रीकृष्ण यांचें आपण श्राद्ध करीत नसतों, परंतु जयंती करीत असतों. ज्यांना आपण अवतार मानलें त्यांची जयंती करावयाची. कारण त्यांचा जन्मच मंगलासाठीं असतो.

**भवोहि लोकाभ्युदयाय तादृशाम्**

ते जन्मतांच दिशा प्रसन्न होतात, वारे मधुर वाहतात. परंतु इतर लोकांचें तसें नाहीं. इतर लोक कसे होते हें ते मेल्यावर कळतें. त्यांची सारी आयुर्मर्यादा पाहून मग त्यांचें मोल ठरवावयाचें असतें. श्रीशिवछत्रपति, श्रीज्ञानदेव, श्रीतुकाराम यांची आपण पुण्यतिथि साजरी करतों. कारण जन्मतःच त्यांचा मोठेपणा ज्ञात नव्हता. तो पुढें ज्ञात झाला. श्रीशिवछत्रपतींहि पुढें अवतार समजले जाऊं लागले व त्यांचीहि जयंती करण्यांत येऊं लागली.

थोर महात्मे हे एका जातीचे, एका गांवचे नसतात. ते सर्वांचे असतात. म्हणून त्यांच्या श्राद्धांत सर्वांनीं गोळा व्हावयाचें. कांहीं महात्मे जगाचे असतात, कांहीं देशाचे असतात, कांहीं प्रांताचे असतात, कांहीं गांवचे असतात. त्यांचे त्यांचे उत्सव त्या त्या मानानें साजरे होतात.

परंतु आपले आईबाप आपल्याला मोठेच आहेत. आपले पूर्वज आपणांस पूज्यच आहेत. ते जगाला माहीत नाहींत. परंतु आपणांस माहीत असतात. त्यांचें स्मरण करणें हें आपलें कर्तव्य आहे. कृतज्ञतेसारखी मधुर वस्तु क्वचितच असेल.

भारतीय संस्कृति रोज पितृतर्पण व ऋषितर्पण करीत असते. ऋषींचें स्मरण व पूर्वजांचें स्मरण. ज्यांनीं ज्ञान दिलें त्यांचें स्मरण, ज्यांनीं देह दिला त्यांचें स्मरण. सर्वांचीं नांवें आपण कशीं घेणार? त्या तर्पणांत कांहीं नांवें असतात. परंतु तीं नांवें सर्व ज्ञात-अज्ञात ऋषींचीं व पितरांचीं प्रतिनिधिभूत असतात.

श्राद्ध म्हणजे श्रद्धेनें केलेलें स्मरण. ज्या दिवशीं आईबाप वारले त्या दिवशीं त्यांचें स्मरण करावयाचें. आपण तीन पिढ्यांचें स्मरण करतों. परंतु तीन पिढ्यांचें स्मरण म्हणजे जणुं सर्वांचेंच स्मरण असतें. श्राद्धाच्या दिवशीं घर सारवून स्वच्छ ठेवावयाचें. एक प्रकारें गंभीर वातावरण घरांत असतें. पिंडांना नमस्कार करण्यासाठीं घरांतील लहान-थोर जमतात. आप्तइष्ट येतात.



श्राद्धाच्या दिवशीं तीनच पिढ्यांचें स्मरण. परंतु सर्व पूर्वजांबद्दल एक दिवस वर्षांतून ठेवलेला आहे. भाद्रपद महिन्यांतील अमावास्या ही सर्वपितृ अमावास्या म्हणून मानलेली आहे. त्या दिवशीं सर्व पितरांचें स्मरण करावयाचें.

श्राद्ध म्हणजे कृतज्ञता. रोज आपण आपल्या व्यवहारांत दंग असतों. परंतु वर्षांतून एक दिवस तरी आईबापांचें स्मरण व्हावें. भारतीय संस्कृतींत श्राद्धाला फार महत्त्व आहे. पाणी देण्यास कोणी तरी हवें, नाहींतर मरणोत्तर गति नाहीं असें समजण्यांत येई. नरकापासून तारतो तो पुत्र, अशी पुत्र शब्दाची व्युत्पत्तीहि देण्यांत येई. ज्याला पुत्र नाहीं, त्याचें घर अमंगल मानण्यात येई. पुत्राशिवाय घराला शोभा नाहीं.

याचा अर्थ एवढाच, कीं परंपरा चालावी. आपण आपली कुलपरंपरा कोणाच्या तरी हातांत देऊन निघून जावें. जो वंशतंतु आपल्या हातांत आला तो आपण तोडणें म्हणजे पाप आहे. तो तंतु अखंड ठेवला पाहिजे. अशा रीतीनें आपण अमर होत असतों. पुत्र असला म्हणजे पितरांना स्वर्ग मिळतो. पितर अमर होतात. पुत्रांच्या रूपानें ते अमर होतात. सर्व पूर्वजांचें पुंजीभूत स्वरूप पुढील वंशतंतूत असतें; म्हणजेच ते सारे अमर होतात हा अर्थ.

प्रत्येक देशांत ही श्राद्धकल्पना आहे. पाश्चिमात्य देशांत पुण्यतिथीच्या दिवशीं समाधीवर फुलें वाहतात.

श्राद्धाच्या दिवशीं दोन हेतू प्रधान असतात. एक पूर्वजांचें कृतज्ञतेनें स्मरण आणि दुसरें आपणांसहि असें मरावयाचें आहे याचेंहि स्मरण. म्हणून श्राद्धाच्या दिवशीं दान करावें. एक दिवस सारें सोडून जावयाचें आहे, त्याची तयारी करावयाची. थोडें थोडें देऊन टाकावयास शिकावयाचें. श्राद्धदिन म्हणजे नम्रता शिकण्याचा दिन, अनासक्ति शिकण्याचा दिन, "कर्तव्य नीट कर, केव्हां जावें लागेल याचा नेम नाहीं" अशा चेतवणीचा दिन.

श्राद्धाच्या दिवशीं आपण ब्राह्मण बोलावतों. त्यांना भोजन देतों. श्राद्धाचें स्वरूप कालाप्रमाणें बदलेलहि. समजा, आज कोणीं असें जेवण वगैरे न दिलें तरी तो अधर्म आहे असें नाहीं. दुसऱ्या स्वरूपांत दान दे. खादी घेऊन वाट. एखाद्या संस्थेला साहाय्य कर. परंतु श्राद्ध केलेंच पाहिजे. श्रद्धेनें, कृतज्ञतेनें पूर्वजांचें स्मरण व आपल्या मरणाचेंहि स्मरण ताजें रहावें म्हणून त्या निमित्तानें त्याग. असा हा श्राद्धविधि आहे.

## ३ एकान्त व एकाग्रता

भारतीय संस्कृतींत एकान्त ही एक महत्त्वाची वस्तु आहे. संसाराच्या रामरगाड्यांतून मन जरा अलिप्त करावयाचें. मन शान्त करावयाचें. मनावरची सारी सुख-दुःखांची गांठोडीं क्षणभर काढून फेंकून धावयाचीं. मनाला मुक्त करावयाचें.

एकान्त म्हणजे विश्रांति. त्या वेळेस आपण आपल्या खोल स्वरूपाशीं जणुं मिळून जावयाचें. आंत आंत जावयाचें. आकाशांत शेंकडों ढग येतात, हजारों वारे सुटतात, धुळीचे लोट उठतात, पांखरें उडतात, परंतु या सर्वांच्या पाठीमागें आकाश निळें निळें असतें. त्या आकाशाला या गोष्टींचा स्पर्श नाहीं. आपलें हृदयाकाश असेंच करावयाचें. रिकामें करावयाचें. स्वच्छ करावयाचें. यासाठीं एकान्ताचा आश्रय करावयाचा.

जरा सायंकाळीं टेकडीवर जाऊन बस. नदीकांठीं जाऊन बस. उचंबळणाऱ्या सागराला पहा. रमणीय बागेंत जा. जरा संसारांतील त्रास-चिंता विसर. परंतु मनुष्याला संसाराचा इतका हव्यास आहे, कीं तो फिरावयासहि एकटा जाणार नाहीं. चार जणांना हांक मारून फिरावयास जाईल. तो संसार बरोबर. त्याच गप्पा, कचेरी-कोर्टाच्या गप्पा, शाळा-कॉलेजांतील गप्पा, आपापल्या कर्मक्षेत्रांतील गप्पा. सर्वांची निंदास्तुति चालावयाची.

आपलें मन म्हणजे जणुं उकिरडा. साऱ्या जगाची घाण जणुं तेथें येऊन पडलेली असते. आपलें मन म्हणजे जणुं चावडी किंवा चव्हाटा. सर्वांची चर्चा या मनांत सदैव चाललेली. अमेरिकेंतील निसर्गप्रेमी थोरो यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे, " Our mind is like a bar-room ! " वकिलांच्या बैठकींत साऱ्या जगाच्या उठाठेवी चालतात, तसें आपल्या मनाचें आहे.

परंतु या मनाला स्वतःच्या आत्म्याची ओळख नसते. त्याला स्वतःच्या जीवनांत कांहीं आनंदच नाहीं. आनंदाचा झरा आंत आहे याची जाणीव त्याला नाहीं. त्याचा आनंद परवश आहे. वर्तमानपत्र वाचलें नाहीं, कीं चुकल्यासारखें होतें. कोणाचें पत्र आलें नाहीं म्हणजे वाईट वाटतें. ज्याचें टपाल रोज पुष्कळ येतें, त्याला वाटतें आपण केवढे मोठे ! किती जगाशीं संबंध !

परंतु हा मोठा मनुष्य दरिद्री असतो. त्याला त्याच्या आत्म्याचें एकहि पत्र मिळत नसतें. त्या आत्म्याची एकहि हांक त्याला ऐकूं येत नसते. या आत्म्याचीं पत्रें ज्याला येऊं लागलीं, त्याच्याहून भाग्यवान् कोण ? या आत्म्याची नेहमीं



उपेक्षा होत असते. तुरुंगांत ज्याप्रमाणें कैद्याची उपेक्षा होते, परंतु तुरुंगांच्या भिंतींची प्रत्येक क्षणीं पाहणी होते, लिंपालिंपी होते, त्याप्रमाणेंच या देहांतील कैदी जो आत्मा त्याची उपेक्षा होते. परंतु या देहाची मात्र कोण काळजी ! तो कैदी आंत मरत आहे ! अरे, त्याची जरा गांठ घे.

एकान्ताची ज्याला संवय आहे, त्याची पटकन् एकाग्रताहि होते. एकाग्रतेची आपणांस फार आवश्यकता असते. कोणताहि प्रश्न सोडवतांना मन एकाग्र करतां आलें पाहिजे. संसार वा परमार्थ, त्या त्या वेळच्या महत्त्वाच्या गोष्टी उलगडतांना जर मनाची, बुद्धीची एकाग्रता करतां आली नाहीं, तर प्रश्न सुटत नाहीं. आपण गोंधळून जातों. महात्माजींच्या सारखे महापुरुष पटकन् चित्त एकाग्र करून सर्व परिस्थितीचें आकलन करून घेऊं शकतात.

एकान्तात आपणांस सामर्थ्य मिळतें, आशा मिळते. जणुं देवाघरीं जाऊन ताजेतवानें होऊन येतों. एकान्त म्हणजे एक प्रकारें मरण. मरणानंतर जसा पुन्हां नवीन जन्म, त्याप्रमाणें एकान्तांतून जणुं पुनर्जन्म होऊन आपण बाहेर पडतों. बुद्धीवरचीं, हृदयावरचीं सर्व कश्मलें झाडून टाकून आपण बाहेर येतों.

आपल्या सर्वांच्या घरांत देवघर असतें. ती एकान्ताची जागा. तेथें जाऊन सारें कांहीं विसरावयाचें. देवाजवळ उघडें व्हावयाचें. त्याचा हात सर्वांगावरून फिरवून घ्यावयाचा. केवढें समाधान तें असतें ! केवढी शान्ति !

देवाजवळ क्षणभर बसून आलेला मग सर्व दानवांना भारी होतो. अपार चैतन्य त्याच्याजवळ असतें. दुर्दम्य आशावाद तो घेऊन येतो. श्रद्धेचें सामर्थ्य घेऊन येतो. एकान्त म्हणजे संजीवनसिंधु मिळविण्याची जागा. एकान्तांत हंसण्या-साठीं रडणें असतें. उड्डाण करण्याकरितां सर्व संकोच असतो. कर्माचा जोरदार वेग निर्माण करण्यासाठीं कर्मशून्यत्व असतें. एकान्त म्हणजे सर्व सामर्थ्याचा साक्षात्कार !

एकान्त म्हणजे माणूसघाणेपणा नव्हे. जगाला तुच्छ लेखणें नव्हे. जगाला विटणें नव्हे. एकान्त म्हणजे स्वतःचें बरबटलेलें जीवन धुऊन टाकण्याची जागा. अत्यंत चिखलानें भरलेलें वस्त्र ज्याप्रमाणें एका बाजूला जाऊन आपण धुतों, त्याप्रमाणें अत्यंत मलिन झालेलें जीवन एकान्तांत जाऊन धुवावयाचें. समाजाची सेवा अधिक उत्कटतेनें व आशेनें, अधिक सामर्थ्यानें व श्रद्धेने करतां यावी म्हणूनच एकान्त सेवावयाचा. मरण म्हणजे सर्वांत मोठा एकान्त !

This book may be kept a fortnight.

ENTERED

SHML-BK
BK3638

B
131.7
.S2
साने गुरुजी.
भारतीय संस्कृति.

| Signature | Issue Date |
|---|---|
| | |

B
131.7
.S2
BK-3638